**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – २३**

**सभावृत्तांत**

**दिनांक – २०.१०.२०१८** **वेळ – दुपारी २.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑक्टोबर - २०१८ ची मा. महापालिका सभा शनिवार दिनांक २०/१०/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.चिंचवडे सचिन बाजीराव | उपमहापौर |
| ३) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ४) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ५) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ६) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ७) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ८) | मा. नितीन ( आप्पा ) प्रताप काळजे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १३) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. अॅड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.लांडे विक्रांत विलास

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४६) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४७) मा.घोलप कमल अनिल

४८) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४९) मा.पवळे सुमनताई मधुकर

५०) मा.चिखले सचिन तुकाराम

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.प्रमोद कुटे

५४) मा.राजू मिसाळ

५५) मा. शैलजा अविनाश मोरे

५६) मा.बाबर शर्मिला राजू

५७) मा.अमित राजेंद्र गावडे

५८) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५९) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

६०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

६१) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६२) मा.ढाके नामदेव जनार्दन

६३) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६४) मा.करुणा शेखर चिंचवडे

६५) मा.भोईर सुरेश शिवाजी

६६) मा.अपर्णा निलेश डोके

६७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६९) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

७०) मा.जयश्री वसंत गावडे

७१) मा.कोमल दिपक मेवानी

७२) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७३) मा.सुलक्षणा राजू धर

७४) मा.शाम गणपतराव लांडे

७५) मा.सुजाता सुनिल पालांडे

७६) मा.योगेश मंगलसेन बहल

७७) मा.कदम निकीता अर्जुन

७८) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७९) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.काळे उषा दिलीप

८३) मा.कोकणे संतोष अंकुश

८४) मा.पवार मनिषा प्रमोद

८५) मा.बारणे अर्चना तानाजी

८६) मा.अभिषेक गोविंद बारणे

८७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८८) मा. अॅड. भोसले सचिन सुरेश

८९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९०) मा.बारणे माया संतोष

९१) मा.निलेश हिरामण बारणे

९२) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

९३) मा.दर्शले रेखा राजेश

९४) मा.कलाटे राहुल तानाजी

९५) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९६) मा.ममता विनायक गायकवाड

९७) मा.कामठे तुषार गजानन

९८) मा.चोंधे आरती सुरेश

९९) मा.कस्पटे संदिप अरुण

१००) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

१०१) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१०२) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०३) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०४) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०५) मा.कुटे निर्मला संजय

१०६) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०७) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०८) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०९) मा.मुंढे उषा अंकुश

११०) मा.कदम शशिकांत गणपत

१११) मा.लोखंडे चंदा राजू

११२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

११३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११९) मा.नवनाथ दत्तू जगताप

१२०) मा.संतोष बबन कांबळे

१२१) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२२) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२३) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२४) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२५) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२६) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२७) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२८) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डिकर-आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर - प्र.अतिरिक्त आयुक्त (१), मा.दिलीप गावडे-प्र.अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.कुंभोजकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे-मुख्यलेखा अधिकारी, मा.चितळे, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर-सहा.आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.खोत – प्र.सहा.आयुक्त, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा कुलकर्णी, मा.गलबले, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील, मा.पवार, मा.सुपेकर-कार्यकारी अभियंता, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले- समाज विकास अधिकारी व मा.माने-लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर- उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.विलास मडिगेरी** – मा. महापौर साहेब, अमृतसर [पंजाब] येथे झालेल्या रेल्वे अपघातात ५८ जणांचे निधन तसेच कविता महाजन -मराठी साहित्य विश्वातील प्रसिध्द लेखिका, संतोष मयेकर-सिनेनाटय अभिनेता, जीवन गायकवाड -कार्यकारी अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, श्रीमंत आबासाहेब घोरपडे -इचलकरंजीचे संस्थानिक, एन.डी. तिवारी - जेष्ठ नेते व उत्तर प्रदेश तसेच उत्तराखंडाचे माजी

उपमुख्यमंत्री, अशोक महादु काशिद -प्रभाग क्रमांक २९ यांचे निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आपल्या पालिकेमधील एकदम संयमी, शांत आणि हुशार असे आमचे अधिकारी जीवन गायकवाड यांचे काही दिवसांपूवी डेंग्यू या आजाराने दु:खद निधन झाले आहे. खरतर आताच पाच ते सहा महिन्यापासून त्यांचे आणि आमचे एक सलोख्याचे आणि चांगले संबंध होते आणि वेळोवेळी चांगले मार्गदर्शन त्यांनी आम्हाला केलेले आहे. मी माझ्या पक्षाच्या वतीने आणि सर्व नगरसेवक, नगरसेविकांच्या वतीने, पदाधिकारी बांधवांच्या वतीने आदरणीय जीवन गायकवाड साहेब यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

**मा. ज्ञानदेव थोरात** - मा.महापौर साहेब, श्रध्दांजली सुचनेला अनुमोदन आहे.

**मा. महापौर** – श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

[सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली]

अ) मा. महापालिका सभा क्र- १८ दि.२०/६/२०१८ (दु.२.००), दि.२२/६/२०१८ (दु.३.०० व सायं ८.५०) व दि.२७/६/२०१८ (दु.३.००) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा. महापालिका सभा क्र- १९ दि.२०/७/२०१८ ( दु.२.०० व २.३० वा.) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

**मा. दत्तात्रय साने** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह सभा क्रमांक १९ ला उपसूचना दिली होती. ५७० कोटीची तो विषय आता आहे का याच्यामध्ये.

**मा. महापौर** – तो विषय आता नाही. पाण्याच्या विषयावर कोणालाच काय बोलायचे नाही का.

**मा. अश्विनी चिंचवडे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. सध्या पाण्याचा प्रश्न खूपच जटील झालेला आहे. आयुक्त साहेब तुम्ही ऐन गौरीच्या सणामध्ये

आम्हाला आश्वासन दिले होते मी तेव्हाही बोलले होते. प्रशासनाचा मी निषेध केलेला होता. पण आता नवरात्र झाली तरीही पाण्याचा प्रश्न आमच्या भागातला तरी पूर्ण झालेला नाही. आणि त्या संदर्भातच जरा मला बोलायचे आहे. पाऊस पुरेसा पडला आहे. पिंपरी चिंचवडला ज्या धरणातून पाणी येते त्या धरणामध्ये साठा भरपूर आहे. तरी आता पाणी प्रश्न का उपलब्ध झालेला आहे. आयुक्त साहेब खुलासा करावा. तसेच जे अधिकारी आहेत ते सतत तांत्रिक बिगाड किंवा लाईट गेलेली आहे अशी काहीतरी उत्तरे देतात. मग आपण सल्लागार कशासाठी नेमतोय किंवा कन्सलटंट का नेमलेला असतो. स्काडा पध्दती आहे मग हे सगळे प्रश्न का उदभवतात पाण्याचे. आयुक्त साहेब त्याबद्दल मला खुलासा पाहिजे. पाण्याचे ऑडीट झाले पाहिजे. जर ते ऑडीट झाले तरच पाण्याचा किती अपव्यय होतोय हे लक्षात येईल. त्यामुळे किती नुकसान होतेय तेही लक्षात येईल. येणा-या आणि जाणा-या पाण्याचा हिशोब त्यामध्ये घेतला जाईल. त्यासाठी लेखापरीक्षण व्हावे. आयुक्त साहेब जर आपण नागरीकांना मूलभूत गोष्टीच व्यवस्थित देऊ शकत नाहीतर आपण स्मार्टसिटी म्हणतोय की बेस्टसिटीकडे वाटचाल करायची आहे. मग हा पाण्याचा प्रश्न सुटला पाहिजे. हया मूलभूत गरजा आहेत. त्या तरी आपल्याला व्यवस्थित पार पाडल्या पाहिजेत. आपण नागरीकांकडून एवढी पाणीपट्टी घेतोय आणि जर त्यांना पाणी पुरेशा प्रमाणात देत नसेल तर पाणीपट्टी घेण्याचा हक्क पण आपल्याला नाही आयुक्त साहेब. महापौर साहेब तुम्ही ही पाण्याची बॉटल आयुक्त साहेबांना भेट दया त्यांच्या लक्षात तरी राहील की पाण्याचा प्रश्न किती आहे. पाण्याची बॉटल महापौर साहेब तुम्ही दया. आयुक्त साहेब चिंचवडगावात नदी डोक्याला आहे आणि कोरड घशाला पडलेली आहे. कारण नागरीक एवढे त्रस्त झालेले आहेत पाण्यासंदर्भात. आयुक्त साहेब पाण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय दिला पाहिजे. येथून मागे कधीच असा पाण्याचा तरी प्रश्न उदभवला नव्हता. मग आताच काय झालेले आहे असे. याचा खुलासा व्हावा, धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आयुक्तसाहेब जवळजवळ तीन वर्षे झाले. आज माझा प्रभाग क्रमांक २० संत तुकारामनगर येथे संत तुकारामनगर, वल्लभनगर, गंगानगर या लोकांना पाणी अजिबात येत नाही. मी जवळजवळ आतापर्यंत तीन ते चार मिटींगला आम्ही बसलोत.

प्रत्येक मिटींगमध्ये तुम्ही आश्वासने दिलीत. आठ दिवसांनी पाणीपुरवठा व्यवस्थित होईल. आठ दिवसांनी पाणीपुरवठा व्यवस्थित होईल. पण आज हया प्रशासनाचा आम्हाला निषेध करावा लागत आहे. अजुनही पाणीपुरवठा सुरळीत केलेला नाही. अगोदर पाणी ४६५ एमएलडी येत होते. आता आम्हाला कळले की ४८० एमएलडी पाणी आपण घेत आहोत. जर महापौर १० लाख लोकसंख्या होती त्यावेळेला आपण ४६५ एमएलडी पाणी देत असूतर आता २० लाख लोकसंख्याच्या वर जर आपण गेलो असेलतर आपण जास्तीचे पाणी का घेतले जात नाही, हा पहिला प्रश्न. आता मगाशी आम्हाला आयुक्तांनी सांगितल की ४६५ एमएलडी पाणी हे २० लाख लोकसंख्येच्या गणनेनुसार बरोबर आहे. ते पाणी बरोबर पुरते. मग पाणी कुठे जाते. एकतर तुम्ही कुठल्या तरी प्रोजेक्टला पाणी अवैधरीत्या देत असाल. जे बांधकाम अवैधरीत्या होतात त्यांना पाणी देत असाल किंवा कुठल्या तरी ऐरीयाला तुम्ही पाणी एक्सेस देत असाल. आज माझ्या प्रभाग क्रमांक २० मध्ये जे पाणी येते ते येताना नेहरुनगरच्या टाकीमध्ये पाणी येते. आज माझ्या बाजूच्या वॉर्डच्या अर्ध्या भागाला पाणी नेहरुनगरच्या टाकीवरुन जात. दिड तासाचा बायपास त्या वॉर्डला दिला जातो. मग तुमचे काय जावई आहे का तिथे का कोण आहे तिथे, का तुमचे माहेर आहे तिथे. माझ्या वॉर्डला पाणी नाही आणि बाजूच्या वॉर्डला एक्सेस पाणी दिले जाते. हे समसमान पाण्याच वाटप का केल जात नाही. पाण्याची एक्वॅलिटी का नाही. प्रत्येक वॉर्डामध्ये टॅक्सपेअर आहेत. पाण्याची जर बिले भरली जातात. पाण्याचे बील तुम्ही एक महिना भरु नका. दुस-या महिन्यामध्ये तुम्ही पाणी कट करता. जर पाणी कट करायला येता तर तुम्हांला पहील्यांदा लोकांना पाणी दयायच आहे. ही पाण्याची जी मूलभूत सुविधा आहे ती तुमच्याकडून का पूर्ण केली जात नाही. आजच्या बाजूच्या वॉर्डला जे.ई. भोसले अत्यंत धमकीदायक गोष्ट आमच्या जे.ई.ला बोलतो. लोकांना बोलतो. जेव्हा आम्ही तुम्हाला पाच वर्षापासून विचारतोय. मी ब-याचदा हा प्रश्न केला की दिड तासाचा बायपास हा त्यांना का दिला जातो. जर त्यांच्याही पाण्याच्या टाक्या आहेत तर तुम्ही तिकडून वॉल का केला नाहीत आणि ते अजुनही तुम्ही इकडून बायपास का चालू ठेवलाय. आणि माझ्या वॉर्डामध्ये वायसीएमएच सारखा एवढा मोठा प्रोजेक्ट चालू असताना हजारो लीटर पाणी तिथे लागत असते. लाखो लिटर पाणी तिकडे लागते तर माझ्या

वॉर्डला पाणी का पुरवल जात नाही. मला महापौर साहेब याचा कमिशनर यांचेकडून माझ्या वॉर्डबद्दलचा खुलासा पाहिजे. प्रत्येक वेळेला खुलासा आम्ही मागतो आणि खुलासा दिला जात नाही. आज एवढे मोठमोठे प्रोजेक्ट जर माझ्या वॉर्डमध्ये असतीलतर माझ्या वॉर्डमधील लोकांना पाणी न पुरवता त्या लोकांना जे वायसीएमला पाणी पुरविले जाते. तर माझ्या लोकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. आज माझ्याकडे बराचसा भाग असा आहे की तिथे पाण्याच्या टाक्या बांधल्या जाऊ शकत नाहीत. तरी आम्ही तुमच्या जे.ई. बरोबर असतो किंवा तुमच्या पवार साहेबां बरोबर बसतो. त्यावेळेला आम्ही त्यांना सांगतो की जेवढया आमच्याकडे सोसायटीज आहेत त्यांना रात्रीचे पाणी दया. गेल्या एक वर्षापर्यंत एका सोसायटीला कितीतरी वर्षे त्यांनी बीलच भरल नव्हत तरी त्यांना अनऑथराईज एक पाण्याची लाईन जात होती आणि ती आम्ही निदर्शनास आणून दिल्यानंतर तीथल बील चालू झालं. मग हे अधिकारी कुठल्या पध्दतीने काम करतात. अवैध रित्या जर पाणी दयायच असेल तर असे पाणी देत असताना बाकीचे जे टॅक्सपेअर्स आहेत. त्यांना पाणी का पुरविले जात नाही हा माझा मूलभूत प्रश्न आहे. पाणी पहिले ही दिले जात होते आणि आताही दिले जात आहे. आणि तेव्हाही पुरत होते तर मग आता का पुरत नाही. ते पाणी पुरलं पाहिजे. आणि अशा पध्दतीने माझ्या प्रभागाचा जो खुलासा मागितला तो खुलासा तुम्ही मला दयायचा. कारण माझ्या टाकीवरुन नेहरुनगरच्या टाकीवरुन उदयोगनगर, कामगारनगर, महेंद्ररॉयल, खराळवाडी, नेहरुनगर, संततुकारामनगर, वल्लभनगर, गंगानगर, एलआयजी कॉलनी हया सगळया भागांचा पाणीपुरवठा होतो. त्यामध्ये वायसीएमएच आहे. तो पाण्याचा पुरवठा तुम्ही ज्या वॉर्डाला एक्सेस पाणी देता ते तुम्ही कुठल्या बेसीसवर देता आणि का देता. याचे उत्तर आयुक्त तुम्हाला आज दयाव लागणार आहे. त्याशिवाय मी येथून हलणार नाही. आणि महापौर साहेब त्यांनी माझ्या वॉर्डचा खुलासा करावा नंतर तुम्ही दुस-यांना बोलायला दया.

**मा.राजू बनसोडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आख्या शहरामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. आज बरेच दिवस झाले आम्ही तक्रार करुन दखल घेतली जात नाही. आमचे तर एकदम लांबचे टोक आहे आयुक्त साहेब. त्या भागात कितीतरी दिवस झाले पाणी येत नाही, अर्धातास पाणीपुरवठा होतो,

त्यातून लोकांना पाणी मिळत नाही, पाणी व्यवस्थित वेळेत सोडत नाहीत. दुसरी गोष्ट महापौर साहेब आपल्या सत्ताधा-यांचा यांच्यावर अजिबात वचक राहिलेला नाही आणि आयुक्त साहेब तुमचाही अधिका-यांवर वचक राहिलेला नाही. त्यामुळे हे अधिकारी लोक आहेत ना त्यांचं पहिली गोष्ट काय चाललंय काय नाही त्याकडे लक्ष नाही त्यांच. वारंवार विभागवार मिटींग घेऊन त्यामध्ये सांगूनही कांबळे साहेबांना मी दहा वेळा बोललो त्यांनी हा विषय मनावर घेतलेला नाही. आयुक्तसाहेब पाण्याचा प्रश्न आता जर सुटला नाही. महापौरसाहेब तुम्ही हसू नका हा विषय महत्वाचा आहे. या शहराची काळजी आयुक्तसाहेबांना नाही, महापौरसाहेबांना नाही. इथं सभागृहामध्ये आल्यानंतर मला अर्ध्या तासाने पाणी मिळाले आहे. ओरडून ओरडून घसा बसला होता. परंतु अर्ध्या तासाने पाणी मिळाले या सभागृहात. माहपौर साहेब राष्ट्रवादीच्या काळामध्ये आजच्या एवढीच धरणाची पातळी होती. तेवढेच पाणी पडत होते धरणामध्ये. गेली तीस वर्षे राष्ट्रवादीच्या काळामध्ये पाणी व्यवस्थित येत होतं. आतांच दिड वर्षामध्ये काय अशी परिस्थिती झाली. पाणी व्यवस्थित येत नाही. सांगा आम्हाला पाणी कुठे मुरते. का खाऊ बुजाओ, बत्ती बुजाओ चाललंय सगळं. सगळ खाऊ बुजाओ, बत्ती बुजाओ चाललंय आयुक्तसाहेब. पाण्याचा प्रश्न जर व्यवस्थित सुटला नाही ना आयुक्त साहेब, मार्गी लागला नाही ना आयुक्त साहेब. तुमच्या केबीनजवळ बसून मी आंदोलन करीन. एवढं बोलून मी थांबतो.

**मा. सचिन भोसले** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आपल्या शहरामध्ये पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झाला आहे. पवना धरणामध्ये १०० टक्के धरण भरले असताना पाण्याचा प्रश्न का निर्माण होतो, याचा गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे. सर्वप्रथम आपण जर पाहिलं तर या शहरामध्ये २४X७, २४X७, २४ तास पाणीपुरवठा होणार अशी अनेक आश्वासने याठिकाणी देण्यात आली. २४X७ ची योजना ही फक्त कागदावरच राहिलेली आहे. प्रत्यक्षात अंमलबजावणी २४X७ ची या कामाची देखील आजतागायात चालू झालेली नाही. मी सगळयात पहिले प्रथमतः या शहरातल्या नागरीकांना जाहीर आवाहन करेन की जोपर्यंत शहरातल्या नागरीकांना मुबलक पाणी, स्वच्छ, वेळेत पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत या शहरातल्या नागरीकांकडून पाणीपट्टी किंवा कुठल्याही प्रकारचा टॅक्स वसुल करु नये आणि नागरीकांनी देखील तो

टॅक्स भरु नये. असं मी याठिकाणी जाहीर आवाहन करतो या शहरातल्या नागरीकांना. कारण की महानगरपालिकेची जबाबदारी आहे की या शहरामध्ये राहणा-या प्रत्येक नागरीकाला सर्व सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही महापालिका आणि प्रशासनाची आहे आणि जर त्यामध्ये आपण कमी पडत असू, आपल्याला जर नागरीकांना सुविधा देता येत नसतील तर मी याठिकाणी जाहीरपणे सांगतो आपल्याला त्यांच्याकडून पाणीपट्टी वसुल करण्याचा देखील अधिकार राहात नाही. आपल्या २४X७ ची जी योजना आहे. ज्या ठेकेदाराला हे काम दिलेले आहे. शहरामध्ये आपण संपुर्ण जर आढावा घेतलातर मोठमोठे पाईप रस्त्याच्या कडेला पडलेले दिसतील. जो कोणी ठेकेदार याठिकाणी २४X७ चे हे काम करतोय, पहिलं तर त्याला ब्लॅकलीस्ट करा. त्याला काम करण्याची पध्दत माहिती नसेल तर आणि त्याची जर काम करण्याची पध्दत चुकीची असेल तर या शहरातील नागरीकांना त्यांच्या काम करण्याने जर त्रास होत असेल तर अशा ठेकेदाराला पहिलं तर ब्लॅकलीस्ट करा. जो काम करीत नाही त्याला बाजूला काढा. भरपूर ठेकेदार आहेत. चांगली लोक आहेत काम करणारी एक्सपर्ट लोक आहेत. संपूर्ण आता तुम्ही जे टेंडर कॉल करताय. ऑलओव्हर इंडियामध्ये टेंडर काढतात. खूप एक्सपर्ट कंपन्या आहेत. त्यांना बोलवा आणि त्यांना हया कामाचे टेंडर दया. सन्माननीय महापौर काही वेळापूर्वी आपल्याकडून याठिकाणी स्पष्टीकरण देण्यात येत होते की वाकडचे काही नागरीक याठिकाणी आले होते. आपण त्यांना स्पष्टीकरण देत होता की पाण्याचे एका ठिकाणाहून डिस्ट्रीब्यूशन होतेय. मग एक साईडला वळविण्यास ते जमत नाही. मग आपण दुसरीकडे पाठविले तर तिकडे आपल्याला पाठविता येत नाही. तर माझं असे म्हणणे आहे की तुम्ही ॲडमिनिस्ट्रेटर ऑफिसर आहात. तुम्ही कंट्रोल करायला पाहिजे. इक्वल डिस्ट्रीब्यूशन ऑफ वॉटर. हे काय आम्ही तुम्हाला सांगायची गरज नाही. किंवा कुठल्या नगरसेवकांने तुम्हाला सांगायची गरज नाहीय. पवना धरणातून आपल्याला किती पाणी मिळतेय. आपण रावेतच्या बंधा-यावरुन किती पाणी उचलतोय आणि उचलल्यानंतर ते पाणी शहरातल्या कुठल्या कोप-यापर्यंत किती पाणी जातेय, किती लोकवस्ती आहे. कुठल्या लोकवस्तीला किती पाण्याची आवश्यकता आहे, याचा सर्व्हे करणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे आयुक्त साहेब तुम्ही त्याच्यामध्ये जातीने लक्ष घालून पहिले हे निश्चित करा की आपल्याला जे पाणी

मिळतय ते पाणी आपण इक्वली डिस्ट्रीब्यूट करतोय का सगळयांना. शहरामध्ये एका भागामध्ये २४ तास काही काही ठिकाणी तीनतीन वेळा पाणी जातेय. आमच्या थेरगांवला करंगळीसारखे पाणी येते, करंगळीसारखे. अधिका-यांमध्ये जे.ई.ची चूक नाहीय. १० नागरीक जर तक्रार करीत असतील तर ते १०० टक्के पाणी बंधा-यावरती दिसतंय. पण थेरगावांत पाणी येत नाही. त्या जे.ई.ला बोलून काय फायदा आहे. तुम्ही सांगताय की एक दिवस प्रॉब्लेम झाला, लाईट गेली, पाण्याचा पुरेसा साठा मिळाला नाही या टेक्निकली गोष्टी आहेत आणि आतापर्यंत सन्मा. महापौर साहेब, आयुक्तसाहेबांनी आतापर्यंत जो खुलासा केला, मगाशी ऐकलं पाच मिनिटे ते सांगत होते की टेक्निकल प्रॉब्लेम होता. लाईट जाते. आपल्याला पाणी मिळत नाही. उपसा बंद पडतो. तर माझे स्पष्ट म्हणणे आहे की साहेब त्याच्यावरती पहिला खुलासा करा. किती दिवसांमध्ये कितीवेळा लाईट गेली. किती वेळा आपल्याला धरणातून जेवढया लेव्हलचे पाणी पाहिजे तेवढया लेव्हलचे पाणी आलं पण आपल्याला पुढे का नाही पाठविता आले. किंवा एकदा रात्री कुठलातरी पाईप फुटला होता. अचानक रात्रीचा पाईप फुटला आणि त्या ठिकाणी सगळी टिम कामाला लागली. हया ज्या काही गोष्टी घडल्या आहेत. या शहरातल्या नागरीकांना तुम्हाला ते सांगता पण आले पाहिजे. आम्ही म्हणत नाही पण आपल्याला सर्वांना शहरातल्या नागरीकांना पाणी दयायचे आहे. काही प्रशासनाच्या अडचणी असतील तर त्या आम्हाला पण कळाल्या पाहिजेत. आम्ही नागरीकांना सांगू परंतु सगळं उपलब्ध असताना तुम्ही जर पळवाट काढत असताल तर याला १०० टक्के तुम्ही जबाबदार आहात. आम्ही निश्चितपणे तुमच्या सोबत राहू. परंतु सगळया अडीअडचणी आम्हाला क्लीअरकट कळाल्या पाहिजेत. दुसरी गोष्ट आता याठिकाणी हे जे सांगितलं २४X७ चे. या २४X७ चे प्रामुख्याने त्यामध्ये लक्ष घाला आणि ते काम ताबडतोब थांबवा. एक तर त्याला करायचं नसेल तर त्याला बाजूला करुन टाका. तिसरी गोष्ट माझ्या थेरगांवमध्ये पाण्याची टाकी बांधणेचे काम वर्क ऑर्डर झालेली आहे. एक ते दिड वर्षे झाले साहेब. आतापर्यंत तो ठेकेदार तिकडे फिरकलाच नाही. त्याला जर फोन केला तर तो ठेकेदार अरेरावीची भाषा बोलतो फोनवर. नंतर तो काय म्हणतो नगरसेवक अरेरावीची भाषा करतात. त्याला जर विचरायला गेलं काय बोलायला गेलं तर तो उलटं बोलतो. मग त्याला कशी उत्तरे दयायची ती आम्हाला पण

कळतात. तो जसा वागेल तस वागायचं आम्हाला पण कळतं. त्याला डांगे चौकातल्या थेरगावच्या पाण्याच्या टाकीचे त्याला काम दिलंय. त्याला ब्लॅक लीस्ट करा कारण का मी अनुभव घेतलायं. त्याला मी एक शब्द अरेरावीचा बोललो नाही. तो बोललाय. कारण काय आहे की परत तो उदया इश्यू होतो. नगरसेवक बोलतात नंतर काहीतरी वेगळा इश्यूव होणार. त्यामुळे मा. आयुक्तसाहेब आपणांस विनंती आहे की आपण त्याला बोलवून घ्या. आणि त्याला डायरेक्ट ब्लॅक लीस्ट करा. माझी मान्यता आहे त्याला काम दयायचच नाही. त्याला तिथं काम करायचच नाहीय. सन्मा. महापौरसाहेब, आयुक्तसाहेब आपल्याला सांगितलं की सर्व्हे करण्याची गरज आहे. की आपल्याकडं पाणी गळती आहे. आपल्याकडे पाणी का जात नाही. तुम्ही तर म्हणताय की पाणी भरपूर आहे. मग पाणी का जात नाही. तर तुम्ही मागे म्हटले होते की आता सगळीकडे सर्व्हे चालू आहे. तो सर्व्हे झाल्यानंतर त्याठिकाणी आपण पाईप लाईन करणार आहोत. तर आजपर्यंत ती ऑर्डर झाली तुमची. आपण ज्यावेळेस त्याच्यावरती एक्सपर्ट/ सल्लागार नेमलेत. त्यांनी आतापर्यंत त्याच्यावर काय काम केलेय. किती दिवस झाले त्यांना ते काम दिलंय. आजपर्यंत त्यांनी एक्च्यूएल काय काम केलेयं. शहरातल्या किती विभागाचे, किती प्रभागाचे त्यांनी सर्व्हे केलेत कारण का की काय झालंय. १६ नंबरचा भाग आहे माझ्या प्रभागातला. किंवा कन्हैया पार्क असेल, गुजरनगर असेल त्याठिकाणी पाण्याच्या पाईप लाईन टाकण्याचे काम मी गेली दोनतीन महिन्यांपासून पाठपुरावा करतोय. पण त्याठिकाणी असं सांगण्यात येते की आता सर्व्हे चालू केला त्याचा नकाशा मिळाला नाही. मग ज्याला आपण काम दिलयं तो काय झोपा काढतोय का. त्याला साधं ड्रॉईंग करायचे आहे. हे ड्रॉईंग करायला त्याला सहा महिने, एक वर्ष लागत असेल तर त्याने अभ्यास करु दया ना. एक वर्षे झालं अजून तो ड्रॉईंग देत नाही. आणि तो ड्रॉईंग देत नाही म्हणून पुढची विकास कामे सगळी ठप्प आहेत. कारण का नळाची लाईनच नाही टाकली तर पुढे ड्रेनेजची लाईन आली, रस्ता आला. काहीच कामे करता येत नाहीत. त्यामुळे जे.ई. लोकं त्याचा पाठपुरावा करतात. परंतु ते तरी काय करणार किती उडया मारणार. कारण का आजपर्यंत आमचं ड्रॉईंगच तयार नाही. ज्याठिकाणी आयुक्तसाहेब मला हयाचा खुलासा

करा. मला परत महापौर एक दोन मिनिटे बोलण्याची संधी दयावी. हयाचा खुलासा करा मला परत प्लीज बोलण्याची संधी दयावी.

**मा.निता पाडाळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब मला फक्त हाच खुलासा दया की आपण सर्व शहरात पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी काय केलेले आहे. मला वाटत प्रत्येक जनरल बॉडीमध्ये भाऊसाहेब भोईर बोलतात की या आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पाणीपुरवठयासाठी एक स्वतंत्र धरणाची तरतूद करा. मी तर म्हणते की आपण जरी स्वतंत्र धरण नक्की बांधले आपल्या महानगरपालिकेसाठी. तर आपला हा सगळया पाण्याचा प्रॉब्लेम सॉलव्ह होईल. दुसरी गोष्ट म्हणजे सगळयाच वॉर्डमध्ये सध्या पाण्याचा प्रॉब्लेम सुरु आहे. आयुक्तसाहेब मला एक सांगा माझ्या वॉर्डामध्ये विजयनगर भागासाठी एक स्वतंत्र टाकीचे भूमीपूजन २०१६ साली केले होते. तर ते भूमीपूजन झाल्यानंतर आजपर्यंत त्या टाकीचे काम चालू झालेले नाही. आपले एक्झीक्यूटीव्ह तांबे साहेबांना मी विचारले तर ते म्हणतात ठेकेदाराला ब्लॅक लीस्ट केले आहे आपण. आपण दुसरे टेंडर काढणार आहे परंतु ते टेंडर काढणार कधी वर्क ऑर्डर देणार कधी. ती टाकी पूर्ण होणार कधी. त्याचा खुलासा तांबेसाहेब यांनी करावा. कारण पूर्वीपण एक्झीक्यूटीव्ह तेच होते त्या भागामध्ये आतापण तेच आहेत. जवळपास दोन-अडीच वर्षे व्हायला आले. तरी का ते काम करीत नाहीत याचा खुलासा तांबे साहेबांनी करावा. दुसरी एक गोष्ट अशी आयुक्तसाहेब. आपली जी अनधिकृत नळ कनेक्शन्स आहेत. अनधिकृत नळ कनेक्शन लोक प्रायव्हेट प्लंबरकडून करुन घेतात. परंतु ते नळ कनेक्शन्स व्यवस्थित होत नाहीत. त्याच्यामुळे पाण्याच्या गळतीचे प्रमाण हे जास्त प्रमाणात वाढले आहे. सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे आपण अनधिकृत नळ कनेक्शन्स शोधून ती बंद केली तर मला वाटते नक्कीच आपल्या शहरातल्या पाणीपुरवठयामध्ये थोडाफार फरक पडेल. त्याचप्रमाणे आयुक्त साहेब सर्वच भागामध्ये एकदम लो प्रेशर आहे आज सुध्दा माझ्या वॉर्डामध्ये जे.ई. पाटीलसाहेब रोज बिचारे सकाळी येतात. आम्ही म्हणत नाही की जे.ई. काम करीत नाहीत. रोज सकाळी येतात सगळी पाहणी करतात. परंतु पाणीच का येत नाही तेच काही कळत नाही. तर आयुक्तसाहेब आपण लवकरात लवकर लक्ष घालावे. पाणीपुरवठयाची समस्या आज फक्त अस नाही की माझ्या काळेवाडी प्रभागातच

आहे. इथं बसलेल्या सगळयाच नगरसेवकांच्या वॉर्डामध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. तर आपण लवकरात लवकर या विषयात लक्ष घालून योग्य त्या पध्दतीने सर्वांना व्यवस्थित पाणीपुरवठा होईल अशा पध्दतीने पाणी दयावे. आयुक्त साहेब आता सणासुदीचे दिवस होते. नवरात्र झाली आता दिवाळी आली. तरीसुध्दा आमच्या भागामध्ये एकदम लो प्रेशरने पाणी येत आहे. आयुक्तसाहेब पूर्वी एक वर्षापूर्वी आमच्या वॉर्डामध्ये सुरळीत पाणी चालले होते. परंतु आता नाही. मला वाटत पक्षनेत्यानी सुध्दा तांबेसाहेबांना बोलवून सांगितले होते ना काळेवाडी भागाचा पाणीपुरवठा सुरळीत करा. पक्षनेते सुध्दा सांगतात की सुरळीत करा. परंतु तांबेसाहेब साधे व्हिजीटला सुध्दा येत नाहीत आयुक्तसाहेब. फक्त गोड बोलतात ते. मला वाटते की त्यांचे आडनाव तांबे बदलून गोडबोले ठेवावे. कारण काही नाही बघतो, करतो हे करतो. ताई हे करतो एवढंच फक्त आम्हाला उत्तरे असतात बाकी काही नाही. एक्झीक्यूटीव्हला जर माहीतच नसेल तर कोणत्याही प्रश्नाचे उत्तर विचारा बघू माहिती घेऊन सांगतो. गेली दोन वर्षे माहिती घेण्यातच चालली आहेत. अजुन त्यांना काही माहिती देता आलेली नाही. आयुक्तसाहेब तांबेसाहेबांची तुम्ही पहिली चौकशी करा. प्रत्येक वॉर्डामध्ये पाण्याचा प्रॉब्लेम असल्यानंतर ते स्वत: जातात का. कधीच जात नाहीत आयुक्त साहेब त्यांना तुम्ही एवढे चार्ज देतात. आज ब प्रभागात आमची जी मिटींग असते त्या मिटींगला वर्षात एकदाच फक्त तांबे साहेब आले असतील. हयाला काय अर्थ आहे. एक्झीक्यूटीव्हची काही जबाबदारी असते की नाही आम्ही बोलायचे कुठे प्रभागाच्या मिटींगलाच बोलू शकतो आम्ही. दुसरे तर कुठे जनरल बॉडीमध्ये सगळयांना बोलणे शक्य होत नाही आयुक्तसाहेब. तरी तुम्ही लवकरात लवकर या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन महापौरसाहेब आयुक्त साहेबांना आदेश दया की सगळीकडचा पाणीपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. आदेश दया पाणीपुरवठा सुरळीत करावा, हि विनंती.

**मा. मयूर कलाटे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर सभागृहात गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. महापौरसाहेब मागे एकदा मी एका कार्यक्रमात सांगितले होते. आता मी काळजी घेईन. आता आमची अशी परिस्थिती आहे. आयुक्तसाहेब मी तुम्हाला चार दिवसापूर्वी घरचा व्हिडीओ दाखवलेला होता. आता माझी बायको सुध्दा आंदोलनाची भूमिका घेते आहे, अशी परिस्थिती आहे आता आमची.

आम्ही जे प्रश्न विचारले होते. म्हणजे घरची सुध्दा आता आंदोलनाच्या भूमिकेमध्ये आहेत महापौर साहेब. आम्ही जे प्रश्न विचारले होते त्याची उत्तरे आपण लेखी स्वरुपात दिलेली आहेत. साहेब ही उत्तरे समाधानकारक बिलकूल नाहीत. आता पाच नंबरचा प्रश्न सांगतो साहेब पवना जलवाहिनीबाबत मुख्यमंत्र्यासोबत बैठक व निर्णय कधी घेणार आहेत. त्याला उत्तर असे दिले आहे की पवना जलवाहिनीबाबत मा. मुख्यमंत्री यांचे समवेत बैठकीबाबत पाठपुरावा करणेत येत आहे, असं उत्तर महत्वाच नाहीतर निर्णय कधी होणार आहे याची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत ना महापौरसाहेब. हा प्रश्न काही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा किंवा भाजपाच्या नगरसेवकांचा नाहीय. आज अशी परिस्थिती आहे की आम्हांला रस्त्यावरुन फिरणे सुध्दा  मुश्कील आहे. मी तर म्हणतो की कधी असा प्रसंग यायला नको की कधी आमचे नगरसेवक किंवा नगरसेविकेला कुठेतरी रस्त्यामध्ये अडवायचे आणि काही वेगळा अनर्थ व्हायचा. महापौर साहेब तुम्ही या शहराचे प्रमुख आहात. तुम्ही त्या खुर्चीवर बसलेले आहात. तुम्ही महापौर म्हणून कुठल्या पक्षाचे नाहीत. ज्यावेळेस तुम्ही स्वत: म्हणता की मी आंदोलन करेन. तर ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. जर तुम्ही आंदोलन करीत असाल तर आमच्यासारखे नगरसेवक कोणाकडे पाहणार आहेत. आमची तुमच्याकडून खूप मोठी अपेक्षा आहे महापौरसाहेब. खरच मी सांगतो की तुम्ही कुठेतरी सिरीयसली मनावर घ्या आयुक्त साहेब. आणि आता पाणीपुरवठयावर चर्चा  होते. पाणीपुरवठयाचे जेवढे अधिकारी आहेत ए टू झेड सगळयांना इथं समोर बोलवा आणि उत्तर दयायला सांगा. काय अडचण आहे. इथं कृत्रिम पाणीपुरवठा आहे काय. काय अडचण आहे. आज धरणात पाणी असून सुध्दा पाणी मिळत नाही. नक्की याच्यामध्ये काय आहे. म्हणजे पाणीपुरवठा कृत्रिम करुन काय आर्थीक हितसंबंध कोणाचे जोपासलेत का. एनओस्या लोकांच्या बंद करायच्यात का. नक्की काय. नक्की काय करायच पाणीपुरवठयाच. याचा खुलासा करा, याची उत्तरे दया. याची उत्तरे समाधानकारक नाहीत महापौरसाहेब. त्यामुळे हयाची उत्तरे आम्हाला अधिका-यांना बोलावून समोरासमोर दया, याचा खुलासा करावा.

**मा. सुलक्षणा धर** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर महापौरसाहेब मी आपल्याला प्रश्न विचारला होता की यावर्षी पवना धरणक्षेत्रात किती

पाऊस पडला आहे. पेपरला आकडा येतो दरवेळेस आणि आज आम्हाला मिळाला आहे आता इथं टेबलवर आहे की तो ९२ टक्के.  ९२ टक्के इतका जर साठा झालेला आहे. आम्ही काही अधिका-यांना चौकशी केली असता असं कळलं की त्यांचे म्हणणे असे की १५ दिवस आधीच पाऊस बंद झाल्यामुळे आपण १०० टक्क्यांपर्यंत टारगेट म्हणजे जेवढे आपले नेहमीप्रमाणे १०० टक्के जे धरण भरुन वाहते तेवढे झालेले नाही. परंतु माझा प्रश्न विचारण्यामागचं कारण असं आहे की आपल्याला धरणातून पाणी मिळते त्यांच्याकडून असं सांगण्यात येते की आपल्याला सफिसियंट वॉटर आपल्याकडे सप्लाय केला जातो. आणि जर तेवढा वॉटर आपल्याकडे सप्लाय होतो मग आपल्याला त्यांचा वॉटर सप्लाय तेथून ते पाणी सोडतात ते बरोबर आहे परंतु आपल्या इथंपर्यंत पाणी येताना हा जो प्रवास आहे. आणि या प्रवासात होणारी जी गळती आहे. ती गळती थांबविण्यासाठी आपण काय करतो. खरतर आपल्याकडे त्या भागात मोठया मोठया ग्रामपंचायती तीनचार आहेत. त्याच्याबरोबर आपल्याकडे मोठे गोठे आहेत. बागायतदार शेतीला पण तिथून पाणी उचलतात. छोटया मोठया इंडस्ट्रीज पण त्या पवनेपासून म्हणजे त्या धरणापासून इथंपर्यंत येईपर्यंत छोटया मोठया इंडस्ट्रीज पण डेव्हलप झालेल्या आहेत. आणि ते पण त्या धरणातून पाणी उचलत असतील  आणि त्यांच परत वेस्ट त्याच पाण्यात मिसळत असेल आणि ते पाणी आपल्यापर्यंत पोहोचेपर्यंत बरीच कपात होत असेलतर आपल्याकडे जेवढे रिक्वॉयर्ड पाणी आहे तेवढे आपल्याला मिळत का. हा ही मोठा प्रश्न आहे त्यांच उत्तर आपल्याला मिळालेले नाही. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या शहराचा विकास करीत असताना या शहराची वाढती लोकसंख्या डोळयासमोर ठेवून त्यांनी बंदिस्त वाहिनीचा जो विचार डोक्यात घेतला होता त्याप्रमाणे त्यांनी ते कामकाज सुरु केले होते. परंतु त्याला काही स्थानिक नगरसेवक म्हणा किंवा स्थानिक नेत्यांनी जो विरोध केला आणि ते काम आज बंद पडल आहे. खरतर तो विचार त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने केला होता, कारण दहा वर्षापूर्वी त्यांच्या डोक्यात हा विचार येतो की या शहराला जेवढा पाणीपुरवठा आपण करतोय तो सफीशियंट नाहीय. आणि तो इथंपर्यंत येईपर्यंत जी गळती होते ती गळती बंदीस्त पाईपलाईनद्वारे आपण थांबवू शकतो. कारण धरणातन आपल्याला बंधा-यापर्यंत डायरेक्ट पाणी जमिनीतून ज्या पध्दतीने सप्लाय होते. ते

ओपन असल्यामुळे त्याचे बाष्पीभवन होते. ते पाणी मधल्यामध्ये अनेक प्रकारे ते डायव्हर्ट केले जाते. तर ते बंद पाईपलाईनमध्ये असल्यामुळे आपल्याला ते डायरेक्ट ते सपोज लिकेज असेल तर ते डायरेक्ट आपल्याला फाईंड आऊट करता येते. तर त्या पध्दतीने आपण जर बंदिस्त पाईपलाईनचे काम आपण ते थांबविले आहे. खरतर दिल्लीपासून ते पालिकेपर्यंत आपलीच सत्ता आहे परंतु तो निर्णय जर आपण घेतला तर आपली जी बोंबाबोंब आहे की आम्हाला पाणीपुरवठा होत नाही. खरतर त्यांच्याकडून आपल्याला सफिशियंट वॉटर सप्लाय येतो. आणि त्याच्यामागे जो आपण खर्च करतो. जे ओपन पाणी येतं आणि त्याच्यामध्ये वेस्टमिक्सेस होते. त्याच्यानंतर ते पाणी आपण ट्रीट करतो. ते पंप करतो नंतर ते लिफ्ट करतो. आणि त्याच्यासाठी जो लागणार खर्च आहे तो खूप अवाढव्य आहे. त्यामुळे ग्रॅव्हीटीने जे पाणी आपण डायरेक्ट त्या बंद पाईप लाईनमधून घेणार होतो. त्याच्यामध्ये आणि त्या खर्चामध्ये बरीचशी आपण काटकसर करु शकतो. आयुक्तसाहेब आपली इरीगेशन डिपार्टमेंटच्या सीओशी इंजिनिअरशी जर आपली भेट झाली होती आणि त्याच्यामध्ये त्यांनी आपल्याला काही प्रमाणात आदेश देण्यात आले होते प्राधिकरणाने की आपण या धरणाबाबत पण आपण विचार करायचा आहे. तर त्याची हाईट वाढवा किंवा त्याच्यातला गाळ उपसा. ते १०० वर्षे जुने आहे. आणि मग त्याच्यामध्ये त्याच ऑडीट होणे गरजेचे आहे. स्ट्रकचरल ऑडीट होणे गरजेचे आहे. या सगळया गोष्टी आपल्या फक्त चर्चेत झालेल्या आहेत. पण त्या गोष्टीला आठनऊ महिने झालेले आहेत. आणि त्याच्यानंतर आपण कुठल्याही प्रकारचे रिझल्ट ओरिण्टल काम आपल्याकडून झालेले नाही. आपण ज्या पध्दतीने कमिटी नेमणार होतो. त्या कमिटीतून काही आपण अहवाल घेऊन मग आपण तो नवीन बंधारा बांधायचा की आहे त्याचेच रिन्यूएशन करायचे. या पध्दतीचे निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला देण्यात आला होता. आणि आयुक्त साहेब आपलही त्याच्यावर पॉझीटीव्हली स्टेटमेंट होते की आम्ही लवकरात लवकर याच्यावर निर्णय घेऊ. आणि मग त्याच्यासाठी आपण पर्यायी व्यवस्था करु. परंतु त्याच्यावर अजुनही आपल्याकडे कुठलीही कमिटी आली नाही आणि पाचसहा लाखापर्यंत खर्च करणार होतो. परंतु २००९ ला तशा प्रकारचा सर्व्हे झालेला आहे की धरणापासून आपल्याला पिंपरी चिंचवडला मिळणा-या पाणीपुरवठयामध्ये ज्याप्रकारे

आपल्याला जेवढी रिक्वॉयरमेंट आहे. त्याच्यासाठी आपल्याला वेगळे काही करायची गरज नाही. असं त्या आहवालातपण आपल्याकडे मेंशन केलेले आहे. आपल्याला फक्त डिसिजन घ्याय होतं की आपण नवीन बंधारा बांधणार आहोत की आहे तोच ठेवणार आहोत. मग त्याच्यासाठी आपण एवढा विलंब का करतोय. त्याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. आणि बंदिस्त पाईपलाईनचा खरतर आपण सभागृहाला मी विनंती करेन, पक्षनेत्यांना ही विनंती करेन की खरच खूप चांगल्या प्रकारे आपण बंदिस्त पाईपलाईनचा जो विचार आहे तो आपण बंद केलेला आहे तो आपण कनव्हेन्स करु शकता. आपले आमदार आहेत, खासदार आहेत त्यांच्याशी चर्चा करुन हा विषय जर आपण केला तर खूप चांगल क्रेडीट तुम्हाला घेता येईल. आणि पत्रकारांना मी विनंती करते की भले ही योजना जरी दादांकडून झाली असलीतरी पण या सत्ताधा-यांनी केले म्हणून त्यांना क्रेडीट देण्यास आमची काही हरकत नाही. तर हा पिंपरी चिंचवड शहराचा प्रश्न आहे. पिंपरी चिंचवडला परत मुबलक पाणीपुरवठा मिळाला पाहिजे. तो आपल्याला सफिशियंट येतोय का. आपल्या म्हणण्याप्रमाणे १३५ लिटर पाणी प्रत्येक दिवशी एका माणसाला मिळावे. ते आपल्यापर्यंत येते परंतु ते आम्हाला प्रॉपरली डिस्ट्रीब्यूट का होत नाही याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. काही ठिकाणी १३५ पेक्षाही जास्त डिस्ट्रीब्यूट होते. तर काही ठिकाणी १००, ९०, ८० लि. असेही होते. मग अशा प्रकारच डिस्ट्रीब्यूशन का केले जाते. याचाही आम्हाला खुलासा होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आपल्या निगडी प्राधिकरण एरियामध्ये ३०० लिटरपर्यंत दिले जाते. मग अशा प्रकारचे डिस्ट्रीब्यूशन आपण करणार असाल तर ही बोंबाबोंब नेहमीच राहणार आहे. तरी माझी आपल्याला विनंती आहे की आपण याबाबत योग्य तो लवकरात लवकर निर्णय घ्यावा. आयुक्त साहेब आपण पण या धरणाच्या बाबतीत आणि या बंधा-यातून डायरेक्ट पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे आणले तर भविष्यात आपला जो प्रश्न आहे कारण आपल्याला पाणी तेवढेच मिळणार आहे, त्याच्यापेक्षा जास्त पाणी आपल्याला मिळणारच नाही. मग भविष्यात आपण असाच आरडाओरडा करणार का. पाऊस आताशी संपलेला आहे. एक महिनाही झालेला नाही. आणि शहरात एवढा पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आणि पुर्ण पावसाळा आपल्याला काढायचा आहे. उन्हाळयामध्ये परत आपल्याला पाण्याचे नियोजन एक दिवसाआड पाणी अशा काही

योजना आपल्याला राबवाव्या लागणार आहेत. तर त्यासाठी आपण कुठल्या प्रकारचे नियोजन करणार आहोत. नागरीकांना तोंड देता देता आमच्या नाकीनऊ यायला लागलं आहे. प्रत्येक वेळेस सकाळी अगदी पाच वाजलेपासून फोन येतात. आणि अधिका-यांकडून अगदी अनप्रोफेशनल उत्तरे देतात. हो का मॅडम आलच नाही का पाणी. मग टाकीच भरली नसेल, बघतो किंवा लाईट गेली असेल अशा प्रकारची प्रश्नांची उत्तरे आपल्या काही एक्झीक्यूटीव्हकडून किंवा जे कोणी अधिकारी आहेत त्यांच्याकडून अशा प्रकारची उत्तरे अपेक्षित नाहीत. नागरीकांचा त्रास वाढलेला आहे. प्रत्येक वेळी लोक रस्त्यावर येतात. यासाठी आपण लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा. अजुन आठनऊ महिने बाकी आहेत. पुढच्या पावसाळयाची वाट बघण्यासाठी. तर त्या धरणातल्या गाळासंदर्भात पण आपण योग्य तो निर्णय घ्यावा. प्रत्येक वेळेस पावसाळयाच्या आधी तो गाळ काढला गेला पाहिजे हे आपल्याकडून अपेक्षित आहे. पण सहासात वर्षे झाले. आपण त्या गाळाला कुठल्याही प्रकारे हात लावलेला नाही. आणि गळतीबाबत तर आपल्याकडे कुठल्याच प्रकारचा हिशोब नाही. मग गळती होतेय आणि आपण प्रत्येक वेळेस फक्त सांगतो की गळती होतेय. परंतु कुठल्या प्रकारची होतेय. तर त्याची अकौटींग होणंपण खूप गरजेचे आहे. त्याचे ऑडीट होणे देखील खूप गरजेचे आहे. ऑडीट झाले नाही असे उत्तर दिलेले आहे. तर हया प्रकारची उत्तरे आपल्याकडून अपेक्षित नाहीत. आणि याच्यामुळे आम्हाला आपल्याला अशी विनंती करावीसी वाटते की कमिशनरसाहेब या बंदिस्त पाईपलाईनचा आपण लवकरात लवकर निर्णय घ्यावा. आणि धरणाच्या रिन्यूएशनचा आपण लवकरात लवकर निर्णय घेऊन पिंपरी चिंचवड शहराचा पाण्याचा प्रॉब्लेम हा आपण दूर करावा धन्यवाद, आपण बोलायला संधी दिल्याबद्दल.

**मा. आरती चोंधे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. पाण्याचा प्रश्न हा अत्यंत गंभीर आहे. तसं जर पाहिलं तर माझ्या प्रभाग क्रमांक २६ विशालनगर, वाकड, पिंपळेनिलख मधील नागरीकांना पाण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागले आहे आंदोलन करावे लागले. आम्ही अनेक वेळा अधिका-यांशी चर्चा करीत असतो, पाण्यासाठी बोलत असतो. अधिकारी येतात परंतु त्यांचे म्हणणे एवढेच की टाकी भरलेली नाही. ही टाकी का भरत नाही तर त्याची अनेक कारणे सांगितली

जातात आज लाईट नाही. हे सगळं दररोज वेगवेगळी कारणे सांगितली जातात. नागरीकांचे असं म्हणणं आहे की पुरेसा पाऊस झालेला आहे. धरणं भरलेली आहेत. मग पाणी का मिळत नाही. प्रशासनाने आणि आयुक्तसाहेब आपण याच्यावरती विचार करावा. आता मगाशी असं सांगितल की आठ दिवस झाले असा प्रॉब्लेम आहे. तर हा प्रॉब्लेम ब-याच दिवसापासूनचा आहे. आठ दिवस असतील तर नागरीक शांत बसतील. पण लोकांना प्यायला सुध्दा पाणी मिळत नाही. लोकांचे असं म्हणणं आहे की आम्हाला दोन तास प्रेशरने पाणी दयावे. तर आयुक्तसाहेब महापौर साहेब आपण हयाच्यावरती विचार करा आणि सगळीकडे लोकांना, नागरीकांना पुरेसे पाणी मिळेल याच्यावरती आपण उपाययोजना करावी.

**मा. झामाबाई बारणे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. शहरामध्ये पाणीपुरवठयाचा हा विषय आपण सुध्दा परवा इथ मिटींग घेतली आमदार साहेबांची आणि तुमची. शहरामधील दररोजचा हा अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे. आणि सर्व नगरसेवकांच्या प्रभागामध्ये पाण्याची बोंबाबोंब ही चालूच आहे. प्रत्येक वॉर्डामध्ये पाणी आहे का नाही हे मला माहीत नाही. काही वॉर्डामध्ये २४ तास पाणी आहे. परंतु आमच्या प्रभागामध्ये ऐन सणाच्या वेळेस दसरा आला. आता नवरात्रानंतर दिवाळी आली. महिलांचा विषय असतो की पाणी. आयुक्तसाहेब, महापौरसाहेब पाण्याचा प्रश्न म्हणजे महिलांना जास्त फोन येतात. आताच चिंचवडे ताईनी सांगितले की पाणी उशाला आणि तहान घशाला. अशा प्रकारची परिस्थिती आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये झालेली आहे. आमच्या वॉर्डामध्ये आताच सचीनने सांगितले की गुजरनगर उंचावरचा भाग आहे तीथ पाणीपुरवठा पुर्ण होत नाही. आणि ज्या आनंतपार्क असेल, श्रीकृष्ण कॉलनी असेल, दत्तनगर असेल, आमचा मधला पट्टा पूर्ण करंगळीसारखे पाणी येते. आणि बायपासने पाणी असल्यामुळे ते टप्प्या-टप्प्याने पाणी देतात. पण टप्प्या-टप्प्याने जरी पाणी दिले तरी पाणीपुरवठा व्यवस्थित व्हायला पाहिजे. एक तास जरी पाणी प्रेशरने सोडले तरी लोकांना पाणी मिळेल मी तर सांगेन दोन तास किंवा २४ तास परंतु प्रेशर पाहिजे पाण्याला. अगदी थोडीथोडी धार असते. वरती तर पाणी चढतच नाही. आणि सुरवातीला पाणी आल्याबरोबर ते पाणी घाण येते. मी अनेक वेळेला बोललेले आहे की सुरुवातीला पाणी घाण येते. मग ते पाणी वाया जाते. लोक

बाथरुमला ते पाणी वापरतात. मग कोणी रस्त्यावर पाणी ओतते, तर कोणी झाडांना पाणी टाकतात. तर कोणी टाकीमध्ये पाणी सोडतात आणि प्यायचे पाणी  भरायच्या टाईमला पाणी जाते. मग असं जर लोकांना प्यायच पाणी जर मिळत नसेल तर मग काय करायचं. आणि मी सभागृहामध्ये ही बोललेले आहे. आयुक्तसाहेब आपल्याला पण बोललेले आहे, महापौर साहेब आपल्याला पण बोललेले आहे, आणि आता नागरीकांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी तुम्ही स्वत: आंदोलन करण्याच्या भूमिकेमध्ये आहात. खरोखर हा जिव्हाळयाचा प्रश्न आहे महापौर साहेब. सर्व नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे आणि ऐन आता हया दिवाळीच्या सणाच्या वेळेस लोक पाणी वापरणार आहेत. कारण महिलांना पाणी असल्याशिवाय कामे होत नाहीत. हा विषय आपण अतिशय गांर्भियाने हाताळला पाहिजे. आणि लोकांना कसा पाणीपुरवठा करता येईल यासाठी प्रयत्न करावेत. सर्वांना समान पाणीपुरवठा करा ना. २४ तास पाणी म्हणजे त्या वॉर्डामध्ये २४ तास पाणी हे नुसते प्यायचे पाणी असते का. २४ तास पाणीपुरवठा करण्याची गरज पण नाही. ज्याच्या वॉर्डात आता २४ तास पाणीपुरवठा चालू आहे. त्या वॉर्डातला कमी करा म्हणजे सर्वांना समान पाणी दया. सर्वांच्या वॉर्डातल्या पाण्याचा हा विषय झाला पाहिजे. हा तुम्ही निर्णय घ्या. आयुक्तसाहेब आणि महापौर साहेब आता आमच्या तिकडे पण पाण्याच्या टाकीचे काम होणार आहे. तर ती टाकी जर पाडली तर नागरीकांना कसा पाणीपुरवठा होईल. त्यांच आधीच नियोजन झालं पाहिजे. नाही तर पाण्याची टाकी पाडली आणि आता काय करता येत नाही असं अधिकारी यांच्याकडून उत्तर आम्हाला मिळालं नाही पाहिजे. परवा दोन दिवस पाणी नव्हते. पाईपलाईन फुटली म्हणून पाणी मिळत नाही. असं आम्हाला उत्तर देताना काय होते लोकांच्या समोर आम्हाला बोलायला लागतं. आम्हाला सांगायला लागत की बाबा असं असं आहे. असं आहे या अधिका-यांना फोन केला तर तुम्हाला नंतर फोन करतो, काहीतरी अडचण आहे, असं उत्तर यायला नाही पाहिजे. आम्हाला पुढे नागरीकांना सांगताना व्यवस्थित सांगता आलं पाहिजे. कुठे पाईप लाईन फुटली, कुठ कुठ काय झालं हे सुध्दा आम्हाला पण सांगता आलं पाहिजे. हयाची सुध्दा अधिका-यांनी काळजी घेतली पाहिजे आणि शहरात सर्वांना समान पाणीपुरवठा झाला पाहिजे. मी अशी आपल्याला विनंती करते.

**मा. योगेश बहल -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब सर्व शहरामध्ये पाण्याची इतकी बोंबाबोंब आहे. एका वॉर्डापुरती नसून संबंध शहरामध्ये हा प्रश्न भेडसावतोय. मा.आयुक्त साहेब, यामध्ये असे दिसून येते की आपल्याला नियोजन ठीक करता येत नाहीय आणि नियोजना अभावी हे प्रश्न आपल्यासमोर आहेत असं सगळयांच्या बोलण्यावरुन दिसून येते. वास्तविक पाहता पाऊस सर्वत्र चांगला झाला आहे. डॅम ९० टक्क्यांपेक्षा अधिक भरलेला असतानासुध्दा अशा पध्दतीने वेगवेगळी कारणे सांगून काही वेळेला पंप नादुरुस्त आहे, टाकीची लेव्हल मेंटन झाली नाही. धरणामधून पाणी कमी उचलले गेले किंवा मग बायपासचा प्रॉब्लेम आला, वॉलव्ह बंद पडला. अशा वेगवेगळया अनेक कारणांना प्रत्येक नगरसेवकांला सामोरे जावे लागते. मा. आयुक्तसाहेब जी काही टीम तुमच्या हाताखाली किंवा या विभागामध्ये काम करते. वास्तविक पाहता त्या टीम मध्येच त्यांच्या मध्येच काहीतरी नियोजन चुकत आहे. आणि कोणीतरी हे मुद्दाम करतेय का हे सुध्दा तुम्हाला पाहण्याची गरज आहे. मग पाणी एवढ मुबलक असताना शहरामध्ये एवढा त्रास का होतोय आणि त्याची कारणे काय आहेत. दुस-या बाजूला ती कारणे शोधत असताना किंवा पाहत असताना स्थायी समितीमध्ये काही वेगळे ठराव केले जातात. कोण पुढारी वेगळेच आपल्या पध्दतीने म्हणतात की आता या भागामध्ये बिल्डरांना एनओसी मिळणार नाही. आदल्या दिवशी ठरावीक पाचपंचवीस लोकांना एनओस्या देऊन टाकतात आणि बाकीच्या एनओस्या बंद. स्थायी समितीला हा अधिकारी दिला कोणी. कोणत्या अधिकारान्वये हे अधिकारी अशा पध्दतीचे वागतात. मग या पाण्यामध्ये नागरीकांच्या तोंडचे पाणी पळविण्याचे काम हया भारतीय जनता पार्टीच्या राज्यामध्ये होतेय असं म्हटल तर चुकीचे होणार आहे का. मग भारतीय जनता पार्टीचे राज्य केंद्रामध्ये आहे, राज्यामध्ये आहे, महापालिकेमध्ये आहे. मग इथंल्या पालकमंत्र्यांनी, आमदारांनी हा प्रश्न राज्य शासनाकडे बसून, मांडून त्या पवनामधून पाणी जास्तीचे कसं घेता येईल. आंद्रामधून, भामामधून पाणी जास्तीचे कसं घेता येईल त्याच काय नियोजन केलेले आहे हे शहराला सांगाव. आजं आम्हालाच नव्हेतर याला पक्षपात न करता जर आपण भारतीय जनता पार्टी असेल, शिवसेना असेल आम्ही पाहिलं की बाहेर शिवसेना सुध्दा आमच्या बरोबर तिथं आंदोलन करीत होती. आज हया ठिकाणी

भारतीय जनता पार्टीचेच नगरसेवक इथं पोटतिडकीने विषय मांडतात. महापौरांनी जाहीर केले आहे की मी सुध्दा आंदोलन करणार आहे. आता हयाच्यापेक्षा वाईट अजून काय पाहिजे. मग तुमचा आज हया प्रशासनावर कंट्रोल राहिलेला नाहीय. तुमचे आमदार तुमचे प्रश्न मांडत नाहीत. तुमचे पालकमंत्री हया शहराबद्दल एकदम निष्काळजी आहेत. त्यांना नागरीकांची काळजी शून्य आहे. मग सर्वत्र पाणी असताना हया शहरामध्ये हा प्रश्न का उदभवतोय, हे कोण सोडविणार. टेंडरीगची मिटींग घेतलीय, रींगची मिटींग घ्यायची. मोठया कामांची मिटींग घ्यायची. मग पाण्याचा प्रश्न कोण सोडविणार. हे शहर घाणीचे साम्राज्य झालेले आहे. यावर्षी शहरामध्ये डेंग्यूची लागण झालेली आहे. म्हणजे ते आकडे बघीतलेतर तुम्हाला चक्कर येईल. जर त्या घरात डेंग्यू, डेंग्यू, डेंग्यू. अस्वच्छतेचे साम्राज्य झालेले आहे आयुक्तसाहेब. तुम्ही काही प्रयत्न केले त्या प्रयत्नामध्ये अडथळे आले. ते अडथळे दूर करताना टेंडर फायनल झाले. एक साईड त्यांना मान्यता देताय. दुस-या साईडने नंतर दोन महिन्यांनी, तीन महिन्यांनी तो विषय आणला जातोय. लोकांपुढे सांगायचे की आम्ही त्यामध्ये एवढेएवढे पैसे कमी केले. अहो पैसे कमी केले नाही माणूस कमी करणार मगच त्यामध्ये होणार. साहेब, तुम्ही कॅलक्यूलेट करुन दिलेल्या फिगर बरोबरच होत्या. त्याला आम्ही पण मान्यता दिलेली होती. परंतु हया पक्षाचे राजकारण, हया पक्षामधले गटागटाचे राजकारण त्यावेळेस चित्र वेगळे रंगविले गेले. की महाग पडतय, महाग पडतय. काय झाल स्वत:च्याच लोकांनी विरोध केला. स्वत:च्या लोकांनीच पुढाकार केला. आणि त्याच भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी तो विषय मंजुर केला. अहो किती मूर्ख बनविणार तुम्ही लोकांना. कोणकोणत्या पध्दतीने भ्रष्टाचार करायचा राहीला ते तुम्ही सांगा लोकांना. अशाच पध्दतीने स्थायी समितीमध्ये या पंतप्रधान योजनेची घरे बांधत असताना त्याला सुध्दा विरोध केलेला आहे.

**मा. महापौर** – विषयांतर करु नका. पाण्याचा विषय चालू आहे. त्यावर बोला.

**मा. योगेश बहल** – मा.महापौर साहेब, पाण्यावरच बोलतोय. पाण्यासाठी लोकांच्या तोंडाला कोरड पडलेली आहे. पाण्याच्या बाबतीत खोटं बोलण्याचं काम चालू आहे. किती खोट बोलणार. सत्य बोलायला एवढं कटू का वाटतं. इथून मागे आम्ही ऐकलेले आहे. एकएक दोनदोन तास ऐकलेले आहे. विषय नसताना ऐकलेले आहे. दादागिरी करुन

ऐकलेले आहे. खालच्या भाषेमध्ये आम्ही ऐकलेले आहे. आज आम्ही म्हणतोय तर तुम्ही ऐका ना. एवढ वाईट का वाटतय तुम्हांला. तुम्ही पण एका वेगळा पक्षामध्ये होते तुम्ही ऐकल नाही का. आता महापौर झालात बरोबर आहे. खुर्चीचा सन्मान ठेवला पाहिजे. तुमचा मान सन्मान आम्ही ठेवून आम्ही बोलतोय. परंतु वस्तुस्थिती पण बोलली पाहिजे. मग आमचे म्हणणे हेच आहे की दुस-या कामाचे आपण एवढे नियोजन करताय. या महापालिकेचे जे पदाधिकारी आहेत, या शहरातले जे पदाधिकारी आहेत, या शहरातले जे आमदार आहेत, या शहरातले जे पालकमंत्री आहेत. त्या लोकांनी या विषयाच गांर्भीय लक्षात घेता त्याच्यावर काही तरी चांगल्या पध्दतीने नियोजनबध्द एक कार्यक्रम आखावा. एकसूत्री काही तरी कार्यक्रम आखावा. की जेणेकरुन या शहराच्या नागरीकांना पाण्याचा प्रश्न भेडसावणार नाही. आज लोक आमच्याकडे हसतात. आज आपण एका ठिकाणी स्मार्टसिटीचे बोलतोय आणि लोकांना पाणी देऊ शकत नाही. कोटयावधी रुपये खर्च करतो. लोकांना पाणी देऊ शकत नाही. या शहरामध्ये महापौरसाहेब सांगा बर मला कच-याचे साम्राज्य किती आहे. तुम्ही वायसीएमला जाऊन बघा डेंग्यूची काय परिस्थिती आहे. तुम्ही वायसीएमला जाऊन बघा त्या डिलीव्हरी वॉर्डची काय परिस्थिती आहे. तिकडचा आयसीयू आपण चालू करतोय का महापौरसाहेब तुम्ही आज प्रत्येक शाळेमध्ये गेलात, शाळेत तुम्ही व्हिजीट करताय. आम्ही ऐकल आम्हाला आनंद झाला. महापौर प्रत्येक शाळेमध्ये जातात शाळेची व्हिजीट करतात. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतात. तसेच महापौरसाहेब तुम्ही वायसीएममध्ये व्हिजीट दया. त्यामध्ये दोनचार दिवस तुमचे घालवा. काय वाईट परिस्थिती आहे तिथे ती तुम्ही बघा. तिथे राजकारण चाललय राजकारण. मरतात लोक मरतात. तिथे लक्ष कोण देतय की नाही. महापौर अशाच पध्दतीने तुम्ही सकाळंच लवकर निघून तुम्ही एकनाथरावांना बरोबर घ्या किंवा अजून कोणाला तरी बरोबर घ्या. पदाधिका-यांना घ्या किंवा आम्हाला बोलवा. आणि वॉर्डामध्ये फिरा कच-याची काय परिस्थिती आहे ती बघा. कसे कच-याचे ढिगा-याचे ढिगारे पडलेले आहेत. आणि किती ठिकाणी रोज फवारणी होते का, स्वच्छता होते का. नाले सफाई होतात का हे बघा ना महापौर साहेब तुम्ही. मी थोड जर विषयांतर केले तर तुम्हाला वाईट वाटतयं. पण वास्तव्य पण बघा ना. सत्य काय ते पण बघा ना. आणि मग जर

तुमचा प्रशासनावर कंट्रोल नसणार आहे. तर मग अशा पध्दतीने प्रश्न मांडायला लागणार आहेत. उदया तुमचीच लोक आंदोलन करणार आहेत. तरी माझी विनंती आहे आपल्याला पाणी आपल्याकडे भरपूर आहे. मा. आयुक्त साहेब आपण स्काडा सिस्टीम केली आहे. काय लिकेज होते. किती लेव्हल झालीय. किती टाकी भरलीय. मोबाईल आहे. अडव्हान्स टेकनॉलॉजी आहे, सर्व आहे. मग अशा पध्दतीने आम्ही एक्झीक्यूटीव्हला प्रश्न केला तर ते म्हणते की मी डेप्यूटीला विचारतो. डेप्यूटीला जर विचारले तर तो म्हणतो की मी रावेतच्या तिथे विचारतो. त्याला विचारल तर तो म्हणतो की मी पंपावर विचारतो. आयुक्तसाहेब अशा प्रकारची उडवाउडवीची उत्तरे आमच्यासारख्या सिनियर माणसाला सुध्दा दिली जातात. मी माझ्या वॉर्डासाठी फक्त बोलत नाही. ही शहराची परिस्थिती आहे. शहरामध्ये अशा प्रकारचा त्रास होतो. मगाशी पालांडेताई बोलल्या. त्या ताई बोलल्या, सगळे जण बोलले. माझी विनंती आहे महापौर साहेब या पाण्याच्या अनुषंगाने या ठिकाणी सुलक्षणा ताईनी प्रश्न विचारले आहेत. परंतु पाण्यासाठी तुम्ही खास सर्व तुमचे पुढारी जे असतील एकनाथराव असतील, माजी महापौरांची टीम असेल सगळे असतील तुम्ही एक मिटींग लावा आयुक्तांबरोबर या शहराचा प्रश्न कसा सोडविता येईल. काय करता येईल. भले एक टाईम दया. पण व्यवस्थित पाणी तर दया, धन्यवाद.

**मा.विनया तापकीर** - मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर आयुक्तांनी आपल्या समोर पिंपरी चिंचवड विकास धोरण मांडलेले आहे. या शहर विकास धोरणाचे मुळ उद्दिष्ट काय आहे. लोकांना मूलभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. मूलभूत सुविधाच पुरविण्यास आपण अपयशी ठरत असेल तर शहर विकास धोरण आणून काय फायदा होणार आहे. जर आपण मूलभूत सुविधाच नागरीकांना पुरवित नसाल तर तुम्ही शहर विकास धोरणाच्या टिमक्या इथं कशाला मारायला पाहिजेत.

मा. महापौर – ताई, तो विषय आल्यावर त्या विषयावर बोला. आता पाण्याच्या विषयावर बोला ना.

**मा.विनया तापकीर** – मा.महापौर साहेब, ग्रामीण भागावर अन्याय होतोय आणि इथं सुध्दा सभागृहामध्ये ग्रामीण भागावर अन्याय होतोय. खरतर मी आपल्याला विनंती करते की तुम्ही शाळेचे दौरे करताय, शाळेची पाहणी दौरे करताय. आनंदाची गोष्ट आहे,

शाळा सुधारणेकरीता प्रयत्न करताय. तसंच पाणीपुरवठा हा देखील महत्वाचा विषय आहे. तसंच पाणी सुधारण्यासाठी महापौर साहेब तुम्ही आयुक्तांना घेऊन फिरा. कारण आमच्या इथं नागरीक इतके त्रस्त झालेत की रडतात बिचारे त्यांना असं वाटायला लागलय की पिंपरी चिंचवड मध्ये राहून आपण गुन्हा करतोय की काय. कारण आमच्याकडे फक्त हवाच येती नळाला. मागच्या दिवाळीला पाणी आले होते त्याच्यानंतर आतापर्यंत पाणी व्यवस्थित आलेल नाहीय. त्यादिवशीच आपली भेट झालीय आयुक्त साहेब. आता तर इथं पाण्याचा अत्यंत गंभीर प्रश्न आहे, तरी तिथे लक्ष दिले गेले पाहिजे. पण अधिका-यांला यायला वेळ नसतो. त्यांना काम असतात, मिटींगा असतात. लोकांनी तिकडे मरु देत पाण्यावाचून. परंतु आपली मिटींग तीथं चालूच राहू देत. शहराची इतकी गंभीर परिस्थिती पाण्याची असताना पिंपरी चिंचवड शहर हे १०० टक्के भरलेले आहे. तरी सुध्दा मला वाटते की ग्रामीण भागावर अन्याय होतोय की काय कारण एक तास पाणी देताय ते सुध्दा कमी दाबाने असते, अर्धा तास पाणी. आमच्या इथल्या नागरीकांनी करायचे तरी काय. पिंपरी चिंचवड शहर चिंतेत आहे. आता ठीक आहे वाढती लोकसंख्या पाहून आपण विचारात घेतल पाहिजे. भामा आसखेड मधून पाणी उचलले पाहिजे. आंद्रामधून पाणी उचलले पाहिजे. नाही तर भविष्यात लोक आमच्याकडे दगड घेऊन मागं लागतील. लोकप्रतिनिधींना आणि तुम्हाला सुध्दा रडायची वेळ येणार आहे एवढं लक्षात ठेवा. आता एवढा गंभीर प्रश्न असताना कोणालाही त्याचे सोयरसुतक नाहीय. माझी अशी विनंती आहे की जोपर्यंत पाणीप्रश्न सुधारत नाहीय. तोपर्यंत ही सभा तहकूब ठेवावी आणि अधिकारी आम्हाला सांगतात की टेक्नीकल प्रॉब्लेम आहे. टेक्नीकल प्रॉब्लेम आम्ही सोडवायचे का. हे काय फुकटचा पगार घेतात का. टेक्नीकल प्रॉब्लेम आहे, टेक्नीकल प्रॉब्लेम आहे आम्हीच जातो आता आणि तो प्रॉब्लेम सोडवितो. पाणीपुरवठयावरती सल्लागार नेमा म्हणजे तात्पुरता तरी प्रश्न सुटेल. अशी मी इथे इच्छा व्यक्त करते आणि सभा तोपर्यंत तहकूब करावी. अशी सुचना मांडते.

**मा.अश्विनी चिंचवडे-** जी सुचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर -** मिनलताई तुम्ही बोला.

**मा. मिनल यादव** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. सर्वांत प्रथम भाजप पक्षाच्या नगरसेवकांनी पाण्यासाठी आंदोलन केले. याच्यामध्ये मला एक

पॉझीटीव्हीटी वाटते की आम्ही आंदोलन केल्यानंतर फरक पडत नाही तुमच्या पक्षाच्या नगरसेवकांनी आंदोलन केल्यावर थोडेसे ते मनाला बोचले असेल आणि त्याच्यावर काहीतरी कारवाई होईल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते त्याचबरोबर आयुक्तसाहेबांना मी विनंती करते की पाण्याचा प्रश्न हा खरच खूप महत्वाचा आहे त्याच्यामुळे तुम्ही एका कानाने ऐकून दुस-या कानाने सोडून दयायचा इतका सोपा हा प्रश्न राहिलेला नाही. आम्हाला या पदावर आमच्या प्रभागातील लोकांनी निवडून दिलेले आहे. तरी आम्हाला त्याचे वाईट वाटते की आम्ही का उभे राहिलो. का नगरसेवक झालो असं आम्हाला वाटायला लागले आहे. कारण बाहेर पडले की लोक आम्हाला फक्त विचारतात पाणी. तुम्ही पाणी देऊ शकत नाही. बाकीच्या गोष्टी तर लांबच राहिल्या. त्याचबरोबर जो अधिकारीवर्ग आहे त्यांना साधी नीट कारणेही देता येत नाहीत. आयुक्तसाहेब मी तुम्हाला नम्र विनंती करते की आठवडयातून कमीत कमी एक दिवस सगळया अधिका-यांची एक जॉईंट मिटींग घेऊन त्यांचे माईंडवॉश तरी करीत जा. त्या अधिका-यांना साधे फोन उचलण्याचे मॅनर्स राहिलेले नाहीत. आम्ही काय, तुमचे बरं आहे, तुमची तब्येत बरी आहे का असं टाईमपास करायला फोन करीत नाहीत. जे प्रश्न आहेत पाण्याचे. पाण्याची जी कारणे आहेत ती ही त्यांना देता येत नाहीत. सकाळी सहाला पाणी सोडतात ते साडेपाचला मेसेज करतात. काही कारण असेल तर ते मेसेज करुन सांगतात की आज पाणी येणार नाही. त्याच्यापुढे आम्हाला जे फोन येतात तर आम्ही काय उत्तरे दयायची. लोक अक्षरश: शिव्या देतात. हयाच्यावर अधिकारी फोन स्वीच ऑफ करुन बंद करुन बसतात. त्यांना बाकीचे कशाचेच घेणेदेणे नसते. त्या लोकांना सामोरे आम्हाला जायला लागते. त्याच्यामुळे सगळया अधिका-यांना इथं समोर बोलवा. त्यांना काय कारणे देतात. आणि मी एक सांगू का की जी इलीगल कनेक्शन्स आहेत याला जबाबदार तुमचे अधिकारी वर्गच आहेत, आणि प्लंबर आहेत. कारण प्लंबर हे टॅब मारुन देतात पाणी सुरळीत करुन देतात आणि मग तुम्ही म्हणता की हे पाणी वेस्ट जाते कुठे. पाणी लिकेज होते कुठे. आधी तुम्ही अधिका-यांना समज दया. बाकीची लोक ही टाईमपास करायला उभी राहिलेली नाहीत. किंवा जे पाणी येते ते लीगली येतेय का हेही त्यांना माहीत नसत. त्यांना विचारल एका भागात. ते तिथे वीस-तीस वर्षे काम करीत असतील. आम्ही इथं नवीन आहोत आम्ही जर एखादया

विषयाची माहिती विचारली तर तीही त्यांना सांगता येत नाही. त्याच्यामुळे सगळयात याला जर कोण जबाबदार असेल तर अधिकारीवर्ग आहे. अधिकारीवर्ग फोन ही उचलत नाही. इलीगली कनेक्शन्स आहेत त्याच्यावर सर्वात प्रथम कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर आपल्या शहरामध्ये जे इलीगल बांधकामे होतात, मोठमोठे हॉटेल्स असतात. कारण का मला नाही वाटत त्यांना कधी पाणी टंचाई झाली आहे. त्यांना कशीकाय पाणी टंचाई होत नाही. बांधकामे होतात ते रात्रीचे वेळी. मी किती वेळा आयुक्त साहेबांना माहिती दिली की माझ्या प्रभागामध्ये रात्रीचीही कामे होत आहेत. अनधिकृत बांधकामे होतात. मग त्यांना पाणीपुरवठा कुठून होतो. त्यांना कसं काय व्यवस्थित पाणीपुरवठा होतो. जे कमर्शियल आहेत लोक त्यांना कसा पाणीपुरवठा होतो. तिथे कधी पाण्याची अडचण येत नाही. आणि मग जे सर्वसामान्य, बेरोजगार स्लम मधील लोक आहेत. त्यांनाच का अशी पाण्याची अडचण येते. माझ्या प्रभागामध्ये दोन ते तीन स्लम आहेत. आमच्या भागामध्ये पाण्याचे टायमींग सकाळी सहा आहे. कधी कधी आठ साडेआठ पर्यंत पाणी येत नाही. मग अशा वेळेस जे गवंडी काम करणारा महिला वर्ग मोठया प्रमाणावर आहे. तर त्यांना कामावर जायला उशीर होतो. पूर्ण दिवसाचा रोज त्यांना मिळत नाही. म्हणजे पाण्याअभावी त्यांना खायची मुश्कीली झालेली आहे. इतकी वाईट परिस्थिती माझ्या प्रभागामध्ये आहे. किती वेळा आयुक्तांना लेटर दिले पेपरला फक्त बातम्या येतात. लोक आता पाण्याविषयी बातम्या वाचण्यासही कंटाळलेले आहेत. याच्यावर जर आता तुम्ही त्वरीत अक्शन घेतली नाही तर पुढील काळामध्ये पाण्यावरुन दगडफेक होईल, धन्यवाद.

**मा.संगिता ताम्हाणे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज याठिकाणी पाण्याचा प्रश्न पूर्ण पिंपरी चिंचवड शहरामध्ये गंभीर स्वरुपाचा निर्माण झालेला आहे. आमच्या प्रभागामध्ये कृष्णानगर टाकी, त्रिवेणीनगर टाकी वरुन पाणी येते. पाण्याची वेळ सकाळी सहाची आहे. पाणी येते सकाळी सात, आठ, नऊ वाजता आणि एका टाकीचे पाणी ४ वाजलेपासून सहा वाजेपर्यंत असते. पूर्ण प्रभागामध्ये पाण्याची परिस्थिती एवढी गंभीर झालेली आहे की पाणी इतके छोटे येते करंगळीएवढे पाणी येते. पाच मिनिटांमध्ये एक बकेट सुध्दा भरत नाही. आज नवरात्र उत्सव होता. लेडीज या लेडीजलाच फोन करतात हे पण लक्षात ठेवा. पहाटे चार वाजलेपासून

आम्हाला फोन येतात. लेडीज या जास्त करुन लेडीजलाच फोन करतात. जास्त करुन नगरसेवकांकडे न जाता लेडीज नगरसेवकांनाच त्रास देतात. पाणी कधी सातला येते, कधी आठला येते तर कधी नऊला पण येते. आणि ते पाणी फक्त एकच तास राहते. आणि ते पाणी इतके घाण असते की पाच मिनिटामध्ये एक बकेट भरत नाही. मग त्या पाण्याला किती प्रेशर असणार. इतक्या कमी दाबाने पाणी मला दोन्ही टाक्यावरुन मिळते. आणि त्यामुळे आमच्या प्रभागामध्ये पाण्याचा प्रश्न इतका गंभीर झालेला आहे. नवरात्रीमध्ये तर लोक अक्षरश: काय बोललेत माहिती आहे का की नानी आम्ही सगळी कपडे वगैरे घेऊन येतो तुमच्याकडे धुवायला. म्हणलं मलाच पाणी नाही तर तुम्हाला कुठून देणार. मग म्हणले नगरसेवकांनाच पाणी भेटत नाही तर आम्हाला कुठून भेटणार. म्हणजे आज लेडीजचा प्रश्न लेडीजकडेच मांडला जातो. ज्यावेळेस मी अधिका-यांना बोलते त्यावेळेस अधिकारी काय म्हणतात. आम्हाला तिकडूनच पाणी कमी आलेले आहे. आणि पंपावर जर चौकशी केली तर म्हणतात की तिकडून पाणी कमी आल्यामुळे टाकी कमी भरलेली आहे. त्यामुळे तुम्हाला कमी दाबाने पाणी येतेय. आणि ज्यावेळेस अधिका-यांना विचारले जाते. त्यावेळेस अधिकारी म्हणतात की आम्हाला फक्त तीन फूटावरच पाणी दिले जातेय. आणि जर घराचे फौंडेंशन तीन फूटावर असेल त्यांनी पाणी कुठून भरायच. आज जर त्यांच्या बेसीनमध्ये देखील पाणी येत नाही. हा तर मोठा गंभीर प्रश्न झालेला आहे. त्यांनी घरे बांधलेली आहे. आज जर त्यांनी अर्ध्या गुंठयामध्ये घरे बांधलेली आहेत. आणि तीन फूटावर जर त्यांचे फौंडेंशन असेल आणि तीन फूटावर जर बेसीन असेल तर त्यांनी पाणी कुठून भरायचे. त्यामुळे हा प्रश्न एवढा गंभीर झालेला आहे. आमचं एवढच म्हणण आहे की जर तुम्ही चोवीस तास पाणी देत असाल तर चोवीस तास न देता दोनच तास जर पाणी भरपूर दिले तर पिंपरी चिंचवड शहराचा प्रश्न मार्गी लागणार आहे. माझी एवढीच विनंती आहे की तुम्ही हे पाणी चांगल्या दाबाने, चांगल्या प्रेशरने दयावे एवढीच विनंती आहे.

**मा.संदिप कस्पटे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौरसाहेब गेल्या अनेक महिन्यापासून आमच्या वाकड, पिंपळेनिलख प्रभागामध्ये पाणी अतिशय विस्कळीत आहे. आम्ही वारंवार याची कंप्लेट करीत असतो तांबे साहेबांकडे, धुमाळ साहेब आहेत, आमचे कुतवळ साहेब आहेत. परंतु धुमाळसाहेब

येतात, कुतवळसाहेब येतात. तात्पुरते तेवढयापुरते एखादा टँकर पाठवितात. तांबे साहेबांना मला याठिकाणी एक विचारायचे आहे. गेल्या दिड वर्षापासून आम्ही वाकडच्या पाण्याच्या टाकीसाठी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडे पाठपुरावा करीत होतो. गेल्या आठ-नऊ महिन्यापूर्वी पाण्याच्या टाकीसाठी पीसीएनटीडीने दिड कोटी आयुक्तसाहेब मंजुर केले आहेत. आणि त्यानंतर खरतर या टाकीसाठी निविदा प्रक्रिया होणे स्वाभाविक होते. परंतु दरवेळेस तांबे साहेबांना विचारले की साहेब कधी काम चालू होतेय टाकीचे. नेक्स्ट वीकमध्ये टेंडर निघणार आहे असंच उत्तर आहे. जवळजवळ आज आठ महिने झाले त्यांचा नेक्स्ट वीक कधी येणार आहे हे तांबेसाहेबांनी याठिकाणी सांगावे. याठिकाणी आमच्या वाकड आणि पिंपळे निलख सोसायटीमधील लोक आलेले आहेत. सर्वात जास्त कुठे पिंपरी चिंचवडमध्ये सोसायटीज असतील तर त्या अडीचशेच्यावर लहान मोठया सोसायटया आमच्या वाकड आणि पिंपळेनिलखमध्ये आहेत. तेवढा टॅक्स ही याठिकाणी ही लोक भरतात. अतिशय प्रामाणिकपणे हे सगळे लोक इथं आलेले आहेत. प्रामाणिकपणे टॅक्स भरतात. आणि त्यांना जर आपण मूलभूत सुविधा देत नसूतर आपल्याला त्यांच्याकडून टॅक्स घेण्याचा अधिकारच नाहीय. त्यामुळे आयुक्तसाहेब, महापौरसाहेब मी आपल्याला कळकळीची विनंती करतो की लवकरात लवकर वाकडच्या पाण्याच्या टाकीचे काम आपण चालू करावे आणि तांबेसाहेबांनी याठिकाणी पाण्याच्या टाकीचे टेंडर कधी निघणार आहे याचा खुलासा करावा.

**मा.तुषार कामठे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज आपण जो पाण्याचा विषय इथं घेतला त्याबद्दल मी मनापासून आपले आभार मानतो. आयुक्त साहेब आपले सुध्दा मनापासून आभार. ज्यापध्दतीने आपले उत्तर असतात की आम्ही दोन वर्षे तेच ऐकत आलेलो आहोत. त्याच्यामध्ये काहीही एक बदल होत नाही. आज आमच्या वाकड विभागाचे अनधिकृत कनेक्शन एवढे झालेले आहेत की त्याची आपण पॉलिसी काय केलेली आहे. आज एवढे महत्वाचे विश्लेषण चालू आहे. परंतु तांबेसाहेब इथ दिसत नाहीत. कुठे पवनेला गेलेत का. पाऊणतास झाला. अहो विषय त्यांचा आहे कुठे गेले ते. त्यांना तहान लागली म्हणे. इथं लोकांना प्यायला पाणी नाही. एवढा महत्वाचा विषय चालू आहे. एवढा ज्वलंत प्रश्न आहे. तुमचे अधिकारी पण

इथं थांबत नाहीत. हयाच्यावरुन आयुक्तसाहेब तुमचे ऐकत नाहीत तर आमचे काय लोक ऐकतील. एक दोन दिवस आधी आयुक्त साहेबांचा जीव आहे त्यांच्यावरती. आम्ही त्यांची बदली सांगितली आपण त्यांना बढती दिली. त्यांना प्रमोशन दिले. महापालिका चालवितय कोण हेच लक्षात ये नाहीय. आज आमच्यासारखे नवीन नगरसदस्य या महापालिकेत निवडून आले आहेत. परंतु आम्हाला खंत आहे. आम्ही आल्यापासून एवढाच विषय ऐकतोय. आज आम्हाला दु:ख वाटतय या महापालिकेमध्ये निवडून आलोत म्हणून. इथं लोकांच्या समस्या सोडविता येत नसतील तर एवढी खंत आमच्या मनामध्ये आहे. आज ज्या मूलभूत गोष्टी आहेत त्या आपण देऊ शकत नाहीत. मग बाकीचे विषय कशाला आपल्याला पाहिजेत. पहिले तर तुम्ही पाणी दया. मग बाकीच्या जेवढया योजना आणायच्या तेवढया योजना तुम्ही आणा. आज गेली दोन वर्षे आम्ही ऐकतोय. अमृत योजना येतेय, नवीन पाईपलाईन येतेय. पण त्या पाईपलाईनमध्ये पाणी येणार कुठून. पाण्याचे नियोजन काय आपल्यापाशी. आताच संदीप आण्णांनी सांगितले की पाण्याची टाकी सँक्शन झालीय. मग त्या पाण्याच्या टाकीचे पुढे काय झाले. का त्यासाठी सल्लागार आपल्याला अजून भेटलेला नाही. त्याचाही खुलासा आपण इथं केला पाहिजे. आज पाण्याची परिस्थिती एवढी बिकट आहे. महापौरसाहेब एक-दोन दिवसा आधी आमचे इथं एक वादविवाद झाला. चौकीमध्ये त्यांनी केस नोंदविली. केस नोंदविताना त्यांनी सांगितले की पाणी मागीतल म्हणून वाद केला. आज तुम्ही माझ्या वॉर्डमध्ये कोणालाही विचारा. माझ्या ऑफिसमध्ये जो कोणी येईल त्याला पाणी, चहा नित्य नेमाने दिला जातो. आता याठिकाणी विरोधकानी पाण्याचा विषय एवढा गाजवला आहे. आणि आवाज देतात पाणी दया पाणी दया. एका बाजूने ही चिडचीड होती मुलांचे वाद होतात. आमचे माध्यमही त्याचा खुलासा न देता काहीही छापून देतात, मला काही फरक पडत नाही. मला माझ्या लोकांची कामे होणे महत्वाचे असते. आज माझी आपल्याला विनंती आहे. माध्यमांनाही विनंती आहे. तुमची प्रसिध्दी वाढविण्यासाठी तुम्ही बातम्या छापता परंतु आमच्यासारख्या नवीन सामजिक कार्येकर्ते असतील त्यांना आत्यहत्येचा विषय मनात येतो. एवढे लोकांचे प्रॉब्लेम असतात याचीही आपण माहिती घ्यावी व व्यवस्थित खुलासा घ्यावा. व काय असेल ते छापून यावे. आज आपल्याबद्दल रोष नाहीय. एकाची चूक बाकींच्यांना भोगावी लागते. तेवढे

मी आपल्याला सांगू इच्छितो. आज महापौरसाहेब आमच्या इथं आपण फक्त २० टक्के पाणी देता. वाकडला फक्त २० टक्के पाणी आहे. महसूल जास्त वाकडवाले देतात आणि कमी पाणी वाकडला देतात. हा दुजाभाव का. आज तांबेसाहेबांनी दोन महिने आधी सन्मा. आमदार आमचे त्यांच्यासोबत असताना मला सांगितले की एक महिन्यामध्ये पाणी व्यवस्थित होईल. त्यांनी आमदार साहेबांनाही शब्द दिला होता. २०० टक्के पाणी आम्ही देतो. २०० टक्के पाणी एका विभागाला देता आणि २० टक्के पाणी आम्हाला देता. याच्या मागचे लॉजीक काय आहे. तांबेसाहेबांचे तिथे काय नातेगोते आहेत. तांबेसाहेबांनी त्याचा खुलासा केला पाहिजे. आज आयुक्तसाहेबांना आम्ही गेल्या सहा महिन्याआधी तेथील कनिष्ठ अभियंता बदली दया. असं मागितलं होतं त्याची काही एक चूक नसताना उदया लोकांनी त्याच्यावर हात उचलायला नको त्यांची काहीही चुक नसताना आजही तो शिव्या खातो. नवीन कनिष्ठ अभियंता, डेप्यूटी यांचा काहीच दोष नाही. तुमची वरची बदलली पाहिजे. आज आम्हाला इथं महापालिकेत येताना सुध्दा यायची इच्छा होत नाही. ज्या लोकांनी आम्हाला एवढं विश्वासाने मतदान केले निवडून दिले आणि आज आम्ही त्यांच्या समस्या सोडवू शकत नाही हयाची खंत आम्हाला इथं आहे. आज फक्त भाजपाची सत्ता आली म्हणून नाहीतर मी माझ्या फक्त निलखच सांगतोय म्हणजे आता पाणी नाही अशी परिस्थिती नाही. मी गेल्या २०१० पासून माझ्या इथं पाणी नाही. पाण्याच्या टाक्या तेव्हा मी स्वत: दिल्या होत्या. आणि आज आम्ही किती दिवस समाजसेवा चालू ठेवायची. आज आम्हालाही बाकीचे आहे ना. आज पहिल्यांदा माझ्या आयुष्यामध्ये मी पहिल्यांदा फोन बंद केलेत. आठ दिवस झाले. सकाळी पाच वाजलेपासून फोन येतात. त्यांना काय उत्तरे दयायची. तुम्ही लोक फक्त ऐकता आश्वासने देता. आठ दिवसात होईल, दहा दिवसांत होईल. विषय संपून जातो. पण तिथे दहा दिवसांनी लोक तुमच्यापशी येत नाहीत तर आमच्यापशी येतात. त्यांची काय चूकी नाही ना याच्यामध्ये. आज तुम्ही त्यांच्यावर एवढा अन्याय करताय तुम्ही पाणी देत नाही. घंटागाडया येत नाहीत. तिथे फॉगींग मशीन जात नाही. मग मशीन तुम्ही घेता कशाला. तुम्हाला फक्त स्लममध्ये दयायचेय. त्यांना पण दया. ते आपल्या शहरातीलच आहेत. आम्ही नाही म्हणत नाही. पण सोसायटीवाले पण आपल्याच शहरातच राहतात ना. त्यांच्यावर का अन्याय. तुम्ही

नवीन नवीन पॉलीसी काढताय त्याच्यामागची लॉजीक घ्यानां. उदया हया लोकांनी टॅक्स बंद केले तर कशावरुन महापालिका चालेल तुमची. आज कुठल्या एनओस्या दया नका देवू त्याच्याशी आम्हाला काय घेणदेण नाहीय. आम्ही महापालिकेमध्ये फक्त लोकांच्या समस्या मांडायला येतो. आमची तेवढी उंची पण नाहीय कुठल्या योजना आणायच्या काय आणायच्या. मला एवढचं समजत की ज्या मुलभूत गोष्टी आहेत त्या पहिल्यांदा तुम्ही त्यांना दया. बाकीच्या योजना तुम्ही नंतर आणा. योजनांना महत्व नाहीय. आता पाणी प्यायला नाही आणि तुमचं ही योजना, ती योजना काय उपयोग आहे काय याच्यामध्ये. आम्ही किती ही इथं बोंबललो तरी काहीही उपयोग होत नाही. ती एक म्हण आहे. भाऊसाहेबांना म्हणी जास्त येतात, कुणापुढ वाचली गिता तशी पध्दत आहे इथं. काहीच उपयोग नाही आमच इथं बोलून. इथं अभ्यासू लोक आहेत. इथं विषय मांडायचे असतात. परंतु इम्प्लीमेंट काहीच होत नाही. तर बोलून काय उपयोग आहे. फक्त मानसिक समाधान की वॉर्डमधील इथं विषय मांडले त्याला काहीही महत्व नाहीय. अशा पध्दतीने या महापालिकेमध्ये काम चालतयं. एकदम चुकीचे काम चालू आहे. माझी भूमिका ही प्रशासनाच्या विरुध्द आहे लक्षात घ्या. मी कुठल्या पक्षाचा आहे काय आहे याच्याशी मला काहीही नाही. इथं जे बसलेत त्यांनाही माझी विनंती आहे. आपण पक्ष म्हणून इथे बसू नका. लोकांच्या समस्या सोडवावयाच्या आहेत म्हणून इथं बसा. पक्ष आपल्या इलेक्शनमध्ये आहेत. राजकारण पुढे चालेल. लोकांच्या समस्या सोडवावयाला तुम्ही इथं या. पूर्वी काय केले मागची उणीधुनी काढण्यातच दिवस चाललेत. आता काय आहे आता काहीच नाहीये ना. बंद पाईपलाईन नाही. भामा-आसखेड नाही. काय केलेय तुम्ही काहीच नाही ना. आयुक्तसाहेब हे काम तुमचं आहे. तुम्हाला सांगायला मला खंत नाही वाटत. तुमची इमेज जी आहे ती खूप चांगली आहे. ती कुठे डॅमेज होतीय हे लक्षात घ्या. तुम्ही तुमच्यातला आत्मा जागा करा. तुमचे अधिकार अंमलात आणा लक्षात घ्या. आज मी आपल्याला सांगू इच्छितो की माझ्या इथली पाण्याची समस्या आपण जसे सांगितले तसे आठ दिवसांत नाही संपली तर मी तुमच्या इथं केबीनमध्ये उपोषणाला बसणार आहे. हे मी आपल्याला सांगू इच्छितो. एवढ बोलतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे** – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मला अस सांगायच आहे की पाण्याचा शहराचा ज्वलंत प्रश्न आहे. मी अजून विचारणार होतो की एखादया अधिका-यांचे डोक्यात हंडा घालून डोक का नाही फुटल. आयुक्तसाहेब, जुलै महीन्यामध्ये २०१७ ला भाऊसाहेबांनी पाण्यावर भाषण केले होते. त्यांच्यानंतर दत्ताकाका सानेंनी अधिका-यांना कोंडून घेतल होते, ते त्यांचे वैयक्तिक प्रश्न मांडत नव्हते तर या संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी होते. मला प्रश्न असा विचारायचा आहे आयुक्तसाहेब की आज आपले पवना धरण साडे आठ टीएमसी आहे. साधारणपणे आपल्याला सहा टीएमसी पाणी वर्षाला शहराला लागते. अडीच टीएमसी पाणी शिल्लक राहते. ठीक आहे बाकीच्या गोष्टी आहेत ६८ एरीगेशनचे डिपार्टमेंटसचे पंपीग आहेत, बाकीच्या गोष्टी आहेत त्याच्यानंतर तळेगावला, देहूरोडला, एमआयडीसीला पण पाणीपुरवठा करावा लागतो. एमआयडीसी १०० एमएलडी पाणी उचलते. आपण ४८५ एमएलडी पाणी उचलतो. आपण जे पाणी उचलतो त्याच्या व्यतिरिक्त आपण ३० एमएलडी पाणी एमआयडीसीकडून घेतो. आयुक्तसाहेब ९०-९२ पर्यंत एमआयडीसी पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करीत होती. २४X७ असे कन्टीन्यू चालू होते हे ब-याचशा लोकांना माहीती असेल. जेव्हापासून महापालिकेने पाणीपुरवठा विभाग पुरवावयाचे आपल्या ताब्यात घेतले तेव्हापासून सगळे विस्कळीत झाले. आता येणारा डब्ल्यू हा किती आहे. ते सांगू शकत नाही. आज मला सांगा आयुक्तसाहेब की आपण जे अधिकारी नेमलेत आता उदा. तांबेसाहेब बिचारे एक दिवसाचे मुख्यमंत्री नाईक पिक्चरमधल्या सारखं त्यांना तुम्ही चार्ज दिला नंतर काढून घेतला. आयुक्त साहेब, आमचा काही कुठल्या अधिका-यांवरती रोष नाही किंवा काही नाही. फक्त काय तुम्हाला वारंवार म्हणलं की तुम्ही कमान ठेवा तुमची. तुम्ही या शहराचे आयुक्त आहात. म्हणजे पालक आहात. या शहराला वळण लावायचे. कामे करुन घ्यायची. हा तुमचा जॉब आहे तुमचे कर्तव्य आहे, तुमच काम आहे. म्हणजे तुम्ही आमचे राजा आणि आम्ही तुमचे सरदार आहोत. पण आता असं झालं आहे की राजा झाला गुल प्रजा झाली भिकारी. आयुक्तसाहेब पाण्याचा प्रश्न सोडवावयाचा म्हटलं तर एक वर्षभराच्या आतमध्ये सुटेल. आपण आपले जे पाणी ट्रीट करतो एसटीपीमध्ये. समजा आता आपण सांगतो की तीन चार एसटीपीमध्ये अडीचशे एमएलडी ट्रीट करतो. त्याला

ट्रीट करुन जर ते पाणी रियूजमध्ये आले तर एमआयडीसीकडून आपण १०० एमएलडी पाणी उचलतो. त्यांना ते पाणी आपण दिले. त्या हजारो लीटरला खर्च करण्यापेक्षा आपण त्यांना नऊदहा लीटरने जरी पाणी दिले. मी तुम्हाला मागे पण बोललो होतो. त्यांचे पाणी आपल्याला १०० एमएलडी वापरायला मिळेल. देहूमध्ये १०० एमएलडी आपल्याला मंजूर आहे. डब्ल्यूटीपीसाठी आपण तिथे अजून जागा घेऊ शकलो नाही. सात किलो मीटर पाईपलाईन टाकलेली आहे. ते पाणी शुध्दीकरण करुन तळवडे असेल, चिखली असेल, मोशी असेल तो भाग आपल्याला चोवीस तास करता येईल. पण प्रशासनाने आपली स्वत:ची मानसिकता ठेवली पाहिजे. सव्वाशे कोटी रुपये खर्च केले तर ते काम होईल. भामा-आसखेडमध्ये आज आपल्याला २०० एमएलडी पाणी मंजुर होऊन किती दिवस झाले. आजपर्यंत आपण तिथे डब्ल्यूटीपीसाठी जागा घेऊ शकलो नाही. तिथे शेतक-यांचे प्रश्न आहेत. ते आज आपल्याला सगळं जर करायचच म्हटलं तर शासनाला आपल्याला तीनशे कोटी रुपये दयायचे आहेत. तरी आठशे कोटी रुपये मध्ये आपले प्रोजेक्ट होऊ शकेल. आयुक्तसाहेब तुम्हाला मी क्लीअरकट सांगतो. दोनचार ब्रीज तुम्ही या वर्षामध्ये कमी बांधले तरी चालतील. हे पैसे तिथे जर खर्च केले आणि ते पाणी जर आणल. हे ट्रीट करुन जरी पाणी एसटीपीचं समजा रावेत डॅममध्ये जरी सोडले. ते ट्रीट करण्यासाठी सेक्टर २३ मध्ये जरी आणले २०० एमएलडी. म्हणजे साधारणपणे ११ किलोमीटर ही जरी पाईपलाईन केली तरी आणि त्याला जर पंप लावले आणि त्या पंप लावून जर ते केले ना. आयुक्तसाहेब २०० एमएलडीचा विषय जरी क्लीअर झाला ना तर शहराचा पाणीपुरवठयाचा विषय मार्गाला लागू शकतो म्हणजे तुमच्याकड सोर्स आहेत परंतु तुमची ती मानसिकता नाही. आणि हयाच्या व्यतिरिक्त एक सांगतो. मुळशी धरण, पवना धरण सव्वासाहा किलोमीटर दोन्ही धरणामध्ये डिसटन्स आहे. आणि मुळशी धरणाची कॅपॅसिटी २३ टीएमसी इतकी आहे. आज तिथे जर पावसाळयाला साधारणपणे ३०-३२ टीएमसी पाणी येते. आज आपण त्यातील १० टीएमसी पाणी खाली आपण सावित्री नदीमार्गे कोकणात जाते. ते असेच सोडून दयायला लागतं किंवा इकडे खाली येते. आज ७ ते ८ टीएमसी पाण्यात टनेलजर केलातर, ब-याच ठिकाणी सल्लागार नेमलेले आहेत. एक इथं सल्लागार नेमून बघा. की इथं टनेल करायला किती खर्च येईल. आज भामा-आसखेडचे

प्रकरण ते अजुन मार्गाला लागले नाही. हजार-आठशे कोटी रुपये आपल्याला खर्च असेल जर ते प्रोजेक्ट लांबले तर दिड हजार कोटी पर्यंत पुढे जाईल. आज बंद पाईप लाईन पवना प्रोजेक्ट तो ही प्रकल्प झालेला नाही शेतक-यांमुळे. मी म्हणतो आयुक्तसाहेब ते एक टनेल करुन जर पाणी आठ मी.ची लेव्हल डिफरन्स आहे फक्त. चोवीस फूट पंचवीस फूट जर टनेल खाली घेतलातर एक्स्ट्रा पाणी जे मुळशीचे आहे ते पाणी जर पवनामध्ये आणले तर तिथे पवनाचे जे शेतकरी आहेत ते म्हणतात की आमचे पाणी कमी होतंय. आज सात आठ टीएमसी. आज साडेआठ टीएमसी जर पवनाची कॅपॅसिटी आहे. अजून सात आठ टीएमसीचा मुर्त साठा आपण आपल्याकडे वळवून घेतला तरी आपला प्रश्न मार्गी लागेल. देहुमध्ये १०० एमएलडीसाठी मंजुर आहे. तुम्ही टेंडर काढा तो ही प्रश्न मार्गी लागेल. शासनाच्या मार्गाने ते विषय मार्गाला लागतील. तीन आमदार, दोन खासदार शहरासाठी तिथे भांडतील. आयुक्तसाहेब तुम्हाला एक सांगतो आता रावेतच्या इथं इरीगेशन डिपार्टमेंटचा माणूस दररोज चेक करायला येतो की पाण्याची लेव्हल काय आहे. आपण काय करतो आपला माणूसच तिथे नाहीय. सात इंच खाली गेले का एक फूट खाली गेले. मग तो तिकडे कळविणार मग पवना डॅममधून पाणी येणार १२ तास लागतात येथे पाणी यायला. पवना धरण ते रावेत डॅम साधारणपणे ३२ ते ३३ किलोमीटर अंतर आहे पाणी यायला. जर १२ तासांनी पाणी आपल्याला आले की मग शहराला इतकी ओरड चालू होते. आणि अनधिकृत कनेक्शन्स, एनआरडब्ल्यू हे बघा जरा. आज तिथे समजा लाईट गेलेली आहे. सगळयांना वाटते की लाईट गेली म्हणून प्रॉब्लेम झालेला आहे. इलेक्ट्रीकचा प्रॉब्लेम झालेला आहे. अहो तिथे जनसेट बॅकअप दया. असा किती खर्च येणार आहे. महापालिका करोडे रुपये इकडेतिकडे खर्च करतेय. १८५ केबीचा जनसेट घ्या किंवा २४० चा घ्या. तुम्हाला जे योग्य वाटेल ते घ्या तिथे थोडा खर्च केला दहा लाख मंजुर केले महिन्याला. सव्वाकोटी रुपये खर्च होईल ना. आयुक्तसाहेब तुम्ही तुमची मानसिकता आणि प्रशासनावरची तुमची कमांड निर्माण केली तरी तुमचे हे प्रश्न मिटणार आहेत. आम्ही इथे आमच्या घरचे प्रश्न घेऊन आलेलो नाहीततर आम्ही पूर्ण पिंपरी चिंचवड शहरासाठी इथं आलेलो आहोत. नुसती बघ्याची भूमिका घ्यायची असेल तर आयुक्तसाहेब आम्हाला पण दिड वर्षे झालेत तुम्हाला पण दिड वर्षे झालेत इथं येऊन.

आम्ही म्हणतोय की कसं काम चाललय तुमचं, काय आहे. बरीचशी लोक म्हणतात की कालचा गोंधळ बरा होता. आजची परिस्थिती वाईट आहे. आता महापौरांना पण या पाणी प्रश्नावरती आंदोलन करावे लागलय. तर हयाच्या पेक्षा मोठी शोकांतिका कुठलीच नाहीय आणि आयुक्तसाहेब आम्ही इथं बोलतो ते या शहराबद्दल बेंबीच्या देठापासून बोलतोय. आम्हाला या शहराबद्दल प्रेम आहे कारण हे शहर आमचं आहे. आणि ते आम्हाला सुधारलेले पाहिजे. इथल्या शहरातील लोकांच्या अडीअडचणी दूर झाल्या पाहिजेत. तुम्ही आज नागरपूरवरुन इथे आलात. अजुन तुमची इथून बदली पुढच्या वर्षा-दोन वर्षाने दुसरीकडे होईल. किंवा तुम्ही आताच बदली मागवून घ्याल. आम्ही काय करायच. कारण आम्हाला इथंच मरायचं आहे. इथंच जगायचं आहे. आमची लाकडं पण इथल्याच नदीवर जाणार आहेत. आणि आयुक्तसाहेब मी जे प्रश्न विचारलेत त्याचा मला खुलासा ताबडतोब दया. ती लेव्हल चेक करायला तिथे आपला माणूस आहे का. आज आपल्याकडे गळती किती आहे. आज एनआरआयडब्ल्यू किती आहे. आज समजा जे पाणी चोरीप्रकरण होते त्याची यंत्रणा घेतली ती कार्यान्वित केली का. समजा आपली लोक कारवाईला गेले कुठले नगरसेवक फोन करुन ती कारवाई थांबवितात का. मी जर त्यामध्ये असेलतर दोषी आहे तर माझ्यावर कारवाई करा. ते पथक नेमणार आहे तुम्ही त्याचा कंट्रोल तुमच्या अंडरमध्ये ठेवा. आयटी कंपनीमध्ये माणूस जर कामाला गेला तर त्याचे मोबाईल काढून घेतात. इथं आठ तास काम कर नंतर तुझा मोबाईल घे आणि नंतर घरी जा. अशा हिशोबाने तुम्ही तुमचे पथक निर्माण करा. आणि प्रत्येक गोष्टीत ज्या अधिका-याला ज्या कामाची डिग्री घेतलेली आहे त्याला ते काम दया. आज इथं काय झाले आहे कुत्र्याचा पाय मांजराला आणि मांजराचा पाय कुत्र्याला. प्रशासन पूर्ण झालंय ढप्प. ज्याची जी कॅपॅसिटी आहे त्याला ते काम नाहीच. कपॅसिटीप्रमाणे जर काम दिलं तर माणूस १०० टक्के व्यवस्थित करतो. आज मी लडकत साहेबांच्या इथे तीनचार वेळेला जाऊन आलो सेक्टर २३ ला. त्यांची अ आणि फ ला बदली केली आहे. आयुक्तसाहेब तुम्हाला सांगतो अ ला आणि फ ला पाण्याचा एवढे बीकट प्रश्न आहेत. कारण की तुमच्या इथं पाण्याचा प्रॉब्लेम आहे दहा ते पंधरा टक्के असेल आमच्या इथं ८० टक्के प्रॉब्लेम आहे. ऐका म्हणजे प्रश्न तुमचा आमचा नाहीय. आपण सगळे एकच आहोत. पण अशी परिस्थिती आहे की तो व्यक्ती रात्री दोन

वाजता, तीन वाजता पण त्या सेक्टर २३ ला असते मी बघीतल डोळयानी. त्यादिवशी रात्री पावणेबारा पर्यंत त्यांची आणि माझी मिटींग चालली. पहिले साहेब आपल्याला कायदे करा या शहरासाठी. तो माणूस जर इतके काम करीत असेल आणि त्याला जर सेक्टर २३ मधून काढले त्याच्यानंतरच एवढे प्रॉब्लेम तयार झाले. साहेब ज्याची काम करण्याची कॅपॅसिटी होती त्याला तुम्ही तिथ काम करायचे सोडून दिले आणि त्या बिचा-याने आजपर्यंत कधी पाणीपुरवठयातून बदली मागितली नाही. तो कायमस्वरुपी पाणीपुरवठया मध्येच आहे. आणि तो त्याच्यामध्ये सुखी आहे. त्याला नॉलेज आहे त्याला थोडीशी माहिती आहे. तर त्याला आपण तिथून काढल आणि इकडे अ आणि फ ला दिल. आता ते कांबळे म्हणून जे आलेत ते रिटायरमेंटला आहेत. त्यांचा महिना दिड महिना राहिला असेल. त्यांना जे काम करायचं होते ते त्यांना दिले असते तर ते त्यांनी व्यवस्थित पार पाडलं असतं. त्यांची आता अशी परिस्थिती झालेली आहे की "भिक नको पण कुत्रा आवर". त्यांना काय त्यातलं माहित नाहीय. ते म्हणतात की मी तरी करु काय. त्यामुळे हे सगळं विस्कळीत झालेले आहे. आयुक्तसाहेब ह्या सुधारणा करणे तुम्ही पालक म्हणून तुमची जबाबदारी आहे. आणि त्या तुम्ही ताबडतोब कराव्यात. आणि मी सांगतो की जर मुळशी डॅम आणि पवना डॅममध्ये जर एखादा कन्सलटंट नेमला तो एक आपल्याला सोर्स बघा, कारण की आज आंद्रा भामाचे हजार आठशे कोटी रुपये खर्च करुन तुम्ही संपुर्ण मार्गी लागेल नाही लागेल माहित नाही. आज शंभर सव्वाशे कोटी रुपये खर्च करुन ते प्रपोजल मार्गाला लागले तर १०० एमएलडी तरी पाणी घ्या. आज तुमच्याकडे सोर्स आहे तुम्ही हे करु शकता. फक्त मानसिकता सुधरा. एवढ बोलून थांबतो, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.अनुराधा गोफणे-** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह. मा. आयुक्त साहेब सर्वप्रथम धन्यवाद महापौर साहेब बोलायला संधी दिली त्याबद्दल. आज आपल्या सभागृहामध्ये पाणी हा सगळयांच्याच जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आणि खर म्हणजे महिलांच्या फार जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आयुक्तसाहेब महापौर साहेब गेली महिनाभर आपल्या शहरातील पाणीपुरवठा हा पूर्णपणे विस्कळीत झालेला आहे. सगळे सण आपण या महिनाभरामध्ये साजरे केले. नवरात्र गेली, नवरात्रामध्ये सर्व महिलांना स्वच्छतेची कामे करायची असतात. परंतु माझ्या प्रभागाचा पाण्याचा प्रॉब्लेम खूप आहे

मी रोज गेली नऊ दिवस माझ्या प्रभागामध्ये पाण्याच्या संदर्भात मिटींग घेतली होती. आयुक्तसाहेब एकाही भागामध्ये व्यवस्थित पाणीपुरवठा नाही आणि एकाही भागामध्ये वेळेत पाणीपुरवठा होत नाही. दिडतास पाणीपुरवठा येतो त्यातले पहिले पंधरा मिनिटे नळातून पहिली हवाच येते त्याच्यानंतर पाणी यायला सुरुवात होते. तर पहिले पाणी संपुर्ण घाण पाणी येते. आणि नंतर पंधरा मिनिटांनंतर चांगले पाणी येते. आणि जायचे वेळेस १० मिनिटे पाणी अगोदर निघून जाते. आयुक्तसाहेब हा खूप गंभीर प्रश्न माझ्या प्रभागामध्ये आहे. मी माझ्या गुरुकृपा कॉलनी असेल, शास्त्रीचौक असेल, दुर्गामाता कॉलनी, गवळीनगर, स्वामी विवेकानंदनगर, दिघीरोड, आदर्शनगर, या सगळया भागामध्ये श्रावणनगर, महादेवनगर, या भागामध्ये आयुक्तसाहेब सकाळी १० ते रात्री १० वा.पर्यंत माझ्या महिला फक्त पाण्याच्या नळाकडे पाहात राहतात. पाण्याची वेळ ही कन्फर्म नाहीय. पाण्याची वेळ ही निश्चित नाहीय. पाणी कधीपण येते. त्यामुळे माझ्या महिला भगिनी घरातून बाहेर पडत नाहीत. पाणी कधीही येईल आणि त्या वेळेस आपण ते भरुन घ्यायचे. की जेणेकरुन आपले रोजचे काम होईल. हया दृष्टीने माझ्या महिला भगिनी घरातून बाहेर पडत नाहीत. अशीही पाण्याची अत्यंत गंभीर परिस्थिती आपल्या शहरामध्ये आणि माझ्या प्रभागामध्ये तर साहेब खूपच गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. साहेब याच्यावर आपण उपाय योजना करायला हवी आहे. सर्वप्रथम आपण पाण्याची जी गळती होतीय यापूर्वी आम्ही सभागृहामध्ये पाणी गळती कळवा आणि पाचशे रुपये मिळवा. अशी योजना राबविली होती की जेणेकरुन पाणी गळती कळायची आणि तिथे ताबडतोब इंम्प्लीमेंट व्हायचं. साहेब आपल्याकडे भरपूर अनधिकृत बांधकामे चालू आहेत. आमच्या भागामध्ये बिल्डर लोकांची इतकी कामे चालू आहेत. तिथला पहिलं पाणीपुरवठा रद्द करा. की जेणेकरुन नागरीकांना पहिल्यांदा पिण्याचे पाणी मिळेल. आज सध्या अशी परिस्थिती आहे की लोकांना पिण्याचे पाणीच नाही. आता तुम्ही या घडीला लोकांना पहिलं पिण्याचे पाणी पुरवा आणि नंतर बाकीची तुम्ही कामं करा आज भरपूर याठिकाणी सगळयांनी सांगितलेले आहे की पाण्याबद्दल काय काय याठिकाणी उपाययोजना करायला पाहिजेत. परंतु माझ्या प्रभागामध्ये २४X७ कामाची आपण वर्कऑर्डर दिलेली आहे. पण गेली तीनचार महिने काहीच काम चालू झालेले नाही. वर्क ऑर्डर दिलेली आहे. अशा ठेकेदाराला ब्लॅकलीस्ट करा. आणि

भोसरीच्या बाजूला आम्हाला नेहमीच कंटीन्यू असे सांगितले जाते की लाईट जाते किंवा काही तरी टेक्नीकल प्रॉब्लेम आहे. हे असं दर वेळेस का होते. एखादया महिन्यामध्ये एखादया वेळेस प्रॉब्लेम होऊ शकतो. परंतु रोजच जर लाईट जात असेल टेक्नीकल काही प्रॉब्लेम असेल तर आम्ही काय करायच आम्ही लोकांना काय सांगायच. तुम्ही त्याच्यावर उपाययोजना करायला पाहिजे. आणि पंपींगला जी नॉनटेक्नीकल लोकं आहेत. त्यांना त्याच्याबद्दल काहीच नॉलेज नाही. अशी लोकं तिथे काम करतात. साहेब माझी आपल्याला विनंती आहे की त्या लोकांना पाणीपुरवठयामध्ये काम करायचं नाही. अशा लोकांना तिथून काढून टाका आणि ज्यांना त्याच ज्ञान आहे अशा लोकांना तिथे घ्या. माझ्या प्रभागामध्ये दोन ठिकाणांहून पाणीपुरवठा होतो. एक पांजरपोळवरुन होतो आणि एक संततुकारामनगरवरुन होतो. साहेब परवा संततुकारामनगर मधील टाकीच्याखाली ज्यावेळेस भजनीमंडळी, महिलाभगिनी सगळे भजने म्हणत होते त्यावेळेस त्या पाण्याच्या टाकीचे पोपडे खाली पडले. त्या टाकीचे स्ट्रकचरल ऑडीट झालेले आहे. त्या टाकीचे लाईफ संपलेले आहे. साहेब त्या टाकीचे रिन्यूएशन करण्याची फार गरज आहे. साहेब मी तुम्हाला पत्र पण दिलेले आहे. की ती टाकी रिन्यूएशन करुन नव्याने तिची थोडीशी क्षमता वाढवावी जेणेकरुन त्या भागातील लोकसंख्या वाढलेली असल्याने त्या भागातील नागरीकांना त्याची फार गरज आहे. आणि जेणेकरुन पाणीपुरवठा जो विस्कळीत झालेला आहे तो सुरळीत व्हावा. आणि आपण जे पाणी सोडतो माझ्या भोसरी भागातील गावठाणामध्ये साहेब कंटीन्यू व्यवस्थित पाणीपुरवठा आहे पण माझ्या शेजारचा प्रभाग त्या पाण्यापासून वंचित आहे असा तुम्ही दुजाभाव का करता. मग तुमचे अधिकारी असां दुजाभाव का करतात. ते तुम्ही काही ठरवून करता का. असं का होतं साहेब. म्हणजे ज्या वेळेस नागरीक त्यांचे संबंधित लोक शेजारच्या प्रभागात असतात ते आम्हांला सांगतात की ताई तीकड भरपूर पाणी आहे आणि आपल्याच प्रभागात का असं होतं. त्याची काही कारणे आहेत साहेब. ज्यावेळेस टाकी ओव्हर फ्लो होती ओव्हर फ्लो झालेल पाणी परत तीथ त्यांना येत आणि तिथे कंटीन्यू पाणी राहते. दिवसभरामध्ये पाच ते सहा तास तिथे पाणी राहते. तर आमच्या गवळीनगरच्या भागामध्ये पाण्याचा खूप प्रॉब्लेम आहे. तर माझ्या प्रभागातील पाण्याचा प्रश्न फार गंभीर आहे साहेब. तरी या सर्व गोष्टीचा विचार करुन

माझ्या प्रभागातील पाणीपुरवठा तसेच शहरातील पाणीपुरवठा देखील नियमित करावा अशी नागरीकांच्या वतीने मी विनंती करते.

मा. प्रियांका बारसे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह. मा. आयुक्त साहेब सर्वच नगरसेवकांनी संपूर्ण पिंपरी चिंचवड मधल्या शहराचा विस्कळीत पाणीपुरवठा बद्दल भरपूर तक्रारी केलेल्या आहेत. त्याच तक्रारी माझ्या आहेत त्या तक्रारी परत रिपीट करण्यापेक्षा मी आपल्याला असे सुचवू इच्छिते की हे जे अधिकारीवर्ग खरतर ते सगळ कंट्रोलींग अधिका-यांच्या हातामध्ये आहे. हे अधिकारी आपण बदली करताय एखादया अधिका-याची तक्रार आली, जे.ई.ची तक्रार आली की आपण इथल्याइथं बदली करतो. हया बदली प्रकरणामध्ये थोडासा बदल केला. महानगरपालिका टू महानगरपालिका जर यांच्या घरापासून यांना जर लांब ठेवले, जरा आठ-दहा जरी बदल्या अशा झाल्यातर सगळया अधिका-यांवरती तुमचा वचक बसणार आहे. त्याबाबतीतही तुम्ही गंभीरतेने दखल घ्या. मा. मुख्यमंत्र्याशी याबाबतीत आपण चर्चा करावी. अशी मी तुम्हाला विनंती करते. कारण हया महानगरपालिकेतून डायरेक्ट नाशिकला, औरंगाबादला, पुण्यामध्ये अशा लांबलांब ठिकाणी हयांच्या जर बदल्या झाल्या तर निश्चित प्रत्येकांच्या कार्यक्षमतेमध्ये बदल घडणार आहे. त्याचप्रमाणे तीन वर्षापेक्षा अधिक ठेकेदार आहे त्या ठेकेदारांच्या हाताखालची लोकं जे व्हॉल्हमनचे काम करतात. टाकीचे कॉक  सोडतात मग या ठेकेदारांच्यावरती कंट्रोल ठेवायचा असेल तर हयांना पण परत परत रिपीट करण्याऐवजी दुस-यांना ठेके दया. प्लंबर लोकं जे आहेत ते सुध्दा आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत. त्यांच्या सुध्दा बदल्या जे.ई.प्रमाणेच लांबलांब केल्यातर त्यांच्यावरही कंट्रोल राहणार आहे. थोडीशी आपण सक्त पावले उचलली तर एकदम सक्षम पावले उचलली तर आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा हा पाण्याचा पुरवठा सुरळीत होइल. आता सगळेच सांगतात की धरण भरलेले आहे १०० टक्के. मग त्या धरणापासून टाकीपर्यंत येईपर्यंत निश्चितच कुठेतरी गळती असेल, गळती काही १०० टक्के नसेल २० टक्के असेल १५ टक्के असेल, १० टक्के असेल    बाकीचे ८० टक्के जरी पाणी आपल्या टाकीमध्ये आले पाहिजे ना. हवा येती म्हणजे खरच वाईट परिस्थिती आहे. निश्चितच आम्ही सगळेच जण या संकटाला सामोरे जात आहोत. आणि हयाचे जे टेक्नीक आहे, सगळयांना

सांगितले जाते की टेक्नीकल प्रॉब्लेम, टेक्नीकल प्रॉब्लेम परंतु हे टेक्नीकल प्रॉब्लेम म्हणजे माणसेच आहेत. या माणसांवरती जर कंट्रोल करायचा असेल तर त्यांना त्यांच्या जागा बदला आणि जागा बदलायच्या असतील तर त्या इथल्याइथं न बदलता या महानगरपालिकेतून त्या महानगरपालिकेत करणे हा एकमेव पर्याय तुमच्या सगळयांसमोर आहे. आपण निश्चित याच्याबाबतीत गंभीरतेने दखल घ्या. आणि आताच सांगितले की भामा आसखेड किंवा पवना डॅमचे पाणी आपल्यापर्यंत येणे. या योजना लवकरात लवकर आपल्यापर्यंत कशा राबविता येतील. याबाबतीत मा.आयुक्त आणि याच्यामध्ये कुठलाही पक्ष अशा मुलभूत गोष्टीसाठी पक्षासाठी मी भांडणार नाही. मूलभूत गरजा हया नागरीकांच्या आहेत आणि त्या नागरीकांचे प्रतिनिधी म्हणूनच आपल्यासमोर मांडत आहोत. आता आमच्या प्रभागातल्या गोफणेताईंनी पण सांगितले. की टाकी कमकुवत झालेली आहे. महिलांच्या ठिकठिकाणी आम्हाला सभा घ्याव्या लागतात. त्यांना तोंड दयावे लागते. उत्तरे दयावी लागतात. पण ताथूरमाथूर उत्तरे आहेत ती एक क्षणापूरती. एक आठवडयापूरती, पंधरा दिवसांपूरती. त्याच्यापेक्षा जास्त आम्ही त्यांना कन्हीन्स करु शकत नाही. अशा वेळी आम्हाला त्यांच्या आक्रोशाला आणि संतापाला सामोरे जावे लागते. तो संतापही आम्हांला सहन करण आमचे कर्तव्य आहे असे आम्ही मानतो. आणि आम्ही शांतपणे त्यांच्या शिव्या सुध्दा झेलत आहोत. कारण आमचे कर्तव्यच आहे शिव्या खाणे सुध्दा. कारण आम्ही जर त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊ शकत नसेल. आणि आमच्या प्रश्नांना जर अधिकारी उत्तरे देऊ शकत नसतील तर ती लाजेची बाब आहे आमच्यासाठी. त्यामुळे मी महापौरांना असे सांगेन की हयांची बदली करणे. आणि ते पण घरापासून लांब करणे. हा एकमेव पर्याय आहे हया बाबतीत आपण गंभीरतेने विचार करावा, धन्यवाद.

मा. पौर्णिमा सोनवणे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह. मा. आयुक्त साहेब आज गंभीर समस्या इथं चर्चिली जात आहे. पुर्ण पिंपरी चिंचवड शहराला कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि अपूरा पाणीपुरवठा होणे ही शरमेची बाब आहे. नागरीकांना आपण मूलभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. नागरीकांकडून आपण कर घेतो परंतु व्यवस्थित पाणी न मिळणे ही खूप शरमेची बाब आहे. अधिका-यांना नेहमी पाण्याविषयी विचारले तर ते उडवाउडवीची उत्तरे देतात. महापौर, आयुक्त यांच्याकडे

तक्रार केली तर हे अधिकारी परत दुसरी उत्तरे देतील. उत्तरे बदलतील. आपण पुर्ण कार्यक्षमतेने काम करीत आहात तर नक्कीच ही जी गोष्ट आहे ती चांगल्या प्रकारे होऊ शकते. दुसरी गोष्ट पाणी येताना पाण्याचे जे टायमींग आहे आमच्या इथं बहुतांश कामगार महिला आहेत. त्यांच्याकरीता त्यांचे म्हणणे आहे की पाण्याचे शेडयूल किंवा पाण्याची वेळ बदलून मिळावी. म्हणजे अधिका-यांना विचारलं होते परंतु ते म्हणले की अशी वेळ चेंज नाही करता येणार. पण तुमच्या स्तरावरुन काही निर्देश करता आले तर बघा. पाईपलाईन सुध्दा ब-याच वर्षापूर्वीच्या आहेत प्रभागातल्या. त्यात गटारीचे पाणी मिसळून येते तर अधिका-यांना या विषयी पण सांगा. बरेच वर्षापूर्वीच्या ज्या पाईपलाईन आहेत. त्या चेंज करणेत याव्यात. दुसरे म्हणजे ब-याच वेळा पंप बंद आहे असं कारण दिले जाते. त्याच्याकरीता अधिका-यांनी दुसरी यंत्रणा नेहमी सज्ज ठेवावी. का तर पंप बंद आहे सारखं हे कारण नागरीकांना आम्हाला नाही देता येत. नागरीक लोक आमच्यावरती राग व्यक्त करतात. दुसरं जो पंप नेहमी बंद असतो त्याच्याकरीता महावितरण आणि पाणीपुरवठा यांनी समन्वय साधावा. आणि पाणी व्यवस्थित यावं याच्याकरीता प्रयत्न करावेत. या व्यतिरिक्त धरणामध्ये १०० टक्के पाणी असताना जर प्रशासन आणि अधिकारी उत्तरे व्यवस्थित देत नसतील. तर हे प्रशासनाचे अपयश आहे अशी खंत व्यक्त करते. आणि महापौरांनी त्यांच्या सर्वांना निर्देश देऊन पाणी सुरळीत करावे. अशी आशा व्यक्त करते आणि थांबते, धन्यवाद.

मा. नितीन काळजे – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. सभागृह. आज आपल्या सर्व सहका-यांनी शहरातील पाणीपुरवठयाविषयी चर्चा केली. सगळयांचा आक्रोश पाहून असं वाटलं की खूपच वाईट परिस्थिती आहे. सगळयांच्या भागामध्ये तशीच परिस्थिती आहे. साहेब ज्यावेळेस एक वर्षापूर्वी मी महापौर असताना पाणीपुरवठयाबाबतीत मिटींग घेतली होती. त्याचवेळेस थोडी माहिती घेतली असता आपल्या शहराला पूर्वीची पाणी परवानगी होती ती ४८० एमएलडी इतकी होती. त्याच्यानंतर हे शहर दुपटीने वाढलेले असताना सुध्दा आपण तेच पाणी सर्व शहराला पाणीपुरवठा करीत आहोत. प्रथमतः मला सर्व सन्माननींयाना अस सांगण्याची इच्छा आहे. याबाबतीत कोणीही राजकारण केले नाही पाहिजे. कारण की हा सर्व नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. आज आपण संदीप वाघेरेंनी सांगितल्याप्रमाणे मला तरी असं

वाटत की बंद पाईप लाईन आपली होणं कठीणच आहे. परंतु भामा आसखेड असेल आंद्रा धरण असेल यामधून आपल्याला पाणी परवानगी भेटलेली आहे त्या माध्यमातून जशी म्हणावी अशी पावले आपल्या प्रशासनाकडून उचलली गेली नाही. हे नाही म्हटलं तरी प्रशासनाचे अपयश म्हणावेच लागेल. आज आमच्या ग्रामीण भागामध्ये जर पाहिलं तर सगळयांत शेवटी आमच्या ग्रामीण भागाचा काही प्रभाग येत असतो. या भागामध्ये ज्यावेळेस तीन ठिकाणाहून पंपींग करुन शेवटच्या ठिकाणी आम्हाला पाणी येत असते. येत असताना आठवडयामध्ये कमीत कमी दोन ते तीन वेळा प्रत्येक ठिकाणी काहीना काही अडचण येत असते. ती अडचण येत असताना सगळयात जास्त फटका शेवटच्या प्रभागांना जास्त बसत असतो. मुळात आपल्या शहरामध्ये अधिकारी काम करतात. परंतु त्यामध्ये पाणीवाटपामध्ये  थोडं मी राजकारण नाही म्हणणार परंतु त्यांचा निष्काळजीपणा म्हटला तरी चालेल. कारण का की अधिकारी ज्या भागामध्ये पाणीपुरवठा कमी होतो, ओरड येते लगेच ते त्या  भागाला १०-१२ एमएलडी पाणी वाढवून देतात. दुस-या भागामधली ओरड आली की त्या भागामधला कमी करुन दुस-या भागामध्ये पाणीपुरवठा वाढवून देतात. साहेब, मुळात आज आपली अशी परिस्थिती झालेली आहे. आडातच नाही तर पोव-यात काय येणार आहे. आज मला असं वाटतं की स्वत: आपण साहेब जरा जास्त लक्ष देऊन भामा-आसखेड, आंद्राचा जो प्रकल्प आहे एक्स्ट्रा पाणी उचलण्याचा. तो लवकरात लवकर पूर्ण करावा असं मला वाटतं. कारण का की तो जर प्रकल्प पूर्ण झाला तर मला असं वाटते ख-या अर्थाने आमच्या ग्रामीण भागामधील पाणीपुरवठा सुरळीत होईल. आज अशी परिस्थिती झालेली आहे आमच्या भागामध्ये आम्ही कोटयावधीची कामे करुन पाणी फिरल्यासारखे झालेले आहे. खूप वाईट परिस्थिती आहे साहेब. आज आपण ज्यावेळेस गेल्या वर्षी दिवसाआड पाणीपुरवठा केला होता. परंतु त्यावेळेस दिवसाआड पाणीपुरवठा करुन आपली परिस्थिती सुधारली नाही. मला असं वाटतं साहेब आपण सर्व पक्षाचे गटनेत्यांना एकत्र घेऊन प्रत्येक भागामध्ये दिवसाआड पाणीपुरवठा करावा. आणि ज्या भागामध्ये पाणी जात नाही त्या भागामध्ये प्रेशरने पाणी सोडले तर पाणी जाईल साहेब मुळातच वरुन पाणी नाहीय. त्यामुळे खाली पाणी जाणार नाही. त्यामुळे दिवसाआड पाणीपुरवठा करावा असं मला वाटतं. की जेणेकरुन दिवसाआड पाणीपुरवठा

केल्यामुळे प्रेशरने पाणी काही भागामध्ये जाईल, दुस-या दिवशी दुस-या भागामध्ये प्रेशरने पाणी जाईल. आज अपण आम्ही ज्यावेळेस तक्रार करतो. प्रत्येक वेळेस अधिका-यांकडे तक्रार केल्यानंतर अधिकारी किंवा प्लंबर असेल तो काय करतो. आमच्या समाधानासाठी इकडं पाईपलाईन उकर तिकडे पाईपलाईन उकर. वरुनच पाणी नाही आणि खाली उकरुन काय साहेब. यामुळे वरतून समान पाणीवाटप व्हावे. अशी मी तुम्हाला विनंती करतो आणि आपल्या ग्रामीण भागामध्ये एक तर नवीन नागरीकरण खूप वाढत आहे. आणि त्याप्रमाणे पाण्याचे वाटप होत नाहीय. मला वाटत जवळजवळ ५० टक्के अनधिकृत नळ कनेक्शनस असतील त्यासाठी पण आपण थोडी कारवाई करुन अनधिकृत बांधकामांना पाणी पुरविले जाते. लोकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेऊन ते पाणी बांधकामांना पण वापरले जाते. त्यावर पण आळा बसला पाहिजे. आणि सर्व अधिका-यांची एकत्रित रित्या बैठक घेऊन सर्व गटनेत्यांना बोलवून नगरसेवकांना देखील बोलविले तर चालेल. आणि दिवसाआड पाणीपुरवठा करावा अशी माझी विनंती आहे. थांबतो जयहिंद जय महाराष्ट्र.

मा. सुनिता तापकीर - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. धन्यवाद महापौर गेली दिड तास मी वाट पहातेय. पाण्यासारख्या गंभीर विषयावर प्रत्येकजण चर्चा करीत आहे. तर मला एक असं सांगायचय दूषित पाण्याबद्दल. सुरुवातीला दूषित पाणी प्रत्येक नळाला येते. जवळजवळ तास ते दिड तास नागरीक तो नळ चालू ठेवतात. ते पाणी वेस्टेज जाते. जर पहाटे चारला पाणी आले तर ते साधारणत: सहा साडेसहानंतर स्वच्छ पाणी येते. नंतर पाण्याचा प्रेशर कमी होतो. मला वाटतं आपल्या महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे पाणी अडवा, पाणी जिरवा. तर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासनाच असं आहे की पाणी अडवा, नगरसेवकांची जिरवा. कारण तुम्ही पहायला गेले तर प्रत्येक नगरसेवक सांगतात की पहाटे चार वाजलेपासून आम्हाला पाण्यासाठीच फोन येतात. पाण्याचा इतका अत्यंत गहन प्रश्न आहे की विचारता सोय नाही. महापौरसाहेब मी तुम्हाला एक विनंती करते की आता आपण ज्या ठिकाणी शालेय भेटी दिल्या त्याचप्रमाणे तुम्ही ऑल ओव्हर पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्या मोठया मोठया सोसायटया आहेत. तिथे अचानक भेटी दया. तर तुम्हाला कळेल की तिथे नळ कनेक्शन किती अनधिकृत दिलेले आहेत. नाही या

अधिका-याचे धाबे दणाणलेले तर बघा. कारण का स्थितीच तशी आहे. सोसायटयांना पाणी भरपूर आहे. सामान्य नागरीक पण कर देतात ना. प्रत्येक ठिकाणी सोसायटीला कमीत कमी चार ते पाच नळ कनेक्शन जास्त आहेत. त्यांचेकडे वरच्या फ्लोअरपर्यंत पाणी येतेय. खालची टाकी पण पूर्ण भरतीय. मग सामान्य नागरीकांनाच हा प्रश्न का. मोटारी लावतात ते बरोबर आहे. खालची पाण्याची टाकी त्यांची पूर्ण प्रेशरने भरतेय. तर तुम्ही जी शाळेंना अचानक व्हिजीट दिलीय. त्याचप्रमाणे तुम्ही पिंपरी चिंचवड शहरातल्या मोठया मोठया स्कीम ज्या झाल्यात. तिथे अचानकपणे व्हिजीट दया. तुम्ही चिंचवडला देणार असाल तर शिवाजी महाराजांनी जो गनिमी कावा वापरला होता त्याप्रमाणे तुम्ही दुसरीकडे जा. भोसरीला जावा. वाल्हेकरवाडीला जा. म्हणजे तुम्ही सांगा एका ठिकाणी आणि जा दुसरीकडेच. म्हणजे तिथले लोक शाबूत राहतील. पण दुसरीकडे तुम्ही जर गेलात अचानक तर तिथली स्थिती तुम्हाला कळेल. तसं मी एक सांगू इच्छिते की आमच्या ग प्रभागामध्ये कधीच तांबे साहेब येत नाहीत. प्रभागाच्या मिटींगला उपस्थित नसतात. पाडाळेताईंनी सांगितले. पाडाळेताई आणि आम्ही शेजारी आहोत. त्यांचे जे दु:ख आहे तेच माझे दु:ख आहे. पाण्याच्या टाकीचे २०१६ मध्ये भूमीपूजन झाले होते. आता २०१८ चालू आहे वर्क आर्डर झालेली आहे. अजुन सुध्दा तिथे पाण्याची टाकी बांधण्यात आलेली नाही. त्याची चौकशी आयुक्तसाहेब आपण जरुर करावी. एवढ बोलून मी थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

मा. उषा ऊर्फ माई ढोरे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब पाण्याचा प्रश्नावर चर्चा झालेली आहे. खरतर या महानगरपालिकेमध्ये पंचवीस वर्षे झाली हा कारभार पहात असताना पहिल्यांदाच हा प्रश्न आक्टोबर महिन्यामध्ये हा उदभवलेला आहे. त्याचे कारण आहे पाण्याची पातळी कमी झाली. टेक्नीकली आता प्रॉब्लेम झालेला आहे. १०० टक्के पाण्याची पातळी कमी झाली टेक्नीकल प्रॉब्लेम आला असेल येऊ शकतो. आपण पण माणसं आहोत आपल्याला पण कधी कधी कुठला तरी आजार होऊ शकतो. आणि आपल्याला कुठेतरी त्रास आपल्या शरीराला होऊ शकतो. त्याच पध्दतीने हा प्रकार घडलेला असावा. जरी प्रकरण याठिकाणी पाणी पातळी कमी झाली म्हणून घडलेले असेल किंवा टेक्नीकली काही प्रॉब्लेम आलेला असेल. तर त्याला पर्याय म्हणून मला वाटतं की पाटबंधारे खाते

ज्यावेळेस पाणी देत असते. त्यावेळेस आयुक्तसाहेब आपला अधिकारी त्याठिकाणी हजर असतो का. महापौरसाहेब ज्यावेळेस आपण पाणी घेतो ४८० दशलक्षलिटर. हे पाणी घेत असताना आपला हक्काचा संबंधित अधिकारी कार्यकारी पाणीपुरवठा जो कोणी लडकत असतील कोण असतील ते याठिकाणी हजर असतात का. ते काही झोपा काढतात का की जे काही पाणी आपल्याला उचलायचं असते ते तेवढे पाणी आपल्याला मिळतयं का. आपल्याला पाणी आलेले आहे का. जर आलेले नसेल तर त्याठिकाणी आपला अधिकारी कुठेतरी कामचुकारपणा करतोय किंवा पाटबंधारे खाते हे आपली दिशाभूल करतेय. हया पध्दतीचा कारभार याठिकाणी पाणीपुरवठयाचा झालेला आहे. खरतर कोणीतरी मुद्दाम खोडी करतयं का हा देखील विचार आपल्याला चौकशीमध्ये केला गेला पाहिजे. आयुक्तसाहेब शहरामध्ये आपण ठराविक काळाने आपण पाणीपुरवठा करीत असतो. मला वाटतं की ८० च्या इलेक्शनला आणि नंतर ९२ चे इलेक्शन झाले. त्यावेळेस आपण प्रत्येक वॉर्डवाईज बोअरवेल केलेल्या होत्या. ज्यावेळेस ह प्रभागामध्ये मिटींग झाली. आयुक्तसाहेब त्यावेळेस मी आपल्याला म्हणले होते की तुम्ही आमच्या प्रभागामध्ये आलात. पण आम्ही जे प्रश्न तुम्हाला कामे सांगणार आहोत त्यावर तुम्ही ॲक्शन घेणार की नाही. त्यावेळेस तुम्ही म्हणाले होते की माई नक्की आम्ही हयासाठी इथं आलो आहोत. तुमच्या प्रश्नांवर आम्ही दखल घेऊन त्याच्यावर कार्यवाही आम्ही करु. मला याठिकाणी आपल्याला सुचित करायचं आहे की बोअरवेल ज्यावेळेस ८० व ९२ सालच्या इलेक्शनला आम्ही केलेल्या आहेत. त्या बोअरवेल आज जागेवर आहेत की नाहीत. ज्या आहेत त्या पूर्ण गंजलेल्या आहेत, मोडलेल्या आहेत. अधिका-यांना सांगितले की अधिकारी वेगळीच कारणे सांगतात आणि दिशाभूल करतात. की ती लोकं तोडतात. आता ती लोक खटके वाजवून त्या बोअरवेल तुटलेल्या असतील. पण आज जी अशी परिस्थिती झालेली आहे त्यामुळे आपल्याला पाणीपुरवठा कमी पडतोय. पण पर्याय म्हणून हया बोअरवेल आपल्याला चालू करायला पाहिजेत. इलेक्ट्रीकवर हया बोअरवेल चालू केल्या पाहिजेत. ज्या ज्या ठिकाणी बोअरवेल आहेत त्या त्या ठिकाणी महापौरसाहेब आपण कपडे धुण्याच्या सोयी सुविधा केल्या पाहिजेत. त्या ठिकाणी त्या महिला बटन टाकून पाणी चालू करतील, कपडे धुतील. महिला त्याठिकाणी धुणे, भांडी करु शकतील अशा प्रकारचे प्रत्येक शहरामध्ये जर आपण बोअरवेल कामे इलेक्ट्रीकवर

केली तर त्याठिकाणी डायरेक्ट पाणी येते आपण आपले येणारे पाणी हे पिण्यासाठी वापरले तर आपला फायदा देखील होईल. भामा-आसखेडचे पाणी आपण १०० टक्के घेणार आहे. आपण जर घर बांधायला काढले तर पाया खांदावा लागतो. हे करायला लागते ते करायला लागते. त्याशिवाय आपले घर उभे राहात नाही. कॉलम झाल्यानंतर आपण स्लॅब टाकतो. त्याचप्रमाणे हया कामाला आता नितीन महापौर होते. त्यांनी आता आपल्याला सांगितले. आपण ते पाणी १०० टक्के उचलतोय. आपण कार्यक्षम महापौर आहात. तुमच्या अक्टीव्हपणा आम्ही पाहतोय. शाळेला व्हिजीट दिली. आता सुनिताताईंनी सांगितले की तुम्ही अशाप्रकारे व्हिजीट दया. पण व्हिजीट देत असताना नागरीकांच्यावर कुठलाही अन्याय होणार नाही. पाणी गळती पाणी गळती याचा अर्थ काय. तुमचा नियम आहे २०१२ पर्यंत. त्याच्यानंतर नवीन नळ कनेक्शन देणार. जिथ लोक राहतात तिथ पाणी घेतात. मला असं म्हणायच आहे की पाण्याची गळती म्हणजे काय आपल पाणी जर कोणी चोरुन नेत असेल तर वापरण्याच्या पाण्याचा वापर जर जास्त होत असेल तर आणि अधिकृत आपल्या शहराला पाणीपुरवठा कमी पडत असेल ती गळती तुम्ही थांबविली गेली पाहिजे. अशा प्रकारचे आपल्या अधिका-यांनी ते काम केले गेले पाहिजे. आता आमचे नितीन म्हणाले की दिवसाआड पाणीपुरवठा करा. पण ते शक्य नाही कोणाला मान्य आहे का. सगळया महिलांना मान्य आहे का,बिलकुल नाही. हे काय करतील आंघोळ करतील, नाष्टा करतील. रुमाल कपडे घालून बाहेर पडतील. पण तो चुकीचा निर्णय आहे. याचा खुलासा झाला पाहिजे. ठीक आहे. नितीनचे दोनाचे चार हात व्हावेत याही शुभेच्छा आहेत. प्रत्येक वार्डामध्ये एक एक दिवस व्हिजीट दया. एक दिवस पाणी नाही दिले तरी चालेल. पण दिवसाआड पाण्याचा विचार महापौरसाहेब आपण करु नका. खरतर सगळयांनी सगळया अडचणी सांगितल्या आहेत. पाणीपुरवठयामध्ये अडचणी आलेल्या आहेत. की जेवढे पाणी घेतोय परंतु पुर्वीचे शहर आणि आताचे शहर. अधिकारी तेच सांगतात पाण्याची पातळी कमी झाली किंवा टेक्नीकल प्रॉब्लेम झाला. कुठेला टेक्नीकल प्रॉब्लेम नाही असं माझ मत आहे. कुठेही पाण्याची पातळी कमी झाली नाही. जी गावे तुम्ही महापालिकेत समाविष्ट केलीत त्या भागामध्ये आपला पाणीपुरवठा जो होतो तो जुन्या भागामध्ये पाणीपुरवठा वाटला गेलेला आहे. असो, पाटबंधारे खात्याला विश्वासात घ्या. जो अधिकारी असेल त्यांनी जर

सांगितलं असतं तर आम्ही मान्य केले असते. की टेक्नीकली प्रॉब्लेम आहे. पाण्याची पातळी कमी आहे, कुठे गाळ साचला आहे. तोच नाहीय आणि तुम्ही पाणीपुरवठयावर चर्चा करता. भयंकर चुकीचे आहे हे. तेथील अधिकारी त्यामध्ये अतिशय हुशार आहेत. खरतर पाटबंधारे खात्याचा विचार पण करा आयुक्त साहेब. काय हयाच्यामध्ये प्रॉब्लेम आहे त्याचा अभ्यास करा आणि आमच्या शहराला दररोज भरपूर पाणीपुरवठा रोज चार तास का होईना प्रेशरने दया हीच विनंती करते आणि थांबते.

मा. काटे स्वाती - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. माझा आता जवळजवळ अर्धातास झाला, एक तर माझा हात दुखतोय, हात वर करतेय तर अजुन हात दुखायला लागला. म्हणून मी सारखे म्हणत होते की मला बोलायला चान्स दया. आता पाण्यावरती बरीच चर्चा झालेली आहे. महापौर साहेब मी तुम्हाला एकच सांगते की माझा दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी असा प्रभाग आहे. कासारवाडीतून मला पाच वाजलेपासून फोन चालू होतात. फुगेवाडीमधून सात वाजलेपासून फोन चालू होतात आणि दापोडीतून जवळजवळ रात्रीचे एक ते दिड वाजेपर्यंत फोन चालू असतात. कशासाठी तर पाण्यासाठी. ताई पाणी आले नाही. ताई पाणी आले नाही कारण वरुन येणारे पाणी दापोडी शेवटचे टोक आहे. आणि दापोडीत पाणी वरुन येतानाच कमी येते. टाक्या भरल्या जात नाहीत. कमी प्रेशरने येते त्याच्यामुळे दापोडी, कासारवाडी, फुगेवाडीला पाणी देणे खूप मुश्कील झालेले आहे. पाणी वरुन का येत नाही. पाणी वरुन का येत नाही कधी पिंपळे सौदागर वरुन येते. तर कधी गुरव पिंपळयावरुन येते. दर आठवडयातून तीन ते चार वेळा पाणी येतच नाही. मग ते पाणी दापोडीकरांना दयायचं कसं, पुरवावयाच कसं. दोन मीटर टाकी भरली की ते पाणी प्रेशरने मिळत नाही. एक तर माझ्या वॉर्डमध्ये जवळजवळ ७० टक्के झोपडपट्टी एरीया आहे आणि त्या लोकांचे रोजचे मोर्चे चालू असतात. मी माझ्या लेव्हलवर कसे ते मोर्चे हॅंडल करते ते माझे मला माहीत आहे. रात्रीच्या ११,१२,१ वाजेपर्यंत महिला माझ्या दारात येऊन बसतात. त्यांना मी काय उत्तर दायचे. का पाणी येत नाही. मोटर्स लावतात. तर मोटर्स का लावतात तर पाणी प्रेशरने येत नाही. पाणी प्रेशरने सोडले तर मोटर्स लावता येणार नाही. परंतु मोटर लावूनही त्या नळाला पाणी येत नाही. ब-याचशा ठिकाणी आता लाईन बदललेल्या आहेत. म्हणजे आता लाईन्स टाकलेल्या आहेत. नवीन लाईन

टाकली तरी त्याला पाणी प्रेशरने येत नाही. दहा नळांपैकी एका नळाला पाणी येते आणि प्रेशरने पाणी येत नाही. वेळ पण इतकी विचित्र आहे. की माझ्या प्रभागात कुष्ठपिढीत लोक आहेत, अपंग लोक आहेत. हातानी व पायांनी. रात्रीचे एकएक वाजेपर्यंत पाण्याचे टायमींग जर व्यवस्थित नाही झाले तर रात्रीचे एक वाजता, दिड वाजता त्यांना पाणी भरावे लागते. सकाळी त्यांना सहा वाजता कामाला जावे लागते. रात्रीच्या एकएक दिडदिड वाजेपर्यंत त्यांना जागावे लागते. कधी पाणी आले तर येते नाहीतर येत पण नाही. एकएक वाजेपर्यंत वाट पाहून त्यांना पाणी मिळत नाही. तर दापोडी हे शेवटचे टोक आहे. आता पिंपरी चिंचवड शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. पण हया दापोडीतील जवळजवळ गेली दिड वर्षे झाले मी सारखा पाठपुरावा करते लोकांना पाणी मिळाले पाहिजे. मोर्चे, आंदोलने करते. तरी त्या पाण्यामध्ये काहीही बदल झालेला नाही, सुधारणा झालेली नाही. मला फक्त एकच सांगायच आहे की जे वरुन पाणी येते ते सगळीकडून फिरुन शेवटी माझ्या दापोडीत येते. दापोडीकरांना अजूनपर्यंत कधीही वेळेवर पाणी मिळालेले नाही. कधी येते ते कमी प्रेशरने येते. वरुन येणा-या पाण्याच्या जर टाक्या भरल्या, पण टाक्या भरतच नाहीत. दोन मीटर टाकी भरली की पाणी कोणाकोणाला देणार. ते दिडतास पण देऊ नका. एक तास पाणी दया पण ते प्रेशरने दया. कारण पहिले अर्धातास इतके घाण पाणी येते. आणि लिकेजचे प्रमाण माझ्या वॉर्डात जास्त आहे. चुकीचे टॅब मारल्यामुळे ड्रेनेजचे पाणी त्याच्यामध्ये शिरुन घाण पाणी लोकांना प्यावे लागते. ब-याच वेळेला मी तक्रार केलेली आहे की घाण पाणी येते, घाण पाणी येते. ते घाण पाणी ब-याच कुजलेल्या जुन्या लाईन्स आहेत. अक्षरशः हात मारला तर ती लाईन तुटते इतकी विचित्र परिस्थिती आहे. तर मला एकच सांगायचं आहे की पाणी आम्हाला प्रेशरने दया. एकच तास दया पण प्रेशरने दया. एवढी मी तुम्हाला कळकळीची विनंती करते. आणि मला बोलायला संधी दिली. त्याबद्दल तुम्हाला धन्यवाद देते.

मा. वैशाली काळभोर - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब, दोन तास झाले आपण पाण्याविषयी बोलतोय आणि महिलांचा गहन प्रश्न आहे. अगदी त्यांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. खरतर दिड वर्षापासून मी सुध्दा स्थायी समितीमध्ये सदस्या असताना पाण्याचा माझ्या प्रभागात खूप मोठा प्रश्न होता.

पण ताईंनी असे देत किंवा आम्ही तो भक्तीशक्तीपासून आमच्या खंडोबा माळपर्यंत अमृत योजनेंतंर्गत आपण लाईन टाकली आहे. प्रभागातल्या काळभोरनगरचा किंवा तुळजाईवस्ती, दत्तवाडी, विठ्ठलवाडीचा प्रश्न सुटला असला तरी मोहननगरमधील अर्धा भाग हा त्रिवेणीनगरच्या टाकीवरुन आहे. आणि तेथील प्रश्न खूप गहन आहे. तिथे उंचावरचा भाग असल्यामुळे पाणी पोहचत नाही. म्हणजे त्रिवेणीनगर महापौर तुमच्याकडे ज्या टाकीवरुन पाणी येते त्याच टाकीवरुन आमच्याकडे पण पाणी येते. दुसरी गोष्ट आपण आपल्या आंतरराष्ट्रीय मानांकानुसार आपल्याकडे १३५ लिटर प्रती व्यक्ती पाणी दयायचे आपण कबूल केले आहे, आपण देतो. पण आज आपण बघितल तर आपल्या प्रत्येक मानसी आपण २१७ पाणी देतो. म्हणजे काही प्रभागात ६० असेल, ८० असेल, ३०० असेल हे २१७ आणि १३५ त्यामधले ८२ लिटर पाणी जाते कुठे. हे बघितले पाहिजे. गळती आहे. अनधिकृत बांधकाम आहेत. म्हणजे सगळयांचे हे प्रश्न आहेत. हे नियोजनपुर्वक केले पाहिजे. दुसरी गोष्ट रावेत बंधा-याचा प्रश्न आहे. आज आत्ता जो परवा प्रश्न आला की रावेत बंधा-याची लेव्हल कमी झाली होती. तर आपण जर रावेत बंधा-याची उंची वाढविली किंवा त्याचा जर प्रश्न सोडविला तर दोन दिवसाचे पाणी का होईना त्या बंधा-यामध्ये साठले जाईल. आणि हा प्रश्न येणार नाही. मला वाटत महापौर आम्ही मागच्या २०१२ पासून २०१७ पर्यंत नगरसेवक होतो त्यावेळेस पाण्याचा प्रश्न कधी आला नाही. सांगायचा उद्देश एकच आहे की त्यावेळेस लाईटचा किंवा पंपींगचा कधीही आम्हाला प्रशासनाकडून सांगण्यात आले नाही. आता जे काही सारख सांगण्यात येते की लाईट फेल्यूयर आहे, पंपींग आहे. हे जे प्रश्न आहेत पूर्ण शहरामध्ये आणि पाण्याचा जो प्रॉब्लेम आहे. पंपींगचा असू देत. हे का आता प्रश्न निर्माण झालेत. ठीक आहे लोकसंख्या वाढली. इतकी लोकसंख्या वाढली की अगदी दोनतीन महिन्यांमध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. मला नाही वाटत पाचसहा लाख लोकसंख्या वाढली असेल तर आपले मेट्रो शहरामध्ये जातेय का. आज आपण स्मार्टसिटीकडे वाटचाल करीत आहोत. पिंपरी चिंचवड स्मार्टसिटी आहे आणि स्मार्टनेसकडे वाटचाल करीत आहोत तरी या गोष्टी महत्वाच्या आहेत. दुसरी गोष्ट आपण मी स्टँडीग कमिटीमध्ये असताना आपण ज्या टाक्या प्रत्येक प्रभागात प्रत्येक ठिकाणी टाक्या बांधण्याचे नियोजन केलेले आहे. आणि त्याच्या वर्क ऑर्डर दिलेल्या

आहेत. तर त्याचे काय आहे हे आपल्याकडून खुलासा हवाय. नक्की ती टाकी बांधणार आहे का त्याच्यामध्ये टाकीमध्ये पाणी कुठून देणार आहोत. पाणी कुठून देणार आहोत. आणि टाकीचे बांधकाम का होत नाही याचा खुलासा हवाय. दुसरी गोष्ट दूषित पाण्याबद् दल आता अनिता तापकीरताईंनी विषय मांडला. दूषित पाणी हा खूप मोठा गहन प्रश्न आहे. आणि दूषित पाणी आपल्याकडे येते एसटीपीवरुन. वॉटर ट्रीटमेंट प्लँट आहे. तिथे नक्की पाणी ट्रीट होते का हा प्रश्न निर्माण होतो कारण आमच्या प्रभागात किंवा शहरात ब-याच ठिकाणी अस वाचतेय आणि प्रत्येक ठिकाणी बघतेय की दूषित पाणीपुरवठा होतो. दूषित पाणीपुरवठा होत असताना जेव्हा आपले अधिकारी टेस्ट करतात त्यावेळेस दोन ठिकाणी टेस्ट करतील दुस-या दिवशी दोन ठिकाणी टेस्ट करतील. महिना महिना हे पाणी दूषितच राहते. कालपरवाची गोष्ट आहे माझ्या ठिकाणी दूषित पाणीपुरवठा आज १५ दिवस झाले तरी अजून लाईन टाकताय. त्यांनी आठ दिवस प्रयत्न केले मॅडम आम्ही बघतोय, करतोय ठीक आहे करताय बघताय सापडत नाहीय. पण तुम्ही लाईन टाकणार दूषित पाणीपुरवठा महिनेमहिने लोकांना देणे म्हणजे खूप चुकीची गोष्ट आहे. आणि ही शोकांतिका आहे. याच्यामुळे डेंगु, मलेरिया सारख्या गोष्टी आपल्याकडे वाढत चाललेल्या आहेत. कच-याचा प्रश्न देखील गहन आहे. मी पाण्याविषयी बोलतेय. डेंगु, मलेरिया बाबत साहेब मी तुम्हाला किती वेळा सांगितलं की हयाच्यापूर्वी डेंगुचा सर्व्हे होत होता. प्रत्येक घराघरात जाऊन आपल्या आरोग्य विभागाकडून सर्व्हे केला जात होता. तो आता सर्व्हे केला जात नाही. त्यामुळे डेंगुचे प्रमाण आता वाढलेले आहे. तरी मला असं वाटतं की हया गोष्टीकडे जरा जास्त लक्ष देऊन पाण्याचे नियोजन जर केले तर निश्चितपणे पाण्याचा प्रश्न सुटेल. अशी मी विनंती करते आणि थांबते.

मा.बाळासाहेब ओव्हाळ - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब, खरोखर गेल्या १५ दिवसांमध्ये ५ ते ६ मला महिलांच्या मोर्चाला तोंड दयावे लागले. माझ्या जागी दुसरा कोण असता तर खरोखर त्याने झाडू आणि लाटणे घेऊन आले असते. आताच ताईंनी सांगितले, नितीन आप्पांनी सांगितले. की एक दिवसाआड पाणी करावे. हे तर पुढची गोष्ट आहे परंतु पहील जे पाणी मिळतेय त्याच्यासाठी लाटणे आणि खराटे घेऊन आले होते. हया विषयाला या १५ दिवसांत मी

त्यांना पाच वेळा तोंड दिले आहे. हयाचे कारण आता ते तुम्ही ओळखून घ्यायचं कोणाला मारायचं ते. तर खरोखर आज त्या महिला मोर्चाचा एकच सूर चालू होता. आणि हे काय जाणून बुजून केले जातेय का मला काही कळत नाही. त्याच्याबद्दल तुम्ही स्वत: विचार करावा. कालच्या मोर्चामधल्या महिला असं म्हणत होत्या महापौर साहेब. की खरोखर आम्हाला पूर्वीचे सरकार बर होतं. त्यावेळी आम्हाला असा प्रॉब्लेम नव्हता. परंतु त्यासाठी तुम्ही टाळया वाजविण्याची गरज नाहीय. कारण का तर याच्यामध्ये काहीच बदल झालेला नाही. परंतु बदल झाला पाहिजे. परंतु बदल करण्याकरीता मला वाटतं की ब-याच माझ्या सहका-यांनी सांगीतल अधिकारी वर्ग, अधिकारी वर्ग. पण आडातच नाहीतर पोह-यात कुठून येणार आहे. काय करणार अधिकारी तरी. त्यांना मी चार वेळा बोलतोय. चार वेळा बोलणार, रागवणार. काय करु शकतो आयुक्त साहेब. काय करणार तुमचा डेप्यूटी तरी. तुमचा एक्झीक्यूटीव्ह आणि तुम्ही जबाबदार. तुम्ही त्याच्यावरती अगोदर नियोजन केले पाहिजे दर वर्षाला आर्थिक नियोजन होते अहवाल येतो. परंतु पाण्यावर काय नियोजन होतच नाहीय. हे जबाबदार तुम्ही आहे. खालचा डेप्यूटी किंवा जेई कोणी जबाबदार नाही. तुम्ही लडकत साहेब असतील तांबे साहेब असतील अशा अधिका-यांच्या जागेवर मला वाटते की त्या खालच्या जेईंना टाका. बदली करा बघा त्यांना अनुभव तरी भरपूर आहे. नुसते काम करणारे अधिकारी नकोत. माझे मित्र संदीप वाघेरे मगाशी बोलत होते. की रात्री दिड ते दोन वाजेपर्यंत लडकत साहेब काम करीत होते. अहो, काम करणारे नकोय ओझे वाहणारे अधिकारी नकोय. डोक्याने काम करणारे अधिकारी पाहिजेत म्हणजे बुध्दीमत्तेने काम करणारे अधिकारी पाहिजेत. तर त्यासाठी मला तर तुमच्या बद्दल अभिमान वाटतोय. परंतु मनात कुठेतरी काहीतरी पाल चुकचुकतेय. त्यात आता मी तुम्हाला एवढं जरी स्पष्ट बोललो आयुक्त साहेब. लडकत साहेब आणि तांबे साहेबांवरती तुम्ही जर काटेकोरपणाने किंवा अगदी काळजीपूर्वक लक्ष जर दिले तर १०० टक्के फरक पडेल परंतु त्याही पेक्षा नियोजन खूप महत्वाचे आहे. पाण्याचे नियोजन झालेच पाहिजे. दर वर्षाप्रमाणे प्रत्येक वर्षी जर आर्थिक नियोजन करतो तर मला वाटतं की आता वाघेरे साहेब म्हणले चार ब्रीज कमी झाले तरी चालतील. अहो, साहेब जनता जर जगली तरच त्या मेट्रो आणि ब्रीजवरुन प्रवास करणार आहे. त्याकरीता त्या जनतेला तुम्ही

पाणी दिले पाहिजे. मूलभूत गरजा दिल्या पाहिजेत. मूलभूत गरजा जर पूरवू शकत नाही तर मला वाटतय आता तुषार कामठे बोलले मी दोघांचे अभिनंदन करतोय. आणि बारसे ताईंनी पण चांगला विषय मांडला. परंतु तो आज विषय नाहीय त्यामुळे मी त्या विषयाकडे वळत नाही. त्या दोघांनी तर खूप अतिशय महत्वाचे विषय मांडले. महापौरसाहेब अनधिकृत नळ कनेक्शन तर माझ्या प्रभागात जवळजवळ ७५ टक्के तरी अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. त्याच्यामध्ये  भाडेकरु ज्या प्रॉपर्टीज आपल्या प्रभागामध्ये, आपल्या महानगरपालिकेमध्ये नोंदविलेल्या सुध्दा नाहीत. फक्त त्या प्रॉपट्रीजमधून भाडे घेतले जाते. एक तर त्या स्थानिक मालकाचा त्यामध्ये फायदा होतो. आणि आता जे सर्व सामान्यांचे जे हाल होतात. मला वाटते तापकीरताईंनी आताच सांगितले की सर्व सामान्यांचे जे हाल होतात. १०० टक्के हा जो मध्यमवर्गीय आहे तो देखील होरपळला जातोय. जुन्या जुन्या बिल्डर लोकांना चारचार कनेक्शन दिलेले आहेत. त्या चार कनेक्शनमधील दोन अधिकृत आहेत दोन अनधिकृत आहेत. त्यांना १०० टक्के महापौरसाहेब पाणीपुरवठा होतोय. आणि बाकीचे ज्यांनी एक गुंठा दिड गुंठा दोन गुंठे जागा घेऊन बांधलेले आहेत. त्यांना पाणी मिळत नाही. चाळीतल्या माणसाला पाणी मिळतेय परंतु ज्यांनी एक दिड गुंठा जागा घेऊन घर बांधकाम केलेय त्यांना पाणी भेटत नाहीय. मला वाटत की स्लम एरियामध्ये एमबी कॅम्पमधून मला दोन कंप्लेट आल्या आहेत. मग तो मध्यमवर्गीय अक्षरश: होरपळून मरतोय. कष्ट तो करतोय, टॅक्स देतोय. तो वर्ग सगळयात जास्त मारला जात आहे. महापौर साहेब तुम्ही अनधिकृत नळकनेक्शनबाबत जास्त लक्ष दयावे. ग्रामीण भागामध्ये सुध्दा अनधिकृत टप-याला पण कनेक्शन दिलेले आहेत. मी वारंवार सांगतोय महापौर साहेब. पाण्याच्या टाकीबाबत मी निवडून आल्या आल्या अर्ज दिलेला आहे. दोन ते चार महिन्यात टाकीचे काम करुन भेटेल. आजतागायत २४X७ चा विषय आलेला नाही. अहो ते खडडयात गेले २४X७ आहे तिथे पाण्याची टाकी बांधून आम्हाला आमच्या प्रभागाला पाण्याचा प्रश्न मिटवावा. महापौर साहेब आम्हाला जनतेने निवडून दिलेले आहे. त्यांचे प्रश्न इथं मांडण्यासाठी आणि तुम्ही इथं आम्हाला  बोलायची संधी देता त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. आयुक्तसाहेब गेल्या हप्त्यामध्ये तीन ठिकाणी मेटेंनन्स करायचे होते. मला वाटते की अहिरे साहेबांनी सांगितले पाण्याची लाईन ही

पूर्ण खराब झालेली आहे. ती लाईन बदली करायची. २५ ते ३० कुटूंबांना पाणीच मिळत नाही. त्याठिकाणी पाण्याची लाईन टाकायची ठरवल परंतु मला अहिरे साहेबांनी उत्तर काय दिले माहिती आहे का ती त्यांची मजबूरी आहे मला त्यांचेबद्दल द्वेष नाहीय. त्यांची मजबूरी आहे साहेब. व्हीआय ही कंपनी कामच करीत नाही साहेब. आपण त्यांना टेंडर का देता. असल्या कंपनीला टेंडर का देता त्यांना काढून टाका आपल्याकडे महानगरपालिका ही कोटयाधीश महानगरपालिका आहे. त्याच्यासाठी पर्याय निवडला गेला पाहिजे. म्हणून मी मगाशी म्हटलं की दिडदोन वाजेपर्यंत जागणारा अधिकारी नको बुध्दीमत्तेने काम करणारा अधिकारी पाहिजे म्हणून. साहेब हयाच्यासाठी आपल्याला जर एखादा ठेकेदार आपल्याला वर्षे झाले बेवकूफ बनवतोय. तर आपण का त्याच्या अगोदर निर्णय घेतला नाही. किंवा त्याला पर्याय का दिला नाही. दुस-या सर्व ठिकाणी आपण पर्याय शोधतो. तर अशा ठेकेदाराच्या बाबतीत पर्याय का शोधला जात नाही. महापौर साहेब तुम्ही स्वत: जातीने लक्ष घातले पाहिजे. त्याचप्रमाणे तुमची शाळेची व्हिजीट झाली त्याच्याबद्दल तुमचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे याबाबतीत देखील अपेक्षा आहे की तुम्ही स्वत: जातीने लक्ष घाला. आणि हा पाण्याचा प्रश्न सोडविलाच पाहिजे. आणि हया ठेकेदाराला पहिल्यांदा ब्लॅकलीस्ट करा. परंतु आपण काय करतो की एका ठेकेदारावर विसंबून राहतो. महापौर एकावरती विसंबून राहायची आपल्याला गरज नाही. त्याला पर्याय असावा म्हणून तुम्ही त्याला पर्याय दया. त्याचबरोबर मूलभूत गरजा मी सांगितले. कच-याचा प्रश्न पण असाच पडलेला आहे. आज सांगतो की मी एक गेल्या सहा महिन्यापूवी राजीनामा देतो म्हणून सांगितले होतं त्याच्यामध्ये माझा पहिला प्रश्न होता की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा कचरा. कारण का की ही आपली मुलभूत गरज आहे. या मूलभूत गरजेवरती काहीही कोणी विचार केलेला नाही. आणि त्याच्यामध्ये आपआपसात जे वाद होत होते. हे रिटेंडर दोन वेळा अपडाऊन अपडाऊन त्याच्यावर काय निर्णय झाला हे आम्हाला अजुनही माहित नाही. फक्त होणार आहे गाडया भेटणार आहेत. गाडया भेटतील या आशेवरती आम्ही पाच वर्षे घालवणार आहे. मला बोलून दया. कोणीही मला अडवायचे नाही. अडवायची गरज नाहीय.

मा. महापौर – बाळासाहेब बोला तुम्ही, बोला. बोला.

मा. बाळासाहेब ओव्हाळ – मा.महापौर साहेब, आयुक्तसाहेब गेल्या एक महिन्यापासून त्याच ठिकाणी एकाच ठिकाणी अहिरे साहेबांना बोलवा तुम्ही एकाच ठिकाणी तिथला जेई काम करतोय. दूषित पाण्यासाठी मला त्या काळभोर म्हणून व्यक्ती आहे. आणि एक वाल्हेकर म्हणून व्यक्ती आहे त्यांचा मला सकाळचा फोन आला. मी अक्षरश: साहेब मी कर्जदाराचा पण कधी फोन बंद केला नाही. परंतु दोन दिवस झाले मी त्यांचा फोन टाळला आहे. ज्याच कर्ज असतं ना त्याचा देखील फोन कधी टाळला नाही. परंतु महापौरसाहेब आज त्याचा फोन मी घेतला नाही. काल ही घेतला नाही माझ्याकडे मीस्ड कॉल आहेत. तर त्या मेटेंनन्ससाठी टेंडर निघणे गरजेचे आहे.आणि मेंटेनन्स करण्यासाठी मला वाटत आज पाणी पुरवठयामध्ये प्रत्येक जण म्हणतो फायनान्स नाहीय. आमच्याजवळ फायनान्स नाहीय पुढे जा. म्हणजे आम्हाला पाहिजे अशी तरतूद नाहीय. जे जुने रेट घेतलेत त्या जुन्या रेटने आम्ही काम करु शकत नाही. त्यामध्ये आम्हाला परवडत नाही. त्यामुळे टेंडर भरत नाही. एकच व्हीआय कंपनी आहे. आणि ती कंपनी तो मालक इकडे पहात सुध्दा नाही. अशी ती व्हीआय कंपनी आहे. मी अधिका-यांच्या बाबतीत बोललो अधिका-यांचा दोष नाही. कारण आडात नाही तर पोव-यात कुठून येणार. दरवर्षाला नियोजन साहेब झालेच पाहिजे याठिकाणी एवढच मी बोलतो आणि तुम्हाला मी विनंती करतो की याच्यावरती तुम्ही अगदी काळजीपूर्वक महापौर साहेब लक्ष घालावे, धन्यवाद.

**मा. बाबू उर्फ प्रेमकुमार नायर** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब सभागृहाचे जे कामकाज आहे त्याचे लाईव्ह कसा काय चालू आहे, कोण दिलय त्याना परमीशन.

मा. महापौर – लाईव्ह कोण करतोय. लाईव्ह कोण करतो.

मा. बाबू उर्फ प्रेमकुमार नायर – या पध्दतीने जर कामकाज असेल तर कमिशनर साहेब तुम्ही पण जबाबदार आहेत याच्यामध्ये. प्रशासन पण जबाबदार आहे. ऐकून घ्या. तुम्ही लाईव्ह जर करायचं ठरविलं असेल तर तो निर्णय असेल तर तो निर्णय तुम्ही सर्व सभासदांना सांगणे गरजेचे आहे. तसं असेल तर सर्व लाईव्ह चानल्सला तुम्ही अधिकार दया. ही पध्दत नाहीय. महापौर साहेब तुमची आणि कमिशनरची ही

जबाबदारी आहे. सभागृहात जर असं चालत असेल तर तुमचं काय रिसपॉन्सीबीलीटी आहे ते पण सांगा. आम्हाला भिती नाहीय आम्ही पण ट्रान्सपरंट पध्दतीने भाषण दयायला तयार आहोत. परंतु सभागृहामध्ये हे प्रत्येक सभासदांना पण माहित असायला पाहिजे की लाईव्ह चानल्स आहेत. तुम्ही स्थायी समितीमध्ये ओपनअप केले. तसं इथं पण ओपन केलं म्हणून सांगा ना तुम्ही सदस्यांना. काही ठराविक लोकांची जर तुम्ही इथं इमेज ब्रेक करीत असेल तर हे चुकीचे आहे महापौर साहेब.

मा. महापौर – लाईव्ह कोणी चालू केला असेल तर तो लाईव्ह बंद करा.

मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर – महापौर साहेब, कोण करतय हे कुठल्याही सभासदांना सांगण्याची गरज नाहीय. इथं सेक्युरिटी काय करतोय. त्यांच्यावर कारवाई करा तुम्ही. माझ म्हणणे हेच आहे की सेक्युरिटी काय करतोय. उदया तुम्ही या सभागृहाच्या कामकाजासंदर्भात जर मिडीयाला आणि पब्लीकला तुम्ही जागा दिली असेल तर आणि चुकीचे लोक तिथ येऊन, बसू जर कामकाज वेगळया पध्दतीने त्याचा फायदा घेत असेल तर महापौर साहेब तुमची आणि कमिशनरची जबाबदारी आहे.

मा. महापौर – मिडीयावाले लाईव्ह बंद करा. लाईव्ह बंद करा. संपूर्ण या सभागृहामध्ये जे काही घडतय. ते तुम्ही उदया वर्तमानपत्रामध्ये देणारच आहात. परंतु ते लाईव्ह बंद करा. ज्या चानलचा लाईव्ह चालू आहे तो लाईव्ह बंद करा. बापू काटे तुम्ही बोला.

मा. बापू ऊर्फ शत्रूघ्न काटे – मा. महापौर साहेब आपण हया सभागृहामध्ये जे काम करतोय ते आपण संपूर्ण मिडीयाला चानलला लाईव्ह करण्याची सुचना करा अशी माझी विनंती आहे. अशी माझी सुचना आहे याला तुम्ही अनुमोदन दया.

मा. सिमा सावळे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मा. महापौर साहेब आताच मा. बापू काटे यांनी जी सुचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर – येथून पुढे हे सभागृह लाईव्हमध्ये चालेल. येथूनपुढे मिडीया वाल्यांना मी या ठिकाणी सर्वांना सांगू इच्छितो सर्व नगरसदस्य, सर्व नगरसदस्या या ठिकाणी नगरसदस्यांची देखील मागणी आलेली आहे की आजपासून याठिकाणी कोणताही चानल कोणतीही मिडीया हे सभागृह ज्यावेळी जनरल बॉडीची सर्वसाधारण सभा या पिंपरी चिंचवड शहरासाठी चाललेली असेल त्यावेळी हे शहर हे सभागृह मिडीयाच्या लाईव्हवर राहील.

मा.बापू ऊर्फ शत्रूघ्न काटे – मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर अडीच तासांपासून फक्त पाणीपुरवठयावर आपण चर्चा करीत आहोत. अतिशय गंभीर प्रश्न या शहरातील आहे. कारण कालपर्यंत मी या विषयासाठी मा. महापौरसाहेब तुम्हाला सांगत आहे. त्या मिटींगमध्ये आपण वॉल्हमन पासून प्लंबर, तुमच्या जेई, डेप्यूटी, कार्यकारी पर्यंत भाषण केले होते. आज आपण सकाळीच आयुक्तसाहेब काही ठराविक गटनेते पक्षनेते यांना बरोबर घेऊन सेक्टर २३ ला आम्ही मिटींग केली. सर्वच नगरसेवकांनी आपल्या सुचना आयुक्तसाहेब आपल्यापर्यंत पोहोचविलेल्या आहेत. प्रत्येक जण आपल्या प्रभागातील पाण्याची टाकी, पाण्याची सिस्टीम पाणी कमी येतेय किंवा प्रशासनला धारेवर धरतेय. खरतर साहेब माझे असं म्हणणे आहे की आपण याच्यातून काय उपाययोजना करणार आहोत. त्याच आपण थोडक्यात सगळयांच बोलण झाल्यानंतर आयुक्तसाहेब तुमच्या पध्दतीने जर मांडलं तर साहेब सर्वांना कळेल. खरी वस्तुस्थिती काय आहे की त्या डॅममधून रावेत बंधा-यापर्यंत पाणी येते मगाशी वाघेरेंनी सांगितलं की ते इरीगेशन डिपार्टमेंटचे आहे. त्याची उंची तो पाहतो तीन इंच कमी झाले, चार इंच कमी झाले. तेवढया प्रमाणात तो पाहतो त्याचा उद्देश असा आहे की आपल्याला पुढच्या जुलैपर्यंत आपल्या शहराला पुरवावयचं आहे. या शहराची ग्रोथ आपण २००४ ते २०१८ पर्यंत पाहिला. भविष्यात प्लॅनींग करताना साहेब आपण जे काही करतो समजा माझ्याइथं जो प्रभाग आहे. पिंपळे सौदागर असेल, पिंपळे गुरव असेल, वाकड असेल. पिंपळे निलख असेल. तर सर्वात जास्त सोसायटया हया पिंपळे निलखमध्ये आहेत. बिल्डींगसाठी ज्यावेळेस आपण साहेब परमिशन देतो माझ्या पिंपळे सौदागर प्रभागामध्ये ५० टक्के प्लॅन्ट सोसायटीमध्ये आहेत ते रिसायकल करुन ट्रिट करुन पाणी वापरत नाहीत. माझी अशी सुचना आहे की आपण त्याठिकाणी कारवाई

करावी. जेणेकरुन ट्रीट केलेले पाणी सोसायटीतील गार्डन, वगैरे भागामध्ये वापरले तर बोअरींगचे पाणी परत वापरात येईल. आपण ब-याच ठिकाणी बिल्डींग परमीशन देतो अशा ठिकाणी आपण कंपलसरी करावे. रेनवॉटर हर्वेस्टींग सिस्टीम ही कम्पलसरी झाली पाहीजे. या सुचना सांगण्याचे कारण की साहेब तुम्हाला खूप काही बदल करावा लागणार आहे. शहराची वाढती लोकसंख्या जर आपण पाहिली तर २००४ ला असलेली लोकसंख्या आज २२ लाखापर्यंत पोहोचलेली आहे. आपल्या शहराला एकच धरणातून पाणीपुरवठा होतो तो म्हणजे पवना धरण. दुसरा विषय जर आपण पाहिला तर भामा-आसखेडमधून आपल्याला १६७ एमएलडी पाणी मंजुरीसाठी आपली माहिती होती. तीन वर्षांनंतर ती परवानगी साहेब कॉलॅप्स झाली. आता योगायोगाने सकाळीच आम्ही तिथे बसलो होतो. माझे मित्र राहुल कलाटे इथं आहेत सभागृहामध्ये वरती सेना आणि आमच्या भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे. त्या डिपार्टमेंटचे मिनिस्टर आहे मा.विजयभाऊ शिवतरे तर माझी राहुल कलाटेंना विनंती आहे की आपण मा.शिवतरे साहेबांकडे पाठपुरावा करुन आपण पक्ष न पाहता आपण लवकरात लवकर त्या फाईलची परवानगी आणावी. म्हणजे आपण काय करु शकतो तर सकाळी आपण पाहिलं की चिखलीमध्ये डब्ल्यूटीपी प्लँट साठी लँड अक्वीजीशन पूर्ण झालेले आहे. भामा आसखेडचे पाणी तिथे जर आणले साहेब. तर शहरामध्ये दरवर्षी आपल्याला पाणी मिळणार आहे. तिकडयाच्या भागातला ब-यापैकी साहेब प्रश्न मिटेल. आता बाळासाहेबांनी सांगितले की प्रत्येकाच्या प्रभागामध्ये इललीगल कनेक्शन्स खूप आहेत साहेब. तुम्ही त्यांनी एक मुदत दया भले एक महिन्याची दया, दोन महिन्याची दया. जेवढे इललीगल कनेक्शन्स आहेत साहेब. ते पूर्णपणे बंद करा. तशी सुचना संबंधित सर्व अधिका-यांना दया. खरतर तुमच्या काही अधिका-यांचे आम्ही कौतुक करतो साहेब. असं म्हणत नाही की कुठल्याच अधिका-यांचे आम्ही कौतुक करीत नाही. सकाळीच आम्हाला लडकतसाहेबांनी चांगल्या पध्दतीने समजून सांगितले आहे. शहरातील पाणीपुरवठयाची जी स्काडा सिस्टीम आहे ती कशा पध्दतीने ऑपरेट होते. ते पाहील्यानंतर काही अधिकारी आमचे रिटायर झालेले जाधव साहेब असतील दुधेकरसाहेब असतील. आम्ही तांबे साहेबांनाही काही दोष देत नाही. प्रॅक्टीकली काही गोष्टी अशा आहेत की चिंचवड ग्रॅव्हीटीला पाणी गेले की

कुठल्या सिस्टीमवर कोण पाणी घेतं त्यासाठी आपण एक कन्सलटंट ठेवावा. आणि २४X७ आपण संपूर्ण शहरात राबवतोय. याठिकाणी आपले चार कॉन्ट्रॅक्टर आहेत. माझी एक तुम्हाला सुचना आहे साहेब की २४X७ जोपर्यंत होत नाही तोपर्यंत समसम प्रमाणात मला नाही वाटत की प्रभागाला पाणी मिळेल. हे सकाळीच तुम्ही आम्हाला सांगितले आहे. तर त्यासाठी तुम्ही तिकडे फोकस करा. आपल्या काही अधिका-यांची मानसिकता पण तुम्ही सांभाळून घ्या. पाणीपुरवठा म्हणजे रिस्कच आहे, जेई, डेप्युटी, एक्झिक्यूटीव्हसाठी. बरेचसे अधिका-यांना जर विचारलतर पाणीपुरवठयामध्ये जाण्यासाठी कोणी तयार नाहीत याच कारण काय की, त्याची मानसीकता तीकड होत नाही. म्हणजे आपल्या महानगरपालिकेमध्ये पाणीपुरवठयाला काम करतो म्हणजे त्याला सगळ आहे. त्यांचे प्रॉब्लेम सॉल्व्ह करण्यासाठी जस आज सकाळी आम्ही काहीजण बसलो होतो असं काही सिनीअर नगरसेवकांना कमिटीमध्ये घ्या मग त्यामध्ये भाऊसाहेब भोईर असतील, योगेश बहल असतील, पक्षनेते असतील, मंगलाताई कदम आहेत, सिमाताई सावळे आहेत यांची एक कमिटी करा. त्या डिपार्टमेंटवर नियंत्रण या कमिटीच राहील. त्या कमिटीच्या माध्यमातून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सुचना ते करतील, त्यामुळे प्लंबर लेव्हल पासून व्हॅलमन पर्यंत अधिका-यापर्यंत कंट्रोल येईल. शहराचा पाण्याचा प्रश्न एकदम महत्वाचा प्रश्न आहे. आज सकाळीच आमच्या दोन नगरसेवकांनी आंदोलन केलं. कारण त्या भागामध्ये पाणीच काही जात नाही. सिस्टीमप्रमाणे तुम्ही परत त्याची कार्यशाळा घ्या. समजून घ्या दोषी कोणी आढळलतर त्याच निलंबन झाल पाहीजे. माझी सभागृहाला विनंती आहे की हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. जस संदिप वाघेरे यांनी सांगीतल की मुळशी डॅम मधुन पवना डॅम मध्ये पाणी आणा. वरती आमदार आहेत, खासदार आहेत. भामा आसखेड त्याठिकाणी काही तांत्रीक अडचणी येतात जर भामा आसखेड पासून एमआयडीसीमध्ये पाणी आणलतर पण तेथून १०० मी. लाईन आणलीतरी चालेल पण शेतकरी काही ठिकाणी होऊ देत नाहीत. याला जबाबदारी जागामालकाची पण आहे त्यांच्याही अडीअडचणी आपल्याला समजून घ्याव्या लागतील. या सिस्टीमवरती काम करण्यासाठी आपण पुर्ण वेळ दयावा. आताच मला व्हीडीओ

दाखवला आपले प्लंबर, आपले व्हॅलमन याठिकाणी व्हॉल्व खुप आहेत त्याच मेन्टेनन्स करत नाहीत. याच्यामध्ये दगड, प्लॅस्टिकच्या पिशव्या असतात तरी खालच्या लोकांनाही सूचना दयाव्यात. पाणीपुरवठयाची आठवडयाला जरी मिटींग घेतलीतरी चालेल, धन्यवाद.

मा. भाऊसाहेब भोईर - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी पाणीपुरवठयाच्या संदर्भात आपण बोलल्याप्रमाणे आणि आपण ठरविल्याप्रमाणे सर्व सभासदांना याठिकाणी व्यथा मांडण्याची मला संधी दिली आहे. परंतु या गोष्टीचा कधी कधी फायदा पण होत असतो आणि तोटापण होत असतो. त्यावर उद्रेक खूप झाला. खूप वेळ बोलून झाले की राग आपोआप शांत होतो. त्यांना काय बोलायचे तो बोलू दया. नंतर आम्हाला काय करायच आहे ते आम्ही करणारच आहे. कारण का तर सायकॉलॉजीकली एक असतं की त्यांना बोलू दया. काय बोलायच ते बोलू दया. सर्वांच्या तीव्र भावना याठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. मा. आयुक्तसाहेब मी पर्सनली आता तुमच्याविषयी माझ्या भावना व्यक्त करतो. की मला आजपर्यंत कळल नाही की तुमचं नेमक आयुक्त म्हणून याठिकाणी रुजू झाल्यानंतर माझं हे उद्दिष्ट आहे. माझं हे ध्येय आहे आणि ते मी साध्य करण्यासाठी कोणाचाही जरी दबाव आला तरी मी मागे हटणार नाही. असं एकही मला या दिड वर्षात दिसलं नाही. मी पंचवीस वर्षे या सभागृहामध्ये आहे. श्रीकर परदेशी आले आणि त्यांनी अनधिकृत बांधकामांसंदर्भात ध्येय डोळयासमोर ठेवले. दिलीप बंडसाहेब आले त्यांना किती आमदारांचे, खासदारांचे दबाव आले. अजितदादांचा सुध्दा दबाव आला. परंतु वेळप्रसंगी अजितदादा देखील त्यांच्या पाठीशी उभा राहिले. आयुक्त साहेब मी प्रामाणिकपणे कोणताही हेतू नसताना या शहरामध्ये उद्रेक नसताना या सभागृहामध्ये माझा पहिला प्रश्न कोणता असेल तर तो पाणीपुरवठयाचा. तो ही जुलै महिन्यात म्हणजे ऐन पावसाळयात म्हणजे धरण चांगल्या पध्दतीने भरभराटीला आल्यानंतर. त्या कालखंडामध्ये मी तो प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी ती भविष्यातील वादळापूर्वीची शांतता होती. ती होती त्या कालखंडामध्ये. पण आता त्याचा उद्रेक झाला. आयुक्तसाहेब मी साधे प्रश्न विचारले होते मला अपेक्षा होती तुमच्याकडून. शेवटी अस आहे की वर्गामध्ये कोणताही विदयार्थी प्रश्न विचारतो. हयावर देखील ब-याच वेळेला त्याचे

आत्मचिंतन करण्याची संधी मिळत असते. अधिका-यांना किंवा शिक्षकांना. तुम्ही आमचे मुख्याध्यापक म्हणून जर बसलेला असालतर आमचे दुर्दैव काय आहे ते आम्ही विविध पक्षाच्या माध्यमातून मत व्यक्त करीत असतो. तुम्ही मात्र तुमचं एकच असतं आयुक्त म्हणून तुमच्यामध्ये गटबाजी नसते. आमच्यामध्ये तो प्रॉब्लेम असतो. त्याचा तर तुम्ही फायदा घेत असता. आयुक्तसाहेब मी तुम्हाला प्रश्न दिले होते. त्या प्रश्नासंदर्भात मी भावना व्यक्त केल्या होत्या. नितीन काळजे महापौर होते त्यावेळेस. त्यांनी त्यावेळेला मिटींग घेतली होती  मला बोलवल होतं मिटींगला. याठिकाणी काय चाललंय की आपल्यांकडे ही सुरुवात आहे मी त्यावेळेस देखील बोललो होतो आणि आता देखील बोलतोय. जगामध्ये जे कोणतं महायुध्द होईल. तर ते पाण्यासाठी होईल. काल सुरेश देशमुख याठिकाणी सोलापूरहून आमच्या साखर कारखान्यामध्ये गळीत हंगामासाठी आले होते. मी विषयांत्तर करीत नाही विषयालाच धरुन बोलतो आहे. त्यांनी सांगितले की आमच्याकडे उस उत्पादन हे केवळ पुणे जिल्हयाच्या माध्यमातून होते. आपल्या मुळा, मुठा आणि पवना धरणाच्या जीवावर उजनी भरते. म्हणजे गव्हाला बारा एकरला जेवढे पाणी लागते. तेवढे एक एकरला उसाला लागते. चार एकर जो भात लावलेला असतो. तो भात पाण्यावर अवलंबून असतो. चार एकरला जेवढे पाणी भाताला लागते तेवढे उसाला एक एकरला लागते. म्हणजे पाणी उसाला जास्त लागते. सगळयात जास्त उत्पादन सोलापूरला मिळते ते आपल्या पाण्यामुळे. आपल्याकडे काय झाले माहिती आहे का. श्रीमंत बापाचे बिघडलेले पोरगे असते. तशी मस्ती आलेली आहे तर कोणती मस्ती. त्याच्यामध्ये आम्हीपण आलो. ८० कोटी रुपयाची दरवर्षी तूट असते. नगरपालिका महानगरपालिकेचा अभ्यास करीत असते. काय परदेशात जायची गरज नाही. सांगली, मिरज, कूपवाडला जा. नाशिकला जा पगाराला पैसे नाहीत. हयांचे पगार थांबू दया. बघा कसे घरपट्टी, पाणीपट्टी दणादण वसूल होतील. ८० कोट रुपयांची आपल्याकडे तूट आहे तरी आपण निवांत आहे. कोणीही काही करीत नाहीत मी वर्षभर पाहतोय. सगळे प्रश्न मी तुमच्याकडे दिलेत. मी वैयक्तिक कारणासाठी दिलेले नाहीत. प्रश्न असा येतो की पाणीपुरवठयाच्या संदर्भात तुमच्या समोर प्रश्न उपस्थित केलेत. ते पक्षीय प्रश्न नव्हते. या शहराचे प्रश्न होते. कोणी गांभीर्याने घेतले. पाणीपुरवठयाच्या एका अधिका-याचा मला फोन नाही. मी माहिती

घेतली. एक अधिका-याचा मला फोन आला नाही. आयुक्तसाहेब तुमच्याकडून अपेक्षा होती मला. या संदर्भात पाच प्रश्न होते. दोन प्रश्न तुम्ही करुच शकत नाही. एक प्रश्ना बद्दल अंमलबजावणी चालू आहे, दोन प्रश्नांबद्दल भविष्यामध्ये मी वाटचाल करीन. काही कोणाला गांभीर्य नाही. ८० कोट रुपयाची तूट आपल्या बजेटमध्ये आहे. ८० करोड रुपये पाण्यात जातात. २०१५-२०१२ ला मला माहीत नाही. आपल्याकडे अनधिकृत बांधकामांना नळ कनेक्शन देण्याचे आपल्याकडे बंद केलेले आहे. माझा प्रश्न आहे प्रशासनाला. की त्यांनी चॅलेंज स्वीकारावे. २०१५ नंतर २०१८ पर्यंत एकही अनधिकृत घर या शहरामध्ये झालेले नाही. त्यांना अजिबात पाणी मिळाले नाही. जे चोरी करतात ते सुजलाम सुफलाम आहेत आणि जे टॅक्स भरतात आणि ईमानदारीने काम करतात ते हंडे घेऊन मोर्चे घेऊन नगरसेवकांकडे येतात. सगळे धंदेवाईक आहेत. बोलवा एका कार्यकारी अभियंत्याला त्यांना काय माहीत असते. त्या अधिका-यांना काही कळत नसतं. पाणीपुरवठा पिंपरी चिंचवड शहरामध्ये भारतामध्ये सगळयात जर पहिलं शहर कोणतं असेल तर पिंपरी चिंचवड फक्त पवना डॅममुळे. पवना डॅम दुष्काळाच्या कालखंडामध्ये सुध्दा शेवटच्या कालखंडामध्ये १० ते २० टक्के पाणीपुरवठा शिल्लक असतो. कधी ऐकलय का की पवना धरण आटलय म्हणून. मी तर पंचवीस वर्षात ऐकले नाही. हयाच्यामधले कोण तज्ञ असेल तर या माझ्या समोर. पण आमची मानसिकताच नाहीय. कारण का की बाकीची टेंडर्स, विकास, प्रचंड जोरात असल्या कारणाने इथं काय फायदा आहे उगाच डोक्याला ताप करुन. आणि हे सगळ साहेब मानसिकता असायला हवी. आपल्याला खुप कठीण परिश्रमामधुन एखादी संधी मिळत असते आयुष्यामध्ये काम करण्याची. तुम्ही अधिकारी आहात आणि अधिकारी म्हणूनच आपलं वर्तन असू दया. मी सांगितल साहेब की सर्जीकल स्ट्राईक असतो ना तसा हर्डीकर स्ट्राईक करा एकदा. सगळेजण कसे सापडतात बघा दणादण. परंतु आपली मानसिकताच नाही. आपण सगळे जण कशात अडकलात मला ते ही कळलं नाही. मग तुमच्यावर आरोप करावा तर काय आरोप करावा. माझ्याकडे काहीच नाही. मग काय आरोप सिध्द करणार. काय सिध्द केले ते ही तुमच्याकडे सांगायला काही नाही. मोठी अडचण ती आहे साहेब. तुमच्याबद्दल माझ्या मनामध्ये संशय वगैरे काहीच नाही. जे काही असेल ते मी बोलत असतो मला काही फरक पडत नाही. प्रश्न असा येतो जे

नाहीय ते नाहीय. परंतु प्रश्न असा येतो की तुम्ही काय सिध्द केले. संशय तुमच्याबद्दल कशावर घ्यायचा. परंतु प्रश्न असा येतो की पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी फक्त आपली मानसिकता नाही. तुम्ही जर ठरवल ना अधिका-यांनी काही विकासात्मक भव्यदिव्य काम आहे. तिथे अतिशय काळजी असते. ती पटापट केली जातात. ती कामे जर आपण सहा महिने बाजूला ठेवली ना मग बघा  पाणीपुरवठा कसा सुरळीत होतो ते. याठिकाणी टाक्यांचा तर सुळसुळाट झाला आहे पिंपरी चिंचवड शहरामध्ये. तुम्ही सगळे जास्त लांब नका जाऊ पाणीपुरवठा कसा करायचा. मुंबईत जा मुंबईत. एवढ पसरलेले मुंबई आहे. धारावी बघितलं तर भिती वाटते. सगळया ठिकाणी जाऊन आलेलो आहे मी त्याठिकाणी पाहिलेले आहे. एक तास पाणी येत फक्त त्यांना माहिती असते. सगळया मुंब्ईला हे माहिती आहे की फक्त एक तास पाणी असते. आख्या चोवीस तासामध्ये हे नियोजन केले जाते. आपल्याकडे कधी पाणी येते याचा भरवासाच नाही. जस सोनू म्हणालाना तुझ्यावर भरवासाच नाही तसा हयांच्यावर आता भरवसाच राहिलेला नाही. या सगळया परिस्थितीचे भान ठेवल पाहीजे. कारण का की तुमची मानसिकताच नाहीय हे काम करायची. कितीही मिटींगा घ्या महापौर साहेब. आता शत्रुघ्न काटेंनी जे सुचविले आहे तीच भूमिका आहे. प्रमुख नेते मंडळींचे कारण का आपण भाषणबाजीमध्ये काय होते आयुक्त म्हणतील किंवा आयुक्त म्हणण्यापेक्षा प्रशासन म्हणेल. कारण का प्रशासन मी पाहतोय. प्रशासन म्हणजे प्रशासनच असते. प्रशासनाचे नियम ही तेच करतात, त्यांना काय बोलायचे आहे ते एकदाच बोलू दयात. आपण इतके समाधानी असतो की माझ मत मी मांडलं. आता मी निर्धास्त झालो. हे सगळया पध्दतीचे नियोजन कोणी करायच असेल तर शत्रुघ्न काटेंनी सांगितल्याप्रमाणे एक वर्षापूर्वी मी हे बोललोय. प्रोसेडींग आहे. माझ भाषण तुम्ही त्या ठिकाणी ऐका. आंद्रा प्रकल्पाचे असेल. बंद योजनेचे असेल या उपाययोजना आहेत ना. काही बोलावे तर लगेच त्याच्या पक्षीय राजकारण सुरु झाले की मुळ मुद्दा बाजूलाच राहतो. अधिकारी लगेच खूष होतात की आता बरोबर लाईनवर आले. परंतु मुद्दा असा येतो की परवा मी सगळे दृश्य पाहत होतो की हे सगळेजण व्यवस्थित पाहतात. की हयांच्यात आता वाद सुरु झालेत. बस आता. आमचआमच काम चालू दया. पाणीपुरवठयामध्ये गांभीर्याने पहा.  आयुक्तसाहेब तुम्हाला मी आव्हान देतो. आव्हान समजा हे काय माझ

व्यक्तीगत आव्हान नाहीय. की मला लढाईला जायच नाहीय. पाणीपुरवठा सुरळीत करा साहेब. आताच्या वातावरणामध्ये सगळे चिडलेले आहेत. मी गटनेत्यांना, विरोधी नेत्यांना, पक्षनेत्यांना विनंती करतो की हयाच विषयावर ही सभा तहकूब करावी. हया शहराची काही घोषित क्रांती नाही किंवा अंतरराष्ट्रीय प्रश्न नाहीत, अशी काही परिस्थिती नाही. तुम्ही आपल्या शहराचं काय चाललय तेवढं पहा. दोन्ही नेत्यांनी मिळून ठरवा की हे जो पर्यंत सुरळीत होत नाही तोपर्यंत सभा तहकूब ठेवा आणि पहिली माहिती करुन घ्या की कार्यकारी अभियंता किती आहेत, डेप्यूटी किती आहेत. जो लाईनमन आहे तो काय करतो. तो रात्रीच्या वेळी फिरत असतो तो कोणत्या अवस्थेमध्ये असतो हे कोणी पाहिलय. त्याचा कार्यक्रम झालेला असतो. त्याला कोणाचा फोन आला की तो तिकडे फिरवतो. हे मी पकडलेले आहे. मी बेताल व्यक्तव्य करणार नाही या सभागृहामध्ये मला माहिती आहे. शब्द हे शस्त्र असतात हे लिहून ठेवलेले असतात कुठेतरी. कुणी जर म्हणलतर मी दोन मीनिटात पकडून आणतो. मला त्याची नोकरी घालवायची नाहीय. कोणत्या अवस्थेत काम करतो. हयाची एक वर्गवारी घ्या. सगळा पाणीपुरवठा सुरळीत होईल. म्हणून आयुक्तसाहेब हे जे प्रश्न आहेत उपाययोजना ही माझ्या प्रोसेडीगमध्ये आहेत. तुम्ही वाचा. बंद योजनेचे काय झाले. जाऊ दे ना कोणी अडवले ते अडविले. ज्याला करायच त्यांनी केले. अहो आता कराना आंद्राचे काय झाले आता ज्यावेळेस तुम्ही त्या नेत्यांबरोबर आज बोलतोय ते माझे नेते आहेत. आदरनीय अजितदादा पवार हे माझे आता नेते आहेत. १०० टक्के आहेत. पण ज्यावेळेस नव्हते. आम्ही जे नेते चांगलं काम करतात त्यांच्याबद्दल बोलतो. उदया लक्ष्मणभाऊ जगताप यांनी चांगले काम केले तरी त्यांच्या बद्दल देखील चांगलच बोलणार आम्ही. ते आज शहराध्यक्ष आहेत. अजितदादा हा एकमेव नेता असा आहे की पहाटे पाचला या शहरात फिरायचा. अधिका-यांची तारांबळ उडायची. आता तुम्ही परत म्हणताल की राजकारण काढलं. मला काय फरक पडत नाही. प्रश्न असा येतो की अंकुश कोणाचा राहिला आहे का. का सगळे नगरसेवक ओरडतात. आज तुषार कामठेवरती कोणती परिस्थिती ओढावली आहे. पाणीपुरवठयाच्या संदर्भात आयुक्तसाहेब मी उपाययोजना दिलेल्या आहेत. मी फक्त बोलतो, प्रश्न मांडतो माझी नैतिक जबाबदारी संपली असे नाही मी त्याच्यावर उपाययोजना देखील दिलेल्या आहेत. त्याचे नियोजन

करा. साहेब एक ते दिड लाख कनेकशन्स अनधिकृत आहेत. ४० टक्के पाण्याची चोरी आहे. ८० करोड रुपये तूट आहे. अहो २२०० ते २३०० कोटीचे आख्या महानगरपालिकेचे बजेट असते. अमरावतीमध्ये बघा लोक रडतात पगार होत नाहीत. एक मिनिटात आपल्याला पळता भूई थोडी होईल. ही जरी रक्कम तुम्ही वसुल केली ना किती तरी विकासकामे त्याच्यामध्ये होऊन जातील. आयुक्तसाहेब माझे मत मी जुलै महिन्या मध्येच व्यक्त केलेले आहे. ते मत मला असे वाटते की आपण वाचावे. माझी काही चूक असेल तर मला ती सांगाव. माझ्यामध्ये मी दुरुस्ती करेन. प्रशासनाची चूक असेल तर त्याबाबत अंमलबजावणी मात्र तुम्ही करावी. अशी मी याठिकाणी आशा व्यक्त करतो. सर्वांच्या भावनांचा याठिकाणी विचार करावा. जोपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत होत नाही तोपर्यंत सभा तहकूब करावी अशी मी गटनेत्यांना विनंती करतो, धन्यवाद.

मा. मंगला कदम - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौरांना मी तीन वाजता फोन केला होता. प्रशासनावर जर वचक ठेवायचा असेल तर आजची सभा तहकूब करा. जोपर्यंत पाणीप्रश्न, आरोग्यप्रश्न आणि ड्रेनेजेचा प्रश्न मार्गी लागत नाही, आणि जोपर्यंत आम्हाला, महापौरांना प्रशासन सांगत नाही, की हे आता मार्गी लावलय तोपर्यंत सभा तहकूब. असं मी तीन वाजता महापौरांशी फोनवर बोलले. आज दोन तास झाले मा. महापौर अर्धे सभागृह येथून निघून गेलेले आहे. याचा अर्थ काय आहे महापौर, की सगळया सदस्यांना असं वाटतय की इथं ओरडून तर काहीही होणार नाही. म्हणून ते लोक अक्षरश: निघून गेलेले आहेत. परंतु महापौर तुम्ही आपण या शहराचे महापौर आहात. तुमचा स्वभाव मला माहिती आहे. जर तुम्हाला खरच काहीतरी करायच असेल तर पूर्वी काही लोक म्हणायचे काम केले तर असं करावं. तर त्या पध्दतीने काम करीत असताना आजपर्यंत तुम्ही खरच चांगले काम करीत आहात. महापौर साहेब, अशी पाण्याची परिस्थिती, ज्यावेळेला पाणी नव्हते त्यावेळेला सुध्दा अशी वेळ आपल्यावर आली नाही. आठवतयं ते दिवस. आता आपण उदया एक दिवसाआड पाणी करणार आहेत. पण शेवटपर्यंत पाऊस पडला तरी आपल्याला काही करायची गरज पडली नाही. याची कारणे शोधायला पाहिजेत ना कमिशनर साहेब. आता शत्रुघ्न काटेंचे मी मनापासून स्वागत करीन, की त्यांनी जे आता भाषण केले. भाऊसाहेब तर चांगले भाषण करणारच कारण ते सिनियर आहेत.

पण शत्रुघ्न काटेंनी जे मॅच्यूरीटीप्रमाणे सगळ सांगितलं. तर तो देखील विचार केला गेला पाहिजे कमिशनरसाहेब. तुम्ही आम्ही रथाची दोन चाके आहोत. सभागृहात आम्ही इथं आहोत रथाची दोन चाके आहेत. ती जर व्यवस्थित चालली तर शहर व्यवस्थित चालणार आहे. आणि त्याशिवाय हे शहर व्यवस्थित चालणार नाहीय साहेब. पक्षीय राजकारण हे निवडणुकीपुरते आहे. वैयक्तिक राजकारण सभागृहामध्ये चालतं, पक्षीय लेव्हलला राजकारण सभागृहामध्ये चालतं हे जोपर्यंत इथं थांबत नाही हे जोपर्यंत बंद होत नाही तोपर्यंत या गोष्टी सुरळीत होणार नाहीत मा. महापौर साहेब आणि म्हणून आज ज्या पध्दतीने आज शहरामध्ये काम करायला पाहिजे. आज असं कोणी सुचविले का हो साहेब की रावेतसारखे अजुन एक पंपींग स्टेशन आपल्या शहरामध्ये असले पाहिजे. का नको शहराला. साहेब करा ना. पंपींगस्टेशनचा प्रस्ताव आणा. पंपींग स्टेशन अजुन एक झाले पाहिजे. आज पाणी पुरत नाही. उदया एखादी जर काही दुर्घटना जर घडली मग आठ दिवस काय शहराने पाणी नाही प्यायचं का. यासाठी शहराला आठ दिवस पाणी पुरेल एवढा साठा असला पाहिजे. त्यांनी काय सांगायचे अहो साहेब ती सुध्दा माणसेच आहेत. आता मी लडकत साहेबांशी बोलत असते. मी त्यांना काल सुध्दा बोलले त्यांना मी सांगितले. मी किती दिवस गप्प बसू शकते हे तुम्हालाही चांगलं माहित आहे. तर त्यासाठी तुम्ही साहेब पाणीपुरवठा हा शहरातील व्यवस्थित करा. तुमच्या काय अडचणी आहेत त्या तुम्ही त्यांना सांगा. साहेब तुम्हाला काय मदत लागत असेल तर आम्हाला सांगा. परंतु आम्ही सुध्दा त्यांच्या एकदम अंगावर धावून, जास्त गोष्टी बोलून उपयोग नाही. साहेब पूर्वी देखील तुम्ही पाणीपुरवठयात काम केलेले आहे आणि आताची जी परिस्थिती आहे लडकतसाहेब त्यावेळेस पंपींगस्टेशनला होते. आज त्यांना तुम्ही बाहेर काम दिलेले आहे. आज त्यांना काम जमोस्तर वेळ तर लागणार आहे ना आणि मग ते विस्कळीत झालेले आहे. २००५ सालापासूनचं लडकत साहेबांचे स्वप्न आहे की पिंपरी चिंचवड शहराला २४X७ चे पाणी दयायचे. परवा दिवशी मला आठवले. आम्ही हैद्राबादला बरोबर होतो. राजू मिसाळ बरोबर होते. आज १३ वर्षे पूर्ण झाली साहेब. पण तरी सुध्दा आपण पुढे जातोय का. आज आपण पाणी देऊ शकत नाही. साहेब २४X७ तर फार लांबची गोष्ट आहे. २४X७ साठी तुम्ही पाईप टाकण्यास सुरुवात केली. २४X७ चे मीटर बसवायला

सुरुवात केलीय नागरीकांचे कशासाठी साहेब. कशाला उगीचच आताच नागरीकांना बोजा, कार्पोरेशनला बोजा. २४X७ चे मीटर बसवायला सुरुवात केलीय. २४X७ चा मीटर बसवायला कोणालाही येऊ दयायचे नाही गेटमधून बाहेर काढायचं आणि आम्ही अधिका-यांनाही सांगितलं की आमच्या इथं पाठवू नका. काही घटना घडली तर आम्ही जबाबदार नाही. पहिलं तर तो मीटर काढायचा आणि आम्हाला जिथं सोयीस्कर आहे गेटच्या इथं तिथे तो लावायचा. ही कुठली पध्दत. अहो मीटर चोरीला गेल्यानंतर नागरीकाला भूर्दंड दयायचा. म्हणजे २४X७ साठी सुध्दा हया योजना आपल्याकडे चालू आहेत. परंतु सध्या शहरामध्ये पाण्याची परिस्थिती इतकी वाईट आहे. त्याच्यावर उपाययोजनाचा विचार करा ना साहेब. आणि हा उपाययोजनाचा विचार करा की तीन दिवस पंपींग स्टेशनला जर आपल्याला लाईटचा प्रॉब्लेम आला तर जनरेटर बसविले पाहिजेत, जनरेटर बसवा. एक मागणी होती रावेत पंपींग स्टेशनची की आम्हाला कॅमेरे पाहिजेत. साहेब एक मिनिटामध्ये मंजुरी दिलीय विचारा तुम्ही. विचारा लडकतांना आम्ही म्हटलं किती खर्च आहे. किती यायचा तेवढा खर्च येऊ दया. पण पिंपरी चिंचवड शहरातल्या नागरीकांचा प्रश्न होता. जर उदया त्या पाण्यामध्ये कोणी काय टाकलं तर आणि जर काही दुर्घटना घडली. तर काय घडेल म्हणून आम्ही कोणत्याही पध्दतीचा विचार केला नाही. आम्ही त्यांना एक मिनिटामध्ये म्हटलं हेच नाही तुम्हाला आणखी काही पाहिजे असलं तरी सांगा परंतु तुम्ही कॅमेरे बसवा काही करा. परंतु सिक्युरिटी ही पाण्याची झाली पाहिजे. या पध्दतीने तुम्ही हे काम केले गेले पाहिजे हे २००६ पासूनचे आधीपासून स्वप्न आहे. ३० टक्के लिकेजेस आहेत आणि आता ३० टक्के अनधिकृत नळ कनेक्शन. साहेब पाणी फूकट देऊ टाका नागरीकांना. आजचा तुमचा अजेंडा राबवा. माझ स्वप्न होतं शहरामध्ये नागरीकांना फूकट पाणी दयायचं. याच कारण असं आहे साहेब तुम्ही बिलींगची वसुली आणि त्याच्यावर होणारा खर्च हा जर बघितला तर मी तुम्हाला खरंच सांगते नागरीकांना पाणी फूकट दिलेले परवडेल. तुम्ही विचार करा. शेवटच्या जनरल बॉडीच्या वेळेला माझी मागणी होती आमच्या पक्षाकडे की शहरामधील नागरीकांना पाणी फूकट देऊ या. मी दाखविले होते की तुमची वसुली किती होते आणि खर्च किती होतो आणि हया सगळयाचा जर ताळमेळ घातला तर साहेब नागरीकांना पाणी फूकट दया. २४ तास सोडा. तुमचे पाणी कोणीही चोरणार

नाही. कोणीही गैरवापर करणार नाही. तुम्ही बघा तरी एकदा. पूर्वी पाणी चोवीस तास होते. कोणीच पाणी भरुन ठेवत नव्हते. आजची परिस्थिती काय झाली आहे. आजचे भरलेले पाणी दुस-या दिवशी बाहेर सोडून देतात. टाकून देतात पाणी. दुस-या दिवशी येईल की नाही पाणी या भितीने नागरीक जास्त पाणी भरुन ठेवतात. मग बाथरुममध्ये सोडून दे. टॉयलेटमध्ये सोडून दे. ही परिस्थिती आहे आजची इथं. परंतु जिथ पाणीच नाही साहेब ज्या मोठया मोठया सोसायटया आहेत. अगदी वीस फ्लॅटच्या सोसायटीला सुध्दा पाणी नाहीय. आज विचारा माझ्याकडे २० फ्लॅटची सोसायटी आहे. आज सकाळी आम्ही तिथं टँकर मागविला आहे. मग टँकरलॉबी चालू आहे का. का पुढे इलेक्शन आहे म्हणून पाणी ताणायचे आणि इलेक्शनच्या वेळेला चांगले पाणी दयायचं असा काही प्रस्ताव आहे का तुमच्याकडे. असं काय असेल तर ते ही बघा. पण याने काही होणार नाही. ज्यावेळेला नागरीक त्रस्त हेतील त्यावेळेला नागरीक मला नाही वाटत की काही चांगला विचार करतील. म्हणून याच्यामध्ये कुठलेही राजकारण न करता महापौरांनी कडक भूमिका घेतली पाहिजे. म्हणजे कडक भूमिका घ्यायची नाही महापौर. सामंजस्यानी म्हणजे तुम्ही जनरल बॉडीमध्ये कमिशनरांना असे सांगा मी सभागृहामध्ये आमच्या नगरसेवकांना या तीन गोष्टींचा त्रास झालेला सहन करणार नाही आणि तुम्ही हे मला किती दिवसांत सोडवून देताय ते विचारा ना तुम्ही आणि कमिशनरांनी खाली विचरावे. एम.टी. कांबळे साहेब होते बघा. आजपर्यंत कधी कुठे प्रश्न आला का कामकाज करताना. त्यावेळेला आमच्या काळामध्ये होते ते. कधीच कुठलाच पाण्याचा प्रश्न आला नाही. का ते प्रश्न सोडवू शकतात बाकीचे सोडवू शकत नाहीत. आता इथं विशाल कांबळे आहेत त्यांना विचारा. पाणीपुरवठयाच्या अधिका-यांचे ते कामच आहे. परंतु त्यांनी पाणीपुरवठा व्यवस्थित केला. एवढी लोकसंख्या वाढली का. एवढं पाणी कुठे गायब झाले. म्हणजेच अनधिकृत कनेक्शन. जिथे अनधिकृत कनेक्शन तिथेच दुसरीकडे लिकेज झाले. म्हणजे लिकेजेसच प्रमाण पहिले २० टक्के होते. आता जास्त टक्के झाले. मग हे तुम्ही कॅलक्यूलेशन करा साहेब. आणि पूर्वी जे पाणीपुरवठयात काम केलेले आहेत त्यांना इनव्हाईट करा. जस आम्ही करतो. पक्षामध्ये आजीमाजींना बोलवतात तसं तुम्ही बोलवा ना आज काळाची गरज आहे. समोरच्याने आपल्याला शिकविले ते काय वाईट आहे. बोलवा ना माजी अधिकारी जे

आहेत त्यांना बोलवा शहराच्या पाणीपुरवठयाचे नियोजन करा कशाला आपल्याला कन्सलटंट लागतील त्यांनाच बोलवा. आज तर अधिका-यांनी तुम्हाला चांगले मार्गदर्शन नाही केले तर मला सांगा साहेब. पण त्यांचेकडून आपण घेतले पाहिजे त्यांना विचारा तुम्ही. की आपण कसं केले पाहिजे, काय केलं पाहिजे. आता उदाहरणार्थ माझ्याकडंचा जो प्रश्न आहे तो पाण्याचा. पाणीच मिळत नाही. आम्ही विचारलं तर त्यांनी सांगितल की व्हॉल्व बसवावा लागेल. किती किरकोळ प्रश्न आहे बघा तुम्ही साहेब. आम्हाला सभागृहात पण बोलायचं नव्हत साहेब. कारण मला त्यांनी कमीटमेंट केलेली आहे. की मी करुन देणार म्हणून. परंतु साहेब किरकोळ प्रश्न आहे ना व्हॉल्व. हा माझाच नाही सगळयांकडे प्रकार तोच आहे मग हा किरकोळ प्रश्न जर असेल तर साहेब त्याच्यासाठी आठ दिवस, पंधरा दिवस लागता कामा नये. आज त्या माणसाची, अधिका-याची त्याची सुध्दा एनर्जी सध्या ते पण झोपत नाहीत ना साहेब. त्यांनाही झोप नाही. रात्र रात्र फिरतात. माझं म्हणणं आहे साहेब ते रात्रभर फिरतात ना. मग त्यांचा उदयाचा सकाळ कसा होणार. कारण ते पण माणूसच आहेत ना. रात्रभर फिरल्यानंतर सकाळी त्यांना झोप लागणारच ना साहेब. कसा उचलतील मग मी काय म्हणणार, मी काय करणार. फोन नाही उचलला तर मी दुस-याला फोन करणार. अरे बाबा का साहेबांनी फोन नाही उचलला. मग तो म्हणणार रात्रभर फिरलेत ना साहेब. रात्रभर जागलेत ना साहेब. ठीक आहे तेवढ तर समजून घ्यायलाच पाहिजे माझ्या सारखीने. पण या गोष्टी न घडण्यासाठी आपण उपाययोजना केल्या पाहिजेत साहेब. अवघड काहीही नाही साहेब. वचक का राहिला नाही हे मी तुम्हाला सांगते. आख्खं झेंडू मार्केट बघा कालचं. कचरा कशाने झाला आहे शहरामध्ये. सगळयांनी झेंडू विकायला आणला पाऊस पडला. झेंडूवाल्यांनी झेंडू तिथेच टाकला आणि उठून गेले साहेब. आणि सगळा कचरा आपल्या इथेच झाला साहेब. सगळा कचरा आपल्या लोकांना उचलावा लागला. आपल्याच इथ नाहीतर परवाच्या दिवशी तळेगावची सुध्दा बातमी होती. याचाच अर्थ अनधिकृत व्यवसायावर सुध्दा आपलं लक्ष नाहीय साहेब. आम्ही मागे तुम्हाला सांगितले साहेब, की तुम्ही अनधिकृत व्यवसाय करु देऊ नका. श्रीकर परदेशी असताना अक्षरश: कोणाचीही हिंमत नव्हती अनधिकृत टप-या टाकण्याची. आजची परिस्थिती काय आहे. आपण काय म्हणणार, बापरे त्या

टपरीवाल्याला काही विचारायला जाणारतर तो आत्महत्या करीन. साहेब आपलं शहर बकाल होऊन जाईल. अस जर तुम्ही म्हणाल तर शहर बकाल होईल. त्यांच्याकडे नोटीस दया. नोटीस दिली तर ते कोर्टात जातील. हे पण सांगते तुम्हाला. पण साहेब याच्यावर कुठेतर वचक राहिला पाहिजे. नाही तर लोकांनी गहाण करायची तुम्हाला मी खर सांगते साहेब, अप्पूघरला अजितदादा कचरा गोळा करीत होते. साहेब इतकं वाईट वाटले माझ्या सारखीला. मी दुस-या दिवशी त्या अप्पूघरच्या इथं गेले. साहेब तसाच कचरा तिथे होता. मी त्यांना म्हटलं तिथं अजित दादांनी कचरा उचलला तिथला तुम्हाला लाजा वाटतात का परत आज तुमचा कचरा इथे. परत काय होणार साहेब मी एक दिवस जाईन दोन दिवस जाईन. त्यांना बडबड करेन आणि तीच परिस्थिती आहे ना आज अप्पूघरची. म्हणजे काय अजितदादांनी कचरा काढो किंवा मग आठवले साहेबांच्याकडे लोक येऊन त्यांनी एवढ पूर्ण शहर स्वच्छ केले होते. काय झालं त्यांच. आख्ख्या शहरामधून कितीतरी टन त्यांनी कचरा काढलेला आहे. लोकांनी कचरा करायचं राहतात का. दंड मारा साहेब तुम्ही. आरोग्य अधिका-यांना विचारा. जर त्याच्या घरामध्ये डेंगूच्या आळया निघाल्या असतील तर पाच हजाराची पावती फाडा म्हणून सांगते मी. कारण का की एका घरामध्ये डेंगू असेल ना तर दहा सोसायटया त्याच्यामध्ये बाधीत होतात. आजची परिस्थिती काय आहे साहेब. सगळ करतो आपण. पण डेंगूची संख्या त्यामुळेच वाढली ना. पण मग कुठे तरी कायदा गंभीर झाला पाहिजे साहेब. सगळेच तुमच्यावर ढकलून आम्ही काय करणार. डेंगु तुमच्यामुळे, काही झालं तुमच्यामुळे, आरोग्य तुमच्यामुळे होतेय. हयाच्यासाठी साहेब आणि महापौर आज आदेश दया. तुम्हाला आठ दिवस दयायचे असतील तर आठ दिवस दया. अजेंडयावर असं म्हणजे मी असं म्हणत नाही. तातडीचा विषय असेल तर नक्कीच जनरल बॉडी झाली पाहिजे. कोणतं महत्वाच काम असेल तर जनरल बॉडी व्हायलाच पाहिजे. परंतु तुम्ही मला सांगांना काय आहे हे. शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातून मी तीन वाजता सांगितले होते आतापर्यंत कमिशनरांची आणि अधिका-यांची दोन तासांची मिटींग झाली असती. आपण तीन वाजता मिटींग उरकली असतील तर. आणि महापौर येथून पुढे ०३ गोष्टीसाठी महापौरसाहेब सांगून टाका. सभागृहाच्या वतीने पण कमिशनरसाहेब मी तुम्हाला विनंती करते. या तीन गोष्टी शहरातील नागरीकांनी मागता कामा नयेत,

त्यांचा हक्क आहे. आपण त्याच्यासाठी त्यांच्याकडून टॅक्स घेतोय. त्यांना सांगा तुमच्या कच-याची विल्हेवाट तुम्ही लावा. पाणीपुरवठाच तुम्ही तुमच बघुन घ्या. आज किती तरी घरामध्ये लोकं बॉटलमधील पाणी पितात का तर अस्वच्छ पाणीपुरवठा शहरामध्ये नळांमधून होतोय. दवाखान्यांमध्ये पैसे घालवण्यापेक्षा पाण्याची बॉटल आणून पाणी पिलेले बरे. तुम्ही सर्व्हे करा. कि ती घरांमध्ये आख्खे टेम्पोच्या टेम्पो फिरत असतात आणि त्या बॉटल किराणामालाच्या दुकानामध्ये उपलब्ध आहेत. पाणी कुठून येते ते मला माहित नाही. पण ते कार्पोरेशनच्या नळाचे भरतात का काय भरतात ते मला माहीत नाही. परंतु त्या बॉटल घेऊन लोक पाणी पितात. ही आजची सत्य परिस्थिती आहे पिंपरी चिंचवडची. एवढे लोक पिंपरी चिंचवडवर प्रेम करतात. आज इतर ठिकाणाहून पिंपरी चिंचवडमध्ये लोक आलेले आहेत. त्यांना आपण विश्वास दिला गेला पाहिजे. आणि अधिका-यांच्या सुध्दा आम्ही पाठीशी राहू. की तुम्ही काम चांगल करा. आज त्यांना आम्ही शिव्या दिल्या तर ते उदया चांगल काम नाही होणार ते डिस्टर्ब होणार आहेत. ते म्हणणार आहेत आम्ही रात्रंदिवस फिरतोय. आणि आम्ही फिरत असताना आज जर आमची कौतुकाची भूमिका कोणी नाही घेतली तर आणि आम्हाला जर बडबडच केली तर ते मानसिकरित्या इतके खचून जातील की विचारताच सोय नाही आणि म्हणून आज अधिका-यांच्या बरोबर राहून आज आपल्याला शहरामध्ये चांगल काम करायच आहे एवढचं आपल्याला साहेब मी सांगते. साहेब तुम्ही खूप हुशार आहात. आतापर्यंतच्या तुमच्या कामाचे रेकॉर्ड बघता पण थोडेफार तुम्हालाही प्रेशर असेल. असं आम्ही नाही म्हणू शकणार. कधी नव्हे ती सत्ता थोडीशी गेल्यानंतर माणसाला पण वाटतच असते की आमच्या म्हणण्याप्रमाणे वागले पाहिजे. त्याप्रमाणे तुम्हालाही वागायला लागत असेल. परंतु ज्या बेसिक सुविधा आहेत त्या नागरीकांना दिल्याच पाहिजेत. त्यासाठी नागरीकांचा तळतळाट किंवा त्या गोष्टी लागणार नाहीत आपल्या सभागृहाला सुध्दा. आणि म्हणून महापौर साहेब आजची सभा कमिशनरांना विचारा अधिका-यांना विचारा किती दिवस तुम्हाला पाहिजेत तो पर्यंत पुढचं कामकाज करु नये हि विनंती आहे साहेब.

मा.अंबरनाथ कांबळे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब दोनच मिनिटे थांबा चांगला विषय आहे मला तुमच्या बद्दलच सांगायचे आहे.

फक्त दोन मिनिटे थांबा. आता एक तास झाला आपला पाण्याचा विषय चाललेला आहे. सर्व नगरसेवक नवीन असणारे, जुने असणारे सर्वांनी सर्व नागरीकांना जे पाणी पाहिजे. तळमळीने सर्वांनी इथे विषय मांडलेला आहे. आणि आमच्या पिंपरी चिंचवडया नागरीकांना पूर्ण पाणी मिळावे. त्यासाठी तळमळीने मी पण बोलणार आहे. कारण पाण्याची परिस्थिती खूप अवघड आहे. कारण ऑगस्ट महिना, सप्टेंबर महिना पाऊस पडला गेलेला नाही. सर्व अधिका-यांनी काही बेकार नाहीत काही चांगले पण अधिकारी आहेत. मी तांबे साहेबांना घेऊन बसल्यानंतर तांबेसाहेबांनी मला आयुक्तसाहेब उत्तर दिले की पूर्ण ऑगस्ट महिन्यामध्ये आपल्याला पाऊस पडला नाही. परत सप्टेंबर महिना पाऊस पडलेला नाही. खरोखरच आयुक्तसाहेब आम्ही प्रभागात हिंडत असताना आपल्या खालच्या अधिका-यांची अवस्था अवघड आहे. कारण मी सर्व नगरसेवकांना सांगू शकतो की आपण पण महापौर साहेब आपण पण आपलं पोरंग आहे म्हणून त्याला मारायचं नाही. आणि दुस-याच पोरगं आहे म्हणून त्याला मारायचं. हे उदाहरण मी का देतो. कारण आपण पण नागरीकांना सांगायला पाहिजे. की आपण पाणी साठवणूक करतो, उदया पाणी येणार आहे ज्यादिवशी पाणी येते त्यादिवशी आपण ते पाणी टाकून देतो. चुकीची गोष्ट आहे ते पाणी आपण दोन दिवस वापरायला पाहिजे. चार दिवस वापरायला पाहिजे कारण बिसलेरीचे पाणी हे किती दिवसाचे असतं ते आपल्याला माहिती आहे. परत आम्ही प्रभागात हिंडत असताना आमचे काही विनायकनगर असेल, कवडेनगर असेल प्रभाग क्रमांक ३१ मध्ये. लाईनने अकरा बारा घरे असतात. एखादा दादागिरी करुन त्याच्यावर मोटार लावतो. त्याची मोटार चौथ्या मजल्यावर असते. तो मनसोक्त पाणी भरतो. बाकीचे शेजारचे लोकांना पाणी मिळत नाही. आपले अधिकारी गेल्यानंतर एखादा दादा असेल तो दादागिरी करतो त्या इंजिनिअरला. मी कसेही पाणी भरु शकतो. आपण पण सर्वांनी नागरीकांना सांगायला पाहिजे. आता आख्या महाराष्ट्राची परिस्थिती महापौर साहेब लातूर सारख्या ठिकाणी आठ-आठ दिवस पाणी पोहचत नाही. मान्य आहे आपल्याला पाणी पाहिजेलच. पण आपल्याला जे एक तास पाणी येते, ते पण आपल्या सगळया नागरीकांनी काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. आणि आयुक्तसाहेब मी तुम्हाला एक नवीन नगरसेवक म्हणून बोलतोय. तुमचे समोर आणून देतोय. कारण एक बारीकशी गोष्ट आहे आयुक्तसाहेब.

आमचे गुरवपिंपळे, नवी सांगवी, जुनी सांगवी आणि दापोडी तो सर्वात शेवटचा टप्पा असल्यामुळे आम्हाला सर्वांत पाणी शेवट येते. तरी सर्व पिंपरी चिंचवड शहराला सर्वांना समान हक्क असावा, सर्वांना समान पाणी मिळावे हि एक विनंती आहे आयुक्तसाहेब. आयुक्तसाहेब मी एक नवीन नगरसेवक असलो तरी या दिड महिन्यात माझी टाकीवर व्हिजीट होती. मी एका आपल्या इंजिनिअरला विचारले की आपल्याला वरुन किती एमएलडी पाणी येते. तर तो म्हटला की २१ एमएलडी पाणी येते. बर म्हटलं २१ एमएलडी पाणी येते. मे महिन्यात किती पाणी येत होते. तर तो म्हणला की १४ एमएलडी पाणी येत होते. तर रावेतमध्ये पंपींगला जो मेन अधिकारी आहे तो त्याच्यामध्ये दोषी आहे. तो कसा आहे ते तुम्हाला आयुक्तसाहेब माझ्याकडे व्हिडीओ आहे. तो मी तुम्हाला स्वत: दाखवितो. मी स्वत: टाकीवर जाऊन पाहिलेले आहे. कारण १४ एमएलडी पाणी मे महिन्यामध्ये सोडले जात होते. आता पाणी २१ एमएलडी सोडले जाते. एक एमएलडी पाणीमध्ये १० लाख लिटर तर साडेसात लाख लिटर पाणी हे कुठे पंपींगने सोडले जाते हे तुम्हाला साहेब मी माझ्याकडे व्हिडीओ आहे तो तुम्ही बघा. कारण त्या पंपींगमध्ये हे अधिकारी आहेत. म्हणजे एक लिटर पाणी एक रुपयाला विकले तर साडे पंच्च्याहत्तर लाख रुपयेचे आमच्यासाठी उलट पाणी कमी केले जाते. ही एक मोठी चोरी रावेतमध्ये होत आहे. तर तिथे साडेसात लिटर पाणी हे बिसलेरीसाठी, किंवा कोणत्या तरी कारखान्यांना दिले जाते. आयुक्तसाहेब तुम्ही नीट अभ्यास करा. कारण आम्ही फिरतो ते नवीन नगरसेवक म्हणून. तरी आम्हाला अंदाज येतोय. तेही साडेतेवीस एमएलडी पाणी येत नाही. आता फक्त साडेचौदा एमएलडी पाणी येतेय. हे मी स्वत:हून सांगतोय कारण वर काही तरी मोठी गफलत चालली आहे. हे तुमच्या कोणत्या तरी अधिका-याचे मी त्याचे नाव नाही घेणार. ते तुम्हाला पण माहीत नसेल. खाली किती पाणी येतेय आणि वर किती येतेय. तिथे जो पंपींग अधिकारी करतोय. तो काही तरी गोंधळ करुन लाखो लिटर, लाखो करोडचे पाणी एक दिवसाला बिसलेरीसारख्या कंपनीला देतोय. हे मी एक नगरसेवक म्हणून हे मनापासून बोलतोय कारण स्वत: माझ्याकडे व्हिडीओ कॅसेट आहे. ती मी तुम्हाला पाठवून देतो. तसेच आमच्या लोकांना जे काही एक तास दोन तास पाणी येईल ते प्रेशरने यावे. महापौर, मला जे बोलायला संधी दिली त्याबद्दल मी तुमचे आभार व्यक्त करतो.

मा. विकास डोळस - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. तीन तास झाले सभागृहामध्ये पाण्याची चर्चा चालू आहे. आयुक्तसाहेब मराठीत एक म्हण आहे “बाप दाखवा नाही तर श्राध्द घाल”. आज पाणीपुरवठा विभागाला मला सांगायचे आहे एक तर पाणी दया, नाहीतर राजीनामा दया. आणि या सगळयांची एकत्रितरित्या जबाबदारी आयुक्तसाहेब तुम्ही घ्या आणि तुमचे काय करायचे आहे ते तुम्हीच ठरवा जेव्हापासून आम्ही निवडून आलो आहे तेव्हा पासून आम्ही पाणी पुरवठयाचा पाठपुरावा करतोय की आम्हाला व्यवस्थित पाणी दया, पाणी दया. साऊथ ऑफ्रिकेमध्ये एक शहर आहे केपटाऊन. मार्चमध्ये तिथे पाण्याची आणीबाणी झाली. प्रत्येक नागरीकाला पन्नास लिटर पाणी देण्याचे ठरविले. त्याच्यानंतर तिथे ही परिस्थिती एवढी भयानक झाली की एक दोन महिन्यांनी प्रत्येक नागरीकांला वीस लिटर पाणी ते पण लष्करी बंदोबस्तामध्ये देण्यात आले. तशी प्रथा त्यांनी चालू केली. आता आमच्या दिघी येथे लष्कर कधी पाठविता तेवढं सांगा फक्त. परिस्थितीच तशी आहे साहेब. आज सकाळी पहाटे पाचपासून लोक आमच्या घरी येतात. दोनशे-दोनशे, अडीचशे-अडीचशे महिला आमच्या घरी असतात. एकाच्याच नाहीतर माझ्या घरी असतात, उंडे साहेबांच्या घरी असतील, आमच्या गायकवाडताईच्या घरी असतील, घुलेताईच्या घरी असतील. पाठीमागच्या आठवडयामध्ये मी बाहेर गेलो होतो शनिवार-रविवार. रविवारी सकाळी सकाळी साडेपाचला माझ्या आईचा फोन आला सकाळी सकाळी आईचा फोन आल्यानंतर मी थोडा घाबरलो आणि म्हणल आई काय झालं. आई म्हणली बाळा दोन दिवस बाहेरच रहा. आता आपल्या घरी दोनशे-अडीचशे महिला आलेल्या आहेत. मला नाही वाटत पाण्याची परिस्थिती सुधरेल. दोन-तीन दिवस आराम करुन ये. हसण्याची गोष्ट नाहीय. कारण की घरच्यांना धास्ती वाटते. या पाणीपुरवठयाच्या प्रश्नामुळे आमच्या मुलाचे आमच्या मुलीचे काय होईल एखाद दिवशी. आपल्या तिकडे रावेतमध्ये संपची लेव्हल नाहीय. नंतर पंपींग स्टेशनचा प्रॉब्लेम आहे. ठीक आहे नंतर मग इलेक्ट्रीकचा प्रॉब्लेम होईल. मग हे सगळे असेल तरी प्रॉब्लेम आहे. परवा दोन दिवसापूर्वी सगळी परिस्थिती ठीक होती. तरी आमच्या काही भागामध्ये पाणी नव्हते. ही टेक्नीकल कारणे देताय मग तुम्हाला ठेवलय कशासाठी. इंजिनिअरचा, अभियंत्याचा अर्थ काय आहे. हया टेक्नीकल गोष्टी सॉलव्ह करणे हाच तर इंजिनिअरचा अर्थ आहे.

का ते पण आम्ही करायच. पाण्यासाठी धोरण ठरवायची गरज होती. आता आयुक्तसाहेब यांनी स्थायी समितीच्या मिटींगमध्ये एकदम व्यवस्थितरित्या सांगितले मग आपल्या शहराची लोकसंख्या पूर्वी काय होती आता काय आहे. आपल्या फीडर लाईन कोणकोणत्या आहेत. मग पंपींगस्टेशनचा प्रॉब्लेम होतो. कधीकधी लेव्हल कमी होती. सगळं मान्य आहे पण लोकांना काय सांगायचं. लोकांना हे सांगू शकत नाही की तिकडे पंपींग स्टेशनला प्रॉब्लेम आहे. लोकांना हे सांगू शकत नाही की तिकडे लेव्हल कमी झालीय. लोकांना पाणी पाहिजे. सकाळी पाच वाजता जेव्हा आम्ही फिरतो ना. एक मनाला चुटका लावणारी तुम्हाला घटना सांगतो जेव्हा पाच वाजता आम्ही फिरत होतो आमचे नगरसेवक बरोबर होते. एक चाळ आहे चाळ, आमच्या प्रभागामध्ये. त्या चाळीच्या बाहेर एक ८०-८५ वर्षाची म्हातारी आहे. दोनचार हंडे घेऊन नळापाशी बसली होती. तिला अक्षरश: चालता पण येत नव्हते. ती खरडतखरडत नळाकडे चालली होती. तिला विचारल आजी एवढी गरज का आहे. तर ती म्हणाली की बाळा आता पाणी नाही भरले तर पाणी मिळेल की नाही याची शंका वाटते. लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. तुषार मगाशी जे बोलला ना ही सभागृहात लोकांचे आम्ही प्रश्न सोडविण्यासाठी येतो. आणि लोकांचे जर प्रश्न सुटत नसतील तर त्या पदाचा काहीच उपयोग नाहीय. आज त्याच्या डोळयात जे पाणी येतय ना ते पाणी आपण समजून घेतल पाहिजे की आपण लोकांचे प्रश्न सोडविले पाहिजेत. दिड वर्षे जर आपल्याला पाणी प्रश्न सोडविता येत नसेल तर मग आपल्याला स्वत:चे अवलोकन करणे गरजेचे आहे. मोठया मोठया सोसायटया होतात. मोठया मोठया सोसायटयांना आतमधून दोन कनेक्शन बाहेरुन दोन कनेक्शन आहेत. आणि आज जो मध्यमवर्गीय आहे ना एक दिड गुंठयावाला त्याचे अक्षरश: मरण झाले आहे आणि रस्त्यावरती तोच येतो. हयांना कनेक्शन मिळतात कसे हया मोठया मोठया बिल्डींगवाल्यांना. जर आपण पाणीपुरवठा करण्यासाठी कॅपेबल नाहीय तर मग परवानग्या कशाला देता. मोठया मोठया बिल्डींगला परवानग्या देऊ नका. स्टॉप करा आजपासून परवानग्या. आम्ही काही व्यावसायिक नाहीय. पण एक सामान्य नागरीक म्हणून माझी मागणी आहे. जर तुम्ही पाणीपुरवठा करायला सक्षम असालतरच एनओसी दया अन्यथा एनओसी देऊ नका. अधिकारी आणि त्यांची कार्यपध्दती आता काही अधिकारी यांच खरच अभिनंदन की रात्री दोनदोन तीनतीन

वाजेपर्यंत जागतात. पण आमचाही नाईलाज आहे ना. जर तुम्ही पाणीपुरवठाच करु शकत नाही ना. तुम्ही काम करा व्यवस्थित पाणी दया, झोपा घरी आम्हाला काय घेणंदेणं आहे. साहेब आता ही दोनतीन तास चर्चा चालली आहे. आता ही चर्चेला सुरवात आहे. चर्चेनंतर नागरीक जेव्हा रस्त्यावर येईन ना. तेव्हा आमचे तर अवघड होईल. पण पालिका म्हणून सगळयांचेच अवघड होईल. त्यामुळे एकच सांगतो की बरेच जण म्हणतात पाणीपुरवठा म्हणजे शिक्षा आहे. ज्याला असे वाटते ना सोडून दयाना नोकरी कोणी तुम्हाला बोलाविले आहे इथं. ज्याला वाटतयं ना पाणीपुरवठा म्हणजे शिक्षा आहे. त्याने नोकरी सोडून दया. त्या नगररचनाच्या, बांधकाम परवानगीच्या अधिका-यांना रोटेशनवरती पाणीपुरवठा विभागात ठेवा आणि ज्याचा रिपोर्ट चांगला नसेल ना त्याला सस्पेंड करुन टाका. दर सहा महिन्यांनी तुम्हाला जर पाणीपुरवठयात काम करायचं असं काही तरी नियम करा साहेब. म्हणजे यांच्यावर अन्याय नाही व्हायचा. सहा वर्षे नाही सहा महिने करा. त्यांना समजू दया लोकांचे. साहेब तळमळ समजून घ्या साहेब. एक तर राजीनामा दया सगळयांनी. नाही तर आम्हांला पाणी दया. जयहिंद जय, महाराष्ट्र.

मा. हर्षल ढोरे - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज सभागृहात पाणी या विषयावरती गेली दोन वाजलेपासून ते आता साडेपाच वाजेपर्यंत चर्चा चालू आहे. आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील अतिशय गांर्भीयाचा जो प्रश्न आहे तो म्हणजे पाणीप्रश्न हा अतिशय गांर्भीयाचा आहे. प्रत्येक सदस्य हा पोटतिडकीने पाण्याविषयी बोलत आहे. खरोखरच आज पिंपरी चिंचवड शहरामध्ये पाण्याचा प्रश्न खूप मोठया प्रमाणात आहे. आताच मगाशी या सभागृहातील ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर असतील, मंगलाताई कदम असतील. आमचे सहकारी मित्र अंबरनाथ कांबळे असतील, आमचे विकास डोळस, बापू काटे असतील, यांनी ज्या पोटतिडकीने विषय मांडलेला आहे तो खरोखरच खूप गांर्भीयाचा आहे. भाऊसाहेब भोईरांचे एक बोलणे मला खरोखर पटले. याठिकाणी कोण भाजपाचा आहे, कोण राष्ट्रवादीचा आहे. हे बाजूला ठेऊन सर्व सभागृहाने एकत्रित येऊन आपण हा पाण्याचा प्रश्न जो पर्यंत मार्गी लावत नाही तोपर्यंत जसं मंगलाताई म्हणाल्या किंवा इतर सर्व भाजपाचे सहकारी मित्र बोलले की ही सभा पक्षनेत्यांनी तहकूब करावी. खरोखर माझी मनापासून सर्व सदस्यांना विनंती आहे.

आमच्या सांगवी भागामध्ये माईंनी मगाशीच सांगितले की खरोखरच आमचा सांगवी हा भाग शहराच्या शेवटच्या टप्प्यामध्ये येतो. अंबरनाथ कांबळे यांनी सांगितले की आमच्या भागामध्ये पाण्याचे प्रेशर एकदम कमी असते. त्याच्याबद्दल आयुक्तसाहेबांनी स्वतः जातीने लक्ष घालावे एवढीच विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

मा. पंकज भालेकर - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब सर्वांनी याठिकाणी पाणीपुरवठ्यावर चर्चा केली आहे. सगळयांचा एक प्रमुख विषय आहे. पाणीसमस्या जर याठिकाणी आपल्याला सोडवावयाची असेल तर नवीन काहीतरी पाण्याचा स्त्रोत आला पाहिजे. महापौर साहेब याठिकाणी सर्वांची एकच मागणी आहे की हा जर पाणीप्रश्न सोडवावयाचा असेल तर नवीन काहीतरी पाण्याचा स्त्रोत आला पाहिजे. हा स्त्रोत आणण्यासाठी आपल्याला काही बंद पाईपलाईन योजना असेल त्याचप्रमाणे भामा-आसखेडचे पाणी असेल. संदीप वाघेरेंनी मगाशी सांगितले की तात्पुरता पर्याय आपल्याला याठिकाणी ग्रामीण भागाला देहूरोडचा १०० चा साठा मंजुर आहे. त्याठिकाणी कसं पाणी उचलता येईल. त्यामुळे आपले तळवडे असेल, चिखली असेल, मोशी आणि च-होली असेल हा संपुर्ण परिसर त्या भागातून पाणी जर उचलले तर त्या संपुर्ण परिसरातील पाणीप्रश्न नक्कीच याठिकाणी सुटण्यास मदत होईल आणि उर्वरित शहराचाही पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल. धन्यवाद महापौर आम्ही आपले आभार मानतो आम्ही पाणीपुरवठा संदर्भात जे प्रश्न दिले होते आम्हाला त्याची उत्तरे मिळालीत. परंतु ती उत्तरे समाधानकारक नाहीत. पहिला प्रश्न आम्ही विचारला होता की पाण्याची व्यवस्था आपली स्काडा प्रणाली होती. याचे उत्तर दिलेय. स्काडा प्रणालीचा उपयोग पाणी पुरवठयाचे सुरळीत व्यवस्थापन करणेसाठी होतो. पण महापौर साहेब मला सांगा आज या पाण्याचा जो प्रश्न आहे याच्यामध्ये कुठेच स्काडा प्रणालीमुळे कुठे नियमित पाणीपुरवठा होतोय. तीनचे पाणी सकाळी चारला येतेय. चारचे पाणी पाचला येतेय. आणि याचा कसा उपयोग होतोय. आपल्या या प्रणालीचा निश्चित चांगला उपयोग झाला पाहिजे. याचे नियोजन करण्याचे आपल्या प्रशासनाची खरोखरच गरज आहे. आणि दुसरा प्रश्न असा विचारला होता की रावेत बंधा-याचे काम मंजुर झाले आहे का तर त्याचेमध्ये असे दिलेय की तत्वतः मान्यता दिलेली आहे. आणि पाटबंधारे विभागाकडून अंदाजपत्रक तयार होत आहे. त्याच्यानंतर निदान

तोपर्यंत रावेत बंधारा क्लीनींग करुन घेतला पाहिजे. म्हणजे त्याची कॅपॅसिटी वाढेल. त्याच्यातला गाळ काढला पाहिजे. की जेणे करुन त्याची कॅपॅसिटी वाढेल कॅपॅसिटी वाढल्यामुळे आपल्याला पाणी जास्त उचलता येईल. तिसरा प्रश्न असा होता की पवना जलवाहिनीचे काम करण्यास जलसंपदा प्राधिकरणाने गेल्या वर्षी परवानगी दिली तर ते काम का थांबले. त्याच्यामध्ये असं उत्तर मला मिळाले आहे की मा. मुख्यमंत्री यांचा स्थगितीचा आदेश उठविल्यानंतर काम सुरु होईल. मग आता ही स्थगिती उठविण्यासाठी महापौरसाहेब तुमच्या काळामध्ये या शहराला समान पाणीपुरवठा झाला पाहिजे. आम्हाला अभिमान राहील की महापौरांच्या काळामध्ये शहराला जास्त पाणीपुरवठा मिळाला म्हणून. निश्चितच आपल्या माध्यमातून आपण सर्व नगरसेवकांना बरोबर घेऊन याठिकाणी गटनेते असतील, नगरसेवक असतील मुख्यमंत्र्याबरोबर बैठक लावून लवकरात लवकर स्थगिती उठवावी की जेणेकरुन आपल्याला ह्या मावळच्या लोकांचा विरोध आहे.  त्यांच्याशी संगनमत करुन काय त्यांचा प्रश्न आहे तो मार्गी लावावा. त्यांचे बाकी काही प्रश्न असतील ते मार्गी लावू निश्चितच महापौर म्हणून आपले काम आहे. की आम्हाला पण अभिमान राहील की आपल्या काळामध्ये याठिकाणी जलवाहिनी मार्गी लागली म्हणून. याठिकाणी चौथा प्रश्न विचारला होता की २४X७ योजनेचे काम किती पूर्ण झाले याठिकाणी उत्तर दिले आहे की २९ टक्के. पण महापौरसाहेब हे फक्त कनेक्शन करण्याचे काम चाललेल आहे. कुठल्याही याठिकाणी नवीन पाईप लाईन टाकल्या नाहीत. बराचवेळा कार्यकारी असतील त्यांचे डेप्यूटी असतील जेई असतील. यांच्याकडे मागणी करतो की आमच्या प्रभागाचा आम्हांला चार्ट दाखवा की आमच्या प्रभागात तुम्ही २४X७ योजनेचे काय नियोजन केले आहे. आजपर्यंत आम्हाला चार्ट दाखवण्यात आलेला नाही आणि ते म्हणतात आम्ही केलेले आहे कुठल्या तरी संस्थेला काम दिलेय. आम्ही त्याचे नियोजन केलेले आहे परंतु आमच्या प्रभागात नागरीकांच्या तिथे समस्या निर्माण होतात. ज्या भागामध्ये पाणी जात नाही. त्यांनी आजतागायात आमच्या प्रभागतल्या २४X७ योजनेचे कुठलाही प्लॅन दाखविलेला नाही. कारण आमच्या पण सुचना विचारात घेतल्या पाहीजे. आपण एखादया संस्थेला काम दिले. त्याचे नियोजन काय केले पाईप कुठे टाकायचे, कुठे नाही. नगरसेवकांकडे नागरीक डायरेक्ट येतात काही भागात पाणीपुरवठा होत नाही.

आज तागायत महापौरसाहेब आम्हाला प्लॅन दाखविला नाही. हे काय चालले आहे नक्की निश्चितच आपण याठिकाणी लक्ष घातले पाहिजे. आमच्या भागाचा आम्ही विचार करतोय. की आमच्या भागात पाण्याची टाकी नाहीय. प्रभाग क्रमांक १२ ला जो पाणीपुरवठा होतो तो कृष्णानगरच्या पंपापासून तीथल्या टाकीवरुन केला जातो. कारण का तुम्ही विचार करा की त्या टाकीवरुन पाणी यायच म्हटलं तर आज जवळ जवळ तीनचार तास लागतात खालच्या भागापर्यंत पाणी जायला लागते. नवीन सोसायटया असतील तिथे पाणीच पोहचत नाही. आज आपल्या महापालिकेची तिथे जागा आहे तिथे जर पाण्याची टाकी बांधली तर त्याठिकाणचा पाण्याचा प्रश्न मिटेल. पण आज तागायत महापालिकेत जाऊन २० वर्षे झाले पाण्याच्या टाकीचे आमच्या प्रभागामध्ये नियोजनच केलेले नाही. त्यांनी असे उत्तर दिलेय की तुमच्या भागामध्ये पाण्याच्या टाकीचे नियोजन करणेत येत आहे. मग कधी करणार आहे अजून किती वर्षे लागणार आहेत. २० वर्षे झाले अजुन पाण्याची टाकी नाही. आम्हाला असं उत्तर दिलेय की पाण्याच्या टाकीचे नियोजन करणेत येत आहे. महापौरसाहेब आपण याठिकाणी निश्चितच ग्रामीण भागातले आहात. त्यामुळे निश्चित आपण लक्ष घालून हे प्रश्न मार्गी लावले पाहिजेत. याठिकाणी मी जो पाचवा प्रश्न विचारला होता पवना जलवाहिनीबाबत मुख्यमंत्र्यासोबत बैठक झाली आहे का त्याच उत्तर दिल आहे की बैठकीचा पाठपुरावा चालू आहे तसेच आंद्रा व भामा-आसखेड धरणतील पाणी महापालिकेस मिळणार होते त्याबाबत काय कार्यवाही चालू आहे. याठिकाणी अस उत्तर दिलेय की शासनस्तरावर मंजुरीसाठी आहे. सगळी अशी त्यांनी हवेतच उत्तरे दिली आहेत. काहीही मनापासून उत्तरे दिली नाहीत महापौर साहेब. आमच्या सर्व नगरसेवकांची कळकळीची विनंती आहे. आपल्या कार्यकाळात तरी हा प्रश्न सुटू दया. आज याठिकाणी पाण्याचा स्त्रोत आयुक्त साहेबां बरोबर माझे बोलणे झाले होते. बरेच जाऊन भेटतात आणि ते ही सांगतात की आपल्या शहराची लोकसंख्या वाढलेली आहे. पाण्याचे नियोजन येणारे पाणी कमी आहे. तर निश्चित याठिकाणी पाण्याचा स्त्रोत मिळाला पाहिजे. तो स्त्रोत कधी मिळणार. प्रत्येक जण म्हणतो की पाण्याचा स्त्रोत वाढवला पाहीजे पण पाण्याचा स्त्रोत वाढत नाही तोपर्यंत नवीन पाणी याठिकाणी आपल्याला जास्त प्रमाणात मिळणार नाही. म्हणून महापौर साहेब, आयुक्तसाहेब आपल्याला नवीन पाणी कुठून येणार. पवना

बंद जलवाहिनी असेल किंवा आपला देहूच असेल. आज एक आपण चार पाच कि.मी. लाईन टाकलीतरी देहू पासून पाण्याच नियोजन करु शकतो. निश्चितच महापौर साहेब आम्ही जे प्रश्न विचारलेत याची पूर्णपणे नीट उत्तरे दिलेली नाहीत. येणा-या काळामध्ये हा पाणीपुरवठयाचा विषय मार्गी लावावा. एवढीच मी आपल्याला विनंती करतो आणि मला बोलण्यास संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो, धन्यवाद.

**मा.नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. जवळपास साडेतीन तास याठिकाणी जो पिंपरी चिंचवड शहरामध्ये जी पाण्याच्या संदर्भामध्ये अनियमितता या संदर्भामध्ये प्रत्येक नगरसेवकांने आपली भूमिका मांडली. आणि मला असं वाटते की ख-या अर्थाने महापौरांनी याठिकाणी महापौर या नात्याने सर्व नगरसदस्यांना त्यांना सुध्दा वाटले की हा विषय खरोखर आपल्या प्रत्येक नगरसेवकांला त्रासदायक आहे आणि पाणी वाटपामध्ये अनियमीतता आहे आणि म्हणून त्यांनी साडेतीन तास या विषयाला चर्चा करुन दिली. मी प्रथमत: याठिकाणी महापौरांचे आभार मानतो. आणि मगाशी आपण सर्व सदस्यांनी सांगितले. खर म्हणजे पिंपरी चिंचवड शहराचे वाढते नागरीकरण, या शहरामध्ये येणा-यांची संख्या गेल्या सात-आठ वर्षामध्ये जर का आपण बघितली. लोकसंख्या वाढीचे प्रमाणे गेल्या सात-आठ वर्षामधले जर बघितले शहरातले वाढते नागरीकरण अलिकडच्या कालखंडामध्ये २०१४ नंतर याठिकाणी मोठया प्रमाणात झाले आहे. आणि म्हणून माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी २०१७ च्या वेळेला नगरपालिकेमध्ये निवडून आल्याच्यानंतर आम्ही पाणीपुरवठा अधिका-यांकडे पत्रव्यवहार केला आणि त्यांना विचारले की आपल्याला जे पाणी दिले जाते. ते ग्रॅव्हीटीने म्हणजे नैसर्गिकरित्या आणि उताराच्या दिशेने पाणी दिले जाते असं याठिकाणी सांगितले गेले आणि मी माझ्या प्रभागामध्ये विचारले तर प्रभागामध्ये ज्या काही पाईपलाईन जातात, त्या पाईपलाईन गेल्या अनेक वर्षापासून टाकलेल्या आहेत त्याचा ले आऊट मला जर का याठिकाणी मिळाला तर ख-या अर्थाने कशा अर्थाने कंट्रोल केले जाते, कुठे पाणी त्याठिकाणी जाते. याचा लेआऊट मी त्याठिकाणी मागितला. म्हणजे मला दुर्दैव वाटले. की महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे वॉर्डामध्ये असणारा पाणीपुरवठयाच्या माध्यमातून ज्या मोठया पाईपलाईन जातात मी छोटया पाईपलाईनच्याबाबत बोलत नाही, चार इंची वगैरे. परंतु चार

इंचीच्या पुढच्या पाईप लाईन ज्या ठिकाणी जातात त्याचा लेआऊट सुध्दा आमच्या पाणीपुरवठा विभागाकडे नाही. म्हणजे ख-या अर्थाने पाईप लाईन कुठे जोडली जाते. ते पाणी कुठे जाते. ते पाणी कुठल्या पाईपलाईनच्या माध्यमातून जाते. त्याला कंट्रोल कुठे केले जाते आणि ख-या अर्थाने कट्रोलींग त्या माध्यमातून होते का या संदर्भामध्ये विचारणा केली. त्या संदर्भामध्ये कुठल्याही प्रकारचा लेआऊट याठिकाणी प्रभाग स्तरावरती पाणीपुरवठयाच्या संदर्भामध्ये नाही. आणि मग ख-या अर्थाने आपण जर का बघितल तर मग हा जर काही कंट्रोलींग मॅप असेल हा जर का आमच्याकडे नसेल तर येणारा अधिकारी किंवा प्लंबर सांगेन तो व्हॉलमन जसा सांगेने तशा पध्दतीने जेई आणि डेप्यूटी याठिकाणी उंटाहून शेळया हाकण्याचे काम करताना गेल्या दिड वर्षामध्ये आम्ही याठिकाणी बघितले आहे. परंतु त्याचबरोबरीने आम्ही याठिकाणी हे ही मान्य करतो की या शहराचे वाढते नागरीकरण लक्षात घेता ज्यावेळेला २००६ मध्ये मगाशी याठिकाणी सांगितले की लोकसंख्येच्या माध्यमातून आपल्याला जर ४.७ म्हणजे जवळपास ५ टीएमसी पाणी आपण धरणामधून घेतो. आणि त्याचे नियोजन जर का आपण केले तर ख-या अर्थाने इलीगल कनेक्शनची संख्या सुध्दा मोठया प्रमाणामध्ये या शहरामध्ये आहे. गळतीचे प्रमाण सुध्दा मोठया प्रमाणामध्ये आपल्या प्रत्येक प्रभागामध्ये प्रत्येक पाईपलाईनच्या माध्यमातून आहे. मग गळती एका बाजूला थांबवायची. दुस-या बाजूला चोरीचे प्रमाण कमी करायचे. मला असं वाटतं की नियोजनाच्या संदर्भामध्ये सुध्दा या पाणीपुरवठा विभागाकडून गेली सहा वर्षापासून २४X७ ची योजना असेल, किंवा भामा आसखेडच्या माध्यमातून आपल्याला जर का पाणी याठिकाणी आणायचे असेलतर त्या संदर्भामध्ये सुध्दा मी आर्वजून याठिकाणी सांगेन की खरे आहे पाणीपुरवठा अनियमित आहे. पाणीपुरवठा आपल्याला ४.७० एमएलडीने पाणी मिळतेय. परंतु त्याचे नियोजन होत असताना वाढत नागरीकरण लक्षात घेताना गेल्या आठ महिन्यापूर्वी आपले जे कमिशनर आहेत त्यांनी आमचे पक्षनेते स्वत: होते, आमदार लक्ष्मणभाऊ त्याठिकाणी होते नागपूरला. आणि त्याठिकाणी मा. ना. गिरीशजी महाजन साहेब, जलसंपदा मंत्र्यांच्याकडे हा जो विषय आहे भामा आसखेड, आंद्र धरणामधून आपल्याला पाणी मिळवण्यासाठी त्यांना त्याठिकाणी विनंती केली. जलसंपदा मंत्र्यांनी आम्हाला त्याठिकाणी पाणी

उचलण्यासाठी तत्वत: मान्यता दिली. आणि त्या दिवसापासून ख-या अर्थाने हा जो की आंद्रा आणि भामा आसखेडमधून आपण जे काही पाणी याठिकाणी उचलणार आहे याठिकाणी ख-या अर्थाने सुरुवात झाली. वाढते नागरीकरण लक्षात न घेता याच पाण्यावरती आपण जर काम करीत राहिलो तर मला असं वाटत की आपण कितीही जरी ओरडलो तरी आपण नियोजन करण्यामध्ये अपयशी ठरलो तर त्याचा काही उपयोग होणार नाही. गेले वर्षभरापासून आम्ही महानगरपालिकेमध्ये आल्यापासून आम्ही या नियोजनासंदर्भात मोठया प्रमाणामध्ये पाठपुरावा मंत्री स्तरावरती किंवा शासन स्तरावरती केलेला आहे. आणि कमिशनरांनी सुध्दा त्या संदर्भात पाठपुरावा केलेला आहे. म्हणजे जर एक टीएमसी पाणी आपल्याला आंद्रा धरणामधून मिळाले तर ख-या अर्थाने आपल्याला रावेत बंधा-यावरती जो काही लोड येतो तो ख-या अर्थाने कमी होईल आणि ही पाण्याच्या संदर्भातली जी अनियमितता चाललेली आहे ती मला वाटते की कमी होईल. खर म्हणजे आपल्याला २४X७ च्या योजनेमध्ये याठिकाणी म्हणलात की आम्ही सेक्टर नंबर २३ मध्ये मागच्या चारपाच दिवसांपूर्वी आमच्या पक्षनेत्यांनी आणि महापौरांनी सर्व इंजिनिअरची सर्व डेप्यूटी, जेई, प्लंबर यांची याठिकाणी बैठक बोलाविली. आजही आम्ही सर्व नगरसेवक सेक्टर २३ ला स्काडाच्या माध्यमातून प्रणाली केली पाणी कसे सोडले जाते. टाकी कशी भरली जाते. या सर्वांची माहिती घेतली. आणि त्या वेळेला आमच्या लक्षात आले की हे जे याठिकाणी टाकीच्यावरती जाण्याचे पंपाचे प्रमाणे फेल्यूअर आहे ते सुध्दा येणा-या काळामध्ये आमच्या नगरसेवकांनी सांगितलेप्रमाणे ख-या अर्थाने त्याठिकाणी लाईटच्या माध्यमातून पंप फेल्यूअर होत असतील तर त्याठिकाणी जनरेटरची व्यवस्था सुध्दा आपण केली पाहिजे. हा सुध्दा या नियोजनामधला कमीपणा आहे असं मला वाटतं. ख-या अर्थाने मी याठिकाणी उल्लेख करेन की आज प्रत्येक नगरसेवक पाण्याच्या संदर्भामध्ये आणि पाणी हा सर्वांचा अतिशय महत्वाचा विषय असल्यामुळे पाणीपुरवठयाच्या संदर्भामध्ये सांगतो की, खाजगी कंपनीमध्ये काम करताना प्रत्येकाचा परफॉर्मन्स चेक केला जातो, त्याप्रमाणे याठिकाणी सुध्दा आपल्या प्रत्येक अधिका-याचा मेजर ऑफ परफॉर्मन्स जर का आयुक्तसाहेब आपण चेक करावा म्हणजे हे पाटया टाकण्याचे काम एकमेकांच्या वरती ढकलण्याचे काम करण्यापेक्षा जबाबदारीने जर का

या अधिका-यांनी त्याठिकाणी काम केले तर मला असं वाटत की प्लंबरवर विश्वास न ठेवता जेईवर देखील विश्वास न ठेवता एक्झीक्यूटीव्हने सुध्दा प्रत्येक स्थळापर्यंत कधी ना कधी तरी जाणे गरजेचे आहे. तर ख-या अर्थाने मी जर का मगाशी उल्लेख केला प्रभागामधल्या पाण्याचा पाईपलाईनचा कमीत कमी ज्या मोठया पाईपलाईन आहेत त्यांचा लेआऊट आणि त्यांचा कंट्रोलींग चार्ट आपल्या प्रत्येक प्रभागाचा या संदर्भामध्ये जर का मिळाला तर ते मला वाटत की ख-या अर्थाने सोयीचे होईल. आणि कुठल्या बाजूला किती पाणी जाते आणि कुठे चोरी होते. कुठे लिकेज होते त्या संदर्भामध्ये सुध्दा या ले-आऊटच्या माध्यमातून आपल्याला मदत करता येईल. कोणीही अधिकारी नवीन जरी आला तरी एकाच्या हातामध्ये मक्तेदारी न ठेवता नवनवीन याठिकाणी जे अधिकारी येतील त्या अधिका-यांनी त्या प्लॅनवरती बघुन त्याठिकाणी आपण पाण्याचे नियोजन करु शकता. असं मला याठिकाणी वाटते आणि या संदर्भामध्ये मी आयुक्त साहेब आपल्याला एक विनंती करेन की आपण सकाळी सेक्टर २३ मध्ये सांगितले की गेल्या १५ दिवसाचा आम्ही तो स्काडाचा चार्ट बघितला तर येणारे पाणी आहे ते कशा पध्दतीने येते. चारपाच तास फेल्यूअर झाल्यानंतर काय विस्कळीत होते आणि आपल्या शहराच्या पाणीपुरवठयावरती त्याचा कसा परिणाम होतो. या संदर्भात सुध्दा आम्ही त्याठिकाणी बघितलं. हे जे काही फेल्यूअरचे प्रमाण आहे ते कमी करण्यासाठी मगाशी आमच्या सदस्यांनी सांगितलं की धरणामधून पाणी आल्यानंतर बंधा-यावरती आमचा इंजिनिअर त्यांठिकाणी सात इंच खाली गेले का दहा इंच खाली गेले हे जर काही बघण्याची परिस्थिती असेल तर या संदर्भामध्ये सुध्दा आमच्या अधिका-यांनी त्याठिकाणी बघितले पाहिजे. वेळचेवेळी ते पाणी पाटबंधारे खात्याकडून आमच्या रावेत बंधा-यापर्यंत कशा पध्दतीने येते ते सुध्दा या अधिका-यांनी लक्ष दिले पाहिजे. आणि येणा-या काळामध्ये हा पाणीपुरवठयाचा जो अविस्कळीतपणा चालू झालेला आहे आणि हा अविस्कळीतपणा पाणीपुरवठयामध्ये मगाशी डोळस यांनी सांगितलेप्रमाणे आमच्या घरीही तीच परिस्थिती जवळपास सगळयाच नगरसेवकांकडे आहे. आणि कुठेतरी एखादया कॉलनीमध्ये किंवा एखादया नगरामध्ये ही अनियमितता नसून संपूर्ण शहरामध्ये अनियमिततेचा प्रकार याठिकाणी झालेला आहे गेल्या महीनाभरापासून तो त्वरीत याठिकाणी सुधारावा. आणि इंजिनिअरला विशेष करुन पाणीपुरवठयाच्या

इंजिनिअरला जे काही ते काम करतात ते काम त्यांनी चांगल्या पध्दतीने करावे. आपण याठिकाणी  नियमित कसा करता येईल या संदर्भात प्रत्येकाने काम करावे असं मला याठिकाणी सांगावस वाटत आणि महापौर साहेब मगाशी भाऊसाहेबांनी सांगितलं की याठिकाणी आपण जी काही सभा चालू केलेली आहे ही दोन तीन तासांपासून चाललेली आहे. प्रत्येकाची मानसिकता होईल, ती मानसिकता झाल्याच्यानंतर कार्यपत्रिकेच्या विषयाला आपण हात घालू मला वाटत की कार्यपत्रिकेच्या विषयापेक्षा पाण्याचा प्रश्न हा अतिशय महत्वाचा आहे आपल्या सगळयांच्यासाठी हा पाण्याचा प्रश्न असताना आपण कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता ख-या अर्थाने जनतेच्यासाठी आपण आहोत आणि म्हणून जनतेच्यासाठी ही सभा आहे तरी आपण ठराविक दिवस आयुक्तसाहेबांच्या टिमला देऊ यात. आजची सभा आपला पाणीपुरवठा नियमित होईपर्यंत कार्यकाल ठेवून ही सभा तहकूब करावी. अशी मी याठिकाणी महापौर साहेब विनंती करतो. तसेच आपण पाण्यावर सर्व नगरसेवकांना बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले धन्यवाद.

**मा.सिमा सावळे -**  मा. महापौर साहेब, तहकूबी सूचनेस अनुमोदन देते.
**मा.महापौर-**  मा.प्रमोद कुटे आपण बोला.
**मा. प्रमोद कुटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. गेल्या चार तासापासून विस्कळीत पाणीपुरवठयावर चर्चा चालू आहे. सर्व प्रथम मी पंकज भालेकर, मयूर कलाटे यांचे अभिनंदन करु इच्छितो त्यांनी आज हा पश्न विचारला आहे. महापौरांनी तो एक्सेप्ट केला त्याबद्दल त्यांचे देखील अभिनंदन. आज हा शहरामधला जटील प्रश्न आहे हे माझ्या आता चांगल लक्षात आल आहे. कारण की ज्यावेळी शहरामध्ये सगळीकडे पाणीपुरवठा सुरळीत होता. माझा प्रभाग हा असा होता की अक्षरशः आमच्या एका सदस्याने काळे फासण्याचा देखील प्रयोग केलेला आहे. आम्ही आयुक्तांना वारंवार भेटून विनंती करुन आम्ही निदर्शनास आणून दिले की आमच्याकडे पाण्याचा खूप मोठा प्राब्लेम आहे. मा. आयुक्तांनी चांगल्याप्रकारे त्याच्यामध्ये लक्ष घालून आमच्या भागाचा पाणीपुरवठा सुरळीत केला आहे. खरोखरच पहिल्यापेक्षा खूप चांगल्या प्रकारे पाणीपुरवठा सुरळीत केला आहे. त्यांनी तेथे टेक्निकल चेंजेस केले, सगळे कनेक्शन्स बदलले त्याच्यामुळे जे काही लिकेजेस होते त्याच्यामध्ये सुध्दा बदल

झालेला आहे. मी मा. आयुक्तसाहेबांचे आभार व्यक्त करतो. तुम्ही आमच्या परिसरामध्ये २४X७ च्या माध्यमातून काम करीत असताना माझ्या प्रभागातला पाणीपुरवठा सुरळीत केला. आज अत्यंत वाईट वाटते. आज एवढया मोठया प्रमाणामध्ये शहरामध्ये सर्व नगरसेवक पाणीपुरवठयासाठी आज आरडाओरड करीत आहेत. पाणी ही तशी आपली मुलभूत गरज आहे. पाण्याचा जिथून आपल्याला सप्लाय होतो, आज थोडंस वाईट सुध्दा वाटत आहे की आमचे खासदार साहेब ते तिथे एकटे तिथे लोकांचा सहभाग घेऊन पवना डॅममधून गाळ काढण्याचे काम करतात. त्याठिकाणी महापालिकेची पण काही तरी जबाबदारी आहे. आज आपण तिकडून पाच साडेपाच टीएमसी पाणी उचलतो. तो रावेतचा बंधारा असेल किंवा पवना डॅम असेल तो मेंटेन करण्याची जबाबदारी आपली आहे. तर महापालिका आयुक्तांना माझी विनंती आहे की जस तुम्ही माझ्या प्रभागामध्ये लक्ष घातले आणि तिथला पाणीपुरवठा सुरळीत केला. तसं शहराच्या पाणीपुरवठयाबद्दल तुम्ही एक डीपीआर तयार करा. एक पूर्वनियोजित एक पुर्ण प्लॅन तयार करा. कशा पध्दतीने पाणीपुरवठा सुरळीत करता येईल. त्याला काय करावे लागेल, टेक्नीकल काय चेंजेस करावे लागतील. त्याचे प्रेझेंटेशन या शहराचे नगरसेवक आहेत त्यांना दया. आम्ही काय येथे ओरडायच आणि जायच उदया पेपरला आमचे नांव कुठेतरी येते. त्यातच आम्ही समाधान मानायचं असं होता कामा नये. आयुक्तसाहेब आपण एक जबाबदार अधिकारी आहात. मला पूर्ण तुमच्या कॅपॅसिटीवर कोणाला असो वा नसो, तुमच्या कॅपॅसिटीवर चांगला विश्वास आहे. तुम्ही चांगला संवाद साधलेला आहे पाणीपुरवठासंदर्भात. तुम्ही नागरपूरला जी कामे केलेली असतील त्याबाबत आमच्याकडे शेअर केलेले आहे. तुम्ही एक चांगले कर्तव्यदक्ष अधिकारी आहात. शहराच्या पाणीपुरवठयासाठी तुम्ही एक चांगला डीपीआर तयार करा. आपण मेट्रोच्या कामासाठी डीपीआर तयार करतो, शहराच्या विकास कामासाठी डीपीआर तयार करतो. जस आपल्याला शरीराला रक्त सप्लाय करणा-या वेव्हज असतात. जर त्या वेव्हज खराब झाल्या तर शरीराचे इतर भाग काही करुन सुशोभित केले तर किंवा चांगले केले तरी त्याचा काही एक उपयोग होणार नाही. आपली पाणीपुरवठा सिस्टीम जी आहे ती आपल्या रक्तवाहिन्या आहेत. त्या रक्तवाहिन्यांचा आपल्याकडे डीपीआर असणे गरजेचे आहे. त्याला कुठे काय होतेय याकरीता हे करणे गरजेचे आहे. आपण

या गोष्टीमध्ये लक्ष घालताल एवढीच मी आपल्याकडे अपेक्षा व्यक्त करतो. आणि गेल्या दिड वर्षातला अनुभव जर सांगायचा झाला तर आज अत्यंत आनंद होतोय की पहिल्यांदा असं घडलय की आज सर्व नगरसेवक ते कुठल्याही पक्षाचे नसताना लोकप्रतिनिधी आहेत. लोकांनी आपल्याला या प्रशासनाला जाब विचारणेसाठी निवडून देऊन पाठविलेले आहे. त्या दृष्टीकोनातून काम करतात. हे पाहून मला अत्यंत आनंद होतोय. आणि प्रत्येक वेळेस प्रत्येक सदस्याने अशाच पध्दतीने प्रशासनावरती अंकुश ठेवण्यासाठी आपल्याला निवडून दिलेले आहे. असेच वागावे कुठल्याही पक्षाची शिवसेनाचा नाही, राष्ट्रवादीचा नाही, भाजपाचा नाही. आपण बावीस लाख लोकांचे लोकप्रतिनिधी आहोत. अशा प्रकारचे आपण सर्वांनी वागले पाहिजे. अशा प्रकारचा आदर्श समाजापुढे ठेवला पाहिजे. मला जी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो, जयहिंद जयमहाराष्ट्र.

**मा. खानोलकर प्रज्ञा** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज आम्ही स्टँडीगचे मेंबर आहेत. आम्हाला दर आठवडयाला हा प्रश्न जो आहे तो आम्ही मांडतो. आमचे १५ जणांचे तुम्ही तोंड दाबू शकता. पण आज हा जो प्रश्न आहे तो आख्या सभागृहासमोर आलेला आहे. तर तुम्ही आता किती जणांची तोंडे दाबणार हे अधिका-यांनी खुलासा करावा याठिकाणी. सांगायचं झालं तर मागच्या वर्षी याठिकाणी मी एसटीपी प्लान्ट कँन्टोन्मेंट बोर्ड देहूरोड याच्याबद्दल बोलले होते. आज त्यांच्याकडे एसटीपी प्लान्टच नाहीय. त्यांचे जे घाण पाणी आहे ते आज तसंच्या तस रावेत नदीमध्ये सोडत आहेत. ते पाणी आज आख्ख  पिंपरी चिंचवड शहर पितं. तर मला आयुक्तांना असं विचरायचं आहे की हा जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यांनी एसटीपी प्लान्ट इन्स्टॉल केला पाहिजे. तो प्लान्ट फक्त कागदोपत्री आहे, त्याचा कोणताही फालोअप घेतलेला नाही.  त्याचा फालोअप कधी घेणार याचा ही खुलासा आज करावा. आज अक्षरश: लाजेची गोष्ट अशी आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्द ही देहुरोडपासून सुरुवात होते. आणि जेव्हा माणूस मुंबईहून येतो. तो देहुरोडमध्ये प्रवेश करतो. ते जे गहाण पाणी आहे त्याला सगळयात आदि दर्शन होतं. ही अत्यंत लाजेची बाब आहे. घाण पाण्याचा जो नाला आहे त्याच दर्शन होते. अजुन एक गोष्ट म्हणजे आज एवढं वर्ष पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्द ही देहुरोडपासून सुरुवात होतेय.

त्याचे साधं फलक ही लावले गेलेले नाहीय. तसे फलक लवकरात लवकर लावणेत यावे अशी मी विनंती करते. बाळासाहेब ओव्हाळ आहेत त्यांनी यापूर्वी टाक्यांचा प्रश्न मांडलेला आहे. ते प्रायोरिटी बेसिसने लवकरात लवकर करणेत यावे. महापौर कालचा आपला जो दौरा झाला. तो खूप उत्तम होता त्याच्याबद्दल आपले अभिनंदन करते. आणि हा जो पाण्याचा प्रश्न आहे तो लवकरात लवकर सोडविण्यात यावा अशी मी प्रशासनाला, आयुक्तांना आणि महापौरांना  विनंती करते, धन्यवाद.

**मा. राजेंद्र लांडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज जवळजवळ चार तासापासून हा प्रश्न चालला आहे. आताच मला दोन फोन आले. की पाणी अजुन आलेले नाही. पाणी येण्याचा टायमींगच पाहिलातर माझ्या प्रभागामध्ये सकाळी चार वाजलेपासून टप्पे चालू होतात. ते रात्री साडेबारा वाजेपर्यंत पाण्याचे टप्पे असतात. याच्यामध्ये एखादया जरी टप्प्यामध्ये कुठे काय प्रॉब्लेम आला तरी लगेच त्या टप्प्याला एकतर पाणी कमी येते. दिड ते दोन तासाचेच प्रत्येक टप्पे आहेत. परंतु एखादया टप्प्यामध्ये जरी टाकी भरली नाही तर खूप मोठा प्रॉब्लेम होतो. आणि त्या भागामध्ये पाणी पोहोचत नाही. पाणी न पोहोचण्यामुळे त्या भागातील नागरीकांचे म्हणणे असे असते की टँकर पाठवा. परंतु टँकर त्याठिकाणी जाऊच शकत नाही हे अधिका-यांना माहिती आहे मलाही माहिती आहे. पण याच्यावरती उपाययोजना करण्यासाठी अधिकारी ब-याच प्रमाणामध्ये माझ्या प्रभागामध्ये काम करीत आहेत. पण याठिकाणी अधिका-यांना जे सहकार्य लाभले पाहिजे. प्लंबर असतील, व्हॉल्हमन असतील, यांचे सहकार्य लाभत नाही. याच्यासाठी अधिका-यांनी पण सशक्त राहिले पाहिजे. कारण आजकाल जर आपण पाहिले तर अधिकारी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असतो की त्या भागामध्ये पाणी पोहोचले पाहिजे. पण तिथे खाली व्हॉल्हमेन असेल त्याच्यावरती ते सगळं नेटवर्क अवंलबून असते. जेव्हा त्या व्हॉव्हमेनच्या मनामध्ये येईल की नाही बाबा एवढ पाणी त्या भागामध्ये गेले पाहिजे. आज परवा दिवशीच मी त्याठिकाणी पवार साहेबांना बोलाविले आणि विचारलं की पवार साहेब आता सव्वातीन मीटर जर टाकीची लेव्हल आहेतर साधारणतः याच्यामध्ये किती पाणी आहे. तर पवारसाहेबांनी सांगितले की १६ लाख लिटर पाणी त्या टाकीमध्ये आहे. त्या भागामध्ये पाणी पोहोचत नाही त्या टाकीवरुन. ती वस्ती आहे साधारणतः २०० घरांची. २००

घरांना जर १६ लाख लिटर पाणी पोहोचत नसेल तर याच्यामध्ये शोकांतिका काय आहे. कारण १६ लाख लिटर पाणी म्हणजे साधारणतः दहा हजार लिटरचे १६० टँकर होतात. १६० टँकर जर त्या वस्तीमध्ये सोडले तर मला वाटते की निम्मी वस्ती वाहून जाईल. तरीपण ते पाणी तिथे येत नाही. पाणी नेमके मुरतय कुठं. यासाठी मी त्यांना सांगितल की याची पाहणी करुन त्याठिकाणी व्यवस्थित पाणीपुरवठा झाला पाहिजे. मग याला जबाबदार त्याठिकाणचे व्हालमेन हेच असतात. मला म्हणायचय की प्रत्येक ठिकाणी आपण जातो आणि पाहतो की प्रत्येक नागरीक म्हणतो की आमच्याकडे पाणी आले नाही. आपण बोलतो सकाळी सहाला पाणी सोडायचे, नाही बाबा त्यावेळेस लेव्हल नाहीय. आठला सोडणार. आठला नाही झाले थोडी लेव्हल कमी आहे. म्हणजे माणसाने आख्खा दिवस पाण्यामध्ये घालवायचा. आज प्रत्येक माणूस हा कामगार वर्ग आहे आमच्या भागातला. त्याने काम करायच का पाणी भरायच हेच कळत नाही. महापौर साहेब, आयुक्तसाहेब हे जे प्रशासकीय अधिकारी आहेत. यांना व्यवस्थित सर्व सुचना करुन प्रभागा मधील पाणीपुरवठा सुरळीत करावा. ही मी आपणांस विनंती करतो आणि तुम्हीही त्याना सांगून पाठपुरावा करावा, धन्यवाद.

**मा. आशा शेंडगे-धायगुडे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर महापौर साहेब पाणीपुरवठा हा महत्वाचा प्रश्न आहे. निश्चित आमच्या सगळयांची जी काही अवस्था आहे तीच तुमची आहे त्यापेक्षा फार काही वेगळी नाही याची आम्हाला खात्री आहे. आज सभागृहामध्ये चर्चेला विषय आल्यानंतर अनेक जणांनी विषय काढले की आम्हाला दादांचे नाव घ्यायचे नाही. आम्हाला देवेंद्र फडणवीसांच नाव घ्यायच नाही, आम्हांला मोदींबद्दल बोलायचे नाही, आम्हाला भाजपाबद्दल बोलायचे नाही, आणि बोलता बोलता सगळयांनी मात्र सगळे नेते कसे भारी होते किंवा कसे तुम्ही वाईट आहात असं सांगण्याचा सुध्दा प्रयत्न या सभागृहामध्ये पुरेपुर झाला आहे. फक्त म्हणायच असत की मला याच्याबद्दल बोलायचं नाही, मला त्याच्याबद्दल बोलायचं नाही. आम्ही राजकीय स्टंट करणार नाहीत आम्ही पक्षीय राजकारण करणार नाहीत. आम्हाला फक्त नागरीकांच्या मूलभूत गरजांवर चर्चा करायची आहे. असं म्हणायच एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला मात्र सगळ बोलून घ्यायच. तोंडसुख घ्यायच आणि पुन्हा एकदा पाण्याचा प्रश्न कसा चव्हाटयावर आणायचा याचा सगळेजण प्रयत्न करतात. परंतु

ख-या अर्थाने शहरासाठी कोण काय बोललय याच्यापेक्षा आपल्याला निश्चितपणे महापौर साहेब तुम्ही शहराचे आहात आम्ही सुध्दा या सभागृहामध्ये निवडून आलो आहोत. काम करतो म्हणून निवडून येतो अस याठिकाणी वाटतं आणि जर का आम्ही या मूलभूत गोष्टी नागरीकांना देऊ शकलो नाहीत. पाणी, रस्ता, ड्रेनेज लाईन आणि दिवाबत्ती. अशा चार सुविधा नागरीकांना दिल्या नाहीत तर नागरीकांना बोलत करु नये अशीच भावना याठिकाणी आम्हाला वाटत. ख-या अर्थाने ज्यावेळेला आपण इतक्या दिवस पाणी, पाणी आणि पाणी एकच चर्चा आपल्या शहरामध्ये रोज उठून पेपर उघडला की त्यामध्ये सुध्दा आज थेरगावमध्ये पाणी नाही, उदया मोशीमध्ये पाणी नाही, तीस-या दिवशी  भोसरीमध्ये पाणी नाही चौथ्या दिवशी पिंपरी चिंचवड शहरात पाणी नाही. सन्मा. महापौर साहेब माझा दापोडी, फुगेवाडी, कासारवाडी प्रभाग आहे. म्हणजे पुन्हा एकदा टेलएंड आहे. पूर्वी पिंपरी चिंचवडमध्ये येण्यापूर्वी दापोडी हा भाग पुणे महापालिकेमध्ये होता. त्यावेळेस सुध्दा हा भाग टेल आहे म्हणून कायम आमच्या दापोडीवरती अन्याय. कधीच आमच्या नागरीकांना नीट पाणी मिळत नाही. आणि आता पिंपरी चिंचवड शहरामध्ये हा भाग टेलएंड आहे. त्याठिकाणी पाणी चांगल्या प्रकारे मिळत नाही. पाणी हा रोजचा विषय आहे साहेब. आज पेपरला बातमी वाचली म्हणून सगळं शहर बोलतयं किंवा आपण पाणी प्रश्नावरती  जागरुक आहोत.  परंतु माझ्या दापोडीची अवस्था जवळपास बाराही महिने तशीच असते. दापोडीमध्ये एकच टाकी आहे त्यामुळे तुम्हाला विश्वास बसणार नाही. माझ्या वॉर्डामध्ये सकाळीच पाणी असले पाहिजे कारण स्त्रियांची घरातील कामं, आंघोळया पांघोळया असतील, कपडे धुणे असतील भांडी घासणे असतील, घर आवरण या सर्व नैसर्गिक लागणा-या बाबी आहेत यासाठी पाण्याची सकाळची गरज असते. परंतु महापौर तुम्हाला विश्वास बसणार नाही. इतक्या वर्षामध्ये सुध्दा दापोडीमध्ये सकाळी साडेपाच, साडेसहा, साडेसात, साडेआठ, साडेदहा, साडेबारा, एक, तीन वाजेपर्यंत पाण्याचे सत्र चालू असते. म्हणजे तीन वाजता ही काय पाणी भरण्याची वेळ आहे का तुम्ही मला सांगा. जर त्याठिकाणी महिला भगिनी कामाला जात असेल तर तिने पाणी कसं भरायचं. साहेब, आम्ही काहीच करु शकत नाहीय. कारण तुमचा प्रशासनावरती अंकुश नाही असं याठिकाणी खेदाने म्हणाव लागतं. तुम्हाला ही माहिती आहे की आजपर्यंत आम्ही तुम्हाला कधीच पर्सनल फोन

केलेला नाही. अनेक प्रश्न आहेत ते आम्ही आमच्या कुवतीने सोडवितो. परंतु मागच्या आठवडयामध्ये आम्ही तुम्हाला वैतागून फोन केला मेसेज टाकला. तुम्हाला माझ्या इथं पाणी वेळेत दयावेच लागेल. तीन दिवस झाले दापोडीमध्ये पाणी पुरवठा झालेलाच नाही. नागरीकांनी आमच्या घरी यायचं हंडा मोर्चा आणायचा आणि मग आम्ही जाग व्हायचं का. आम्ही त्यांना फार काही देत नाही. मूलभूत गरजाच देतो व ते देणं आमच कर्तव्य आहे. माझ्या दापोडीसाठी तुम्ही काय निर्णय घेणार आहात. माझ्या वॉर्डातील महिला सकाळी आठला कामाला जात असतील आणि सायंकाळी सहाला येत असतील तर तीनं सकाळी पोराबाळांना सांगायचं की बाळा दुपारी पाणी भर. तर आणि तरच या घरातल पाणी भरल जातं अन्यथा पाणी भरु शकत नाही. फ्लॅट सिस्टीम असेल, बिल्डींग असेलतर टाकी भरली जाईल परंतु बैठी घरामधल्या लोकांनी काय करायचं. हा काही आजचा विषय नाहीय महानगरपालिका झाल्यापासून इतक्या वर्षात दापोडीच्या प्रश्नावरती कधीही कोणाकडूनही उत्तर मिळालेले नाही काम का झालेल नाही ही अत्यंत शोकांतिका आहे. आता कोणाला पक्षाचे राजकारण सांगायचे सांगा. इतक्या वर्षे आपण काय केले दापोडीच्या बाबतीमध्ये आपण सांगा. का तेथील पाणीपुरवठा सुधारणा केल्या नाहीत. साहेब, आपण दापोडीबाबत काय निर्णय घेणार आहात. माझ्या दापोडी भागामध्ये एक तर सकाळी वेळेत पाणी दया किंवा संध्याकाळी वेळेत पाणी दया. दिवसभर पाणी भरत बसायला आमच्या बायका रिकाम्या नाहीत. आमच्या महीला रिकाम्या नाहीत त्यांना सुध्दा त्यांच्या जबाबदा-या आहेत, त्यांच्या कुटूंबासाठी कामे करण्याची गरज आहे. त्यांना पाणी भरणेसाठी ते घरी बसू शकत नाहीत. कधी दुपारी बारा वाजता पाणी सुटते तर कधी दुपारी दोन वाजता वाजता पाणी सुटते. तिथून पुढे त्या महिलेला घरातील भांडी धुवायची असतील, कपडे धुवायची असतील तर तिने काय काम करायचं दिवसभरामध्ये. सन्मा. महापौरसाहेब, आयुक्तसाहेब याठिकाणी तुम्हाला विनंती राहील की दापोडीच्या बाबतीमध्ये आपण वेगळा निर्णय घेतला पाहिजे. टेलएंड हे उत्तर यापुढे आम्ही ऐकणार नाहीत. त्याचबरोबर आज ख-या अर्थाने पाणीप्रश्नावर बोलत असताना अनेकांनी आपआपली मते मांडली. मी यापुर्वी अनेकवेळा या सभेमध्ये सांगीतल आहे की पाणीपुरवठयातील अधिकारी तुम्ही सहज चेंज करता एक्झिक्युटीव्ह हे काढले, ते टाकले, ते काढले हे टाकले, जे.ई. बदलले, परवा तुम्ही

आमचा जे.ई. बदलला. पुर्वी आमच्याकडे देवकर नावाचा अधिकारी होता विश्वास बसणार नाही त्याच्या नावाची लोक पुजा करत होते. पाणीपुरवठयाची अडचणच नाही. देवकर चांगल्याप्रकारे टाईमींगला पाणी सोडायचे म्हणून लोक त्यांचे कौतूक करतात. देवकर शासनाचे होते ते शासनसेवेत परत गेले. आता जे कोण अधिकारी असतील ते त्यांच्या परीने ते काम करण्याचा प्रयत्न करतात परंतु त्याठिकाणी आपल्याला रिझल्ट मिळत नाहीत. नगरसदस्यांनी सांगीतल की आमचा प्लंबर त्याठिकाणी तोच गॉडफादर. तुम्ही तांबे साहेबांना घेवून या किंवा दुसऱ्या अधिका-यांना घेवून या त्यांना सुध्दा त्याठिकाणी प्लंबर लागतो का नाही बघा. त्यावर व्हॉलमन पाणी सोडणारा लागतो का नाही ते बघा कारण तो पण सांगू शकतो पाणी कुठ आहे. का आपण याच्यावरती आपले युटीलीटी प्लॅन तयार करत नाहीत. कुठ जोडायच कुठ काय करायच हे आमच्या नगरसेवकांना सांगता येणार नाही एवढ तो व्हॉलमन परफेक्ट सांगतो. त्यातून ते कर्मचारी आपली डयुटी करुन घरी गेले असतीलतर आमच्या अधिका-यांना दुर्दैवाने त्यांना कॉल करावा लागतो. येतो का रे तेवढा वॉल बघायचा होता. अशी या शहराची अवस्था आहे. मला अस वाटत की पाणीप्रश्न हा अत्यंत महत्वाचा आणि गरजेचा प्रश्न आहे. बाकी गोष्टीत चालत पण पाणी एक दिवस दिल नाहीतरी नागरीक ओरडतात ते ओरडणारच, ते आमच्यावर चिडतात, ते आम्हांला वाईट बोलतात हरकत नाही ते होणारच कारण आम्ही त्यांच्याकडन मत घेतली त्यांना सांगीतल की तुमच्या सगळया मुलभूत गरजांसाठी आम्ही सक्षमपणे हाजर असणार आहोत आणि त्या पध्दतीने आम्ही देवू शकलो नाहीतर नागरीकांनीही आम्हांला जाब विचारलाच पाहीजे आणि त्यांना सुध्दा आम्ही उत्तर दिलच पाहीजे. परंतु हे करत असताना आमचेही काही लिमीटेशन्स आहेत त्या लिमिटेशनवर अधिकारी वर्ग म्हणून तुम्ही वर्कआऊट केल पाहीजे. किती महीने झाले आज श्रावण महीना गेला, ताई उदया श्रावण सोमवार आहे, पाणी सुटेलनां अशी आमची महीला विचारते, ताई पाणी सोडानाहो, अशी म्हणते. आख्खा श्रावण महीना गेला. आम्ही म्हणणार नवरात्रमध्ये शंभर टक्के पाणी देणार, नवरात्रीमध्ये तुम्हांला अनेक मॅसेज केले आम्हांला डोईजड झाल. रोज आम्ही लोकांना खोट बालतो की काय अशी आम्हांला आमची शंका येते. आम्ही खोट बोलत नाही आम्ही आमच्या अधिका-यांच ऐकूण ते पुढे फॉरवर्ड करतो. आता साहेब, नवरात्र सुध्दा

संपली आहे. पुन्हा पंधरा दिवसावर दिवाळी आली आहे. माझी विनंती आहे की काहीही केलतरी दिवाळीच्या आत आपली पहीली आंघोळ जी आहे, दिवाळी सुरु होते त्या काळाततरी नागरीकांना आपण पाणी देणं लागतो की नाही याचा विचार करणं गरजेच आहे. दस-याच्या आदल्यादिवशी तांबे साहेबांना फोन केला की आपली टाकी भरल का हो, ते म्हणाले का हो ताई विचारता. सणासुदीला सुध्दा पाणी येते की नाही एवढी धास्ती नागरीकांनी घेतलेली आहे. तुमच एखाद टार्गेट असत की अपल्याला हे करायचच आहे तुमच हे टिमवर्क आहे हे टिमवर्क म्हणून तुम्ही जे काही करता त्याच्यावरती रिझल्ट मिळत नाहीत. तुम्ही करत नाहीत, तुम्ही सुस्तावलेला आहात, तुम्ही निवांत बसता अशाप्रकारचे आरोप कोणी केले असतीलतर ज्याचे त्याचे विचार त्यांच्याजवळच असतात त्याबद्दल माझ दुमत नाही. तुम्ही काम करतात परंतु त्या कामाला ख-या अर्थाने गती किंवा रिझल्ट ओरीएण्टेड काम ज्याला म्हणतो तुमच्या प्रयत्नाना यश येत नाही, मग यश येत नाही का आणू देत नाही याचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे. कालपर्यंत पाणी शहराला यायच तीतकच आजही येतं. जेवढया टाक्या होत्या तीतक्याच टाक्या आहेत. तुमची स्काडा यंत्रणा आहे मग आपली ही यंत्रणा नेमक काय करते. टाक्या किती भरतात हे तुमच्या अधिका-यांना ऑन टेबल दिसते तरी सुध्दा पाणीपुरवठा सुरळीत का होत नाही याच्यावर सुध्दा विचार केला पाहीजे. तुम्ही तुमच्या अधिका-यांना किमान पाणीपुरवठयाचे जे काही आठ प्रभाग आहेत त्याठिकाणी जे पाणीपुरवठयामध्ये काम करायला इच्छूक असतील त्यांना तिथच ठेवा. त्यांची हालवा हालव करण्यात मजा नाही. त्यांना तुम्ही हालवल की आमचा पाणीपुरवठा डिस्टर्ब होतो. मग शेवटी प्लंबर लोक येवून थांबतात त्यांच्या बदल्या नको त्यांच्यावर अवलंबून रहाव लागत. त्याच बरोबर टाकी भरायला आणि पाणी सोडायला जो काही कर्मचारी वर्ग लागतो त्याची सुध्दा आपण पाहणी करा. त्याठिकाणी रात्रपाळीला ठेकेदाराची माणस सात आणि आठ हजारावरती असतात. त्यांच मिनीमम वेजेस काय आहे हे मला माहित नाही पण त्या सात आणि आठ हजारावरती काम करणारे माणस रात्रीच्यावेळेस टाकीवर असतात. सात ते आठ हजारासाठी ते रात्रभर टाकीवरती जागतात. टाकी भरली की त्यांनी फोन करायचा त्यात तो ठेकदाराचा माणूस त्याला किती किमंत दयायची ते अधिका-यांना तुम्हांला माहिती आहे. त्यात

त्याला विचारायच किती मी. टाकी भरली. त्यांनी काम कराव पण रिझल्ट ओरीएण्टेड काम होणार असेलतर करावं. त्यामुळे तुम्हांला सांगीतल आहे की आमचे जे अधिकारी असतील ते त्याच ठिकाणी ठेवा. रात्रपाळीला सक्षम आपला महानगरपालिकेचा कर्मचारी, जबाबदार अधिकारी तेथे असणे गरजेचे आहे. ज्यावेळेला आम्ही सगळेजण या विषयावर चर्चा करतो त्या मुलभूत गरजांसाठी तुमची एक टिमवर्क, तुमची एक यंत्रणा तुमच एक प्लॅनिंग असण गरजेच आहे. भाऊसाहेब भोईर बोलताना म्हणाले की तुम्ही काय करता, तुमचा पण अजेंडा असला पाहीजे. आपण आता नुसती चर्चा करतो पाणी आहे का, पाणी आहे का, पाणी शहरात आहेच, अजीबात आम्ही कोणीच म्हणत नाहीत की शहरात पाणी येत नाही. आजपर्यंत खुप व्हल्गना केल्या गेल्या परंतु पाणी असताना पाणी दिल जात नाही. पाणी प्रॉपर सोडल जात नाही म्हणजेच काय साहेब, की फक्त नियोजनाचा अभाव आहे. ज्या दिवशी तुमच नियोजन परफेक्ट होईल तुमचे एक्सपर्ट अधिकारी सगळयाना विश्वासात घ्या, प्रामाणिकपणे सगळे काम करतात त्यांच्याकडुन वर्क आऊट घ्या निश्चितपणे चांगले नियोजन करुन या शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करु शकतात. साहेब, तुम्ही पाणीपुरवठयामधील अधिकारी, कर्मचारी, प्लंबर जे जे कोणी असतील त्यांचा तुमच्या अध्यक्षतेखाली पाणीपुरवठयावर एक मेळावा घ्या. त्यात आम्हांला कुणालाच बोलू नका आणि त्यांना विचारा की प्रश्न काय आहे. कालपर्यंत पाणी येत होत आज शहरातील पाणी का येत नाही. कोण चोरतय का, कोण नेहते का. हे पण तुम्ही विचारा. लाईट गेली पंपींग स्टेशनवरची मशीन बंद पडली या प्रश्नामुळे पाण्याचा उपसा झाला नाही आणि म्हणून पाणी आल नाही असं काही झाल असेलतर पंचवीस वर्ष आपण काय नियोजन केलं हे सुध्दा आपण सांगायच आहे. जर का पंचवीस वर्षापुर्वी कास्टींगची लाईन टाकली असेलतर ती पुढच्या दहा वर्षात बदलण ही प्रशासनाची जबाबदारी नाही का. त्यावेळेसच्या सत्ताधा-यांची कोणाची जबाबदारी नव्हती का. आज रोज उठून याठिकाणी पाणी नाही, त्याठिकाणी पाणी, त्याठिकाणी गळती झालेली आहे, तेथे लाईट बंद पडली त्यामुळ मशीन खराब झालेली आहे हे उत्तर आम्ही किती दिवस ऐकायच. तुमच नियोजन काय आहे. आम्ही जर सत्ताधारी म्हणून आता असोलतर आणि आमच्या मागे जर का तुम्ही शिव्या देत असालतर आम्ही पण ऐकूण घेणारे नाहीत. का पंचवीस वर्षात नियोजन

केल गेल नाही. आता सांगीतल त्या पाईपाला हात जरी लावलातरी ते पाईप तुटतात का इतक्या वर्षात तुमच नियोजन झाल नाही. बोलताना सोप असतं, देशाच्या पंतप्रधानाना आणि मुख्यमंऱ्यांना बोलणं इतकी सोपी गोष्ट नाही. शंभर टक्के याठिकाणी लोकशाही आहे आपल्या सभागृहातला हा तीसरा स्तंभ आहे. नागरीकांसाठी आपण सगळेजण आहोत परंतु शहरातील पाणीप्रश्न जटील आहे का तर हो नक्की आहे, महत्वाचा आहे का शंभर टक्के महत्वाचा आहे, नागरीकांना पाणी देण्याची आमची जबाबदारी आहे कातर ती सुध्दा आहे. परंतु त्यासाठी पक्षीय राजकारण करायच नाही म्हणायच, आणि पुन्हा बोलायचं. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की शहरातील पाणीपुरवठा आपण सुरळीत केलाच पाहीजे. नागरीकांची गरज आहे, लोकांना पाणी पाणी करण्याची वेळ आपल्यावरती आलीच नाही पाहीजे. तुम्हांला सांगीतल्याप्रमाणे पाणीपुरवठयातील अधिकारी कर्मचा-यांचा खरच तुम्ही मेळावा घ्या त्यांच्या अडचणी विचारा आणि शहरातील पाणीपुरवठा सुरळीतच झाला पाहीजे. यापुढे आपण सुध्दा या प्रश्नाची गय करायच काही कारण नाही. कारण माझा नागरीक फक्त पाणी मागतो साहेब ते त्याना दया. मग बिल्डींग बांधायची का, पुल करायचेत का, विकास करायचा का नाही हा नंतरचा दुय्यम भाग आहे. परंतु शहराला पाणी देणं ही नैतीक जबाबदारी आपल्या महानगरपालिकेची, आपल्या प्रशासनाची आणि आम्ही निवडून आलेल्या नगरसेवकांची देखील आहे आणि आपण ती पुर्ण करावी अशी तुमच्याकडन अपेक्षा व्यक्त करते. तुमच नियोजन जे आहे ते आम्हांला पुढच्या दोन दिवसामध्ये सांगावे, आजतर तुम्ही सांगतालच. परंतु एक परफेक्ट नियोजन तुम्ही आम्हांला दयाव अशी अपेक्षा याठिकाणी व्यक्त करते आणि मा. महापौर साहेब, याच्यावरती तुम्ही सुध्दा शंभर टक्के पाठपुरावा करावा. आता आम्हांला कंटाळा आला पाणी प्रश्नावर बोलण्याचा आणि ऐकण्याचा.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज याठिकाणी खर पाहिलं तर मी महापौरांचे अभिनंदन करतो. गेले चार साडेचार तास आपण पाणीपुरवठा प्रश्नावरती सर्व नगरसेवकांना अतिशय चांगल्या प्रकारची बोलण्याची संधी दिली. आयुक्त साहेब आपण कार्यक्षम आयुक्त आहात. पाणीपुरवठा आणि आरोग्य हे दोन विभाग जर सोडले तर संपूर्ण शहरामध्ये जी कामे चाललेली आहेत ते अतिशय

चांगल्या प्रकारचे काम तुम्ही करताय. त्याचप्रमाणे पाण्याच्याबाबतीत सुध्दा मला माहिती आहे. संबंधित मंत्री असतील, संबंधित अधिकारी असेल आपण मंत्रालयामध्ये जाऊन पाण्याचा प्रश्न असेल त्याचबरोबर आंद्राचा प्रश्न असेल या प्रश्नासाठी आपण वारंवार त्याचा पाठपुरावा करताय. परंतु पाणीपुरवठयाबाबतीत जर बोलायच झालं तर पाणीपुरवठयामध्ये जे अधिकारी आहेत त्यात काही अधिकारी चांगले आहेत काही अधिकारी कामचोर आहेत. त्यामध्ये काही अधिकारी आपल्याला माहिती देत नाहीत. आपली दिशाभूल करतात आज तुम्ही मला सांगा शहरामध्ये एप्रिल-मे च्या दरम्यान आपण ४८५ एमएलडी पाणी उचलत होतो. माझ्या माहितीप्रमाणे माझ्या वॉर्डामध्ये असेल किंवा ब-याच ठिकाणी याच्या पाठीमागच्या काळामध्ये प्रत्येक सोसायटीमध्ये दिवसाआड, दोन दिवसाआड टँकर मागविला जायचा परंतु एप्रिल-मे च्या दरम्यान एकही टँकर कोणाला विकत घ्यायला लागला नाही त्यामुळे चांगल्या पध्दतीच पाणीपुरवठा विभागाने काम केलेलं आहे. परंतु एप्रिल-मे पासून आजपर्यंत अशी किती लोकसंख्या वाढली त्याचाही आपण खुलासा करावा कारण तेव्हा आपण ४८५ एमएलडी पाणी उचलत होतो आणि आजही आपण ४८५ एमएलडी पाणी उचलत आहोत. याच्यामध्ये लोकसंख्या एवढया मोठया प्रमाणात वाढलेली नाही. परंतु तरी सुध्दा आपल्याला पाणी कमी का पडते याचा आपण विचार करण्याची गरज आहे. परवा दिवशी पाणीपुरवठा संदर्भात मिटींग झाली. त्याच्यामध्ये लडकत साहेब असतील, कांबळेसाहेब असतील त्या प्रत्येकानी अंग झाडण्याच काम केलं. रावेतमधून सेक्टर २३ मध्ये पाणी येते. कार्यकारी डेप्यूटीला फोन करतात., डेप्यूटी जेईला फोन करतात, जेई प्लंबरला फोन करतात. तो करतो व्हॉल्हमनला फोन. पण साहेब माझ्या माहितीप्रमाणे व्हॉल्हमन असेल, प्लंबर असेल. जेई असेल खाली कामे ती चांगली करतात. सर्वात महत्वाचे म्हणजे मगाशी ताईंनी पण सांगितलं की पंपींगस्टेशनला लाईटचा प्रॉब्लेम येतो. आता आपण सभागृह चालवितो. आता महानगरपालिकेमध्ये लाईट गेल्यानंतर एक मिनिटामध्ये जनरेटरमधुन परत लाईट येते कारण हे इमर्जन्सी समजतो, याच्यापेक्षा आपले पंपींग स्टेशन हे महत्वाचे आहे. त्यामुळे त्याठिकाणी जनरेटर आवश्यक आहे तो घेतला पाहीजे, बसवला पाहीजे. त्याचप्रमाणे आज सकाळी आपण माहिती घेतली पवना धरणामधून आपल्याला ठराविक टायमींगला पाणी सोडले जाते

त्यावेळेला  ऍक्च्युअली नदीतील पातळी कमी होते. परंतु पवना धरणाशी संबंधित अधिका-याला, इरिगेशनला आपण विनंती करावी की हे पाणी प्रत्येक तासाला आपण किती लीटर उचलतो तेवढया प्रमाणामध्ये लाईट तयार करुन मला वाटत की टप्प्याने पाणी सोडले जाते. पण साधारणतः आपण ज्या प्रमाणात पाणी बसेल तेवढयाच प्रमाणामध्ये पाणी सोडायला सांगा. त्याप्रमाणे आपल्याला पाणी व्यवस्थित सुरळीत होईल. तसं पाहिलं तर   ब-याच ठिकाणी बोलले जाते आयुक्तसाहेब आपणही होता की शेवटच्या टोकाला रावेतपासून शेवटच्या टोकाला पाणीपुरवठा कमी होतो. परंतु माझा तर वॉर्ड मध्येच आहे. तीकड नवी सांगवी आहे, दापोडी आहे. या भागापेक्षा माझा मध्यंतरी भाग आहे. आता परवा दिवशीच मी तुम्हाला सांगितलं. मी पाठीमागे दहा वर्षापूर्वी नगरसेवक असताना सर्व्हे नंबर १७ मध्ये प्राधिकरणाने दिलेले गाळे आहेत. त्याच्यामध्ये मला वाटते की ९८ साली एक पंचवीस लाख लीटरची टाकी बांधली त्याच्यानंतर २००० साली परत एक वीस लाखाची टाकी बांधली. परत २००४ साला पंचवीस लाख ली. ची टाकी बांधली. परंतु आयुक्त साहेब वॉर्डामध्ये एवढया तीन टाक्या आहेत मला वाटतं आमच्या प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष बाबासाहेब तापकीर यांनी १९९६-९७ च्या काळामध्ये आमच्या भागामध्ये फक्त सव्वा लाख लीटरची टाकी बांधली. माझ्या वॉर्डामध्ये तीन टाक्या बांधलेल्या असून त्या टाकीमधून एक ठिपका सुध्दा पाणी माझ्या वॉर्डात येत नाही ही शोकांतिका आहे. हे तांबे साहेबांना मी ब-याच वेळेला सांगितले. की तांबे साहेब याठिकाणी या तीन टाक्यांचे पाणी सगळया सोसायटयांना जातेय. मग ते वाकड असेल, पिंपळेनिलख असेल, किंवा पिंपळेसौदागर असेल या भागामध्ये एक वर्षे झाले आम्ही तांबेसाहेबांना सांगत आहोत. आयुक्तसाहेब आपल्यालाही मी सांगीतल आहे. या भागाच पाणी सकाळच सोसायटयांना दिले जातेय आणि माझा प्रभाग आहे तेथे सर्वसामान्य वर्ग आहे. छोटी छोटी घरे आहेत. त्या घरांना संध्याकाळचे पाणी दिले जातेय. आणि साधारणतः माझा ७५ टक्के वॉर्ड असा आहे तेथे बायपासने पाणीपुरवठा होतोय. आणि आजची परिस्थिती अशी आहे गेल्या चारपाच महिन्यांपासून पाण्याची टाकी भरत नाही, बायपासला प्रेशर येत नाही. पूर्वी बायपासला प्रेशर असल्यामुळे अडीच पावणेतीनला टाकी भरायची. आपण तीनला पाणी सोडायचो. तीनला पाणी सोडल्यानंतर ते नऊ वाजेपर्यंत पाणी रहायचे.  परंतु आजची

परिस्थिती अशी आहे की बायपासला प्रेशर कमी आहे. जी अडीचला भरणारी टाकी ती साधारणतः तीन साडेतीनला भरते. कधी चारला भरते. तर आपण बायपास केल्यानंतर आता सध्या माझ्या काही काही भागामध्ये सहातास पाणीपुरवठा होतो. आयुक्तसाहेब आपल्याला मी एक व्हिडीओ कॅसेट पाठविली आहे. काही काही भागामध्ये खाली जमिनीवर परात ठेवली जाते आणि त्या परातीत पाईपने पाणी सोडल जातं. ती परत नंतर हंडयात ओतायचे. आणि नंतर ते घरात न्यायचं. एवढी वाईट परिस्थिती आहे. तुम्हाला मी ब-याच वेळा सांगितल की तुम्ही याबाबतीत लक्ष दया. परंतु त्याचबरोबर अशीही आपली चर्चा झाली आहे. आमच्या टाक्या तर भरतच नाहीत. परंतु बायपासचा प्रेशर असल्यामुळे खूप पाणी कमी मिळते. आणि ब-याच ठिकाणी आता चर्चा झाली की बिगर परवाना नळ कनेक्शन आहेत. बिगर परवाना नळ कनेक्शन का घेतात. ज्यांना पाणी मिळत नाही ते बिगर परवाना नळ कनेक्शन घेतात. एक नळ कनेक्शन एका कुटूंबाला घेतले जाते. त्याच्यामध्ये पाणीच येत नाही त्याच्यामुळे दुसरे बिगरपरवाना घेतले जाते. सोसायटया असतील किंवा छोटी मोठी घरे असतील. त्यासाठी आपण थोडे लक्ष घालण्याची गरज आहे. त्याचबरोबर मी तांबे साहेबांनाही विनंती केली होती. माझ्या प्रभागातील जी दहा लाख लिटरीची टाकी आहे. त्याच्यावर बुस्टर बसवा परंतु मी इथं तांबे साहेबांचे नाव घेतले आहे. कारण ते चांगले काम करतात हे मला माहीत नाही. परंतु बरेचजण म्हटले की तांबे साहेबांच्या ऐवजी गोडबोले म्हटले तर मला माहीत नाही की चांगल्या कामामुळे त्यांना गोडबोले म्हणतात का वाईट कामा मुळे गोडबेले म्हणतात हे मला माहित नाही परंतु गेल्या काही दिवसांपूर्वी तांबे साहेबांनी मला शब्द दिला आहे. की मी बुस्टर बसवण्यासाठी प्रयत्न करतो. बसवणार का नाही हे मला माहीत नाही. परंतु आयुक्तसाहेब आता वॉर्डात फिरताना आम्हाला एवढी अडचण येते. जरी कोणत्याही कार्यक्रमाला आम्हाला बोलाविले तर कार्यक्रमाला सुध्दा आम्ही जात नाही. कारण गेल्यानंतर पहिला पाण्याचा प्रश्न. आणि तुम्हाला मी मगाशीच सांगितलं की माझा वॉर्ड हा ७० ते ७५ टक्के हा बायपासने पाणी येते त्यासाठी आपण जास्तीत जास्त लक्ष घालावे अशी याठिकाणी मी आपल्याला विनंती करतो. आणि आयुक्तसाहेब दुसरी मी एक आपल्याला सुचना करतो. की आपल्या भागामध्ये, संपुर्ण शहरामध्ये ज्या ज्या सोसायटया असतील तिथे लोकांनी

बोअरवेल मारलेल्या आहेत. बोअरवेलला पहिल्यांदा मोठया प्रमाणात पाणी असायचं. पण आता एकएक दोनदोन बोअर मारल्या तरी पाणी लागत नाही. तर माझ असं मत आहे की पावसाळयामध्ये पहिले पाणी जमिनीमध्ये मुरायचं आता तसं राहिलंच नाही. सर्व ठिकाणी बांधकामे झालेली आहेत. परंतु जे चेंबर आहे त्याठिकाणी आपण बोअरवेल मारण्याचा प्रयत्न करावा. की जेणेकरुन त्या बोअरवेलमध्ये पावसाचे पाणी शिरेल आणि जमिनीमध्ये पाणी राहील. म्हणजे भविष्यकाळामध्ये जरी आपल्याला धरणाचे पाणी कमी पडले जमिनीमध्ये पाणी मुरुन त्या बोअरवेलमधून त्याच्यामधून सुध्दा आपण पाणी वापरु शकता. सगळयाकडे ऍक्वा आहेत त्यामुळे ते पाणी सुध्दा वापरु शकताल. त्याचबरोबर आमच्या सोसायटयांना सुध्दा पाणी येत आहे त्या सोसायटयांना दोन दोन, तीन तीन टँकर विकत घ्यावे लागतात. मात्र सोसायटीला एकतीस हजाराचे बील आलेले आहे. उलटा मीटर फिरतो की काय मला माहित नाही. बोलण्यासारख भरपूर आहे परंतु भरपूर वेळ झालेला आहे त्यामुळे मी आवरतो घेतो परंतु याठिकाणी मगाशी बापूंनी सांगितल्याप्रमाणे की आपण सर्व पक्षाचे प्रमुख सर्वांना घेऊन एक मिटींग घ्यावी. आठ दिवसांमध्ये पाणीपुरवठ्याची मिटींग घेवून ते सुरळीत कसे होईल याकरीता मा.महापौरांनी, मा. आयुक्तांनी लक्ष दयावे अशी मी याठिकाणी विनंती करतो आणि या ठिकाणी थांबतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह महापौर साहेब, इलेक्शन होऊन बरोबर पावणदोन वर्षे झाले. यमुनानगरसारखा जो परिसर आहे. स्कीम नंबर सहा आणि स्कीम नंबर बारा. त्याचप्रमाणे माझ्या सेक्टर २२ चा जो परिसर आहे. या परिसरामध्ये वेळोवेळी पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्यामुळे अनेकावेळा मी तुमच्याकडे वारंवार तक्रारी देखील केलेल्या आहेत. आणि तांबेसाहेब यांच्याकडे देखील तक्रारी केलेल्या आहेत. महापौर साहेब अक्षरशः लोक त्रस्त आहेत त्या भागामध्ये. आज मी या विषयावर तुमच्याशी बोललो आणि तुम्ही मला शब्द दिला आहे की त्या भागामध्ये आपण लवकरात लवकर एक टाकी बांधून आपण त्या लोकांना रिलीव्ह करु. याबद्दल मी तुमचे हार्दीक आभार मानतो. महत्वाची गोष्ट म्हणजे अशी आहे की यमुनानगरला जोडून एक परिसर आहे तो म्हणजे आपणच बांधलेला प्रकल्प आहे तो म्हणजे जेएनएनयुआरएनचा. आणि त्या प्रकल्पामधून गेल्या सहा ते

सात महिन्यापासून पाणी येत नव्हते. संबंधित जे अधिकारी आहेत त्यांना मी या गोष्टीची कल्पना वेळोवेळी दिली आहे की त्या परिसरामध्ये पाणी येत नाही. ज्येष्ठ नागरीक आहेत, विदयार्थी वर्ग आहे. अक्षरशः सहा महिन्यांनंतर जेव्हा लडकत साहेबांनी व्हिजीट दिली. आणि कामास सुरुवात केली त्यावेळेस त्या पाईपमधून प्लॅस्टीकची पिशवी आणि दगड आढळले आणि त्यामुळे त्या परिसराला पाणी जात नव्हते. मी लडकत साहेबांना विनंती करतो की उर्वरित जेवढया बिल्डींग आहेत त्याच लवकरात लवकर आपण काम करुन घ्याव. त्याचप्रमाणे बौध्दनगर असेल मिलींदनगरचा परिसर असेल राजनगरचा जा परीसर आहे त्या परिसरामध्ये अक्षरशः महापौर साहेब आम्ही महानगरपालिकेचे काही अधिकारी वर्ग तिथे व्हिजीट करत होतो. व्हिजीट करत असताना एक म्हातारी अंगावर धावून आली. आणि आई बहिणीवर आम्हाला शिव्या दिल्या महापौर साहेब. आपले महापालिकेचे अधिकारीवर्ग साहेब अक्षरशः दोन पावले मागे गेले. त्यांनी स्वतःच्या डोळयांनी पाहिले की काय व्यथा आहेत महत्वाची गोष्ट म्हणजे अशी. दुसरी गोष्ट म्हणजे शेजारीच आपण सेक्टर २२ साठी टाकी काही दिवसापुवी उभी केली होती. ती टाकी असताना सुध्दा सेक्टर २२ ला पूर्णपणे पाणी जात नाही. निगडी यमुनानगर परिसरामध्ये जात नाही. तर लवकरात लवकर आपण तो प्रोजेक्ट चालू करावा. त्याच्यावर उपाय योजना कराव्यात अशी मी तुम्हाला विनंती करतो. खरतर पिंपरी चिंचवड शहरातील सर्वात पहिला प्लॅन २४x७ चा त्या परिसरामध्ये चालू करणेत आला. आणि ज्या वेळेस तो चालू करणेत आला त्यावेळेस मागच्या टर्ममधील नगरसेवक होते. आणि ज्यावेळेस तो बंद करणेत आला त्यावेळेस आम्हाला कोणत्याही प्रकारची सुचना किंवा कल्पना न देता तो पायलट प्लॅन बंद करणेत आला. आज त्याच परिसरातून एवढया तक्रारी आहेत की लिमीटच्या बाहेर मी सांगू शकत नाही. २४X७ चे लवकरात लवकर त्या परिसरामध्ये काम व्हावे. जुन्या पाईपलाईन चेंज कराव्यात. नवीन पाईपलाईन टाकणेत याव्यात. लवकरात लवकर स्वच्छ पाणी आणि चांगल्या पध्दतीचे पाणी नागरीकांना देण्यात यावे. महापौर साहेब खरतर आज लडकत साहेब असतील. आयुक्तसाहेब असतील सगळे गटनेते असतील. पाणीपुरवठा विभागास व्हिजीट दिली. त्या व्हिजीटमध्ये लडकतसाहेबांनी आम्हाला खूप चांगल्या पध्दतीने सांगितले. त्याच्यातून एक गोष्ट अशी म्हणजे सुचना येते की भिती

सुध्दा वाटतेय की पाटबंधारे खात्याने आपल्याला तीन दिवस तीन तीन तासाच्या गॅपने आपल्याला पाणी दिलं त्यामुळे संपूर्ण शहराला पाणीपुरवठा व्यवस्थित झालेला नाही त्याच्यामुळे तो विस्कळीत होता. अशी एक भिती आहे की पुण्यामध्ये आपण पाहिले की काही दिवसापूर्वी एक कालवा फुटला आणि हजारो लोकांच्या घरामध्ये पाणी गेले. त्याचप्रमाणे कालची एक न्यूज आली की कुठेतरी तो कालवा परत खचला. महापौर साहेब, रावेत या परिसराला माझा जवळचा संबंध आहे माझी मावशी त्या परिसरामध्ये राहते. वेळोवेळी लहानपणापासून आम्ही त्या बंधा-यावर गेलेलो आहे. ब्रिटीशांनी बांधलेला तो बंधारा आहे. त्या बंधा-यावरुन एकेकाळी बैलगाडया जात होत्या. बस सुध्दा जात होती टेम्पो सुध्दा जात होते. टू व्हीलर सुध्दा जात होती. त्या बंधा-याची अक्षरशः तुम्ही पाहाणी करा खालून अक्षरशः लोखंड बाहेर आलेले दिसल. एवढी बेकार अवस्था झालेली आहे. तो जर का फुटला तर आपल्याला जर का तीन तीन तासांच्या गॅपने पाणी आले आणि त्याच्यानंतर पूर्ण शहरातला पाणीपुरवठा विस्कळीत झाला आणि तो जर का अचानाक फुटला. तर मला नाही वाटत आपल्या पिंपरी चिंचवड शहराला पाणी नसल्यामुळे खूप मोठी मनुष्यबळी होवु शकते. महापौर साहेब, आपण सगळे जण याठिकाणी बोलत असताना एक शब्द नक्की बोललो. कोणत्याही पध्दतीचे पक्षीय राजकारण नको. मी मान्य करतो हे पक्षीय राजकारण नाही  बरोबर. पण आज एक गोष्ट तर नक्की सांगतो की भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. मीत्र पक्ष म्हणून शिवसेना त्यांच्या बरोबर आहे. आज तुम्ही लोकांनी जर का त्याचा फालोअप घेतला. पत्रव्यवहार व्यवस्थितपणे केला. तर त्याचा कुठेतरी आपल्याला फायदा होईल. आणि ते काम आपण कुठेतरी लवकरात लवकर मार्गी लावू शकतो. आयुक्तसाहेबांनी सांगितले सकाळी आमचं बोलण झालं. राहुलदादांनी पण सांगितले. परंतु याची वाट न पाहता सर्वांनी मिळून त्याच्यासाठी लवकरात लवकर काम करणे गरजेचे आहे. महापौरसाहेब अजुन एक गोष्ट तुम्हाला सांगतो आपल्याला लिमीटेड पाणी पाटबंधारे खाते देते. शहराचे जर का तुम्ही वाढते क्षेत्र पाहिले तर हळूहळू लोकसंख्या वाढत चालली आहे. लोकांचे लोंढे वाढत चालले आहेत. बांधकामे वाढत चालली आहेत आणि त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे प्रोजेक्ट सुध्दा लोकहितासाठी आणि जनहितासाठी बांधत चाललेलो आहोत. त्यांना पण आपल्याला पाणी दयायचे आहे. अजुन एक महत्वाची गोष्ट म्हणजे

अशी की याच सभागृहामध्ये आपण काही दिवसांपूर्वी एक ठराव नोंदविला होता. इतरही काही गावे आपल्या शहरामध्ये समाविष्ट होणार आहेत त्याचा आपण विचार केला आहे का. आपल्यालाच पाणी नाहीय आज महापौरसाहेब. समाविष्ट होणा-या गावांचा आपल्याला प्रामुख्याने विचार करावा लागेल. राज्य शासनाने किंवा केंद्रशासनाने आपल्याला जर का मान्यता दिली, ती गाव तुम्ही समाविष्ट केलीतर सगळयात मोठा गंभीर प्रश्न आपल्यासमोर उभा राहणार आहे. महापौरसाहेब माझ्या मते रावेत बंधा-यापासून भोंडवे लॉनपर्यंत त्या बंधा-यातन सगळा व्यवस्थितपणे गाळ काढला पाहिजे. गेली कित्येक वर्षे त्या बंधा-यातून गाळ आपण काढलेला नाहीय. वरती मोठीमोठी गावे आहेत त्या गावांचा आख्खा गाळ, गणपती विसर्जनाच्या घाटातला गाळ तो आख्खा गाळ येऊन तिथे थांबलेला आहे. आणि तुम्ही त्याचीच जर का दुसरी बाजू बघितली. कमीत कमी पंधरा ते वीस फूट खाली खोल आहे. त्याचीच जर का पुढची पाण्याची बाजू बघितलीतर अक्षरशः तुम्ही तिथे पाच आणि दहा फुटावर उभे रहाल. तरी नक्कीच तो गाळ जर का व्यवस्थितपणे साफ केला व्यवस्थितपणे जर का ते काम केले. त्या परिसरामध्ये मोठा पाण्याचा साठा आपल्यासाठी उपलब्ध होऊ शकतो आणि आपण व्यवस्थितपणे पाणीपुरवठा देऊ शकतो. गेली कित्येक वर्षे आपण पिंपरी चिंचवड शहराला ठरलेले पाणी पाटबंधारे विभागाकडून मागत आहोत. महापौरसाहेब आपण तो कोठा वाढविला पाहिजे. १०० टक्के वाढविला पाहिजे आणि शहरातील नागरीकांना चांगल्या पध्दतीचे पाणी दिले पाहिजे. अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो. धन्यवाद, जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा.शैलजा मोरे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी सगळयांनी आज पाण्याचा प्रश्न मांडलेला आहे तो माझ्या प्रभागात पण आहे. आणि खूप जटील प्रश्न आहे मला फक्त एकच म्हणायचे आहे की जे व्हॉल्हमेन आहेत ते सगळे बदला. महापालिकेचे जे लडकत साहेब आहेत बाकी इतर डेप्युटी आहेत, जे.ई आहेत त्यांना सांगीतल की त्या व्हॉलमेनचे आम्हांला नंबर दया आणि ते कोणकोणत्या दिवशी सोडतात ते पाण्याचा आम्हांला सांगा. आम्ही काही काळ फासणा-यापैकी नाहीत. मागे आयुक्तांना मी सांगितलं होते की आमच्याकडे सुध्दा मेन आणि मसल पॉवर दोन्ही आहेत पण आम्ही तसं करणार नाहीत आणि आम्ही त्या विचाराचे

नाहीत. बरोबर आहे हर्डीकरजी आपल्याशी मी बोलले होते या विषयावर. पण आम्हांला त्यांचे नंबर दया म्हणजे आमचा कोणताही प्रतिनिधी जावुन त्यांच्यावर वॉच ठेवेल. या दोन महिन्यामध्ये आमच्याकडे पाण्याची कमतरता झाली आहे. आम्ही सांगितलं की हया हया ठिकाणी पाणी हया हया वेळेला येते. जाऊन तुम्ही चेक करा. तिथे आमचे प्रतिनिधी गेले आणि मंगलामॅडम पण गेल्या. त्याचदिवशी पाणी इतके आले की खालीपर्यंत पाणी गेले. वरच्या माळयावर पण पाणी चढले. असं कस होते. आता आपण सगळया लोकांना सांगितले. आपण शाळेमध्ये व्हिजीट देता ती सांगून देता. ती शाळेची व्हिजीट आता तुम्ही काही दिवस थांबवा. आपण शाळांना व्हिजीट देता हे खूप महत्वाचे आहे. तुम्ही अचानक पणे तिथे व्हिजीट दया. आयुक्तसाहेब आपण अचानकपणे प्रभागांमध्ये व्हिजीट दया. आणि त्या त्या पार्टच्या लोकांना घेऊन जा म्हणजे त्यांना कळेल. मी प्रशासनाला नुसता दोष देणार नाही. तुम्ही आणि आम्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहोत. मी कायम तुम्हाला सांगत असते. आष्टीकर असतील कोणी असतील मी सगळयांना सांगते की आपण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहोत. पण याच्याकडे गांर्भीयाने लक्ष देणे गरजेचे आहे. ज्या घरामध्ये करंगळी एवढ पाणी येत होते त्या घरामध्ये अक्षरशः पाणी वरती आलेले आहे. सगळयांनी सहकार्याने तुम्ही अधिकारी, पदाधिकारी, महापौर, आयुक्त खरच याची दखल घ्या. हर्डीकरजी मी आपल्याला सांगितले होते की २४X७ चे काम पाण्याशी संलग्न आहे. जे २४X७ आहे त्यांचे काम अजिबात चांगले नाही. जी मीटरची पध्दत आहे. काही काही ठिकाणी स्लम ऐरीयापण आहे, ज्यांच मीटर आतमध्ये आहे त्यांच काही नाही त्यांनी म्हणले होते की आम्ही फक्त दारापर्यंत मीटर देणार. मग मीटर परत चोरीला जाणार. आकुर्डी गंगानगर, पंचतारानगर हा गरीब असा ऐरीया आहे. ते मीटर परत कसे काय बसवू शकणार. त्याच्यामुळे पहिले मीटर ते तुम्ही दयायला पाहिजे. जे बंगलेवाले आहेत, प्राधिकरणात जिथे आम्ही राहतो तीथे ठिक आहे बंगल्याच्या आतमध्ये दिलतर त्याची आम्ही जबाबदारी घेवू. दुसरी गोष्ट त्यांचे काम इतके निकृष्ट दर्जाचे आहे की काही ठिकाणी अक्षरशः घाण पाणी आलेले आहे. दुसरी गोष्ट काही ठिकाणी तुम्ही मीटर जे बसविले आहेत ते इतके पटपट फिरते आहे की तीन लेडीजने माझ्याकड तक्रार केली आहे. त्यांचे काम जे वर्षभरात व्हायला पाहिजे ते तीन महिन्यात झालेले आहे. मग

तुमचे पाण्याचे अधिकारी व आमचे प्रतिनिधी यांनी जाऊन बघितलेतर मीटरमध्ये दोष आढळला. मग त्या तीन बायका माझ्याकडे आल्या त्या नसत्या आल्यातर त्यांना बील भरावे लागले असते. एक महिना बील नाही भरले की आपण लगेच त्यांचे कनेक्शन कट करतो. मग साहेब त्या मीटरमध्ये दोष आढळून आला. परत अजुन आमच्या इथ शेजारी शिंपी राहतात. त्यांच्याकडे कस झाल की मीटरमध्ये जेव्हा आपण पाण्याचे कनेक्शन करतो ते करताना त्याच्यामध्ये माती गेली म्हणून त्यांच्याकडे पाणी आले नाही. म्हणजे आम्ही नवरात्रामध्ये देवीला गेलो होतो तरी आम्हाला अडचण आहे. कोणी वारल तरी आम्हाला अडचण आहे. बरोबर आहे शर्मीलाजी. आम्हाला लोक अगदी जगू देईनाशी झालेले आहेत. पाणी आणि कचरा मी म्हणत नाही पण या सगळया मूलभूत गरजा आहेत. त्यातल्या त्यात पाणी हे जीवनाशी निगडीत आहे. हर्डीकरजी मी आपल्याला म्हटलं होत की २४X७ ची एक मिटींग घ्या. आपण म्हणाला होता की घेत आहोत. पण २४X७ ला आपण एवढ का लाडावून ठेवले आहे मला माहीत नाही. कारण ते काय म्हणले की त्यांना वेळ नाहीय. म्हणून आपण त्या मिटींग कॅन्सल केल्या. मी त्यांना एवढ पण म्हटल होत की २४X७ ची मिटींग आपण कधी घेणार तेव्हा आपण महापौर, आयुक्त, गटनेते, सर्व पदाधिकारी सगळयांना घेऊन मिटींग घ्या. परंतु त्यांना वेळ नव्हता म्हणून ती मिटींग लांबणीवर गेली. ती लांबणीवर न जाता मी सगळया पक्षाचे नगरसेवकांच्या वतीने विनंती करते की २४X७ ची मिटींग लवकरात लवकर घ्या. त्यांना काळया यादीत टाकणार आहे जे काही करणार आहे ते लवकरात लवकर करा. कारण का तर रस्त्याची चाळण झालेली आहे. आम्ही म्हणतो की मोठे खडडे आहेत ते बुजवा. कार्पोरेशनचे लोक म्हणतात की आमचे काम नाही ते २४X७ चे काम आहे. २४X७ वाले म्हणतात की आमचे हे टेंडर संपणार आहे. आम्हाला आता काम करण्याची इच्छा नाही. मग हे जे सगळ होत आहे हर्डीकरजी आपण ती मिटींग सगळयांच्या सोयीसाठी लवकरात लवकर घ्यावी. पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा एवढच मी बोलते. ही विनंती आहे आमची सगळयांची. आपण थांबला होता पण तुम्ही हे नाही केले, आता बाहेर बरेचसे लोक आणि ज्येष्ठ प्रतिनिधी बसले होते, मी म्हटल का बसलात तर ते म्हणाले की पाणी येत नाही. बरीचशी जनता आलेली होती म्हणून पाण्यासाठी आमचा मोर्चा आहे. मी म्हणलं खर सांगू का इथं आम्हाला

पण बसायला पाहिजे. पण आम्ही इथे सत्तेत आहोत म्हणून आम्ही इथे बसू शकत नाही. मी म्हटलं की तुम्ही काळजी करु नका तुमचा विषय मी इथ नक्की मांडणार आहे. मी त्यांच्या वतीने पूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांच्या वतीने आमचे सगळे सहयोगी नगरसेवक नगरसेविका यांच्या वतीने आम्ही तुम्हाला विनंती करते की आणि खरच हा जो पाण्याचा प्रश्न आहे तो मार्गी लावावा अशी अपेक्षा व्यक्त करते. थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. सिमा सावळे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये आज पाणी प्रश्न जे नेहमी विजवायच काम करत त्यानी आज संपुर्ण सभागृह पेटत ठेवलेल आहे मा.महापौर साहेब. निवडणुकाही जवळ आलेल्या आहेत त्यामुळे विषय तर पेटला पाहिजे. कारण मला चांगलं आठवत तुम्ही आणि मी या सभागृहामध्ये २०१६ ला होतो. ज्याप्रकारचा पाणीपुरवठा येत्या इलेक्शनच्या काळामध्ये विस्कळीत झालेला होता तशीच परिस्थिती आतासुध्दा आलेली आहे. त्यामुळे सगळेजण बोलतात ते बरोबर आहे की मार्च, एप्रिल, मे च्या दरम्यान पाणीपुरवठा जो विस्कळीत होतो तो आता कसा झाला. काही ठिकाणी पुरस्कृत असेल, काही ठिकाणी कृत्रिम करतात. काहीनी  सांगितलं की टँकरलॉबी चालवावयाचे आहे का. सगळयांचे वेगवेगळे आरोप वेगवेगळी मतमतांतर याठिकाणी व्यक्त झालेली आहेत. दुपारी पावणेदोन वाजता ज्यावेळेस मी सभागृहात येत होते, खाली गाडीतून उतरल्यास मला बघीतल्यानंतर जे काही आंदोलनकर्ते होते जोरजोरात घोषणा देत होते. चोर है, चोर हैं भाजपा चोर है. मी म्हटल की बाबा मला बघून तुम्ही काही घोषणा देऊ नका. जसा पाण्याचा प्रश्न तुमच्याकडे आहे तसा माझ्याकडे आहे. त्यामुळे मला काही फार वाईट वाटणार नाही, पण वाईट कधी वाटले. ज्यावेळेस प्रधानमंत्र्यांच्या नावाने घोषणा दिली आणि त्यांना चोर, ते खूप वाईट वाटले. या शहराची संस्कृती, संस्कार आहेत सभागृहाचे. इतक्या खालच्या दर्जाचे कधीच नव्हते. जेव्हा आम्ही विरोधी पक्षामध्ये होतो तेव्हा आम्ही प्रधानमंत्र्याना, मुख्यमंत्र्यांना या पायरीवरती कधीच आणले नाही. जे की आज आणले आहे. आणि मग जो आव आणला जातो की आम्ही पक्षीय राजकारण करायचे नाही. मग तू भारी का मी भारी. मग याने पहिले बोलायचे का त्याने पहिले बोलायचे. आपणही मीठ खातो आपलेही रक्त पेटलं पाहिजे. ज्या पक्षाचे

नावाने जर आपण या सभागृहामध्ये बसत असू आणि पक्षाच्या नेत्याना ज्यावेळेस चोर ठरवल्या जात तर आपली सुध्दा नितीमत्ता जागेवर असली पाहीजे, मा. महापौर साहेब. नाहीये ना जागी, नाहीये. सेटींग करण्यात आपण गुंतलोय. विरोधीपक्षाने त्यांची भूमिका योग्य रितीने पार पाडलीच पाहिजे, त्यांचे कामच आहे ते आणि सत्ताधारी म्हणून आपण सुध्दा आरोप सहन करण्याच आपले काम आहे. कारण ती सत्ता आपण उपभोगतो आणि म्हणून त्यांनी आपल्या चूकांवरती बोट ठेवलेच पाहिजे. परंतु ठेवत असताना ज्यावेळेस तुमच्या विचारांची पातळी घसरते त्यावेळेस राज्याचा मुख्यमंत्री आणि देशाचा पंतप्रधान तुम्ही या पायरीवर आणून बसवता त्यावेळेस तुम्ही काय एवढे राजकारण करता मला कळत नाही. मला चोर म्हणलं तर ऍग्री, मला काही वाईट वाटत नाही कारण की मी नगरसेवक आहे मी सत्ताधारी पक्षाची नगरसेवक आहे. मला कोणी शिव्या दिल्या तर मी वाईट वाटून घेण्याचे कारण काय. कारण मी सत्तेत आहे साहेब. माझी जबाबदारी आहे सुविधा पुरविण्याची. परंतु एकीकडे ज्यावेळेला तुम्ही गोडवे गात होता आणि म्हणत असाल पक्षीय राजकारण करायचे नाही. मग तिथे मिडीया होती म्हणून तुम्ही पक्षीय राजकारण करीत होतात का. आमचे नंदकुमार सातुर्डेकर बंधु आहेत त्यांना मी म्हणल भाऊ मला बघून जास्त जोरात घोषणा चालू आहेत का, पण मला वाईट नाही वाटणार मला चोर म्हणलतरी, पण प्रधानमंत्र्यांना म्हणतात त्याच वाईट वाटत. मुख्यमंत्र्याना शिवी देता ते माझ्या राज्याचे मुख्यमंत्री आहे, ते या देशाचे पंतप्रधान आहेत. त्यांना कोणी शिवी दिलेली, त्यांना कोणी वाईट म्हटलेले नाही खपवून घेणार. कारण हा सव्वाशे कोटीचा देश आहे. त्यांनी कुठेकुठे लक्ष दयायचे. वॉर्डात आपण नगरसेवक आहोत. पल्लीकडच्या गल्लीत कच-याचा ढीग साठतोतर तो आपल्याला दिसत नाही. आपल्याला कळत नाही कोणी जर तक्रार केली, व्हॉटसअप केला तर आपल्याला जाग येते. आणि मग  देशाच्या पंतप्रधानांना इथं घेतात आणि आपण काय करतो, तो मला वाईट म्हणतो आणि हा मला चांगला म्हणतो याच्यामध्येच आपण गुंतून पडलो आणि म्हणून पक्षीय आस्मिता याठिकाणी जागृत ठेवणे, तेवत ठेवणं तितकेच गरजेचे आहे. जे ते मिडीयासमोर बोललेत तेच त्यांनी या सभागृहामध्ये सुध्दा बोलले पाहिजे या मताची मी आहे. नाहीतर तो प्रसिध्दीसाठी स्टंट आहे आणि स्टंट करणा-यांना कोण थांबवू शकतं, कोणीच थांबवू

शकत नाही. आम्ही विरोधी पक्षामध्ये होतो. आम्ही कधी काही कुठल्या मुख्यमंत्र्यांना बोललो नाहीत. त्यावेळेस पाटबंधारे मंत्री म्हणून होते सन्मा. दादा ते सुध्दा गल्लीपासून दिल्ली पर्यंत आणि दिल्लीपासून गल्लीपर्यंत पंधरावर्षे त्यांच राज्य होतं. मग त्यावेळेस नाही पवना जलवाहीनीचा प्रश्न सुटला. रक्तलिखित इतिहास घडला आणि म्हणूनतर सत्ताबदल झाला. पाणीप्रश्न पेटलाच होता, तो काही आजचा पेटलेला आहे अशातलाही काही भाग नाही. परंतु आताची जी परिस्थिती आहे मा. महापौर साहेब ही परिस्थिती मात्र निर्माण केली गेलेली आहे यामध्ये शंका नाही. ती यासाठी नाही की ज्यावेळेस तुम्ही सांगितले मगाशी आमचे नखाते दादा बोलत होते. एक्झीक्यूटीव्ह, डेप्यूटी, जेई तुमचा प्लंबर मग व्हॉल्हमन ही जी खेळी चाललेली आहे ती त्यांच्याकडन झाल. त्यामध्ये काही आमचे मनगटशाहीवाले नगरसेवक सुध्दा आहेत. तुमच्या वॉर्डातले पाणी कोणतरी पळवतेय माझ्या वॉर्डातले पाणी कोणतरी पळवतेय. इंद्रायणीनगरसारख्या भागात सुध्दा आज सगळया सेक्टरमध्ये बोंब आहे, फोन उचलला की ताई, पाणी नाही. कधी येणार आहे हो. दस-याच्या दिवशी पाणी नाही कधी येणार आहे हो. नवरात्रामध्ये पाणी नाही कधी येणार आहे हो. उत्तरे देता देता मा. महापौरसाहेब खरच तारांबळ उडाली. तोंडातल पाणी पळाल होत आणि हे मान्य करण्यात मला काही वाईट वाटत नाही. चूक झाली तर मान्य पण केली पाहिजे. आता तुम्ही गेलातर बघा आमच्या इथं काही ठिकाणी चार इंचीची लाईन टाकली आहे. ज्या सोसायटयांना पहिले कनेक्शन आहे त्यांना आता परत कनेक्शन दयावे लागेल साहेब, आमची मजबूरी आहे. आम्ही तर जुने कनेक्शन देत नाही. तीस-पस्तीस, चाळीस, पन्नास-पन्नास फ्लॅटची एक एक बिल्डींग आहे. खालची टाकी सुध्दा अर्धी भरत नाही तर वर पाणी केव्हा जाणार. आमच्या मोटारी असतात एका लेव्हलला टाकी आली की अटोमॅटीक पाणी चालू होते. आता तिथे प्यायला पाणी नाही. त्याठिकाणी नवीन कनेक्शन देण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नाही. पण असं किती ठिकाणी करायचं. आता तर चिखले म्हणले की यमुनानगरला पाणी नाही. २४X७ चा शिवसेनेच्या तत्कालीन आमच्या गटनेत्या होत्या त्यांच्या वॉर्डामध्ये पहिला प्रयोग झाला. तो त्यांच्याच प्रभागामध्ये झाला होता. आणि त्या खूप खूष होत्या की माझ्या प्रभागामध्ये चौथ्या मजल्यावर सुध्दा पाणी येते. तांबे साहेब बंद केलेय का आपण ते. बंद झालेय

ते. पाणी कमी केले. पण जिथे चौथ्या मजल्यावर पाणी येत होते. मग एक तर तो प्रयोग करायचा नव्हता मग तुम्ही काय करता पहिला प्रयोग करता मदाच बोट चाटवता आणि मग मात्र कारल खायला घालता, असं नाही ना चालणार. मग एकीकडे तुम्ही लोकांना सवय लावली. एकीकडे आपण २४X७ नुसार पाणी दयायचं म्हणतो. २४X७ काय आम्ही आणलेले आहे का ते तर तत्कालीन सत्ताधा-याच्या काळात आलेले आहे. पहिला जो प्रयोग झाला तो त्यांच्याच काळात आलेल आहे. आम्ही आज ते सक्सेस होत नाही असं जर म्हणत असूतर ठीक आहे ना त्याचा अनसक्सेस जे काही रेशो असेल तो आमच काही म्हणण नाही. पण आणला आम्ही नव्हता. राबवायचे काम आम्ही निश्चितपणे करतो कारण की ती राज्याची, केंद्राची योजना आहे, केल तर पाहिजे काम. वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत पैसे तर खर्च होतात. आणि मगाशी आशाताई जशा म्हटल्या की पंचवीस वर्षामध्ये ज्या पाईप लाईन टाकल्या होत्या त्या सडलेल्या आहेत, कुजलेल्या आहेत. ते जे काही गढूळ पाणी येते. आणि येऊ नये म्हणून २४X७ मध्ये आपण नवीन पाईप लाईन टाकतो. मग हे करायच नाही का, करा तांबे साहेब ते. पण जे करता त्यासाठी डिजाईन घ्या. नियोजन करा कुठून कुठला कुठे पाईप गेला. चार इंचीचा कुठे गेलाय, सहा इंचीचा कुठे गेलाय. तुम्ही त्याचे डिजाईन ठेवा. त्याच्यानंतर आम्हांला आख्खा रस्ता खोदायला लावू नका. नाही तर तुम्हाला शोधून आणायला लागेल आम्हाला, कुठे व्हॉल ठेलेला आहे म्हणून. साहेब आपल्याकडे नवीन लाईन टाकली की त्याच ड्रॉईंगच नाही. आणि ड्रॉईंग नसल्यामुळे आपण संबंध ठिकठिकाणी खोदत बसतो. तर ते खोदले गेले नाही पाहिजे. त्याचे ड्रॉईंग ठेवा. वेबसाईडवरती टाका. ज्यावेळेस स्काडा प्रणाली आणली त्यावेळेस पहिली मी असेल विरोध करणारी. विरोध याच्यासाठी केला कमिशनर साहेब त्यावेळेस एकच पेटंट नाही आपल्याकडे. त्यामध्ये काय कमी असं आम्हांला कळत नव्हत खर सांगायच म्हणजे आम्ही टेक्निकल नाही आहोत. आम्ही ईंजिनीअर नाही आहोत. आम्हाला नाही कळत त्यातल पण आम्हाला एक कळत की एखादी वस्तू जर तुम्हाला घ्यायची असेल. तुम्ही आम्हाला सांगितलं होत, आठवत असेल तत्कालीन कमिशनर असतील अधिकारी असतील त्यांनी सांगीतल होत की स्काडा घेताना आमच्याही मोबाईलवर दिसेल की कुठली टाकी किती भरलेली आहे, किती मीटर भरलेली आहे, कुठल्या भागात कसा

पाणीपुरवठा होतो. मला तर गेल्या पंधरा वर्षात काही मिळालेल नाही. जर स्काडा प्रणाली आपल्याकडे विकसित झालेली आहे. आपला जर का त्यावर विश्वास आहे तर मग पाण्याची बोंब का. मग वेळोवेळी का कळवल जात आम्हांला उदया पाणी येणार नाही. उदया पाणी येणार नाही म्हणजे आज काय करायचं. एकच टाईम पाणी देतो आपण संध्याकाळी तर देत नाही. इंद्रायणीनगर भागामध्ये सात वाजता पाणी असंत. त्यांना आठ वाजता मेसज जातो. मला स्वत:ला आठ वाजता मेसेज आलाय की या भागात इतक्या वाजता पाणी येणार नाही म्हणून. अरे हो पण तो वेळ निघून गेलाय. आता सांगून काय उपयोग आहे. काही वेळा असं होत की साहेब अशा वेळेला मोठमोठया सोसायटयांमध्ये नाकारला टॅंकर. महापालिकेचा टॅंकर नाकारला. ते म्हणाले आम्हांला काही अपायकारक झालतर तुम्ही काय करणार. त्याबद्दल कमीशनरांनी प्रेस कॉन्फरन्स घ्यावी. तुम्हाला सांगावे लागेल साहेब. की हे जे पाणी आहे  ते शुध्द पाणी असतं. पंपींग स्टेशनवरुन आम्ही तुम्हांला पुरवतो ते कुठल्या गटारातल, नालीतल, नदीतल नाही, ते चांगल पाणी आहे, पिण्यासारख पाणी आहे तुम्ही ते वापरा म्हणून. कमिशनर म्हणून तुम्ही निश्चितपणे चांगल काम करीत आहात. परंतु नियोजन मात्र आपलं चुकतय. या नियोजनामध्ये तुम्हांला स्ट्रीक्ट भूमीका घ्यावीच लागेल. पाणीपुरवठा असा विभाग आहे की कोणीच कधीच सॅटीस्फाईड झालेल नाही त्या विभागात. शहरातला कुठलाना कुठलातरी कोपरा हा तहानलेला राहतोच. आणि एक तहानलेला असलातर ज्यांच्याकडे भरलेला ड्रम असतात ते सुध्दा तिथे ओरडतात की आमच्याकडेही पाणी नाही. दापोडीमध्ये तर रात्री बारा, दोन अडीच वाजता केव्हाही पाणी येते. त्यांनी काय करायच बोपखेल वाल्यांनी काय करायचं. त्यांचा खरच प्रश्न जटील आहे. परंतु जिथे येत होत, चांगल होत तीथलही विस्कळीत झालं. इंद्रायणीनगरला साहेब कधीच प्रॉब्लेम नव्हता. पण आता आमच्याकडंच सुध्दा पाणी पळविले आहे. रोज उठून मी माझ्या शेजारच्या नगरसेवकाबरोबर नाही भांडू शकत. तुम्ही माझा प्रॉब्लेम समजून घ्या साहेब. हे काम कोणाचे आहे. अधिका-यांचे आहे ना. त्यांनी जर त्यांची डयूटी ईमानदारीने केली. सर्व भागात समान पाणी वाटप केले तर हे भांडण नाही होणार. तुम्ही भांडत नाही आणि मला सांगा तुम्ही भांडायला. मी भांडेल ओ. पण मला कळतयना त्याच्याकडे सुध्दा पाणी नाही तो तरी काय करणार आहे.

त्याचाही नाईलाज आहे. तोही शिव्या खातोय. विकास डोळसने मगाशी सांगितल की आईने सांगितल की तू दोन दिवस येऊच नको. साहेब फोन वरुन तुम्ही एकल ना बोलतात कसे नागरीक तर. तळपायाची आग मस्तकाला जाईल तुमची. त्यांची चूकच नाही नागरीकांची त्यांनी आम्हाला त्यासाठीच निवडून दिलेले आहे. त्यांनी आम्हाला सांगितल पाहिजे आम्हाला शिव्याच घातल्या पाहिजे. त्यांच्यामुळेच आमच्या गळयात हार पडलेले आहेत. त्यामुळे इथं आता आम्ही तुमची बाजू घेऊ शकत नाही. पण साहेब यामध्ये सिरीयसली लक्ष घालून काम करण्याची गरज आहे. मी आशाताईंना रोज फोन करुन विचारते की काय प्रॉब्लेम आहे वॉर्डामध्ये. माझे आठ ते दहा व्हॉटसप ग्रूप आहेत. एकाही ग्रूपवरती चांगल बोलल्या जात नाही. नागरीकांचे गूप केले. पाणी नाही, पाणी नाही, पाणी नाही, पाणी नाही, पाणी नाही. किती लोकांचे ऐकायचे पाणी नाही. जीव काढलाय साहेब पाण्यानी. या शहरामध्ये जी सत्ता बदल झाली त्यामध्ये पाण्याचा फार मोठा हात आहे. आणि आता डोळयासमोर निवडणुका आहेतच. मगाशी सगळे जणच बोललेत त्यामध्ये खासकरुन योगेशभाईच सांगेल की विरोधी पक्षनेता म्हणून आणि मा.महापौर म्हणून मी त्यांचे कौतूक करेन की त्यांनी अत्यंत चांगली कारकीर्द केली आहे. मंगलाताईंनी सुध्दा. विरोधीपक्षात असलेतरी चांगले काम केले असेल तर कौतुक तर करायला पाहिजे ना. दम दयायच्या ताई सभागृहामध्ये बरोबर आहे ना तांबे साहेब. तांबे साहेब तक्रार आली नाही पाहिजे बघा काय करायच ते मला माहिती नाही. पाणीपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. साहेब आम्ही तर तुम्हाला गोडीतच सांगतोय. आमच गोडीत तरी ऐका. आता तर आम्ही हात जोडून सांगतो आमचं ऐका हो. नका आमच्या मुख्यमंञ्यांना त्या लेव्हलला आणू. वाईट वाटत साहेब, सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा. आम्ही जे आज सभागृहात आहेत ते त्यांच्याच कृपेने आहोत. त्यामुळे त्यांना कोणी वाईट म्हणलतर आम्हाला वाईट वाटलचं पाहिजे या मताची मी आहे. म्हणून तुम्हाला विनंती करुन सांगते तांबे साहेब, तुम्ही चांगले काम करता तर चांगलेच काम करा. लडकत साहेबांना तेथून का काढल, लडकत साहेबांना परत तिथेच ठेवा. त्यांना खुप माहिती आहे, खरच खुप माहिती आहे. ठेवा तेथे त्यांना किमान पाण्याच नियोजन तरी चांगले करतील. मगाशी योगेशभाई म्हणलेत की जेएनएनयुआरएमच्या संदर्भात तेथे अधिकारी बसवलेत, कोण बसवलेत तर

कमीशनरसाहेब तुम्हांला कोणी धरलय. तुम्हांला आम्ही थोडीच सांगतो या अधिका-याला काढा आणि या अधिका-याला ठेवा. जर जेएनएनयुआरएमचे लोक म्हणत असतील दूषित पाणीपुरवठयामुळे लोकांना रोगराई होत असेलतर तुम्हाला कोणी धरलय, बदलून टाका अधिकारी, आमची वाट नका बघू. कारण एक लक्षात ठेवा ज्यादिवशी पब्लीक आमच्या विरोधात जाईल त्यादिवशी आम्ही सुध्दा विरोधी पक्षासारखच शांत बसणार नाहीत. त्यामुळे तुम्ही सुध्दा काळजी घेतली पाहिजे. आम्ही आमच्या मर्जीतले अधिकारी बसवले असतील आणि ते जर अकार्यक्षम असतीलतर ते अधिकारी आम्ही पण बदलले पाहिजेत ना. पण आम्ही जर काढणार नसु आणि तुम्ही जर टिकेचे धनी होणार असालतर तुम्ही काय करता. मगाशी भाऊसाहेब भोईर बोलले की तुम्ही वाईट काही केले नाही पण तुमचा अजेंडा काय याच्यावरती बोलण्यासारखे काही नाही. मी सुध्दा विचार केला मी भाऊसाहेबांच्या पुर्ण मताशी अजिबात सहमत नाही, अजिबात सहमत नाही. तुम्ही चांगली कामे करुन चूक केलीत पण तुम्ही प्रसिध्दी घेत नाहीत. साहेब इथं कसं होतं पहीले पीआरओ होते. रोज कमिशनरने काय केले त्याची प्रेस नोट निघायची. तुम्ही बोलत नाही त्यामुळे तुम्ही चांगले काय काम करता ते कळत नाही. आणि चुकल काय तर त्याचा इतका बोभाटा होतो की तुम्हाला कळत नाही मी नेमकं काम कोणासाठी करतोय. कमिशनर म्हणून करतोय का सत्ताधारी पक्ष म्हणून करतोय का विरोधी पक्षाची बाजू घ्यायची. विरोधी पक्षाची घेतली आम्ही तुम्हांला बोलतो तुम्ही आमची बाजू घेतलीतरी आम्हीच तुम्हांला बोलतो. त्यामुळे तुमचा अजेंडा असा काही नाही. तसे तथ्य पण नाही त्यामध्ये तरी तुम्ही सुध्दा ते बघीतलेच पाहीजे. आम्हाला वाईट वाटले तरी चालले साहेब. पण काही निर्णय कठोरपणे घ्याच आणि घ्यावे लागतील तुम्हाला पुढच्या काळामध्ये. डिसेंबर, जानेवारी ला जर आचारसंहिता लागली काय होईल. पाणी पेटेल या शहरात अशी परिस्थिती आहे. पूर्वीपासून आतापर्यंत आपण ४८५ एमएलडी पाणी आपण उचलतो. मी ई-सकाळमधून लडकतसाहेब तुमचेच हे वाचले ११ ऑक्टोबरला ४८४ एमएलडी पाणी उचलल, १२ ऑक्टोबरला ४७३ एमएलडी पाणी उचलले, १३ ऑक्टोबरला ४७२ एमएलडी पाणी उचलले, १४ ऑक्टोबरला ४६१ एमएलडी पाणी उचलले, १५ ऑक्टोबरला ४५४ एमएलडी पाणी उचलले, १६ ऑक्टोबरला ४७० एमएलडी पाणी उचलले, १७

ऑक्टोबरला ४५७ एमएलडी पाणी उचलले, १८ ऑक्टोबरला ४६७ एमएलडी पाणी उचलले. ज्यावेळेस ४५० होतं तरी शहरात ओरड नव्हती. आता तर आपण जे पाणी उचलयला परवानगी आहे तेवढेच पाणी आपण उचलतो. तरी संपूर्ण शहरात पाण्याची ओरड आहे. मग साहेब असं काही झालंय का आपल्या शहरामध्ये, मोठा कुठेतरी प्रोजेक्ट चालू आहे. आपल्याकडून परवानगी दिली गेली आहे. पाणीपुरवठयाकडन जे काही कनेक्शन आपण त्याठिकाणी दिलेय त्यापेक्षा जास्त पाणी वापरतोय. पाणी चोरी होतेय, पाणी चोरी तर पूर्वीपण होत होती. दहा टक्के, पंधरा टक्के, वीस टक्के, पंचवीस टक्के पाणीचोरी पूर्वी पण होत होती. गळती आणि चोरी होती तरी संपूर्ण शहर सुखी होते ना, तरी पण आता ओरड जास्त. एकाच ठिकाणी नाहीतर शहरातले चारही कोपरे तहानलेले आहेत. या महीनाभराच्या काळामध्ये असं काय घडल आहे या शहरामध्ये की इतका जटील प्रश्न झाला आहे पाणीपुरवठयाचा. अनधिकृत नळजोड दिले गेले, अनधिकृत बांधकामाना जास्त नळजोड दिले गेले म्हणून विषय आला. जरी अनधिकृत बांधकाम होते तरी पाणी तर आपण देतच होतो. आपण डायरेक्ट नव्हतो देत तरी शेजाराकडन घेतच होते. त्यामुळे तो विषय तिथे नाहीच, त्यामुळे नेमक घडतय काय. बंधा-यातून पाणी उचलायच आपल जे प्रमाण आहे आपल जे काही पाटबंधारे खात्यानी एक दिवस आपल्याला उशिरा उचलायला दिलं किंवा आपली लाईट गेली. हे सगळे प्रश्न अनेक वर्षांचे येतात. मंगलाताईंनी मगाशी एक सुंदर सुचना मांडली की आपण पंपींग स्टेशन दुसर सुध्दा उभ केलं पाहिजे, तथ्य आहे साहेब, मला वाटत महापालिका झाली तेव्हा पासूनचे हे पंपींग स्टेशन असेल. तिथले पंप सुध्दा वारंवार दुरुस्त करावे लागतात आणि दुरुस्तीवर जो खर्च होतो तसेच पंपींगस्टेशन जर आपण दुसर उभा करु शकलोतर आणि करता आलं तर त्यात काय कठीण नसेलतर ते करा. आणि ते जर करुन आपला प्रश्न मिटत असेल तर काय हरकत आहे. जिथे इतके पैसे खर्च करतो तर आणखी सही. पण करावे तर लागेल. प्रश्न तर सोडवावा लागेल. चोरी तर थांबविता येत नाही, गळती तर थांबविता येत नाही. गळती थांबवायची म्हणून तर २४X७ आणले आहे. चोरी थांबवायची आहे म्हणून घरोघर मीटर बसवतोय. दुसरा तुमचा विषय आहे आता विषय पत्रिकेवर परत. बालाजीनगर सारख्या भागामध्ये साहेब, की जिथ विरोधीपक्षाचे नगरसेवक होते तरी पाण्याची बोंब नव्हती. आता पेपरला पहिली बातमी

लागते की पाणी नाही म्हणून तिथे. इंद्रायणीनगर सारख्या भागाची बातमी लागते. मग सत्तेत येऊन चूक केली काय. विरोधी पक्षामध्ये असताना असा प्रॉब्लेम आला नाही, कारण की त्यावेळेस किमान बोंबाबोंब तरी नव्हती. त्यावेळेस फोन केला की काम होत होतं, आता तेही होत नाही. जोराने बोलता येत नाही. जोरात बोलले तर कोण काय करेल आणि काय ऐकवेल. अधिका-यांना तर बोलायची पण चोरी झाली आहे अशी परिस्थिती आहे. साहेब, खूप छोटे विषय जरी छोटे नसले तरी हे आमच्यासाठी प्रचंड जिव्हाळयाचे विषय आहेत. त्या संदर्भात आपल्याला काय सुधारणा करता येतील, आपण काय चांगल काम करु शकतो त्याच्यावरती आपण लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे मा. महापौर साहेब, मा. कमिशनरसाहेब. मगाशी एकाने सांगितले की मा.महापौर साहेब आपण सभागृहात होता. एकदा सांगीतल केजूबाईचा बंधारा फोडायचा. फोडला म्हणून त्याचा गवगवा. रावेतचा बंधारा फोडायचा बरोबर आहे ना फोडायचा. फोडले कुठले कुठले आपण बंधारे. एक काही तरी धोरण ठरल पाहीजे. एकात पुररेषा वाढते म्हणून बंधारे फोडायचेत आणि पाणी थांबत नाही म्हणून आता बांधायचेत. एक काही तरी डिसीजन घ्या साहेब. ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत आपल्याला पाणी सर्वात जीवनावश्यक आहे आणि याच्यामध्ये जर ते मोडत असेल तर त्या संदर्भात साहेब निर्णय घेताना आपण चार वेळा नाही दहा वेळा विचार केला गेला पाहिजे. आंद्रा असेल भामा आसखेड असेल. या संदर्भात सुध्दा साहेब आपण पाठपुरावा केला पाहिजे. आपण स्टँडीगला बसायचो. मागच्या संबंध वर्षभर कचरा आणि पाणी आणि साफसफाईबाबत स्टॅण्डींगच्या पहिला तास त्याच्यावरतीच गाजायचा. सगळे एक्झीक्यूटीव्ह, डेप्युटी, जेई बसवा. याचा आढावा बैठक घ्या, आढावा बैठक झाली पाहिजे. स्टँडीग सुरु व्हायच्या अगोदर तुम्ही पहिली आढावा बैठक ठेवा. सगळे अधिकारी असतात तिथे. तुम्हाला कुठे बोलवायचे आहे. पाणीपुरवठा सुरळीत कसा होत नाही. रात्रीचे पथक नेमा तिथे, व्हिजीट करा, सरप्राईज व्हिजीट करा. या संदर्भात साहेब तुम्हाला स्वतःला रस्त्यावरती उतराव लागेल. मला अजून आठवते साहेब २००२ ला. शहरामध्ये कच-याचे प्रचंड साम्राज्य असताना प्रविणसींग परदेशी होते त्यावेळेला ते सायकल घेऊन सकाळी फिरायला निघायचे. आपण पावडर फेकतो ना रस्त्यावरती ती पावडर सुध्दा त्यांनी त्यावेळेस कॅच केली होती. छोटे छोटे विषय असतात साहेब. परंतु नागरीकांशी संबंधित

असतात. लोकांना आवडते साहेब. अधिकारी ऑनफिल्ड असेलतर. मला माहिती आहे तुम्हाला प्रसिध्दीचा फार सोर्स नाही. परंतु साहेब प्रसिध्दी म्हणून नाही तर गरज पण आहे. तुम्ही ऑनफिल्ड असलात की तुमच्या हाताखालचे लोक सुध्दा चांगल राहतील असा आम्हाला विश्वास वाटतो लोकांना सुध्दा विश्वास वाटतो. त्यामुळे सगळया टाक्याला भेट दया. काय प्रॉब्लेम आहे तो बघा. या महिना भरात जर नाही चक्र उलट फिरायला लागलेतर याची किंमत साहेब सत्ताधारी म्हणून आम्हाला मोजायची आहे. आणि ती मोजू लागू नये म्हणून साहेब तुम्हांला सुध्दा तेवढच दक्ष रहाव लागेल. कारण का आमच्या बरोबर तुम्ही सुध्दा भरडले जाणार आहात. मा. महापौर साहेब आपण येत्या काळामध्ये ज्या भागामध्ये पुर्वी पाणीपुरवठा सुरळीत होता त्या भागामध्ये आता जो काही हाहाकार उडालेला आहे त्याच्यावरती आपण कॉण्ट्रेक्ट चेक करु. आणि जिथे खरच पाणी कमी जाते त्याठिकाणी सुध्दा आपल्याला चांगल काय करता येईल ते बघायचं आहे. तुम्ही साहेब आता पाठीमागे तांबे साहेब बसलेले आहेत मला माहीत नाही, तुम्ही तोंडी त्यांना आदेश दिले होते की बांधकाम परवानग्या बंद करा. त्यांनी बंद केल्या. आपण त्यांना नोटीस बजावली. माझी मेमरी ब-यापैकी शार्प आहे. मला चांगल आठवतय की हया परवानग्या तुमच्या भागातल्या बंद करा म्हणून स्टॅण्डींगन निर्णय दिले साहेब, आणि त्याच्यावरती अगदी सगळयांनी हे सुध्दा बोलले स्टॅण्डींगला अधिकार आहेत का. तो जनरल बॉडीला आहे. त्यावेळेस तुम्ही सांगितलं होतं की त्या परवानग्या बंद करा. बंद केल्यातर शटलमेंटसाठी केल्यात का, चालू ठेवल्या तर प्यायला पाणी नाही, करायच काय. हयाच्यावरती आपल्याकडून साहेब काहीतरी ठोस उपाययोजना झाली पाहिजे. की काय ऍक्झॅक्टली केले पाहिजे. आणि गेल्या अनेक वर्षापासूनच्या सडलेल्या पाईपलाईन्स आहेत त्या बदलण्यासाठी जितके जास्त फास्ट काम करता येईल तितक जास्त लवकरात लवकर काम उरकायला सुरुवात केली पाहिजे. आता ज्या ज्या ठिकाणी पाण्याचे प्रॉब्लेम निर्माण झालेले आहेत. त्याठिकाणी तिथे सुरळीत होते आणि आता प्रॉब्लेम आहे. साहेब, तुम्हाला आठवत असेल तर बघा. मी त्यावेळेस सुध्दा सांगितले होते की वॉल्हमेनचा जो कॉन्ट्रॅक्टर आहे तो बदला. मी स्टॅंडींगला असताना सुध्दा तुम्हाला बोलले होते चेअरमन असताना. तो बदलावा. आज सकाळी यांच्याकडे, दुपारी दुसरीकडे रात्री तिसरीकडे. अशी वेगवेगळया

भागातली ओरड आहे. प्रॉब्लेम कधी येतो साहेब, मी आणि आशाताई शेजारी शेजारी बिल्डींगमध्ये असू माझ्याकडे पाणी आले आणि यांच्याकडे पाणी नाही. पाईपलाईन तर एकच आहेना साहेब, त्यांना सांगा त्यांच्यावरती दंडात्मक कारवाई करा. सगळयात मोठा खेळ तोच करतो. तो कोणाशी संबंधित आहे कुठल्या पक्षाशी संबंधित आहे कॉन्ट्रॅक्टर हे आख्ख्या शहराला माहीत आहे. माझ्या दुर्दैवाने तोच सगळयात बिलो आहे. मेरा बस चलतो तो उसको कब का हटाती. दुर्दैवाने तो सगळयात बिलो असतो आणि म्हणून काम त्याला जाते. व्हॉल्मंनला पैसे देते नाही, पगार नीट करीत नाही. साहेब व्हॉल्हमन कुठल्या अवस्थेत असतात काय असतात, रात्री बारा वाजता तो व्हॉल काढायला असतो. गेट पडलेले असते तरी कोणाचेही लक्ष नसते. अशा परिस्थितीमध्ये सुध्दा ती लोक काम करीत असतात. एक नाही दोन नाही तब्बल अडीच ते तीन हजार लोकांचे काम त्यांचेकडे आहे. आणि या शहराचे चित्र आम्हाला नालायक म्हणण्याचे काम आख्खं शहर जे करतयं त्याला एकमेव जबाबदार तो कॉन्ट्रॅक्टर आहे. तो कुठल्या पक्षाशी संबंधित आहे हे सगळयांना माहिती आहे. वेळप्रसंग पडलीतर मी काही नाव घ्यायला घाबरत नाही. तो इथल्या मोठया पदाधिका-याचा तत्कालीन सत्ताधा-याचा सख्खा चुलत भाऊ आहे. त्यांच्या मुळे असा तो काही खेळ करतोय. एकतर त्याला तंबी दया. या भागात जर का पाणी कमी आले तर पुढचे तीन महिने त्याचे बिलींग करु नका. आणि मग बघा साहेब कसा पाणीपुरवठा सुरळीत होतो ते. हा खेळ खेळणारा तो व्यक्ती आहे. त्याच्या वर आपल्याला जास्त कॉण्स्ट्रेस्ट कराव लागेल. जो सगळयात खालचा प्लेअर आहे त्याकडे तुम्हाला लक्ष दयावेच लागेल साहेब. कारण बाद कोणाला करायच आणि कोणाला जीवदान दयायच हा त्याच्याकडे खेळ आहे. त्यामुळे त्याच्याकडे तुम्ही आवर्जून लक्ष दयावे. मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपण याठिकाणी बोलण्यास संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानते, थांबते जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. राहुल कलाटे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. गेल्या चार ते पाच तासापासून आपण इथं पाणी, पाणी, पाणी यावर चर्चा करत आहोत. सर्वपक्षीय  नगरसेवकांचे अभिनंदन करावस वाटत. त्यांनी पक्ष पाहिला नाही त्यांनी आपआपल्या भागातल्या समस्या त्या प्रत्येकानी पोटतीडकीने मांडलेल्या आहेत. ही

वेळ का आली शहरावरती, या नगरसेवकांवरती. आपण रावेत बंधा-याच पाणी उचलतोय. त्याची वितरणाची व्यवस्था ही आपली महापालिकेची आहे. तीच व्यवस्था इतकी अचानक का ढासळली. ज्यावेळेस पंपींग स्टेशनवर आयुक्त साहेबांनी पक्षनेत्यांची मिटींग घेतली. त्याठिकाणी सांगितले की मागचे चार दिवस झाले आपल्याला वरुन पाणी कमी आलं आहे. त्यानंतर सांगितले की एक दिवस एमएसईबीचा प्रॉब्लेम होता. लडकतसाहेबांनी सांगितले की आपण मागच्या चार पाच दिवसांमध्ये एवढ, एवढ पाणी उचलले. पण आयुक्त साहेब जलसंपादनाकडन एक आकडेवारी आमच्याकडे आली. त्यांना आम्ही आज सकाळी विचारले तर त्यांनी जी आकडेवारी दिली. आपण म्हणता की ११ तारखेला ४८४ एमएलडी पाणी उचलले आणि जलसंपदा विभागाकडे आकडेवारी आहे ७३४ एमएलडी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पंपीग स्टेशनवरती उचललेल आहे. १२ ऑक्टोबरला लडकत साहेब आपण सांगताय ७७३ एमएलडी जलसंपदाकडची आकडेवारी आहे ७३४ एमएलडी. १३ आक्टोबरला ४७२ एमएलडी, जलसंपदाकडे आहे ७८३ एमएलडी. सगळेच आकडे आपण जर पाहिले इव्हन १८ ऑक्टोबरला ४६७ एमएलडी जलसंपदाकडे आकडेवारी आहे ८२६ एमएलडी. सकाळी साहेब आपण तिथे बसलेलो असताना आपण एक मार्ग काढायलाच बसलो होतो. पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपण त्याठिकाणी चर्चा केली आहे. कारण आपल्याकडे एवढा वेळ नव्हता. परंतु हया माहितीमध्ये तफावत का दिसते. म्हणून तर शंका येते. असं का करताय तुम्ही याच कारण दया. आयुक्तसाहेब तुम्ही सांगितलं की २४X७ मध्ये आपली लाईन आली चौकात डिस्ट्रीब्युशन आहे. आमची रिक्वॉयरमेंट होती १४ एमएलडीची आपण सांगितलं की आता फक्त बिर्ला हॉस्पिटल ते पवना नदी मध्ये लाईन टाकायची राहिली आहे ती टाकली की तुम्हाला डायरेक्ट पाणी देता येईल. आणि त्यानंतर पाणी टप्प्याटप्प्याने वाढेल. मी तुमचं अभिनंदन करतो की सात पासून आम्हांला साडेनऊ, दहा एमएलडीपर्यंत आम्ही आलोयं. एक दिड वर्षापुर्वीचीच परिस्थिती होती तुम्ही वैयक्तिक लक्ष घातल्यानंतर तीच्यात बदल झाला. परंतु आमची जी रिक्वॉयरमेंट आहे ती १६ एमएलडी आहे आणि तुम्ही देताय आम्हाला नऊ साडेनऊ एमएलडी म्हणजे ऑलरेडी तुम्ही पाच साडेपाच एमएलडी कमी देता आणि त्याच्यानंतर ही टंचाई. मग त्या लोकांनी काय करायचं. रात्री आकराला पाणी येत, कधी पाहटे चारला पाणी येते कधी

आठला पाणी येते. प्रत्येक भागात तुमचा पाण्याचा वेगवेगळा टाईमींग आहे. म्हणजे आम्ही फक्त लोकांचेच फोन घ्यायचे का. रात्री ११ ला पाणी आलतर लोकांनी पाणी कधी भरायचे. आपल्यांकडे २४X७ नाहीय नळ दाबला की पाणी आल. माणूस घरी असेल तर पाणी भरेल. दुसरं असं की सहोब आपण एप्रिलला दरवाढ केली ती दरवाढ केल्यानंतर आज भाऊसाहेबांनी सांगितल की ८० कोटीची तूट आहे. दुसऱ्या बाजूला आपण चार टक्के सुविधा कर पण घेतोय प्रॉपर्टी टॅक्स वसूल करीत असताना. म्हणजे कुठतरी आपण नागरीकांकडून वेगवेगळया मार्गाने पैसे घेतोय, कशासाठी घेतोय त्या मलभूत सुविधा देण्यासाठी आणि साहेब आपण तिथेच कमी पडताय. आपण का कमी पडतोय याचं आपण आत्मपरीक्षण करा. आज आपण पाहिल असेल की सगळीकडे २४X७ ही चार वर्षापुर्वीची स्कीम चालली आहे. शहराच्या ४० टक्के भागाचे टेंडर काढलेले आहे. त्यावेळेस विश्वनाथ म्हणून नागपूरचा ठेकेदार होता चांगले काम केले म्हणून धन्यवाद. त्यानंतर परत तुम्ही अरिहंतला ६० टक्के काम दिलेय आणि अजून एक कोणतरी होता. त्याचे ही काम संपत नाही त्याच्यावर का कारवाई करीत नाही आपण. साहेब तुम्ही आल्यानंतर पाणीपुरवठयाचा व्यवस्थित अभ्यास केला की नाही ही सुध्दा शंका आहे. तांबे गोडबोले मी तर म्हणतो तांबे पळपुटे आहेत. मी त्याला एक शब्द विचारला होता आता ताईंनी सांगितलं. मी तुम्हाला उलटं सांगेल मी तुम्हांला फक्त प्रश्न विचारला होता की तुम्ही एनओस्या का बंद केल्या आणि मी परत तुम्हाला प्रश्न विचारला की एनओस्या का चालू केल्या. दुसऱ्या बाजूला तुम्ही काय म्हटले की आमचे इन्फ्रास्ट्रकचर नाहीय म्हणून आम्ही पाणी देवू शकत नाहीत. मग दिडमहिना दोन महिन्यात तुम्ही काय दिवे लावले. तुम्ही परत एनओस्या दिल्या. मला पाच तारखेला संबंधित व्यावसायिकाचा फोन आला की आम्ही जपानला आलो टूरला आज संध्याकाळी पाच वाजता एनओस्या बंद करणार आहेत. मी म्हणल चालू कधी केल्या तर तो म्हणाला काल सकाळीच चालू केल्या. मी तांबे साहेबांना फोन केला. मी आपल्याला सुध्दा फोन केला. आपण म्हणले मा.मुनगंटीवारच्या मिटींगला आहे. कशाच्या आधारे हे सगळं चाललंय. माझ्याकडे पत्र आहे त्यांचे मी तुम्हाला माहिती देऊ शकत नाही. जेव्हा आम्ही विचारतोय तुम्हाला मी ऑफिसमध्ये जावुन बसतो, गोपनीय म्हणताय, मी आयुक्तांशी चर्चा केल्याशिवाय तुम्हाला उत्तर देऊ शकत नाही.

कसली पाणीपुरवठयाची गोपनीय माहिती. पाणी नाही मिळाले तर लोकांचे जीव जातील आणि ही कसली गोपनीय माहिती. लोकप्रतिनिधींना का माहिती दयायची नाही. साहेब, तुमचा कंट्रोल आहे की नाही त्यांच्यावर. एनओस्या वाचून दाखवू का कोणाच्या कोणाच्या आहेत. कोणासाठी चालविता तुम्ही पालिका हया मूठभर लोकांसाठी. एका बाजूला तुम्ही सांगता पाणी भरपूर आहे आणि दुस-या बाजूला तुम्हीच एनओस्या बंद करता. तुम्ही सांगता इन्फ्रास्ट्रकचर नाही. अटोमॅटीक पाणी कमी करता. अटोमॅटींक पाणीही वाढतय, चाललय काय हे. कोणासाठी चालल आहे हे. तुम्ही चांगले काम करा आम्ही सगळे तुमच्याबरोबर आहोत. एका बाजूला २४x७ कडे साहेब तुम्ही लक्ष दया. तुम्ही स्मार्ट सिटी स्मार्ट सिटी करताना महापौरांवर वेळ येते पाणीपुरवठयासाठी आंदोलन करण्याची. तुम्ही शंभर टक्के फिल्डवर आला. त्यापेक्षा आपण त्यातन आऊट व्हा. आपल्याकडे काही पैशाची कमी नाही. स्मार्ट सिटीमध्ये एखादया दुस-या शहराचे कल्याण होईल. त्यांना तरी पैसे मिळतील त्यांच्याकड पैसे नाहीत. तुम्ही एका बाजूला स्मार्ट सिटी करताय. दुस-या बाजूला पाण्याची ही अवस्था. एप्रिलला रेट पण वाढवले. हे काय चाललय, काय हे सगळं. आपली जबाबदारी काय पहील्यांदा आपल्या शहरातील नागरीकांची पाण्याची गरज भागवायची मग बाहेरच्यांना. आज लोढासारख्यांना आपण पाणी देत नाहीत का. किती पाणी आपण लोढाला देतो. दुस-या बाजूला आपण सोसायटीवाल्यांना सांगतो तुम्ही तुमचे पंपींग स्टेशन करा, एसटीपी चालू करा, पाणी रिसायकल करुन झाडांना वापरा. दोनदोन चारचार कोटीचे फ्लॅट आहेत त्यांना आपण पाणी देतो. का देतो एका बाजूला तुम्ही म्हणता की पक्षीय राजकारण बाजूला ठेवा. दोन दोन कोटीचे फ्लॅट आहेत. त्याला का सांगत नाही पवनात तुझा प्लॅन्ट लाव, त्यांनाही आपण देतो ना. कुणी निर्णय घेतला का घेतला. म्हणजे आपली गरज असताना तुम्ही बाहेरही पाणी देता. आपल्या शहरात पाण्याची बोंबाबोंब असताना तुम्ही शहराबाहेर पाणी देता. आता सगळया नगरसेवकांच अभिनंदन कराव लागेल, सगळयांनी आपआपली बाजू मांडली, का मांडली. एका सोसायटीत तीस-तीस, चाळीस-चाळीस फ्लॅट आहेत. तुम्ही भामा-आसखेडच पाणी आणण्यासाठी प्रयत्न करता तुम्ही मुळशीवरुन आण्ण्याची सुध्दा चर्चा केली. तुमचे हे सगळे प्रयत्न कुठेतरी रुपाला येतील परंतु तोपर्यंत काय शहरतर वाढत चाललं आहे. म्हणजे आज आपण मुबलक पाणी

उचलत असताना डिस्ट्रीब्यूशनमुळे शहरात पाणीटंचाई आहे याची जबाबदारी तुम्ही कोणावर टाकणार. साहेब, जशी तांबेची जबाबदारी लडकत साहेब तुमची पण जबाबदारी आहे. उगाच याला बोलायचे त्याला बोलायचे ही कुठली पध्दत आहे. हेड म्हणून तुम्ही पण त्याला तेवढचे जबाबदार आहात. आज पाण्यासारख्या गंभीर विषयावर आपण चर्चा करीत आहोत. कच-याचपण तसच आहे. सेक्शन-४३, ७२ (क) महापालिकेच्या कोणत्याही अधिका-याने आपली कर्तव्ये पार पाडत असताना केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल महापालिकेच्या कोणत्याही सभेमध्ये किंवा सभागृहात चर्चा चालू असेलतर त्या सभेमध्ये किंवा सभागृहामध्ये असे अधिकार असतील. (सेक्शन-४२, ७२ क वाचन केले) साहेब, माहिती पाहिजे. एनओसीची कॉपी तर आमच्याकडे पण आहे. नाव वाचलीतर भलताच वाद उभा राहील. आम्हांला कुणालाच वाद करायचा नाही पण वस्तुस्थिती सभागृहा समोर आली पाहीजे. तुम्ही २६ जूनला पाणी बंद केलं. मी ४ जुलैला तुम्हांला पत्र दिलं की का बंद केल म्हणून. मी २१ ला रिमांईंडर दिल, परत रिमांडर दिले. तुम्ही चारला चालू केले आणि मी पाचला पत्र दिलं तुम्ही एनओस्या चालू का केल्या. शंका यायला का जागा ठेवता तुम्ही त्याचही उत्तर नाही ही काय पध्दत नाही. कोण चालविते महापालिका. शहरातल्या आमदारांवर पण वेळ येतेय मिटींग घ्यायची काय करता तुम्ही, एनओस्या बंद करा. आमच्या भागात पाणी नाही. तरी तुम्हांला लोकांना पाझर फुटत नाही.  म्हणजे साहेब अतिशय विचित्रपणे आपले काम चालू आहे. अनधिकृतपणे पाण्याचा वापर करण्यास मनाई. तुम्ही कोणावर कारवाई केलेली आहे आतापर्यंत एकतरी कारवाई दाखवा. म्हणजे एका बाजूला तो टॅक्सपिअर आहे तो टॅक्स देतो त्याच्यावर आंदोलनाची वेळ येते. आणि दुस-या बाजुला यांना तुम्ही पाठीशीच घालता, का पाठीशी घालता कारण काय आहे.  ७२ (क) आणि ४३ या दोन्ही प्रमाणे तांबेनी व्यवस्थित खुलासा करावा अशी मी विनंती करतो. हे करीत असताना तुम्ही शहराबाहेर लोढांना पाणी देत आहात. साहेब तुम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करताय भामा-आसखेडसाठी तुम्ही चार दिवस नागरपूरला अधिवेशनला होता. आम्हाला सगळया गोष्टी मान्य आहेत. मगाशी शत्रुघ्न काटेनीं सांगितले. विजयबापू पण पाणीपुरवठयाचे मंत्री आहेत. साहेब मी पण महापौरांना पत्र दिले आहे. विजयबापूना शहरात बोलवायच म्हणून.  माझ्या वॉर्डातील दोन टाक्या बांधून तयार

आहेत उदघाटनासाठी. तुम्ही तरी कुठे सिरीयस होताय सत्ताधारी. हा तर राजकारणामधला फरक आहे ना. तुम्ही सांगितल्यानंतर मी एकदा बापूंशी बोललो पण. शेवटी आज पण सकाळी बोलावे लागले. की बापू तुमच्यासाठी मी महापौरांना दिड महिन्यापूर्वी पत्र दिले आहे. शहरात बोलवायला हे राजी नाहीत आणि तुम्ही काय फालोअप करताय. तुम्ही कुठेतरी एका बाजूला म्हणताय की पक्ष बाजूला ठेवा आणि दुस-या बाजूला असं करता म्हणजे महापौर साहेब हे कुठेतरी सगळयांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. मला काही कोणाला भांडायच नाही. पण कुठेतरी सगळयांनी आत्मपरिक्षण करण्याची वेळ आली आहे. पक्षनेत्यांनी पण आहे आणि तुम्ही पण आहे. महापालिका चालवतो कोण, आम्हाला तोच प्रश्न पडला आहे. आयुक्त साहेबांच कात्रीसारख झाल. आला इकडून नदीच्या आलीकडून की साहेबांचा डिसीजन बदलला, आला नदीच्या पलीकडून की साहेबांचा डिसीजन बदलला. कुठेतरी तुम्हाला पण कायदयाप्रमाणे वागावे लागेल. तुमच्या मनात आले तर एनओस्या बंद. मनात आले तर एनओस्या चालू. आणि तुम्ही असे कसे काय करु शकता. एका बाजूला तुम्ही शहराची डेव्हलपमेंट थांबवताय. एनओस्या बंद म्हणजे काय नवीन बांधकामे बंद. अहो, साहेब आमच्या भागात आम्हाला मान्य आहे. पण पिंपरीत काय. पिंपरी गावात काय बदल झालाय. आम्हाला तुम्ही म्हणताय तुमचा भाग वाढतोय, तुमच्या भागातल पाणी वाढतय. निगडी, प्राधिकरण, यमुनानगर, पिंपरीगाव इथं का पाणी येत नाही आता, इथ कुठ बांधकाम वाढलीत इथं का पाणी देत नाही आपण. इथं कुठे नव्याने लोक आलेत. म्हणजे कुठेतरी तुमच्याच एक्सप्लेशन देण्यामध्ये एवढया मोठया प्रमाणात शंका उत्पन्न होतात की तुम्ही कृत्रिम पाणीटंचाई का केली. तुमच्याच उत्तरातून जाणवतेय ही पाणी टंचाई. डॅममधून पाणी उचलताय. तुमची वितरण व्यवस्था कमजोर झालीय का केलीय. ही शंका आता आम्हाला येतेय. ही शंका घेत असताना तुमच्या प्रश्नाच्या उत्तरातच तुम्ही म्हणताय की पवना जलवाहिनीबाबत मा. मुख्यमंत्री यांचेसमवेत बैठकीबाबत पाठपुरावा करणेत येत आहे. जलसंपदा प्राधिकरणाकडून पवना जलवाहिनी विरोधातील याचिका फेटाळण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री यांचे स्थगितीचा आदेश उठल्यानंतर काम सुरु करणेत येईल. म्हणजे कुठेतरी एक बोट दुस-याकडे आहे तर चार बोटे आपल्याकडे स्वत:कडे पण आहेत ना. हे सगळ साहेब शहरासाठीच चालले

आहे हे परत प्रकर्षाने सांगावे लागते. साहेब कुठेतरी या शहरामध्ये रिसायकल बाबत सोसायटीचे प्लॅन असतील त्याच्याकडे लक्ष दया. तुम्ही ज्या पध्दतीने प्रयत्न करताय भामा-आसखेड बंद, पवना प्रकल्प बंद म्हणजे सगळेच भूसंपादनामुळ आज काम बंद आहे. पुणे महापालिकेचे पण बंद आहे. मग आपण शेतक-यांसाठी काय करता. तुम्ही जी उपाययोजना सुचविली ती आम्हाला योग्यच वाटली. चिखलीतन उचलण शक्य नाहीतर देहूतून यात्रा असल्यानंतर पाणी पुढे खराब येतं. हे तुम्ही करानां हे करायला तुम्हांला कोणीच आडवल नाही. एका बाजूला याच्याकडे तुम्ही लक्ष दया. तुम्ही रिटायर्ड लोक घ्या ना, शाळांना घेता तशी पाणीपुरवठयाला पण घ्या त्यातले एक्सपर्ट लोक घ्या. आता तुम्ही एका टाऊन प्लॅनिंगच्या अधिका-याला कुठे टाकले पाणीपुरवठयाला. आता पूर्वीसारखी परिस्थिती नाहीय पाणीपुरवठयाची. २४X७ ची काम कुठेही चालू आहेत. साहेब, माझ्या इथलेच एक उदाहरण आहे. ज्याला थोडे टेक्नीकल नॉलेज असेल पण त्या जेईमध्ये त्या डेप्यूटीमध्ये तुम्ही एक्सपर्टतरी बाजूला करा ज्याला पाण्यातल कळतं. ज्याच टेक्निकल नॉलेज असत त्याना जाऊ दयाना. चौदा चौदा वर्षे काम करुनही त्यांना तीथच काम करायच, त्यात त्याना इन्ट्रेस्ट, त्यात त्यांचे डीव्होशन आहे ना नाहीतर तांबेसारखे, फक्त प्रमोशन. साहेबांच्या पुढेपुढे केले की आपल्याला काही काळजी नाही. असे पण अधिकारी आहेत पाणीपुरवठयात. साहेब जूने चार दोन अधिकारी असतील. चारदोन शाळेचे प्राध्यापक असतील अशा लोकांची टिम केलीतर साहेब आपल्यापेक्षा निश्चितच एक्सपर्ट माणसाची मदत मिळेल व ती घेतली पाहिजे. साहेब अशी जर एक्सपर्ट लोक आज जर नाही घेतली तर मागे काय झालं, सात वर्षे काय झाले दहा वर्षे काय झाले. भविष्यात तुम्हा आम्हांला नाहीतर प्रत्येक नागरीकाला आवघड होईल. शहरातल्या नागरीकांची नको भांडणे व्हायला पाण्यासाठी. तुझ्या भागात पाणी आहे आणि माझ्या भागात पाणी नाही अशी वेळ नका येऊन देऊ. अशी वेळ नका आणू की आम्हाला वॉल्हमेन जवळ जाऊन बसायची. बरोबर आहे ना महापौर. आपण आहोत ग्रामीण भागातले. पण साहेब अजुनही त्यामध्ये सिरीयस व्हा. पाण्यासाठी जे जे काही लागेल त्यासाठी तुम्ही आम्ही सगळेच बरोबर आहोत. असं नका करु की लोकप्रतिनिधी वजनदार आहे म्हणून त्याच्या भागात पाणी दयायचं आणि ज्याला कोणी विचारत नाही त्याच्या भागात नाही दयायच. समसमान

डिस्ट्रीब्युशन करा. माझे भागात सगळयात जास्त टॅक्स येतो. सगळेच लोक टॅक्सपेअर्स आहेत. तुम्ही अभ्यास करा आणि भविष्यातील पाणीपुरवठयाची शहरातील गरज ओळखा. तुम्ही भाऊसाहेबांनी जेव्हा जुलैमध्ये प्रश्न मांडले होते त्यावेळेस जर सिरीअसली घेतले असतेतर आज ही वेळ आली नसती. ही वेळ कधी येती फेब्रुवारी, मार्च, एप्रिलला ती वेळ आज आली. तरी पण तुम्ही कुठेतरी काळाची गरज ओळखा. आता परत चालू केले आहे एनओस्या ते परत बंद करा. परत एक दिवस चालू करा. साहेब तुम्हाला बंद करायच्या होत्या ना तर तुम्ही सरळ सांगायचे होते की या या तारखेपर्यंत अर्ज करा. तुम्ही त्याचा क्रायटेरीयाच काय लावला त्याच आज एक्सप्लेशन या सभागृहात पाहीजे. नाहीतर तुम्ही सेक्शन ७२ किंवा ४३ अन्वये तांबेवर कारवाई करा. आम्ही तुम्हाला मागणी करतो, फक्त आम्ही निगेटीव्ह नाही बोलत. तुम्ही या शहराचे पाणी सुधारवताना स्वतःला झोकून दया. नाहीतर अशी वेळ नका येऊ देऊ. तस पाहीलतर साहेब पत्र मी तुमच्याच नावान दिलेलं आहे. साहेब तुम्ही वेळेत सिरीअस व्हा, ही मनमानी आहे, गोपनीय आहे असे सांगतात, काय गोपनीय आहे. म्हणजे अक्षरशः काय करता येईल याचे आत्मपरीक्षण तुम्ही सगळयांनी करा. जेई, पाणी सोडणारे आहेत त्यांच्या बरोबर आम्ही पण बसतो पण त्यांना तुमच्या इकड वरती काय होतं ते त्यांना काय कळतं, शुध्दीकरण केंद्रात काय चालले आहे, रावेतला काय चालल आणि पवनात काय चालले आहे हे त्यांना काय कळत. हे तुमचच डोक आहे काय असेल ते. त्यांना काहीही कळत नाही. त्यांची डयुटी ते नियमात करतात. वरीष्ठामध्येच गोंधळ चालला आहे. जो पर्यंत तांबे आहेत तोपर्यंत ताब्यांत पाणी पिऊ नका नाहीतर आहे ते पण नाही यायच तुमच्या नळाला. तांबे साहेबांनी खुलास केल्यानंतर मला परत बोलायचे आहे.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आज पाच तास झाले पाण्यावर मिटींग चालली आहे. खरतर आम्हाला वाटले होते की विरोधकाना पाणी येत नाही म्हणून आम्ही बोंबलतोय आणि म्हणून आम्ही आंदोलने करतोय. पण आज मला कळाले की आदरनीय आमचे जेवढे नगरसेवक बोलले त्या सर्व नगरसेवकांचे मनपासून कौतुक करतो. कुठलेही राजकारण न करता सर्वजण अतिशय पोटतिडकीने या पाण्याच्या विषयावर बोलले. आपण जवळ पास चार साडेचार पाच तास आपण

सगळयांनी एकून घेतलं. त्याबद्दल ज्यांनी प्रश्न विचारले होते आमच्या सुलक्षणाताई धर असतील. आमचे पंकज भालेकर असतील त्यानंतर आमचे मयूर कलाटे असतील. मयूर कलाटेच्या माध्यमातून सांगण्यात आले की त्यांची सौभाग्यवती त्यांना विरोध करायला निघाली होती. कारण भगिनींना जेवढा त्रास आहे तेवढा या पाण्याच्या संदर्भात बाकी कोणाला नसावा असं मला वाटते. कारण सकाळी आमचा जेव्हा दिवस चालू होतो तेव्हा पहिला जो फोन असेल तो फोन पाण्यावरुन आम्हाला उठवतात. बाकीचे कोण आम्हाला उठवीत नाहीत. पण सकाळी पहिला जो फोन असेल तो फोन आम्हाला पाण्याचा येतो की आम्हाला पाणी आले नाही. तिथून आमचा दिवसाचा दिनक्रम असेल तो चालू होतो. तो रात्री जवळपास बारा असेल, एक असेल, दोन असेल, तीन असेल पहाटे आमच्या कडे सहा वाजेपर्यंत पाणी चालते. आदरनीय महापौर आपण त्या परिसरामध्ये राहता. खरतर ज्या परिस्थितीमध्ये प्रश्न विचारले यावर्षी पवना धरण क्षेत्रामध्ये किती पाऊस पडला किंवा त्या धरणात साठा किती आहे. नंतर २४X७ चा विषय आहे. पाणीगळतीचे ऑडीट होते की काय, होत असेल तर किती लिटर्सची गळती होते. हे तीन प्रश्न आमच्या सुलक्षणाताईंनी विचारले होते. खर तर या प्रश्नाला उत्तर दिलेय की पाणी गळतीचे ऑडीट केले जात नाही. अजुन एका प्रश्नाचे उत्तर दिलेय की पवना धरणामध्ये आज अखेर ३२.९४ मिमी इतका पाऊस पडला आणि ९२ टक्के पाणी पवना धरणामध्ये आहे. एक तर हे हवामानाचा अंदाज घेऊन केलेय का कुठला जोतीष्य आणून केलेय का खोटे उत्तर दिलेय हे आम्हाला माहीत नाही. साहेब, पावसाळा चालू आहे आज या परिस्थितीमध्ये पावसाळा चालू असताना जर ही अवस्था आपल्या शहराची असेल तर मला अस वाटत की आपला जो अधिकारी वर्ग आहे तो एकतर जाणूनबुजुन आपल्याला काहीतरी भूलभूलय्या करतोय किंवा आपल्याला फसवल जातेय. आपल्याला याच्यामध्ये नियोजन शून्य कारभार दिसतोय, असे इथ या निमित्ताने आम्हाला दिसतेय. यापूर्वी पाणी चांगले होते की नाही हे सगळयांनी सांगितलं होते म्हणून किंवा नव्हत म्हणून. यानंतर पाणी याच वेळेला का बंद झालंय. २०१४ ते २०१७ पर्यंत किंवा २०१७ नंतर आता २०१९ पर्यंत पाण्याचे नियोजन याच काळामध्ये केले पाहिजे का. याच काळामध्ये पाण्याचा प्रश्न वाढला का. यापूर्वी वाढला नव्हता का हा प्रश्न याच काळामध्ये का आला. तसं कोणी आम्हाला सांगितलं असेल. कारण कोणीही येऊन विचारतेय. आमचा

कोणीही, असेल कॉन्ट्रॅक्टर दुनियादारी असेल. कोणी आरोप करीत असतीलतर त्याच्यावर ताबडतोब कारवाई करा साहेब. आम्ही सांगतो म्हणून करावी. पण तो आरोप सिध्द करुन किंवा आरोप फेअर करुन म्हणजे प्लंबर आहे, का तो वॉल्हमन आहे की काय साहेब, आज मी असं ऐकलय की ज्या ज्या ठिकाणी आपल्या महानगरपालिकेने आख्या शहरात पाईपलाईन टाकलेल्या आहेत त्या २४X७ मध्ये आपण घेतलेल्या आहेत. पाईपलाईन कुठून कुठे गेली त्याचा हॉल्व्ह कुठे आहे. हे कुठून सोडले जातेय हे आजतागायत आपल्या रेकॉर्डवर नाही. ज्याठिकाणाहून पाईप लाईन गेली आहे त्या कुठल्याही अधिका-याला, आज आलेले अधिकारी उदया बदलून गेला तर त्याला सांगता येत नाही. आपल्याकडे डायग्राम नाही. आज ही वेळ का आली. या वर्षभरात, पाचसहा महिन्यात, आठनऊ महिन्यात लोकसंख्या तर वाढली का बाहेरचे लोक आपल्याकडे आली. साहेब १०० टक्के याच्यामध्ये गोलमाल आहे. याच्यामध्ये कोणीतरी काय तरी नाटक करतेय. काहीतरी याच्यामध्ये काळबेरं आहे हे १०० टक्के सगळया नगरसेवकांच्या लक्षात आलेले आहे आणि ते मी पण मान्य करतो साहेब. एकदम दयनीय अवस्था आहे. दसरा गेला, गोकुळाष्टमी गेली, गणपती गेले, नवरात्र गेली, आम्ही समजू या काळामध्ये पाण्याचा वापर जास्त होतो. पण आता दिवाळी आली आहे. नगरसेवक म्हणतात ना आम्हाला मार खायला लागेल. ही साहेब वस्तुस्थिती आहे. आम्ही आंदोलने कशासाठी करतो. आमच्या स्वत:साठी नाही केलेली. आम्हाला प्रसिध्दी मिळावी म्हणून नाही करत. शहरामध्ये पाणी काय सत्ताधा-यांना मिळते आणि विरोधकांना मिळत नाही किंवा विरोधकांना मिळते आणि सत्ताधा-यांना मिळत नाही असाही विषय नाहीय. हा विषय सर्वसामान्य जनतेचा आहे. त्यांनी आम्हाला निवडून दिले आहे आणि हेच बोलण्यासाठी जे काही शहरामध्ये प्रश्न आहेत ते या सभागृहात सुटावेत, या सभागृहात याची माहिती मिळावी म्हणूनच आम्ही त्या माध्यमातून आंदोलन करीत असतो. साहेब, एक बाजूने आम्हाला सांगितले, आता राहुलने आकडेवारी सांगितलं. एक आकडेवारी आम्हाला दिली गेली. एका वृत्तपत्रामध्ये आलेली आहे ४८ ते ७६ पर्यंत आणि एका वृत्तपत्रामध्ये आलेल आहे म्हणजे आम्ही माहिती घेतली त्यामध्ये वेगळच काहीतरी निष्पन्न झालेल आहे. माझ्याकडे जलीसंपदाचे अधिकृत पत्र आहे. साहेब, आपण नक्कीच एवढ पाणी वापरत असताना

आपल्याला प्रॉब्लेम येतोय. सन्मा.नगरसेवकांनी सांगीतल की रावेतच्या बंधा-यामध्ये गाळ आहे. आमच्या मंगलाताईंनी सांगितले तिथे एक्सीडेंटली जर एखादा काय प्रॉब्लेम झाला तर त्या संदर्भात जर तो रावेत बंधारा बंद पडला तर मग काय. आयुक्त साहेब, आपण जाणीवपूर्वक या विषयावर दुर्लक्ष करताय की काय किंवा आपल्याला माहिती देताना किंवा आपण ते काही सांगताना आतापर्यंत रिपोर्ट चुकीचे दिले गेले काय. असं या निमित्ताने सांगावस वाटते. साहेब आंद्रा असेल भामा-आसखेड असेल किंवा त्या परिसरातून जेवढ आपल्याला पाणी आणायचे असेल जवळपास १६७ एमएलडी पाणी आपल्याला तिकडून आणायचे आहे. पुणे जिल्हा नियोजनच्या मिटींगमध्ये हा महत्वाचा विषय समोर आला होता त्यावेळेस या परिसरातले या मतदार संघातले या शहरातले किती आमदार त्याठिकाणी होते ते आदरणीय आमच्या दादांनी सांगीतलं. साहेब फक्त तुम्ही होते बाकी कोणी नव्हते. या महत्वाच्या विषयासाठी या परिसरातले कोणीही आमदार नव्हते हे जीवंत उदाहरण तुम्हांला देतो. जर लोकसंख्या वाढत असेलतर आपल्याला नियोजन करणे गरजेचे आहे. परत तुम्ही म्हणताल तुमच्या काळात काय केलं. कोणीतरी म्हणणार कि सत्ताधारी तुम्ही असताना काय केल. आम्ही पवना बंद जलवाहीनी केली. भामा-आसखेड, आंद्रा हा आमचाच प्रकल्प आहे आम्ही तो मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने पवना धरणाच्या माध्यमातून या घटना घडल्या त्या अतिशय चुक झाली त्या आजही आम्ही मान्य करतो. पण जे घडल त्यावर राजकारण त्या काळात तिकडची सत्ता वेगळी होती आणि इकडली सत्ता वेगळी. एकनाथराव, महापौर साहेब आम्ही तुम्हाला विनंती करतो की, सत्ता दिल्ली पासून ते गल्लीपर्यंत आपली आहे. पवना धरणाच्या माध्यमातून जे जे काही प्रश्न तुम्हाला सोडवायचे असतील, जे जे त्यांना काही दयायच असेल, घ्यायच असेलतर आजूबाजच्या शेतक-यांच्या काही अडचणी असतीलतर त्यांना तीतकीच मदत देवून आपण ते बंद जलवाहीनीचा  प्रकल्प मार्गी लावावा अशी तुमची पण बातमी मी इथ वाचली. खरतर वेळ तुमच्यावर सुध्दा आली होती तुमचही पत्र आयुक्तांसमोर मिळाल की तुम्ही आज आम्हांला मदत करणार होते आयुक्तांना पत्र दिले होते. जर या शहराच्या महापौरांना सत्ताधारी महापौरांना आंदोलन करण्याची वेळ येत असेल तर याच्यापेक्षा दुर्भाग्य मला वाटतय या शहराचे कोणाच नसाव. आपण पण आंदोलन करणार होता. आपल्याला

इकडून फोन आला असेल तिकडून फोन आला असेल म्हणून आपण आंदोलनामध्ये सहभागी झाला नसावात असं मला वाटत. पण ठीक आहे महापौर. पण धन्यवाद, महापौर आमच्याबरोबर उभे राहिलात, धन्यवाद. पण आम्ही ज्यावेळेस आंदोलन करतो त्यावेळेस आमच्यावर गुन्हे दाखल होतात. आम्ही जेव्हा पाण्यासाठी आंदोलन करतो त्यावेळेस आमच्यावर गुन्हे दाखल होतात. पण आपल्या एका सहकारी आमदारांनी सांगितले. तीन दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास एकाएकाला बघून घेतो. आलं नाही पाणी आलं नाही. कोणाला मिळालं नाही. पाणी आलं नाही तर एनओस्या बंद करा.

**मा.महापौर -** या शहरातील प्रत्येक लोकप्रतिनिधी हा या शहरातील नागरीकांकरीता पाण्यासाठी भांडत आहे.

**मा. दत्तात्रय साने** – मा.महापौर साहेब, ऐकाना मी काय सांगतोय मी त्यांचे कौतुक करतोय. मी त्यांचे कौतुक करतोय मी काय सांगतोय ते ऐका पहिलं. मी काही वाईट बोलत नाही. म्हणजे सत्ताधारी आमदारांनी किंवा महापौर तुमचे किंवा अन्य आमच्या सर्व सदस्यांचे हे प्रशासन ऐकत नाही. त्यांना दिलेली जी डेडलाईन आहे त्यांचे ऐकत नसेल तर या पाण्याच्या प्रश्नासाठी आता आपल्याला काही तरी करावे लागणार आहे, हे मला सांगायचं होत महापौरसाहेब. त्यांच्याबाबतीत मला वाईट काही बोलायचे नाहीय. म्हणजे आमचे पक्षनेते, तुमच्या भाजपाचे नेते म्हणजे मला त्यांच्याबद्दल वाईट बोलायचे नाही परंतु त्यांनी सांगून सुध्दा जर पाणीपुरवठा सुरळीत होत नसेल तर मला वाटतं एकदा कोणी सांगितलं की पाणी सुटतय त्या भागात. मला वाटते की पिंपरीच्या आमदारांचे कौतुक करावे लागेल. ते तुमच्याकडे काही पाण्याचे प्रश्न मांडत नसणार असे मला वाटते. म्हणजे असं सगळ असताना या भामा-आसखेडचा विषय असेल किंवा पवना धरणाचा विषय असेल यामध्ये आपण नक्की काही तरी करावे असं मला वाटते. मगाशी भाऊसाहेब भोईरांनी सांगितले की आपला अजेंडा काय. आयुक्त म्हणून या दिड वर्षभरामध्ये आपण काय काम केलेले आहे आणि केले असेल तर ते थोडेसे सांगावे. या पाण्याच्या प्रश्नासाठी काय केले. कच-याच्या प्रश्नासाठी काय केले आहे. शहरातील मला वाटत की मयत झालेली पण संख्या आणलेली आहे डेंगुने, मलेरियाने. हा प्रश्न पाण्यामुळे झाला आहे. तुषार कामठेंनी जी खंत व्यक्त केली आहे.

सल्लागार चालू आहे, संदिप वाघेरे यांनी जी खंत व्यक्त केली राजा व्यापारी प्रजा भिकारी. माजी महापौर नितीन काळजेनी सांगितले की पाणी दिवसाआड करा. सर्व नगरसदस्यांनी सांगितलं की एकदम नियोजन शुन्य कारभार या सध्याच्या काळामध्ये चाललेला आहे. हे जर सर्व नीट करायच असेलतर आयुक्तसाहेब मी आपल्याला विनंती करतो. या सर्व ज्या साधकबाधक गोष्टी ज्या झालेल्या आहेत या गोष्टींना जबाबदार कोण आणि याच्यावर काय कारवाई करणार जोपर्यंत या पाण्यावरचा प्रश्न सुटत नाही. पक्षनेते आपल्याला विनंती करतो नाहीतर तुम्ही पण आमच्या काळात असाल म्हणून आम्हांला सगळयांना तुमच्या काळात याव लागल हया विषयाचे राजकारण करण्यापेक्षा भाजपा असेल, शिवसेना असेल, मनसे असेल. आम्ही असो. या सर्व गोष्टी सर्व नगरसेवकांना पक्षनेत्यांना विनंती करुन सांगतो की याच्यावर तोडगा निघाला गेला पाहिजे, याच्यावर मार्ग निघाला गेला पाहीज. समान वाटप झाले पाहिजे. एक फोन आला की तिकडे पाणी सुटतय, दुसरा फोन आला की ईकडे पाणी सुटतय. काय म्हणतात ना जास्त ताकदीचा नगरसेवक असेल त्याचा फोन आला की तिकडे पाणी सुटतय. असं न होता समान वाटप आयुक्तसाहेब आपण करावे. फोनवर कोणाचे प्रेशर येत असेल दबाव येत असेल, काही फुटबॉल होत असेल, इकडून तिकडून दबाव येत असेल तर आपण ही आयुक्त आहात. आपल्या ताकदीचा वापर करावा, आपल्या अधिकाराचा वापर करावा. अशी आपल्याला विनंती करतो आणि या विषयासाठी महापौर साहेब जेवढे दिवस, जोपर्यंत निर्णय लागत नाही, जोपर्यंत याच्यावर डिसीजन होत नाही. या विषयपत्रिकेवर असं काही महत्वाचं नाहीय. किंवा ही विषयपत्रिका आज व्हावी आणि त्यांच्यानंतर शहर बंद पडणार आहे असं काही नाही. यासाठी जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही सर्व ठिकाणी समान पाणीपुरवठा होणार असेल त्यानंतर ही सभा घ्यावी. प्रत्येक नगरसेवकांनाही विचारावे की तुला बाबा पाणी मिळतय का व्यवस्थित. त्याच्यानंतर ही सभा घ्यावी तोपर्यंत सत्तारुढ नेते आपल्याला विनंती करतो तोपर्यंत ही सभा तहकूब करावी. पाणी तेरा रंग कैसा कारण असं नको व्हायला आपण अधिका-यांना सूट देतोय असं नको व्हायला की आपआपल्यामध्ये भांडूण आपण अधिका-यांना बोलायला लावतोय. आता तांबेचे मला वाटतेय की ब-याच जणांनी सांगितलय की तांबेचे नांव गोडबोले ठेवा. या माध्यमातून मला वाटतं की तांबे खूप गोड बोलतात.

खूप ॲक्टीव्ह अधिकारी आहेत मी पंधरा वर्षे बघतोय आणि खूप असं गोडगोड गप्पा मारुन त्यांना कशापध्दतीने परत प्रेमाने पाठविता येईल अशा माध्यमातून ते पाठवितात पण आपल्याला विनंती करतो की मागच्या वेळेस सुध्दा पठाण साहेबांच्या वेळेस आम्ही आंदोलन केले होते. त्यावेळेस आपण आम्हाला आठ दिवसांची डेडलाईन दिली होती. त्याच्यानंतर ज्यांनी ज्यांनी आंदोलन केले त्यांना सुध्दा काही डेडलाईन दिल्या होत्या. आता आमदारांच्या डेडलाईन संपलेल्या आहेत. या शहराचे भाजपाचे अध्यक्ष आहेत यांचीही डेडलाईन संपलेली आहे आमचीही डेडलाईन काय आहेत ते बघू जर पाणीप्रश्न सुटला नाही तर आमचं जे काही वेगळया पध्दतीचे आंदोलन होईल हे आपल्याला या सभागृहात सांगतो. आणि आम्ही गप्प बसणार नाही जे काही होणारे परिणाम म्हणजे आयुक्तांचे असतील, अधिका-यांचे असतील. आणखी कोणाचे असतील. त्यास जबाबदार आयुक्त या नात्याने आपण असाल असे या निमित्ताने सांगतो आणि ज्या पध्दतीने आम्हाला १२८ नगरसेवक आहेत त्यांच्या प्रभागामध्ये समान पाणीवाटप पाणी दयावे. ज्यांना कमी पाणी येत असेल त्यांना जास्त करावे. ज्यांना जास्त येत असेल त्यांना कमी करावे. आणि प्रत्येक ठिकाणी हीच खंत आहे सर्व महिलांची. पाण्याचे काय झालं पाणी कोणी चोरुन नेले. जसा कचरा चोरायचे काम चाललय तसं पाणी कोणी चोरलं हा प्रश्न आम्हाला विचारतात. म्हणून मी तुम्हाला सांगतो याच्यापुढे आम्हीही सभागृहातली भाषण करणार नाहीत. इथून पुढे आम्ही सभागृह चालू देणार नाही. इथून पुढे कितीही मिटींग तहकूब होऊ दयात. पाणी हा प्रश्न सुटेपर्यंत आम्ही आपलं सभागृह चालू देणार नाही असं याठिकाणी सांगतो. जोपर्यंत पाणीपुरवठयाचा पश्न मिटत नाही तोपर्यंत सभा तहकूब करावी. अशी मी आपल्याला विनंती करतो आणि थांबतो.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर विषयपत्रिकेवर विषय नसताना सुध्दा सहा तास एखादया विषयावर चर्चा होण्याची या महापालिका सभागृहामध्ये ही पहिली वेळ आहे. दत्ताकाका प्रश्नोत्तरासाठी एक तास असतो मला माहिती आहे. मला कल्पना आहे की सभाशास्त्र आपल्या सगळयांना माहीत आहे. प्रत्येक जण आपआपले रंग दाखवण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे तुम्ही ज्या पध्दतीने म्हटले पाणी तेरा रंग कैसा आणि प्रत्येक जण हेच सांगण्याचा प्रयत्न

करतोय. पाण्यासाठी राजकारण करायच नाही. आपला अजेंडा आपल्या पक्षाचा अजेंडा काय आहे हे दाखवण्याचा प्रत्येक जणच प्रयत्न करतो. तो एक गोष्ट दाखवतो. आम्हाला पाण्याच राजकारण नाही करायच. पण पाण्यावर राजकीय शितोंडे एकमेकांवर उडवायचे काम खरतर सगळयाच पक्षाने सहा तास मी सातत्याने ऐकले आहे. आणि कधी कधी सुरुवातीला आम्ही ठरवलं मा. महापौरांना मी विनंती केली की जेवढं बोलायच तेवढ बोलू दया. कोणाचा आवाज दाबायचा प्रश्न नाही खरतर हा पाण्याचा प्रश्न हा सगळयांसाठी महत्वाचा प्रश्न आहे. आणि गेल्या आठदहा दिवसांपासून, पंधरा दिवसांपासून, महिन्यापासून ही गोष्ट बघतोय. हा पाण्याचा प्रश्न खरच निर्माण झालाय खरतर आता पुढच्या पाच सहा महिन्यामध्ये लोकसभा, विधानसभेच्या निवडणूका आहेत. आणि काका तुम्ही ज्या पध्दतीने शेवटचे सबमिशन केले की आम्ही या पुढच्या काळामध्ये सर्वसाधारण सभा होऊ देत नाही. याच चित्र आहे लक्षात ठेवा. म्हणजे कधीकधी पंधरा वीस वर्षे, पंचवीस वर्षे या महापालिकेमध्ये तुमची सत्ता होती. मला माहीत आहे डेप्युटी तुमचे आहेत, जे.ई. तुमचे आहेत, प्लंबर तुमचे आहेत. वॉल्हमन तुमचे आहेत. आणि अशा पध्दतीची तुम्ही ज्या पध्दतीने म्हणजे सगळया पक्षाच्या नेत्यांनी एक गोष्ट सांगितली की जेवढे पाणी मागच्या दोन वर्षापूर्वी या पवना डॅममधून आपण उचलत होतो तेवढयाच पाण्याचे डिस्ट्रीब्यूशन आपण रावेतच्या पंपींग स्टेशनमधून आपण शहरभरामध्ये करीत होतो. आणि तुम्हीच सगळे म्हणताय की आता पाणी कोणी चोरल. म्हणजे ज्या पध्दतीने मी महापालिकेमध्ये येत होतो. महापालिकेच्या सभागृहाच्या पाय-या चढत असताना मला बघितल्यानंतर अधिक थोडासा जोर आला, की पाणी चोर. खरतर मला कधी कधी एखादया गोष्टीची किव करावीसी वाटते. पाणी चोरायला तर तुम्हीच जबाबदार आहात ना. ही वस्तुस्थिती आहे गेल्या आठवडाभरामध्ये मी तुम्ही बोलत असताना मी एक शब्द बोललो नाहीय. तुम्ही आरोप केले प्रत्यारोप केले मी शांतपणे ऐकत होतो. गेल्या आठ दिवसापूर्वी आम्ही मा. महापौरांच्या नेतृत्वाखाली मा. आयुक्तांच्याबरोबर पाणीपुरवठयाच्या सगळया अधिका-यांची, सगळया प्लंबर लोकांची फक्त वॉल्हमन बोलाविले नव्हते. या सगळयांची मिटींग ज्यावेळेस लावली त्यावेळेस कमिशनरांनी साधा प्रश्न विचारला एखादया डेप्यूटीला आणि जेईला, त्याने सांगितले की तुझ्या प्रभागामध्ये किती पाणी येतेय. त्याला माहीत नाही.

खरतर आपण सगळे इंजिनिअर असतील त्यांना टेक्नीकली माहीत असते. त्याच्यापुढची परिस्थिती जे.ई.ची आहे. म्हणजे ही जर परिस्थिती पाणीपुरवठयाच्या मधल्या कर्मचा-यांची असेल तर मला खात्री आहे निवडणुका आलेल्या आहेत. रोज आंदोलने करुन माझी पार्टी किती चांगले काम करते या शहरासाठी हे दाखवण्याचा खरतर करते हे लक्षात ठेवा. मी पहिलेच सांगेन हा आरोप नाही माझा, पाणीपुरवठा जो विस्कळीत केला त्याला काका तुम्ही सगळेजण जबाबदार आहात. मला माहीत आहे की एखादा एक्झीक्यूटीव्ह काय करतो. एखादया नगरसेवकाचा फोन आला तो सांगतो डेप्यूटीला, डेप्यूटी सांगतो जे.ई.ला. जे.ई. सांगतो प्लंबरला, प्लंबर वॉल्व्हमनला सांगतो. ही जी परिस्थिती या शहराची पाण्याबद्दल निर्माण झाली आहे. खर आहे की या शहराला पाण्याची गरज आहे आणि ज्या ज्या माझ्या सगळया सन्माननीयांनी सांगितले. अजितदादांना व्हिजन होती पवना बंद जलवाहिलनीचे काम. खरतर पाण्यासाठी राजकारण तर आम्ही पण करत नव्हतो....

**मा. महापौर -** तुम्ही आता पाण्यावर बोला. आता बस झालं. पाण्यावरच बोला आता जास्त चर्चा करु नका.

[ सभागृहात गोंधळ ]

**मा. एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, पाण्यावरच मी बोलतोय. माझ्या अगोदर अनेक सदस्यांनी पवना बंद जलवाहिनीबाबत सांगितलं. माझ्या अगोदरच्या सगळया वक्त्यांनी भामा आसखेडवर सांगितले. भामा आसखेडची परिस्थिती काय. आम्ही भामा आसखेडचे आम्ही केले असं म्हणणा-यांनी कुठेतरी असा विचार केला पाहिजे. अरे भामा आसखेडचे तुम्ही काय केले. खोट बोलण्याची संस्कृती नाही झाली पाहिजे. खर बोला आम्ही सगळया गोष्टीसाठी तुमच्याबरोबर आहे. गेल्या वर्षी आठ महिन्यांपूर्वी भामा-आसखेडच्या संदर्भामध्ये तुम्ही डब्ल्यूटीपीचा प्लॉंट तळवडेला करीत होते. चिखलीला जागा मिळाली त्यात कमिशनरांचा आणि माझ्या दोन्ही आमदारांचा हात आहे हे लक्षात ठेवा. त्याठिकाणी डब्ल्यूटीपीचे काम करुन पुढच्या काळामध्ये भामा-आसखेडचे पाणी मार्गी लावण्याचे काम करतोय. तुम्हीच सांगितले राहुल कलाटे याठिकाणी बोलले नागपूरच्या अधिवेशनाच्या काळामध्ये कमिशनरसाहेब चार दिवस होते आणि भामा-आसखेडला पाणी मिळविण्यासाठी पाण्याचा हिस्सा मिळविण्यासाठी

प्रयत्न करीत होते. तुम्हीच एका बाजूला सांगताय की आठ महिन्यापूर्वी झाले. तुम्हीच एका बाजूला सांगताय की नागरपूरच्या अधिवेशनामध्ये झाले. खरतर पाण्यासाठी जे चांगले केले त्याचे आम्ही १०० टक्के कौतुक करु. परंतु प्रामाकिपणाने मनापासून एक गोष्ट सांगतो पाण्याचा प्रश्न या शहरामधला सुटला पाहिजे. त्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणारी ही भारतीय जनता पार्टी आहे हे लक्षात ठेवा. आरोप चुकीच्या पध्दतीने कधी करु नका. ज्या पध्दतीने महापौरांनी एक वर्षे सांगितले पाण्याचा प्रश्न सुरळीत नाही झाला तर मला सुध्दा आंदोलन करण्याची वेळ येईल हा भारतीय जनता पार्टीचा महापौर त्याचेमध्ये मन आहे हे लक्षात ठेवा अशा पध्दतीने शहरातील लोकांसाठी उदगार करु शकतो. महापौर साहेब मी तुम्हाला विनंती करणार आहे की खरतर सहा तास आपण चर्चा केली. पाण्याचा प्रश्न कमिशनर साहेब खरतर सहा तास या विषयावर आपण चर्चा करतोय. तुमचं स्पष्टीकरण ऐकण्याची सभागृहाच्या माध्यमातून आमच्या सगळयांची इच्छा आहे. त्या संदर्भामधले तुमचे सबमिशन ही या सभागृहाच्या समोर होणे अत्यंत गरजेचे आहे. पण मला माहीत आहे की या सभागृहामध्ये सगळया सदस्यांना ज्या पध्दतीने आज आम्ही चार तास रावेतला पंपींग स्टेशनला जाऊन बघितलं. तिथली परिस्थिती बघितली. मला कल्पना आहे की काही अधिकारी खूप चांगले काम करतात. आणि प्रत्येक जण एक गोष्ट सांगत होता. की मला पाणीपुरवठयाला काम करायचे नाही. मा. महापौर या सभागृहाच्या माध्यमातून तुम्हाला विनंती आहे की जे अधिकारी पाणीपुरवठा विभागामध्ये काम करण्यासाठी स्वतः हून येतील त्यांना एक प्रमोशन आणि दोन इनक्रीमेंट दया साहेब. आणि जे अधिकारी पाणीपुरवठयामध्ये काम करायला नाराज होतील किंवा नको म्हणतील त्यांची दोन इन्क्रीमेंट कमी करा आणि एक प्रमोशन कमी करा लक्षात ठेवा तरच पाणीपुरवठयाचा प्रश्न सुटणार आहे. नाहीतर एक दोन बोटावर मोजण्या इतका अधिकारी तो बीचारा आपल्या जीवाचे रान करतो. रात्री बारा वाजता त्याठिकाणी जातो. दुस-या दिवशी परिस्थिती बदलली तर त्याठिकाणी येऊन काम करतो. पाणीपुरवठयाच्या डीपी आणि बीपीमध्ये ब-याच अधिका-यांना इन्ट्रेस्ट असल्यामुळे पाणीपुरवठयामध्ये काम करण्याची मानसिकता नसेल. साहेब माझी विनंती आहे प्रभागवाईज पाण्याचे नीट मुल्यांकन करा, सगळयांचे म्हणणे आहे की समान पाणीपुरवठा झाला पाहिजे. समान

पाणीपुरवठा ज्या ज्या प्रभागामध्ये स्काडा आहे. आम्ही लडकत साहेबांच्या बरोबर आज दोन चार तास बसल्यानंतर आमच्याही एक गोष्ट निश्चित लक्षात आली की कुठल्या टाकीमध्ये किती पाणी भरतय, कुठल्या टाकीतील किती पाणी मुरतयं हे जर आपल्याला मोबाईलवर दिसू शकते तर माझी विनंती आहे या निमित्ताने मा. महापौर साहेब, या पुढच्या काळामध्ये शहरातल्या सगळया वॉर्डामध्ये आजची जर परिस्थिती बघितली. काही ठिकाणी मुद्दामहून पाण्याची परिस्थिती वाईट केली जाते. त्याचे कारण आहे की बदनामी झाली. की आम्ही किती चांगल्या पध्दतीचे अशा पध्दतीची परिस्थिती काही मंडळी काही अधिका-यांना काही कर्मचा-यांना घेऊन केली जात आहे. साहेब माझी विनंती आहे या निमित्ताने मा. महापौर साहेब, जे अधिकारी चांगले काम करतात त्यांच्या पाठीवरती सुध्दा कधीतरी हात टाकण्याची गरज आहे. मी कमिशनरांच्या संदर्भामध्ये सांगितले. कमिशनरांचे काम काय करताय. मी तुम्हाला अभिमानाने सांगेन की हेच कमिशनर भामा आसखेडचे पाणी पिंपरी चिंचवड शहराला मिळाल्याशिवाय या शहरातून जाणार नाहीत हे लक्षात ठेवा. एखादया कामाचे प्रेम किती असले पाहिजे एखादया कामाचा पाठपुरावा कशा पध्दतीने केला पाहिजे. अशा पध्दतीचा एक प्रामाणिक अधिकारी आपल्याला मिळाला आहे आणि मी तुम्हाला मनापासून सांगतो की भामा आसखेडचे पाणी दोन वर्षामध्ये आणण्याचा प्रयत्न आपण सर्वजण करु. माझी सभागृहाला या निमित्ताने विनंती आहे आम्ही सत्तेमध्ये आहोत म्हणून तुम्ही आंदोलने केली आहेत, ऐकूण घेतल, पेपरला बातम्या आल्या. मी पाणीपुरवठयावर बोललो. अशी माझी वर्तमानपत्रामध्ये बातमी आली. लाईव्ह चॅनलवरुन काही ठिकाणी म्हटलं या लाईव्हवर असल्यामुळे मी अजुन लोकांना चांगला दिसेल. अशा पध्दतीचे पाण्यासाठी कृपा करुन कोणी राजकारण करु नका. भाऊसाहेबांनी ज्या पध्दतीने सांगितले की सगळया पक्षाच्या नेत्यांना घेवून आपण तर प्रामाणिकपणाने प्रयत्न करतो. राहुलदादा महापौर झाल्याच्या नंतर सगळया विषयाच्या संदर्भामध्ये सगळया गटनेत्यांना एकत्रित घ्या. त्यांच्या बरोबर चर्चा करा. काही सिनिअर पदाधिका-यांच्या बरोबर बसून या शहरामधले प्रश्न कशा पध्दतीने सुटतील अशा पध्दतीचा प्रामाणिक प्रयत्न करतोय आणि या निमित्ताने विनंती. कमिशनरसाहेब माझी तुम्हाला विनंती आहे. मा. महापौर कमिशनरांना सांगा पाण्यासाठी प्रत्येक अधिका-

याच्या संदर्भामधले त्याचे काम तयार करा. कामाची त्यांना रिसपॉन्सीबिलीटी दया. की जे अधिकारी पाण्यासाठी चुकीचे काम करतील. त्यांची हयगय करु नका हे लक्षात ठेवा. हया सभागृहामधले सगळे पदाधिकारी सगळे नगरसेवक तुमच्या बरोबर आहेत. त्यांची जबाबदारी पक्की करा. जे चुकीचे काम करतील त्यांचेवर निलंबनाची, सस्पेंड करण्याची कारवाई करा. जे चांगल काम करतात त्यांना मोटीव्हेशन देण्याची गरज आहे. मा. महापौर मी तुम्हाला विनंती करतो या पुढच्या काळामध्ये आपल्याला शहरामध्ये जी समस्या आहे ती कृतीमरीत्या आहे की कशा पध्दतीची आहे हे पाहीले पाहीजे. साहेब, माझी तुम्हाला विनंती आहे आज तुमच सबमीशन करण्याच्या ऐवजी ही सभा आपण तहकूब करुन पुढच्या आठ दिवसानंतर ज्यावेळेस घेऊ त्यावेळेस पाण्याच्या संदर्भामधले तुम्ही केलेले मुल्यांकन आणि या सगळया अधिका-यांना जबाबदारी दया माझी तुम्हाला विनंती आहे. आठ दिवसाच्या आत सगळया अधिका-यांना तुम्ही जबाबदारीची जाणीव करुन दया. आठ दिवसाच्या आत जर पाणीपुरवठयाचा प्रश्न सुटला नाही, पाण्याचा विस्कळीत पणा जर नीट नाही केलातर संबंधित अधिका-याला निलंबित केल्याशिवाय आपल्याला जमणार नाही हे लक्षात ठेवा. तरच हे अधिकारी पुढच्या काळामध्ये काम करतील. आणि चांगल्या अधिका-यांना मोटीव्हेशन देऊन या शहरामधला पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही याची आपल्याला पुढच्या काळामध्ये दक्षता घ्यावी लागेल. अनेक प्रश्नांची उत्तरे दयायचीत साहेब. प्रश्नांच्या बाबतीत मला बोलायच होतं. सगळया सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. राज्य शासनाने सांगितलं होत आंद्रा असेल भामाआसखेड असेल. जलसंपदा मंत्र्याच्या संदर्भात सांगितलं मला खात्री आहे लक्षात ठेवा. सगळया प्रश्नांवर आम्ही प्रामाणिकपणाने या शहरामधल्या अन्त्योदयाचा प्रयत्न या शहरामधल्या शेवटच्या माणसाला न्याय देण्यासाठी खरतर या सभागृहाच्या माध्यमातून आम्ही प्रयत्न करतो. या शहराच्या महापालिकेवर कोणाचे नियंत्रण नाही काका. आम्ही सगळेजण एकत्रित बसतो. आम्ही सगळेजणे एकत्रित बसून एखादा विषय करतो. तुमच्या काळामध्ये एकच नेते होते. आम्हाला सगळया नेत्यांना एकत्र घेऊन या शहराचा विकास करण्याचा प्रयत्न करायचा आहे. माझी तुम्हाला सगळयांना विनंती आहे. आंदोलन तुम्ही करा. आंदोलन करायला या लोकशाहीमध्ये आम्ही कोणी प्रतीबंध

करणार नाहीत. माझी तुम्हाला प्रामाणिक विनंती आहे की पाण्याच्या प्रश्नामध्ये खरतर तुम्ही सगळयांनी राजकारण करु नये. पाण्याचा प्रश्न विचारला मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्ही सांगितले की जर ठेकेदार आमचा असेलतर त्याच्यावर कारवाई करा. चुकीच्या पध्दतीने तो ठेकेदार काम करीत असेल कायदयात बसत असेल की नाही हे मला माहीत नाही. पण अशा ठेकेदाराचं सुध्दा काम रद्द करायच हे मला माहीत आहे. खरतर या ठेकेदारांच्यामुळे या शहरातील पाणी कोणीतरी पळविण्याचा प्रयत्न केला जातोय तर त्याला कुठेतरी चपराक बसेल हे लक्षात ठेवा. आणि त्या ठेकेदाराला पाठीशी घालणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांचे सस्पेंशन आपल्याला पुढच्या काळामध्ये करावे लागेल. मा. महापौर मी आपल्याला विनंती करतो की या निमित्ताने ही सभा आपण आठ दिवसांसाठी तहकूब करावी अशी सूचना मी करतो व मा. कमिशनर साहेबांचा खुलासा आपण पुढच्या सर्वसाधारण सभेच्या अगोदर घ्यावा अशी मी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब,. मा आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. एकनाथ पवार यांनी जी तहकूबी सूचना मांडली त्याला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर-** उपस्थित सर्व नगरसदस्य, नगरसदस्या सर्व अधिकारी पदाधिकारी सर्वांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो आणि सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि या शहरातील नागरीकांना ज्या पाणीपुरवठयाच्या समस्यांसाठी सामोरे जावे लागत आहे या सर्व गोष्टींचा विचार करुन मी आयुक्तांना आज अशा सुचना करतो की दि. ३१/१०/२०१८ दुपारी २ वाजेपर्यंत जर या शहरातला पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर संबंधित अधिका-यावर आपण निलंबनाची कारवाई करावी. दि. ३१/१०/२०१८ दुपारी २.०० वाजेपर्यंत ही सभा तहकूब करणेत येत आहे, धन्यवाद.

-------

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २३</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**(दि.२०/१०/२०१८ ची तहकूब सभा)**

**<u>दिनांक – ३१.१०.२०१८</u>** **<u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/१०/२०१८ ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दिनांक ३१.१०.२०१८ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.राहुल गुलाब जाधव | महापौर |
| २) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ३) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ४) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ५) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ६) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ७) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ८) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | |
| ९) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १०) | मा.तापकीर विनया प्रदीप (आबा) | |
| ११) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १२) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |

१३) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१४) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१५) मा.गायकवाड निर्मला मनोज

१६) मा.सागर बाळासाहेब गवळी

१७) मा.गोफणे अनुराधा देविदास

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.अजित दामोदर गव्हाणे

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२२) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२३) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.लांडे विक्रांत विलास

२९) मा.गीता सुशिल मंचरकर

३०) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३१) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३३) मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३६) मा.अश्विनी भिमा बोबडे

३७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३८) मा.संजय बबन नेवाळे

३९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४०) मा.भालेकर प्रविण महादेव

४१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४४) मा.घोलप कमल अनिल

४५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४६) मा.पवळे सुमनताई मधुकर

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.राजू मिसाळ

५०) मा.शैलजा अविनाश मोरे

५१) मा.बाबर शर्मिला राजू

५२) मा.अमित राजेंद्र गावडे

५३) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५४) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५५) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५६) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५७) मा.ढाके नामदेव जनार्दन

५८) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५९) मा.करुणा शेखर चिंचवडे

६०) मा.भोईर सुरेश शिवाजी

६१) मा.अपर्णा निलेश डोके

६२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६३) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६४) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६५) मा.कोमल दिपक मेवानी

६६) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

६७) मा.सुलक्षणा राजू धर

६८) मा.शाम गणपतराव लांडे

६९) मा.सुजाता सुनिल पालांडे

७०) मा.योगेश मंगलसेन बहल

७१) मा.कदम निकीता अर्जुन

७२) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७३) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७४) मा.नढे विनोद जयवंत

७५) मा.पाडाळे निता विलास

७६) मा.काळे उषा दिलीप

७७) मा.कोकणे संतोष अंकुश

७८) मा.पवार मनिषा प्रमोद

७९) मा.बारणे अर्चना तानाजी

८०) मा.अभिषेक गोविंद बारणे

८१) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८२) मा. अॅड.भोसले सचिन सुरेश

८३) मा.बारणे माया संतोष

८४) मा.निलेश हिरामण बारणे

८५) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

८६) मा.दर्शले रेखा राजेश

८७) मा.कलाटे राहुल तानाजी

८८) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८९) मा.ममता विनायक गायकवाड

९०) मा.कामठे तुषार गजानन

९१) मा.चोंधे आरती सुरेश

९२) मा.कस्पटे संदिप अरुण

९३) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९४) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९५) मा.सुनिता हेमंत तापकीर

९६) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९७) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९८) मा.कुटे निर्मला संजय

९९) मा.आंगोळकर सागर सुनिल

१००) मा.मुंढे उषा अंकुश

१०१) मा.लोखंडे चंदा राजू

१०२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०९) मा.नवनाथ दत्तू जगताप

११०) मा.सोनवणे शारदा हिरेन

१११) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११२) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११४) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११५) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर - आयुक्त, मा.पाटील- अतिरिक्त आयुक्त (१), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.डॉ.अनिल रॉय -आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्यलेखा अधिकारी, मा.पाटील, मा.तुपे, मा.निकम, मा.सवणे-सहशहर अभियंता, मा.चितळे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.झगडे-सहा.आयुक्त, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.राऊत, मा.खोत – प्र. सहा.आयुक्त, मा.पोमण - मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे-अति.आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.चव्हाण, मा.तांबे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.पाटील, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख-कार्यकारी अभियंता, मा.दगडे – पशुवैदयकीय अधिकारी, मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी व मा. माने-लेखाधिकारी पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.महापौर - उपस्थित मा.नगरसेवक व मा. नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा. नामदेव ढाके** - मा. महापौर साहेब, वाय.जी. महाजन -भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते माजी खासदार, यशवंत देव -जेष्ठ गीत व संगीतकार, बाळासाहेब ननावरे - सुरक्षारक्षक कर्मचारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सुदाम गुलाबराव दगडे, लक्ष्मीबाई नंदकुमार शितोळे – माजी महापौर रंगनाथ शितोळे यांच्या सुनबाई,

अलकाताई सातकर – भोसरी, तुळशिराम मलशेट्टी - माजी नगरसेवक प्रकाश मलशेट्टी यांचे वडील, गजानन लांडगे - सामजिक कार्यकर्ते, भोसरी, सुनिल दत्तु फुगे - सामजिक कार्यकर्ते, भोसरी, कै.जाईबाई दिनकर गोडांबे- ज्येष्ठ माता, प्रभाग क्रमांक २७, कै.ज्ञानोबा साधू कापसे -जेष्ठ नागरीक ह. भ.पा., प्रभाग क्रमांक २७, कै.चंद्रकांत वहिले - प्रभाग क्रमांक २७ यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहणेत यावी अशी सूचना मी देतो.

**मा. तुषार कामठे** – महापौर साहेब, सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर** – सर्वांनी श्रध्दांजलीसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

[ सभागृहामध्ये दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. ]

**मा.आण्णा बोदडे, (सहा. आयुक्त)** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी मा.संतोष पाटील अति. जिल्हाधिकारी यांची याठिकाणी नियुक्ती झालेली आहे. ते आज या सभेमध्ये उपस्थित आहेत त्यांचा सभागृहाच्या वतीने सन्मान करावा अशा प्रकारची विनंती आहे. त्याचबरोबर मा. संजय कांबळे, हे कार्यकारी अभियंता या पदावरुन महापालिका सेवेतून आज सेवानिवृत्त होणार आहेत त्यांचा ही सन्मान सभागृहाच्या वतीने करावा अशी मी विनंती करतो. संजय कांबळे यांनी हे सभागृह बांधण्यामध्ये फार मोठे योगदान दिलेले आहे. याची संपूर्ण पाठीमागची रचना ही संजय कांबळे यांनी केलेली आहे. अगदी काव्य रचनेपासून त्यांनी लिखाण केलेले आहे असे संजय कांबळे उपअभियंता म्हणून या सभागृहाचे कामकाज पाहात होते. आज कार्यकारी अभियंता पदावर ते सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचाही सत्कार आपण सभागृहाच्या वतीने करीत आहोत. तसेच आपल्या महानगरपालिकेच्या क प्रभाग माजी अध्यक्षा अश्विनीताई जाधव यांचा वाढदिवस आहे. त्यांनाही याठिकाणी सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देण्यात येतील. व त्यानंतर मा. अति. आयुक्त श्री संतोष पाटील यांनी सभागृहाला आपला परिचय दयावा.

[ मा. महापौर, मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती अध्यक्षा, मा.सत्तारुढ पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षाचे गटनेते, मा. आयुक्त व सर्व पदाधिकारी यांचे हास्ते अतिरिक्त आयुक्त-मा. संतोष पाटील, मा. संजय कांबळे-कार्यकारी अभियंता व मा. अश्विनी जाधव- नगरसदस्या यांचा सत्कार करणेत आला. ]

**मा. संतोष पाटील (अति. आयुक्त-१) -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह मी संतोष चंद्रकात पाटील, महसूल व वन विभागाच्या अप्पर जिल्हाधिकारी या संवर्गातील अधिकारी आहे. नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ च्या आदेशाप्रमाणे सोमवार दिनांक २९ ऑक्टोबर २०१८ रोजी मी अतिरिक्त आयुक्त(१), पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर रुजू झालेलो आहे. १९९६ च्या बॅचचा मी उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी आहे. उपजिल्हाधिकारी संवर्गामध्ये साधारणतः २० वर्षे कार्यरत असताना निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा पुर्नवसन अधिकारी, भूसंपादन अधिकारी उपजिल्हाधिकारी रोजगार हमी योजना त्याचबरोबर जिल्हा निवडणूक अधिकारी या पदावर तसेच महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळामध्ये प्रादेशिक अधिकारी या पदावरही मी कार्यरत होतो. त्याचप्रमाणे २०१६ ते १२ ऑक्टोंबर २०१८ या दरम्यान मी अप्पर जिल्हाधिकारी नांदेड या पदावर कार्यरत होतो. सोमवार पासून अप्पर आयुक्त या पदावर रुजू झालेलो आहे. पुढील कालावधीमध्ये मी आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित करतो. आणि माझ्या सर्व प्रयत्नाने या पदाची सर्व कर्तव्ये पार पाडण्याचे मी आपल्या सर्वांना आश्वासन देतो, धन्यवाद.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह सर्वप्रथम मा. संतोष पाटील, अति. आयुक्त यांचे अभिनंदन करतो. आपण या शहराच्या भविष्यासाठी चांगले काम करावे अशी आम्ही सभागृहाच्या वतीने अपेक्षा व्यक्त करतो. मा.महापौर साहेब आपल्याला विनंती करतो मागच्या मिटींगला पाण्याच्या प्रश्नावर सर्व सदस्य पोटतिडकीने बोललेले आहेत. सभागृहामध्ये पाण्याच्या विषयी जे काही नगरसदस्य बोललेले आहेत. त्याच्यावर खुलासा व्हावा आणि खुलासा समाधानकारक असेलतर आम्ही त्याबाबत प्रतिक्रिया देणार नाहीत. परंतु समाधानकारक नसेल तर आम्हाला परत बोलण्याची संधी दयावी अशी विनंती करतो. आदरनीय संजयजी कांबळे यांनी आपल्या महानगरपालिकेमध्ये त्यांच्या कार्यकाळामध्ये अतिशय चांगले असे काम केले आहे. त्यांनाही मी सभागृहाच्या वतीने, महापौरांच्या वतीने शुभेच्छा देतो. त्यांचा पुढील कार्यकाळ जीवनामध्ये त्यांच्या कामाच्या व्यतिरिक्त काही इच्छा अपेक्षा राहिल्या असतील त्या इच्छा त्यांच्या पूर्ण होवोत. अशा सर्व सभागृहाच्या वतीने त्यांना शुभेच्छा

देतो. त्यांनी या महानगरपालिकेमध्ये अतिशय चांगले काम केल्याबद्दल त्यांना मी मनापापासून धन्यवाद देतो. सर्व सभागृहाच्या वतीने धन्यवाद देतो.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आज अति. आयुक्त संतोष पाटील यांनी चार्ज घेतला आहे. मी माझ्या पक्षाच्या वतीने, या सभागृहाच्यावतीने त्यांच स्वागत करतो आणि त्यांच्याकडून एकच अपेक्षा व्यक्त करतो की आपल्या हातून खरच पारदर्शक कारभार व्हावा, स्वच्छ कारभार व्हावा. आणि कांबळे साहेबांना देखील शुभेच्छा देतो ते रिटायर्ड होत असताना त्यांच्या काही अपेक्षा असतील ज्या काम करताना पूर्ण नाही झाल्या त्या कांबळे साहेबांना रिटायरमेंट नंतर सर्व अपेक्षा पूर्ण करता याव्यात अशा मी शुभेच्छा व्यक्त करतो. कांबळे साहेबांनी जो आपला टेन्यूअर घालवला त्या टेन्युअर मध्ये निश्चितच सहभाग असल्याने मी त्यांचे अभिनंदन करतो.

**मा. राजू मिसाळ -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज अतिरिक्त आयुक्त म्हणून पाटील साहेब चार्ज घेत आहेत आणि एका साईडला आपले कार्यकारी अभियंता कांबळे साहेब रिटायर्ड होत आहेत. पहिल्यांदा पाटील साहेबांचे मी कालही स्टँडीग कमिटीमध्ये स्वागत केलेले आहे. आणि मी तर कमिशनर साहेबांचे पण अभिनंदन करणार आहे आणि त्यांचेही आभार मानणार आहे कारण त्यांच्या प्रयत्नांना फार मोठे यश आलेले आहे. कारण मी कालही बोललो आहे की जे या पदावर अति. आयुक्त म्हणून काम करीत होते. त्यांच्याबाबतीत मी दोन-तीन गोष्टी कमिशनर साहेबांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. साहेब, मला वाटते की महिनाभर ते सुट्टीवर गेले आहेत. सक्तीच्या आहेत का कुठल्या सुट्टीवर गेलेत ते आम्हाला माहिती नाही. तर साहेब त्यांना तुम्ही जाऊन देऊ नका. आम्ही जी काही माहिती मागितली आहे. त्यांची सखोल चौकशी व्हावी. अशी पुन्हा एकदा मी सभागृहासमोर विनंती करतो आणि पाटीलसाहेब पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही मोठी महानगरपालिका आहे. थोडा वेळ लागेल तुम्हाला सर्व माहिती घ्यायला. आम्ही अपेक्षा करतो की तुमच्याकडून ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची तुमच्या हातून जसं आता सर्व सदस्यांनी मांडलं, आमच्या नेत्यांनीही मांडल की चांगली सेवा तुमच्या हातून आणि पारदर्शक असा कारभार व्हावा. या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये तुमचे आम्ही स्वागत करतो.

साहेब कांबळे साहेब रिटायर होत आहेत त्यांनी चांगले काम हया महापालिकेमध्ये त्यांच्या हातून घडलेले आहे. आणि आज रिटायर होत असताना हा योगायोग पण म्हणायला लागेल असे बरेच अधिकारी रिटायर्ड होताना एक दिवस पुढे मागे किंवा पंधरा दिवस पुढे मागे अशी आपली जीबी असते पण आज ३१ तारखेलाच जीबी आली आहे. मी कालच आयुक्तसाहेबांना बोललोय की जे आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेतून चांगले अधिकारी रिटायर्ड होत आहेत महापौर साहेब जसं आपण कन्सलटंट नेमतोय तर मी म्हणतो की हा जो त्यांचा अनुभव आहे पाणीपुरवठयामधून देखील बरेच आपले अधिकारी रिटायर्ड झाले आहेत. आज पाणीपुरवठयाबाबतच फार मोठी चर्चा आहे. मला वाटतं की साहेब पण त्याच्यावर खुलासा देणार आहेत. तर हया लोकांचा अनुभव आपल्याला कुठेतरी हया महापालिकेत ही वाढती जी लोकसंख्या आहे आणि वाढता जो कारभार आहे. त्याच्यामध्ये यांचा अनुभव आहे तो आपल्याला नक्की आपल्या कामी येईल. जसं दुधेकर साहेब असतील पिरजादे साहेब असतील. आपल्या महापालिकेतून चांगले अधिकारी रिटायर्ड झालेले आहेत. तर मला वाटतं की हयांना हयांचा जो काही कामाचा अनुभव आहे तो अनुभव नक्कीच पुढच्या कामामध्ये विचारात घ्यावा. आणि कांबळेसाहेब या महापालिकेची तुम्ही जी काही सेवा केलेली आहे त्या आमच्या सोबत मला वाटत की हे सभागृह तुमच्या माध्यमातून बांधण्यात आलेले आहे. याठिकाणीच आम्ही बसलो आहे. हे सभागृह पण तुमच्या कारकिर्दीमध्ये झालेले आहे. त्यामुळे तुमच्या नक्कीच चांगल्या कामाची, चांगले अधिकारी रिटायर्ड होत असताना काही ना काही तरी अडचणी येत असतात. अधिका-यांच्याबद्दल काहीतरी बोलले जाते. परंतु तुमच्यासारख्या अधिका-याबद्दल आम्हाला चांगलाच अनुभव या महापालिकेमध्ये आला आहे. मी तुमच्या कारकिर्दीला शुभेच्छा देतो आणि इथेच थांबतो. धन्यवाद.

**मा.सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज अतिरिक्त आयुक्त आदरनीय संतोष पाटील साहेब यांची नव्याने नियुक्ती झालेली आहे. मी आपल्या सर्वांच्या वतीने व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने त्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे आमचे आदरनीय अधिकारी संजयची कांबळेसाहेब यांच्या आज सेवापूर्तीचा कार्यक्रम आणि या कार्यक्रमानिमित्त आपण सर्वांनीच त्यांना

पुढील शुभेच्छा दिलेल्या आहेत. त्यांचे पुढील आयुष्य आरोग्यदायी आणि चांगले जावो अशीच श्रीमंत दगडूशेठचरणी प्रार्थना करतो. आणि थांबतो धन्यवाद.

**मा. अपर्णा डोके -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. खरतर आज निवृत्ती आणि नियुक्ती असा हा आजचा दिवस आहे. हे सांगायला आम्हाला मनापासून आनंद वाटेल. मा. कांबळेसाहेब गेली ३५ वर्षे महापालिकेत काम करीत असताना आणि चांगल काम करीत असताना कार्यकारी अभियंता म्हणून निवृत्त होतात. हे सांगायला आम्हाला मनापासून आनंद वाटेल की या महापालिकेच्या इतिहासामध्ये हया सभागृहाचे कामकाज, या सभागृहाची नवीन बांधणी चालू होती. तेव्हा त्यांचे मोठे योगदान तर आहेच. पण त्यांनी वेगवेगळे विभाग अतिशय चांगल्या सक्षमरितीने सांभाळून त्यांच्यात असलेल्या एक कलागुणांचा म्हणून त्यांना सांस्कृतिक आवड जी आहे ती स्वरसागरच्या माध्यमातून कायम हिरीरीने त्यांनी भाग घेतलेला आहे. आणखी कलाकरांना बरोबर घेऊन चांगली संधी उपलब्ध व्हावी. म्हणून त्यांनी या क्षेत्रामध्ये म्हणजे स्वरसागर सारख्या संगीत महोत्सवा मध्ये पण आपले योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे मला सांगायला आनंद वाटेल की आपल्या सभागृहामध्ये जे सुभाषित याठिकाणी लिहिलेले आहे. "लोकशाहीचे मंदीर हे सुंदर, संभाषण असावे मधुर निरंतर, सत्यन्याय शांतीचा राहो आदर, जनहित विकासाचे हे सुध्दा त्यांच्या कल्पनेतूनच हे सुभाषित आज या सभागृहामध्ये कायमस्वरुपी आठवण राहील असं त्यांच्या कल्पकेतेने साकार झालंय. पुन्हा एकदा पाटील साहेब नियुक्त होतात अतिरिक्त आयुक्त म्हणून मनापासून त्यांनाही शुभेच्छा देते. आणि कांबळे साहेबांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या काळानंतर त्यांनाही आरोग्यदायी त्यांच्या मनोकामना पूर्ण व्होवोत अशा शुभेच्छा देऊन माझे दोन शब्द थांबवते.

**मा. अनुराधा गोफणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज याठिकाणी अतिरिक्त आयुक्तपदी संतोष पाटील साहेब आलेले आहेत. त्यांना संपूर्ण सभागृहाच्या वतीने खूप खूप शुभेच्छा देते. की आपल्या महापालिकेचा कारभार आणि आपल्या महापालिकेची सर्व कामे त्यांच्या हातून चांगली घडोत आणि आज याठिकाणी आमचे कार्यकारी अभियंता संजय कांबळे साहेब देखील सेवानिवृत्त होते आहेत. कांबळे साहेबाबरोबर काम करण्याचा बरचसा कालखंड, खरच खूप चांगली कामे कांबळे

साहेबांनी आमच्याबरोबर केली आहेत. त्याचबरोबर ज्या कामांना ब-याच अधिका-यांनी नकार दिला अशी बरीचशी कामे कांबळे साहेबांनी चांगल्या प्रतीने घडून आणली आणि माझ्या प्रभागातील एक चांगला प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी याठिकाणी साकार झालेला आहे. आयुक्तसाहेब आपण देखील त्या प्रकल्पाला व्हिजीट केलेली आहे. आणि केवळ कांबळे साहेबांच्या प्रयत्नामुळे आणि तुपे साहेबांच्या प्रयत्नामुळे चांगले चांगले प्रकल्प याठिकाणी उभारलेले आहेत. तर साहेब आपल्याला पुढील सेवानिवृत्तीच्या काळासाठी खूप खूप शुभेच्छा देते. आणि महापौर साहेब तुम्हाला एक विनंती करते की आपले हे चांगले चांगले अधिकारी निवृत्त होत आहेत याठिकाणी नवीन लोक येतील काम करतील. परंतु हे चांगले चांगले अधिकारी आता सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे अनुभव देखील आपण याठिकाणी घ्यावेत. आपल्या पाणीपुरवठयाचा देखील खूप मोठा प्रॉब्लेम याठिकाणी झालेला आहे. मागच्या काळामध्ये चौधरीसाहेब पाणीपुरवठयामध्ये होते. खूप चांगले अधिकारी अगदी त्यांना कुठल्या लाईनमध्ये कुठे व्हॉल्व आहे हे देखील ते सांगायचे असे चांगले अधिकारी आपल्या या महापालिकेमध्ये होऊन गेलेले आहेत. तर आपण निश्चितच अशा अधिका-यांचा अनुभव घेऊन या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा विकास करीत असताना त्यांचा देखील आपण विचार करावा. त्यांचाही अनुभव आपण घ्यावा असे मला वाटते आणि याठिकाणी थांबते धन्यवाद.

**मा.सुलक्षणा धर -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आज पाटील साहेबांना मी शुभेच्छा देते अतिरिक्त आयुक्त पदावर त्यांची नियुक्ती झाल्याबद्दल. आणि कांबळे साहेबांच्याबद्दल बोलायचे झाले तर सगळयांनी सांगितले की हे सभागृह बनविण्यामध्ये त्यांचे खूप मोलाचे योगदान आहे. हे पण त्यांच्या कल्पनेतून आणि त्यांच्या प्रयत्नातून लावण्यात आले आहे. त्याचबरोबर शहरातील गार्डन्स देखील चांगल्या पध्दतीने डेव्हलप करण्यामध्ये त्यांची मदत आहे. आयुक्तसाहेब आपल्याकडे जो मोठा भीमसृष्टीचा जो प्रकल्प आहे तो देखील त्यांच्याच प्रयत्नातून नावारुपाला आलेला आहे. आणि त्याच बरीच काम इनकम्प्लीट राहिलेले आहे. तर नवीन अधिकारी आपण नेमणार परंतु नवीन अधिका-यांना ती कल्पना समजेपर्यंत बराच वेळ लागेल. तर तो प्रोजेक्ट आपला पुर्ण होईपर्यंत जर कांबळे साहेबांना कन्सलटंट म्हणून अटलीस्ट दॅट प्रोजेक्ट ओन्ली जर त्यांना आपण कन्सलटंट म्हणून नेमा किंवा विनंती करुन

प्रोजेक्ट जबाबदारी जर आपण त्यांच्यावर दिली आणि तो प्रोजेक्ट आपल्याला चांगल्याप्रकारे करता येईल. कारण आता आपल्याकडे बरेचसे ७५ टक्के काम झालेले आहे. थोडे काम पेंडीग आहे आणि त्याचे फिनीसींगचे काम त्यांच्या व्यतिरिक्त दुसरी कोणी व्यक्ती आली तर त्यांना तितक्या प्रकारे त्याला फायनल टच देता येणार नाही. तर त्या कामासाठी आपण कांबळे साहेबांना विनंती करुन निदान त्यांच्याकडून पूर्ण करुन घेता येईल आणि कांबळे साहेबांनाही पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देते.

**मा. भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आज आपण एक नियुक्ती त्यांचे अभिनंदन आणि जे निरोप घेतात त्यांना भावी आयुष्यामध्ये शुभेच्छा देण्यासाठी दोन शब्द बोलण्याची संधी दिली आहे. संतोष पाटील यांचे अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती झालेली आहे. संतोष पाटील यांनी आपली माहिती देत असताना अतिरिक्त जिल्हाधिकारी मध्ये संपूर्ण माहिती सांगितली. आणि नागपूरवरुन आपण इकडे आलेले आहेत. नागपूरचा चांगला अनुभव त्यांना आहे. हर्डीकरसाहेबांनी आम्हाला नागपूरचा योग्य वापर कशा पध्दतीने इथ केला जातो याच दिड वर्षामध्ये चांगले दर्शन दिल्यामुळे त्यामुळे आता संतोष पाटील आम्हाला संतुष्ट करा नक्की. एक तर अतिरिक्त आयुक्त दोन अर्थाने असतात एक तर अति काय तरी करतो नाहीतर अतिरिक्त काही तरी करतात. नाही तर काहीच नाही आणखी त्रासदायक होऊन बसतात. तीनचार प्रकार असतात त्यामुळे संतोष पाटील यांच्या एकत्रित व्यक्तीमत्वावरुन तरी वाटतयं की तुम्ही आम्हाला काय त्रास दिला तरी तुम्हाला कळणार नाही. परंतु ही सगळी भूमिका तुमची वाटचाल करीत असताना लक्षात आल्यानंतर मग आपल्याबद्दल काय मत पडतेय ते बघू. पण आता आपल्याला मनापासून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा. तीन वर्षापेक्षा जास्त कालखंड रहावा अशी आम्ही आपल्याकडून अपेक्षा करावी असं आपण काम करावं. दुसरे संजय कांबळे हे माझे खास जुने मित्र आहे. विशेषतः अधिकारी म्हणून आमचा विसर होत नाही. परंतु कला क्षेत्रामध्ये संबंधित असल्या कारणाने महाभारतामध्ये धृतराष्टाचे काम काय चालले आहे ते संजय सांगायचा न बघता. एवढी दृष्टी त्यांना होती. हया पध्दतीने त्यांनी काम केलेले आहे. त्यांच विशेष करुन आनंदी राहण्यामध्ये रहस्य काय. संगीत क्षेत्राबद्दल अभ्यास केलेले जाणते व्यक्तीमत्व फक्त संगीत क्षेत्राबद्दल बोलतोय नाटयक्षेत्राबद्दल नाही.

ब-याचवेळा संगीत क्षेत्र देखील व्यापक असतं. परंतु संजयने अतिशय उत्तम काम केले आहे. महानगरपालिकेची आपली जबाबदारी पार पाडीत असताना आपण आयुष्यभर या महानगरपालिकेच्या नावालौकीकामध्ये काय भर पडेल. सामजिकदृष्टया आपण अगदी मोलाची कामगिरी केलेली आहे. आणि आपण आयुष्यात काय सदाबहार राहणार आहे. याच कारण त्यांना गाणं येते. ज्याच्या आयुष्यामध्ये संगीत, नृत्य, नाटय, कला, क्रिडा हया सगळया गोष्टीची आवड आहे. त्याच आयुष्य कधी वृक्ष होत नाही. त्यामुळे आपल आयुष्य काही वृक्ष होणार नाही. कंटाळा आला की गाणी ऐकावयला येतजा आम्हांला. सभागृह संपल्यानंतर आम्ही ऐकण्यासाठी सदैव तयार राहू. सांस्कृतिक क्षेत्रातील काही काम असेल आयुक्तसाहेब तर अशा व्यक्तींचा योग्य वापर करता येईल आपल्याला. ज्याला काही समजत नाही त्याला ते दिलं की वाट लागते. तर संजय कांबळेंचा आपल्याला चांगल्या पध्दतीने वापर करता येईल. दुसरीकडे आपण सगळयांच अभिनंदन करतोय. निरोप देताना निरोप देतोय महानगरपालिकेच्या नोकरीला पण आमच्या अंतःकरणामध्ये बसलेल्या स्थानाला आमचा निरोप नाहीय. तर आयुष्यभर आपलं नातं असच राहणार आहे. त्यामुळे काळजी करु नका. नाव संजय जरी असले तरी तुम्हांला घरी बसुन सुध्दा ईथ काय चाललय हे तुम्हाला कळणारच आहे. जर आपल्याला काही वाटलं आमच्याकडून काय चूक होत आहे तर निश्चित मित्र म्हणून सांगण्यासाठी या. अश्विनीताई जाधव यांचा देखील याठिकाणी वाढदिवस साजरा केलेला आहे. त्यांना देखील याठिकाणी शुभेच्छा देतो. भोसरी मतदार संघात असताना आपल्याला भविष्यकाळ उज्वल आहे. चांगल्या पदावर आपण बसावे. एक जाधव बसलेले आहेत दुसरे जाधव सुध्दा बसु शकतात, असे काही नाही. त्यामुळे तुम्हाला देखील शुभेच्छा देतो. आणि थांबतो धन्यवाद.

**मा. आशा शेंडगे-धायगुडे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. ख-या अर्थाने आज आपल्याकडे पाटील साहेबांचे आगमन, आणि आमच्या कांबळे साहेबांची निवृत्ती. हे दोन्ही गोष्टी आज एकत्र होतात. निश्चितपणे अतिरिक्त आयुक्त म्हणून पदभार सांभाळत असताना चांगल्या पध्दतीने काम करताल अशी अपेक्षा आहे. तुम्ही चांगल्या पध्दतीने काम केलेच पाहिजे कारण तुमच्या माध्यमातून या महानगरपालिकेचा विकास होणार आहे. तो तुमच्या कार्यकाळातल्या कामाचा एक भाग

आहे आणि तो तुम्ही निश्चितपणे पार पाडाल अशी अपेक्षा आहे. आणि दुस-या बाजूला आमचे संजय कांबळेसाहेब हे निवृत्त होत आहेत. महापौरसाहेब तुमचे कौतुक केले पाहिजे. व्यासपीठावर अधिकारी येऊन महापौरांच्या बरोबर उभा राहतो त्यांना त्याला आनंद वाटत असेल. ज्यावेळेला एखादा अधिकारी आपली तीस पस्तीस वर्षे महानगरपालिकेच्या सेवेला देतात. आणि त्यांच्या कल्पनेतून भले ते पगार घेतात हा वेगळा भाग आहे. परंतु ते महानगरपालिकेमध्ये चांगले काम करण्याचा ते प्रयत्न करतात. अशा अधिका-यांचे कौतुक मनापासून केले पाहिजे. परंतु साहेब याठिकाणी मी तुम्हाला आर्वजून सांगते की कांबळे साहेबांची म्हणजे माझ्या प्रभागामध्ये ते पाणीपुरवठामध्ये काम करतात. आणि अत्यंत चांगल्या प्रकारचे काम त्यांच्याकडून पाहायला मिळते. आयुक्तसाहेब मी आपल्याला परवा पत्र दिले आहे. दोन तारखेला माझ्या वॉर्डामध्ये उदघाटन आहे आणि ३१ तारखेला कांबळे साहेब रिटायर्ड होणार आहेत. मी त्यांना फक्त म्हणलं की आधीच का नाही सांगितलं मला. मी उदघाटन थोडसं आधी घेतलं असतं. आता तुम्ही रिटायर होणार असल्यामुळे माझ्यावरच जबाबदारी येणार कोण बघणार ते. तर ते म्हणालजे तुम्ही कशाला टेंशन घेताय असं एका वाक्यात त्यांनी सांगितलं. मी नसलो मॅडम तरी मी आऊट ऑफ वे जाऊन मी कार्यक्रमाला तर येऊ शकतो. आणि तेवढ करीत असताना कार्यक्रमाची सगळी तयारी मी रिटायर्ड ३१ तारखेला होण्यापूर्वी संपूर्ण नियोजन एकदम परफेक्टली करुन मग मी निवृत्त होईल त्यामुळे त्या कार्यक्रमाचे कोणत्याही प्रकारचे टेंशन न घेता १०० टक्के मी असताना कार्यक्रम होईल. त्याच पध्दतीचा कार्यक्रम मी नसताना देखील होईल. अशा प्रकारची ग्वाही देणारे अधिकारी ज्यावेळेला आपल्या महानगरपालिकेत असतात त्यांच्या कामाचे निश्चितपणे कौतुक होणे अपेक्षित आहे. कांबळेसाहेब तुम्हाला देखील निश्चितच आनंद होतोय की आपल्याबद्दल सगळेजण इथ बोलतात. नुसत बोलण सोप असंत परंतु माईकमध्ये एखादया अधिका-याचे तोंड भरुन कौतुक करायला तस अधिका-याचे काम चांगले असणे गरजेचे असते. त्या पध्दतीचे काम तुम्ही केलेले आहे. तुमच्या मनामध्ये असलेल्या इच्छा अपेक्षा या निश्चितपणे पुर्ण होवोत अशी अपेक्षा व्यक्त करते. आणि तुमचा भावी काळ हा आरोग्यदायी जावो अशी अपेक्षा व्यक्त करुन थांबते. जयहिंद जय महाराष्ट्र.

**मा. विलास मडिगेरी -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आपल्या महापालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त या पदावरती आदरनीय संतोष पाटील हे कालच रुजू झाले आहेत. आम्ही काल स्थायी समितीमध्ये त्यांचे स्वागत आणि अभिनंदन केले आहे. योगायोगाने काल स्टँडीग आणि आज जीबी आहे. सर्वांनी याठिकाणी अतिरिक्त आयुक्त यांचे स्वागत केलेले आहे. आम्ही याठिकाणी सत्ताधारी म्हणून भारतीय जनता पार्टीचे सर्व नगरसदस्यांच्या वतीने अतिरिक्त आयुक्तांचे मनापासून याठिकाणी शहरामध्ये आणि महापालिकेमध्ये स्वागत करतो. त्यांच्याकडून सर्वांनी याठिकाणी चांगल्या कामाची तर अपेक्षा केलेलीच आहे. प्रत्येक अधिकारी काम करीत करत असतो. परंतु ही महापालिका आपली खूप मोठी आहे. अनेक महापालिकेला याठिकाणी पगाराला पैसे नाहीत. परंतु आमच्या महापालिकेमध्ये खूप चांगल्या पध्दतीचे काम याठिकाणी होत असते. खूप मोठया प्रमाणात याठिकाणी कामे होत असतात. आपण काम करत असताना विकासाची मोठी कामे याठिकाणी होत असतात. त्याप्रमाणे खर्च पण याठिकाणी होत असतो. आपण काम करीत असताना पारदर्शी या महापालिकेमध्ये काम करुन या शहराचा विकास व्हावा. या माध्यमातून आपण याठिकाणी काम करावे अशा प्रकारची याठिकाणी अपेक्षा व्यक्त करतो. संजयजी कांबळे याठिकाणी ३५ वर्षे या महापालिकेमध्ये त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीचे कामकाज केले. ज्युनियर इंजिनिअर म्हणून ते याठिकाणी रुजू झाले. कार्यकारी अभियंता म्हणून आपण त्यांना याठिकाणी सेवापूर्तीचा निरोप देत आहोत. असे कमी अधिकारी असतील की त्यांचे  सेवानिवृत्तीचा निरोप आपण वीस तारखेच्या जीबीमध्ये देत असतो. परंतु योगायोग असा आहे की आज शेवटच्या दिवशी जीबी आहे. सर्वांनी त्यांचे तोंडभरुन कौतुक याठिकाणी केलेय. आणि अधिका-यांचे कौतुक करीत असताना खर म्हणजे त्यांनी खरच चांगले काम केले असेल म्हणून त्यांचे कौतुक याठिकाणी होत असते. त्यांच्या माध्यमातून आंबेडकर चौकातील जी भीमसृष्टी आहे खर म्हणजे त्यांचे सेवानिवृत्ती व्हायच्या अगोदर उदघाटन व्हायला पाहिजे होते. त्यांची खूप मनोमन इच्छा असूनही त्यांचा संकल्प होता ती भीमसृष्टी सुध्दा त्याठिकाणी लवकरात लवकर होईल. आयुक्तसाहेब, महापौरसाहेब आपल्याला विनंती आहे की स्टँडीग कमिटीमध्ये सुध्दा मागील आठवडयापूर्वी आम्ही चर्चा केली होती. जे जे चांगले अधिकारी

याठिकाणी सेवानिवृत्त झालेत. जे सेवानिवृत्त झालेले अधिकारी आहेत त्यांना एकदा या महापालिकेमध्ये आपण याठिकाणी बोलवावे. जसं आपण कन्सलटंट म्हणून याठिकाणी अनेक लोकांना नेमतो. तर त्या पध्दतीने त्यांची जर काम करण्याची तयारी असेल मानसिकता असेल तर त्यांना एकदा बोलून घेऊन खरतर विशेष करुन पाणीपुरवठयाचे जे अधिकारी आहेत दुधेकर साहेब आहेत, पिरजादे साहेब आहेत असे अनेक चांगले अधिकारी याठिकाणी सेवानिवृत्त झाले आहेत. त्या सर्वांना याठिकाणी बोलवून आपण त्यांच्या माध्यमातून पुढच्या काळामध्ये आपण त्यांच जर मार्गदर्शन घेतले तर महापालिकेमध्ये अनेक विभागामध्ये चांगले काम होऊ शकते. असं मला याठिकाणी वाटते. संजय कांबळे साहेबांना याठिकाणी त्यांच्या भावी आयुष्यासाठी मनापासून खूप खूप शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह खरतर सर्व सन्माननीय सदस्यांनी अतिरिक्त आयुक्त संतोष पाटील यांच्याबाबतीत आपले मत व्यक्त केले. आणि भाऊसाहेब ते नागरपूरहून नाही आलेत नांदेडहून आले आहेत. तुम्ही ज्या पक्षामध्ये यापूर्वी काम करीत होता त्या पक्षाच्या नेत्याच्या खादयांला खांदा लावून नांदेड शहराचा विकास करण्यामध्ये खरतर त्यांचा खूप मोठा वाटा आहे. संतोष पाटील तिथे तीन वर्षे होते त्याच्या अगोदर एमआयडीसीला होते. आणि एक चांगला अधिकारी महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवडला हर्डीकरसाहेबांच्या जोडीला दिलेला आहे. आपल्या अपेक्षा तर १०० टक्के प्रत्येक अधिका-याच्या बद्दल असतात. सगळया अधिका-यांनी खूप चांगले काम केले पाहिजे. शहराच्या विकासामध्ये त्यांचे योगदान असले पाहिजे. आणि मला खात्री आहे की संतोष पाटील साहेब निश्चितच त्या पध्दतीचे चांगले काम करतील. आणि भाऊसाहेब हे खरे आहे की एखादया अधिका-याच्या कामाचे मूल्यांकन हे त्याच्या कामाच्या पुढच्या काळामध्ये केले जाते. आणि कधीकधी मी तुम्हाला छोटेसे उदाहरण देतो की त्यांची महिन्यापूर्वी बदली झाली. बदली झाल्याच्यानंतर सुध्दा त्यांना तेथून सोडत नव्हते. तिथे डोंगरे म्हणून कलेक्टर आहेत. डोंगरेंचे म्हणणे होते की तुम्ही इथंच रहा. तिथून त्यांनी आठदहा दिवसांच्या नंतर रिलीव्ह केले. नंतर मधल्या काळामध्ये मंत्रालयामधून सोडताना अजुन एक आठवडाभराचा काळ गेला आणि मला असं वाटते की एक सक्षम अधिकारी आपल्या महापालिकेमध्ये रुजू झालेले

आहेत. मी संतोष पाटील साहेबांचे याठिकाणी मनापासून अभिनंदन करतो. आणि पुढच्या काळामध्ये या शहराचा विकास करण्यामध्ये आपले खूप चांगले योगदान राहील. अशी अपेक्षा व्यक्त करतो. खरतर संजय कांबळे साहेबांच्या बद्दल सगळया सदस्यांनी म्हणजे दोन पध्दती आहेत. की आपण संतोष पाटील साहेबांकडून अशी अपेक्षा व्यक्त केली आणि ज्यावेळेस संजय कांबळे साहेब निवृत्त होतात तर सगळयांच्या मनामध्ये खंत निश्चित होते. एखादा चांगला अधिकारी आपल्यामधून निवृत्त होत आहे. खरतर अशी उदाहरणे खूप कमी आहेत महापालिकेमध्ये. म्हणजे दिड वर्षाच्या काळामध्ये ब-याचदा मी अधिकारी बघतो. काही अधिकारी खूप चांगले काम करतात मेहनत घेतात. शहराचा विकास झाला पाहिजे अशा पध्दतीची भावना असते. काही अधिकारी दहा वाजता पंच केले की पावणेसहाला मी कशा पध्दतीने घरी जाईल हे बघतात. तर मला असं वाटते की प्रत्येक अधिका-याने आपले स्वत:चे मूल्यांकन केले पाहिजे. की खरच महापालिकेच्या सेवेमध्ये मी किती खरच चांगल काम करतोय. आणि ज्यावेळेस सगळ सभागृह एखादया अधिका-याच्या बद्दल चांगले बोलतात. याचा अर्थच तो अधिकारी खूप चांगले काम करतोय असे मला वाटते. कांबळेसाहेब त्याच उदाहरण आहे, आदर्श आहेत. आणि किमान आपल्या अधिका-यांना विनंती आहे की वरिष्ठांना तरी. म्हणजे आपल्या बद्दल खूप चांगलं बोलावं ही जर अपेक्षा असेल तर मागच्या काळामध्ये काय झाले हे सोडून दया पुढच्या काळामध्ये आपण संजय कांबळेचा आदर्श घेऊन चांगले काम कस करु याचा जर मनापासून निश्चय केला तर मला असं वाटतं की सभागृह त्यांचा निश्चितच आदर करील. त्याच अभिनंदन करेल. आणि माझ्या अगोदरच्या सगळया सदस्यांनी सांगितलं विलासराव तुम्ही स्टँडीगमध्ये ठराव केला. माझी या निमित्ताने महापौरसाहेब आपल्याला विनंती आहे. की काही जे चांगले अधिकारी आहेत ते सेवानिवृत्त होत आहेत. आणि हे खर आहे की त्यांना आपल्या सेवेमध्ये थोडीसी अडचण निश्चित येऊ शकते. एखादा अधिकारी कार्यकारी अधिकारी म्हणून ज्यावेळेस काम करतो. आणि ज्यावेळेस पद गेलेच्यानंतर त्यावेळेस त्याला तो अधिकार नसतो. एखादया ज्युनियर लेव्हलच्या अधिका-याला असं वाटू शकते की तुमचा आणि माझा संबंध काय आहे. तर ज्यांना कामच करायच नाही अशा पध्दतीचे प्रश्न विचारतात. माझी विनंती आहे की महापौरसाहेब की चांगल्या अधिका-

यांना आपण महापालिकेच्या सेवेच्या कामामध्ये त्यांना आपण कसं जोडून घेता येईल अशा पध्दतीचे निर्देश मा. आयुक्तांना दयावेत. दुसरी सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे आज माझी बहीण अश्विनीचा वाढदिवस आहे. अश्विनी जाधव यांचे खरतर योगायोग आहे की जीबी ३१ तारखेला आणि तिचा वाढदिवस आला. आपण काय तिचा वाढदिवस ३१ तारखेला आहे म्हणून जीबी नव्हती ठेवली. अश्विनीताईंचे याठिकाणी मनापासून खूप खूप अभिनंदन करतो. आणि तिघांनाही पुढच्या काळामध्ये खूप चांगल्या पध्दतीचे आयुष्य जगावे, सुखसमृध्दी भरभराट आपल्या सगळयांना मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.महापौर –** सर्व सन्माननीय सदस्य सर्व सभागृहाबरोबर मी देखील संतोष पाटील अतिरिक्त आयुक्त यांचे या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये मनापासून स्वागत करतो. तुमच्याकडून आमच्या या शहराला चांगल्या कामाची अपेक्षा आहे तस काम आपण कराव. त्याचबरोबर आपल्या संपूर्ण कारकिर्दीमध्ये संजय कांबळे साहेबांनी या पिंपरी चिंचवड महानगरपालिके बरोबर या शहराची चांगली अशी सेवा केली आहे. या जडणघडणीमध्ये त्यांचा खूपमोठा हातभार आहे. तुम्हाला देखील पुढील जीवनासाठी मी मनापासून शुभेच्छा देतो. त्याचबरोबर या सभागृहातील सदस्या अश्विनीताई जाधव यांना देखील मी अभिष्टचिंतन दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो आणि मी आयुक्तांना सुचना करतो की आपण पाणीपुरवठयावरचा खुलासा जी काही सदस्यांची मागणी होती, किंवा त्यादिवशी सदस्यांनी पाणीपुरवठयावरती आपले मत व्यक्त केले त्या आधारे आपण याठिकाणी खुलासा दयावा.

**मा.आयुक्त** - मा.महापौर साहेब, सन्मा सभागृह, सर्व पत्रकार बंधु. पिंपरी चिंचवड शहरात आल्यापासून आतापर्यंत या सभागृहात पाणी प्रश्नावरती तीन वेळा चर्चा माझ्यासमोर झालेली आहे. यापुर्वीच्या दोन्ही चर्चेच्या वेळेला माझी खूप मनस्वी इच्छा असूनही माझ अभिवेदन त्यावेळेला सभागृहासमोर झालेलं नाही. यावेळेला मला प्रशासनाच्या वतीने संपूर्ण पाणीप्रश्नावरती मत व्यक्त करण्याची ही संधी प्राप्त झालेली आहे. तरी या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहराचा संपूर्ण पाण्याचा जो लेखाजोखा आहे, जो पाणीप्रश्न आहे त्याच्यामागची कारणमिमांसा असेल, त्याच्यामागची कारण शोधण्याची प्रक्रिया असेल किंवा भविष्याचा वेध घेऊन करावयाच्या उपाययोजना

असतील त्या सर्व अनुषंगाने या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा तीन्ही चर्चांच्या वेळेला झाली. अत्यंत चांगली अशी शहराच्या भविष्याचा वेध घेणारी आजच्या समस्यांना निश्चितपणे सडेतोड असे प्रश्न विचारणारी आणि त्याचा ऊहापोह करणारी चर्चा सर्व सन्माननीय नगरसेवकांनी या सभागृहात केलेली आहे. त्याचा सांगोपांग विचार करुन आपणाकडून आलेल्या सुचनांचा संपुर्ण अभ्यास करुन आणि सर्व प्रशासकीय यंत्रणेशी चर्चा करुन जी काही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे त्याच्या आधारे मी सभागृहात जे विविध प्रश्न उपस्थित झाले व त्याच्या अनुषंगाने जे उपप्रश्न सादर झाले किंवा अनेकांच्या मनामध्ये काही शंका, किंतु निर्माण झाले त्याच्या अनुषंगाने मी माझ्या परीने खुलासा करण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या तहकुब सभेमध्ये सन्माननीय नगरसेविका अश्विनीताई चिंचवडे यांनी चर्चेला सुरुवात केली. त्यानंतर अनेक विषय या चर्चेमध्ये निघाले. विविध सदस्यांनी विविध स्वरुपाचे प्रश्न याच्यामध्ये उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे त्या क्रमाने मी उत्तरे न देता सगळया प्रश्नांना मी एकत्रित केलेले आहे. एका प्रकारचे प्रश्न एकत्रित केलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक सन्मा. सदस्य, सदस्यांचे नाव न घेता मी एकत्रित विस्तृत उत्तर देत आहे याची अनुमती मला सभागृहाने दयावी. विवीध गटनेत्यांनी देखील आपल्या शेवटच्या निवेदनामध्ये अनेक प्रश्न, अनेक बाबी मांडलेल्या आहेत. त्यांचा देखील परामर्ष मी माझ्या निवेदनामध्ये घेणार आहे. निश्चितपणे चर्चा ही सुरु राहील. आपल्या सगळयांचा मतमतांचा, सुचनांचा विचार करुन आपल्याला निरंतर शहराची पाणी समस्या, त्याच्यावरच्या कायमस्वरुपी उपाययोजना आणि लाँगटर्म प्लॅनींग की जेणे करुन हे शहर सस्टेनेबल आणि व्हिवेबल शहर होईल याच्या अनुषंगाने आपल्याला एकत्रित उपाययोजना करायची असल्याने आपल्या सर्वांच्या मदतीने, सहकार्याने आणि सुचनांनी आपण हे चांगल्या रितीने करु शकू याचा मला विश्वास आहे.

पहिल्या प्रथम ज्या मुद्दयावरुन या संपूर्ण पाणीप्रश्नाची चर्चा सुरु झाली की नवरात्रीच्या कालावधीमध्ये गणेशोत्सव संपल्यानंतर किंवा त्या कालावधीपासून या शहरामध्ये पाणी समस्या तत्कालीक निर्माण झाली त्याची कारणमिमांसा काय याच्यापासून मी चर्चेला खुलासा दयायला सुरुवात करणार आहे आणि त्यानंतर त्याची तत्कालीक कारणे असतील. काही भागामध्ये ठराविक प्रश्न या निमित्ताने समोर आलेले

आहेत. काही समस्या समोर आलेल्या आहेत. त्यांचाही मी ऊहापोह करणार आहे. त्यानंतर या प्रश्नांना आपण कशा पध्दतीने उपाययोजना करीत आहोत त्याचीही सुचना, माहिती मी आपल्यासमोर देणार आहे. प्रशासकाची भूमिका काय आहे असा देखील एक प्रश्न या संबंधाने निश्चितपणे चर्चा करण्यासाठी उपस्थित करण्यात आला होता त्याच्या अनुषंगाने देखील मी प्रशासकीय मत व्यक्त करणार आहे. पहिल्या प्रथम आपण सर्वजण जाणता की महानगरपालिकेच्या मध्ये पाणी किती उपलब्ध आहे. आपले पवना या धरणामध्ये आरक्षण आहे. त्या आरक्षणामधून आपण पवना नदीतून रावेत बंधा-यामध्ये पाण्याची उचल करतो. रावेत येथे आपले पंपींग स्टेशन आहे तेथून हे पाणी सेक्टर नंबर २३ येथील वॉटर ट्रीटमेंट प्लांटमध्ये घेतले जाते. वॉटर ट्रीटमेंट प्लांटमधून विविध आपल्या डिस्ट्रीब्यूशन मेन्सच्या माध्यमातून याचे डिस्ट्रीब्यूशन घर पातळीवरती विवीध माध्यमातून पोहोचविण्यात येते. याच्यामध्ये प्रमुख दोन भाग आहेत. आपले इकडे ग्रॅव्हीटी मेन्सच्या माध्यमातून जे सप्लाय होणारा महत्वाचा थेरगाव ग्रॅव्हीटीवरचा आणि चिंचवड ग्रॅव्हीटीवरचा काही भाग आणि पंपींगच्या माध्यमातून काही भागामध्ये जीकडे पंपींग करतो त्याच्यातला किवळे-रावेतचा भाग असेल, निगडी-प्राधिकरणाचा भाग असेल, नेहरुनगरचा भाग असेल, भोसरीचा भाग असेल किंवा डब्ल्यूटी पोर्टवरुन त्याच्या पलीकडच्या क्षेत्रामध्ये सप्लाय होणारा भाग असेल. एस-१, एस-२ या टाकीवरुन सप्लाय होणारा भाग असेल, असे विवीध भाग आपल्या शहरामध्ये आहेत. आपल्या शहराची जी वितरण व्यवस्था आहे ती शहराच्या जडणघडणीपासून किंवा त्याच्या पूर्वीपासून कार्यान्वित आहे आणि त्याच्यामध्ये वेळोवेळी टप्प्या-टप्प्याने विकास होत गेलेला आहे. थोडक्यात सुरवातीला सांगायची जर एक गोष्ट असेल तर आजच्या स्थितीमध्ये पिंपरी चिंचवड शहर हे सुरुवातीला एक कॉमपॅक्ट असे जुन्या मुंबई-पुणे हायवेच्या दोन्ही बाजूला वसलेले असे शहर होते. उत्तरोत्तर नवीन गावे त्याच्यामध्ये समाविष्ट करण्यात आली आणि अशा रितीने आजच्या स्थितीमध्ये पवनेच शहरातन वाढणार खोर दक्षिणेला आपल्या मुळेच्या बॉर्डरपर्यंत आपलं शहर वाढलेल आहे आणि इंद्रायणी नदीच्या पात्रापर्यंत आज आपल्या शहराचा विकास झालेला आहे. जर आपण शहराची रचना भौगोलिकरित्या विचारात घेतली तर दोन नदयांच्या खो-यांमध्ये आपलं शहर वसलेलं आहे. ही दोन नदयांची खोर म्हणजे, एक इंद्रायणी नदीच

खोर आहे आणि एक पवना नदीच खोरं याच्यामध्ये आपली ही जी लाईन आहे तिथे उंच असा भाग मध्ये येतो. आणि त्यामुळे काही भागामध्ये आपल्याला ग्रॅव्हीटीने पाणीपुरवठा करता येतो पण इंद्रायणी नदीच खोर हे पवना नदीच्या खो-यापेक्षा उंचावर असल्याने आपल्याला लाईन ओलांडून पंपींगच्या माध्यमातून असा पाणीपुरवठा करावा लागतो अशी सौरचना आपल्या इथे आहे. ज्या वेळेला शहराचा विकास होत होता त्या वेळेला शहर आपलं डब्ल्यूटीपीच्या आधारे विकसित होत गेलं. शक्यतो शहराचा विकास होत असताना ज्या भागामध्ये पंपींग असतं त्या भागापासून विकासाची प्रक्रीया सुरु होते आणि टेल असते ते सगळयात शेवटी विकसित होते. परंतु गेल्या काही वर्षामध्ये आपल्या निदर्शनास असं आलेल आहे की शहराचा जो गेल्या काही वर्षातला विकासाचा वेग आहे तो सात टक्के दराने आपले शहर दरवर्षी विकसित होत आहे आणि हा जो महत्वाचा शहर वाढीचा वेग आहे हा एक अनुभव सांगतो की आपला टेल जिकडे आहे डिस्ट्रीब्यूशन व्यवस्थेचे त्या भागामध्ये शहराची वाढ झपाटयाने होत आहे. टेल याचा जर अर्थ मला सांगायचा जर झाला तर आपल्या डिस्टीब्यूशन नलीकेचा शेवट हा ज्या भागामध्ये होतो, उदा. वाकडचा भाग असेल किंवा दापोडी, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरवचा भाग असेल किंवा आता नव्याने विकसित असलेला च-होली, मोशी, दिघीचा परिसर असेल हे आपल्या डिस्ट्रीब्यूशन व्यवस्थेच्या अनुषंगाने टेलला शेवटाला असलेले भाग आहेत आणि याच भागामध्ये गेल्या काही वर्षामध्ये झपाटयाने होणारा विकास आहे तो या भागामध्ये होताना दिसतो आहे. जर अशा अनुषंगाने विचार केलातर आतापर्यंत पाणी समस्या शहरामध्ये नव्हती आणि निश्चितपणे अचानकपणे पाणी समस्या उदभवल्यानंतर अनेकांच्या मनामध्ये किंतू निर्माण होणे हे साहजिक आहे. सुरुवातीलाच गेली महिनाभर आपल्या इथं जो डिस्टर्ब वॉटरसप्लाय शहरभर होता त्याची काही कारणमिमांसा आहे का, याचा शोध घेतला. आपण डब्ल्यूटीपी सेक्टर २३ याठिकाणी गटनेत्यांना देखील आमंत्रित करुन त्याची जी कारणमिमांसा होती ती त्यांच्यासमोर सादर केलेली होती. त्याचा थोडक्यात सारांश असा ४ ऑक्टोबर २०१८ रोजी रावेत बंधा-याची पाण्याची पातळी काही कारणाने कमी झाली. परत ५ ऑक्टोबर रोजी देखील पाण्याची पातळी कमी झाली. त्यानंतर पुनश्चः १२ ऑक्टोबर, १३ ऑक्टोबर, १४ ऑक्टोबर हे तिन्ही दिवस १५ ऑक्टोबर, १६ ऑक्टोबर १७ ऑक्टोबर

रोजीही बंधा-यातील पाण्याची पातळी विविध कारणांनी कमी झाली. १७ ऑक्टोबर रोजी पाण्याची पातळी कमी झालेली असताना १८ ऑक्टोबर रोजी वादळी वा-यामुळे रावेत येथील विदयुत पुरवठा खंडीत झाला. हा सगळा जर घटनाक्रम पाहिलातर तो नेमका सलग एका लागोपाठ एक दिवसामध्ये झाला. १२ ऑक्टोबर पासून १८ ऑक्टोबरपर्यंत या ना त्या कारणांमुळे विविध कारणांमुळे, एकतर रावेत बंधा-याची पाण्याची पातळी खालावल्यामुळे आपले दोन पासून चारपर्यंत पंप बंद पडले. ज्या वेळेला इलेक्ट्रीकल सप्लाय खंडीत झाला, त्यावेळेला आपल्याला दोन इलेक्ट्रीकल फिडर लाईन्सच्या माध्यमातून आपल्या रावेत पंपींग स्टेशनला एक्सप्रेस फिडरसच्या माध्यमातून सप्लाय होत असतो. मात्र विदयुत विभागाकडून प्रिकॉशन म्हणून किंवा अन्य काही कारणामुळे विदयूतपुरवठा खंडीत केल्यामुळे पुर्ण पंप त्यादिवशी बंद पडले. आणि अशा परिस्थितीमुळे एकंदरीत १२ ते १८ आणि त्याच्या आदिचा देखील आख्खा आठवडा पुनश्चः २४ ऑक्टोबर रोजी बंधा-यातील पाण्याची पातळी कमी झाली. ३० ऑक्टोबर म्हणजे कालच्या दिवशी देखील थोडीशी पाण्याची पातळी बंधा-यातील कमी झाली. या विवीध कारणांमुळे या महिनाभर आपल्याला खंडीत पाणीपुरवठयाला सामोरे जाव लागलेल आहे. याची कारणमिमांसा आपण घेतली असता ज्यावेळेला इरिगेशन विभागाच्या अधिका-यांशी चर्चा केली. त्यांच्याकडून देखील काही प्रमाणामध्ये नियोजन केले जाते. त्या नियोजनाची प्रणाली अशी आहे की आपल्याइकडे रावेत बंधा-याची पातळी दररोज सकाळी इरिगेशन पाटबंधारे विभागाचा कर्मचारी येऊन बंधा-याची पातळी घेतो आणि त्या बंधा-यातील पातळी पाहून त्याच्या कॅलक्यूलेशननुसार पवना धरणातून पाणी विसर्ग हे आपल्या इथं पॉवर स्टेशनच्या माध्यमातून सोडले जाते. पॉवर स्टेशन चालविण्यासाठी विसर्ग होत नसून आपल्या बंधा-यातील पाण्याची पातळी मेन्टेन करण्यासाठी तो विसर्ग केला जातो आणि त्याच पाणी विसर्गावरती पॉवर जनरेशनची देखील निर्मिती केली जाते. या प्रक्रियेमध्ये जर काही कमी जास्त झालतर त्याच्यामुळे ब-याच वेळेला ही पाण्याची पातळी कमी होण्यामध्ये किंवा अनधिकृत उपसा, समजा रस्त्यामध्ये काही कारणांने झाला किंवा अचानक तापमानामध्ये वाढ झाली किंवा त्यांच्या ऍडजेस्टमेंटमध्ये किंवा पाणी सोडण्यामध्ये किंवा पॉवर स्टेशनमध्ये काही बिघाड किंवा काही अडथळा निर्माण झाल्यास त्याच्यामध्ये अनेक

वेळेला आपल्याकडे पाणी कमी येते आणि अचानकपणे संध्याकाळच्या सुमारास आपल्या येथे बंधा-यातील पाण्याची पातळी कमी व्हायला सुरुवात होते. याच्यामध्ये अनेकांच्या मनामध्ये किंतु असतो की त्याच्यामध्ये आपण तात्काळ बदल का घडवून आणू शकत नाही. अशा स्वरुपाची चर्चा त्यादिवशी झाली. तरी मला सांगावेसे वाटते की ज्या वेळेला पवना धरणातून पाणी सोडले जाते तिथपासून रावेत बंधा-यामध्ये सोडलेल्या पाण्याचा इंपॅक्ट येईपर्यंत सुमारे १२ तासाचा अवधी दयावा लागतो. एवढा कालावधीत आपल्या इथं पाणी नदीच्या प्रवाहातून येत असतं आणि त्यामुळे जरी तिकडून कुठलीही ऍडजेस्टमेंट करायचा आपण प्रयत्न केला तरी सुध्दा त्याचा इंपॅक्ट हा १२ तासांनंतर दिसतो. त्यामुळे सकाळी ७ वाजता एखादी लेव्हल घेतल्यानंतर त्याच्यानुसार सोडलेले पाणी आपल्या इथं त्याचा इंपॅक्ट दिसण्यासाठी थेट आपल्याला संध्याकाळ उजाडते आणि सकाळचे पाणी सोडताना जर काही चूक झाली किंवा अडचण निर्माण झाली तर त्याचा इंपॅक्ट हा दर वेळेला आपल्याकडे संध्याकाळी होत असतो. आणि त्यामुळे डिस्ट्रीब्यूशन प्रणाली ही आपली दिवसा सकाळी अनेक भागामध्ये सकाळी ३ वाजल्यापासून ४ वाजल्यापासून पाण्याच्या सप्लायला सुरुवात होत असते. आपले पंप अविरत सुरु असतात. दर तासाला ते पाणी पंप करीत असतात. आणि त्यामुळे डिस्ट्रीब्यूशन एका मागोमाग एक, एका मागोमाग एक अशारीतीन सगळया भागांच डिस्ट्रीब्यूशन होत असताना अचानक संध्याकाळच्या वेळेला जर लेव्हल कमी झाली आणि काही अडचण झालीतर ती संपूर्ण प्रणाली पूर्ववत होण्यासाठी त्याला एक ते दोन दिवसांचा कालावधी जातो. आणि त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये जर सलग सात दिवस जर काही कारणाने आपली संपूर्ण पाण्याची यंत्रणा खंडीत होत गेली तर निश्चितपणे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा हा बाधीत होतो आणि तशीच काही स्थिती ही गेल्या महिनाभरामध्ये निर्माण झाल्यामुळे निश्चितपणे नागरीकांना मोठया त्रासाला सामोरे जावे लागलेलं आहे. या अनुषंगाने इरीगेशन विभागाच्या अधिका-यांबरोबर सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. आणि अशा स्वरुपाची खंडीतता निर्माण होऊ नये याकरीता समन्वय चांगल्या रितीने राखण्यासाठी आमच्याकडून प्रयत्न करणेत आलेले आहेत. यासोबतच विविध स्तरावरती म्हणजे १२ तासांचा जो पाण्याचा प्रवास असतो त्याच्यामध्ये विविध ठिकाणी जर आपल्याला लेव्हल इंडीकेटर्स लावून

त्याच्यावरती काही अडव्हान्स व्हॅल्यूम सिस्टीम डेव्हलप करता येऊ शकते काय याचा देखील शोध घेण्याचा प्रयत्न सध्या पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून करणेत येत आहे. यासोबतच पॉवर स्टेशनला काही बिघाड झाला किंवा अन्य काही झाले तर त्याची सूचना तात्काळ मिळावी की जेणेकरुन दिवसभरामध्ये पाणी वॉटरसप्लायचे आपल्याला ऍडजेस्ट करता येऊ शकेल त्याची अगाऊ सूचना सगळे कार्यकारी अभियंता जे डिस्ट्रीब्यूशन सांभाळतात त्यांना देता येऊ शकेल याच्यासाठी ऍडव्हॉन्स वॉर्निंग सिस्टीम डेव्हलप करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ती जर झाल्यास आपल्याला असा कुठला भाग जर खंडीत होणार असेल, पाणीपुरवठयाच्या रॉवॉटर पंपींगला जर बाधा येणार असेल तर त्याची ऍडव्हॉन्स वॉर्निंग देण्यासाठी सिस्टीम विकसित करण्यावरती आम्ही भर ठेवत आहोत. या सगळया प्रक्रियेमध्ये अनेकांच्या मनामध्ये अशी शंका असते की जर पंप बंद पडला तर तो सुरु करायला आपल्याला फार वेळ जातो. कारण आपल्याकडे दोन-दोन फिडर लाईन्स आहेत. मला याच्याबाबतीत देखील असा खुलासा सादर करावयाचा आहे की एखादी लाईन जर खंडीत झाली आणि त्या लाईनमधून आपल्याला दुसऱ्या लाईनवरती एक्सप्रेस फिडरला जर शिफ्ट करायचे असेल तरी अनेक पंप त्याठिकाणी आहेत आणि सगळे पंप एका वेळेला ऑन करता येत नाहीत. एका आड एक करावे लागत असल्यामुळे त्याच्यामध्ये सुमारे अर्ध्या तासाचा कालावधी जात असल्याने, अर्धा तास सुध्दा जरी जर बाधीत झाला तर त्याच्यामध्ये आपल्या शहरामध्ये तेवढाच भाग अबॅक होण्याची शक्यता नाकारता येत नसते आणि त्यामुळे या सगळया प्रक्रियेमध्ये विवीध वेळी काही डिफीकल्टीजमुळे आपल्या इथें काही भाग हा बाधीत होत गेलेला आहे. एक बाब नोंद घेण्याची अशी आहे की ज्या वेळेला शहराचा विकास होत होता त्यावेळेला १९९१ साली शहराची लोकसंख्या ही ५ लक्ष २० हजार इतकी साधारणतः होती. २००१ साली १० लक्ष इतकी लोकसंख्या शहरामध्ये होती. २०११ साली सुमारे १७ लक्ष ३० हजार इतकी लोकसंख्या आपल्या शहराची होती. त्याअनुषंगाने आपण या वाढीचा आलेख जर गृहीत धरलातर २०१७ साली सुमारे २२ लक्ष लोकसंख्या आपल्या शहरामध्ये आहे आणि २०१८ मध्ये साधारणतः फ्लोटींग पॉप्यूलेशन आणि अन्य बाबी गृहीत धरल्यातर आज आपल्याला सुमारे २५ लक्ष नागरीकांना पाणी पुरवठयाची सुविधा या शहरामध्ये निर्माण करावी लागणार आहे

किंवा उपलब्ध करुन दयावी लागणार आहे. या वेगाने वाढणा-या शहरामध्ये मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपली जी टेल आहे या टेलला डिस्ट्रीब्यूशन प्रणालीची सुविधा वाढ करणे, डिस्ट्रीब्यूशन व्यवस्थेमध्ये बदल करणे हे आपल्या सगळयांसाठी अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. तरी सुध्दा जर आपण पाहिले की अनेकांच्या मनामध्ये असा किंतू होता की सन २०१६ मध्ये परिस्थिती चांगली होती आणि अचानकपणे २०१८ मध्ये असं काय घडल की या कालावधीमध्ये आपल्या इथं पाण्याची व्यवस्था इतकी अचानकपणे बिघडलेली आहे. एक छोटासा आकडा आपल्यासमोर सादर करण्यासाठी असा आहे की १ एप्रिल २०१७ रोजी आपल्याकडे असलेल्या नळ जोडांची संख्या ०१,२४,९७३ इतकी होती आणि तेव्हापासून आजपर्यंत १ एप्रिल २०१७ ते १ ऑक्टोबर २०१८ या दिड वर्षाच्या कालावधीमध्ये वाढ झालेल्या नळजोडांची संख्या जर आपण बघितली तर ऑफिसियल नळजोड ऍड झालेले आहेत त्यांची संख्या ४८८१ इतकी असून सुमारे ४९,८२० सदनिकांची त्याच्यामध्ये वाढ झालेली आहे. याचाच अर्थ आपण जर गृहीत धरलातर अंदाजे केवळ या कालावधीमध्ये वाढ झालेल्या अधिकृत लोकसंख्येची संख्याच ही ३ लक्ष इतकी असून साधारणतः तितक्यांच्यासाठी आवश्यक पाण्याची वाढ त्याच्यामध्ये आपल्याला ऑफिसियली करावी लागत आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये २०१२ साली आपल्या इथं अनधिकृत घरांचा सर्व्हे करण्यात आलेला होता. त्याच्या अनुषंगाने सुमारे ६६ हजार अनधिकृत घरे आपल्या शहरामध्ये होती. मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये अनधिकृत घरांच्या संख्येमध्ये वाढ झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि त्याच्या अनुषंगाने पर्यायाने अनधिकृत नळ कनेक्शन, नळजोड याच्यामध्ये देखील वाढ झाली असण्याची शक्यता निश्चितपणे नाकारता येत नाही. आजच्या स्थितीली ३ ऑक्टोबर २०१८ रोजी उपलब्ध असलेल्या नळजोडांची संख्या १,२९,८५४ इतकी आहे. की जी सदनिका ज्या कव्हर करतात ती सुमारे ०३,७६,००० इतक्या सदनिका ऑफिसियल नळजोडीमध्ये कव्हर्ड होतात. मात्र जर २५ लाख इतकी लोकसंख्या आपली जर गृहीत धरली तर सुमारे ५ लाख आपल्या इथे सदनिका म्हणजे ५ लाख कुटूंबाना आपल्याला वॉटर सप्लाय करण्याची आवश्यकता आहे. याचाच अर्थ जर पाहिला तर आज कुठे ना कुठे तरी हा ताळमेळ आपल्या इथं बसत असल्याचे दिसून येत नाही. सुमारे सव्वालाख सदनिका असतील

किंवा सव्वालाख कुटूंबे असतील की ज्यांच्याकडे आज आपल्या वितरण व्यवस्थेमध्ये त्यांचा समावेश होताना या प्रक्रियेमध्ये दिसून येत नाही. त्याचा एक्झॅट आकडा शोधण्याचा मोठा उपक्रम प्रशासनाच्या वतीने चालू आहे. गेल्या काही महिन्यामध्ये ज्यावेळेला आपण पॉलिसी घेतली की नळजोडीच्या संदर्भामध्ये आपल्या इथे आपण अनधिकृत नळजोड हे आपल्याकडे मोठया प्रमाणात आहेत आणि याकरीता आपण चर्चा पहिल्या वेळेला या सभागृहामध्ये केली होती. सन्मा. नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी प्रश्न विचारला असता त्यावेळी सविस्तर चर्चा झाली होती. त्या चर्चेमध्ये अनेक मुद्दे त्यावेळेला उपस्थित झाले होते आणि त्या चर्चेच्या अनुषंगानेच आपण अनधिकृत नळजोडी नियमित करण्याचे धोरण प्रशासनाच्या वतीने तयार करणेत आले की ज्याला एप्रिल-मे महिन्यामध्ये या सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. या अनधिकृत नळजोडीच्या नियमितीकरणाच्या नंतर आपल्या इथे आपण संपूर्ण शहरभर सर्व्हेची प्रक्रिया राबविली. सर्व्हे प्रक्रिया करुन आपण जेवढे आपल्याला सापडले त्यांची नोंद, अनधिकृत नळ कनेक्शनची नोंद देखील घेतलेली आहे. या संपूर्ण माहितीच्या अनुषंगाने पुनश्च एक छोटीशी ॲडीशनल माहिती आपल्यासमोर मला सादर करायची आहे. ही सगळीच वितरण व्यवस्था होत असताना आपल्या शहरामध्ये सुमारे ४८० एमएलडी पाणी आपण दररोज रावेत बंधा-यातून घेतो. एमआयडीसीकडून देखील काही पाणी आपल्याकडे येते आणि असं एकत्रित पाणी आपण विवीध भागामध्ये सप्लाय करतो. आपल्या इकडे एकूण १,२९,८८५ इतके नळजोड आहेत. त्यांना साधारणतः आज पाण्याची उपलब्धता काय आहे. याचा देखील शोध घेतला असता सुमारे ४५ ते ४० टक्के नळजोड जे आहेत म्हणजे ५८,९३९ नळ जोड आहेत की ज्यांना सुमारे १२० एलपीसीडी म्हणजे मानांकापेक्षा कमी पाणी आपल्या इकडे उपलब्ध होताना दिसत आहे. साधारणतः १२,७९१ आपल्या इथं नळजोड जे आहेत की ज्यांना मानांकाइतके म्हणजे १२० एलपीसीडी ते १५० एलपीसीडी इतके पाणी आज उपलब्ध होत आहे. आणि १५० एलपीसीडी पेक्षा साधारणतः ५८,१२५ इतक्या नळजोडांना मानांकापेक्षा जास्त पाणी उपलब्ध होताना दिसत आहे. हा आकडा आपल्या बिलींग डेटावरुन काढलेला आकडा असून याच्यामध्ये अनेक ठिकाणी तफावत असण्याची वास्तवामध्ये देखील शक्यता नाकारता येत नाही. मात्र आपला जो बिलींग डेटा आहे त्या बिलींग

डेटाच्या माध्यमातून आजची स्थिती अशी आहे की जवळपास ४० ते ४५ टक्के नळजोड यांना पाणी हे मानांकापेक्षा कमी पडते आहे. आणि सुमारे ५५ टक्के इतक्या नळजोडांना मानांकाइतके किंवा मानांकापेक्षा अधिक पाणी आज शहरामध्ये उपलब्ध आहे. त्यामुळे आपल्या सगळयांच्या मनात एक प्रश्न आहे की शहरामध्ये समन्यायी आणि इक्वल डिस्ट्रीब्यूशन पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता आहे. आणि निश्चितपणे हा भाग आपल्या सगळयांच्या समोर या आकडेवारीच्या माध्यमातून येत आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की आपल्या इथं वाढीचा जो भाग आहे तो मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे टेलमध्ये म्हणजे ज्या भागामध्ये आपली वितरण व्यवस्था शेवटाला आहे त्या भागामध्ये वाढ वेगाने असल्याने आपल्याला पर्यायी वितरण व्यवस्था या भागासाठी निर्माण केल्याशिवाय समन्यायी पाणी वाटप करणे शक्य होत नाही. त्याच्यामध्ये कारण असे आहे की आपल्या शहरामध्ये ज्या डिस्ट्रीब्यूशन लाईन्स आहेत त्या डिस्ट्रीब्यूशन लाईन्समधन शेवटापर्यंत पाणी आपण घेऊन जात असतो. सेक्टर २३ आपल्या उत्तरेला आहे आणि तिकडून सगळया शेवटापर्यंत पाणी जात असताना शेवटाला जर पाणी मला पर्याप्त संख्येन दयायचे असेल तर त्यासाठी सुमारे १४ किलोमीटरचा प्रवास करुन हे पाणी हया संपूर्ण डिस्ट्रीब्यूशन चॅनलमधून येत असते आणि या प्रक्रियेमध्ये कुठे ना कुठे तरी मधली गळती असेल किंवा जास्त वाढीव पाण्याचा वापर असेल ही सगळी प्रक्रिया निरंतरपणे सुरु राहते. आणि त्यामुळे तोपर्यंत आपण पॅरलल यंत्रणेने कमांड ऐरीया सेग्रीगेट करुन जोपर्यंत पाणी टेल पर्यंत किंवा विविध भागापर्यंत त्या पध्दतीनं घेऊन जात नाही तोपर्यंत समन्यायी पाणी वाटप करणे आजच्या स्थितीमध्ये आपल्याला शक्य होत नाही. आणि त्यामुळे काही भागामध्ये असमतोल पाण्याचा उपलब्धतेचा हा राहणार असल्याची बाब देखील आपल्यासमोर उद्दक्त करावी लागते. याच्या व्यतिरिक्त अनेकांनी एक शंका मनामध्ये उपलब्ध केली होती की शहरामध्ये पाण्याच्यामध्ये गळती किती, चोरी किती आणि मोठया प्रमाणामध्ये आपला वित्तीय असमतोल जो आहे त्याचा जो एकूण खर्च आहे आणि आपले जे उत्पन्न आहे या पाणी व्यवस्थेवरचे याच्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये तफावत आहे. या विषयावरती मला आपल्या सगळयांना सांगावेसे वाटते की सुमारे ४० टक्के इतके पाणी हे आपण नॉन रेव्हेन्यूय वॉटर म्हणजे हिशोबबाहय पाणी या

पध्दतीने आज आपल्या शहरामध्ये आहे सुमारे ४० टक्के पाणी. हिशोबबाहय पाणी म्हणजे काय असा अनेकांच्या मनामध्ये प्रश्न असतो. ४० टक्के पाणी म्हणजे पाणी गळती आहे का तर असा त्याचा अर्थ होत नाही. याच्यामध्ये गळतीचा समावेश होतो, त्यासोबतच चोरीचा समावेश होतो. अनधिकृत कनेक्शनने वापरलेले पाणी देखील याच्यामध्ये समाविष्ट होते. याच्या व्यतिरिक्त अन्य बाबींसाठी वापरलेले पाणी असेल की जे हिशोबबाहय रहात असेल जस एखादया घरामध्ये मीटर आहे. पण मीटर योग्य रितीने कार्य करीत नसल्यामुळे त्याला झिरो रिडींग येत आहे. ते सुध्दा हिशोबबाहय पाणी झाले. अशा अनेक बाबींमुळे आपल्या शहरामध्ये एकूण हिशोबबाहय पाणी किती आहेतर ते साधारणतः ३८ ते ४० टक्क्याच्या वर आपल्या शहरामध्ये आज हिशोबबाहय पाणी आहे. आणि हे हिशोबबाहय पाणी आपल्या संपूर्ण शहराला निश्चितपणे अडचणीमध्ये आणणारी बाब आहे. ज्या वेळेला लोकसंख्या कमी होती. त्यावेळेला आपल्याला पाणी पर्याप्त होते. त्यामुळे आज जर कागदावर आपण बघितले तर लोकसंख्येच्या मानाने आपल्याला प्रत्येकाला पुरेसे पाणी असले पाहिजे. असं आज आपल्याला कागदावरती दिसते. पण ज्या वेळेला आपण आपल्याकडे हिशोबबाहय पाणी याच्यामध्ये समाविष्ट करतो त्यावेळेला मात्र आपल्या सगळयाच्या समोर निदर्शनास मला आणून दयायचय की आजची स्थिती ही अत्यंत क्रिटीकली, बॅलेन्स या स्टेजवरती येऊन पोहोचलेली आहे. की ज्यामुळे प्रत्येक भागामध्ये अत्यंत क्रिटीकली बॅलेन्स स्थितीन पाणीपुरवठा होत आहे. जर त्याच्यामध्ये कुठे जरी खंडीतता आली की तो भाग डिस्टर्ब होतो आणि त्यामुळे अनेक वेळेला कुठल्याही भागामध्ये खंडीतता झाली तरी, दोन तासाचा पॉवर सप्लाय जरी ब्रेक झाला, दोन तासांसाठी जर दोन पंप बंद पडले तरी कुठला ना कुठला तरी भाग त्याच्यामुळे अटॅक होतो आणि त्याच्यामुळे साहजिकच नागरीकांची मोठया प्रमाणामध्ये ओरड होते. हया सगळया बाबींमुळे आपल्याकडे पाणी उपलब्धता हा सध्याच्या स्थितीमध्ये अत्यंत अडचणीचा आणि बिकटचा सगळयांसाठी प्रश्न झालेला आहे. आपल्या सगळयांसाठी एनआयडब्ल्यू जर इतक असेलतर त्याच्या अनुषंगाने आपण आतापर्यंत काय उपाययोजना केल्या. हा प्रश्न अनेकांच्या मनामध्ये आहे. यासोबतच शहर वाढत आहे. हे शहर वाढत असताना वाढीव पाणी आणण्यासाठी आपल्या शहराने या प्रशासनाने काय उपाययोजना केल्या हा

देखील दुसरा प्रश्न अनेकांच्या मनामध्ये आहे. याच्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या कारण मिमांसेमध्ये न जाता जी वस्तुस्थिती आहे ती आपण सर्वांनी स्वीकारली पाहिजे. याच्यामध्ये दोन प्रकारच्या उपाययोजना आजपर्यंत प्रशासनाच्या वतीने राबविणेत आलेल्या आहेत. पहिली उपाययोजना राबविण्यात आली होती ती म्हणजे बल्क वॉटर अव्हॅलॅबीलिटी वाढविणे. म्हणजे एकूण वॉटर सप्लायमध्ये आपल्याला वाढ करणे. वॉटर सप्लायमध्ये आपल्याला वाढ करायची असेल तर कुठूनतरी आज आपल्याकडे जितके पाणी उपलब्ध आहे त्याच्यामध्ये आपल्याला कुठला ना कुठला तरी स्त्रोत निर्माण करावा लागणार आहे. हा वाढीव स्त्रोत आपल्याकडे उपलब्ध आहे. आणि पहिला स्त्रोत आपण एक्सप्लॉईड करण्याचा आता पर्यंत प्रयत्न केलेला आहे. तो म्हणजे पवना धरणामध्ये आपले असलेले संपूर्ण आरक्षण आपल्याला उपयोगात आणायचे असेल तर आपल्याला ते बंद पाईपलाईनच्या माध्यमातून आणल्यास आपल्याला वाढीव आरक्षण उपलब्ध होणार होते आणि हया भूमिकेतून जेएनएनयुआरएम अंतर्गत पवना बंद पाईपलाईन योजनेची जडणघडणी या प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. मात्र काही कारणांमुळे आपल्याकडे ही योजना पूर्ण होऊ शकली नसल्यामुळे एक टीएमसी इतक्यापर्यंत वॉटरला आज आपण दैनिकरित्या वार्षिकरित्या मूकत आहोत त्याच्या पर्यायाने आपल्याकडे दुस-या काही उपाययोजना आहेत का त्याच्या अनुषंगाने आपल्या इथे भामा-आसखेड आणि आंद्रा या दोन धरणामध्ये देखील आरक्षणाची उपलब्धता आहे. या दोन्ही धरणातून आरक्षणाची उपलब्धता मात्र आपल्याकडून मुदतीमध्ये पैसे न भरले गेल्यामुळे त्या धरणामधील आरक्षणाची उपलब्धता लॅप्स झाली होती. मात्र हीच उपलब्धता शासनाकडून रिस्टोअर करणेत आलेली आहे आणि त्यामुळे पुनश्चः आता आपल्याला या धरणातून बल्क वॉटर उपलब्ध करुन घेणे आता शक्य होणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये केवळ बल्क वॉटर उपलब्ध होऊन आपल्याला चालणार नाही. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला जे बल्क वॉटर एडिशनल आपल्याकडे उपलब्ध होईल त्याच्यावर ट्रीटमेंट करण्याची क्षमता देखील आपल्याला ठेवावी लागणार आहे. पुनश्च एकदा मला आपल्याला सांगावेसे वाटते की मी जी मूळ आपल्यासमोर मांडणी केली होती की आपल्या इथे दोन बेसिन आहेत. पवना बेसिन आहे आणि इंद्रायणी बेसिन आहे. आज आपण पवना बेसिनमधूनच पाणी इंद्रायणी बेसिनमध्ये

पाणीपुरवठयासाठी शिफ्ट करतो आहे. जर भविष्यामध्ये चांगल्या रितीने समतोल आणि अप्राप्तीक स्वरुपामध्ये डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था आपल्याला साकार करावयाची असेल तर इंद्रायणी बेसिनमधील पाणी इंद्रायणी बेसिनमध्येच आणुन ट्रीट करुन इंद्रायणी बेसिनमध्येच सप्लाय करणे. आणि पवना बेसिनमधले पवना बेसिनमध्ये पाणी ठेऊन पवना बेसिनमध्ये होणा-या वाढीसाठी तितक पर्याप्त स्वरुपामध्ये पुरविणे हा आपला भविष्याचा मार्ग असला पाहिजे आणि त्याच्या अनुषंगाने आपल्याला मार्गक्रमणा करणे अत्यंत आवश्यक आहे. आणि हे जर करायचं असेल तर पहिल्या प्रथम आपल्याला जे रिस्टोर झालेले आरक्षण आहे ते आपल्याला ताब्यात हक्काने करुन घेणे ही सगळयात महत्वाची बाब ठरणार आहे. आणि त्यामुळे प्रशासनाच्या वतीने लवकरच आपल्याला हया आरक्षणाचा हप्ता इरीगेशन डिपार्टमेंटने पाडून दिलेला आहे. त्याचा पहिला हप्ता भरण्यासाठी आपल्याकडे ज्या काही वाढीव निधीची आवश्यकता लागेल त्याच्यासाठी प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव सादर करणेत येणार आहे. मात्र हे करीत असताना आपल्या भागामध्ये आपल्याला केवळ बल्क वॉटर आरक्षण उपलब्धता करुन भागणार नाही. आपल्याला याच्यासाठी बल्क वॉटर पाणी उचलणं ते बंद पाईपलाईनच्या माध्यमातून आणणं, त्याच्यावरती वॉटर ट्रीटमेंट करणे. त्याच्यासाठी वॉटर ट्रीटमेंट प्लॉ ट तयार करणे, वॉटर ट्रीटमेंट प्लांट तयार केल्यानंतर त्याच्यापासून भविष्यामध्ये पुनश्चः अस्तित्वात असलेले डिस्ट्रीब्यूशन चॅनेल वेगवेगळे करणे. डिस्ट्रीब्यूशन चॅनेल पर्यंत त्याचा सप्लाय करणे, नवीन टाक्यांची निर्मिती करणे आणि त्या नवीन टाक्यांमधून नवीन वाढ होणा-या भागापर्यंत डिस्ट्रीब्यूशन लाईन्स टाकणे, याची संपूर्ण रचना आपल्याला नव्याने करावी लागणार आहे. आणि हे खूप मोठया प्रमाणामध्ये घ्यावयाचे काम त्याचे नियोजन जर आज केले तर पुढील तीन वर्षमध्ये कुठे ना कुठे तरी आपल्याकडे म्हणाव इतकी परिस्थिती चांगली होईल त्याच्यामध्ये २०३० पर्यंत आपल्या शहरवासियांना पर्याप्त स्वरुपामध्ये पाण्याची उपलब्धता होऊ शकेल. हया सगळया प्रक्रियेमध्ये काही स्थानिक पातळीवरती देखील प्रश्न आहेत. हे झाले बल्क वॉटर संदर्भातले प्रश्न. त्याच्या अनुषंगाने देखील काही स्थानिक प्रश्न नगरसेवक, नगरसेविका यांनी मांडलेले आहेत. त्याच्यामध्ये काही प्रॉब्लेम असतील की काही भागामध्ये एका भागामध्ये भरपूर पाणी आहे.

त्याच्यातल्याच दुसऱ्या दोन गल्ल्यांमध्ये पाणी अत्यंत कमी आहे. एखादया भागामध्ये दूषित पाण्याचा सप्लाय होत आहे आणि मोठया प्रमाणामध्ये आळया पाण्यामध्ये दिसून येत आहेत किंवा दूषित पाण्यास पूर्ण गटाराचा वास येतो आहे. अशा स्वरुपाच्या तक्रारी देखील उपलब्ध झालेल्या आहेत. आम्ही संपूर्ण शहराची माहिती घेतली असता एकूण १७ महत्वाचे भाग असे आहेत की त्याच्यामध्ये काही लोकल एरियामध्ये प्रॉब्लेमस आहेत. त्याच्यामध्ये प्रामुख्याने वाकड, पिंपळे निलख, थेरगावचा काही भाग रहाटणीचा काही भाग, पिंपळे सौदागरचा काही भाग, ताथवडे बायपास रोडच्या पश्मिचेकडील भाग, वैदूवस्ती व सुदर्शननगरचा भाग, दापोडीचा काही भाग, दिघी, मोशी, देहू-आळंदी रस्त्याच्या कडेचा नव्याने विकसित होत असलेला भाग, चऱ्होली, चक्रपाणी वसाहत, भगतवस्ती, रुपीनगर, देहू-आळंदी रस्ता जाधववाडीचा काही भाग, यमुनानगर, संततुकारामनगर असे काही प्रभावीत भाग आहेत की ज्या भागामध्ये निश्चितपणे पाण्याची स्थानिक अडचण आहे. संततुकारामनगर असेल किंवा अन्य काही भाग असतील त्याठिकाणी काही लोकल समस्या या अनुषंगाने आपण पाहिलेल्या आहेत. याच्या व्यतिरिक्त देखील काही ठराविक भागामध्ये काही स्मॉल पॉकेटस आहेत काळेवाडीमध्ये, जरी काळेवाडी आपण गृहीत धरली तर ती सखल भागामध्ये आहे तरी सुध्दा काळेवाडीचा एखाद दुसरा गल्ल्यांचा किंवा काही नगरांचा भाग हा थोडासा उंचावर असल्याने जर कुठेतरी प्रार्दूभाव झाल्यास त्या स्थानिक भागामध्ये अडचण निर्माण होत असते. अशा विविध भागांचा आपण साखल्याने विचार केलेला आहे. प्रशासनाच्या वतीने सर्व कार्यकारी अभियंता, उपअभियंता, आणि त्यांच्या हाताखाली काम करणारे जे.ई. यांना सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत. की हया ज्या स्थानिक अडचणी आहेत यांच्यावरती स्थानिक पातळीवरती विशेष लक्ष घालून त्यांच्यामध्ये उत्तरे काढण्याची आवश्यकता आहे. याच्यामध्ये मात्र माझी सर्व सन्माननीय नगरसेवकांना महत्वाची विनंती आहे हे सगळे करण्यासाठी आपल्याला स्थानिक पातळीवरती पाण्याची उपलब्धता वाढविणे हे आपल्या सगळयांच्या समोर एकत्रित लक्ष्य आणि ध्येय असले पाहिजे आणि हे करण्यासाठी तात्काळ उपलब्ध होणारा मार्ग कुठला असं जर मला विचारल तर तो म्हणजे शहरात होत असलेली पाण्याची गळती आणि चोरी रोखणे. त्यासाठी आपल्याला २४X७ पाणीपुरवठा योजनांची तात्काळ आणि

तातडीन प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणे हा आपल्या सगळयांसाठी सार्वत्रिक हिताचा अत्यंत महत्वाचा आणि निकडीचा प्रश्न आहे. याच्यामध्ये २४X७ याच्याबाबतीत देखील सविस्तर चर्चा या सभागृहामध्ये गेल्या चर्चेमध्ये झाली. २४X७ याच्या बाबतीमध्ये मला काही विश्लेषण करायचे आहे. अनेकांच्या मनामध्ये २४X७ च्या बाबत अशी संकल्पना आहे की २४X७ म्हणजे २४ तास पाणीपुरवठा आपल्याला होणार आहे. ही बाब निश्चितपणे त्याच्यामध्ये उद्दत्त आहे की २४ तास जर पाणी आपल्याकडे पाईपमध्ये आणलेतर त्याचे संपुर्ण ध्येय या योजनेचे आहे. मात्र तोच एकमेव त्याच्यामधला आऊटकम आहे असा त्याचा अर्थ होत नाही. २४X७ योजना ज्यावेळेला आपण राबवायला घेतली त्याच्यामागे अनेक बाबी आणि त्याच्यातल्या अनेक उपंग त्याच्यामध्ये समाविष्ट होतील. सगळयात महत्वाची जी बाब २४X७ अंमलबजावणी मध्ये जी आहे ती म्हणजे आपल्या सगळयांचे लक्ष मी याच्यासाठी वेधू इच्छितो की २४X७ याचा अर्थ समन्यायी पाणी वाटप करण्यासाठी जी यंत्रणा लागणार आहे ती उपलब्ध करुन देणे. काही भागांना ३०० एलपीसीडी प्रमाणे पाणी आहे ३०० एलपीसीडी प्रमाणे पाणी असल्याने त्याला २४ तास पाणी असल्यासारखेच आहे. एकदा पाणी आले की तीन दिवस पुरेल इतके आज पाणी आहे. पण काही भाग असे आहेत की त्यांना ४० एलपीसीडी प्रमाणेच पाणी मिळतेय आणि त्यामुळे त्यांना टँकरवरती विसंबून रहावे लागत आहे. तर याच्यामध्ये जर कुठेतरी तफावत दुर करायची असेल तर समन्यायी पाणी वाटप करावे लागेल. या सोबतच डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था नीट करुन आपल्याला याच्यामध्ये पाण्याची उपलब्धता वाढवावी लागेल. बल्क वॉटर आपल्यापर्यंत येईपर्यंत सुमारे तीन वर्षाचा कालावधी हा किमान लागणार आहे. तर दरम्यानच्या कालावधीमध्ये जी गळती होते आहे, अनधिकृत पाण्याची चोरी होत आहे. याच्यावरती निर्बंध घातल्यास आपल्याला सुमारे १५ ते २० टक्के पाणी अतिरिक्त उपलब्ध होणार आहे. आणि हे आपल्या सर्वांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. जर आपण ही गळती रोखली तर आपल्याला अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल. स्थानिक पातळीवरती ज्या अडचणी आहेत त्या निश्चितपणे दूर होण्यास आपल्याला सहयोग होणार आहे आणि त्यामुळे सर्व सभागृहाला एक विनंती आहे की २४X७ या योजनेंतर्गत आपल्याकडे संपूर्ण पॅकेजेस अंमलबजावणी करणेसाठी आपल्याकडे यंत्रणा आहे. ४० टक्के शहरासाठी

आपल्याकडे ड्रेनेज विभागांतर्गत एक एजन्सी नियुक्त करणेत आली आहे. आणि अमृत योजनेतंर्गत उर्वरीत ६० टक्के शहरासाठी चार टाक्याच्या अंतर्गत आपण तीन एजन्सीजची नियुक्ती केलेली आहे आणि हया सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी आपल्या शहरामध्ये सुरु आहे. मात्र मला आपल्या सगळयांच्या समोर सांगायचे आहे की जर आपल्याला पुढील मे महिन्याच्या अखेरीस पर्यंत जो ड्रायस्पेस आहे याच्यामध्ये जास्तीत जास्त पाईपलाईन्स आपण बदलू शकलो, जास्तीत जास्त वैयक्तिक नळजोड आपण बदलू शकलो तर मोठया प्रमाणामध्ये कामाची अंमलबजावणी करणे आपल्याला शक्य होईल. जेणेकरुन आपण १५ ते २० टक्के पाण्याची उपलब्धता वाढवून स्थानिक पातळीवरती जे प्रश्न आहेत त्याच्यामध्ये आपण निश्चितपणे सुधारणा आणू शकतो. यासोबतच २४X७ योजनेमध्ये आपल्या शहरामध्ये १७ कमांड एरियाज आहेत डीएमए आणि विवीध भागामध्ये वॉटर झोनच डिस्ट्रीब्यूशन करुन ५० च्या आसपास आपल्याकडे डीएमएस तयार केलेले आहेत. याच्यामध्ये डीएमएवाईज डिस्ट्रीब्यूशन केल्यामुळे एखादया भागामध्ये जास्त पाणी जाते दुस-या भागामध्ये कमी पाणी येते. याच्यामध्ये देखील सुधारणा होणार आहे आणि हे डीएमएस सेग्रीकेशन करण्यासाठी आवश्यक असणारी जी इंटर कनेक्शन्स किंवा काही नवीन पाईप लाईन टाकण्याची जी योजना आहे त्याचा देखील अंर्तभाव या २४X७ योजनेमध्ये आहे आणि याची संपूर्ण अंमलबजावणी केल्यानंतर समन्यायी पाणी वाटप करणे आपल्याला शक्य होणार आहे. वाकड असेल किंवा पिंपळे निलखचा भाग असेल या भागांना जर पाणी पोहोचवायचे असेलतर आपल्याला थाऊजंट मिलीमिटरची पॅरेलल पाईपलाईन तिथपर्यंत जोपर्यंत पाणी घेऊन जात नाही तोपर्यंत आपल्याला या भागामध्ये पाणी वाढविणे शक्य होत नाही आणि त्यामुळे जोपर्यंत ही अंमलबजावणी आपण पूर्ण करु शकणार नाहीत तोपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये कितीही म्हटले तरी आपल्याला या भागामध्ये पाण्याची वाढ करणे शक्य होत नाही आणि त्यामुळे प्रशासनाच्या वतीने या एक हजार मिलीमीटर पाण्याची पाईप लाईन तात्काळ पूर्ण करणे हेच लक्ष्य ठेवण्यात आलेल आहे. याच अनुषंगाने विषयामध्ये, चर्चेमध्ये असा एक मुद्दा निघाला होता की जी यंत्रणा २४X७ च्या अंमलबजावणी करीता ४० टक्के कामासाठी नियुक्त केलेली आहे ती अत्यंत फेल गेलेली आहे. त्यांचे कामकाज प्रभावीपणे झालेले नाही, त्यांच्यावरती

कारवाई करावी. मला सभागृहासमोर सांगावेसे वाटते की आम्ही या अनुषंगाने या एजन्सीशी सविस्तर चर्चा केलेली आहे. आपण जेएनएनयुआरएम अंतर्गत जो उपक्रम राबविला होता तो कॅफ्टेस प्लस ऑफेक्स म्हणजे पाच वर्षाच्या ओव्हरएण्ड कॉन्ट्रॅक्टसह आपण दिलेले ते कॉन्ट्रॅक्ट आहे आणि त्यामुळे ते त्यावेळेला राबविणेत आलेल्या योजनांपैकी एक नाविन्यपूर्ण असा प्रकल्प आपण त्यावेळेला राबविला होता. मात्र नाविन्यपूर्ण प्रकल्प राबवित असताना आज प्रकल्पामध्ये थोडी कॉम्प्लेसिटी निर्माण झाली होती. आज आपण जवळपास ३० टक्के इतक काम या प्रकल्पाचे पूर्ण केलेले आहे आणि अदयापपर्यंत उर्वरीत ७० टक्के काम करणे बाकी आहे. परंतु यासोबतच ओरीयण्टली रिसपॉन्सिबिलीटी देखील या एजन्सीकडे असल्याने कॉन्ट्रॅक्ट थोडेस कॉम्पलेक्स आहे. जर आजच्या स्थितीमध्ये आपण या एजन्सीला टर्मिनेट करण्याचा निर्णय घेतला जो की आपण घेऊ शकतो आणि तो तात्काळ घेऊ शकतो अशा स्थितीमध्ये आपण आहोत. तथापि, ही गोष्ट जरी आपण टर्मिनेशनची केली तरी इट वील बी लूज लूज सिच्यूएशन. वील लूज सिच्यूएशन ऍचिव्ह करणे हे जर आपल्याला साध्य करायचे असेल तर कुठल्याही परिस्थितीमध्ये आपल्याला आहे त्या यंत्रणेकडन प्रभावीपणे काम करण्यासाठी त्यांच्या मागे उभे राहून त्यांच्याकडन काम करुन घेणे हा आपल्याकडे सर्वात सोपा आणि जलद मार्ग आपल्यासमोर आहे. जर एजन्सीला टर्मिनेट केले तर टर्मिनेशन प्रोसेस करणे, कॉम्प्लेन्सी जी आहे लीगल कॉम्प्लेन्सीची पुर्तता करुन त्याच्यातून बाहेर येऊन नवीन एजन्सी नियुक्त करण्यासाठी देखील आपल्याकडे साधारणतः पुढील तीन महिन्याचा कालावधी किमान राहील आणि जो महत्वाचा कालावधी ड्रायस्पेसचा आहे तो आपण गमावून बसू. जेणेकरुन आपल्याला हाताशी काही येणार नाही. त्यामुळे सध्याच्या स्थितीमध्ये मी आपल्यासमोर निवेदन करतो आहे की या एजन्सीकडूनच प्रभावीपणे काम करुन घेण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. ही बाब आपल्या सगळयांच्या निदर्शनास मला आणायची आहे. तथापि त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची कार्यान्वीतता होताना जर दिसले नाही, त्यांचेकडून मदत करुनही जर त्यांनी पुढे काम केले नाहीतर निश्चितपणे त्यांना टर्मिनेट करुन त्यांच्यावरती जबरदस्त दंड करुन त्यांना काळया यादीत टाकण्याची भूमिका प्रशासनाने घेतलेली आहे. हे मी आपल्यासमोर निवेदन करु इच्छितो.

यासोबतच अमृत योजनेअंतर्गत नवीन चार पॅकेजेसच काम आज आपण शहरामध्ये सुरु केलेले आहे. या चार पॅकेजेसच्या बाबतीत आपल्याला सविस्तर माहिती देत असताना ही सर्व पॅकेजेस अमृत योजनेच्या गाईडलाईन्स अंतर्गत झालेली असल्याने चोवीस महिन्याचा कालावधी या पॅकेजेसला आहे. साधारणतः २ टक्के ते ४ टक्के अबोव्ह या रेंजमध्ये ही पॅकेजेस आपल्याकडे अवॉर्ड झालेली आहेत. मात्र एक बाब आपल्या निदर्शनास आणायची आहे की या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ही पॅकेजेस अवॉर्ड करीत असताना त्यांना कुठल्याही प्रकारचे एस्क्लेशन क्लॉज आपण या कॉन्ट्रॅक्टमध्ये या कंत्राटदारांना दिलेले नाही. आणि त्यामुळे मुदतीत काम करण्यावाचून या कंत्राटदारांना पर्याय नाही. दुसरी बाब मला सांगावीसी वाटते की याच वेळेला जगभरामध्ये क्रूड ऑईलचे दर वाढत असल्यामुळे एसडीपी पाईपच्या किंमतीमध्ये देखील वाढ होत आहेत. आणि त्यामुळे आपण जर या प्रकल्पाच्या अंमलबजावणीला काही कारणामुळे दिरंगाई करीत असलो, कुठेतरी स्लो होताना दिसले तर निश्चितपणे याच्या खर्चामध्ये वाढ होणार आहे आणि त्यामुळे प्रकल्प अंमलबजावणी करणे देखील भविष्यामध्ये कठीण होऊ शकेल आणि त्यामुळे  या सभागृहामध्ये मी आपणा सर्वांना विनंती करतो की आपल्या सगळयांच्या सहकार्याने पुढील सात महिन्याच्या कालावधीमध्ये जर आपण एकत्रितपणे, एकजूटपणे चांगल्या रितीने कामाची अंमलबजावणी करु शकलो तर पुढील सात महिन्यामध्ये आपआपल्या सगळया भागामध्ये आपण या प्रकल्पाची व्यवस्थित अंमलबजावणी करु शकू जेणे करुन हे २० टक्के पाणी अतिरीक्त आपल्याकडे उपलब्ध होईल, जेणेकरुन स्थानिक समस्या सोडविण्यासाठी आपल्याला निश्चितपणे मदत होईल. तिसरा महत्वाचा मुद्दा असा आहे की अनधिकृत नळजोड कनेक्शन्स. मोठया प्रमाणामध्ये या शहरामध्ये अनधिकृत नळजोड कनेक्शन्स आहेत. अनधिकृत नळजोड कनेक्शन्स जर आपल्याला नियमित करायचे असतील तर एक आपल्याला मोठया प्रमाणामध्ये संघटीत असा ड्राईव्ह या शहरामध्ये घ्यावा लागणार आहे. आज शोध घेतल्याप्रमाणे साधारणतः अनधिकृत नळजोडी आम्हाला १५ हजाराच्या आसपास सापडलेल्या आहेत. तथापि, याच्याव्यतिरिक्त देखील असा एक प्रकार आपल्या शहरात आहे की एक अधिकृत कनेक्शन असतानाही दोन अनधिकृत कनेक्शन्स घेतल्याचे देखील काही भागामध्ये निदर्शनास आलेले आहे. त्याचे उत्तम कारण म्हणजे ज्या

भागामध्ये सुरवातीला बैठी घरे होती आणि त्या घरांनी आपल्या घरांच्यावरती एक माळा, दोन माळा अशा प्रकारचा विकास केलेला आहे. अशा ठिकाणी ज्यावेळेला मल्टीटेनामींट हाऊसहोल्ड असते त्यावेळेला एक कनेक्शन घेऊन खाली संप आणि पंप अरेजमेंट करण्याची अपेक्षा असते. मात्र अनेक भागामध्ये पूर्वी विकसित झालेले भाग असतील की ज्या ठिकाणी संप आणि पंप करण्याची जागा नसल्यामुळे अनेक भागामध्ये पहिल्या माळयावर, दुसऱ्या माळयावर काही काही भागामध्ये तर चौथ्या किंवा पाचव्या माळयावर देखील डायरेक्ट कनेक्शननी पाणी पुरवावे अशी अपेक्षा अनेक भागांमध्ये नागरीकांची आहे. आणि त्यामुळे ही कनेक्शन्स जोपर्यंत सिंगल कनेक्शनला शिफ्ट होत नाहीत त्या भागामध्ये कंबाईन पंपची अरेंजमेंट होत नाही तोपर्यंत या भागांना आपल्याला आजच्या स्थितीमध्ये चांगल्या रितीने पाणीपुरवठा करणे शक्य होणार नाही. ज्यावेळेला वरील माळयावरती पाणीपुरवठा करण्याची क्षमता प्रशासनाकडे नसते त्यावेळेला अनेक ठिकाणी अशी बाब निदर्शनास आलेली आहे की नागरीकांच्या वतीने त्याठिकाणी टुल्लू पंपचा, मोटारचा वापर केला जातो आणि मोटारचा वापर करुन पाणी ओढून घेण्याकडे नागरीकांचा कल होताना दिसतो. नागरीकांचे म्हणणे असे असते की आम्ही जास्त पाणी थोडेच घेतो पण त्याचा दुष्परिणम असा होतो की आपल जे नळजोड असते त्याच्या मधल सक्सेशनच्या माध्यमातून पाणी ओढल्यामुळे अनेक वेळेला नळजोड जिकडे टॅब मारलेला आहे तिकडे तो लिकेज होतो, तीकडे त्याच्यामध्ये तूटफूट होते आणि पर्यायाने आपले पाणी वाया जाते. आणि त्यामुळे नळजोड करण्यावरती टुल्लू पंप लावणे हे देखील आपल्या शहरासाठी मोठी घातक गोष्ट आहे आणि त्याच्यावर देखील कारवाई करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने या पॉलिसीच्या अनुषंगाने आपण १५ हजार जी नळजोड आपण अनधिकृत शोधलेली आहेत त्यांचे अधिकृत करण्यासाठी ३१ तारखेपर्यंतची मुदत प्रशासनाच्या वतीने नागरीकांना देण्यात आलेली आहे. आज संध्याकाळपर्यंत जेवढे अर्ज आपल्याकडे प्राप्त होतील त्यांना या संपूर्ण अधिकृत कनेक्शनच्यामध्ये घेण्यात येईल. पुढील तीन महिन्यांमध्ये यांना त्यांची कनेक्शनस बदलून देण्याचा प्रयत्न प्रशासनाच्या वतीने करण्यात येणार असून जे कनेक्शन्स याच्यापुढे अनधिकृत स्वरुपात आढळून येतील त्यांच्यावरती चोरीचा गुन्हा दाखल करुन ती कनेक्शन्स तोडण्याची प्रशानसची

भूमिका आहे. या अनुषंगाने पोलिसांची मदत घेऊन पोलिसांच्या माध्यमातून आणि आपल्या प्रशासनाच्या माध्यमातून त्यांच्यावरती कारवाई करण्याची भूमिका प्रशासनाने घेतलेली आहे. या व्यतिरिक्त अनेक भागामध्ये पाणी चोरी कुठे होते का या अनुषंगाने अनेक मुद्दे देखील मांडण्यात आले. कनेक्शनच्या माध्यमातून चोरी होते, मोठया प्रमाणामध्ये टँकरचा वापर आहे का, अनधिकृत बांधकामे होतात का किंवा बांधकामे कुठली अधिकृत होतात. त्यांनी कुठे आपली कनेक्शन घेतलेली आहेत का. याचा देखील शोध घेण्याचा प्रयत्न प्रशासनाने केलेला आहे. काही चुकीच्या पध्दतीने पाणी उचलण्याची शक्यता आम्ही आयडेंटीफाय केलेली आहे आणि त्यांच्यावरती प्रशासनाच्या वतीने पाळत ठेवण्यात येत आहे. ज्यादिवशी रंगेहात अशा पाणी चोरांना पकडण्यात येईल त्यावेळेला त्यांच्यावरती तात्काळ प्रशासनाच्या वतीने फौजदारी स्वरुपाची गुन्हे दाखल करण्यात येतील. चोरीचे गुन्हे दाखल करणेत येऊन त्यांचेवरती पोलीस केस करण्यात येतील याची देखील नोंद प्रशासनाने घेतलेली आहे. या व्यतिरिक्त आजूबाजूच्या शहरामध्ये गहुंजे परिसरामध्ये नवीन होणाऱ्या विकासामध्ये काही चुकीच्या पध्दतीने पाण्याची उपलब्धता होते आहे का याचा देखील शोध घेण्यात येत आहे. बल्क वॉटर ज्याठिकाणी वापरात आहे तिथे देखील शोध घेण्यात येत आहे. या व्यतिरिक्त आणखी एक सुचना पुढे आली होती की ज्या अनेक नवीन सदनिका बांधण्यात आलेल्या आहेत त्यांच्यामध्ये पर्यावरण विकास करीत असताना कंपलसरी एसटीपी बांधा करणेत आलेले आहे. मात्र अनेक इमारतीत आपल्याकडे बांधलेल्या एसटीपीचा वापर करीत नाहीत असे दिसून आलेले आहे आणि त्यामुळे त्याच्या अनुषंगाने मोठया प्रमाणात शोध मोहिम प्रशासनाच्या वतीने घेण्यात येत आहे. बांधकाम परवानगी विभागाचे बीट निरिक्षक यांना या दोन्ही गोष्टींची शोध मोहिम घेण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. केवळ नागरीकांना एसटीपीचा वापर करुन रीवॉटर युज वाढवा असं सांगून प्रशासन थांबत नसून त्यांना त्याच्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी देखील प्रशासनाने पावले उचललेली आहेत. याकरीता मिळकत करामध्ये सूट देण्यासाठी पर्यावरण संतुलित सोसायटया जे एसटीपीचा पाण्याचा पुनरवापर करतील, कचऱ्याचे स्वत:च्या पातळीवरती नियोजन चांगल्या रितीने करतील अशा सोसायटयांना त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दहा टक्के, साडेसात टक्के आणि पाच टक्के

इतकी मिळकत करामध्ये सूट देण्याची देखील भूमिका आणि पॉलिसी सुरु करण्याचे प्रशासनाने केले असून तो प्रस्ताव देखील स्थायी समिती मान्यतेने या सभागृहासमोर येणार आहे. अशा रितीने केवळ एका बाजूला जे चुकीच्या पध्दतीने पाणी वापर करतात त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका प्रशासनाची असताना दुस-या बाजूला जे चांगल्या रितीने पाण्याचा पूनरवापर करतील, पाण्याची उपलब्धता आपल्या शहराची वाढविण्यासाठी मदत करतील अशा सोसायटयांना मदत करण्याचा, प्रोत्साहन देण्याची भूमिका देखील प्रशासनाने घेतलेली आहे. हे करीत असताना एकूण शहरामध्ये किती भागामध्ये टँकर पुरवठा केला जातो याची सविस्तर माहिती प्रशासनाने घेतलेली आहे. किती टँकरपुरवठा हा कुठल्या भागामध्ये साधारणतः किती ट्रिप दररोज टाकतात याची सविस्तर माहिती घेण्यात आलेली आहे. प्रत्येक टँकरधारकाचा सोर्स काय आहे. त्याची माहिती घेण्यात आलेली आहे. आणि पुढील काही कालावधीमध्ये प्रत्येक सोर्सची तात्काळ पडताळणी करण्याची भूमिका देखील प्रशासनाची आहे आणि तशा सूचना बीट निरिक्षक आणि पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी यांना देण्यात आलेल्या आहेत. आणि त्यामुळे त्यांच्या माध्यमातून कुठूनही पाण्याची चोरी होऊ नये याच्यासाठी खबरदारी प्रशासनाच्या वतीने घेण्यात येत आहे. आपल्या एसटीपीमध्ये निर्माण होणारे पाणी जे आहे ते रिसायकल वॉटर आहे. याचा वापर गार्डनसाठी, बांधकामासाठी करण्याचे धोरण प्रशासन राबवीत आहे आणि त्याच्यासाठी जे नवीन इमारतीचे बांधकाम होणार असेल त्यांना जर पाण्याची आवश्यकता असेलतर टॅकरच्या माध्यमातून ते रिसायकल केलेले पाणी पुरविण्याची व्यवस्था करण्यासाठी धोरण लवकरच प्रशासनाच्या वतीने आणणेत येणार आहे. सगळयात शेवटी म्हणजे आज आपण कमीटमेंट काय देऊ शकतो याच्या अनुषंगाने आज आपल्याला सगळयांना कमीटमेंट अशी दयायची आहे की मानांकाप्रमाणे संपूर्ण शहरभर पाणी उपलब्ध झाले पाहिजे मात्र जोपर्यंत २४X ७ ची प्रभावी अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत याच्यामध्ये निश्चितपणे अडचणी आहेत. आणि त्यामुळे पुढील १२ महिन्याच्या कालावधीमध्ये जास्तीत जास्त भागामध्ये २४X ७ प्रकल्पाची अंमलबजावणी करुन इक्वल डिस्ट्रीब्यूशन ऑफ वॉटर करण्यासाठी प्रयत्न प्रशासनाच्या वतीने करण्यात येणार आहेत. १ जानेवारी २०१६ नंतर बांधकामांना जे नळजोड दिलेले आहेत ते तात्पुरत्या स्वरुपाचे आहेत. ही बांधकामे तोडण्याची कारवाई

प्रशासनाच्या वतीने ज्या ज्या वेळेला सिस्टीमॅटीकली करण्यात येईल त्या त्या वेळेला हे नळजोड देखील डिसकनेक्ट करणेत येतील. मात्र महत्वाचे जे काही नियमनाकुल न करता येण्यासारखे जे काही नळ जोड आज आहेत कमर्शियल असतील किंवा अन्य कुठलेही असतील ते तात्काळ शोधून डिसकनेक्ट करणेत येणार आहेत. हे करीत असताना आज एक गोष्ट सगळयांच्या समोर मला सांगावीसी वाटते ती म्हणजे अनेक भागामध्ये आज दुस-या माळयावरती तिस-या माळयावरती चौथ्या माळयावरती पाणी मागण्याची एक भूमिका आहे. आणि असं करण्याच्या प्रयत्नामध्ये आपण मोठया प्रमाणामध्ये त्या भागामध्ये पाणी वेस्ट करीत असतो. अशा भागांची निश्चितपणे नोंद घेण्याची गरज आहे. की त्या भागामध्ये संप ॲन्ड पंपाची अरेंजमेंट तात्काळ नागरीकांनी करुन घेण्याची आवश्यकता आहे. कारण आजच्या स्थितीमध्ये केवळ एक मीटर उंचीवरती आज आपण मानांकाप्रमाणे पाणी देण्यासाठी प्रयत्नशील आहोत आणि त्यामुळे असे काही भाग आहेत की ज्याठिकाणी कुठली ही व्यवस्था नाही. त्या नागरीकांशी संपर्क साधून त्यांच्याकडे पाठपुरावा करणेत येत आहे. की त्यांनी संप ॲन्ड पंपाची अरेंजमेंट करावी. काही भाग असे आहेत की ज्या भागामध्ये बॅकवर्ड किंवा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोक त्या भागामध्ये राहतात. निश्चितपणे त्यांना कुठल्या ना कुठल्या मदतीची आवश्यकता भासेल असे भाग शोधून त्या भागामध्ये काही डिस्ट्रीब्यूशन वरती सोल्यूशन काढता येईल काय याचा शोध देखील कन्सलटंटच्या मदतीने आणि पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून आपण घेत आहोत. असे एरियाज आयडेंटीफाय करुन त्यांना मानांकाप्रमाणे तेवढाच वेळ बुस्टरच्या माध्यमातून किंवा तात्पुरती टाकी तेवढया भागापुरती निर्माण करुन जर त्यांना देता आलीतर त्याचा देखील प्रयत्न प्रशासनाच्या वतीने करणेत येत आहे. अंतिमतः मला एक सादरीकरणाच्या माध्यमातून भविष्यामध्ये करावयाच्या उपाययोजना संदर्भामध्ये दोन स्लाईडस आपल्याला दाखवावयाच्या आहेत. माझी विनंती आहे महापौरांना की मला हे छोटेसे सादरीकरण दाखविण्याची अनुमती दयावी. केवळ दोन स्लाईडस मी आपल्यासमोर सादर करणार आहे की जी आज भविष्याच्या अनुषंगाने सर्वदुर पाण्याची उपलब्धता चांगल्या रितीने व्हावी आपले शहर ख-या अर्थाने स्मार्ट विव्हेबल शहर व्हावे. सस्टेनेबल शहर व्हावे. याकरीता कशा रितीने आपण हे कामकाज कराव हे

आपल्या सगळयांना माहिती असणे आवश्यक आहे. आपल्या शहरासाठी मी आताच सांगितले तसं आज आपल्याला आरक्षण भामा आसखेड, आंद्रामधून उपलब्ध झालेले आहे. आंद्रा, भामा आसखेडमधून १०० एमएलडी आणि १६७ एमएलडी इतकं पाणी आपण उचलणार आहोत आणि ते बंद पाईपलाईनच्या माध्यमातून आपल्या इथंपर्यंत घेऊन येणार आहोत. पण हे पाणी येण्यासाठी आपल्याला निश्चितपणे वेळ लागणार आहे. आणि त्याच्यामध्ये निश्चितपणे काही भागामध्ये अडचणी असतील त्यामुळे ते प्रकल्प राबवेपर्यंत आपल्याला देहू बंधा-यातून पाणी उचलण्याची अनुमती देखील राज्य शासनाने दिलेली आहे त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात देहू बंधा-यातून ते पाणी उचलून चिखली येथे डब्ल्यूटीपी तयार करुन चिखली येथे पाणी आणणार आणि तिकडून इंद्रायणी खो-यातून आपली नवीन विकसित होत असलेली जी गावे आहेत त्या भागामध्ये डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था करणार. अशा स्वरुपाची भूमिका आज प्रशासनाने ठेवलेली आहे. मात्र केवळ हे बल्क पाणी आले म्हणजे आपल्या इथं सर्व भागापर्यंत पाणी च-होली, मोशी किंवा वाकड, पिंपळे निलख पर्यंत जाईल याची शास्वती नाही. आणि यासाठी आपल्याला वाढीव पाणीपुरवठा करणेसाठी डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आणि त्याच्याच करीता हे थोडक्यात सादरीकरण आपल्यासमोर सादर करीत आहे. [स्क्रीनवर प्रेझेंटेशन दाखविण्यात आले] [पहिली स्लाईड] - ही आपल्या शहराची भौगोलिक रचना आहे हा इंद्रायणी खो-याचा भाग आहे. आणि पवना खो-याचा भाग आहे ही रीजलाईन ओलांडून जाण्यासाठी आपल्याला या सेक्टर २३ निगडी येथून पंपीग करुन ही रीजलाईन ओलांडून आपल्याला या भागाला पाणी दयावे लागते. जर टेलचा विचार केला तर इकडून पंपीग करीत असताना वाकड ही टेल येते, दापोडी ही इकडची टेल येते. संत तुकारामनगर हा भाग या भागामध्ये येतो त्यामुळे तिथेही शेवटचा भाग येतो. आपल्या दिघीचा भाग याठिकाणी येतो. तो पण टेलला येतो. च-होली हा सगळयात शेवटचा टेलचा भाग आहे. बोपखेल येथे पाणी नेण्यासाठी आपल्याला सुमारे २८ किलोमीटर इतका प्रवास करुन त्याठिकाणी पाणी जाते. त्यामुळे याच्यामध्ये पध्दतीत व्यवस्था केल्याशिवाय आपल्याला हि सुधारणा करता येणार नाही. पुन्हा हा हायवेच्या पलीकडचा जो भाग आहे हा देखील उंचावरती असल्याने आपल्याला या भागामध्ये काही पंपींगच्या सुविधा

कराव्या लागणार आहेत. मामुर्डी किवळेचा जो भाग आहे तिथे देखील आपल्याला पंपींग करावे लागते. तो देखील पवना खो-यामध्ये भाग असला तरी थोडासा उंचावरती असलेला भाग आहे. त्यामुळे या पध्दतीची आपल्या शहराची रचना आहे. हा जुना भाग आहे याच्यावरती पूर्वीची पाणी व्यवस्था आहे. हा पीसीएनटीडीनंतरचा विकसित झालेला भाग आहे. की त्याच्यामध्ये नंतर पाण्याची डीमांड वाढत गेलेली आहे. आणि आता जो नव्याने वाढलेला  भाग आहे हा नंतर चहूबाजूने वाढलेला भाग आहे आणि त्यामुळे हया भागामध्ये आपल्याला डिस्ट्रीब्यूशन व्यवस्था ही नव्याने निर्माण करावी लागणार आहे. की जी आज कुठल्याही पध्दतीने अस्तित्वात नाही. आज केवळ जुन्या लाईनच्या माध्यमातून आपण आहे त्याच लाईनवरती डिस्ट्रीब्यूशन एक्सटेंड करीत असल्याने हे आऊटरचे भाग आहेत शेवटाचे भाग आहेत तिथे मानांकाप्रमाणे पाणी उपलब्धता होत नाही. त्यामुळे जर भविष्याचा विचार केला तर २०२१ चा तर आपल्याला हया पटटयामध्ये वाढीव १०१ एमएलडी इतक्या पाण्याची आवश्यकता भासणार आहे आणि हा जो भाग आहे तो पट्टा आता त्याच्यामध्ये इंद्रायणी खो-यामध्ये सुमारे ५०० एमएलडी इतक्या पाण्याची आपल्याला आवश्यकता भासणार आहे. हे नवीन डीपीची प्रक्रीया आता आपण सुरु करतो आहोत. याच्यामध्ये या गोष्टी समोर येतीलच. पण त्याच्या सुरुवातीलाच भविष्याचा वेध घेताना ही माहिती मी आपल्यासमोर दिली आहे. [दुसरी स्लाईड ] - जर लोकसंख्या आपली २०१५ साली २१ लक्ष इतकी होती आणि ती २०२१ साली आपण जर गृहीत धरली तर ज्या वेगाने शहर वाढतेय आणि वाढीव भाग त्याच्यामध्ये समाविष्ट जर झाला तर साधारणतः ३६ लाखापर्यंत लोकसंख्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण आज आठ गावे नव्याने समाविष्ट होण्यासाठी प्रस्तावीत केली आहेत ती जर आली तर त्यांचा देखील इंपॅक्ट त्याच्यावरती पडणार आहे. आणि त्यामुळे २०३१ ते २०४१-४५ सालची लोकसंख्या आपण गृहीत धरुन पाण्याचे नियोजन करायला सुरुवात केलेली आहे. त्यामुळे जर आपल्याला हे पाणी आंद्रा भामा-आसखेडमधून जरी आले तरी ते आपल्याला इकडून देहु बंधाऱ्यातून उचलून डब्ल्यूटीपी चिखली येथे नेऊन त्यानंतर च-होली पर्यंत, दिघीपर्यंत घेऊन जाण्यासाठी टाक्यांची व्यवस्था करावी लागणार आहे. त्याच पध्दतीने ताथवडे असेल, पुनावळे असेल, पिंपळे निलखचा भाग असेल,  वाकडचा भाग असेल या भागात पाणी

देण्यासाठी आपल्याला या भागामध्ये नव्याने टाक्यांची निर्मिती करावी लागणार आहे. त्यामुळे साधारणत: २०२१ पर्यंत तात्काळ या भागामध्ये पर्याप्त आणि समन्यायी इक्वल डिस्ट्रीब्यूशन ऑफ वॉटर करण्यासाठी इमीजीएटली आपल्याला १९ पाण्याच्या टाक्यांची आवश्यकता भासणार आहे. आणि १९ पाण्याच्या टाक्यांसाठी आपल्याला तितक्याच डिस्ट्रीब्यूशनने आणि त्याच्यावरती डिस्ट्रीब्यूशन लाईन यांची देखील आवश्यकता भासणार आहे. आणि हे जर आपल्याला करायचे असेल तर पुढील येत्या तीन वर्षामध्ये हया संपुर्ण प्रकल्पाचे नियोजन करुन साधारणत: २०० कोटी याच्यावरती खर्च करुन आपल्याला ही सविस्तर यंत्रणा आणल्यास आपल्याला समन्यायी पाणीपुरवठा ख-या अर्थाने संपूर्ण शहरामध्ये देणे शक्य होणार आहे. म्हणजे एक भाग बल्क वॉटर सीक्यूरिटी वाढविणे आणि बल्क वॉटर अव्हॅलॅबिलीटी नंतर या संपूर्ण शहरासाठी उर्वरीत नव्याने होणा-या भागासाठी डिस्ट्रीब्यूशन यंत्रणा करणे याचे आज नियोजन आपण पूर्ण केलेले आहे. पण हे करीत असताना आज मधली तीन वर्षे जर आपल्याला आजच्या समस्येवरती तोडगा काढायचा असेलतर २४X ७ ची प्रभावी अंमलबजावणी पुढील सात महिन्यामध्ये मे महिन्यापर्यंत करुन जास्तीत जास्त भागामध्ये आपल्याला पाण्याची उपलब्धता स्थानिक पातळीवरती वाढविणे ज्या भागामध्ये संप आणि पंप अरेंजमेंट नाही त्या भागांना आयशोलेट करुन तिथे बुस्टरच्या साहयाने किंवा लोकल साखळयांच्या साहाय्याने त्यांना पंपींग करणे. अनधिकृत नळजोड अधिकृत करुन जास्तीत जास्त लोकांना नेटवर्कमध्ये आणणे हेच प्रभावीपणे राबविल्यास आपल्याला उपाययोजना करता येणार आहेत. शेवटचा मुद्दा जर मला सांगावयाचा झाला तर प्रशासनाच्या अजेंडयाबाबत एक विषय निघाला होता. प्रशासनाचा अजेंडा हा कुठल्याही स्वरुपाचा नागरीकांच्या हितासाठी अंमलबजावणी करणे हा एकमेव अजेंडा आहे. त्याकरीता झालेल्या चुका विचारात घेऊन त्यांच्यावरती पूर्ण अभ्यास करुन भविष्याचा वेध घेऊन लॉंगटर्म प्लॅनींग करणे हीच प्रशासनाच्या अजेंडयाची भूमिका आहे. कुठल्याही राजकीय पक्षाच्या वैयक्तिक हिताचा प्रश्न न करता येथे रहात असलेल्या स्थानिक नागरीकांच्या व्यापक हिताचा विचार करणे त्यासाठी वेळप्रसंगी कडू निर्णय घ्यावे लागले तरी कडू निर्णय घेणे ज्यावेळेला भविष्याचा वेध घेणारे प्रकल्प आणायचे असतील तर त्यावेळेला तंत्रज्ञ, तांत्रिक ज्ञान असलेले लोक

आणि ज्यांच्याकडे अनुभव मोठया प्रमाणात आहे यांचा सगळयांचा विचार करुन या सभागृहाच्या मदतीने योग्य अशी अंमलबजावणी करणे हीच भूमिका प्रशासनाची आहे हेच नमुद करतो. सगळयात शेवटी महत्वाच्या विषयावरती आमच्या एनओसी देण्यावरुन चर्चा या सभागृहामध्ये करण्यात आली होती की एनओस्या काही कारणास्तव प्रशासनाने बंद केलेल्या होत्या. त्याच्या संदर्भामध्ये मला सभागृहासमोर सविस्तर निवेदन करावयाचे आहे की ज्या वेळेला आपल्या इथं मे महिन्यामध्ये पाणी टंचाईसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती त्यावेळेला खरच पाण्याची उपलब्धता आहे का आणि हया विषयावरती एप्रिलच्या मिटींगमध्ये चर्चा करणेत आली. त्या चर्चेच्या वेळेला असं निष्पन्न झाले की आपल्याइकडे गेल्या पाच वर्षापासून नवीन निर्माण होणा-या प्रकल्पांना कंडीशनर एनओसी देण्यात येत आहे. आणि कंडीशनर एनओसी देताना आपण म्हणत आहोत की तुम्हाला आम्ही कुठल्याही स्वरुपाचे पाणी आमच्याकडून देणार नाही किंवा फक्त पिण्यापुरते पाणी देऊ. मात्र तुम्हाला तुमच्या पाण्याची व्यवस्था जोपर्यंत आंद्रा भामा आसखेड योजना पूर्ण होत नाही तोपर्यंत तुमच्या स्वखर्चाने करावी लागेल. आणि या भूमिकेतून या शहराचा विकास टेल एंडला जरी असला तरी मोठया प्रमाणात होत आलेला आहे. आणि त्यामुळे मोठया प्रमाणामध्ये ज्या सोसायटया तयार झालेल्या आहेत या आमच्याकडून देण्यात येणा-या पाण्यापासून वंचित आहेत. मात्र जनमाणसाची अपेक्षा असते की त्यांना प्रशासनाच्या वतीने, मनपाच्या वतीनेच पाणी मिळावे आणि त्यामुळे भविष्यातील आपण उपाययोजना करीत आहोत. मात्र अशा परिस्थितीमध्ये ज्यावेळेला आंद्रा भामा-आसखेडचे आपले आरक्षणच रद्द झाले त्या वेळेला अशा स्वरुपाच्या एनओस्या देणे कितपत योग्य होत याच्या अनुषंगाने चर्चा करणेत आली. अशाच परिस्थितीमध्ये निर्णय जो घेण्यात आलेला होता की, प्रत्येक कार्यकारी अभियंता पातळीवरती अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. ही अंमलबजावणी करीत असताना पाण्याच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक कमांडमध्ये वेगवेगळया पाण्याची उपलब्धता आहे. जर आपण सेक्टर २३ चा भाग बघितला तर तिथे जास्त पाणी उपलब्ध आहे. टेलचा भाग बघितला तर तिथे कमी पाणी उपलब्ध आहे, आजच्या परिस्थितीनुसार. पाण्याच्या उपलब्धतेनुसार एनओसी देणे अपेक्षित होते. आणि निश्चितपणे आमच्या कार्यकारी

अभियंताकडून त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झालेली आहे. मात्र कार्यकारी अभियंता रामदास तांबे यांच्या कार्यप्रणालीबाबत संशय निर्माण झाल्यामुळे मी त्यांच्याकडन खुलासा मागविला असता तो खुलासा असमाधानकारक सापडल्याने त्यांच्यावरती जी तात्पुरती जॉईंट सिटी इंजिनिअरची जबाबदारी देण्यात आली होती ती त्यांच्याकडून काढून घेण्यात आलेली आहे आणि त्यासंबंधी सविस्तर चौकशी प्रस्तावीत करणेत आलेली आहे. जर या चौकशीअंती ते दोषी आढळल्यास त्यांच्यावरती योग्य ती कारवाई करणेत येईल मात्र आजच्या स्थितीमध्ये आपल्याला आंद्रा भामा-आसखेडचे रिस्टोरेशन पूर्ण झालेले असल्यामुळे भविष्यातील शहराच्या वाढीच्या वेगाला खीळ न घालता आपण लवकरात लवकर आंद्रा भामा-आसखेड असेल किंवा पवना बंद पाईपलाईन असेल याचा एकत्रित पाठपुरावा करुन आपल्याकडे बल्क वॉटर सिक्यूरिटी निर्माण करणे आणि त्याच्या माध्यमातून या ऍडीशनल डिस्ट्रीब्यूशन सिस्टीमची यंत्रणा निर्माण करुन पुढील तीन वर्षात संपूर्ण शहराला पाण्याचे दृष्टीने “सुजलाम सुफलाम” बनविणे सस्टेनेबल बनविणे आणि जबाबदार बनविणे हे आपल्या सर्वांचे एकत्रित कर्तव्य असले पाहिजे. या अनुषंगाने संपूर्ण सभागृहाचे पत्रकारांचे, नागरीकांचे संपुर्ण सहकार्य या प्रशासनाला लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करुन माझा सविस्तर आणि लांबलेला खुलासा थांबवितो, धन्यवाद.

**मा.प्रियंका बारसे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह आताच मा. आयुक्त साहेबांनी पाणीपुरवठयाच्या मागच्या आंदोलनामध्ये संपुर्ण सभागृहाने जो प्रश्न उठविला की संपुर्ण पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही. तर सरांनी खूपच चांगल्या पध्दतीने खुलासा केलेला आहे. निश्चितच त्यांचे भाषण कौशल्य खूपच चांगले आहे की एकदिड तास आम्ही मंत्रमुग्ध झालो. म्हणजे मंत्रमुग्ध होण्या इतपत तुम्ही आम्हाला शांत केलेले आहे हे मी मान्य करते. पण सर्वसामान्य जनतेला या सगळया गोष्टींचे काही देणे घेणे नसते. की इथे टेक्नीकल प्रॉब्लेम काय आहेत. आणि आमचा हाच मेन प्रॉब्लेम आहे की आम्ही नागरीकांना या गोष्टी समजावून सांगू शकत नाही. सरांनी आताच सांगितले की ३६ वर्षे झाले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला. आपण वर्धापन दिन साजरा केला ३६ वा. आणि या ३६ व्या वर्धापन दिनानंतर आपल्याला पाणी समस्येसारख्या मोठया प्रश्नावरती खुलासा दयावा

लागतोय. खरतर या श्रीमंत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा हा  अपमान आहे. तर दुसरी गोष्ट सरांनी सांगितली की ४० टक्के हिशोबबाहय पाणी. म्हणजे ४० टक्के हिशोबबाहय पाणी हे सुध्दा ३६ व्या वर्षातल आपल हे खूप मोठे अपयश आहे. प्रशासनाने या गोष्टींकडे अधिक गांभिरतेने पाहणे खूप गरजेचे आहे. त्यानंतर सरांनी सुरुवातच अशी केली की ही तात्कालीक परिस्थिती होती त्यामुळे हा सगळा गोंधळ झाला. पण गेली दिड वर्षे मी नगरसेविका पदावर आहे आणि गेली दिड वर्षे ही पाण्याची समस्या आम्ही अनुभवत आहोत. त्यामुळे फक्त या पंधरा-वीस दिवसांतील ही तात्कालीक परिस्थिती नाहीय सर. तर या गोष्टींवर खूप गंभीरतेने आपण पाहणे गरजेचे आहे आणि तुम्ही भाषण निश्चितच चांगले केले. पण ही भाषा आम्ही लोकांना सांगू शकत नाही हे आमचे दुर्दैव आहे, धन्यवाद.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. महापौर साहेब आताच मा.आयुक्तांनी जो खुलासा दिला आहे. खरतर त्यादिवशी तुम्ही आमची मिटींग घेतली आणि कशामुळे दोनचार दिवस पाणी विस्कळीत झाले त्याचा पूर्ण खुलासा तुम्ही सांगितला. आता शहरातील तुम्ही अनधिकृत नळजोड कनेक्शन किती आहेत आणि अधिकृत किती आहेत याची ही कल्पना संपुर्ण सभागृहाला दिली आहे. मा. आयुक्त साहेब संपुर्ण प्रेझेटेंशन तुम्ही संपुर्ण नगरसेवकांना मार्गदर्शन केले आहे. आपल्या पध्दतीने आपण सर्व माहिती सभागृहासमोर सांगितली आहे. महापौरसाहेब याच्यामध्ये एक गोष्ट सांगू इच्छितो. की ज्या पध्दतीने आपण पवना धरणातून रोज ६० टीएमसी पाणी उचलतो आणि ते पाणी पिंपरी चिंचवड रावेत या बंधा-यात येऊन थांबते आणि तिथून आपण पाणी उपसा घेतो. मी मागच्या जीबीला पण तुम्हाला सांगीतल महापौर साहेब तो संबंध परिसर या परिसरामध्ये आम्ही लहानाचे मोठे झालो असल्यामुळे त्या बंधा-याची उंची आम्हाला माहिती आहे साहेब. आज जर का आपण पाहिलं तर आजच्याच लोकमतमध्ये फोटो आला आहे. त्या फोटोमध्ये संपुर्ण घाणीचे साम्राज्य त्या जलउपसा केंद्राच्या शेजारी आहे. त्याचठिकाणी आम्ही काही वर्षापूर्वी पोहण्यासाठी जात होतो. तर त्याठिकाणी माणूस बुडत होता. आज एवढा गाळ साचल्यामुळे जे ६ टीएमसी पाणी आपण रावेत बंधा-यामधून घेतो. लेव्हल जर आपण वरती पाहिल्यानंतर ६ टीएमसी आहे. पण चार सहा टीएमसी पाणी आपल्याला मिळत

का हे पाहणे आपल्याला गरजेचे आहे महापौर साहेब. याच्यासाठी तो संपुर्ण गाळ काढणे गरजेचे आहे. त्या रावेत बंधा-याची व्यवस्थितपणे दुरुस्ती करणे गरजेचे आहे. महापौर साहेब अजुन एक माहिती आम्हाला जवळच्या एक सन्माननीय सदस्यांनी सांगितली आहे. की शेजारीच असलेले गहुंजे स्टेडीयम आख्खं पाणी आपल्या पवना डॅममधून ते उचलतात. आपल्याला दिलेल पाणी ते उचलतात आणि वापरतात. त्याच्यावर देखील आपले नियोजन असणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे शेजारी असलेले जे लोढा बांधकाम, ते सुध्दा आपल्या इथून पाणी उचलत आहे. ही सर्व माहिती घेणे गरजेचे आहे. जर आपल्यालाच पाणी पुरत नसेल तर अनधिकृतरित्या ते लोक पाणी कसं काय घेतात याची चौकशी होणे गरजेचे आहे. महापौर साहेब ज्या पध्दतीने आपण सर्वसामान्य नागरीकांचे अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करुन घेणार आहोत. आता आपल्याला आयुक्त साहेबांनी सांगितले की काही मजले वाढविल्यामुळे एक अधिकृत कनेक्शन त्याच्यावर दोन अनधिकृत कनेक्शन आहेत. ही गोष्ट मान्य आहे. जी वस्तुस्थिती आहे ती मान्य करायला काही हरकत नाही. पण हे फक्त सर्वसामान्यांपुरते नसावे. या शहरामध्ये अनेक उच्चभू हॉटेल्स आहेत त्यांच्यावर सुध्दा या सर्व गोष्टींची आपण अंमलबजावणी करावी. याठिकाणी काही शाळा आहेत अधिकृतरित्या, कॉलेजेस आहेत मोठेमोठे कॉलेजेस आहेत. ते सुध्दा लीगली, अनलीगली पाणी चोरुन घेतात. या सर्व गोष्टी आपण प्रामुख्याने पाहिल्या पाहिजेत. तर या पण सगळया गोष्टींकडे आपण लक्ष दयावे एवढच मी बोलतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आयुक्त साहेब आपण अभिवेदन केले. निश्चितच या शहराच्या लोकसंख्येचा आढावा घेतलेला दिसतो. हा घेतला असताना आपण ज्या काही उपाययोजना सांगितल्या त्यात पाण्याची पातळी ४ आक्टोबरपासून १८ ऑक्टोबरपर्यंत मध्ये-आधे विस्कळीत होती पण हे असताना साहेब कुठेतरी आपण आपल्या कर्मचा-यांना पाठीशी घालता. हे चुकताय, कुठेतरी सगळंच तुम्ही वीजेवर सोडून परत तुम्ही वीजपुरवठा खंडीत झाला. प्रत्येक ठिकाणी तुम्ही वरुन बंधा-यातन पाणी उचलल गेलं ते का नाही उचलल गेल आणि हेच तुम्ही बंधा-याच सांगत असताना जो बंधारा आता नव्याने बांधायचा आहे त्याचे पैसे आपल्याला पीडब्ल्यूडीला दयायचे आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे त्यादिवशी मी

विजयबापूंचा फोन पक्षनेत्यांना पण लावून दिला. तर बापू म्हणाले की मी अजुन सर्व्हेक्षण करतोय. त्यातून पण अडजेंस्टमेंट लेव्हल सर्वे येईल त्यानंतर ती पुढची कारवाई सुरु होईल. या बंधा-याचं नेमकं काय झालं. तुम्ही नवीन बंधारा बांधणार नाही बांधणार हे तुम्ही अजीबात या गोष्टीकडे तुमच अधिवेशनामध्ये या गोष्टीकडे थोड दुर्लक्ष झालेलं दिसून येतेय. आणि साहेब आपण सांगितलं की या शहरात अनधिकृत बांधकामे वाढलेली आहेत. गेल्या दिड वर्षामध्ये  वाढलेल्या अनधिकृत बांधकामांना जबाबदार कोण. हा सुध्दा प्रश्न शहरासमोर आहे. सत्ताधारी म्हणून भारतीय जनता पार्टी आणि आयुक्त म्हणून तुम्ही. कारण की तुम्ही पाहिलं असेल तुम्ही आमच्या एरियामध्ये येऊन पहा. प्रचंड प्रमाणात इलीगली बांधकामे सुरु आहेत. तुम्ही आज बांधकाम काढताय टप-यांचे काय. म्हणजे काल आमच्या इथ तक्रार आली होती म्हणून आम्ही गेलो होतो सगळे अधिकारी होते. अगदी आरोग्यासहीत सगळे. तर त्याला विचारल या टप-या कोणाच्या आहेत तर त्यांनी गावातल्या माणसाच कोणाच तरी नाव सांगीतल. आपली शाळा तीकडे डांबरी रोड त्याला लागून त्या टप-या. कोणीही त्याला मालक नाही. स्थानिक माणसाच्या मालकाचे असेल तरी ते मी मान्य करीन की बाबा हयाचा मालक इथं आहे. पण काहीच नाही. म्हणजे अक्षरशः त्या अनधिकृत बांधकामांकडे तुमचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे शंका येते की आपण खुलासा एवढा चांगला दिलाय. अभिवेदनच एवढे चांगले दिलेय. तर त्याच इंप्लीमेंन्टेशन कस होणार साहेब तुम्ही हे सांगत असताना एका बाजूला तुम्ही तांबेच सांगताय की तांबे त्यात आढळून येतात. मी तुम्हाला अजुन एक एनओसी दाखवतो. त्यांनी एका डेव्हलपरला १९/९ ला पण एक एनओसी दिली दोन एकर जागेची. साहेब हे अधिकारी कोणासाठी काम करतात तुम्ही सांगताय तुमच्या एचओडी मिटींगमध्ये तुम्ही सांगीतल त्याप्रमाणे एकाही कार्यकारी अभियंताने कारवाई नाही केली. तांबेनीच कारवाई का केली. केली तर केली. विशिष्ट लोकांना पण का दिल्या गेल्या. साहेब मी आता जर या १२ एनओस्या वाचून दाखवल्या ना तर याच्यामध्ये शहरातले सगळेच पुढारी आहेत. परत त्याला राजकीय वळण लागेल. त्यात आमदार पण आहेत, खासदार पण आहेत. अस आम्ही म्हणायच का की तुम्ही मूठभर लोकांसाठी एन्ओस्या देता. तुम्ही त्या तांबेवर काय कारवाई करणार हे स्पष्ट करा. तुम्ही अजुन त्यांची काय चौकशी करणार. माझ्याकडच सगळ

रेकॉर्ड तुमच्या टेबलवर आणून ठेवतो. तुम्ही एकतर्फी चौकशी करणार असेल तर ती मान्य नाही. आम्हाला कोर्टात जावे लागेल. आता आपण अमृत योजनेच सांगितलं. अमृत याजनेत आपल्याला पाण्याचा टाक्या बांधायच्या आहेत. मी महापौरांना एक दिड महिन्यापूर्वी १/९ ला पत्र दिले आहे. माझ्याकडे पाण्याच्या टाक्या बांधायच्या सगळ प्रोसेस पुर्ण झालेली आहे. फक्त भूमीपूजनाला वेळ नाही. आता महापौरांनी काल मला पत्र देतो म्हणले पण कसं, मी येतो म्हणून. पण मागणी काय केली होती की जलसंपदामंत्री त्या कार्यक्रमाला यावेत अशी आमची इच्छा आहे. जेणे करुन तुमचा रावेत बंधा-याचा विषय आहे, पण आज सकाळी मला पक्षनेत्यांनी सांगितलं की ३ तारखेपर्यंत थांबा. आता शब्द दिला आहे महापौर साहेब, तुम्ही मला आधी वचन दया आज तुम्ही भूमीपूजन केले की माझ्या पाण्याचा प्रश्न सुटला. आपण आताच करु लगेच एक तासामध्ये. कशाला अजुन तुमची वेळ घ्यायची. आयुक्त साहेब तुम्ही हे सांगितल्याप्रमाणे भामा-आसखेड बद्दल सांगितल, तुम्ही देहू बद्दल सांगितलं. शहराचे दोन पार्ट आहेत ते पाण्यात पण केले. एक पवना बेसीन आणि एक इंद्रायणी बेसीन. पण ते चांगले आहे. विषय चांगला आहे तर चांगलच होणार. तुम्ही ज्या पध्दतीने सांगितले की देहूलाही प्लॅन्ट करु आणि चिखलीमधन उचलू म्हणजे काही गोष्टी तुमच्या स्वागतार्ह आहेत. पण हे स्वागतार्ह असताना तुम्ही कुठेतरी सत्ताधा-यांचा नाकर्तेपणा लपऊ नका. तुम्हाला विनंती करायची, ही विनंती का करायची की साहेब आता आपण ज्या उपाययोजना करताय त्या चांगल्या प्रकारे कराव्यात. फक्त हया करीत असताना आपण कोणालाही पाठीशी घालू नका. अशी मी तुम्हाला विनंती करेन. आणि तुम्ही जे सांगताय की वाकड आणि हा सगळा परिसर टेल टेल टेल. आता आम्हाला तो शब्द कुठेतरी पाठ होईल साहेब. साहेब आपण जर डिस्टंन्स पाहिलांतर सेक्टर २३ मधून आपण राईटला गेलो आपण दहा वर्षापूर्वी सेक्टर २३ मधून लाईन नेली १२ मीटर रोडने. आणि तुम्ही जो आज टेल म्हणताय तो भाग तुमच्या पिंपरी पेक्षाही जवळ येईन. जर तुम्ही लाईन त्या पध्दतीने टाकली. हया सुचना आम्ही आपल्याला करु इच्छितो परंतु हया सभागृहाचे जास्त वेळ न घेता मी आपल्याला एवढच सांगू इच्छितो की ज्या पोटतिडकीने विषय मांडला त्याच पोटतिडकीने तो पुर्णत्वास न्यावा. जर तो चांगला असेल तर आम्ही सर्व मिळून आपल्या पाठीशी

आहोत. जर त्यात कोणी पार्टीसिपेट असेल तर तसं आम्हाला वेळीच सांगीतलतर तसेही आम्हालाही बोलता येईल, धन्यवाद.

**मा. अजित गव्हाणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह महापौर साहेब मागच्या जनरल बॉडीच्या मिटींगमध्ये पाणीप्रश्नांवर सर्वांनी आपआपली मते मांडली. आणि आयुक्तसाहेबांनी त्या अनुषंगाने खुप चांगला खुलासा करण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे आणि सगळयाच गोष्टींना आयुक्तसाहेब आपण स्पर्श केला. अनधिकृत कनेक्शनच्या बाबतीत जी गळती आहे त्याच्या संदर्भात आपण तुमच्या टीमला सांगितले सगळया आपल्या स्टाफला सांगितले की तशा पध्दतीची कारवाई करावी. परंतु यामधील मुख्य अडचण अशी आहे की तुमच्या अधिका-यांना, कर्मचा-यांना जोपर्यंत तुम्ही पुर्ण ताकदीने त्याच्या पाठीशी उभे रहात नाहीत तोपर्यंत ते कुठलीच कारवाई करु शकणार नाहीत. सर्वांत महत्वाचे म्हणजे आम्ही जे नगरसेवक आणि या शहराचे राज्यकर्ते आहोत यांच्या माध्यमातून काही कनेक्शन्स दिली गेलेली आहेत. काही वेळेला अनेकदा सभागृहात सांगण्याचा प्रयत्न केला गेला, सांगितलं गेलं की ज्या मेन लाईन आहेत. त्या मेन लाईनवर एडीशनल कनेक्शन्स आहेत आणि मेन लाईनवर कनेक्शन दिल्यामुळे होतेय काय त्याठिकाणी जोपर्यंत त्या लाईनला पाणी असेल तोपर्यंत त्या लाईनला नळाला पाणी राहते. आणि हे तुमच्या अधिका-यांना पण चांगले माहीत आहे. अशा प्रकारची अनेक ठिकाणी कनेक्शन्स आहेत. विशेषतः ही कनेक्शन्स इलेक्शनच्या काळामध्ये दिली गेली आहेत. ही कनेक्शन्स आजपर्यंत आपल्या अधिका-यांना काढता आलेली नाहीत कारण याला कुठेतरी राजकीय दबाव त्यांच्यावर येत असतो. याठिकाणी बोलत असताना तांबेचा विषय निघाला. खर म्हणजे आयुक्तसाहेब पाणीपुरवठयात काम करणे सर्वांत कठीण काम आहे. पाणीपुरवठयात जे अधिकारी काम करतात. मगाशी येताना कुठेतरी चौधरींचा उल्लेख झाला. असे पाणीपुरवठयात चांगले अधिकारी होऊन गेले. त्यांनी चांगले काम या महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात केले आहे. त्याच्यामुळे प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्तसाहेब तुमची मुख्य जबाबदारी आहे की तुमच्या अधिका-यांच्या कर्मचा-यांच्या पाठीमागे सक्षमपणे उभे रहावे लागेल. आणि हे करीत असताना तुम्हाला सर्व राज्यकर्त्यांना नगरसेवकांना तुम्हाला विश्वासात घ्यावे लागेल. मगाशी तुम्ही जी आकडेवारी सांगत

होता की दरडोई शहरातील प्रत्येक नागरीकाला किती पाणी मिळाले पाहिजे. प्रत्येक कुटूंबाला मिळाले पाहिजे. हे इक्वल डिस्ट्रीब्यूशन नाही. त्याच्या मागची ही सर्व कारणे आहेत आणि हे करीत असताना तुम्हाला अतिशय कडकपणे कारवाई करावी लागेल. तर १०० टक्के अनधिकृत कनेक्शन्स तुम्हाला तोडावे लागतील ती अधिकृत करावे लागतील. आणि विशेषतः तुम्ही मगाशी उल्लेख केला अनधिकृत बांधकामांचा. अनधिकृत बांधकामे होतात त्यासाठी कोणीही विकत पाणी घेत नाही. आपल्या या पाणीपुरवठयातून आपल्याच पाईपलाईनमधून पाणी घेतले जाते. आणि सर्रासपणे ज्याठिकाणी अनधिकृत बांधकामे चालू आहेत त्या गल्लीमध्ये मोठया प्रमाणात पाण्याचा प्रश्न निर्माण होतोय तेथे नगरसेवकांनाही माहीती की ज्या गल्लीमध्ये अनधिकृत बांधकामे चालू आहेत. त्या गल्लीमध्ये महापौर साहेब पाण्याचा प्रॉब्लेम असतोय. आणि आपले अधिकारी त्याठिकाणी कुठल्याही प्रकारची कारवाई करु शकत नाही. कारण त्यांना कारवाई करु दिली जात नाही. त्याच्यामुळे तुम्हाला याच्याकडे बारकाईने लक्ष दयावे लागेल. आणि आता तुम्ही सांगितलं की आपले शहर हे देशातले एक फास्टेस गोईंग शहर आहे. आपण जी  लोकसंख्येची आकडेवारी सांगण्याचा प्रयत्न केला की २०२१ ते २०३१ पर्यंत किती लोकसंख्या आपल्या शहराची असणार आहे. हे सगळ करत असताना आपल्याला भामा-आसखेड आणि आंद्राचे पाणी मंजुर होते. मागच्या सरकारच्या काळामध्ये अजित दादांच्या प्रयत्नांनी  आपल्याला हे पाणी मंजुर झाले होते परंतु त्यानंतरच्या काळामध्ये हे पाणी प्रत्यक्षात आपल्याला आपल्या शहरामध्ये आणता आले नाही. २०१७ साली ते लॅप्स झाले कारण आपण पैसे भरले नाहीत. त्याच्यामागच्या कारणाची पण मी माहिती घेतली. आपल्याला ते पाणी पैसे न भरता फ्री ऑफ कॉस्ट मिळावे असा प्रयत्न महापालिकेच्या वतीने चालू होता परंतु ते झाल नाही आणि त्यानंतर आजतागायत मला वाटत की तीनचार दिवसांपूर्वी भामा-आसखेडसाठी पुन्हा त्याला आपण मंजुरी घेतली. खर म्हणजे हे पाणी आणणे अत्यंत गरजेचे आहे. आणि हे जोपर्यंत पाणी येत नाही तोपर्यंत महापौर साहेब आपल्याला वारंवार अशाच पाण्याच्या प्रश्नावरती सभा घ्याव्या लागतील. सभेमध्ये सगळेजण बोलतील नागरीकांना शेवटी आपल्याला फेस करायचे आहे. जेव्हा पाणी नसते तेव्हा नगरसेवकांना नागरीक कशा पध्दतीने बोलतात. आणि जो कर्मचारी त्या वॉर्डात काम

करतो त्याला अतिशय खालच्या पातळवरचे बोलणे ऐकावे लागत आणि सगळयात मुख्य प्रश्न आज शहरात या पाण्याचा आहे. या दृष्टीकोनातून आपल्याला खूप बारकाईने लक्ष दयावे लागेल. हा जो प्रकल्प तुम्ही म्हणाला  की तीन वर्षात पुर्ण करायचा आहे. तर माझं असं म्हणणे आहे की साहेब आपण याला वर्ष दोन वर्षात पाणी आपल्याला आले पाहिजे. अशा पध्दतीचा प्रयत्न झाला पाहिजे. आम्ही याठिकाणी आपल्याला विनंती करतो की आम्हाला सगळयांना बोलू दया. आमची भूमिका याच्यामागची पुढच्या काळामध्ये आमच्या सगळयांची गरज तुम्हाला लागणार आहे. कारण पाण्याच्या प्रश्नावरुन आम्हाला राजकारण करायचं नाही. आमचा हेतू एवढाच आहे की आपल्या शहरातील प्रत्येक नागरीकाला चांगल पाणी मिळाव. आयुक्त साहेब आम्ही तुमच्याबरोबर आहोत आमचं राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्ष निश्चितपणे तुमच्याबरोबर या सर्व कामांमध्ये आहे. कारण तुम्ही चांगल काम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राहुलजी कलाटे म्हणले की इतर पक्षाचा काय दबाव आहे. परंतु शेवटी या शहरातल्या प्रत्येक नागरीकाला पाणी मिळणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब तुम्ही उल्लेख केला टेल एंडचा. च-होली, दिघी आणि जो मोशीचा परिसर आहे. वाकड, दापोडी, आणि संत तुकारामनगर या ठिकाणी पूर्वीपासूनचा हा प्रश्न शहरामध्ये आहे. कारण त्या त्या वेळी पाण्याची कमतरता भासते. कारण हा प्रश्न कधी निर्माण व्हायचा. ज्यावेळेस उन्हाळा यायचा त्यावेळेस. परंतु आता पहिल्यांदाच असं घडलय की उन्हाळा अजून फार लांब आहे आणि आताच आपल्याला पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे येथून पुढचा काळ आपल्याला चालेंजींग आहे. आपल्या सगळयांना त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करावा लागेल. जिथे जिथे अनावश्यक पाण्याचा वापर होतोय तो थांबला गेला पाहीजे. तसेच रिसायकलींगचा जो मुद्दा आहे, सोसायटयांना आपण जे कंपलशन करतोय रिसायकलींग करण्याचे. परंतु प्रत्यक्षात सगळयाच सोसायटयांमध्ये रिसायकलींग होत नाही. ब-याच ठिकाणी एसटीपी प्लँट चालविले जात नाहीत. त्याच्यामागची कारणे त्यांना त्या सोसायटीला ते झेपत नाहीत अशी अनेक कारणे त्याच्यामध्ये आहेत. त्याच्यामुळे रिसायकलींग आपल्याला ज्याप्रमाणे अपेक्षित आहे त्याप्रमाणे पाण्याचे रिसायकलींग होत नाही. परंतु येथून पुढच्या काळामध्ये आपल्याला अधिक सक्षमपणे काम करण्याची गरज आहे. आणि पाणीपुरवठयात खरच चांगले अधिकारी आहेत लडकत

साहेब अनेक वर्षे पाणीपुरवठयामध्ये काम करीत आहेत. असे चांगले अधिकारी आपल्याकडे पाणीपुरवठयामध्ये आहेत. अनेक लोक वेगवेगळया ठिकाणी, काही अधिकारी बिल्डींग परमिशनला अनेक वर्षे काम करतात. काही लोक नगररचनामध्ये अनेक वर्षे काम करतात. त्यांना काही काळ पाणीपुरवठयात पाठवा साहेब. पाणीपुरवठयात काम करणे एवढं सोपे नाही. आता राहुलजींनी आपल्या बोलण्यातून तांबेचा विषय निघाला. ते पाणीपुरवठयात काम करतात. आता एनओसीचा मुद्दा निघाला. प्रत्येक स्कीमला मंजुरी देताना भामा-आसखेड आंद्राचे पाणी आल्यानंतर तुम्हाला पाणी देऊ. अशा प्रकारची तरतूद कारण त्या त्या वेळी त्या त्या प्रशासनाने केलेली आहे. परंतु आपले शहर वाढत असताना याठिकाणी ती गरज आहे. इथं जो फ्लॅट घेतो तो कोण माणूस असतो तो या शहरामध्ये काम करणारा माणूस आहे. त्याला त्या घराची गरज असते. त्यामुळे आयुक्तसाहेब मधल्या काळामध्ये तिकडच्या लोकप्रतिनिधींची मिटींग घेतली त्याच्यामध्ये तिकडच्या एनओसी बंद केल्या नंतर इकडच्या एनओसी बंद केल्या परंतु हा काही महापौर साहेब मार्ग नाही. आपलं शहर वाढतय आणि आपल्या शहराचा नावलौकीक खूप मोठा आहे. आपल्याला बेस्ट सिटीचा पुरस्कार मिळालेला आहे. त्याच्यामागचे कारण असे आहे की आपण शहराला चांगले इंफ्रास्ट्रकचर येथून मागच्या काळामध्ये नागरीकांना दिलेय. त्याच्यामुळे आपले हे शहर चांगलं शहर, स्वच्छ व सुंदर शहर आहे. आपल्याला जो स्वच्छतेच्या बाबतीत पुरस्कार मिळाला त्याच्यामागची कारणे सक्षमपणे इथं प्रशासनाने आणि लोकप्रतिनिधींनी काम केल्यामुळे ते घडल आहे. त्यामुळे येथून पुढच्या काळामध्ये सुध्दा आपल्याला असंच काम करावं लागणार आहे. तुम्हाला कोणालाही पाण्याला अडविता येणार नाही. कारण बेकायदेशीर पाणी घेतले जाते परंतु अधिकृत पाणी घेताना त्रास दिला जातो. ही कुठेतरी चुकीची बाब आहे. त्यामुळे मला असं वाटते की तांबेच्या विषयी आपण निश्चितपणे त्याच्या खोलामध्ये जावे. कुठेतरी काय तरी त्यांच्यावरती प्रेशर आले असेल. कुठेतरी त्यांनी नियमांचे उल्लंघन कदाचित केले असेल. परंतु त्यांच्यावरती योग्य प्रकारचा न्याय व्हावा. माझं म्हणणे तेच आहे राहुलजी. एनओसी तुम्ही बंद करु नका. तुम्ही एनओसी बंद करुच शकत नाही. शहरामध्ये जो पाणीपुरवठा केला जातो, आपली चूक आहे आपल्या शहरातील नागरीकांना पाणीपुरवठा करणे बंधनकारक आहे.

त्याच्यामुळे माझी अशी अपेक्षा आहे की या शहरातील प्रत्येक नागरीकाला पाणी दिले पाहिजे. आणि आपण कुठेही कमी न पडता या दृष्टीकोनातून आपण पुढच्या काळामध्ये प्रयत्न करावा लागेल. आयुक्तसाहेब तुम्हाला सक्षमपणे तुमच्या प्रशासनाच्या पाठीशी उभे रहावे लागेल आणि आम्ही सर्व नगरसदस्य तुमच्याबरोबर आहोत, धन्यवाद.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा. महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी अजित गव्हाणे आणि बारसे ताईंनी चांगल्या पध्दतीने खुलासा केलेला आहे. मी अधिक वेळ घेत नाही. आयुक्तांचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतोय की सव्वासहा तास चर्चा झाल्यानंतर केलेल्या सर्व घटनेचे मीच एकटयाने प्रायश्चित्त करायची वेळ आली की काय. म्हणून त्यांनी अतिशय अभ्यास केला आणि सविस्तर खुलासा याठिकाणी केला. आयुक्तसाहेब यामध्ये आपली काहीच चूक नाही. आपण आले त्याला दिड वर्षे झालेले आहेत त्यामुळे तुम्ही याठिकाणी आयुक्त आहात म्हणून आम्ही तुमच्याबरोबर या संदर्भात सविस्तर चर्चा करतो. आपण जी माहिती दिलेली आहे ती का दयायची की तुम्ही नवीन आलेल्या कोणत्याही आयुक्तांना पुर्वइतिहास या महानगरपालिकेचा भौगोलिकदृष्टया संपुर्ण माहिती असणं अत्यंत गरजेचे आहे ती आपण मिळवली. किमान सव्वासहा तास चर्चा झाल्याच्यानंतर महापौरांना मी धन्यवाद देतो की एवढी वेळ दिल्यानंतर किमान आपल्याला हे वाटलं की आपण भौगोलिक परिस्थितीचा विचार करावा आणि तो आपण केला आणि आता सत्य परिस्थिती आपल्या समोर आलेली आहे. हयाचा अर्थ केलेले सगळे तुम्हीच केले असं कोणीच म्हणत नाही. प्रश्न असा येतो की एक प्रगल्भ अनुभव असलेली माणसे आणि एक नव्याने निवडून आल्यानंतर त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. नगरसेवकांना काय घेणं नाही टाकी कुठे करायची आहे, पाणी कुठून गेलेय भौगोलिक परिस्थिती काय आहे. आम्हांला पाणी पाहिजे हे नगरसेवकांचे साध मत आहे. आयुक्तसाहेब तुम्ही माहिती दिली, परंतु मी गेली पंचवीस वर्षे दोन कारणे नेहमीच ऐकत असतो. एकतर बंधा-याची कमी पातळी झाली आणि नंतर विदयुत पुरवठा खंडीत झाल्यानंतर असं झालं. हे मी पंचवीस वर्षे ऐकतोय साहेब. पण यावर असं कोणीच विवेचन केले नही की त्यावर वीज पुरवठा खंडीत झाल्यानंतर मी काय तातडीने उपाययोजना करु शकतो नंबर एक. या संदर्भात कोणीच संयुक्तिक खुलासा केलेला नाही. दुसरी एक गोष्ट मला

आपलं अभिनंदन करावसं वाटतं. गेली वीस बावीस वर्षे टक्केवारीवर ओरडतोय. पहिले १० टक्के, २० टक्के, ३० टक्के.  टक्केवारी म्हणजे टेंडरची टक्केवारी नाही. चोरीची टक्केवारी. आता ३० ची ४० टक्के झालीय, आता तुम्ही विचार करा किती जरी पाणी आपण उचललं, नियोजन केलंतर ४० टक्के तुम्ही सांगितलेले मी लिहून ठेवलंय. जवळ जवळ एक लाख पंचवीस हजार लोकांची नोंद नाहीय.  आणि दुसरं एक तुम्ही बोलले की अनधिकृत नळकनेक्शन्स पंधरा हजार सापडले नाही हे त्यांनी स्वत:हून जाहीर केलंय. मी कालचं माहिती घेतली आहे. मी कोणत्याही गोष्टीची माहिती घेतल्याशिवाय बोलत नाही. मी स्वतः काल सगळे अधिकारी बोलवले. मी संपूर्ण त्यांची माहिती घेतली. ज्या दिवशी बोलवले त्या दिवशी १३ हजाराचा आकडा होता. दोन दिवसांमध्ये दोन हजार वाढले असतील. माझ्याकडे १३ हजारची माहिती होती. माझं असं मत आहे आयुक्तसाहेब आता यावर काय उपाययोजना कराव्यात. आपल्याकडे दोन अपेक्षा आहेत. एक तर सर्व गटनेत्यांची कमिटी करावी. एखादं सविस्तर भाषण होणार नाही त्याच्यावर फार वेळ चर्चा होणार नाही. हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. आणि त्या संदर्भात मी आता नगरसेवकांना पण विनंती करतो की कोणाच्या काळात काय झालं, कोणाला श्रेय मिळाले नाही.  शहर ज्यांनी निर्माण केलं त्यांना श्रेय मिळालं नाही. एवढी काय कोणती त्याच्यासाठी क्रांती होणार आहे. काही फरक पडत नाही. त्यामुळे शहराच्या दृष्टीकोनातून आपण सविस्तर विचार करुन एक कमिटी करावी. आता तुम्ही ३१ ऑक्टोंबरनंतर कारवाई करणार आहात ना. तर कोणाचाही जरी फोन आला ना तरी हर्डीकर साहेब तुम्ही सर्जीकल स्ट्राईक घ्या. कारण का प्रामाणिकपणे जे टॅक्स भरतात जे प्रामाणिक पाणीपट्टी सर्व कर भरतात त्याचा सगळा लोड त्या करावर येतो आणि लोक एकएक दोनदोन तीनतीन लाखि विनामूल्य पाणी मी नावे सांगू शकत नाही. कारण का तर तीन वर्षे पाण्याचे बीलच भरलेले नाही. म्हणजे तीन वर्षे झाले फुकट पाणी घेत आहेत. सोसायटीच्या सोसायटी. आणि हे सगळं तुम्ही ज्यावेळेस कारवाई सुरु केली ना. अभिनंदन आहे तुमचं. आता मागे हटू नका साहेब. आणि हयाचं कोणाला श्रेय मिळेल काय मिळेल, पाचवा विषय आलेला आहे. मी लडकतसाहेबांचे आणि तांबेसाहेबांचे अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो की अतिशय जो गरीब आहे आणि त्याला खरच गरज आहे साहेब. तुम्ही दर निश्चित केलेले आहेत पस्तीस रुपये

महिना. मोबाईलला आपण महिन्याला किती खर्च करतो आपण, ठीक आहे ना. खरच गरीब परिस्थिती आहे. तो दारिद्रय रेषेखालील आहे. झोपडपट्टीतला माझा बांधव आहे त्याना  दयाना सवलत तुम्ही परंतु जो दहा लाखाचे घर बांधतोय तो म्हणतो मला तीन हजारासाठी सवलत दया, हे मात्र चुकीचे आहे. दुसरं तुम्ही मला एक शब्द पाठीमागे दिला होता. अनधिकृत बांधकामे खूप चालू आहेत. आपण सहज बोलत होतो काय अधिकृतरित्या बसलो नव्हतो. तुम्ही म्हणले ते प्राधिकरण हद्दीमधले आहे ते माझ्या हद्दीमधील नाही. प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये आपण कारवाई करु शकत नाही. त्यांचा टॅक्स तर आपण घेतो. मग ते पाणीपुरवठा कुठून घेतात प्राधिकरणाकडून. प्राधिकरणाचे ऑफिस हे काय सिमेबाहेर नाही ना. पाकिस्तानमधून परवानगी घ्यायला लागत नाही. किंवा बांगलादेशामधून परवानगी घ्यावी लागत नाही. तर आयुक्तसाहेब या चारपाच गोष्टी आहेत. आता या कालावधीमध्ये काय झाले आहे माहिती आहे का. तुमची दहशत वेगळी असते आणि कार्यकारी अभियंता. जो इथ कायमस्वरुपी अधिकारी आहे त्याच्या सगळयाशी ओळखी झालेल्या असतात ते माझ्यासमोर नाही बोलू शकत. तो काय करतो पर्याय शोधतो. काही लोकांचा काय व्यावसाय सुरु झालेला आहे माहिती आहे का आता पर्यंत तो निवासी दरामध्ये व्यावसाय करत होता हे कोणाला सांगू नये किंवा प्रशासनाला कळू नये म्हणून मागणी चालू झालीय सगळयात जास्त इनकम सोर्सेस तो आहे आता. हया सर्व लोकांची तुम्ही प्रत्यक्षरित्या मिटींग घ्या. तुम्ही बोलणे आणि त्यांना ताकीद देणे. आम्ही सभागृहात भाषण केल्याने त्यांच्यावर काही परिणाम होणार नाही. कारण आमचाच कोणतरी असतो आम्हाला कोणतरी फोन करतो तो कोणाच्या तरी अत्यंत जवळचा असतो. त्यामुळे आम्ही त्याला माफ करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण साहेब खाली प्रत्येक ग्राऊंडवर जे काम करतात साहेब त्यांची एक मिटींग लावा साहेब, तुमच्या आयुक्तालयामध्ये मिटींग घ्या. मी जे बोलतोय त्याची संपूर्ण शहानिशा करा. आता सगळा सुळसुळाट सुटलाय, निवासी करायचय त्याची नोंद नाही तो निवासी म्हणून व्यावसायाला वापरतोय. या व्यावसायिकाची नोंद आता परत व्यावसाय म्हणून करायची आहे. अशी संपूर्ण वर्गवारी तुम्ही करा. मी सांगतोय ते तुम्ही गांर्भियाने घ्या. मी मागच्या वेळेस हेच सगळं दिड वर्षापूर्वी बोलत होतो. आणि म्हणून एक समिती करा. महापौरसाहेब याबाबत भाषणे पण होतील. सभागृह फक्त

त्याच मुद्दयावर चालले. अत्यावश्यक बाब आहे. मी एकनाथ पवारजीना विनंती करतो की पाच पक्षाचे सर्वजण एकत्रितरित्या घेऊन आणि आता जे दंड वसुली करण्याचे जे धोरण ठरविले आहे. त्यामध्ये कपात करु नका नाहीतर त्यांनी आता जाहीर केलेले आहे पंधरा हजार. आता मोहीम सुरु केली त्यात सापडतीलपण आयुक्त साहेब काही गोष्टीसाठी तुम्हांला स्वतःला बसाव लागणार आहे. कारण का बरेच अधिकारी बाहेरुन आलेले अधिका-यांच फार इथ सख्य नसतं. पण इथं राहिलेल्या अधिका-यांचं सख्य असत कारण काही गोष्टी त्यांच्या मनाविरुध्द कराव्या लागतात. काही आमच्या मनासाठी कराव्या लागतात. आम्हाला राग येऊ नये मनं सांभाळावी लागतात. यांची दु:ख दुर करायची असतीलतर तुम्ही तातडीने मिटींग घ्या. काही आयुक्तांनी नकळत कोणालाही मध्यस्थी न करता प्रत्यक्ष काही लोकांची मिटींग घेतल्यानंतर १०० कोटी एक काळ आपल्याला कर्ज घ्यावे लागत होते. सहा महिन्यात १०० कोटी शिल्लक पडले एका आयुक्तांच्या धोरणमुळे. त्यामुळे आपल्याला ही संधी आहे की आता तुम्ही ख-या अर्थाने संपुर्ण भौगोलिक परिस्थिती समजून घेतलेली आहे. दुसरा एक आक्षेप आहे माझा. कदाचित माझं अज्ञान असेल. अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न आपण करावा कारण आपण अभ्यास केलेला असेल. टाक्या एवढया लागतात का. एकदा मुंबईचे नियोजन कसं आहे ते एकदा पहा. आणि तिथं जी सक्षम अथवा रिटायर्ड माणसे आहेत. त्यांचे आपल्याला मार्गदर्शन घेता येईल का. कारण की आपल्याला दुर्गादेवी टेकडीवर हे करुन आपल्याला त्यासाठी काही करता येईल का. कारण पवनेमधून पाणी घेताना कामशेत मध्ये त्याठिकाणाहून काय डंप करुन पाणी आपल्याला युटीलाईज करता येईल का. खर्च कमी होईल. परंतु टाक्या एवढया बांधायच्या परत त्याचे नियोजन ठिक आहे तुमच्या अभ्यासानुसार ते बरोबर असेल पण माझ अज्ञान असेल तर ते दूर करावं परंतु त्याच्यामध्ये तथ्य असेल तर बघा कारण हे एक टोक आणि ते एक टोक भौगोलिक परिस्थितीनुसार त्या दृष्टिकोनातून आपण नियोजन करावे. आणि तुम्ही स्वतः लक्ष दया. याठिकाणी ४० टक्के जी चोरी आहे. ती चोरी ३१ ऑक्टोबर संपल्यानंतर किमान आपल्याकडे चाळीस पन्नास कोट रुपयांची भर पडेल. आणि परत टाकी बांधण्यासाठी जो खर्च येईलना तो तिथून उपलब्ध होईल एवढीच या ठिकाणी सुचना करतो.

**मा.अभिषेक बारणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. मी महापौर साहेब एवढचं सांगू इच्छितो की जे २४X 7 चे काम आहे त्या कामाची गती वाढली पाहिजे. हया कामाचा कालावधी ठरला पाहिजे. आज तुम्ही बोलताना उल्लेख केला की सात महिन्यामध्ये सर्व नगरसदस्यांनी मदत करुन ते काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत. आम्ही देखील आमच्या वॉर्डामध्ये आम्ही चारही नगरसदस्य पाठपुरावा करुन आमच्या प्रभागामध्ये ३० टक्के पाईपलाईन टाकून झालेल्या आहेत. टाकून झाल्यात पण ते कनेक्शन्स देत नाहीत. आणि कनेक्शन देत नसल्यामुळे आज आपण ३१ आक्टोबर शेवटची तारीख ठेवली होती की अनधिकृत कनेक्शनस जोडून घ्यावेत म्हणून. तर लोकांची अशी अपेक्षा होती की पैसे भरताना त्यांना तुम्ही लगेच नवीन कनेक्शन दयावे. तर त्यासाठी कसा प्रयत्न करता येईल याकडे लक्ष दयावे. आणि जो दंड ठेवलेला आहे अनधिकृत कनेक्शनचा तो दंड तुम्ही दारिद्रय रेषेखालील लोकांकडून टप्याटप्याने घ्यायचा जरी प्रयत्न केला तर त्याचा देखील विचार व्हावा. एवढच सांगतो आणि थांबतो धन्यवाद.

**मा.विकास डोळस -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आयुक्त साहेबांनी आता पाण्याविषयी सविस्तर खुलासा दिला आहे. आयुक्त साहेब टॅलेण्ट आहेत, बुध्दीमान आहेत प्रत्येकाला कळाले पण असेल पण याच्यानंतर माझ्या मनामध्ये काही प्रश्न राहत आहेत. आता भाऊसाहेबांनी सांगितले की बंधा-यातील लेव्हलचा प्रश्न आहे. मला वाटत होत की दिड वर्षापासून हा प्रश्न आहे परंतु पंचवीस वर्षे झाले बंधा-याची लेव्हल कमी होतच राहिली आहे. म्हणजे जसा राष्ट्रीय प्राणी असतो तसा राष्ट्रीय म्हणजे आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये बंधा-याची लेव्हल. मग आता त्या बंधा-याच्या लेव्हल जर कमी होत असेलतर तिकडे जी माणसे आहेत मला कळत की ती संस्था वेगळी आहे. आपली पिंपरी चिंचवड महानगरपालिका वेगळी आहे. मग त्यांच्यावरती कोणाचे तरी नियंत्रण असेल ना. आज जर २२ लाख लोक त्या बंधा-याच्या लेव्हलमुळे अफॅक्टेड होत असतील. पाण्यापासून वंचित रहात असतील तर तिकडे त्या काम करणा-या माणसांवरती कोणाचा वचक नाही का. आपण त्यांच्यावरती कारवाई करु शकत नाही का. मग इकडे आपल्या सभागृहामध्ये एखादा ठराव करा की त्यांची अकार्यक्षमता आहे. त्यांच्यामुळे आमचे नागरीक अफॅक्टेड होतात. आमचे नागरीक

पाण्यापासून वंचित राहतात. त्यांच्यावरती कारवाई करा त्या लोकांवरती. दुसरे म्हणजे साहेब तुमचे सादरीकरण झाल्यावरती अस वाटलं की आता पाणी प्रश्नावरती प्रश्न मांडायचा की नाही म्हणजे क्लिनचीट मिळाली. आता माझ्यासारख्या सदस्यांना असं वाटेल की आता पाणीप्रश्नावरती बोलू का नको. दिड वर्षापासून आम्ही त्याच्यासाठीच भांडतोय. स्लाईडमधील एक गावांची स्लाईड एक्चूअली मला पहायची होती. ती अचानक पुढे गेली त्यामध्ये दिघी दिसले परंतु ती स्लाईड पुढे गेली त्याच्यामध्ये काय लिहिले होते मला माहीत नाही. पण साहेब ईक्वल डिस्ट्रीब्यूशनवरती काम करावे लागेल. बंधा-याची लेव्हल कमी जास्त होते ना तर त्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांना एखादे पत्र पाठवून कोण काम करतयं त्याच्यावरती कारवाई करायला लागेल आपल्याला. पाण्याचा प्रश्न गंभीर आहे आपण जरी सादरीकरण केले असेल जेव्हा जेव्हा आमच्याकडे पाण्याचा प्रश्न असेल तेव्हा तेव्हा माझ्यासारखे नगरसेवक आवाज उठवतील. वेळप्रसंगी आंदोलनही करतील, धन्यवाद.

**मा.संतोष लोंढे** - मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब. सन्मा. सभागृह. आता मा. आयुक्त साहेबांनी अतिशय चांगल्या पध्दतीने विश्लेषण दिले आहे. पण ते विश्लेषण आचारणात येण्यासाठी आजच्या स्थितीमध्ये जे आपले कर्मचारी ठेकेदार पध्दतीने कर्मचा-याकडून काम करुन घेतात त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचे वेळेच बंधन पाळत नाहीत. आता नवीनच महापौरांच्या प्रभागामध्ये पण पहाटे तीन वाजता पाणी सोडले जातं. याठिकाणी ठेकेदारी पध्दतीने जे कर्मचारी काम करतात त्यांना वेळेचे कुठलेही बंधन नसते. त्यांना काहीही घेणदेण नसते. मनमानी प्रमाणे कधीही यायचं कधीही पाणी सोडायचे असे हे प्रकार त्याठिकाणी चालू आहेत. तर आपण मा. आयुक्त आपल्या कर्मचा-यांच्या प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना त्याठिकाणी सक्त ताकीद देऊन ज्याठिकाणी ते वेळेच बंधन पाळत नाहीत त्यांच्यावर कारवाई करावी. पुढील काळासाठी जे कमर्शियल आहे आणि जे निवासी आहेत त्यात प्रत्येक प्रभागवाईज त्यांची गणना व्हावी आणि त्या गणनेतून कोण अधिकारी कामचुकारपणा करतात त्यांच्यावरती कारवाई करावी. कारण की आता गेल्या दस-याला संपुर्ण भोसरी परिसरामध्ये पाण्याचा वणवा होता. आता पुढील काळामध्ये दिवाळी आलेली आहे. त्याच्यामध्ये आपल्याला शहरामध्ये नागरीकांचा आरडाओरडा न होता दिवाळी सगळयांना सुखसमृध्दीची

जाण्यासाठी आपण सातत्याने पाणी आणि लाईट या दोन  जीवनावश्यक गोष्टी आहेत त्यासाठी त्याच विवेचन सर्वांनी प्रशासनाला पटवून दिल पाहीजे की त्याठिकाणी पाण्याच्या बाबतीत जे अधिकारी कामचुकारपणा करतात त्यांची जबाबदारी आहे, नैतिक जबाबदारी पध्दतीने त्यांनी काम केले पाहिजे. दिवाळीमध्ये महिलांना स्वच्छतेच्या बाबतीत पाण्याच प्रमाण जास्तीचे लागते आणि त्यातून पाण्याच वेळेच बंधन ही नित्य नेमाने  वेळेवरच सोडवणे गरजेच असतं. एवढेच याठिकाणी बोलतो आणि थांबतो.

**मा.लक्ष्मण उंडे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. आयुक्त साहेबांनी जे सांगितलं ते सर्वांना कळल असेल पण मला एकही शब्द कळला नाही. त्याच कारण सांगतो साहेब आम्ही आर्मीमध्ये असताना वीस वर्षे नोकरी केली आहे. तिथे कधीही पाण्याचा प्रश्न आला नाही. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आम्ही फक्त पाण्यावरती निवडून आलो आहे. आणि तो पाण्याचा प्रश्न आम्ही दिड वर्षे सोडवू शकलो नाही हे आमच अपयश आहे. संध्याकाळची आम्हांला भीती वाटायला लागली. मला बॉर्डरवरती दुष्मनाची भिती नव्हती वाटली. परंतु आता संध्याकाळचा फोन जर वाजला तर फक्त पाण्याचा प्रश्न दुसरे काही नाही. आणि माता-भगिनी, त्यांची चुकी नाही साहेब. त्या पाणी भरत असतात. टॅक्स भरत असतात आणि माझ्या दिघी परिसरामध्ये माजी सैनिक आहेत. ते प्रत्येकवेळी माजी नगरसेवकांकडे जातात, आम्ही टॅक्स भरतो असे सांगत असतात हे सर्व ते करत असताना आपण त्यांना पाणी देऊ शकत नाही तर आम्ही झीरो आहेत. माता भगीनीचा संध्याकाळी आम्हाला फोन आला तर त्या म्हणतात आम्ही काय जीव दयायचा का. साहेब खर सांगायच म्हणजे पहाटे चार-चार वाजता फोन येतात तुम्ही जागेवरती या आणि पाहुन जा. मलेरियाचा आजार असतो ना तो बरोबर संध्याकाळी ताप येतो. तर आता भिती वाटते की आम्हाला मलेरिया तर नाही झाला. तर माझी महापौर साहेब विनंती आहे की याच्यावर कारवाई करावी. आणि खरच आम्ही आताच आयुक्त साहेबांना सांगतो आम्ही वॉर्डातल्या नागरीकांना पाणी देऊ शकलो नाही. दिघीमध्ये काही टाक्या बांधून काही उपयोग होणार नाही. एवढं बोलून थांबतो जयहिंद, जय महाराष्ट्र.

**मा. महापौर** - उपस्थित सर्व नगरसदस्य, नगरसदस्या या सर्वांनी पाण्याच्या विषयावर चर्चा केलेली आहे. सर्वांच्या भावना लक्षात घेऊन आज मी आयुक्त साहेबांना आदेश करतो.

[ सभागृहात गोंधळ ]

**मा. महापौर -** दत्ताकाका दोन मिनिटे थांबा ना तुम्ही. पाण्याचा विषय चालला आहे आणि इथे कोणतेही विषय काढताय. आठ दिवस झाले शहरातील पाण्याची स्थिती सगळयात चांगली आहे. ज्याच्या प्रभागात पाणी नसेल त्याने उभे राहून सांगावे की वॉर्डात पाणी नाही. अनधिकृत नळ कनेक्शनची आज शेवटची मुदत होती. आज मी पाणीपुरवठा विभागाला आदेश देतो. अनधिकृत नळजोड कनेक्शनची मुदत अजुन १५ दिवस वाढवा. १५ दिवसांपर्यंत जे अधिकृत करुन घेतील ते घेतील. नंतर ते कनेक्शन तुम्ही तोडून टाका. २४X ७ चे शहरामध्ये जे काम चालू आहे त्या एजन्सीला आपण सक्त ताकीद दयावी. येणा-या सात महिन्याच्या आत आपण काम करुन घ्यावं. आणि सर्व नगरसदस्यांना मी विनंती करतो प्रत्येक प्रभागामध्ये २४X ७ चे काम चालू आहे. त्यांना सहकार्य करुन आपण ते लवकरात लवकर २४X ७ चे काम पूर्ण कराव. त्याचबरोबर स्काडावाल्यांना सांगून पाणीगळती लवकरात लवकर रोखावी. रावेत बंधा-याचा विषय आपल्याकडून सांगायचा राहून गेला. जो इरिगेशन विभाग आहे तो बंधारा बांधणार आहे त्यांच्याकडून तो आपण लवकरात लवकर सांगून बांधून घ्यावा. सचिन चिखले आपण जो गहुंजेचा विषय घेतला आपल्या कोठयातून ते पाणी घेत नाहीत त्यामुळे त्यांचा आणि आपला काही पाण्याचा विषय येत नाही. त्याचबरोबर पिंपरी चिंचवड शहरात राहुल कलाटेंनी सांगितलेप्रमाणे शहरातील सर्व रस्ते, फूटपाथ मोकळे करावेत हे मी पत्रकार बंधुना गेल्या दिड महिन्यांपूर्वी सांगितले होते. आज मी याठिकाणी आयुक्तांना देखील सुचना करतो की येणा-या महिनाभराच्या आत आपण सर्वजण शहरातील ३० मी., ४५ मी., २४ मी. आणि १८ मी. या रस्त्याच्या कडेचे सर्व फुटपाथवरील टप-या काढून फुटपाथ मोकळे करावेत. हे देखील तुम्हाला मी या निमित्ताने सांगतो.

**मा. माधवी राजापुरे –** मा महापौरसाहेब विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३०२ विषय क्रमांक- १

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.सागर आंगोळकर, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.२९१६ दि.१८/०७/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २५६ दि.६/०९/२०१८
४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २७४ दि.२७/०९/२०१८

पिंपरी चिंचवड मनपा मा.महापालिका सभा ठराव क्र.९१० दि.२३/०८/२०१६ अन्वये पिं.चिं.मनपाच्या वतीने पी.एम.पी.एम.एल. ६०:४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेस पैकी ५५० वातानुकूलित बसेस ए.एस.आर.टी.यु. या केंद्र शासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०:४० या तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम या प्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेसिफिकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे. आज रोजी पी.एम.पी.एम.एल. कडून फक्त २०० बसेस खरेदी झाल्याचे समजते. सुमारे दोन वर्षापुर्वी मान्यता देवून सुध्दा पी.एम.पी.एम.एल. कडून बसेस खरेदीस अत्यंत विलंब होत आहे परिणामी शहरातील सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे पी.एम.पी.एम.एल. च्या मागणीनुसार व स्पेसिफिकेशन नुसार लेखा विभागाकडील बसेस खरेदी या तरतूदीमधून बसेस मनपा मार्फत खरेदी करून पी.एम.पी.एम.एल.ला उपलब्ध करून देणे बाबतचा विषय धोरणात्मक बाब म्हणून मान्यता देणेत येत आहे.

**मा. सिमा चौगुले –** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.पंकज भालेकर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी पीएमपीएमएलचे माने साहेब असतील तर त्यांनी खुलासा करावा. १५५ कर्मचारी त्यांनी वर्ग केले किंवा नाही त्यानंतर हा विषय मंजुर करावा.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, सन्मा महापौर साहेब, आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे हा जो पीएमपीएमएलचा विषय आणलेला आहे. तो एक तर सदस्य प्रस्ताव आहे. मा.आयुक्त साहेब हा सदस्य प्रस्ताव आहे. याच्याबाबतीत महापौर साहेब आपल्याला विनंती करतो की आयुक्तांनी याबाबतीत खुलासा करावा. सदस्य प्रस्ताव आपण इंम्प्लीमेंट करणार आहात का आयुक्तसाहेब आपली पीएमपीएमएल ज्यादिवशी प्रस्तावीत झाली त्यानंतर आतापर्यंत जे पैसे दिलेत किंवा आतापर्यंत बसेस घेतलेल्या आहेत. त्या यापूर्वी घेतलेल्या आहेत. आपण घेऊन दिलेल्या आहेत का पीएमपीएमएलने घेतलेल्या आहेत. त्याचा सविस्तर खुलासा करावा. नंतर मा. आयुक्तसाहेब मला बोलायचे आहे.

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, खरतर हा पीएमपीएमएलचा विषय तिस-यांदा जीबीच्या विषयपत्रिकेवर आला आहे. त्याचे कारण असं आहे की आपल्या सगळयांनी एक विनंती केली होती. पीएमपीएमएलच्या अधिका-यांबरोबर नगरसेवकांची बैठक झाली पाहिजे. आणि ती बैठक आपण अटोक्लस्टरला घेतली. मी असं म्हणणार नाही की संख्या किती होती. परंतु या महापालिकेमध्ये मा. महापौरांनी एखादी गोष्ट सांगितली की पूर्ण बैठक बोलावली. दोन-तीन बैठका झाल्या. पोलिसांसमवेत बैठक झाली. पीएमपीएमएलची बैठक झाली, त्यामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी सांगितले १५५ कर्मचा-यांचा मुद्दा. नंतर पंकज ज्या पाहुण्यांना आपण पीएमपीएमएल मधुन पीसीएमसीमध्ये काम करायला लावल होतं मला असं वाटते की ते भेटले नाहीत. कारण आठवडयापूर्वीच त्यांना रिलीज केले आणि कामही त्यांना पुढच्या काळामध्ये या महापालिकेमध्ये दिले जाणार आहेत. हा विषय कमिशनर साहेब मंजुर करणार आहेत किंवा नाही. पीएमपीएमएलच्या बसेस खरेदी करण्यासंदर्भात हा मुद्दा आहे. खरतर कोणीही बसेस घेऊ दया, पीएमपीएमएलने घेऊ दयात किंवा पीसीएमसीने घेऊ दयात. बसेस या लोकांच्या सेवेसाठी आपण देत आहोत

आणि आपण ब-याच वेळा अशी परिस्थिती म्हणतो की आपल्याला बसेसची संख्या कमी आहे. बसेसची परिस्थिती वाईट झालेली आहे. जर आपण पीएमपीएमएला म्हटलं तर ते पगारावरती पैसे जाऊ शकतात किंवा बोनसवरती पैसे जाऊ शकतात. त्या हेतूसाठी खरतर आपण हे पैसे देण्याचा प्रयत्न करतोय. तर हेतू हा बस खरेदीचा आहे. जर या शहरामध्ये आपल्याला चांगल्या बसेसची गरज आहे. लवकरात लवकर बसेस आल्या पाहिजेत अशी जर आपली मानसिकता आहे. जर ती परिस्थिती असेल तर पीएमपीएमएलच्या बसेस या लवकरात लवकर आपल्या ताफ्यात आल्या पाहिजेत त्याचा फायदा या शहरातल्या लोकांना होणार आहे. हा सदस्य प्रस्ताव आहे. सदस्य प्रस्तावावर निर्णय काय घेऊ शकतात तो कमिशनर साहेबांचा अधिकार आहे. सगळया जणांना प्रत्येकाला बोलावेसे वाटते. काही विषय किंवा एखादी गोष्ट कमिशनरसाहेबांनी होणार नाही म्हटलं तर होणार नाही. अशाही पध्दतीची उदाहरणे आहेत ना. आपल्या स्थायी समितीच्या सदस्यांना जर मनापासून असं वाटतंय की लवकरात लवकर बसेस आल्या पाहिजेत. लवकरात लवकर या शहराच्या ताफ्यामध्ये लोकांच्या सेवेसाठी चांगल्या बसेस आल्या पुण्यामधून पिंपरी आणि पिंपरीमधून पुण्याला जायला लवकरात लवकर सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी सगळया विषयांवरती चर्चा केली पाहिजे ही मानसिकता तर सगळयांचीच आहे. पण एखादया विषयावर नाही केली चर्चा. याच्यामध्ये चुकीचं तर आपण काय करीत नाही ना. चुकीचे केलं तर त्याला विरोध हा १०० टक्के केला पाहिजे. खरतर आपण सभागृहामध्ये पाणीपुरवठयाच्या संदर्भामध्ये मागच्यावेळेस सहा तास चर्चा केली. आजही तीन तास चर्चा केली. म्हणजे चर्चा करण्यामध्ये आपण कुठल्या पक्षाला अडवतोय. त्याच म्हणण दाबण्याचा प्रयत्न करतोय अशी परिस्थिती काका नाही. मा. महापौर साहेब आपल्याला या निमित्ताने विनंती करतो की हा विषय मंजुर करुन आपण पुढचा विषय घ्यावा हि विनंती.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. पिंपरी चिंचवड आणि पुणे महानगरपालिका मिळून पीएमपीएमएल झाली. महापौर साहेब या ठिकाणी पीएमपीएमच्या काही गोष्टींकडे मला आपले लक्ष वेधायचे आहे. आज आपण पाहिलं तर पीएमपीएमच्या टोटल २०९६ बसेस आहेत. त्यातल्या १५७७ बसेस या पीएमसीकडे आहेत. ५१९ बसेस या पिंपरी चिंचवडकडे आहेत. आपण जर पाहिलं तर

या प्रायव्हेट बसेस ५१ रुपये प्रति किलीमीटर या पध्दतीने पीएमपीएमएल पैसे देते. त्यात महालक्ष्मी अटोमोबाईल १४३, महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट १४३, ट्रायव्हल लाईन १५४, बीव्हीजी इंडीया ११०, आणि १०३ म्हणजे अशा साहेब ६५३ बसेस आज भाडेतत्वावर पीएमपीएमएलकडे आहेत. यांचे जर रोज पाहिलेतर ५५३ बसेस या रोज ८० हजार किलोमीटर रस्त्यावर धावत आहेत. तर हया ८० हजार किलोमीटरसाठी आपण ५१ रुपये प्रमाणे धरलेतर रोज या प्रायव्हेट बसेसला पीएमपीएमएल चाळीस लाख ऐंशी हजार रुपये देतेय. तर आपला जो हिस्सा आहे ६०-४० या प्रमाणात आपलं आणि त्यांचे वाटप आहे. त्याप्रमाणात आपण त्यांना पैसे देतो त्याप्रमाणात ते आपल्याला सुविधा देतात. पिंपरी चिंचवड शहराला २०१९ मधुन फक्त ५१९ बसेस चालतात म्हणजे आज रेशिओ प्रमाणे २०० बसेस आपल्याला कमी आहेत. मी मागच्या वेळेस पण गुंडे मॅडमला विचारले होते की तुम्ही ऑलरेडी आम्हाला २०० बसेस कमी देताय. तर अगोदर तुम्ही या बसेस दिल्या पाहिजेत. सागर आंगोळकर आणि राजेंद्र गावडेंनी हा सदस्य ठराव का केला. साहेब त्याच्यावर काय कार्यवाही करतील हा पुढचा भाग आहे. हयाच्यात सुध्दा पाहिलं की चौथ्या टप्यातील भाडे तत्वावर बसेसच्या करारातील अटीनुसार ४०० सीएनजी बसेस घेण्यात येत आहेत. महामंडळातही ४०० बसेस घेण्याची निविदा काढली आहे. इकडे आपण ही २०० बसेस घेऊन त्यांना दयायच्या म्हणतोय. असे असताना आपण आजपर्यंत पीएमपीएमला ६१८ कोटी रुपये दिले आहेत. महापौर साहेब आपल्या शहरातील नागरीकांना चांगली सुविधा मिळावी, पब्लिक ट्रान्सपोर्ट चांगल्याप्रकारे मिळावे. म्हणून खरतर या पीएमपीमएलचा हेतू होता. परंतु आपण आजपर्यंत ६१८ कोटी रुपये दिले त्यांना. जेव्हा पासून पीएमपीएमएल अस्तित्वात आली आहे. तर त्या प्रमाणात आपण सेवा घेतली का. तर त्याप्रमाणात आपण सेवा देतोय का. याचसुध्दा कोणी मॉनिटरींग करतेय किंवा नाही. आज २०० बसेस कमी आहेत त्या आपण मागून घेतोय का. साहेब, जस आपण म्हणतोय की या शहरासाठी सेकंड कार्यालय ठेवावे. आयुक्तांना बसू दया अतिरिक्त आयुक्तांना बसू दया कोणालातरी बसू दया. म्हणजे आजही आपण २०० बसेस घेतोय तिकडे पीएमपीएमएलने ४०० बसेसचे टेंडर काढले आहे. असं असताना आपणही परत २०० बसेसचा ठराव करतोय. त्यांच्या ४०० बसेसमध्ये आपली कॉट्रीब्यूशन आहे का याचा खुलासा करावा. खुलासा करताना हे

पण विचारा की पीएमपीएमएल का असावी की जेणेकरुन शहरातील नागरीकांना सर्व सामान्य माणसाना ती वापराता यावी. हे वापरत असताना त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडून फक्त आपल्याला लागणारे पैसे घ्यावेत या दृष्टिकोनातून न पाहता या शहरातील नागरीकांना चांगल्या सुविधा देत असताना आज पर्यंत आपल्याला २०० बसेस कधी दिल्या याचा देखील खुलासा आपण करावा. की जेणेकरुन आपल्या शहरातील जनतेला पीएमपीएमएलच्या सुविधा देता येतील. नाहीतर फक्त आपण पैसे देतोय परंतु त्या प्रमाणत आपण आपल्या नागरीकांना सुविधा नाही दिल्यातर कुठेतरी आपण कमी पडतोय अशी भावना आपल्याही मनात येईल. त्यामुळे तो खुलासा करावा, धन्यवाद.

**मा. महापौर** – मा. आयुक्तसाहेब यांनी खुलासा करावा.

**मा. आयुक्त -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, आता जो विषय विषयपत्रिकेवर आहे याच्यामध्ये ज्या वेळेला अंतिम निर्णय सर्वसाधारण सभा घेईल त्याच्या अंमलबजावणीच्या वेळेला त्याची कायदेशीर रित्या तपासणी करुन मगच अंमलबजावणी आयुक्तांच्या वतीने करण्यात येते. या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की आतापर्यंत पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विदयमाने पीएमपीएमएलने हा खरेदीचा प्रस्ताव आतापर्यंत राबवीत आलेली आहे. यावेळेला देखील यापुर्वीचा जो आपला ठराव आहे त्याच्या अनुषंगाने बसखरेदीची प्रक्रिया ही पीएमपीएमएलच्या माध्यमातून सुरु आहे. सध्या ४०० सीएनजी बसेसची खरेदी ही या टप्प्यामध्ये सुरु असुन त्याची निविदा अंतिम टप्प्यामध्ये आहे. यासोबतच ५०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी प्रक्रिया देखील सध्या सुरु आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की या संपूर्ण खरेदी प्रक्रियेमध्ये ६०-४० या तत्वावर ६० टक्के भाग हा पीएमसीचा आणि ४० टक्के भाग हा पीसीएमसीचा अशा पध्दतीने आपण कॅपिटल एक्सपेंडीचर फायनान्स करतो. या अनुषंगाने यापुर्वी झालेल्या ठरावानुसार काही बसेस हया थेट खरेदी करतात तर काही बसेस हया मार्केट फायनान्स पध्दतीने खरेदी करण्याचा निर्णय झालेला होता. मात्र त्याच्यामध्ये सुधारणा करुन आता थेट खरेदीन आपणच आपल्या फायनान्सिंग पध्दतीने सगळया बसेस खरेदी करण्याची सध्या

प्रक्रिया सुरु आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की संपूर्ण नियोजनाच्या अनुषंगाने पीएमपीएमएलच्या माध्यमातील जी खरेदी आहे त्याच्यासाठी आपला जो ४० टक्केचा शेअर आहे तो आपण मंजुर करावा. आणि ठरावानुसार यापुढे जो की ठराव होईल त्याच्या अनुषंगाने कायदेशीर अंमलबजावणी करणेत येईल.

यानंतर सदरचा ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. सविता खुळे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३०३ विषय क्रमांक - २

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१७/कावि/५९०/२०१८ दि.०६/०९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१४६ दि.११/०९/२०१८

कॉलेज ऑफ फिजीशीयन एँड सर्जन, मुंबई यांचेमार्फत घेण्यात येणारा सी.पी.एस. अभ्यासक्रम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये सन १९९८ पासुन सुरु करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमाकरीता कॉलेज ऑफ फिजीशीयन एँड सर्जन, मुंबई यांचेमार्फत प्रवेश प्रक्रीया राबविणेत येत असुन त्यांचे मार्फतच उमेदवार/ विद्यार्थी यशवंराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये सी.पी.एस. अभ्यासक्रमाकरीता पाठविले जातात. तसेच सदर अभ्यासक्रमाकरीता मनपामार्फत विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. कॉलेज ऑफ फिजीशीयन एँड सर्जन्स, मुंबई यांचे मार्फत सन २०१८ मधील प्रवेश प्रक्रीये बाबतचे प्रसिध्द केलेल्या माहिती पत्रकामध्ये सदर अभ्यासक्रमाकरीता पाठविल्या जाणा-या विद्यार्थ्यांकडून र.रु. ४,५०,०००/- व संस्थेच्या कोट्या मधल्या विद्यार्थ्यांकडून

र.रु.९,००,०००/- इतके शुल्क आकारणी करणेबाबतची तरतुद नमुद केलेली आहे. त्यामुळे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामार्फत घेण्यात येत असलेल्या सदर अभ्यासक्रमासाठी येणा-या विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणी संदर्भात निर्णय घेणेसाठी मनपा स्तरावर मा. आयुक्त सो यांच्या आदेशान्वये मा. अति. आयुक्त १ यांच्या अध्यक्षतेखाली मुलेप, कायदा सल्लागार व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीची सभा दि.३०-०८-२०१८ रोजी पार पाडली आहे. त्यामुळे समितीने सी.पी.एस. अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे याबाबत अन्य संस्थांकडून माहिती आलेली असता, त्यांचेकडून प्रति विद्यार्थी ९ ते १० लाख रुपये इतके शुल्क आकारले जात असल्याची तोंडी माहिती देण्यात आलेली आहे. पिंपरी चिंचवड मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात सी.पी.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मनपामार्फत देण्यात येणारे स्टायपेंड, सदर अभ्यासक्रमासाठी नेमण्यात आलेल्या Hon. Doctor (Teacher) यांना दिले जाणारे मानधन व सी.पी.एस. इन्सपेक्शन व रिन्युअल चार्जेस या सर्व बाबी मिळुन प्रत्येक विद्यार्थ्यामागे सरासरी दोन वर्षाचा खर्च र.रु. ७,८४,८००/- इतका येतो. सदरचा खर्च विचारात घेता, सी.पी.एस. विद्यार्थ्यांकडुन प्रत्येकी र.रु. ४.५० लाख प्रति वर्ष याप्रमाणे एकुण र.रु. ९ लाख (दोन वर्षासाठी) असे शुल्क आकारण्यास तसेच पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन अभ्यासक्रमासाठी कुठलेही शुल्क न आकारता, र.रु.९ लाख रुपयांचा ५ वर्षांचा बॉण्ड लिहुन घेण्यास समितीने शिफारस / निर्णय दिलेला आहे. तरी, समितीच्या शिफारशीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम रुग्णालयात सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वर्षासाठी सी.पी.एस.अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी र.रु.४.५० लाख प्रतिवर्ष इतके शुल्क आकारणी करणेस तसेच पिंपरी चिंचवड मनपा आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी यांच्याकडुन अभ्यासक्रमासाठी कुठलेही शुल्क न आकारता, र.रु.९ लाख रुपयांचा ५ वर्षांचा बॉण्ड लिहुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. संगिता भोंडवे** - मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. राहुल कलाटे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब तुम्ही ही जी फि सांगताना साडेचार लाख रुपये ती फिजीबल होते का नाही ते पहा. आपण महिन्याला पंचवीस हजार रुपये त्या मुलांना इन्सेन्टीव्ह पण देणार. दुस-या बाजूला इन्सपेक्शन फि पण वीस लाख रुपये आपण सीपीएमला देणार. साडेचार लाख रुपये मध्ये हे बसणार काय. याची तपासणी आपण करावी.

**मा. अर्चना बारणे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ३०४ विषय क्रमांक - ३

दिनांक - ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१०३११/२०१८ दि.३१/८/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१६५ दि.११/०९/२०१८

आरोग्य कार्यकारी अधिकारी आरोग्य मुख्य कार्यालय यांनी दि.२९/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये मा. क्षेत्रिय अधिकारी अ क्षेत्रिय कार्यालय यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक (१)अक्षेका/आ१/कावि/७०२/२०१८दिनांक१८/८/२०१८(२) अक्षेका/आ१/कावि/४०३/१८ दि.१८/८/२०१८(३)अक्षेका/आ१/कावि/६०४/२०१८दि.११/७/२०१८अन्वये जगीकरणाद्वारे साफसफाई या लेखाशिर्षावर र.रु. १,७५,००,०००/- वाहन इंधन या लेखाशिर्षावर र.रु.३५,००,०००/- तसेच घरोघरचा कचरा गोळा करणे या कामासाठी र.रु.३५,००,०००/- इतकी तरतूद आरोग्य मुख्य कार्यालयाकडील घनकचरा व्यवस्थापन

या लेखाशिर्षातून वर्ग करण्याची विनंती केली आहे. संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रातील कचरा वाहतुक खाजगीकरणाद्वारे करणेची निविदा कार्यवाही मुख्य कार्यालयामार्फत करणेत येणार होती. व सदरचा खर्च आरोग्य मुख्य कार्यालयामार्फत होणार होता. तथापि सदरची निविदा कार्यवाही अद्याप प्रलंबित असलेने सदर नमूद लेखाशिर्षावरील तरतूद क्षेत्रिय कार्यालयात कमी पडत असलेने प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद र.रु.२,४५,००,०००/- (अक्षरी र.रू.दोन कोटी पंचेचाळीस लाख फक्त) वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.२,४५,००,०००/-)

**मा. आरती चौंधे –** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदरचा ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक - ४

दिनांक - ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०७६०/२०१८ दि.१४/९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१८१ दि.१८/०९/२०१८

क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.२८/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये ग क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थायी अस्थापना लेखाशिर्षावरील तरतूद माहे सप्टेंबर २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१९ या महिन्यांकरिता वेतन अदायगी करिता तरतूद कमी पडत असल्याने र.रू.७०,००,०००/- तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे. र.रू.६२,६५,०००/- तरतूद केलेली असुन र.रू.६२,९९,४८५/- खर्च झालेले असून

र.रू.७,००,५१५/- तरतूद शिल्लक आहे. ग क्षेत्रिय कार्यालयाकडे वाहनचालक, लेखाधिकारी, लेखापाल, लिपिक यांची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मा.अध्यक्ष, प्रभाग समिती व प्रशासन अधिकारी खाजगी वाहन वापर करीत आहे त्यांचे बिल अदायगी साठी स्वतंत्र लेखाशिर्ष नाही स्थायी अस्थापना लेखाशिर्षातुन तरतूद खर्ची टाकणेत येत आहे यासाठी र.रू.७०,००,०००/- वाढीव तरतूदीची आवश्यकता आहे. अखर्चित निधीतून स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर र.रू.७० लाख वाढ करून वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके –** मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 3149, दिनांक 11/09/2018 अन्वये मान्यता विचारात घेवून नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील 2018-19 या अंदाजपत्रकातील पान क्रमांक (322) क्रमांक (4) मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनुक्रमांक 11 इतर योजना / कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतूद मधून करण्यास तसेच त्याकामी लाभार्थींच्या संख्येत वाढ झाल्यास 31/03/2019 अखेर पर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ नुसार सदर योजना राबविणेकामी आवश्यकते नुसार इतर लेखाशिर्षावरील भांडवली / महसुली अखर्चित / शिल्लक रकमेमधून आवश्यक ती रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनुक्रमांक 11 इतर योजना / कार्यक्रम या लेखाशिर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस मान्यता देण्यात यावी तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. ३३८० दिनांक २३/१०/२०१८ अन्वये मान्यता विचारात घेऊन सदर प्रकल्प राबविण्यासाठी खर्चाची तरतूद प्राथमिक शिक्षण विभागातील ई लर्निंग स्कूल वरील पान क्र. २९९ अ.नु. ४९ या लेखाशिर्षामधुन खर्च करण्यात यावी सदर प्रकल्प सन २०१८-१९ मध्ये राबविण्यासाठी जादा खर्चासाठी प्राधान्याने पान क्र. २९९ अ.नु. ४९ ई लर्निंग स्कुल या लेखाशिर्षावर प्राथमिक व माध्यमिक विभाग तसेच इतर विभागातील अखर्चित राहिलेली तरतूद व इतर विभागास न लागणारी तरतूद वेळोवेळी प्राधान्याने वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत यावी तसेच खालील नविन

कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन कामास प्रशासकीय मान्यता देणेत यावी व आवश्यक तरतूद वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. अ. क्र. | अ. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१८-१९ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद र.रु. | घट करावयाची तरतूद र.रु. | सन २०१८-१९ ची सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मोशी येथील मोरया कॉलनी, फातीमानगर, खानदेशनगर, संत ज्ञानेश्वर नगर इ ठिकाणचे रस्ते अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | - | - | २५०००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली/ मोशी येथील उर्वरीत ठिकाणचे रस्ते अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | - | - | २००००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| ३ | प्र.क्र. ३ येथील आदर्शनगर मधील डी.पी.रस्ते विकसीत करणे. | २३ | ११५ | २५०००००००० | ७५०००००० | ० | १००००००० | ६५०००००० |
| | एकूण | | | | ७५०००००० | १००००००० | १००००००० | ७५०००००० |

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातून विशेष योजना लेखाशिर्षातील कामांसाठी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या तरतूदी कामकाजाच्या

दृष्टीने अपुरी पडत असून सदर प्रशासकीय मान्यतेनुसार काम करणे शक्य होणार नाही असे वाटते तरी सदर कामांच्या प्रशासकीय मान्यतेत वाढ करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे सदर कामांच्या प्रशासकीय मान्यतेत वाढ करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील पान क्र./अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४/१०६ | विशेष योजना | आकुर्डी स.नं. १७३ पै.(सि.स.नं. ४६६१ पै.) येथील कोहली वखारजवळील १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ६० लाख | ६.०० कोटी |
| २ | ४५/६९ | विशेष योजना | प्रभाग क्र. १४ मधील विवेकनगर, तुळजाईवस्ती भागातील डी.पी.रस्त्यांचे मजबुतीकरण/सुधारणा/नुतनीकरण/कॉँक्रीटीकरण करणे. | १५ लाख | १५.०० कोटी |
| ३ | ४५/७० | विशेष योजना | प्रभाग क्र. १४ मधील आकुर्डी पालखी मार्गाचे आकुर्डी मनपा दवाखाना ते खंडोबामाळ चौकापर्यंतच्या रस्त्याचे कॉँक्रीटीकरण करणे. | १५ लाख | १५.०० कोटी |

तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून सदर कामामुळे शहराच्या सौंर्दयात व लौकीकात भर पडणार आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | आवश्यक तरतुद रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्र. क्रं. २६ पिंपळे निलख-रक्षक चौक येथील बी.आर.टी.एस. रस्त्यालगत मिलिटरी हद्दीत भारताचा राष्ट्रध्वज उभारणे व इतर स्था. अनु. कामे करणे | ५०,००,०००/- | ३४,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांचा नव्याने समावेश करणेकामी व प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून अंदाजपत्रकातील जुन्या कामांचे नाव वगळून नविन नावांच्या कामांचा समावेश करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | अंदाजपत्रक सन २०१८-१९ मधील कामाचे नाव | बदली करायच्या कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | पिंपळे निलख प्रभाग क्र.५४ येथील महादेव मंदीरामागील परिसरात नदीकडेने संरक्षण भिंतीचे काम करणे व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे. | प्र.क्रं. २६ वाकड-कावेरीनगर पोलिस वसाहती लगत सिमाभिंत बांधून भिंतीवर समूह शिल्प उभारणे | ४,००,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर जुन्या कामांच्या नावा ऐवजी नविन नावाचे कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्र.क्र. ३ च-होली/मोशी येथील विकास आराखडयातील रस्त्यांचे कामे सद्यस्थितीत मोठया प्रमाणात चालू आहेत. सदर विकास आराखडयातील रस्त्यांमध्ये जुन्या काळातील विहिरी पुर्णपणे बाधित होत असल्याने सदरच्या विहीरी बंद करणे आवश्यक आहे. सदर बंद करण्यात येणा-या विहिरीच्या मनपामार्फत योग्य तो मोबदला देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ३३३० दि. १६/१०/२०१८ अन्वये अतिरिक्त आयुक्त (२) यांनी त्याचेकडील पत्र क्र.

सुवि/५/कावि/४०४/२०१८ दि. ३०/०८/२०१८ अन्वये सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु. २ कोटी ५० लाख पत्र क्र. सुवि/५/कावि/४०३/२०१८ दि. ३०/०८/२०१८ अन्वये ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षावर र.रु. १३ कोटी तरतुद वाढवुन मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यात ट्रॅफिक वार्डन मदतनीस यांचा किमान वेतन दर दि. ०१/०४/२०१८ पासुन र.रु. ११८२४.७१ ऐवजी र.रु. २१,५१२/- झालेला आहे. रखवालदार मदतनीस यांचा किमान वेतन दर दि. ०१/०४/२०१८ पासुन र.रु. ११८२४.७१ ऐवजी र.रु. २१,५१२/- झालेला आहे. त्याकरीता ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षावर र.रु. १३ कोटी व अन्वये सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु. २ कोटी ५० लाख तरतुद वाढवुन मिळणेची विनंती केली आहे. अखर्चित निधीतुन ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षाकरीता र.रु. ५ कोटी व सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षाकरीता र.रु. १.५० कोटी अखर्चित निधीतुन वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.३ चिखली येथील अनाथ आश्रम ते देहु आळंदी रस्त्याला मिळणारा ३०.०० मी डि.पी. रस्ता विकसित करणे (निविदा क्र ३०/५४-२०१७-१८) निविदा रक्कम रूपये १,८६,७१,९८९/- हे काम, ठेकेदार मे. पेव्हे कंन्सट्रक्शन यांना मिळालेले असून, सदरचे काम करण्यास सद्यस्थितीत २५% जागा मनपाच्या ताब्यात आली असल्याने, सदर काम करण्याचे आदेश अद्यापही ठेकेदारास देणेत आलेले नाहीत. सदर कामातून विषयांकीत रस्ता करणेत येणार होता. तथापि, रस्त्याने बाधीत जागा संबंधित मालकांनी मनपास देण्यास तयारी न दाखविल्याने, सदरचा पुर्ण लांबीचा रस्ता करता येत नसल्याने, मनपाच्या ताब्यात असलेला रस्ता विकसीत करून, उर्वरीत शिल्लक राहणा-या रकमेतून, प्रभाग क्र १ चिखली मधील सोनवणेवस्ती, शेलारवस्ती व इतर आवश्यक ठिकाणी असलेल्या रस्त्यांचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तरी वरिलप्रमाणे सदर काम करणेस मान्यता देणेत यावी. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. १,२,६,८,९, १० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता ( औंध –रावेत बीआरटी ते मुंबई बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. ४४, ५० व ५१ मधील १८ मी. रुंद रस्ता (

मुंबई – बेंगलोर हायवे ते पुनावळे ) प्रस्तावित केलेला आहे, सदर रस्त्याने बाधित काही क्षेत्र मानपाच्या ताब्यात आलेले आहे. परंतु काही मिळकत धारक जागा टी.डी.आर व एफ.एस.आय. ने ताबा देत नाही त्यामुळे सदर भागातील रस्ता विकसित करता येत नाही. त्यामुळे नागरिकांची रस्त्याअभावी अडचण निर्माण झाली आहे, त्यामुळे रस्ता भुसंपादनाने ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तरी मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता ( औंध –रावेत बीआरटी ते मुंबई बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. ४४, ५० व ५१ मधील १८ मी. रुंद रस्ता ( मुंबई – बेंगलोर हायवे ते पुनावळे ) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देण्यात यावी.

२) पिंपरी चिंचवड शहरामध्ये नव्याने पोलीस आयुक्तालय स्थापन झालेले आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) करीता कार्यालय नसलेने पिंपरी चिंचवड हद्दीत जागेचा सर्व्हे करता डांगे चौक, थेरगाव येथील महापालिकेचे सांस्कृतिक भवन (जकात ऑफिस) या ठिकाणी कोणतेही कामकाज चालत नसल्याने सदर सांस्कृतीक भवन गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) करीता उपलब्ध करुन देणेसाठी मा. पोलीस निरिक्षक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड शहर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विनंती केलेली आहे.

सबब मा. पोलीस निरिक्षक यांना वरीलप्रमाणे सुचविलेले डांगे चौक, थेरगाव येथील महापालिकेचे सांस्कृतिक भवन गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) यांचे कार्यालयाचे संचलन सुलभ होण्याचे दृष्टीने कायदेशीर बाबी पडताळुन देणेस मान्यता देणेत यावी. तसेच १) प्रभाग क्र. २ मधील बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजीमहाराज यांचा आश्वारूढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे (पान क्र. ३७ अ.क्र. १५९ ) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला असून या कामाचे

नावांमध्ये “प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वारूढ पुतळा उभारणे कामी अनुषंगिक कामे करणे ” असा बदल करणेस मान्यता देणेत यावी.

२) प्रभाग क्र. ५ जाधववाडी कुदळवाडी मधील डि. पी. रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ५०/४-२०१७-१८) या चालू असलेल्या कामामधून नवीन प्रभाग क्र. २ मधील डि.पी. व नॉन डि.पी. रस्त्यांची कामे करणेस मान्यता देणेत यावी.

३) प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे (पान क्र.५५/अ.क्र.२७) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश असून या कामास रक्कम रूपये १६ कोटी चे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच मा. महापालिका सभा क्र. २१, ठराव क्र. २६२ दि. ०६।०९।२०१८ साठी खाली नमूद प्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे. यावी.

सदर मंजुर ठरावातील परीच्छेद क्र. ४ मधील ओळ क्र. ११ मधील मजकुर “करण्याविषयीचे धोरणानुसार करण्यास मान्यता देणेत यावी.” वगळून त्याऐवजी खालीलप्रमाणे मजकुर समाविष्ठ करण्यात यावा. “करण्याविषयीचा प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात येवून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रातील नदी ते निळी पुररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण।रस्ता बाधित मिळकती वार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात समाविष्ठ असल्या तरीदेखील अशा मिळकतींचे मूल्यांकन त्या मूल्य विभागाच्या विकसनक्षम मूल्य विभागाचे दरानुसारच करणेत येवून मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४ दि. २०।११।२०१५ व ठराव क्र. ९१५ दि. २९।०८।२०१६ नुसार खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचे धोरणांस मान्यता देण्यात यावी..” याप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देण्यात यावी. तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | वाढ करावयाची तरतूद रक्कम | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कासारवाडी शास्त्रीनगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | नविन | नविन | ७,००,००,००० | --- | | --- |
| | <u>घट</u> | | | | | | | |
| | अखर्चीत कामामधुन शिल्लक रक्कम | | | | | | | |
| १ | दापोडी येथील एल.एस. सोनकांबळे रेल्वे अंडरपास येथे नाल्याची खोली वाढविणे व रस्ता | | | | | | ७५,००,००० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | काँक्रीटीकरण करणे. | | | | | | | |
| २ | दापोडी येथे इंजिनिअरींग स्टोअर विकसित करणे. | | | | | | | २५,००,००० |
| ३ | फुगेवाडी येथील ७.०० मी. रस्ता विकसित करणे. | | | | | | | ५०,००,००० |
| | | | | | | एकूण | ७५,००,००० | ७५,००,००० |

तसेच क क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागा कडील प्रभाग क्र. २ मधील खालील विकास कामांचा सन २०१८-१९ चे अंजापत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र/अनु क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | सन २०१८-१९ ची तरतुद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील गट नं ६०६ आरक्षण १/१४६ येथे माध्यमिक शाळा इमारत बांधणे. | - | विशेष योजना | 270,000,000 | - | 10,000,000 | | |
| २ | प्रभाग क्र. २ मधील मनपाचे विविध सांस्कृतीक कार्यक्रम व क्रिंडा विभागामार्फत भरविण्यात येणा-या स्पर्धांसाठी मंडप व्यवस्था करणे. | - | स्थापत्य विषयक कामे करणे | 5,000,000 | - | 3,300,000 | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र. २ मध्ये अस्थित्वातील मोडकळीस आलेली सार्वजनिक स्वच्छता गृह पाडून त्या ठिकाणी नविन स्त्री व पुरषांसाठी सुलभ स्वच्छतागृह बांधणे | - | विशेष योजना | 35,000,000 | - | 5,000,000 | | |
| ४ | अखर्चीत कामामधून शिल्लक रक्कम | | | 2,005,683,100 | | | 18,300,000 | |
| एकूण | | - | | | - | 18,300,000 | 18,300,000 | |

तरी वरील प्रमाणे कामे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करून अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी तसेच या कामांना सन २०१८ - १९ साठी लागणारी तरतुद अर्खीत कामामधून शिल्लक असलेल्या रकमेतून वर्गाकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रावेत येथील रेल्वे उड्डाणपुलालगत असलेला सेवा रस्ता विकसीत करणे व अनुषंगिक कामे करणे. | | | विशेष योजना | १०००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | नविन काम |
| २ | मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवे ते भक्ती शक्ती चौका पर्यंत ४५ मी. रस्ता विकसीत करणे. | २४ | १२८ | विशेष योजना | ७३००००००० | १२००००००० | ० | १००००००० | ११००००००० | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (भाग - १) | | | | | | | | | |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या भक्ती शक्ती उद्यान येथे स्थापत्य विभागामार्फत १०७ मीटर उंचीचा राष्ट्रध्वज उभारणे व अनुषंगिक कामे करण्यात आलेली आहेत. सदरचा उभाकरण्यात आलेला राष्ट्रध्वज २४ तास (पावसाळा वगळून) फडकवणे आवश्यक आहे. सदरचा राष्ट्रध्वज व अनुषांगिक साहित्याची चालन देखभाल दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. सदर चालन देखभाल दुरूस्तीचे कामामधील विद्युत विभातील विद्युत यांत्रिकी स्वरुपाचे काम हे विद्युत विभागामार्फत व राष्ट्रध्वजामध्ये दुरूस्ती करिता राष्टध्वज चढविणे व उतरविणे हे सुरक्षा विभागामार्फत तसेच स्थापत्य विषयक कामे स्थापत्य विभागामार्फत करणे आवश्यक आहे. सदर भक्ती शक्ती येथिल राष्टध्वज चालन व देखभाल तसेच अनुषंगिक यंत्रणेचे चालन देखभाल दुरूस्ती त्रेवार्षिक ( ३ वर्ष ) कामाकरिता प्रशासकिय मान्यता र.रू ३,००,००,०००/- कोटी तसेच सदर कामास विद्युत उद्यान यास लेखाशीर्षमधील पान क्र. ३१९ अनु क्र. २ च्या कामामधून र,रु. १,००,००,०००/- तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वार्ड क्र. १० मध्ये बर्ड व्हॅली या उद्यानात फ्लोटिंग म्युजीकल संगीत कारंजे व मल्टीमिडीया लेजर व एल.इ.डी. लाईट बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | ३१९ | २ | उद्याने | ५००००००० | ९३०००००० | ० | १०००००० | ८३०००००० | विद्युत मुख्य कार्यालय ( अ प्रभाग ) |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | भक्ती शक्ती उद्यान येथील राष्ट्रध्वज फडकविणे चालन व देखभाल तसेच अनुषंगिक यंत्रणेचे चालन देखभाल दुरूस्तीकरणे. | - | - | उद्याने | ३००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | विद्युत मुख्य कार्यालय ( अ प्रभाग ) |

मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमाक 31 मधिल अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्तीचे खांब हे 20 ते 25 वर्षा पुर्वी बसविलेले असुन ते गंजलेले आहेत त्यामुळे धोका होण्याची शक्यता आहे, सदर चे पोल हे अंतर्गत लहान रस्त्यावर असुन त्या ठिकाणी मनपा चे वाहन पोहचु शकत नाही, तसेच ते धोकादायक असल्याने त्यावर चढुन किंवा शीडी लावून दुरूस्ती काम करता येत नाही. तरी सदरचे सर्व जुने खांब बदलुन त्या ठिकाणी नविन खांब बसविणे व त्या अनुशंगाने केबल वायर इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाचा समावेश सन 2018-19 चे अंदाजपत्रकात समावेश नसल्याने " प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवि सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे जुने खांब बदलणे " ह्या कामाचा समावेश अंदाजपत्रकात करून सदर कामा करीता खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवी सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे जुने खांब बदलणे | ३१२ | ५ | विद्युत सार्वजनिक सुरक्षीतता | ३००००००० | ० | ९०००००० | ० | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रभाग क्रमांक ३१काटेपुरम चौक ते PWD पाण्याच्या टाकी पर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसीत करणे. | ४६ | ९१ | वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्किंग जागा विकसीत करणे | ५००००००० | | ० | ४५००००० | | |
| ७ | प्रभाग क्रमांक ३१ फेमस चौक ते दशक्रिया विधि घाट रस्ता अद्यावत पद्धतीने विकसीत करणे. | ४६ | ९५ | वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्किंग जागा विकसीत करणे | ५००००००० | | ० | ४५००००० | | |

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षात अंतर्गत खालील नवीन कामे करण्यासाठी प्रशासकिय व तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | प्राधिकरण से.क्र.२७ अ येथे यशवंतराव चव्हाण स्मारक समितीची इमारत बांधणे | | | विशेष योजना | ३०००००००० | ० | २००००००० | ० | २००००००० | नवीन काम |
| ९ | प्राधिकरण से.क्र.२७ मधील मदनलाल धिंग्रा मैदानावर फुटबॉल साठी सिंथेटिक ट्रॅक करणे व बॅडमिंटन हॉलचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक | | | विशेष योजना | १५००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | नवीन काम |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कामे करणे. | | | | | | | | | |
| १० | प्र.क्र. २४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे. | ४६ | १६/१ | विशेष योजना | १२५००००० | ५०३३७००० | ० | ३०००००० | २०३३७००० | |

तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील रक्कमेमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्र कीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | | |
| १ | कासारवाडी भाजीमंडई विकसीत करणे. | विशेष योजना | नविन | नविन | १,००,००,००० | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| | | | ठराव क्र.१८७ दि.२०/०४/२०१८ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणे. | | | | | | |
| | | | | | | एकूण | १०,००,००,००० |

तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील रक्कमेमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्र कीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | | |
| १ | कासारवाडी फुगेवाडी १२ डीपी रस्त्यावर सीडी वर्क बांधणे व रस्ता विकसीत करणे. | विशेष योजना | नविन | नविन | २,००,००,००० | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| | | | ठराव क्र.१८७ | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दि.२०/०४/२०१८ | | | |
| | अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणे. | | | | | |
| | | | | | एकूण | १०,००,००,००० |

तसेच प्रभाग क्र. ९ मधील नुरमोहल्ला परिसरातील मोकळया जागेत पुरुष व महिला २६ सीट्सचे स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे पा.क्र. ४९३ अ.क्र.१३ कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. १७७, दि.२०/०४/२०१८ अन्वये रक्कम रुपये १५,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर ठिकाणी २६ सीट्सचे स्वच्छतागृह सुलभ शौचालय संस्थेमार्फत बांधावयाचे आहे. तसेच तेथील मोकळया जागेमध्ये स्वतंत्र निवासी रखवालदाराची खोली नाल्यावर ॲप्रोच स्लॉब देखील बांधावयाची आहे. वरील सर्व बाबींची उपरोक्त कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम अपुरी पडत आहे. तरी प्रभाग क्र. ९ मधील नुरमोहल्ला परिसरातील मोकळया जागेत पुरुष व महिला २६ सीट्सचे स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे, या कामासाठी रक्कम रुपये १,५०,००,०००/- (अक्षरी एक कोटी पन्नास लाख फक्त) एवढया रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ३४५५, दि. ३०/१०/२०१८ अन्वये स्थापत्य "अ" क्षेत्रिय कार्यालय व मुख्यालयाकरीता अंदाजपत्रकामधील तरतुदीमध्ये वाढ-घट करणेकामी प्रस्तावित केले आहे. स्थापत्य अ मुख्यालय या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील स्थापत्य विशेष योजना, भांडवली, प अंदाजपत्रक व महसुली कामे या लेखाशिर्षातून प्रस्तावित कामांचे र.रू.८,२९,६३,०००/- वर्गीकरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२७ मोरवाडी मधील लिंगायत स्मशानभूमीची दुरूस्ती देखभालीची कामे करणे व नुतनीकरण करणे. | १७ | ५ | विशेष योजना | 15,00,000 | 3,00,000 | |
| २ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | ३० | २ | रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | 50,00,000 | 1,45,00,000 | |
| ३ | प्रभाग क्र. ९ मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | ३० | ३ | रोड पेव्हमेंट मॅनेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | 25,00,000 | 6,00,000 | |
| ४ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथील के एस बी चौक ते नंदिनी हॉटेलपर्यंत सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे. | ३० | ४ | विशेष योजना | 0 | 27,00,000 | |
| ५ | प्रभाग क्र. १५ आकुर्डी दत्तवाडी मधील स्व. मधुकर आण्णा पवळे पुतळ्याच्या परिसराचे सुशेभिकरण करणे. | ४१ | ३ | स्थापत्य विशेष योजना | 20,00,000 | 26,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रभाग क्र. ९ मध्ये चिखली फिल्ट्रेशन प्लॉन्ट पासुन शाहुनगर, संभाजीनगर च्या विविध भागात गार्डनिंगसाठी पाईप लाईन टाकणे. | ५१ | ३ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 35,00,000 | |
| ७ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे बहिरवाडे मैदाना भवती सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक काम करणे. | ५१ | ६ | स्थापत्य विशेष योजना | 5,00,000 | 55,00,000 | |
| ८ | प्रभाग क्र. १० मधील मोरवाडी आय.टी. आय. येथे स्थापत्य व फर्निचर विषयक कामे करणे. | ५३ | ६९ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 50,00,000 | |
| ९ | सायन्स पार्क परिसरात तारांगण उभारणे. | ५४ | २ | विशेष योजना | 35,00,000 | 70,00,000 | |
| १० | मोरवाडी येथे कला व क्रिडा सभागृह विकसित करणे. | ५४ | ४ | पर्यटन विकास आराखडा | 70,00,000 | 8,00,000 | |
| ११ | ब प्रभागात वॉर्ड क्र.२१ मध्ये वॉर्ड सेंटर विकसित करणे. | ५४ | ५ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 29,00,000 | |
| | भांडवली मुख्यालय | | | | | | |
| १२ | प्रभाग क्र. ९ शाहुनगरमध्ये अत्यावश्यक ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे. | ७१ | ११ | नाला ट्रेनिंग | 0 | 1,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बजाज स्कुल व परिसरात ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटरसाठी पाईप लाईन टाकणे. | ७२ | ७ | सरफेस गटर्स | 16,30,000 | 50,000 | |
| १४ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे HDFC व परिसरात ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटरसाठी पाईप लाईन टाकणे | ७२ | ८ | सरफेस गटर्स | 17,00,000 | 50,000 | |
| १५ | प्रभाग क्र.९ मधील HDFC कॉलनी व परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७६ | २९ | डांबरी रस्ते | 0 | 40,00,000 | |
| १६ | प्रभाग क्र. १४ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३२ | डांबरी रस्ते | 12,30,000 | 2,83,000 | |
| १७ | प्रभाग क्र. १७ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३५ | डांबरी रस्ते | 10,00,000 | 13,00,000 | |
| १८ | प्रभाग क्र. २७ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३८ | डांबरी रस्ते | 9,50,000 | 11,00,000 | |
| १९ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर व शाहूनगर परीसरातील रस्त्यांचे खडी मुरूमीकरण व BBM पध्दतीने रस्त्याचे चर | ७६ | ४० | डांबरी रस्ते | 6,00,000 | 14,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बुजविणे व डांबरीकरण करणे. | | | | | | |
| २० | प्रभाग क्र. ९ मधील अम्ब्रेला उद्यान व परिसरात रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७६ | ४१ | डांबरी रस्ते | 4,00,000 | 2,00,000 | |
| २१ | प्रभाग क्र. १० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्ये भागात नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २४ | दगडी फरशी फुटपाथ | 16,50,000 | 12,50,000 | |
| २२ | प्रभाग क्र. १५ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २६ | दगडी फरशी फुटपाथ | 16,00,000 | 14,00,000 | |
| २३ | प्रभाग क्र. १७ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २८ | दगडी फरशी फुटपाथ | 22,50,000 | 10,50,000 | |
| २४ | प्रभाग क्र. २६ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | ३० | दगडी फरशी फुटपाथ | 22,50,000 | 8,00,000 | |
| २५ | प्रभाग क्र. ९ सर्प उद्यान व परिसरात फटपाथ तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | ७९ | ३२ | दगडी फरशी फुटपाथ | 4,00,000 | 50,000 | |
| २६ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे KSB चौक ते नंदिनी हॉटेल पर्यंत ठिकठिकाणी पेव्हींग | ७९ | ३३ | दगडी फरशी फुटपाथ | 10,80,000 | 10,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब्लॉकचे फुटपाथ तयार करणे. | | | | | | |
| २७ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर थरमॅक्स चौक ते KSB चौक पर्यंत पेव्हींग ब्लॉकचे फुटपाथ तयार करणे. | ७९ | ३४ | दगडी फरशी फुटपाथ | 7,80,000 | 9,45,000 | |
| २८ | वॉर्ड क्र. १० लोटस हौसिंग सोसायटी जवळील सी.डी. वर्कचे रुंदीकरण करणे. | ८१ | १ | पुल व प्रकल्प | 7,00,000 | 4,50,000 | |
| २९ | अ प्रभागातील एक वॉर्ड विकसित करणे (प्रभाग क्र. १४ भक्ती शक्ती उद्यान) | ८१ | १ | इमारत योजना | 10,00,000 | 50,00,000 | |
| ३० | प्रभाग क्र. १६ मध्ये मौलाना आझाद उर्दु शाळेचे रंगसफेदी व नुतनीकरणाची कामे करणे. | ८२ | १६ | इमारत योजना | 10,00,000 | 2,00,000 | |
| ३१ | प्रभाग क्र. १७ अंतर्गत मनपा इमारतीची स्थापत्यविषयक कामे करणे. | ८२ | २० | इमारत योजना | 9,60,000 | 4,00,000 | |
| ३२ | प्रभाग क्र. २६ काळभोरनगर (नविन प्रभाग क्र. १४) काळभोरनगर मोहननगर मध्ये दिशादर्शक सुचना फलक रोड फर्निचर व स्थापत्य विषयक कामे | ८६ | १९ | स्थापत्य विषयक कामे करणे | 11,00,000 | 20,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे. | | | | | | |
| ३३ | प्रभाग क्र. १० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्ये पेव्हींग ब्लॉक गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २३ | स्थापत्य विषयक कामे करणे | 25,00,000 | 16,10,000 | |
| ३४ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतींचा किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २७ | स्थापत्य विषयक कामे करणे | 26,00,000 | 16,00,000 | |
| ३५ | प्रभाग क्र. २५ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २८ | स्थापत्य विषयक कामे करणे | 26,00,000 | 12,00,000 | |
| ३६ | प्रभाग क्र. ९ येथील मनपा इमारतीमध्ये स्थापत्य विषयक कामे करणे. | ८६ | ३२ | स्थापत्य विषयक कामे करणे. | 5,00,000 | 11,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भांडवली प्रभाग | | | | | | |
| ३७ | प्रभाग क्र. २६ मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७७ | ६४ | डांबरी रस्ते | 0 | 8,50,000 | |
| ३८ | प्रभाग क्र. १० मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५२ | दगडी फरशी फुटपाथ | 90,000 | 3,00,000 | |
| ३९ | प्रभाग क्र. १४ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५३ | दगडी फरशी फुटपाथ | 40,000 | 6,10,000 | |
| ४० | प्रभाग क्र. १५ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५४ | दगडी फरशी फुटपाथ | 30,000 | 6,50,000 | |
| ४१ | प्रभाग क्र. १६ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५५ | दगडी फरशी फुटपाथ | 30,000 | 6,00,000 | |
| ४२ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५६ | दगडी फरशी फुटपाथ | 50,000 | 90,000 | |
| ४३ | प्रभाग क्र. २७ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५९ | दगडी फरशी फुटपाथ | 10,000 | 6,75,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४४ | प्रभाग क्र. १५ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, फुटपाथ इ. किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८८ | ५८ | स्थापत्य विषयक कामे करणे | 30,000 | 1,00,000 | |
| ४५ | प्रभाग क्र. १६ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, फुटपाथ इ. किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८८ | ५९ | स्थापत्य विषयक कामे करणे | 3,00,000 | 3,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प अंदाजपत्रक | | | | | | |
| ४६ | अ प्रभागात महिलांकरिता स्वच्छतागृह बांधणे व अनुषंगिक कामे करणे. | ४८८ | ३ | संडास व मुता-या | 1,50,000 | 50,000 | |
| | महसुली मुख्यालय | | | | | | |
| ४७ | प्रभाग क्र. १० मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४२ | ५ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 10,00,000 | 10,00,000 | |
| ४८ | प्रभाग क्र. १७ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४२ | ९ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 10,00,000 | 11,00,000 | |
| ४९ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५४६ | ३० | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय (अ प्रभाग) | 16,65,000 | 50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे. | ५४७ | ३७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय (अ प्रभाग) | 7,00,000 | 4,00,000 | |
| ५१ | प्रभाग क्र. २४ मध्ये नविन सार्वजनिक शौचालय बांधणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५५४ | १२ | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय (ब प्रभाग) | 63,50,000 | 7,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महसुली प्रभाग | | | | | | |
| ५२ | प्रभाग क्र. १४ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४४ | ४४ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 0 | 3,00,000 | |
| ५३ | प्रभाग क्र. १५ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४४ | ४५ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 2,21,000 | 10,000 | |
| ५४ | प्रभाग क्र. २५ चिंचवड स्टेशन मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीचे कामे करणे. | ५४४ | ४८ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 2,05,030 | 7,00,000 | |
| ५५ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर मधील विविध ठिकाणी डांबरी रस्त्यांची किरकोळ दुरुस्तींची कामे करणे. | ५४४ | ५१ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 1,50,000 | 8,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५६ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ५४८ | ६६ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 40,168 | 60,000 | |
| ५७ | प्रभाग क्र. २६ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ५४८ | ६७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 70,000 | 6,80,000 | |
| ५८ | प्रभाग क्र. १९ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | ५४९ | ८३ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,00,598 | 3,60,000 | |
| ५९ | प्रभाग क्र.१९ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरूस्ती करणे | ५४९ | ८७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,01,503 | 1,30,000 | |
| ६० | प्रभाग क्र.१९ मध्ये खड्डे, ट्रेंचेस, जीएसबी, व्हेटमिक्स पध्दतीने बुजविणे. | ५४९ | ८८ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,10,000 | 1,40,000 | |
| ६१ | प्रभाग क्र. १९ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | ५४९ | ९० | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 5,24,095 | 1,50,000 | |
| | घट | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६२ | प्र.क्र. २४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे. | ४६ | १ | विशेष योजना | 15,00,00,000 | | 8,29,63,000 |
| | एकुण | | | | 21,63,47,394 | 8,29,63,000 | 8,29,63,000 |

वरीलप्रमाणे स्थापत्य "अ'' क्षेत्रिय कार्यालय व मुख्यालयाकडील वर्गीकरण प्रस्तावित केलेनुसार रक्कम रुपये ८,२९,६३,०००/- ( अक्षरी - रक्कम रूपये आठ कोटी एकोन्नतीस लाख त्रेसष्ठ हजार फक्त) इतकी तरतुद वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. सुरेश भोईर –** मा. महापौर साहेब उपसुचनेस अनुमोदन देतो.

**मा. नायर प्रेमकुमार उर्फ बाबु** – मा. महापौर साहेब, उपूसचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३०५ विषय क्रमांक- ४

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/०६/कावि/१०७६०/२०१८ दि.१४/९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१८१ दि.१८/०९/२०१८

क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांनी दि.२८/०८/२०१८ चे प्रस्तावान्वये ग क्षेत्रिय कार्यालयाकडील स्थायी अस्थापना लेखाशिर्षावरील तरतूद माहे सप्टेंबर २०१८ ते माहे फेब्रुवारी २०१९ या महिन्यांकरिता वेतन अदायगी करिता तरतूद कमी पडत असल्याने र.रू.७०,००,०००/-तरतूद वाढवून मिळणेची विनंती केलेली आहे. र.रू.६२,६५,०००/- तरतूद केलेली असुन र.रू.६२,९९,४८५/- खर्च झालेले असून र.रू.७,००,५१५/- तरतूद शिल्लक आहे. ग क्षेत्रिय कार्यालयाकडे वाहनचालक, लेखाधिकारी, लेखापाल, लिपिक यांची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मा.अध्यक्ष, प्रभाग समिती व प्रशासन अधिकारी खाजगी वाहन वापर करीत आहे

त्यांचे बिल अदायगी साठी स्वतंत्र लेखाशिर्ष नाही स्थायी अस्थापना लेखाशिर्षातुन तरतूद खर्ची टाकणेत येत आहे यासाठी र.रू.७०,००,०००/- वाढीव तरतूदीची आवश्यकता आहे. अखर्चित निधीतून स्थायी अस्थापना लेखाशिर्षावर र.रू.७० लाख वाढ करून वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक 3149, दिनांक 11/09/2018 अन्वये मान्यता विचारात घेवून नागरवस्ती व विकास योजना विभागाकडील 2018-19 या अंदाजपत्रकातील पान क्रमांक (322) क्रमांक (4) मधील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनुक्रमांक 11 इतर योजना / कार्यक्रम या उपलेखाशिर्षावरील तरतूद मधून करण्यास तसेच त्याकामी लाभार्थींच्या संख्येत वाढ झाल्यास 31/03/2019 अखेर पर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६६ नुसार सदर योजना राबविणेकामी आवश्यकते नुसार इतर लेखाशिर्षावरील भांडवली / महसुली अखर्चित / शिल्लक रकमेमधून आवश्यक ती रक्कम नागरवस्ती व विकास योजना विभागातील इतर कल्याणकारी योजना मधील उपलेखाशिर्ष अनुक्रमांक 11 इतर योजना / कार्यक्रम या लेखाशिर्षावर वेळोवेळी प्राधान्याने वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र. ३३८० दिनांक २३/१०/२०१८ अन्वये मान्यता विचारात घेऊन सदर प्रकल्प राबविण्यासाठी खर्चाची तरतूद प्राथमिक शिक्षण विभागातील ई लर्निंग स्कूल वरील पान क्र. २९९ अ.नु. ४९ या लेखाशिर्षामधुन खर्च करण्यात यावी सदर प्रकल्प सन २०१८-१९ मध्ये राबविण्यासाठी जादा खर्चासाठी प्राधान्याने पान क्र. २९९ अ.नु. ४९ ई लर्निंग स्कुल या लेखाशिर्षावर प्राथमिक व माध्यमिक विभाग तसेच इतर विभागातील अखर्चित राहिलेली तरतूद व इतर विभागास न लागणारी तरतूद वेळोवेळी प्राधान्याने वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समाविष्ठ करुन कामास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे व आवश्यक तरतूद वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. अ. क्र. | अ. क्र. | प्रशासकीय र.रु. | सन २०१८-१९ चा मुळ अंदाज | वाढ करावयाची तरतूद र.रु. | घट करावयाची तरतूद र.रु. | सन २०१८-१९ ची सुधारीत तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मोशी येथील मोरया | - | - | २५०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कॉलनी, फातीमानगर, खानदेशनगर, संत ज्ञानेश्वर नगर इ ठिकाणचे रस्ते अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | | | | | | | |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली/ मोशी येथील उर्वरीत ठिकाणचे रस्ते अदयावत पध्दतीने विकसीत करणे. | - | - | २०००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० |
| ३ | प्र.क्र. ३ येथील आदर्शनगर मधील डी.पी.रस्ते विकसीत करणे. | २३ | ११५ | २५००००००० | ७५०००००० | ० | १००००००० | ६५०००००० |
| | एकूण | | | | ७५०००००० | १००००००० | १००००००० | ७५०००००० |

तरी सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातून विशेष योजना लेखाशिर्षातील कामांसाठी सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या तरतूदी कामकाजाच्या दृष्टीने अपुरी पडत असून सदर प्रशासकीय मान्यतेनुसार काम करणे शक्य होणार नाही असे वाटते तरी सदर कामांच्या प्रशासकीय मान्यतेत वाढ करणे आवश्यक असल्याने

खालीलप्रमाणे सदर कामांच्या प्रशासकीय मान्यतेत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | अंदाजपत्रकातील पान क्र./अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | सन २०१८-१९ मधील अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४/१०६ | विशेष योजना | आकुर्डी स.नं. १७३ पै.(सि.स.नं. ४६६१ पै.) येथील कोहली वखारजवळील १८.०० मी. डी.पी.रस्ता विकसीत करणे. | ६० लाख | ६.०० कोटी |
| २ | ४५/६९ | विशेष योजना | प्रभाग क्र. १४ मधील विवेकनगर, तुळजाईवस्ती भागातील डी.पी.रस्त्यांचे मजबुतीकरण/सुधारणा/नुतनीकरण/कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख | १५.०० कोटी |
| ३ | ४५/७० | विशेष योजना | प्रभाग क्र. १४ मधील आकुर्डी पालखी मार्गाचे आकुर्डी मनपा दवाखाना ते खंडोबामाळ चौकापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख | १५.०० कोटी |

तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून सदर कामामुळे शहराच्या सौंर्दयात व लौकीकात भर पडणार आहे.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | आवश्यक तरतुद रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | प्र. क्रं. २६ पिंपळे निलख-रक्षक चौक येथील बी.आर.टी.एस. रस्त्यालगत मिलिटरी हद्दीत भारताचा राष्ट्रध्वज उभारणे व इतर स्था. अनु. कामे करणे | ५०,००,०००/- | ३४,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामांचा नव्याने समावेश करणेकामी व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून

अंदाजपत्रकातील जुन्या कामांचे नाव वगळून नविन नावांच्या कामांचा समावेश करणे गरजेचे आहे.

| अनु क्र. | अंदाजपत्रक सन २०१८-१९ मधील कामाचे नाव | बदली करायच्या कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | पिंपळे निलख प्रभाग क्र.५४ येथील महादेव मंदीरामागील परिसरात नदीकडेने संरक्षण भिंतीचे काम करणे व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे. | प्र.क्रं. २६ वाकड-कावेरीनगर पोलिस वसाहती लगत सिमाभिंत बांधून भिंतीवर समूह शिल्प उभारणे | ४,००,००,०००/- |

तरी वर नमूद केलेप्रमाणे सन २०१८-१९ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर जुन्या कामांच्या नावा ऐवजी नविन नावाचे कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्र.क्र. ३ च-होली/मोशी येथील विकास आराखडयातील रस्त्यांचे कामे सद्यस्थितीत मोठया प्रमाणात चालू आहेत. सदर विकास आराखडयातील रस्त्यांमध्ये जुन्या काळातील विहिरी पुर्णपणे बाधित होत असल्याने सदरच्या विहीरी बंद करणे आवश्यक आहे. सदर बंद करण्यात येणा-या विहिरीच्या मनपामार्फत योग्य तो मोबदला देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ३३३० दि. १६/१०/२०१८ अन्वये अतिरिक्त आयुक्त (२) यांनी त्याचेकडील पत्र क्र. सुवि/५/कावि/४०४/२०१८ दि. ३०/०८/२०१८ अन्वये सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु. २ कोटी ५० लाख पत्र क्र. सुवि/५/कावि/४०३/२०१८ दि. ३०/०८/२०१८ अन्वये ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षावर र.रु. १३ कोटी तरतुद वाढवुन मिळण्याची विनंती केलेली आहे. त्यात ट्रॅफिक वार्डन मदतनीस यांचा किमान वेतन दर दि. ०१/०४/२०१८ पासुन र.रु. ११८२४.७१ ऐवजी र.रु. २१,५१२/- झालेला आहे. रखवालदार मदतनीस यांचा किमान वेतन दर दि. ०१/०४/२०१८ पासुन र.रु. ११८२४.७१ ऐवजी र.रु. २१,५१२/- झालेला आहे. त्याकरीता ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षावर र.रु. १३ कोटी व अन्वये सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु. २ कोटी ५० लाख तरतुद वाढवुन मिळणेची विनंती केली आहे. अखर्चित निधीतुन ठेकेदारी पद्धतीने सुरक्षा व्यवस्था लेखाशिर्षाकरीता र.रु. ५ कोटी व सामाजिक सुरक्षितता उपक्रम या लेखाशिर्षाकरीता र.रु. १.५० कोटी अखर्चित निधीतुन वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.३ चिखली येथील अनाथ

आश्रम ते देहु आळंदी रस्त्याला मिळणारा ३०.०० मी डि.पी. रस्ता विकसित करणे (निविदा क्र ३०/५४-२०१७-१८) निविदा रक्कम रूपये १,८६,७१,९८९/- हे काम, ठेकेदार मे. पेव्हे कंन्सट्रक्शन यांना मिळालेले असून, सदरचे काम करण्यास सद्यस्थितीत २५% जागा मनपाच्या ताब्यात आली असल्याने, सदर काम करण्याचे आदेश अद्यापही ठेकेदारास देणेत आलेले नाहीत. सदर कामातून विषयांकीत रस्ता करणेत येणार होता. तथापि, रस्त्याने बाधीत जागा संबंधित मालकांनी मनपास देण्यास तयारी न दाखविल्याने, सदरचा पुर्ण लांबीचा रस्ता करता येत नसल्याने, मनपाच्या ताब्यात असलेला रस्ता विकसीत करून, उर्वरीत शिल्लक राहणा-या रकमेतून, प्रभाग क्र १ चिखली मधील सोनवणेवस्ती, शेलारवस्ती व इतर आवश्यक ठिकाणी असलेल्या रस्त्यांचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तरी वरिलप्रमाणे सदर काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. १,२,६,८,९, १० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता ( औंध –रावेत बीआरटी ते मुंबई बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. ४४, ५० व ५१ मधील १८ मी. रुंद रस्ता ( मुंबई – बेंगलोर हायवे ते पुनावळे ) प्रस्तावित केलेला आहे, सदर रस्त्याने बाधित काही क्षेत्र मानपाच्या ताब्यात आलेले आहे. परंतु काही मिळकत धारक जागा टी.डी.आर व एफ.एस.आय. ने ताबा देत नाही त्यामुळे सदर भागातील रस्ता विकसित करता येत नाही. त्यामुळे नागरिकांची रस्त्याअभावी अडचण निर्माण झाली आहे, त्यामुळे रस्ता भुसंपादनाने ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तरी मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. १,२,६,८,९,१० व ११ मधील १८ मी. रुंद रस्ता ( औंध –रावेत बीआरटी ते मुंबई बेंगलोर हायवे) व मौजे पुनावळे येथील मंजुर विकास योजनेतील स.न. ४४, ५० व ५१ मधील १८ मी. रुंद रस्ता ( मुंबई – बेंगलोर हायवे ते पुनावळे ) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा सन २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

२) पिंपरी चिंचवड शहरामध्ये नव्याने पोलीस आयुक्तालय स्थापन झालेले आहे. त्याअंतर्गत गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) करीता कार्यालय नसलेने पिंपरी चिंचवड हद्दीत जागेचा सर्व्हे

करता डांगे चौक, थेरगाव येथील महापालिकेचे सांस्कृतिक भवन (जकात ऑफिस) या ठिकाणी कोणतेही कामकाज चालत नसल्याने सदर सांस्कृतीक भवन गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) करीता उपलब्ध करुन देणेसाठी मा. पोलीस निरिक्षक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड शहर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विनंती केलेली आहे.

सबब मा. पोलीस निरिक्षक यांना वरीलप्रमाणे सुचविलेले डांगे चौक, थेरगाव येथील महापालिकेचे सांस्कृतिक भवन गुन्हे शाखा युनिट -२ (सांगवी, वाकड, हिंजवडी, देहुरोड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी) यांचे कार्यालयाचे संचलन सुलभ होण्याचे दृष्टीने कायदेशीर बाबी पडताळुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) प्रभाग क्र. २ मधील बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजीमहाराज यांचा आश्वारूढ पुतळा उभारणे व अनुषंगिक कामे करणे (पान क्र. ३७ अ.क्र. १५९ ) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आला असून या कामाचे नावांमध्ये "प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी विनायकनगर मोशी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा आश्वारूढ पुतळा उभारणे कामी अनुषंगिक कामे करणे " असा बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

२) प्रभाग क्र. ५ जाधववाडी कुदळवाडी मधील डि. पी. रस्ता विकसीत करणे (निविदा क्र. ५०/४-२०१७-१८) या चालू असलेल्या कामामधून नवीन प्रभाग क्र. २ मधील डि.पी. व नॉन डि.पी. रस्त्यांची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

३) प्रभाग क्र. २ बो-हाडेवाडी येथील ताब्यात येणा-या गायरान जागेतील आरक्षणावर शाळा इमारत बांधणे (पान क्र. ५५/अ.क्र.२७) या कामाचा सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश असून या कामास रक्कम रूपये १६ कोटी चे खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा. महापालिका सभा क्र. २१, ठराव क्र. २६२ दि. ०६।०९।२०१८ साठी खाली नमूद प्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर मंजुर ठरावातील परीच्छेद क्र. ४ मधील ओळ क्र. ११ मधील मजकुर "करण्याविषयीचे धोरणानुसार करण्यास मान्यता देणेत येत आहे" वगळून त्याऐवजी

खालीलप्रमाणे मजकुर समाविष्ठ करण्यात यावा. "करण्याविषयीचा प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात येवून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रातील नदी ते निळी पुररेषा (निषिध्द) क्षेत्रातील आरक्षण।रस्ता बाधित मिळकती वार्षिक मूल्यदर सूचीत विकसनक्षम मूल्य विभागात समाविष्ठ असल्या तरीदेखील अशा मिळकतींचे मूल्यांकन त्या मूल्य विभागाच्या विकसनक्षम मूल्य विभागाचे दरानुसारच करणेत येवून मा. महापालिका सभा ठराव क्र. ७७४ दि. २०।११।२०१५ व ठराव क्र. ९१५ दि. २९।०८।२०१६ नुसार खाजगी वाटाघाटीने मोबदला अदा करण्याविषयीचे धोरणांस मान्यता देण्यात येत आहे." याप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील तरतुदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | वाढ करावयाची तरतूद रक्कम | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कासारवाडी शास्त्रीनगर येथे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | विशेष योजना | नविन | नविन | ७,००,००,००० | --- | | --- |
| | <u>घट</u> | | | | | | | |
| | अखर्चीत कामामधुन शिल्लक रक्कम | | | | | | | |
| १ | दापोडी येथील एल.एस. सोनकांबळे रेल्वे अंडरपास येथे नाल्याची खोली वाढविणे व रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | | | | | | ७५,००,००० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | दापोडी येथे इंजिनिअरींग स्टोअर विकसित करणे. | | | | | | | २५,००,००० |
| ३ | फुगेवाडी येथील ७.०० मी. रस्ता विकसित करणे. | | | | | | | ५०,००,००० |
| | | | | | | एकूण | ७५,००,००० | ७५,००,००० |

तसेच क क्षेत्रीय कार्यालय, स्थापत्य विभागा कडील प्रभाग क्र. २ मधील खालील विकास कामांचा सन २०१८-१९ चे अंजापत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र/अनु क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | सन २०१८-१९ ची तरतुद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. २ मधील गट नं ६०६ आरक्षण १/१४६ येथे माध्यमिक शाळा इमारत बांधणे. | - | विशेष योजना | 270,000,000 | - | 10,000,000 | | |
| २ | प्रभाग क्र. २ मधील मनपाचे विविध सांस्कृतीक कार्यक्रम व क्रिंडा विभागामार्फत भरविण्यात येणा-या स्पर्धांसाठी मंडप व्यवस्था करणे. | - | स्थापत्य विषयक कामे करणे | 5,000,000 | - | 3,300,000 | | |
| ३ | प्रभाग क्र. २ मध्ये अस्थित्वातील मोडकळीस आलेली सार्वजनिक स्वच्छता गृह पाडून त्या ठिकाणी नविन स्त्री व पुरषांसाठी सुलभ | - | विशेष योजना | 35,000,000 | - | 5,000,000 | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वच्छतागृह बांधणे | | | | | | | |
| ४ | अखर्चीत कामामधून शिल्लक रक्कम | | | 2,005,683,100 | | | 18,300,000 | |
| एकूण | | - | | | - | 18,300,000 | 18,300,000 | |

तरी वरील प्रमाणे कामे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करून अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता मिळावी तसेच या कामांना सन २०१८ - १९ साठी लागणारी तरतुद अर्खीत कामामधून शिल्लक असलेल्या रकमेतून वर्गाकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रावेत येथील रेल्वे उड्डाणपुलालगत असलेला सेवा रस्ता विकसीत करणे व अनुषंगिक कामे करणे. | | | विशेष योजना | १०००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | नविन काम |
| २ | मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवे ते भक्ती शक्ती चौका पर्यंत ४५ मी. रस्ता विकसीत करणे. (भाग - १) | २४ | १२८ | विशेष योजना | ७३००००००० | १२००००००० | ० | १००००००० | ११००००००० | |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या भक्ती शक्ती उद्यान येथे स्थापत्य विभागामार्फत १०७ मीटर उंचीचा राष्ट्रध्वज उभारणे व अनुषंगिक कामे करण्यात आलेली आहेत. सदरचा उभाकरण्यात आलेला राष्ट्रध्वज २४ तास (पावसाळा वगळून) फडकवणे आवश्यक आहे. सदरचा राष्ट्रध्वज व अनुषांगिक साहित्याची चालन देखभाल दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. सदर चालन देखभाल दुरूस्तीचे कामामधील विद्युत विभातील विद्युत यांत्रिकी स्वरुपाचे काम हे विद्युत विभागामार्फत व राष्ट्रध्वजामध्ये दुरूस्ती करिता राष्टध्वज चढविणे व उतरविणे हे सुरक्षा विभागामार्फत तसेच स्थापत्य विषयक कामे स्थापत्य विभागामार्फत करणे आवश्यक आहे. सदर भक्ती शक्ती येथिल राष्टध्वज चालन व देखभाल तसेच अनुषंगिक यंत्रणेचे चालन देखभाल दुरूस्ती त्रेवार्षिक ( 3 वर्ष ) कामाकरिता प्रशासकिय मान्यता र.रू ३,००,००,०००/- कोटी तसेच सदर कामास विद्युत उद्यान यास लेखाशीर्षमधील पान क्र. ३१९ अनु क्र. २ च्या कामामधून र,रु. १,००,००,०००/- तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | वार्ड क्र. १० मध्ये बर्ड व्हॅली या उद्यानात फ्लोटिंग म्युजीकल संगीत कारंजे व मल्टीमिडीया लेजर व एल.इ.डी. लाईट बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | ३१९ | २ | उद्याने | ५००००००० | ९३०००००० | ० | १०००००० | ८३०००००० | विद्युत मुख्य कार्यालय ( अ प्रभाग ) |
| ४ | भक्ती शक्ती उद्यान येथील राष्ट्रध्वज फडकविणे चालन व देखभाल तसेच अनुषंगिक यंत्रणेचे चालन देखभाल दुरूस्तीकरणे. | - | - | उद्याने | ३०००००० | ० | १०००००० | ० | १०००००० | विद्युत मुख्य कार्यालय ( अ प्रभाग ) |

मनपाचे ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमाक 31 मधिल अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्तीचे खांब हे 20 ते 25 वर्षा पुर्वी बसविलेले असुन ते गंजलेले आहेत त्यामुळे धोका होण्याची शक्यता आहे, सदर चे पोल हे अंतर्गत लहान रस्त्यावर असुन त्या ठिकाणी मनपा चे वाहन पोहचु शकत नाही, तसेच ते धोकादायक असल्याने त्यावर चढुन किंवा शीडी लावून दुरूस्ती काम करता येत नाही. तरी सदरचे सर्व जुने खांब बदलुन त्या ठिकाणी नविन खांब बसविणे व त्या अनुशंगाने केबल वायर इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाचा समावेश सन 2018-19 चे अंदाजपत्रकात समावेश नसल्याने " प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवि सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे जुने खांब बदलणे " ह्या कामाचा समावेश अंदाजपत्रकात करून सदर कामा करीता खालील प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रभाग क्रमांक 31 मधिल पिंपळे गुरव व नवी सांगवी येथील अंतर्गत रस्त्यावरील दिवाबत्ती चे जुने खांब बदलणे | ३१२ | ५ | विद्युत सार्वजनिक सुरक्षीतता | ३००००००० | ० | ९०००००० | ० | | |
| ६ | प्रभाग क्रमांक ३१काटेपुरम चौक ते PWD पाण्याच्या टाकी पर्यंतचा रस्ता अद्यावत पद्धतीने विकसीत करणे. | ४६ | ९१ | वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्किंग जागा विकसीत करणे | ५००००००० | | ० | ४५००००० | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | प्रभाग क्रमांक ३१ फेमस चौक ते दशक्रिया विधि घाट रस्ता अद्यावत पद्धतीने विकसीत करणे. | ४६ | ९५ | वाहतुक सुधारणा विषयक कामे करणे व पार्किंग जागा विकसीत करणे | ५००००००० | | ० | ४५००००० | | |

सन २०१८-१९ च्या  अंदाजपत्रकात विशेष योजना लेखाशिर्षात अंतर्गत खालील नवीन कामे करण्यासाठी प्रशासकिय व तरतुद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ अंदाजपत्रकात असणारी रक्कम रक्कम | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | प्रत्यक्ष आवश्यक तरतुद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | प्राधिकरण से.क्र.२७ अ येथे यशवंतराव चव्हाण स्मारक समितीची इमारत बांधणे | | | विशेष योजना | ३०००००००० | ० | २०००००००० | ० | २०००००००० | नवीन काम |
| ९ | प्राधिकरण से.क्र.२७ मधील मदनलाल धिंग्रा मैदानावर फुटबॉल साठी सिंथेटिक ट्रॅक करणे व बँडमिंटन हॉलचे नुतनीकरण करणे व अनुषंगिक कामे करणे. | | | विशेष योजना | १५००००००० | ० | १०००००००० | ० | १०००००००० | नवीन काम |
| १० | प्र.क्र. २४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे. | ४६ | १६/१ | विशेष योजना | १२५०००००० | ५०३३७००० | ० | ३०००००००० | २०३३७००० | |

तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील रक्कमेमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्र कीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | | |
| १ | कासारवाडी भाजीमंडई विकसीत करणे. | विशेष योजना | नविन | नविन | १,००,००,००० | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| | | | ठराव क्र.१८७ दि.२०/०४/२०१८ | | | | |
| | अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणे. | | | | | | |
| | | | | | | एकूण | १०,००,००,००० |

तसेच सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकातील रक्कमेमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष/ कामाचे नाव | अंदाजपत्रक | | सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात असणारी तरतूद | आवश्यक असणारी अंदाजपत्रकीय रक्कम | वाढ करावयाची अंदाजपत्र कीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पान क्र. | अ.क्र. | | | |
| १ | कासारवाडी फुगेवाडी १२ डीपी रस्त्यावर सीडी वर्क बांधणे व रस्ता विकसीत करणे. | विशेष योजना | नविन | नविन | २,००,००,००० | १०,००,००,००० | १०,००,००,००० |
| | | | ठराव क्र.१८७ दि.२०/०४/२०१८ | | | | |
| | अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ करणे. | | | | | | |
| | | | | | | एकूण | १०,००,००,००० |

तसेच प्रभाग क्र. ९ मधील नुरमोहल्ला परिसरातील मोकळया जागेत पुरुष व महिला २६ सीट्सचे स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे पा.क्र.४९३ अ.क्र.१३ कामास मा.महापालिका सभा ठराव क्र. १७७, दि.२०/०४/२०१८ अन्वये रक्कम रुपये १५,००,०००/- प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

सदर ठिकाणी २६ सीट्सचे स्वच्छतागृह सुलभ शौचालय संस्थेमार्फत बांधावयाचे आहे. तसेच तेथील मोकळया जागेमध्ये स्वतंत्र निवासी रखवालदाराची खोली नाल्यावर ॲप्रोच स्लॉब देखील बांधावयाची आहे. वरील सर्व बाबींची उपरोक्त कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम अपुरी पडत आहे. तरी प्रभाग क्र. ९ मधील नुरमोहल्ला परिसरातील मोकळया जागेत पुरुष व महिला २६ सीट्सचे स्वच्छतागृह बांधणे व दुरुस्ती करणे, या कामासाठी रक्कम रुपये १,५०,००,०००/- (अक्षरी एक कोटी पन्नास लाख फक्त) एवढया रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ३४५५, दि. ३०/१०/२०१८ अन्वये स्थापत्य "अ" क्षेत्रिय कार्यालय व मुख्यालयाकरीता अंदाजपत्रकामधील तरतुदीमध्ये वाढ-घट करणेकामी प्रस्तावित केले आहे. स्थापत्य अ मुख्यालय या विभागाकडील सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील स्थापत्य विशेष योजना, भांडवली, प अंदाजपत्रक व महसुली कामे या लेखाशिर्षातून प्रस्तावित कामांचे र.रू.८,२९,६३,०००/- वर्गीकरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०१८-१९ मधील तरतुद | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विशेष योजना | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२७ मोरवाडी मधील लिंगायत स्मशानभूमीची दुरूस्ती देखभालीची कामे करणे व नुतनीकरण करणे. | १७ | ५ | विशेष योजना | 15,00,000 | 3,00,000 | |
| २ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथील रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | ३० | २ | रोड पेव्हमेंट म्रमेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | 50,00,000 | 1,45,00,000 | |
| ३ | प्रभाग क्र. ९ मधील अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे. | ३० | ३ | रोड पेव्हमेंट म्रमेजमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | 25,00,000 | 6,00,000 | |
| ४ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथील के एस बी चौक ते नंदिनी हॉटेलपर्यंत सर्व्हीस रोडचे डांबरीकरण करणे. | ३० | ४ | विशेष योजना | 0 | 27,00,000 | |
| ५ | प्रभाग क्र. १५ आकुर्डी दत्तवाडी मधील स्व. मधुकर आण्णा पवळे पुतळ्याच्या परिसराचे सुशेभिकरण करणे. | ४१ | ३ | स्थापत्य विशेष योजना | 20,00,000 | 26,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रभाग क्र. ९ मध्ये चिखली फिल्ट्रेशन प्लॉन्ट पासुन शाहुनगर, संभाजीनगर च्या विविध भागात गार्डनिंगसाठी पाईप लाईन टाकणे. | ५१ | ३ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 35,00,000 | |
| ७ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे बहिरवाडे मैदाना भवती सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक काम करणे. | ५१ | ६ | स्थापत्य विशेष योजना | 5,00,000 | 55,00,000 | |
| ८ | प्रभाग क्र. १० मधील मोरवाडी आय.टी. आय. येथे स्थापत्य व फर्निचर विषयक कामे करणे. | ५३ | ६९ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 50,00,000 | |
| ९ | सायन्स पार्क परिसरात तारांगण उभारणे. | ५४ | २ | विशेष योजना | 35,00,000 | 70,00,000 | |
| १० | मोरवाडी येथे कला व क्रिडा सभागृह विकसित करणे. | ५४ | ४ | पर्यटन विकास आराखडा | 70,00,000 | 8,00,000 | |
| ११ | ब प्रभागात वॉर्ड क्र.२१ मध्ये वॉर्ड सेंटर विकसित करणे. | ५४ | ५ | स्थापत्य विशेष योजना | 0 | 29,00,000 | |
| | भांडवली मुख्यालय | | | | | | |
| १२ | प्रभाग क्र. ९ शाहुनगरमध्ये अत्यावश्यक ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन | ७१ | ११ | नाला ट्रेनिंग | 0 | 1,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | टाकणे. | | | | | | |
| १३ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर येथे बजाज स्कुल व परिसरात ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटरसाठी पाईप लाईन टाकणे. | ७२ | ७ | सरफेस गटर्स | 16,30,000 | 50,000 | |
| १४ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे HDFC व परिसरात ठिकठिकाणी स्टॉर्म वॉटरसाठी पाईप लाईन टाकणे | ७२ | ८ | सरफेस गटर्स | 17,00,000 | 50,000 | |
| १५ | प्रभाग क्र.९ मधील HDFC कॉलनी व परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७६ | २९ | डांबरी रस्ते | 0 | 40,00,000 | |
| १६ | प्रभाग क्र. १४ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३२ | डांबरी रस्ते | 12,30,000 | 2,83,000 | |
| १७ | प्रभाग क्र. १७ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३५ | डांबरी रस्ते | 10,00,000 | 13,00,000 | |
| १८ | प्रभाग क्र. २७ भागातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७६ | ३८ | डांबरी रस्ते | 9,50,000 | 11,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर व शाहूनगर परीसरातील रस्त्यांचे खडी मुरूमीकरण व BBM पध्दतीने रस्त्याचे चर बुजविणे व डांबरीकरण करणे. | ७६ | ४० | डांबरी रस्ते | 6,00,000 | 14,50,000 | |
| २० | प्रभाग क्र. ९ मधील अम्ब्रेला उद्यान व परिसरात रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ७६ | ४१ | डांबरी रस्ते | 4,00,000 | 2,00,000 | |
| २१ | प्रभाग क्र. १० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्ये भागात नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २४ | दगडी फरशी फुटपाथ | 16,50,000 | 12,50,000 | |
| २२ | प्रभाग क्र. १५ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २६ | दगडी फरशी फुटपाथ | 16,00,000 | 14,00,000 | |
| २३ | प्रभाग क्र. १७ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | २८ | दगडी फरशी फुटपाथ | 22,50,000 | 10,50,000 | |
| २४ | प्रभाग क्र. २६ मध्ये नविन पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ७९ | ३० | दगडी फरशी फुटपाथ | 22,50,000 | 8,00,000 | |
| २५ | प्रभाग क्र. ९ सर्प उद्यान व परिसरात फटपाथ तयार करणे व स्थापत्य विषयक कामे करणे. | ७९ | ३२ | दगडी फरशी फुटपाथ | 4,00,000 | 50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे KSB चौक ते नंदिनी हॉटेल पर्यंत ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉकचे फुटपाथ तयार करणे. | ७९ | ३३ | दगडी फरशी फुटपाथ | 10,80,000 | 10,00,000 | |
| २७ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर थरमॅक्स चौक ते KSB चौक पर्यंत पेव्हींग ब्लॉकचे फुटपाथ तयार करणे. | ७९ | ३४ | दगडी फरशी फुटपाथ | 7,80,000 | 9,45,000 | |
| २८ | वॉर्ड क्र. १० लोटस हौसिंग सोसायटी जवळील सी.डी. वर्कचे रुंदीकरण करणे. | ८१ | १ | पुल व प्रकल्प | 7,00,000 | 4,50,000 | |
| २९ | अ प्रभागातील एक वॉर्ड विकसित करणे (प्रभाग क्र. १४ भक्ती शक्ती उद्यान) | ८१ | १ | इमारत योजना | 10,00,000 | 50,00,000 | |
| ३० | प्रभाग क्र. १६ मध्ये मौलाना आझाद उर्दु शाळेचे रंगसफेदी व नुतनीकरणाची कामे करणे. | ८२ | १६ | इमारत योजना | 10,00,000 | 2,00,000 | |
| ३१ | प्रभाग क्र. १७ अंतर्गत मनपा इमारतीची स्थापत्यविषयक कामे करणे. | ८२ | २० | इमारत योजना | 9,60,000 | 4,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | प्रभाग क्र. २६ काळभोरनगर (नविन प्रभाग क्र. १४) काळभोरनगर मोहननगर मध्ये दिशादर्शक सुचना फलक रोड फर्निचर व स्थापत्य विषयक कामे करणे. | ८६ | १९ | स्थापत्य विषयक कामे करणे | 11,00,000 | 20,000 | |
| ३३ | प्रभाग क्र. १० तुळजाईवस्ती व विवेकनगर मध्ये पेव्हींग ब्लॉक गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २३ | स्थापत्य विषयक कामे करणे | 25,00,000 | 16,10,000 | |
| ३४ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतींचा किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २७ | स्थापत्य विषयक कामे करणे | 26,00,000 | 16,00,000 | |
| ३५ | प्रभाग क्र. २५ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, रस्ते दुभाजक, फुटपाथ व मनपा इमारतीची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८६ | २८ | स्थापत्य विषयक कामे करणे | 26,00,000 | 12,00,000 | |
| ३६ | प्रभाग क्र. ९ येथील मनपा इमारतीमध्ये स्थापत्य विषयक कामे | ८६ | ३२ | स्थापत्य विषयक कामे करणे. | 5,00,000 | 11,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करणे. | | | | | | |

| | भांडवली प्रभाग | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३७ | प्रभाग क्र. २६ मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ७७ | ६४ | डांबरी रस्ते | 0 | 8,50,000 | |
| ३८ | प्रभाग क्र. १० मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५२ | दगडी फरशी फुटपाथ | 90,000 | 3,00,000 | |
| ३९ | प्रभाग क्र. १४ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५३ | दगडी फरशी फुटपाथ | 40,000 | 6,10,000 | |
| ४० | प्रभाग क्र. १५ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५४ | दगडी फरशी फुटपाथ | 30,000 | 6,50,000 | |
| ४१ | प्रभाग क्र. १६ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५५ | दगडी फरशी फुटपाथ | 30,000 | 6,00,000 | |
| ४२ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५६ | दगडी फरशी फुटपाथ | 50,000 | 90,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४३ | प्रभाग क्र. २७ मध्ये पेव्हींग ब्लॉक दुरुस्ती करणे. | ८० | ५९ | दगडी फरशी फुटपाथ | 10,000 | 6,75,000 | |
| ४४ | प्रभाग क्र. १५ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, फुटपाथ इ. किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८८ | ५८ | स्थापत्य विषयक कामे करणे | 30,000 | 1,00,000 | |
| ४५ | प्रभाग क्र. १६ मध्ये पेव्हींग ब्लॉक, गटर्स, फुटपाथ इ. किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ८८ | ५९ | स्थापत्य विषयक कामे करणे | 3,00,000 | 3,50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | प अंदाजपत्रक | | | | | | |
| ४६ | अ प्रभागात महिलांकरिता स्वच्छतागृह बांधणे व अनुषंगिक कामे करणे. | ४८८ | ३ | संडास व मुता-या | 1,50,000 | 50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | महसुली मुख्यालय | | | | | | |
| ४७ | प्रभाग क्र. १० मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४२ | ५ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 10,00,000 | 10,00,000 | |
| ४८ | प्रभाग क्र. १७ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४२ | ९ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 10,00,000 | 11,00,000 | |
| ४९ | प्रभाग क्र. ९ शाहुनगर येथे किरकोळ देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५४६ | ३० | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय | 16,65,000 | 50,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | (अ प्रभाग) | | | |
| ५० | रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे. | ५४७ | ३७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय (अ प्रभाग) | 7,00,000 | 4,00,000 | |
| ५१ | प्रभाग क्र. २४ मध्ये नविन सार्वजनिक शौचालय बांधणे व देखभाल दुरुस्तीची कामे करणे. | ५५४ | १२ | किरकोळ देखभाल दुरुस्ती(महसुली) मुख्यालय (ब प्रभाग) | 63,50,000 | 7,00,000 | |
| | महसुली प्रभाग | | | | | | |
| ५२ | प्रभाग क्र. १४ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४४ | ४४ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 0 | 3,00,000 | |
| ५३ | प्रभाग क्र. १५ मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीची कामे करणे. | ५४४ | ४५ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 2,21,000 | 10,000 | |
| ५४ | प्रभाग क्र. २५ चिंचवड स्टेशन मध्ये डांबरी रस्त्याचे दुरुस्तीचे कामे करणे. | ५४४ | ४८ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 2,05,030 | 7,00,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५५ | प्रभाग क्र. ९ संभाजीनगर मधील विविध ठिकाणी डांबरी रस्त्यांची किरकोळ दुरुस्तींची कामे करणे. | ५४४ | ५१ | डांबरी रस्ते किरकोळ दुरुस्ती | 1,50,000 | 8,00,000 | |
| ५६ | प्रभाग क्र. १७ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ५४८ | ६६ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 40,168 | 60,000 | |
| ५७ | प्रभाग क्र. २६ मध्ये पेव्हींग ब्लॉक, पावसाळी गटर्स इ. स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | ५४८ | ६७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती | 70,000 | 6,80,000 | |
| ५८ | प्रभाग क्र. १९ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे. | ५४९ | ८३ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,00,598 | 3,60,000 | |
| ५९ | प्रभाग क्र.१९ मध्ये संडास ब्लॉक व मुता-या यांची देखभाल दुरूस्ती करणे | ५४९ | ८७ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,01,503 | 1,30,000 | |
| ६० | प्रभाग क्र.१९ मध्ये खड्डे, ट्रेंचेस, जीएसबी, व्हेटमिक्स पध्दतीने बुजविणे. | ५४९ | ८८ | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 4,10,000 | 1,40,000 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६१ | प्रभाग क्र. १९ मध्ये थर्मोप्लास्ट पट्टे मारणे. | ५४९ | ९० | किरकोळ देखभाल दुरुस्ती महसुली प्रभाग | 5,24,095 | 1,50,000 | |
| | घट | | | | | | |
| ६२ | प्र.क्र. २४ (रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) येथील रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचे नुतनीकरण करणे. | ४६ | १ | विशेष योजना | 15,00,00,000 | | 8,29,63,000 |
| | एकुण | | | | 21,63,47,394 | 8,29,63,000 | 8,29,63,000 |

वरीलप्रमाणे स्थापत्य "अ'' क्षेत्रिय कार्यालय व मुख्यालयाकडील वर्गीकरण प्रस्तावित केलेनुसार रक्कम रुपये ८,२९,६३,०००/- ( अक्षरी - रक्कम रूपये आठ कोटी एकोन्नतीस लाख त्रेसष्ठ हजार फक्त) इतकी तरतुद वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा. कमल घोलप –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते-

विषय क्रमांक ५

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/मुख्य/२९२/२०१८ दि.११/०९/२०१८

२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१९८ दि.२५/०९/२०१८

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे दर बदल व अनाधिकृत नळजोड नियमित करणेच्या दृष्टीकोनातून मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७ दि.२८/०२/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८ च्या अनुषंगाने आदेश

क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेश निर्गमित केले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व झोपडपट्ट्या यामधील नळजोडांचे दर वास्तववादी असावेत तसेच झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी अनामत रक्कम, दंड व पाणीपट्टी (मागील वर्षांची) याबाबत निर्णय घेणेसाठीच्या सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत यावी.

**मा. शर्मिला बाबर –** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा सभागृह. या विषयाला माझी उपसूचना आहे. खरतर हा पाणीपुरवठयाचा विषय आहे. पाणीपुरवठयाच्या विषयामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले आणि विषय लवकर संपला पाहिजे त्याच त्याच विषयावर चर्चा नाही झाली पाहिजे. अशा पध्दतीची भावना लक्षात घेऊन भाऊसाहेब पाणीपुरवठयाच्या विषयाला आपण उपसूचना एवढयासाठी देतोय की भामा-आसखेडचे पाणी आरक्षण करण्यासंदर्भामध्ये मागच्या आठवडयामध्ये महाराष्ट्र शासनाने जो निर्णय केला. आणि खरतर त्याच्यामध्ये कुठली दिरंगाई नाही झाली पाहिजे. त्यासाठी वर्गीकरण ४५ कोटीचा प्रस्ताव आपल्याला शासनाला दयायचा आहे. ४५ कोटी त्यांना देण्यासाठी आपण हे वर्गीकरण करतोय आणि दुसरी सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे पाण्यावर आपण कितीही चर्चा कली तरी पाणी देईपर्यंत लोकांना आपलं समाधान होणार नाही. त्यामुळे भामा आसखेड आंद्रा धरणामधून पाणीपुरवठा करण्यासाठी आणि पाईपलाईन टाकण्याच्या संदर्भामध्ये १५ दिवसाच्या आत आपण टेंडर प्रक्रिया पूर्ण करतोय. या विषयासाठी अजुन वीस तारखेच्या जीबीची वाट न बघता त्यामुळे ही उपसूचना या निमित्ताने देत आहे.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पाण्याची वाढती मागणी भागविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक बिसिंआर२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(घो), दिनांक २४/१०/२०१८ नुसार महाराष्ट्र शासनाने आंद्रा प्रकल्पातील ३८.८७ द.ल.घ.मी. व भामा आसखेड प्रकल्पात ६०.७९ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. सदर पत्रातील अट क्र.६ नुसार महानगरपालिकेस सिचन पुनर्स्थापना खर्च सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्या टप्प्याने समान हप्त्यात भरणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाकडील जलसंपदा विभागाच्या दि.२७/०७/२०१७ चे पत्रामध्ये दोन्ही प्रकल्पांसाठी र.रु.२३८.५३ कोटी अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा

प्रचलित दर अथवा भाववाढ निर्देशांक विचारात घेऊन यापैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च शासनाकडे जमा करणेबाबत कळविले आहे.

सबब, पाण्याच्या आरक्षणाची आवश्यकता लक्षात घेता, महाराष्ट्र शासनास सिंचन पुनर्स्थापनेचा येणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस तसेच याकामी लागणारी तरतूद खालील विभागांच्या लेखाशिर्षातून र.रु. ४५ कोटी 'पाणीपुरवठा विशेष योजना' निधी पुस्तक क्र.१ पानांक २४४, अनु.क्र.११ या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| विभाग | वर्ग करावयाची रक्कम (कोटीमध्ये) | सन २०१८-१९ अंदाजपत्रकीय पुस्तक क्र. | पान क्र. व अनु.क्र. |
|---|---|---|---|
| नगररचना भूसंपादन निधी | १४.०० | ३ | २६८/२६९ |
| आरोग्य मुख्य कार्यालय | २०.०० | २ | ११३/०४ |
| अखर्चित निधी | ११.०० | -- | -- |
| एकूण | ४५.०० कोटी | | |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे हद्दीबाहेरील सिध्दीविनायक नगरी, श्रीविहार नगरी, श्रीनगरी, समर्थनगरी, दत्तनगरी, आशिर्वाद कॉलनी या भागात दैनंदिन पाणीपुरवठा करणेत येतो. तथापि सिध्दीविनायक नगरी, श्रीहरी नगरी या भागामध्ये पाण्याचा दर निवासी आकारणेत आलेला आहे. त्या अनुषंगाने श्रीनगरी, समर्थनगरी, दत्तनगरी, आशिर्वाद कॉलनी या भागास देखील पाण्याचा दर निवासी वापरासाठी प्रचलित निवासी दरानेच आकारणेस मान्यता देण्यात यावी.

**मा. नामदेव ढाके –** मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.अजित गव्हाणे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, मगाशी महापौर साहेब आमचं म्हणण तेच होते. एकनाथराव उलट आमचे म्हणणे हे आहे की त्या संदर्भात उलट महापौर साहेब आपल्याकडून लेट झाले. २०१७ ला जर आपण ते करुन घेतलं असतं तर दिवस आपले वाया गेले नसते. जे झाले ते झाले परंतु आता पाणीपुरवठा संदर्भात आयुक्त साहेब आपण कधी पण पाणीपुरवठयाच्या संदर्भात भामा आसखेड आणि आंद्रा धरणाच्या

बाबतीत तुम्ही कधीपण ऐनवेळचे विषय आणा. आमच्या सगळया विरोधी पक्षाच्या वतीने आम्ही १०० टक्के सहकार्याची भूमिका महापौर साहेब आमची राहील. थोडं अधिक गतीने करण्यासाठी तुम्ही तुमचे राज्यात तुमचं सरकार आहे. तुम्ही आणखी पाठपुरावा केला तर आणि ही उपसूचनाही योग्य आहे. अशाच पध्दतीने काम करा आणि एकनाथराव बोलल्याने काय फरक पडत नाही. महापौर साहेब उलट सुरुवातीच्या काळामध्ये आम्हाला असं वाटलं की महापौर साहेब चांगले आहेत. पण कुठेतरी तुम्ही पण आता रुळल्यामुळे आणि विरोधी पक्षनेत्याला तर आपण बोलूनच दिले पाहिजे. याच्यामुळे जर आपल्याला चांगल्या पध्दतीने सभागृह चालवायचे असेल तर चांगल्या पध्दतीने काम करायचे असेल तर सगळयांना बोलाण्याची संधी दया. आणि निश्चितपणे असं केले तर चांगल्या पध्दतीने हे सभागृह चालेल. पाणी हा विषय महापौर साहेब अत्यंत महत्वाचा आहे.

**मा दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, खरतर मी या विषयाचे अभिनंदन करतो. याठिकाणी चांगला विषय आणलेला आहे. लडकत साहेबांनी किंवा अन्य कोणी त्यांच्या टीमने चांगला विषय आणला आहे. आपले अभिनंदन करतो. दुसरं सत्तारुढ पक्षनेत्यांनी आता जी उपसूचना आणलेली आहे. ती योग्य उपसूचना आहे. कधीकधी योग्य उपसूचना आणल्या जातात. आणि त्या योग्य असल्याकारणाने मी त्यांचही आभार मानतो. कारण खरतर ही प्रशासनाची चूक आहे. भूर्दंड भरावा लागतो की काय असं मला वाटतंय. कारण त्या काळामध्ये भामा आसखेड किंवा आंद्राच्या पाण्या संदर्भात निर्णय आमच्या काळामध्ये झालेला होता. पैसे भरण्याचे काम मला वाटत की अजितदादांनी आपल्याला सांगितलं होतं की मधल्या काळामध्ये २३० कोटी रुपये भरायचे होते. राज्यात भाजपाची सत्ता आहे आयुक्तसाहेब अजुन एकदा आपल्याला विनंती करतो की जर आपल्या महानगरपालिकेचे पैसे वाचत असतील तर सत्ताधारी पक्षाने आपल्या मुख्यमंत्र्यांना किंवा जलसंपदामंत्री यांना जर सांगून मागच्यावेळेला जो काही निर्णय होता. पाच टप्प्यामध्ये आपल्याला साडेपाचशे कोटी रुपये भरायचे आहेत तर ते पैसे जर आपल्याला वाचवायचे असतील तर याच्यामध्ये काही योग्य भूमिका महापौर साहेब आपण जर घेतली तर ती योग्य होईल. मगाशी महापौर साहेब मला बोलून दिले नाही. मला थोडसं आपल्याला सांगायचं होतं आतापर्यंत आम्ही ऐकलं होतं की च्याय पे चर्चा चालती. आज आपली गेल्या वीस तारखेला पाण्याची चर्चा झाली आणि आजही आपली पाण्याबद्दल चर्चा चाललेली आहे. आयुक्त साहेबांनी

एवढं गोल गोल गोल गोल करुन सगळ सांगितलं की असं वाटलं की आम्हाला उदयापासून पाणी सुटणार आहे. किंवा आपल्याला पाणी मिळणार आहे. असं काही तरी आम्हाला वाटल होतं. किमान सभागृहातील तीस चाळीस टक्के नगरसदस्य समाधानी होतील. अशी काहीतरी चर्चा घडेल अशी आम्हाला माझ्या मनात शंका होती. पण आपण मागचेच बे चे पाडे, काय घडलंय कशा पध्दतीने घडलंय तुम्ही सांगण्याचा प्रयत्न केला. हे आम्ही पेपरला वाचले तुम्ही पेपरला हेच स्टेटमेंट दिले होते. हयाच्यामध्ये निर्णय काय घेणार. पाणी मिळणार कशा पध्दतीने मिळणार हयाच्यावर आपण काही सांगितलं नाही. आणखी तीन वर्षे पाण्यासाठी या शहराला वंचीत राहावे लागणार की काय असा एक संदेश आपण याठिकाणी दिलेला आहे. म्हणून मगाशी मला हेच सांगायचं होतं आणि दुसरं आयुक्तांना एक चुकीची माहिती मिळाली आहे. पाणीपुरवठयाची जी माहिती आपल्याला दिली आहे. ती माहिती आपण चुकीची सांगितली आहे. ११ ऑक्टोबर ४८४ एमएलडी पाणी उचलल अस दाखवितात. आणि जलसंपदाच्या माध्यमातून मला जी माहिती मिळाली आहे ती अशी आहे की ७३४ एमएलडी पाणी आपण उचलले आहे. १२ तारखेला ४७६ एमएलडी पाणी उचलले आहे. तिथे आपण ७३४ एमएलडी पाणी उचलले असं दाखवताय. १३ ऑक्टोबरला ४७२ एमएलडी पाणी उचलय. ७८३ एमएलडी पाणी उचलल असं आपण दाखवलय. म्हणजे तुम्ही एक बाजूने सांगताय की धरणातून कमी पाणी येतंय आणि दुस-या बाजूनं सांगताय की आपण जास्त पाणी उचललय. दुसरं महापौर साहेब आपल्याला एक महत्वाच मी सांगतोय. जो रावेत बंधारा आहे त्या बंधा-याची स्थिती आम्ही काल बघीतलेली आहे, मी स्वत: त्या बंधा-याच्या ठिकाणी जाऊन आलो आहे. त्या बंधा-याची अवस्था एवढी वाईट आहे. तिथला गाळ, तिथला आजूबाजूचा परिसर, महत्वाचा म्हणजे आयुक्तसाहेब आपल्याला विनंती आहे की तो बंधारा साफ करण्यासाठी जे काही लागेल पक्षनेते आपल्याला विनंती आहे जरी ही यंत्रणा आपल्याला सुधरावयाची असेल पवना धरणातून आपल्याला जास्त पाणी उचलायच असेल तर पण धरणात तर होतेय. असं काही तरी आपल्या निदर्शनास आलेले आहे. तर तो बंधारा व्यवस्थित साफ केला. तो खोदला गेला त्यातला गाळ उपसला गेला तरीही महापौर साहेब आपल्यासमोर हा जो प्रश्न उभा आहे. जो चाळीस टक्केचा गळतीचा विषय दाखविला आहे. ती गळती कमी करुन नागरीकांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल अशा माध्यमातून ते केले पाहिजे. शहरामध्ये एवढी अनधिकृत बांधकामे झाल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. तर अनधिकृत बांधकामे होतात कुठून, केलीय कोणी, झाली कोणामुळे. याच्यापेक्षा ती करतेय कोण तीथ आपली यंत्रणा काम करते का हा ही एक

महत्वाचा विषय आहे. म्हणून महापौर साहेब तुम्ही चौदा हजार पंधरा हजार जी आकडेमोड केली आहे ती आकडेमोड सुध्दा आम्हाला वाटत नाही. आमच्याकडे सुध्दा अनधिकृत बांधकामे आहेत. याला कारणीभूत सुध्दा तुमचे प्रशासन आहे. म्हणून माझी विनंती आहे आयुक्त साहेब. अनधिकृत बांधकामांवर सुध्दा कारवाईचे कडक धोरण राबविणे गरजेचे आहे. महापौरांना मी हेच सांगणार होतो महापौर साहेब की आजच्या ३१ तारखेची नळजोडसाठी जी डेडलाईन दिली होती त्याची मुदत आणखी १५ दिवस वाढवली. मला वाटत की याच्यापूर्वी ३१ डिसेंबरला आपण ऑर्डर होती आणि आयुक्तसाहेब आपण काय करतो की तुम्ही सहा महिने सात महिने आठ महिने म्हणताय. अजुन पावसाळा संपत नाही तोवरच हा प्रश्न आला आहे. काल मुख्यमंत्र्याची पेपरला बातमी वाचली की पाण्याच्या संदर्भात आदरनीय मुख्यमंत्र्यांनी पुण्यामध्ये पाण्यासंदर्भामध्ये मिटींग घेतली आहे. सत्तारुढ पक्षनेत्यांनी आयुक्तांच्या माध्यमातून काही प्रश्न आपण त्यांच्या माध्यमातून मार्गी लावणेस हरकत नाही. पुण्यात जर मा. मुख्यमंत्री लक्ष घालत असतील तर पिंपरी चिंचवडमध्ये पण मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे. आणि त्या संदर्भात अशीच बातमी आहे. इथला ही पाण्याचा प्रश्न सोडण्यासाठी प्रयत्न करावा. असं याठिकाणी सांगतो आणि आयुक्त साहेब तुम्ही जे काही लाँग टाईम दिलेले आहे. तर मी महापौरांना विनंती करतो की पाण्याचा जो तीन वर्षाचा गॅप दिलाय तो लवकरात लवकर समान वाटप, महापौर साहेब समान वाटप जर केलं तर हा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. आणि चाळीस टक्के गळती नक्की कुठे होतेय. कोण नेतेय कोण चोरतंय. याचंही आयुक्तांनी आम्हाला विश्लेषण केले नाही. आणि आपल्या पाण्याचे ऑडीट होते की नाही याचंही विश्लेषण आयुक्तसाहेब आम्हाला सांगितलेंले नाही. जरी ऑडीट झालं तर पाण्याच्या प्रश्नातून आपण थोडं वाचू. गळतीच्या प्रश्नावर सुध्दा आपण कठोर कारवाई करावी. असंही आपल्याला या निमित्ताने सांगतो आणि धन्यवाद महापौर साहेब आपण मला बोलायला दिलं म्हणून मी आता बोललेलो आहे. भामा आसखेड संदर्भात आमची जी काही मदत लागेल विरोधी पक्षाच्या माध्यमातून आम्ही आपल्याला मदत करु. लवकरात लवकर भामा आसखेडच पाणी कसं येईल हे बघावे नाहीतर ते पवना जलवाहिनी नको व्हायला. कोणी राजकारण त्यामध्ये करायला नको. आताच सगळे जागे झाले आहेत. कोणी झोपलेले नाही. म्हणून माझी तीव्र विनंती आहे की  कुठल्याही  प्रसंगाला सामोरे न जाता प्रेमाने कसे पाणी आणता येईल असा एक विचार व्हावा अशी विनंती करतो आणि थांबतो.

**मा. कमल घोलप-** मा. महापौर साहेब उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचने प्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक- ३०६ विषय क्रमांक- ५

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.पापु/मुख्य/२९२/२०१८ दि.११/०९/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३१९८
दि.२५/०९/२०१८

पिंपरी चिंचवड शहरातील पाणीपट्टीचे दर बदल व अनाधिकृत नळजोड नियमित करणेच्या दृष्टीकोनातून मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७ दि.२८/०२/२०१८ व मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८ च्या अनुषंगाने आदेश क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८ अन्वये मा.आयुक्त यांनी आदेश निर्गमित केले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व झोपडपट्ट्या यामधील नळजोडांचे दर वास्तववादी असावेत तसेच झोपडपट्ट्यांमधील अनाधिकृत नळजोड नियमित करणेकामी अनामत रक्कम, दंड व पाणीपट्टी (मागील वर्षांची) याबाबत निर्णय घेणेसाठीच्या सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील पाण्याची वाढती मागणी भागविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक बिसिंआर२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(घो), दिनांक २४/१०/२०१८ नुसार महाराष्ट्र शासनाने आंद्रा प्रकल्पातील ३८.८७ द.ल.घ.मी. व भामा आसखेड प्रकल्पात ६०.७९ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. सदर पत्रातील अट क्र.६ नुसार महानगरपालिकेस सिचन पुनर्स्थापना खर्च सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्या टप्प्याने समान हप्त्यात भरणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाकडील जलसंपदा विभागाच्या दि.२७/०७/२०१७ चे पत्रामध्ये दोन्ही प्रकल्पांसाठी र.रु.२३८.५३ कोटी अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा

प्रचलित दर अथवा भाववाढ निर्देशांक विचारात घेऊन यापैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च शासनाकडे जमा करणेबाबत कळविले आहे.

सबब, पाण्याच्या आरक्षणाची आवश्यकता लक्षात घेता, महाराष्ट्र शासनास सिंचन पुनर्स्थापनेचा येणारा प्रत्यक्ष खर्च अदा करणेस तसेच याकामी लागणारी तरतूद खालील विभागांच्या लेखाशिर्षातून र.रु. ४५ कोटी 'पाणीपुरवठा विशेष योजना' निधी पुस्तक क्र.१ पानांक २४४, अनु.क्र.११ या कामावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| विभाग | वर्ग करावयाची रक्कम (कोटीमध्ये) | सन २०१८-१९ अंदाजपत्रकीय पुस्तक क्र. | पान क्र. व अनु.क्र. |
|---|---|---|---|
| नगररचना भूसंपादन निधी | १४.०० | ३ | २६८/२६९ |
| आरोग्य मुख्य कार्यालय | २०.०० | २ | ११३/०४ |
| अखर्चित निधी | ११.०० | -- | -- |
| एकूण | ४५.०० कोटी | | |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे हद्दीबाहेरील सिध्दीविनायक नगरी, श्रीविहार नगरी, श्रीनगरी, समर्थनगरी, दत्तनगरी, आशिर्वाद कॉलनी या भागात दैनंदिन पाणीपुरवठा करणेत येतो. तथापि सिध्दीविनायक नगरी, श्रीहरी नगरी या भागामध्ये पाण्याचा दर निवासी आकारणेत आलेला आहे. त्या अनुषंगाने श्रीनगरी, समर्थनगरी, दत्तनगरी, आशिर्वाद कॉलनी या भागास देखील पाण्याचा दर निवासी वापरासाठी प्रचलित निवासी दरानेच आकारणेस मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अॅड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३०७ विषय क्रमांक- ६

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/०६/कावि/१०१४३/२०१८
दि.०३/०९/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३२४४
दि.०९/१०/२०१८

शहर अभियंता,"फ क्षेत्रिय" कार्यालय स्थापत्य विभागाकडील विभागाअंतर्गत वाढ/घट र.रू.१,९०,२२,४६३/- वर्गीकरणाचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात कमी तरतूद प्राप्त झाल्यामुळे कामांना पुरेशी तरतूद ठेवता आली नाही. निविदा कार्यवाहीतील चालू कामांना ही उपलब्ध तरतूद कमी आहे. काही पूर्ण कामांना व चालू कामांना तरतूदी कमी पडत आहे. सदर कामांकरिता तरतूदी उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रभागातील तरतूदी मधून वाढ/घट करुन तरतूदी उपलब्ध करुन देणेत आलेल्या असल्याने र.रू.१,९०,२२,४६३/- वाढ/घट करुन वर्गीकरण करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी विषयपत्रातील अ.क्र.२० वरील कामाचे बील अदा झाले असल्याने सदर र.रु.६,९०,०००/- वर्गीकरणाची आवश्यकता नाही. तरी सदर रक्कम वगळून उर्वरित र.रु.१,८३,३२,४६३/- चे वर्गीकरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. तसेच क क्षेत्रीय कार्यालय मुख्यालयामध्ये सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१,०२,००,०००/-)

**मा. संदिप कस्पटे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदरचा ठराव मतास टाकणेस आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा. कमल घोलप -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३०८ विषय क्रमांक- ७

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.लेखा/६/कावि/१०७५९/२०१८ दि.१४/०९/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३२४९
दि.०९/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकातील 'फ' क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभागाकडील स्थापत्य मुख्यालय कार्यालयाकडील सन २०१८-१९ चे अंदाजपत्रकाकरीता एकूण तरतुद मागणी केलेनुसार उपलब्ध झालेली नाही. अपुरी तरतुद मिळाल्यामुळे चालू कामांना पुरेशी तरतुद ठेवणेत आली व निविदा कार्यवाहीतील कामांना उपलब्ध तरतुदीमधील शिल्लक तरतुदीमधुन अपुरी तरतुद ठेवणेत आलेली आहे. तसेच काही पूर्ण कामांना व चालू कामांना तरतुदी कमी पडत आहेत. सदरची सर्व निविदा कार्यवाहीतील कामे सद्यस्थितीत चालू असून काही कामे तरतुदी अभावी ठेकेदार यांनी बंद ठेवलेली आहेत. तसेच काही पुर्ण झालेल्या कामांचा नव्याने समावेश करून तरतुद करणे आवश्यक आहे. सदर प्रभागातील विविध कामे करणेबाबत मा.नगरसदस्य व प्रभागातील नागरीक यांच्याकडून वारंवार मागणी होत आहे. मा.महापालिका सभा ठराव क्र.236, दि.20/7/2018 नुसार र.रु.2,11,56,83,100 वर्गीकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर ठरावातील 169 कामांपैकी 32 कामे काही कारणास्तव होणार नाहीत व काही कामांची तांत्रीक तपासणी करुन फेर ठराव करणार असल्याचे मा.शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.स्था/लेखा/8/कावि/140/2018 दि.30/08/2018 अन्वये लेखा विभागास कळविणेत आले आहे. सदर महापालिका सभा ठराव क्र.236 दिनांक 20/7/2018 मधील 32 कामे

वगळून मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव अंमलबजावणीसाठी सादर केला आहे. त्यामुळे सदर वगळलेली कामे करण्यात येणार नसल्याने अखर्चीत कामामधुन शिल्लक रकमेतून प्रस्तावात नमुद कामांना तरतुद मिळणेस विनंती केली आहे. तरतुद वर्ग करणे आवश्यक असलेल्या कामांची यादी तयार करणेत आलेली असून, त्यानुसार फ क्षेत्रिय स्थापत्य कार्यालय व फ स्थापत्य मुख्यालय स्तरावरील कामाकरीता प्रस्तावात नमूद प्रमाणे आवश्यक तरतुद र.रू.१०,८५,५२,८०६/- (अक्षरी र.रु.दहा कोटी, पंच्याऐंशी लाख, बावन्न हजार आठशे सहा फक्त) अखर्चित निधीतुन वर्ग करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी विषयपत्रातील अ.क्र.३८ वरील कामाचे बील अदा झाले असल्याने सदर र.रु.५,६२,३००/- वर्गीकरणाची आवश्यकता नाही. तरी सदर रक्कम वगळून उर्वरित र.रु.१०,७९,९०,५०६/- चे वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. १०,७९,९०,५०६/-)

**मा. प्रियंका बारसे-** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा. सागर गवळी –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो-

ठराव क्रमांक- ३०९ विषय क्रमांक- ८

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.कक्षेका/स्था/कावि/६८/२०१८ दि.१/१०/२०१८
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.३२७५
दि.०९/१०/२०१८

क क्षेत्रिय कार्यालय मुख्यालयाचे सन 2018-19 च्या अंदाजपत्रकामध्ये कामाच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे वाढ / घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू. 6,59,29,000/-)

**मा.राजेंद्र लांडगे** - मा. महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.वैशाली घोडेकर -** मा. महापौर साहेब, मग आधीच सांगायचे होते ना तुम्ही मंजुर केल्यानंतर बोलायला देता. काही अर्थ आहे का आमच्या बोलण्याला. मला काय म्हणायच महापौर साहेब क प्रभाग तुमचा पण आहे. महापौर साहेब आता एवढी मोठी रक्कम वाढ आहे की घट आहे. वाढ असेल तर आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. याचा खुलासा दया ना थोडासा. कळू दया ना क प्रभाग तुमचा. तुम्हाला अडचण नाही आम्हाला अडचण आहे. नेते खुलासा देऊ दया ना. वाढ आहे की घट आहे. एवढं तर कळू दया ना वाढविले आहेत की घटविले आहेत. नाहीतर मग देऊ दयात खुलासा वाढ/घट असंच मांडलेले आहे. आता तुम्ही उपसूचना वाचली आम्ही काही बोललो नाही तुम्हाला. काहीही बोललो नाही. कोणत्या उपसूचनेमध्ये कुठे तरतुद केली किती वाढविले किती घटविले. आम्ही काही बोललो नाही. पण महापौर साहेब हे माझ्या प्रभागातले आहे वाढ आहे की घट आहे हे मला कळाले पाहिजे. मंजुर नाही मग तुमची चूक आहे महापौर साहेब मला खुलासा पाहिजे.

**मा. महापौर** – मी तुम्हाला खुलासा देतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उषा उर्फ माई ढोरे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३१० विषय क्रमांक- ९

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.३९
दि.२१/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ॲनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या

संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. चंदा लोखंडे –** मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. उषा उर्फ माई ढोरे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक- ३११ विषय क्रमांक- १०

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग– मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.४०
दि.२१/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती

आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना अनु.जाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा. यशोदा बोईनवाड –** मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. महापौर साहेब या विषयामध्ये उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननी शिवाय केवळ उमेदवारांना परीक्षेकरीता पाचारण करणेत आले होते. साहेब हे थोडे लक्षात येत नाही. विषय तुम्हाला मानधनावर घ्यायचे आहे. त्यामध्ये असं का म्हटलं आहे की कुठल्याही कागदपत्राशिवाय कुठल्याही छाननीशिवाय लेखी परीक्षात प्राप्त केलेल्या गुणांकानुसार ही दोन्ही पदे महत्वाची आहेत. आयुक्त साहेब, उमेदवारांना कोणत्याही कागदपत्राशिवाय छाननीशिवाय केवळ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीच्या आधारे परत पुढे असं म्हटल आहे की लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांकानुसार म्हणजे आपण असं अर्धवट का लिहिले आहे महत्वाची पदे आहेत. तुम्ही म्हणताय छाननी नाही.

**मा. महापौर-** प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. मंगेश चितळे (सहा.आयुक्त प्रशासन) -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ही जी पदे होती त्याची आपण ऑनलाईन जाहिरात दिली होती. त्यावेळेस जी डाक्यूमेंट आपल्याकडे सबमीट होती त्यांची आपण त्यावेळेस छाननी करीत नाही. त्यानंतर पुन्हा आपण लेखी परीक्षा घेतो. त्यानंतर त्याठिकाणी स्पेसिफीक कागदपत्रे पडताळणीसाठी दि. १८/१२/१७ ला त्यांना पाचारण केले होते. त्यानंतर ती कागदपत्रे आपण तपासली आहेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उषा उर्फ माई ढोरे-** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- ११

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ - १) मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.४३
दि.२१/०९/२०१८

कुमारी पूजा शंकर शेलार, वय वर्ष २४ वर्ष, शैक्षणिक अर्हता – बी.ए., राहणार- जय बजरंग चौक, भोसरी, पुणे – ४११ ०३९ या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या महिला खेळाडूस महाराष्ट्र शासनाचा खेळामधील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्कार हा तिच्या कबड्डी या खेळातील योगदानाबद्दल प्राप्त झाला आहे. तरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त कुमारी पूजा शंकर शेलार या महिला खेळाडूची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर राज्यशासनाचे मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. राजेंद्र लांडगे –** मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके -** मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसुचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या अस्थापनेवर कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त असणा-या महिलेस प्रशासन अधिकारी (गट–ब) या पदावर राज्य शासनाचे मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेकामी विषय मंजुरीसाठी दाखल आहे. तथापि महापालिकेच्या अस्थापनेवर यापुर्वी महिला खेळाडु शितल मारणे यांनाही कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झालेला असुन त्यांना शासन मान्यतेने लिपिक पदावर नेमणूक दिलेली आहे. सबब शितल मारणे यांना देखील वरीलप्रमाणे कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला असलेने दोनही नेमणूकामध्ये तफावत येवु नये म्हणून शितल मारणे यांना देखिल शासन

मान्यतेने प्रशासन अधिकारी (गट–ब), (मुख्य क्रिडा अधिकारी) पदावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत यावी तसेच ज्योत्सना शिंदे, प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) यांना शासनसेवेत परत पाठविणेस मान्यता देणेत यावी.

**मा. सुरेश भोईर –** मा. महापौर साहेब, उपसुचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. उषा उर्फ माई ढोरे-** मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसुचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक -३१२ विषय क्रमांक- ११

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ - १) मा.उषा उर्फ माई ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.४३

दि.२१/०९/२०१८

कुमारी पूजा शंकर शेलार, वय वर्ष २४ वर्ष, शैक्षणिक अर्हता – बी.ए., राहणार-जय बजरंग चौक, भोसरी, पुणे – ४११ ०३९ या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या महिला खेळाडूस महाराष्ट्र शासनाचा खेळामधील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्कार हा तिच्या कबड्डी या खेळातील योगदानाबद्दल प्राप्त झाला आहे. तरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त कुमारी पूजा शंकर शेलार या महिला खेळाडूची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर राज्यशासनाचे मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या अस्थापनेवर कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त असणा-या महिलेस प्रशासन अधिकारी (गट–ब) या पदावर राज्य शासनाचे मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेकामी विषय मंजुरीसाठी दाखल आहे. तथापि महापालिकेच्या अस्थापनेवर यापुर्वी महिला खेळाडु शितल मारणे यांनाही कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झालेला असुन त्यांना शासन मान्यतेने लिपिक पदावर नेमणूक दिलेली आहे. सबब शितल मारणे यांना देखील वरीलप्रमाणे कबड्डी या खेळासाठी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला असलेने दोनही नेमणूकामध्ये तफावत येवु नये म्हणून शितल मारणे यांना देखिल शासन मान्यतेने प्रशासन अधिकारी (गट–ब), (मुख्य क्रिडा अधिकारी) पदावर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे तसेच ज्योत्सना

शिंदे, प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) यांना शासनसेवेत परत पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. माधवी राजापुरे –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १२

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५
दि.२८/०८/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८५ दि.२७/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत सन २०१२-१३ पासून ऊर्जासंवर्धनाच्या दृष्टीकोनातून जुने सोडियम व्हेपर/मेटल हालाईड दिवे/टि-५(९६ वॅट) काढून एलईडी दिवे बसविणेची कामे सुरू आहेत.महापालिकेच्या उर्जा संवर्धनाच्या दृष्टीने सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालईड दिव्याच्या ऐवजी रस्त्याच्या प्रकारानुसार आवश्यक प्रकाश प्रमाण राखणेकरीता (लक्स लेव्हल) उर्वरीत एलईडी व्यतिरिक्त दिव्यांच्या ठिकाणी योग्य क्षमतेचे एलईडी दिवे बसविणेकामी सर्वे करणे, डीपीआर बसविणे व पर्यवेक्षण करणेकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.ऊर्जा नियोजन प्रा.लि.पुणे यांची नेमणूक करणेत आली आहे. मे.ऊर्जा नियोजन प्रा. लि. पुणे यांनी सर्वेचे कामकाज पुर्ण केलेले असून प्राप्त सर्वेनुसार अहवाला नुसार सुमारे ३८७५५ इतके विविध क्षमतेचे एलईडी दिवे विविध रस्त्यावर बसविणेत आलेले असून अद्यापपर्यंत सुमारे ३६१३४ दिवे सोडियम व्हेपर/ /टि-५/सीएफएल/मेटल हालाईड (MH) या प्रकारचे आहेत. सदरचे काम स्वखर्चातून किंवा ईस्क्रो माध्यमातून करावयाचे नियोजन

मनपाचे होते. तथापि ईस्क्रो तत्वावर एलईडी दिवे बसविणेसाठी राज्य शासनाने ईईएसएल सोबत करारनामा केलेला आहे. त्यानुसार राज्य शासनाने त्यांचेकडील दि.१२ जानेवारी २०१८ चे शासन निर्णयानुसार सर्व नागरी संस्थानी पथ दिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार मे.ईईएसएल कडून विहित केलेल्या तक्त्यामध्ये माहिती मागविणेत आली होती. मनपाने सादर केलेल्या माहितीनुसार मे.ईईएसएल कडून प्रकल्प प्रस्ताव (Project Proposal) व करारनामा मसुदा (Draft Agreement) पाठविला आहे. त्याबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे. सद्यस्थितीत मनपा हद्दीत एकूण दिव्यांची संख्या सुमारे - ७४८८९ इतकी आहे. एकूण विद्युत भार - १०.०६ MW एलईडी बसविण्यात आलेल्या दिवाबत्तीची संख्या - ३८७५५, एलईडी बसविण्यात आलेल्या एलईडी विद्युत भार -३.२७ MW, ईईएसएल कडून एलईडी बसवावयाच्या दिव्यांची संख्या - ३६१३४ एवढी आहे. वार्षिक दिवाबत्तीचे वीजबील अंदाजे र.रू.२७.३९ कोटी (सर्व दिवे चालू स्थितीत गृहीत धरून) ईईएसएल मार्फत ईस्क्रो तत्वावर (cost sharing based) जुने पारंपारिक फिटींग काढून एलईडी फिटींग बसविणेत येणार आहे. फिटींग्सची वॉरंटी ७ वर्षे (इन्शूरन्संह) आहे. मध्यवर्ती नियंत्रीत कक्षातून दिवे नियंत्रीत करणारी यंत्रणा (CCMS) चादेखील अंतर्भाव आहे. बसविलेल्या एलईडी दिव्यांची देखभाल व दुरूस्ती काम ईईएसएल मार्फतच करण्यात येणार आहे. होणा-या उर्जा बचतीकरीता राष्ट्रिय बँकेत उर्जा बचत स्वंतत्र खाते उघडावे लागेल. होणा-या उर्जा बचत व देखभाल व दुरूस्ती कामावर लागणारा खर्च बचतीतून एन्यूटी बेसीसवर ईईएसएल यांना अदा करावा लागेल.

ईईएसएल ने सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावानुसार खालील बाबी दिसून येतात –

1. सदरचा प्रकल्प ईस्क्रो तत्वावर राबविणेत येणार असून सुरवातीस महापालिकेस कोणताही खर्च करावा लागणार नाही.
2. सध्यस्थितीतील दिव्यांचा तसेच एलईडी बसविणेत आलेनंतर दिव्यांच्या प्रकाश तीव्रतेचा संयुक्तीक पाहणी करून अहवाल तयार करणेत येणार आहे.
3. नॅशनल लाईटींग कोड नुसार रस्त्यावर आहे तशीच किंवा त्यापेक्षा जास्त सुधारित लक्स लेवल ठेऊन दिव्यांचे वॅटेज निश्चित केले जाणार आहे.
4. एलईडी फिटींगची वॉरंटी कालावधी देखभाल व दुरूस्तीसह सात वर्षाचा असून प्रत्यक्ष होणा-या वीजबचतीतून अॅन्यूटी बेसीसवर ईईएसलला प्रतिवर्षी निर्धारित केलेली रक्कम वर्षांकरिता अदा करावी लागणार आहे.

5. सदर कामामध्ये एलईडी फिटींग बसविणेत येत असलेल्या ठिकाणी ब्रॅकेट,क्लॅम्प साहित्य व वायर कामाचा समावेश आहे.
6. सदर कामामध्ये एलईडीसह व सीसीएमएस यंत्रणा बसविणे कामाचा समावेश आहे.
7. मनपाने उर्जा बचतीतून प्राप्त झालेली रक्कम भरणेकरीता राष्ट्रिय बँकेत स्वतंत्र रित्या एस्क्रो खाते (escrow) उघडून सुरवातीला अँन्यूटीच्या (प्रतिवर्षी निर्धारित केलेल्या रक्कमेच्या) तीन महिन्यांची रक्कम सदर खात्यात मनपाला जमा करावी लागणार आहे.
8. एलईडी दिवे बसविलेनंतर दिव्यांची संपूर्ण देखभाल दुरूस्ती ईईएसएल मार्फत करण्यात येणार आहे मात्र पायाभूत सुविधेकरीता जादा होणारा खर्च मनपास करावा लागणार आहे.

तरी मे.ईईएसएल यांचेकडून पारंपारिक दिवे बदलून एलईडी दिवे बसविणे व तदनंतर होणा-या वीजबचतीतून अँन्यूटी बेसीस वर निर्धारित रक्कम पुढील 7 वर्षांकरिता प्रतिवर्षी मे.ईईएसएलला ईस्क्रो खाते काढून अदा करणेसाठी करारनामा करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. उषा उर्फ माई ढोरे** – मा. महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके** - मा. महापौर साहेब विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो

**मा.सुरेश भोईर** - मा. महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -३१३ विषय क्रमांक- १२

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.१५
दि.२८/०८/२०१८
३) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८५ दि.२७/०९/२०१८

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अंबरनाथ कांबळे -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १३

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/
३६/१७४/२०१८ दि.०५/०७/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८८ दि.२७/०९/२०१८

मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.६३ येथे मंजूर विकास आराखडयानुसार श्री.कवडे यांचे घरापासून कांकरीया गॅस गोडाऊन असा दक्षिणोत्तर १२ मी रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्त्याची लांबी ३३५ इतकी मी. आहे. व जागेवर सुमारे १३७ मी अंतरामध्ये घरे असुन सदर घरे सुमारे ३.०० मी इतके रस्ता रुंदीने बाधित होत आहे. व उर्वरीत जागेत पूर्णतः १२ मी रस्ता विकसीत झालेला आहे.

सदर रस्ता रुंदीने बाधीत नागरिकांनी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस पाठविली आहे. सदर नोटीसीनुसार २४ महिने कालावधीत सदर जागेचे भूसंपादन करावे लागणार आहे.

तरी स.नं.६३ मधील १२ मी रस्त्याचे सुमारे १३७ मी लांबीतील सुमारे ३ मी प्रमाणे भुसंपादन तातडीने करावे लागणार आहे सदर क्षेत्राचा भुसंपादनाने ताबा घ्यावयाचा असल्याने सदर भुसंपादनकामी येणा-या सर्व खर्चास व त्यासंबधीत इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देणेत यावी.

**मा. संदिप वाघेरे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १३ दसरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

**मा.सुरेश भोईर** – मा. महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक- ३१४ विषय क्रमांक- १३

दिनांक -३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील जा.क्र.नरवि/कावि/
३६/१७४/२०१८ दि.०५/०७/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २८८ दि.२७/०९/२०१८

विषय क्रमांक १३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.निर्मला गायकवाड -** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १४

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.मसाभां/५/कावि/
३८४/२०१८ दि.३१/०८/२०१८
२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २९० दि.२७/०९/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन ई-निविदा सुचना क्रमांक-17/2011-2012 मागवून मे. मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेले दर स्विकृत करुन ( कमी केलेल्या दरानुसार ) खरेदी करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक - 48, दिनांक 17/04/2012 अन्वये मे. मनाली एंटरप्रायझेस यांचेइून प्राप्त झालेल्या ई-

निविदा दरामध्ये कमी करुन दिलेल्या दरानुसार करारनामा करुन खरेदी करण्यास व येणा-या र.रु. 2,79,24,750/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मे. मनाली एंटरप्रायझेस यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाकरीता Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System पुरवठयाकामी मे. मनाली एंटरप्रायझेस यांना मसाभां/5/कावि/348/2012, दिनांक 31/05/2012 अन्वये आदेश देण्यात आला होता. आदेशात नमुद केलेनुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी मशिनचा पुरवठा दिनांक ०१/१२/२०१२ रोजी केलेला आहे. सदर मशिनचे दिनांक ३०/०१/२०१३ रोजी इनस्टॉलेशन केलेले आहे. मशिनचे इनस्टॉलेशन झालेनंतर मशिन कार्यरत होती. तथापि काही कारणास्तव मशिन बंद असलेने Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हया मशीनची ई-निविदेत नमुद केलेले स्पेशिफिकेशन प्रमाणे तांत्रीक तपासणी मा.प्रोफेसर, इन्स्ट्रूमेंटेशन अण्ड कंट्रोल,कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांचेकडून करुन घेण्यात आलेली आहे. त्यांनी अहवालानुसार संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्ती करुन घेण्यात येवून मशिन चालू करण्यात आलेली होती. तथापि काही कालावधी नंतर सदरची मशिन कुलिंग सिस्टि म अभावी बंद होती. वाय. सी.एम. रुग्णालयात उपलब्ध करुन दिलेली एच.बी.ओ.टी. मशिन कुलिंग सिस्टीम बंद असलेने मशिन बंद स्थितीत असलेने दिनांक २५/०४/२०१५ रोजी मे.कास्को इंडस्ट्रीज प्रा.लि. यांनी दिलेल्या सर्व्हिस रिपोर्ट नुसार मे.मनाली एंटरप्रायझेस यांचेकडून सदर मशिनकरीता आवश्यक लागणारे स्पेअर पार्टस् खरेदीकामी कोटेशन सादर केलेले होते. एच.बी.ओ.टी. मशिन दुरुस्त करणेकामी र.रु. ७,१७,५००/- इतका अपेक्षित खर्च येणार असल्याने प्रस्ताव सादर करुन त्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-१८२५७, दिनांक २९/११/२०१६ अन्वये एच.बी.ओ.टी. मशिन दुरुस्त करणेकामी आवश्यक स्पेअर पार्टसचा पुरवठा करुन दुरुस्त करणेकामी मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या कोटेशनमधील कमी करुन दिलेल्या र.रु. ७,१७,०००/- चे खर्चास मान्यता दिलेली होती. मा.स्थायी समिती ठरावाच्या अनुषंगाने मे.मनाली एंटरप्रायझेस यांना पत्र क्र.YCMH/भां/२/कावि/३५४/२०१६, दिनांक ३०/१२/२०१६ अन्वये नोटराईजड प्रतिज्ञापत्र, करारनामा व आवश्यक एफ.डी.आर. जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी दिनांक ०१/०३/२०१७ रोजी करारनामा करुन दिलेला आहे. सदरचा करारनामा दिनांक ०२/०३/२०१७ रोजी मा.स्थायी समिती कार्यालयाकडे सील

करणेकामी पाठविण्यात आला होता. दिनांक ३०/०६/२०१७ पर्यंत करारनामा सील झालेला नसलेने एच.बी.ओ.टी. मशीनचा दुरुस्ती आदेश निर्गत करण्यात आला नव्हता. तसेच पुर्वीच्या दरपत्रकाची वैधता संपल्यापमुळे संबंधित प्रक्रिया रद्द करुन त्रयस्थ संस्थेची एच.बी.ओ.टी. मशीन चालविणेकामी नेमणूक करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला होता.

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी Expression of Interest वृत्तपत्राचे विशेष रोटेशन घेवून प्रसिध्द करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मे. बॅरोमेडिक हेल्थकेअर प्रा. लि. व मे. ऍडव्हॅंट हेल्थकेअर यांचे मार्फत प्रस्ताव प्राप्त झालेले होते. सदर प्रस्तावाचा विचार करुन वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन कार्यान्वित करुन चालविणेस देणेकामी मे.क्रिसिल इन्फ्रास्ट्रक्चर सोल्यूशनस प्रा. लि., यांचे मार्फत RFP तयार करण्यात आलेली आहे. Y.C.M. Hospital करीता उपलब्ध करुन दिलेली HBOT मशिन महागडी असून तिचा वापर होणे आवश्यक आहे. सदयस्थितीत वाय.सी.एम. रुग्णालय येथे प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता असले मुळे HBOT मशिन चालविणे शक्य होत नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ (ब) नुसार Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT centre at Y.C.M. Hospital साठी ई-निविदा प्रसिध्द करण्याकरीता मा. महापालिका सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सबब, वाय. सी. एम. रुग्णालयातील Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System हीमशीन चालविणेस देणेकामी M/s. Crisil यांनी Request for Proposal Selection of Operator for Operation and Maintenance of the existing HBOT centre at Y.C.M. Hospital चा मसुदा सादर केलेला असून Multiplace Hyperbaric Oxygen Chamber With Air Lock System ही मशीन चालविणेस देणेची ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देणेत यावी.

**मा. भिमाबाई फुगे –** मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा. सुलक्षणा धर -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. एचबीओटी या मशीनचा उपयोग निरनिराळया आजारांसाठी होतो. खरतर डायबेटीक यासारख्या पेशंटला त्या मशीनचा उपयोग चांगल्या प्रमाणात होतो. आपल्याकडे स्क्रीनचे वगैरे असे जे काही आजार

असतात जी जखम लवकर बरी होत नाही. अशा प्रकारच्या पेशंटला यामशीनचा उपयोग चांगल्या प्रकारे होऊ शकतो. या मशीन खर तर कार्बनडाय ऑक्साईड पॉईझनिंगमुळे बबल्स तयार होतात आणि मग असे पेशंट लवकर रिकव्हर होत नाहीत. त्यांच्यासाठी या मशीनचा खूप चांगला उपयोग होतो. आणि मग अशा प्रकारच्या मशीन घेण्यामागे खरतर आपला इंटेंशन खूप चांगला होता. आणि ती मशीन आपण घेतली वायसीएम रुग्णालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका २०१२ मध्ये. २०१३ त्याचे इंस्टॉलेशन झाले, २०१३ मध्ये इंस्टॉलेशन झाल्यानंतर काही काळ ती मशीन कार्यरत होती आणि ती मशीन चालू असताना काही रुग्णांना त्याच्यावर ट्रीटमेंट देण्यात आली. नंतर काही काळ ती मशीन बंद पडली. नंतर संबंधित ठेकेदाराकडून ती मशीन आपण रिपेअर करुन घेतली. आणि पुन्हा त्याच्या कुलींग सिस्टीममध्ये बिगाड झाला. मग त्याच्यासाठी आपण निविदा काढली. त्या दरम्यान आपण असा निर्णय घेतला की ही मशीन त्रयस्त संस्थेला चालविण्यास देण्यात यावी. आणि मग त्याच्यासाठी आपण दोन संस्थांकडून प्रस्ताव मागितले आणि त्यांच्या प्रस्तावानुसार आपण आरएफपी तयार केली. आणि त्या ज्या संस्था आहेत त्या मे. बॅरोमेडिक हेल्थकेअर प्रा. लि. व मे. ऍडव्हॅंट हेल्थकेअर यांच्या मार्फत आपण प्रस्ताव मागितले आणि त्याचे स्पेशल इनफ्रास्ट्रचर सोल्यूशनस प्रा. लि. यांच्या सोबत आपण आरएफपी तयार केली. आणि हा विषय आपण आपल्याकडे म्हणजे ती मशीन खूप महागडी असल्याने त्याचा वापर आपल्याला होणे आवश्यक आहे. आणि आपल्याकडे प्रशिक्षित मनूष्यबळ नाही. म्हणून ती मशीन आपण त्रयस्त संस्थेला चालविण्यास देणेबाबतचा हा विषय सभागृहापुढे आलेला आहे. सन्मा. महापौर साहेब या आऊटसोर्सिंगचे विषय इथून मागेही केलेले आहेत. आपली जागा आपण रुबी हेल्थकेअरला दिलेली आहे. ते तिथे अतिशय चांगल्या प्रमाणात बिझनेस करतात. आपल्याकडे इथं बरेचसे सन्मा. सदस्य आहेत त्यांना तिथे चांगल्या प्रकारे ट्रीटमेंट मिळते. हे आपल्या सगळयांना माहिती आहे. खरतर या प्रकारात म्हणजे रुबी हेल्थकेअरमध्ये आपले सन्मा. नगरसेवक तिथे पेशंट घेऊन जातात, रिक्वेष्ट केलीतरी आम्हांला तेथे कुठल्याही प्रकारच इम्पॉर्टंट मिळत नाही आमच्या पेशंटला चांगल्या प्रकारची सर्व्हिस मिळत नाही. मग अशा परिस्थतीत आपण पुन्हा तीच चूक करायची आहे का. मुळात महानगरपालिकेचा आऊटसोर्सिंग हा इन्ट्रेस्टच नसायला पाहिजे. आपल्याकडे स्कील अधिकारी आहेत आपण काही योजना आणतो. आणि त्या योजना आपल्याला राबविता येत नाहीत म्हणून आपण आऊट सोर्सिंग करायच का. मग आपल्याला मॅनेजमेंट जमत नाहीय का. आणि असे ब-याच

प्रकारचे प्रश्न आपल्याकडे उपलब्ध होतात. आज कोणीतरी एचबीओटीसाठी जागा पण मागतेय. एचबीओटी पण मागतेय. आणि मग कोणीतरी उदया म्हणेल की आम्हाला आयसीयू चालवावयाचे आहे. पुढे मग आम्हाला ओपीडी चालवावयाला मिळेल का. जर मग आपण प्रत्येक गोष्ट चालवावयाला दिली तर मग आपल्याला वायसीएम चालवावयाचे आहे की नाही हा खूप मोठा प्रश्न आहे. महापौर साहेब, आपण प्रत्येक गोष्ट वायसीएमची प्रत्येक बिझनेस म्हणून बघायला नाही पाहिजे. खरतर आपण वायसीएम चालवतोय एचबीओटीचा हा प्रस्ताव जेव्हा सभागृहापुढे आणलेला आहे त्याच्या संबंधित आपण त्या संस्थेकडून आपण त्यांना जागाही देणार आहे आणि त्यांना आपण मशीन पण देणार आहे. हा कितपत योग्य निर्णय आहे. कारण जर आपल्याकडे ती मशीन खूप गरजेची असती. आणि ती मशीन घ्यायला आपल्याकडे फायनान्शिअली तेवढा सपोर्ट नसतो किंवा तरतूद नसती आणि मग अशा परिस्थितीमध्ये कुठली संस्था आपल्याला जर मशीन देणार असती तर आपण ती जागा त्या संस्थेला वापरण्यास देण्यास हरकत नव्हती. परंतु या परिस्थिती मध्ये जागा आपली, मशीन पण आपली आणि आपण एखादया संस्थेला वीस तीस वर्षाच्या करारावर चालविण्यास देणे हे योग्य नाही. याच्यासाठी आपण किरकोळ कारणे देतो. की आपल्याकडे एक्सपर्ट टीम नाही. एक्सपर्ट टेक्नीशयन्स नाहीत. मग या विषयात आपण असे म्हणाला होतात की या प्रकारची मशीन आपण पूर्वी चालवीत होतो. मग विना एक्सपर्ट टीमकडून आपण मशीनचा वापर करीत होतो का. तेव्हा आपल्याकडे एक्सपर्ट टीम नव्हती का. मग आताच आपल्याला मनूष्यबळाची कमतरता का जाणवते. आणि ते मनूष्यबळ मिळण्यासाठी आपण काय प्रयत्न केलेत. अशाप्रकारचे इन्स्टीटयूट आहेत, पुणे हे विदयेचे माहेरघर आहे. अनेक प्रकारचे येथे कोर्सेस होतात. मग अशा प्रकारची कुठली इन्स्टीटयूट आहे की तिथे अशा प्रकारचे कोर्सेस कंडक्ट केले जातात. त्या इन्स्टीटयूटला आपण व्हिजीट देऊन अशा प्रकारचे टेक्नीशयन्स मिळतात क हे बघायला पाहिजे. एमप्लॉयमेंट एक्सचेंजला जर आपण कळविले आम्हाला अशा प्रकारचे टेक्नीशियन्स हवेत सुपरस्पेशालिटीसाठी. तर अशा प्रकारचे मनूष्यबळ आपल्याला ऍव्हेलेबल होईल. ती मशीन आपल्या इथेच एसेंबल झाली आहे. आपल्या जवळपासच्या एरियामध्ये ती एसेंबल झाली असल्याने ती रिपेअर होऊ शकते. आणि त्याच्यासाठी टेक्निशियन मिळण्यास आपल्याला कुठल्याच प्रकारची अडचण येणार नाही. खरतर या महानगरपालिकेचे नाक आहे आपलं वायसीएम. या शहराची एक वेगळी ओळख आहे. आणि या वायसीएममध्ये महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण भारत देशातून रुग्ण येत

असतात. वेगवेगळया प्रकारच्या ट्रीटमेंटसाठी. महापौर साहेब बरेचदा तिथे आपल्याकडे औषधे एव्हेलेबल नसतात. ही जबाबदारी कोणीच घेत नाही. सर्व प्रिसक्रीप्शन्स आपले डॉक्टर्स देतात. आणि पेशंटला बाहेरुन औषधे आणायला सांगतात. अशा परिस्थितीमध्ये आम्ही चौकशी केल्यानंतर आम्हाला सांगतात की आपल्याकडे स्टॉक कमी आहे आम्ही कळविलंय. आपले टेंडर निघतात अशा प्रकारची उत्तरे देतात. मग याच्यासाठी जबाबदार कोण आहे. औषधांच्या बाबतीत आपल्याकडे कोणालाही गांभीर्य नाही. परंतु दोन वर्षानी तयार होणा-या पीजीचे इनस्ट्रयूमेंट खरेदी करण्यामध्ये आतापासूनच आपली टीम तयार आहे. त्याच्यामध्ये खूप जणांना इंटरेस्ट आहे. खरतर आपल्या वायसीएममध्ये डॉक्टर्स कसे वाढतील याबाबत आपण इंटरेस्ट क्रियेट केला पाहिजे. प्रत्येकाने चर्चा केली पाहिजे. कारण याच्या माध्यमातून आपण खूप चांगली सेवा रुग्णांना देत असतो. कधीकधी विनामूल्य सेवापण आपण गोरगरीबांना देत असतो. आणि मग याच्यामध्ये आपल्याकडे डॉक्टर्स वाढीसाठी महापौर साहेब मी मा. मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते पिंपरी चिंचवडमध्ये वायसीएम रुग्णालयाकरीता डॉक्टर्सच्या रिक्वॉयरमेंटबद्दल. परंतु त्याच्यानंतर आपल्याकडे फारशी परिस्थिती बदलेली दिसत नाही. आपल्याकडे जे डॉक्टर्स आहेत एक्सपर्ट टीम आहे परंतु त्यांनाही काही अडचणी आहेत. त्यांना असिसटंटच्या अभावी त्यांना चार चार दिवस एखादया सर्जरी झालेल्या पेशंटकडे साधी व्हिजीटही देता येत नाही. मग त्यावेळात तो पेशंट आपण सिस्टरच्या भरवशावर ठेवतो. परंतु आपल्याकडे असिस्टंट नसल्यामुळे किंवा लॅबटिक म्हणजे सर्जरी केल्यानंतर औषधांचा विशिष्ठ प्रोटोकॉल असतो. तो प्रोटोकॉल फालो केलाय काय त्या पेशंटची रिकव्हरी या सगळया गोष्टी पाहण्यासाठी असिस्टंट असलातर ब-याचशा लवकर पेशंट रिकव्हर होतात. परंतु प्रत्येक वेळेस त्या मेन डॉक्टरला मेन सर्जनला पेशंटचा फालोअप घेणं शक्य होत नाही. त्यामुळे तो पेशंट इंफेक्शन होतय की काय होतेय या सगळया गोष्टीकडे दुर्लक्ष होतं आणि मग ब-याचदा त्या पेशंटला आपला जीव पण गमवावा लागतो. मग एवढा हलगर्जीपणा आपण त्या पेशंटच्या बाबतीत करणार आहे का. कुठेतरी याच्याही बाबतीत आपण गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. पूर्वी आपल्याकडे बीएचएमएस डॉक्टर्स असायचे निदान ते कॅज्यूअल्टीला प्रायमरी ट्रीटमेंट प्रथमोपचार तरी करायचे त्याच्यामुळे आपल्याकडे सीएमओकडे जो लोड असतो, आताही आपण सीएमओ मध्ये आपल्याकडे कॅज्यूअल्टीमध्ये किती पेशंट असतात. आणि सीएमओ किती आहेत त्याच कम्प्यारीजन हे जर केलतर नक्कीच डॉक्टरर्सना खूप जास्त लोड आहे. बरेचदा चारचार तास पेशंट वेटींगमध्ये असतात.

परंतु त्यांच्यापर्यंत डॉक्टर्स पोहचू शकत नाहीत. आणि अशा वेळेस बरेचदा पेशंटचा जीव पण गेलेला आहे. आणि मग त्यांच्या नातेवाईकांची मानसिकता खराब झाल्यामुळे फ्रस्ट्रेशनमुळे आपल्या डॉक्टरांना मारही खावा लागतो. अशा परिस्थितीमध्ये आपण गांभीर्याने निर्णय घेणे आवश्यक आहे. आपल्याला तर डॉक्टर्स पाहिजेतच महापौर साहेब. आपण अपेक्षा करतो एमबीबीएसची आणि त्यांना बीएएमएसचा पगार देतो. अशा परिस्थितीमध्ये ते डॉक्टर्स आपल्याकडे टिकणे शक्य आहे का. म्हणजे आपली गत अशी झाली आहे की आपल्याला टेक्नीशयन पाहिजे. आपण शैक्षणिक अर्हता ठेवतोय आयआयटी इंजिनिअर्स आणि पगार देणार टेक्नीशयनचा. मग अशा परिस्थितीमध्ये कोण काम करणार आहे. अशा परिस्थितीचा ही महापौर साहेब आपण विचार करायला पाहिजे. आपण पीजीआय सुरु करणार आहोत. पीजीआयमध्ये आपल्याकडे बरेच डॉक्टर्स अव्हेलेबल होतील. तुमच्याकडे स्टुडंट पण बरचसे येतील. आणि मग अशा परिस्थितीमध्ये या एचबीओटी मशीनचा उपयोग खूप मोठया प्रमाणात होईल. त्यामुळे अशा प्रकारची मशीन कोणास चालविण्यास देऊ नये. अशी मी आपल्याला विनंती करेन. कारण ही मशीन देण्यामागे आपला काहीच फायदा नाही. आणि वीस वीस वर्षासाठी तीन हजार स्केअर फूट जागा विदाऊट एनी कॉस्ट म्हणजे त्यांना आपण फ्रीमध्ये वापरायला देणार. ती मशीन आपण रिपेअर करुन घेणार. ती मशीन रिपेअर करुन घेतल्यानंतर आपण स्वत: वापरु ना ती मशीन. ती ही तीन हजार स्केअर फूट जागा तेवढया मशीनसाठी लागणार आहे का. ऑलरेडी आपल्याकडे खूप जागा कमी आहे. तीथे वेगवेगळे आपल्याला काही सुपर स्पेशालिटी वॉर्डस तयार करता येतील. मग आखी तीन हजार स्क्वे.फुट जागा आपण त्या मशीनसाठी दयायची का. आणि मग हे वीस वर्षाच्या करारावर त्याच्यामध्ये आपला कंट्रोल कुठे राहणार आहे. हया सगळया गोष्टींचा विचार करावा. महापौर साहेब आऊटसोर्स करुन आपण खूप अकार्यक्षम आहोत असं आपण दाखवतोय. त्यामुळे या पध्दतीचे निर्णय घेताना आपण थोडास पारदर्शक चष्मा वापरावा. यामध्ये सपोज कुठल्या ठेकेदाराला फेवर करण्यासाठी जर आपण अशा प्रकारचे विषय सभागृहामध्ये आणत असाल तर ते खूप चुकीचे आहे. ते नागरीकांच्या हिताचे नाहीत आणि महानगरपालिकेच्याही हिताचे नाहीत. त्यामुळे या संबंधित अधिकारी आणि नगरसेवकांना मी विनंती करेल की विषयाचा सविस्तर अभ्यास करा, या विषयावर चर्चा करा. आणि मग त्याच्यावर योग्य तो निर्णय घ्या. या तीन हजार स्केअर फूटमध्ये आपल्याला आणखी आयसीयू युनिट वाढविता येईल. त्याची आपल्याला खूप गरज आहे. आज आपल्याकडे जागा नसल्यामुळे आपण डायरेक्ट

ससूनला पेशंट पाठवितो. त्यामुळे अशा प्रकारचे काही होणार नाही. त्यामुळे महापौर साहेब अशा प्रकारचा प्रस्ताव रद्द करुन ही मशीन चालविण्याबाबत आपण आदेश दयावेत. आपले अधिकारी जर अक्टीव्ह नसतील तर त्यांना अक्टीव्ह करा. प्रत्येक वेळी काहीतरी कारणे देऊन आपल्याला माणूस मिळत नाही. परंतु कुठल्याही प्रकारचा प्रयत्न केलेला मला तरी दिसत नाही. आयुक्त साहेब आपण ही याच्यावर थोडासा विचार करुन, चर्चा करुन हा विषय मंजुर करायचा की नाही ते आपण ठरवालच. परंतु हया विषयाला आमचा विरोध नोंदवून महापौरसाहेब आपण योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा करते आणि बोलायला संधी दिल्याबद्दल धन्यवाद देते.

**मा.निता पाडाळे –** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह महापौर साहेब मला इथं एवढचं सांगायचे आहे की सीटी स्कॅन, एमआयआर वायसीएममध्ये आपण कमी दरामध्ये करतो. तर ते आपण कोणत्या संस्थेला चालवायला दिलेले आहे. कोणी तरी शहा म्हणून तिथे आहेत मला माहीत नाही. कोणती संस्था आहे काय आहे ते. परंतु महापौरसाहेब तिथे पूर्ण राजकारण चालते. ठराविक नगरसेवकांनी जर फोन केला तर त्यांच्या पेशंटला फ्री होतं. आयुक्तसाहेब माहितीच्या अधिकारामध्ये तुम्ही माहिती घ्या. आणि त्यांना विचारा किती जणांचे तुम्ही फ्री केले. आणि आमच्यासारख्या नगरसेवकांनी एकदा जरी फोन केला तर आम्हाला सांगतात १०० रुपये कमी होईल, २०० रुपये कमी होईल. हयाला काही अर्थ नाही आयुक्तसाहेब. पेशंट इतके गरीब असतात ना. अक्षरशः रडतात आमच्या ऑफिसमध्ये. सात-आठ हजार रुपये कमाविणारे कुठून एवढा खर्च करणार. तर हयाच्याबद्दल थोडीसी तुम्ही चौकशी करावी. आणि जी काही माहिती आहे. सभागृहासमोर आपण त्या अधिका-यांना सांगावे. ब-याचशा नगरसेवकांना असं माहीत पण नाहीय की एमआरआय, सिटी स्कॅन कधी कधी फ्री पण होतो. कोणत्याही नगरसेवकांना माहीत नाही. जर ते अधिकारी इथं असतील तर त्यांनी इथं माहिती दयावी. अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.गोफणे अनुराधा -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आताच निताताई पाडाळे यांनी खंत व्यक्त केली. सन्मा. महापौर साहेब मी देखील हा अनुभव घेतलेला आहे की जे आपल्या वायसीएममध्ये एमआयआर असेल, सिटी स्कॅन असेल त्या लोकांकडून अजिबात चांगला रिसपॉन्स मिळत नाही. नगरसेवकांनी फोन केल्यानंतर किमान

त्यांनी रिसपेक्टीव्हली बोललं पाहिजे. आयुक्तसाहेब अजिबात भाषा त्यांची व्यवस्थित नसते. आणि आम्ही जे काम सांगतो ते आमच्या प्रभागातील नागरीकांचे काहीतरी प्रश्न असतात. किंवा त्यांना वायसीएम संदर्भात काही तरी सूट दया म्हणून त्यांना आम्ही फोन करत असतो. तर आयुक्तसाहेब चांगली भाषा ते वापरत नाहीत व्यवस्थित बोलत नाहीत. आणि आयुक्तसाहेब मला आज याठिकाणी एक गोष्ट निदर्शनास आणायची आहे की माझ्या प्रभागातील एका महिलेला परवा दिवशी एक कुत्रं चावलं तर भोसरी आणि वायसीएम रुग्णालयामध्ये त्याची लस उपलब्ध नव्हती. आयुक्तसाहेब या गोष्टीकडे आपण लक्ष दयावं. जेणेकरुन जर रुग्ण आपल्याकडे येतोय आणि जर लस उपलब्ध नसेल तर रुग्णाने जायचं कोणाकडे. मी याबाबत विचारणा केली असता आपल्या आजुबाजूच्या हॉस्पिटल्समध्ये देखील ही लस उपलब्ध नव्हती. आयुक्तसाहेब ही गांर्भियाची गोष्ट आहे आपण याच्याकडे लक्ष दयावे. की जेणेकरुन नागरीकांना लवकरात लवकर लस उपलब्ध करुन त्यांचे प्रॉब्लेम सॉल्व्ह व्हावेत.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह आताच जो एचबीओटी मशीनच्या संदर्भात विषय आपल्यासमोर आला आहे. सुलक्षणाताई धर यांनी खरच एक चांगला विषय आपल्या समोर आणला आहे. मी महापौर साहेब आणि सत्तारुढ पक्षनेते यांना विनंती करतो की एक तर या विषयासंदर्भात संबंधित अधिका-यांकडून खुलासा घेऊन माहिती घ्यावी. अन्यथा तोपर्यंत हा विषय तहकूब ठेवावा. त्याच्यावर व्यवस्थितपणे अभ्यास करु दया. आणि नंतर हया विषयावर निर्णय घ्या. असं मी तुम्हाला विनंती करतो. धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर एचबीओटी म्हटलं इथं काही नवीन नगरसेवक आहेत त्यांना विषय माहीत नाही. परंतु एचबीओटी म्हटलं की आम्हाला सगळयांना टेन्शन येते. किंबहुना भिती वाटते की तीन कोटीची मशीन, पण ती कितीला होती काय होती. हे आख्या शहराला माहिती आहे. ही मशीन आपल्याकडे कोणत्या प्रकारे आणि कशी आली. आणि आता सुध्दा काही नगरसेवक बोलतात तर काहींना वाटते की त्यांच्या ज्या वेदना आहेत वायसीएम बद्दलच्या. परंतु २०१२ साली जी मशीन आपल्या महानगरपालिकेच्या आवारात आली. तिचे इन्स्टॉलेशन झाले

आपल्या इथं आणि ती आजपर्यंत बंद आहे. ती मशीन काही काळापुरती चालू होती महापौरसाहेब. परंतु त्याच्यामध्ये मला वाटतं की हार्डली १०० ते १५० पेशंट त्याच्यामध्ये पाठविले असतील. आणि त्यानंतरच्या काळामध्ये तेव्हापासून ती मशीन बंद आहे ती आजतागायत बंद आहे. आज ज्यावेळेला महापौर साहेब हा विषय सभागृहामध्ये आला. मग आता आम्हाला सगळयांना वाटतं की आम्ही याच्यावर चर्चा केली पाहिजे. मग पुन्हा दोन जीबी हा विषय तहकुब केला पाहीजे. सन्मा. महापौर साहेब आम्हाला तुमचं कौतुक करावासं वाटतं की तुम्ही संपुर्ण सभागृहाला अत्यंत चांगला वेळ चर्चेला देता येथून मागचे सभागृह आपण पाहिलेले आहे तुम्ही पाहिले, मी ही पाहिलेले आहे. परंतु तुम्ही सगळयांना बोलायला वेळ देता. एखादया व्यक्तीने एखादया विषयावर किती वेळ बोलायचे. कोणी जर म्हटलं की माझा विषयाबद्दलचा पॉईंट बोलायचा राहिला आहे तरी देखील तुम्ही बोलण्याची संधी देता. अत्यंत चांगल्या पध्दतीने सभागृह चालविता. मला असं वाटतं की तुम्ही याठिकाणी नगरसेवकांना सांगितलं पाहिजे. प्रत्येकाने त्या डॉकेटची माहिती घ्या. अभ्यास करा आणि मग तुम्हाला त्यातून निष्पन्न होत नाही त्याची माहिती सभागृहामध्ये घेतली पाहिजे. या विषयाची माहिती सांगा असा तुमचा पहिला प्रश्न कसा काय होऊ शकतो. डॉकेट वाचले पाहिजे त्याचा अभ्यास केला पाहिजे. तर मग त्याच्यानंतर नाही कळलं, नाही समस्या सुटल्या तर १०० टक्के सभागृहातला वेळ हा त्यांच्यासाठी असणार आहे. परंतु तसं होताना दिसत नाही. कोणत्याही विषयाला उठायचं आणि मला याची माहिती दया असं म्हणायचं. कधीकधी वाईट वाटते की सभागृहामध्ये महत्वाचा विषय राहतो की काय. एखादया विषयावर आपण खूप वेळ बोलतो आणि एखादा महत्वाचा विषय सभागृहाकडून राहू नये याची पण काळजी घेणे आवश्यक आहे. सन्मा. महापौर साहेब याठिकाणी अनेकांनी खंत व्यक्त केली की रुबी हेल्थ केअर असेल किंवा आपल्याकडे ज्या वेगळया सुविधा आपण देतो. महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये असणा-या लोकांना अल्प दरामध्ये देतो. परंतु अल्प दरामध्ये देत असताना सुध्दा तिथं चांगल्या प्रकारची वागणूक मिळत नाही. मला चांगल आठवत की मागच्या वेळेस मी स्वत: नगरसेवक असताना माझा एमआरआय करताना मी पैसे भरले आहेत. पैसे मी भरले त्याचं अजिबात दु:ख नाही. कारण माझी कुवत आहे पैसे भरण्याची त्यामुळे मी भरलेत. परंतु ज्या वेळेला आपण एचबीओटी सारखी मशीन घेतोय. साहेब याठिकाणी आपण ऑक्सिजन म्हणजे त्यावेळेला मायकल जॅक्सन सारखा जो डान्स करणारा आहे, गायक आहे. ते तिथे एचबीओटी मशीमध्ये बसतात आणि तीथं ऑक्सिजन

लेव्हल मेंटेन करतात आणि त्यांच्यासाठी आवश्यक असणारी मशीन आपण वायसीएममध्ये घेतली ही त्यावेळेसची मोठी चुक होती. परंतु घेतली, झालेल्या घटनेवरती पुन्हा पुन्हा चर्चा करणे अत्यंत चुकीचे ठरेल. परंतु आता घेतलेल्या मशीनच काय करायचं. त्याच्यावरती बोलणं, चर्चा करणं आवश्यक वाटतं. महापौर साहेब आपल्याला माहिती आहे की त्यावेळेला त्याचे डॉक्युमेट तयार झालेले आहेत, आपण टेंडर काढणार आहोत काही लोकांना आपण कॉल करतोय. जीबीच्या मंजुरीसाठी हा विषय आला, सभागृहापर्यंत आला आहे. नाहीतर आम्हाला कळलं सुध्दा नसतं. सन्मा. महापौर साहेब आपल्याला विनंती करते आपल्याकडे जे पिवळे रेशनिंग कार्ड असते. असे नागरीक ज्यांची ख-या अर्थाने आर्थिक कुवत नसेल अशांना आपण किती टक्के फ्री करतोय. असा काहीतरी क्रायटेरीया आपण त्याच्यामध्ये नमुद केला पाहिजे. ती मशीन येथून पुढच्या काळामध्ये बंद ठेवणे किंवा हा विषय दफ्तरी दाखल करणे फेटाळून लावणे हयाच्यामध्ये काही तथ्य नाही ख-या अर्थाने नागरीकांना सुविधा देण्याची संधी आहे. आता मशीन आलेलीच आहे तर त्याचा पुरेपूर तीन कोटी रुपये त्या मशीनसाठी आपण भरलेले आहेत साहेब. त्या मशीनची कुवत एक कोटीची सुध्दा नाही. फॉरेनवरुन आली इकडून तिकडून आली असं खूप काही विषय घडले परंतु ती आपल्या एमआयडीसीमध्ये जोडली गेली असे अनेक विषयी त्या मशीनबाबत चर्चा आहे. वास्तव तर तसंच आहे परंतु महापौरसाहेब तुम्हाला विनंती करते किंवा उपसूचना देते की ज्या नागरीकांकडे रेशनिंगचे पिवळे कार्ड असेल, जे नागरीक आर्थिकदृष्टया दुर्बल असतील इकॉनॉमिकली बॅकवर्ड असतील अशा नागरीकांसाठी आपण ती सुविधा अत्यंत अल्प दरामध्ये, अत्यंत शब्द वापरते मी जाणीवपूर्वक. आता ते १२०० घेतात हे काही परवडणारे नाही. तर त्या दृष्टीकोनातून आपण या निविदेमध्ये या अटीशर्ती टाकून मग या विषयाला मंजुरी दयावी अशी मी आयुक्त साहेबांना, महापौर साहेबांना विनंती करते. माझ्या उपसूचनेला अनुमोदन दया. मा. महापौरसाहेब पिवळे रेशनिंगकार्ड असेल, आर्थिकदृष्टया दुर्बल असतील त्याचा क्रायटेरिया ठरवून मग आपण निविदा प्रसिध्द करावी. अशी विनंती याठिकाणी करते उपसूचना देते. आता माईंनी सांगितले की जे स्थानिक आहेत. पिंपरी चिंचवड शहरवासीय आहेत त्यांना अत्यंत म्हणजे अगदी कमी दरामध्ये कारण आपल्याला आपली वायसीएम जिवंत ठेवायची आहे. या दृष्टीकोनातून आपण या विषयाचे गांभीर्य बघावे. आणि माझी उपसूचना स्वीकारावी हि विनंती.

**मा.घुले नानी उर्फ हिराबाई -** मा. महापौर साहेब, उपसूचनेला मी अनुमोदन देते.

**मा. सचिन चिखले -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह ती मशीन चालू करा अशी आमची सर्वांचीच मागणी आहे. पण ती कोणाला देताय. या संदर्भात आम्हाला जरा माहिती दया. त्या ताईंनी सांगितलेले आहे. जे स्थानिक नगरसेवक आहेत त्यांचा विचार थोडासा लक्षात घ्या. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे मागच्या पंचवार्षिकमध्ये तुम्ही मशीन खरेदी केली. तेव्हा आम्ही नगरसेवक होतो का. पण आता विषय तुम्ही आणला. तो तुम्ही आणलाय तर आणलाय मंजुरीसाठी लगेच घाई का करताय. थोडं थांबाना आम्ही काय वर्ष वर्षभर तुम्हाला सांगतो काय. आमचा विरोध आहेच ना. विरोध असा आहे. हा विषय तुम्ही थांबवा ना. काय फरक पडतोय. नाही ते विषय तुम्ही दहा-दहा वर्षे तुम्ही थांबवताय.

**मा. महापौर** – सचिनशेठ तुम्ही ऐका ना. तुमचा विरोध आपण नोंदवून घेऊ.

**मा. राहुल कलाटे -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. ती जी मशीन आहे ती मशीनच आहे. कोणाला तरी चालवावी लागेल. एक तर आपल्या तरी स्टाफला चालवायला लागेल नाहीतर चालवायला दयावी लागेल. परंतु ही मशीन घेत असताना काही चुका झाल्या असतील काय झाले असेल परंतु हयाचा अपेक्षित खर्च ७,१७,५००/- म्हणजे कुठेतरी मेंटेनन्स करण्यासाठी ही मशीन वाटतेय. त्या मशीन किंमत कोटयावधी आहे. तरी साहेब अशा पध्दतीने ती मशीन घेतली. आज आपण वायसीएमची एकंदरीत परिस्थिती पाहीलीतर वायसीएम या शहरातल प्रत्येक गोरगरीब नागरीक आजारी झाल्यानंतर वायसीएमकडे आशेने येतो. आपण जर त्या नागरीकांला त्या पध्दतीने सुविधा दिल्या नाहीत तर म्हणजे मगाशी महापौरांनी तो विषय तात्काळ मंजुर केला. परंतु कुठेतरी सीपीएस सारखे आठ्ठावीस डॉक्टर्स आपण घेतो. त्या डॉक्टरांना आपण प्रति महिना २५,०००/- देतो. हे देत असताना आपण त्यांची राहण्याची व्यवस्था करतो. राहण्याची व्यवस्था केल्यानंतर ते लोक एमबीबीएसनंतर तिथे डिप्लोमा करतात. आपल्याकडे ते स्पेशलायजेशन करतात. त्यानंतर त्यांना त्या त्या म्हणजे ज्याचा डिप्लोमा ते वायसीएमला करतील. त्या भागात त्यांना प्रॅक्टीस करता येते. बरोबर आहे ना साहेब. डॉक्टरांला ती प्रॅक्टीस करता येते. त्यासाठी त्यांची फि आपण साडेचार लाख देतो. म्हणजे आपण हयाच्या अगोदरच्या विषयात तो विषय

आहे. तर साहेब आपण ह्याच्यावर खर्च किती करतोय. म्हणजे आपण कुठेतरी आपण वायसीएमवरती खर्च करतोय कशासाठी करतोय. या शहरातील नागरीकांच्या आरोग्यासाठी. आता सचिनने सांगितलं, धरताईंनी सांगितलं. ही मशीन आपण चालवायला देणार. खरच नागरीकांना त्याचा उपयोग होणार असेल तर चालवायला देणार असाल तर या शहरातल्या नागरीकांसाठी एक दर पण ठरवून घ्या. नाहीतर शहरातील नागरीकांसाठी मोफत घ्या. बाहेरच्या नागरीकांसाठी ठराविक चार्जेस घ्या. तर कुठल्या तरी पध्दतीने एवढे दिवस मशीन नादुरुस्त असताना देखील नुकसान झालेले आहे आणि भविष्यात याचा उपयोग जास्तीत जास्त नागरीकांना कसा होईल याचा आपण सर्वांनी, मा. महापौर साहेब आपण विचार करावा. मागच्या विषयामध्ये देखील आपण २८ डॉक्टर्स घेतोय. हे २८ डॉक्टर्स घेत असताना आपण त्या डॉक्टरांकडून साडेचार लाख रुपये फी घेत असताना आपण त्यांना तीन लाख वर्षाला देतोय. हे देत असताना आपण इन्पेक्शनचे वीस लाख रुपये गर्व्हमेंटला देतोय. पुर्वी हीच फि आपण डायरेक्ट भरायचो आता आपण नीटकडन २८ डॉक्टर्स कशासाठी घेतले. कुठेतरी शहरातील नागरीकांना आपल्याला रेसिडंट डॉक्टर्स असावेत जेणेकरुन ते रात्री अपरात्री अव्हेलेबल होतील. आपण त्यांच्याकडून व्यवस्थित फीज घेतली आणि अशा ठिकाणी ही मशीन्स चालवायला दिलीतर शहरातील नागरीकांचा जास्तीत जास्त फायदा होईल. शहरातील नागरीकांच्या आरोग्याशी निगडीत असा प्रश्न आहे. असं न करता आपण थोड दया पण क्वॉलिटी दया. आपण वायसीएमच्या संदर्भात गांर्भियाने पहावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा. दत्तात्रय साने -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. खरतर मला असं वाटतय आयुक्तसाहेब आपण एखादया दिवशी ही महानगरपालिका विकणे आहे. असा जर ठराव नाही केला तर बरं होईल. एचबीओटी हा खूप जुना १०-१२ वर्षे आधी सभागृहात ऐकून ऐकून कंटाळा आलेला आहे. आपल्याला विनंती आहे की एकतर हा विषय आपण आपली वस्तु महानगरपालिकेची, जागा आपली आणि ती वस्तु आपण चालवयाला का देतोय हे मला आजपर्यंत कळालेले नाही. साडेसात लाख रुपये खर्च त्या मशीनला असताना आपण आपली जागा त्यांना देतोय. सगळयात मोठं म्हणजे महापौर साहेब वायसीएम हे एक पांढरा हत्ती म्हणून आपण त्याठिकाणी सांभाळतोय आणि त्या वायसीएमवर आपण कोटयावधी रुपये खर्च करतोय. गोरगरीबांना आपल्या शहरातून नव्हे तर महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून

वायसीएममध्ये जे काही रुग्ण येतात. त्यांच्यावर आपण विलाज करण्याचा प्रयत्न करतोय. खूप मोठा खर्च करतोय. एचबीओटी आणण्याचा उद्देश होता की सुलक्षणाताईंनी सांगितले. तो उद्देश खूप चांगला होता. पण त्याच्यामध्ये एवढे मोठे रामायण महाभारत करण्याचा प्रयत्न केला, झाला आणि आजपर्यंत गेली २०१२ पासून हा एचबीओटीचा विषय आज सहा सात आठ वर्षे झाले. प्रत्येक वेळेस त्यासंदर्भात सगळे बोललेले आहेत. महापौरसाहेब माझी आपल्याला विनंती आहे की मशीन आपणच चालवावी. त्याला जे लागणारे मनूष्यबळ असेल, डॉक्टर्स असतील ते मशीन आपण आपल्या माध्यमातून चालविले तर हे खूप चांगले आहे. मला असं वाटतं की कोणाला डोळयासमोर ठेवून हा विषय आणलाय, कोणाला दयायचयं. किंवा कोणाला काय कुठल्या पध्दतीने लावायचय. आज कोटीची एचबीओटीची मशीन आपण आपल्या जागेत वापरण्यास देण्याचा प्रयत्न करत असालतर मला असं वाटतं की ते ही जी हॉस्पिटल आता आपली आहेत, तुमच धोरणच मला वाटत असं आणल की काय मला माहित नाही. भोसरी हॉस्पिटल बंद आहे, तालेरा हॉस्पिटल बंद आहे. जिजामाता हॉस्पिटलची परिस्थितीपण वाईट आहे, भोसरीच हॉस्पिटल तयार आहे. म्हणजे असं काही आहे का तीथ पण कोणालातरी बांधा, वापरा आणि हास्तांतर करा अशाप्रकारे तीथ पण चाललेल आहे का. शहरामध्ये जर आपण वैदयकीयच्या दृष्टिकोनातून चांगला प्रयन करीत असताना वायसीएमसारख्या हॉस्पिटलमध्ये रुग्णांना आपण चांगली ट्रीटमेंट देत असताना तिथे मला वाटत आयुक्तसाहेब सिरीयसली ऐका. तिथे हे जे दोन वाघ मागे बसलेले आहेतना आता त्यांचा पहील्यांदा वाद मिटवा. हे दोघे कोर्टात जाताना सुध्दा बरोबर जातात तिथे गुलूगुलू करतात आणि इथ तुमच्या समोर काही करत असतीलतर त्यांना दोघांनाही काहीतरी जबाबदारी दया. कोणाला वायसीएम संभाळायला दया, कोणाला इतर काही संभाळायला दया. पण त्यांच्यावर कुठेतरी दोघांवर जबाबदा-या टाका. कोर्टाचा जो काही निर्णय लागायचा आहे तो लागू दया. त्यांना जे काय करायचंय ते करु दया. खरतर वायसीएमची वाट लावायचा प्रयत्न कोणी जर करीत असेल तर या दोघांमुळे चाललेले आहे. आम्हाला दोघांचही काय घेणदेण नाही. चांगल्या वास्तूचा जर आपण गैर वापर करीत असेल तर रॉयला वाटते की साळवे बघेल साळवेला वाटत की रॉय बघेल. दोघांच्या मध्ये जर वायसीएमचा फुटबॉल होत असेलतर, गोरगरीब जनतेला त्याचा त्रास होत असेल वैदयकीय रुग्णांना त्रास होत असेल तर हयाच्या बाबतील आपण आता एक कुठलातरी चांगला निर्णय घेण्याची आयुक्तसाहेब आता गरज आहे. त्यांची काय पध्दत आहे कशी असेल ती असेल. त्यांना जे काय दयायचं ते

त्यांच्या पध्दतीने दया. किंवा दोन विभाग करा त्याचे. कुठेतरी काय कोणाला देण्याघेण्याचे ठेवा. कोणाला घेण्यादेण्याचे ठेवा. असं काय तरी करा. पण या दोषांचा व्यवस्थित निर्णय लावलातर ते वायसीएम नीट राहील. साहेब वायसीएममधील परिस्थिती आजही तिथे डॉक्टर किंवा तिथे जाणारा पेशंट काय परिस्थिती आहे. एखादा जर गरीब कोणी असेलतर त्याला ट्रिटमेंट दिली जात नाही ही दुर्भाग्याची गोष्ट आहे म्हणून तुम्ही जे अनेक ठिकाणी ऑपरेशन केलेत तसे वायसीएमचे ऑपरेशन केले तर बर होईल. म्हणून महापौर साहेब आयुक्त साहेब हे कोणाला चालवावयाला दयायचे असेल तर आमचा १०० टक्के विरोध आहे. जर तुम्हाला मंजुर करायचा असेल तर आमचा विरोध नोंदवून मंजुर करा. ती मशीन आपली आहे, खर्च आपला आहे, जागा आपली आहे. आपण साडेसात लाखासाठी किंवा अन्य काही कारणासाठी आपण ते उपलब्ध करुनही त्याला टेक्निशीअन मिळत नसेलतर आपण ती उपलब्ध करुन, आपण आपली वास्तु आपली मशीन आपण चालवावी. अशी मी याठिकाणी विनंती करतो. यावर सुलक्षणा धरताईनी सविस्तर चर्चा केलेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे जर विषय मंजुर करायचा असेल तर आमचा विरोध नोंदवून मंजुर करावा.

**मा. एकनाथ पवार -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, काका तुमचे जे म्हणणे आहे तसे विषय मंजुर करण्याची घाई आम्हाला पण नाही. पण एक गोष्ट हा विषयपत्रिकेवर ज्यावेळेस विषय येतो. त्यावेळेस या विषयावर आपल्याला चर्चा करण्याची गरज आहे. आणि सर्वजण खरतर पाण्यापेक्षाही विषय हा महत्वाचा या शहरामधल्या वायसीएमचा, दवाखान्याचा विषय आहे. तुम्ही जेवढे पोटतिडकीने पाण्यावर बोलत होते. मला अभिनंदन तुमचं करावसं वाटले. वायसीएमच्या विषयावर सुध्दा तुम्ही खूप गंभीर आहात. आणि माझ्या अगोदर ज्यांनी ज्यांनी वायसीएमच्या विषयावर १०० टक्के आपण त्यांच्या मताबरोबर आहोत. त्यामुळे चिंता करायची काही गरज नाही. खरतर सन्मा. महापौर साहेब या विषयाच्या संदर्भामध्ये एचबीओटीची मशीन ज्यावेळेस घेतली. त्यावेळेस सभागृहामध्ये मी सुध्दा होतो, आणि ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक गोष्ट वायसीएमच्या संदर्भामध्ये चांगल्या पध्दतीने झालीच पाहिजे ही सभागृहामध्ये सगळयांची मनस्थिती आहे आणि हे खर आहे. ज्या पध्दतीने गेल्या अनेक वर्षापासून वायसीएमची परिस्थिती होती. सुलक्षणाताई तुम्ही ही बघताय. मला माहीत आहे की मागच्यापेक्षा तर वायसीएम मध्ये चांगले डॉक्टर आलेले

आहेत. चांगली ट्रीटमेंट देण्याचा प्रयत्न होतोय. कधी कधी मोठया मनाने आपण ही गोष्ट कबूलही केली पाहिजे. आणि पुढच्या काळामध्ये पीजी इन्स्टीटयूट आल्याच्यानंतर म्हणजे कोणीतरी सांगितलं की पीजी इन्स्टीटयूट आणण्याचा घाट म्हणजे खरतर हा विषय राजकीय नाही किंवा एखादया पक्षाचा नाही. आपल्या सगळयांना असं वाटतय की ज्या पध्दतीन रुबी हेल्थ केअरच्या संदर्भामध्ये माझ्या अनेक सदस्यांनी याठिकाणी तक्रारी केल्या. मा. आयुक्तांना माझी विनंती आहे की एकदा त्याचे अग्रीमेंट सगळयांना दाखवा. म्हणजे ज्या पध्दतीने आशाताई एचबीओटी मशीनच्या संदर्भामध्ये या शहरातल्या गोरगरीबांना कमीत कमी पैशामध्ये ट्रीटमेंट घ्यावी अशा पध्दतीच्या भावना सांगत होत्या. ताई मी तुमच्या म्हणण्याशी १०० टक्के सहमत आहे. म्हणजे महापालिका पैसे कमविण्याचे साधन नाहीय हे लक्षात ठेवा पण ज्यावेळी एचबीओटीचा विषय येतो म्हणजे त्या मशीनच्या खोलात मला जायचे नाही. ती फॉरेनमधुन आली का आपल्या एमआयडीसीमध्ये बनविली की कुठे बनविली. मला या मुद्दयात जायचं नाही. कारण ती प्रक्रिया त्यावेळेस राबविलेली आहे. पण ही वस्तुस्थिती आहे की ज्या माणसाने ती मशीन तुम्हाला दिली. त्याला पैसे दिलेत की नाहीत. का एखादया माणसाच्या किंवा अधिका-याच्या चुकीमुळे आपण एखादया माणसाला आपण कुठेतरी घसरत घसरत आपण कुठेतरी घेऊन जातो. आपण विषय केला पाहिजे. खरतर सगळयाच गोष्टीचा आपण ज्यावेळेस विचार करतो. तीस वर्षाच्या कराराने केले पाहिजे म्हणजे हा विषय काय एवढा अर्जंट आमच्यासाठीही नव्हता. खरतर दत्ताकाका मी तुम्हाला एवढच सांगेन तालेरा हॉस्पिटल चालू आहे, बंद नाहीय. मी तुम्हाला मनापासून सांगतो आपण सर्वजण एक गोष्ट निश्चित ठरवू की या शहरामधल्या गोरगरीबांना चांगल्या पध्दतीची आरोग्य सुविधा मिळाली पाहिजे. शाळा आणि आरोग्य या दोन प्यारलल गोष्टी आपण दुर करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे आपण पीजी इन्स्टीटयूटच्या मागे लागलो आहोत. खरतर मला म्हणायच नाही की डॉ. रॉय आणि डॉ साळवे यांचे भांडण चाललय. ही भांडणे गेल्या अनेक वर्षापासूनचे होते. साक्षीदार आपण सर्वजण आहोत. माझी तुम्हाला सगळयांना विनंती आहे. मा. आयुक्त आणि मा. महापौर साहेब आरोग्याचा महत्वाचा विषय आहे. आणि या संदर्भामध्ये वायसीएममध्ये चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. मला माहीत नाही की रॉय साहेब वीस वर्षाचे या संदर्भामध्ये केले तर मला खात्री आहे की मागचा अनुभव कोणाला तरी डोळयासमोर ठेवूनच केला असणार. म्हणजे सत्ताधारी पार्टीचा पदाधिकारी जबाबदार असून सुध्दा आपण एखादी गोष्ट डोळयासमोर ठेवतो. सभागृहामध्ये एखादा प्रतिनिधी सदस्य

पोटतिडकीने एखादा विषय मांडतो. त्याच्यामागची भावनाच असते की त्याच्यामध्ये चांगल्या पध्दतीच्या सुधारणा झाल्या पाहिजेत. एखादया गोष्टीचा समाजाला फायदा झाला पाहिजे. त्याचा अधिकाधिक फायदा शहरातील अनेक लोकांना, गोरगरीब जनतेला मिळाला पाहिजे. हीच भावना आहे खरतर लक्षात ठेवा. आणि वायसीएमची आताची परिस्थिती आपण जर का बघितली, गेल्या वर्षभरापूर्वीची वायसीएमची परिस्थिती, गेल्या सहा महिन्यापूर्वीची वायसीएमची परिस्थिती आणि पुढच्या वर्षभराच्या नंतर पीजी इन्स्टीटयूट झाल्याच्यानंतर वायसीएमची परिस्थिती बघीतलीतर आपल्याला अप्रतिम आमुलाग्र असे बदल खरतर पुढच्या काळामध्ये करायचे आहेत. फक्त डॉक्टर करुन उपयोग नाही याची जाणीव आम्हाला आहे. कपाँऊडर बघितला पाहिजे, नर्सेसची संख्या वाढविली पाहिजे. बेडची संख्या वाढविली पाहिजे चांगल्या पध्दतीच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. या ही गोष्टीचा विचार आपल्याला पुढच्या काळामध्ये करावा लागणार आहे. मा. महापौर साहेब मी आपल्याला विनंती करतो. आपल्या विषयपत्रिकेवरील विषय आपण आज मंजुर करण्याचे ठरविले असेल तर मला असं वाटतं सर्व सन्मा. सदस्यांना या संदर्भामध्ये शंका असतील आपलं मत मांडायचे असेल नीट माहिती घ्यायची असेल तर मला असं वाटतं की एक सभा आपण जर पुढच्या काळामध्ये विषय मंजुर करायचा की नाही की विषय फेटाळायचा खरतर पुढच्या सभेपर्यंत जरी आपण निर्णय केला तर मला वाटतं की खुलाशाच्यानंतर आपण मा.आयुक्तांना आदेश दयावेत या संदर्भामधले आपलं म्हणणं काय ते सांगाव आणि काका या विषयामध्ये तुमचा विरोध आहे आमचा पाठींबा आहे. अशा पध्दतीची परिस्थिती सभागृहाच्या माध्यमातून नाही मी तुम्हाला सांगतो की आमचे ही काही म्हणणे नाही. जे तुमचे म्हणणे आहे तेच कदाचित आमचे म्हणणे असेल परंतु हा विषय चांगल्या पध्दतीने झाला पाहिजे, फेर झाला पाहीजे. एवढी या निमित्ताने आपल्या सगळयांची भावना आहे. मा. महापौर साहेब या निमित्ताने आपण खुलासा देण्यासाठी आदेश दयावेत आणि विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.डॉ. अनिल रॉय, [आरोग्य वैदयकीय अधिकारी ] -** मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हे वैदयकीय विभागाकडून आलेले विषय आहे एचबीओटी आऊटसोर्स करणेबाबत.

सदर मशीन सन २०१२ मध्ये खरेदी करणेत आलेले आहे. सन २०१३ साली इनस्टॉल झाल्यानंतर त्याबाबतीत अनेक आक्षेप करप्शन बाबत घेतले गेले. त्यावेळचे तत्कालीन आयुक्तांनी दोघांची कमिटी नेमली. नंतर आयआयटी मुंबईकडून सदर मशीन योग्य आहे की नाही हे तपासण्यासाठी त्यांना पत्र देणेत आले. आयआयटीने जेव्हा तपासण्याचे नाकारले. तेव्हा सीईओपी, पुणे त्यांचेकडे ते काम देण्यात आले. ते मशीन योग्य आहे का किंवा त्याची किंमत योग्य आहे का. तथापि सीईओपी, पुणे यांनी जेव्हा हे मशीन तपासले त्यामध्ये अनेक त्रुटी आढळल्या. त्यामध्ये त्यांनी काही बदल करणेबाबत सुचविले. त्यानंतर ठेकेदाराकडून ते बदल आपण करुन घेतले. त्यानंतर सीईओपी, पुणे यांनी मशीनचे किमंतीबाबत काही उल्लेख केला नाही. त्यानंतर ती मशीन चालू करणेत आली. साधारणपणे सन २०१४ च्या आसपास. ते मशीन एकदोन महिने चालले परत नादुरुस्त झाले. एएमसीच्या अंडर असल्यामुळे ते ठेकेदाराकडून सदर मशीन रिपेअर करुन घेण्यात आले. त्यानंतर परत सन २०१५ मध्ये ती मशीन बंद पडली. त्यानंतर आपण रिपेअरसाठी टेंडर काढले. ही जी रक्कम आपण बघतोय सात लाख रुपये ते टेंडर काढणेत आले. हे टेंडर काढण्यासाठी आणि ज्या व्यक्तीने मशीन पुरविले आहे मनाली इन्टरप्रायझेस त्यांनी ते टेंडर भरले. तथापि त्यांनी नंतर ते रिपेअर करण्यास नाकारले. त्यामुळे ते मशीन अजुन बंद अवस्थेत आहे. ते रिपेअर करणेस नाकारल्यामुळे आम्ही ठरवल की ते मशीन आऊटसोर्स कराव. जे कोणी चालविणार त्यांनीच मशीन रिपेअर करायची. त्यांनीच मेंटन करायची. आणि त्यांनीच त्यासाठी स्टाफ दयायचा. त्यामुळे आपण पेपरमध्ये पब्लिश केलेले होते. त्यामध्ये दोन संस्थानी इंटरेस्ट दाखविला होता. एक मे. ॲडव्हॅंट हेल्थकेअर म्हणून दिल्लीचे आणि एक मे. बॅरोमेडिक हेल्थकेअर प्रा. लि म्हणून पुण्याचे. बॅरोमेडिक हे स्वत: मशीन मॅन्यूफॅक्चरर आहे. एडव्हॅंटचे जे आहेत ते डॉक्टरच आहेत ते अनेक ठिकाणी मशीन चालवितात. मुंबई मध्ये दिल्लीमध्ये त्यांची अनेक ठिकाणी मशीन्स आहेत. पूर्ण पीसीएमसीमध्ये कुठल्याही हॉस्पिटलमध्ये अशी मशीन नाही. पुण्यामध्ये देखील हॉस्पिटलमध्ये आहे. ससूनमध्ये सध्या मशीन बंद अवस्थेत आहे. केईएमला देखील एक वर्षापासून बंद आहे. केईएमला प्रती तास तीन हजार पाच हजार घेतली जायची आपण जे आता प्रपोज केलेले आहे. पिंपरी चिंचवड ते हॉस्पिटलमध्ये जे रुग्ण असतील त्यांच्यासाठी पाचशे रुपये किंमत फक्त आपण ठेवलेली आहे. इतर प्रायव्हेट रुग्णांसाठी जी काही किंमत ठरवावयाची असेल त्यासाठी आपण टेंडर मागवतोय. वीस वर्षासाठी आपण त्यांना जागा मोफत देत आहोत हे खरे आहे. तथापि तीन वर्षानंतर चौथ्या

वर्षापासून रेव्हेन्यू शेअरींग बेसीसवर करायचे आहे. चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी ५ टक्के, सहाव्या आणि सातव्या वर्षासाठी १० टक्के, आठव्या आणि नवव्या वर्षासाठी १५ टक्के, दहाव्या वर्षापासून २० टक्के रक्कम जे काही त्यांना उत्पन्न मिळेल त्यातून त्यांनी महानगरपालिकेकडे जमा करायचे आहे. आपल्याकडे स्टाफची अडचण नक्कीच आहे आणि मॅडमने म्हणल की ते सर्टीफिकेट इतर कुठल्यातरी कामासाठी वापरता येईल पण नक्कीच वापरता येणार नाही, ते बेसमेंट आहे तिथे आयसीयू उभारता येत नाही, दुसर कुठलही काम तिथ होऊ शकत नाही. बेसमेंटमध्ये आपली लॉण्ड्री आहे त्याच्या शेजारील जागा आहे तिथे कुठलीही ओपीडी चालविता येणार नाही.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ३१५ विषय क्रमांक- १४

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील क्र.मसाभां/५/कावि/ ३८४/२०१८ दि.३१/०८/२०१८

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक- २९० दि.२७/०९/२०१८

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा विषय सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.ॲड. मोरेश्वर शेडगे –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १५

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग- मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.स्वभाअक/३/कावि/२९३/२०१८ दि.६/१०/२०१८

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०९/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र “अ”

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | १४८८४ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | १४६५८ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | ११८६६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-११३१४ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-७५९० सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ३७२४ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ८३६४ लाभार्थी | GOI+GOM=५०१.८४लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १६७.२८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६६९.१२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७४७८ लाभार्थी | GOI+GOM=४४८.६८लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४९.५६ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५९८.२४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत यावा.

**मा. संदिप कस्पटे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करणे करीता उपाययोजना करीत आहे. शहरातील ओला व सुका कचरा गोळा करणे, विलगीकरण करणे, वाहतूक करणे व प्रकिया करणेसाठी केलेली व्यवस्था, कचरा उचलून मोशी कचरा डेपोवर पोहच करण्यासाठी ठेकेदाराची नेमणूक तसेच ५०० टीपीडी चे मॅकेनिकल कंपोस्ट प्लॉन्ट, ३० टीपीडी वर्मी कंपोस्ट प्लॉन्ट, ५ टीपीडी प्लॅस्टीक टु फ्युल, ५ टीपीडी सेंद्रीय खत निर्मीती ची व्यवस्था केलेली आहे. पिंपरी चिंचवड शहर तीन तारांकित

नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करण्याकरीता प्रयत्नशील आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत तीन तारांकीत नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शहर सहभागी होणेस मान्यता देणेत यावी. तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहर हागणदारी मुक्तीसाठी सामुदायिक व सार्वजनिक शौचालयात करण्यात येत असलेली सुधारणा व देखभाल दुरुस्ती तसेच शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौचास बसू नये याकरीता महानगरपालिका उपाययोजना करीत आहे. महानगरपालिका हद्दीत उघडयावर शौचास कोणीही बसू नये याकरीता नवीन प्रभाग क्र. १ ते ३२ मध्ये ९० टक्के नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय उपलब्ध आहेत. तसेच आतापर्यंत महानगरपालिकेने केंद्र शासनाचे IHHL योजनेअंतर्गत एकूण ११७६५ कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधून वापर सुरु केलेला आहे. शहरातील सर्व पेट्रोलपंप सार्वजनिक वापराकरिता खुले करणेत आलेले आहेत. शहरात सर्व नागरिकांसाठी शौचालय सुविधा पुरेशी उपलब्ध असल्यामुळे व शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करीत आहे. उघडयावर कोणीही व्यक्ती शौचास बसत नसल्यामुळे स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत शहर ODF+, ODF++ प्रमाणिकरण करणेकरिता सहभागी होण्यास मान्यता देणेत यावी.

**मा. सुरेश भोईर -** मा. महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा. ॲड. मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणे दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक- ३१६ — विषय क्रमांक- १५
दिनांक ३१/१०/२०१८ — विभाग – मा. आयुक्त

संदर्भ – १) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२९३/२०१८ दि.६/१०/२०१८

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११

नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,८८,९५,०००/- व ९,०७,७५,०००/- असे एकुण र. रु १३,९६,७०,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/०९/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

प्रपत्र “अ”

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १४८८४ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १४६५८ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ११८६६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-११३१४ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण-७५९० सी.एस.आर(एनजीओ) |

| | | | |
|---|---|---|---|
| संख्या | | | मार्फत बांधकाम - ३७२४ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ४६५ सीटस | महिला–२०३सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष–२६२ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ८३६४ लाभार्थी | GOI+GOM=५०१.८४लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १६७.२८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६६९.१२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ७४७८ लाभार्थी | GOI+GOM=४४८.६८लाख | GOI = २०००/-व<br><br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१४९.५६ लाख | ULB=२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **५९८.२४ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला. तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास तीन तारांकित नामांकन (3 स्टार रेटींग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करणे करीता उपाययोजना करीत आहे. शहरातील ओला व सुका कचरा गोळा करणे, विलगीकरण करणे, वाहतूक करणे व प्रकिया करणेसाठी केलेली व्यवस्था, कचरा उचलून मोशी कचरा डेपोवर पोहच करण्यासाठी ठेकेदाराची नेमणूक तसेच ५०० टीपीडी चे मॅकेनिकल कंपोस्ट प्लॉन्ट, ३० टीपीडी वर्मी कंपोस्ट प्लॉन्ट, ५ टीपीडी प्लॅस्टीक टु फ्युल, ५ टीपीडी सेंद्रीय खत निर्मीती ची व्यवस्था केलेली आहे. पिंपरी चिंचवड शहर तीन तारांकित

नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करण्याकरीता प्रयत्नशील आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत तीन तारांकीत नामांकन (3 स्टार रेटींग) साठी शहर सहभागी होणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहर हागणदारी मुक्तीसाठी सामुदायिक व सार्वजनिक शौचालयात करण्यात येत असलेली सुधारणा व देखभाल दुरुस्ती तसेच शहरातील कोणताही नागरिक उघडयावर शौचास बसू नये याकरीता महानगरपालिका उपाययोजना करीत आहे. महानगरपालिका हद्दीत उघडयावर शौचास कोणीही बसू नये याकरीता नवीन प्रभाग क्र. १ ते ३२ मध्ये ९० टक्के नागरिकांकडे वैयक्तिक शौचालय उपलब्ध आहेत. तसेच आतापर्यंत महानगरपालिकेने केंद्र शासनाचे IHHL योजनेअंतर्गत एकूण ११७६५ कुटुंबांनी वैयक्तिक शौचालय बांधून वापर सुरु केलेला आहे. शहरातील सर्व पेट्रोलपंप सार्वजनिक वापराकरिता खुले करणेत आलेले आहेत. शहरात सर्व नागरिकांसाठी शौचालय सुविधा पुरेशी उपलब्ध असल्यामुळे व शासनाने नमुद केलेले सर्व निकष पुर्ण करीत आहे. उघडयावर कोणीही व्यक्ती शौचास बसत नसल्यामुळे स्वच्छ सर्व्हेक्षण २०१९ अंतर्गत शहर ODF+, ODF++ प्रमाणिकरण करणेकरिता सहभागी होण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.ज्ञानदेव थोरात –** मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक- १६

दिनांक ३१/१०/२०१८ विभाग – मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र मातंवि/३/कावि/१२३/२०१८ दि.८/१०/२०१८

पिंपरी चिंचवड शहराचे एक अनोखे स्थान तयार करणे, नागरिकांची जीवनशैली उंचावण्यासाठी एक उच्च दर्ज्याचे शहर म्हणून ओळख निर्माण करणे हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उद्दिष्ट आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने शहर परिवर्तनाचे उद्दिष्ट साधण्याकरिता

२ जानेवारी २०१८ पासून शहर परिवर्तन कार्यालयाची स्थापना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या लाभार्थींत सुधारणा करण्यासाठी दीर्घकालीन धोरण विकसित करण्यासाठी शहर परिवर्तन कार्यालय कार्यरत आहे. पिंपरी-चिंचवड शहराची तुलना भारतीय आणि निवडक जागतिक शहरांशी करण्यात येत आहे. त्यासाठी शहराचा सर्वांगिण विकास करणे, शहरातील प्रत्येक नागरिकाला शहराची ओळख निर्माण करणेकामी विकास धोरणात समाविष्ट करणे, चिरस्थायी पर्यावरणपुरक शहर आणि शहराची वेगळी ओळख निर्माण करणे व शहर विकासासाठी आवश्यक परिणामांची वेगवान अंमलबजावणी करणेकामी कार्यप्रणाली राबविणेत येत आहे. शहर परिवर्तन कार्यालयामार्फत महानगरपालिकेस शहराची सध्याची परिस्थिती व भविष्यकालीन स्थितीमधील फरक/अंतर ओळखण्यास व अंमलबजावणीस योग्य उपाय शोधण्यास मदत करणेत येत आहे.

पहिल्या टप्प्यात शहर परिवर्तन कार्यालयामार्फत शहर विकास धोरण आराखडा तयार करणेचे प्रस्तावित असून महानगरपालिकेचे अधिकारी/विभागप्रमुख यांच्या सहकार्याने आराखड्याचा प्रारुप मसुदा तयार करणेत आला आहे. नागरी समुह संघटक व शहरातील लोकप्रतिनिधी यांच्या मान्यतेने त्यास अंतिम स्वरुप देणेत आले आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने १४,००० पेक्षा अधिक नागरिकांचे सर्वेक्षण केले असून त्याद्वारे प्राप्त प्रतिसाद/सुचनांचा शहर विकास धोरणात समावेश करणेत आलेला आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने एक सर्वसमावेशक, नागरिक प्रतिबद्ध सर्वेक्षण केले असून ज्याद्वारे सर्व भागातील नागरिकांकडून प्रतिसाद/सुचना प्राप्त केल्या आहेत. १४,००० पेक्षा अधिक नागरिकांचे प्रतिसाद प्राप्त झाले आहेत आणि त्यांचे विश्लेषण केले आहे. सर्वेक्षणातील निष्कर्ष शहर विकास धोरण तयार करणेसाठी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने नागरी समस्या समजून घेण्यासाठी विविध विभागांशी व्यापक चर्चा केली आहे. तसेच, नागरीकांचे प्रतिसाद/सुचनांचा अंतर्भाव धोरण आराखड्यात करुन शहरातील लोकप्रतिनिधींच्या संमतीने एक गतिमान कार्यप्रणाली तयार करणेत आलेली आहे.

शहर परिवर्तन कार्यालयाने शहरातील नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याशी सल्लामसलत करून धोरणाचा प्रारुप मसुदा तयार करुन नागरीकांच्या सुचनांचा अंतर्भाव

करुन मसुद्यास अंतरिम स्वरुप देण्यात आले आहे. त्यामध्ये ६ प्रमुख कैंद्रित क्षेत्रांची निवड करणेत आली आहे. शहाराचे व्यवस्थापन सुलभ होण्यासाठी महापालिकेचे ध्येय, उद्दिष्ट, मुल्ये व धोरण आराखडा, २२ धोरणात्मक उपक्रमासह (सोबत प्रपत्र "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे) तसेच, शहर परिवर्तन विकास आराखड्या विषयक तपशीलवार स्पष्टीकरण (सोबत प्रपत्र "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे) धोरणात्मक उपक्रमांचे नियोजन केले आहे.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी स्थापन करणेत आलेल्या शहर परिवर्तन कार्यालयामार्फत शहरात विकास धोरण राबविणेकामी तयार करणेत आलेल्या शहर परिवर्तन विकास आराखड्यास महापालिकेचे ध्येय, उद्दिष्ट, मुल्ये व धोरण आराखडा, २२ धोरणात्मक उपक्रमासह (सोबत प्रपत्र "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे) तसेच, शहर परिवर्तन विकास आराखड्या विषयक तपशीलवार स्पष्टीकरण (सोबत प्रपत्र "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे) यांस मान्यता देणेत यावी.

**मा.बाबू उर्फ प्रेमकुमार नायर** – मा. महापौर साहेब, वरील ठरावास अनुमोदन देतो.

**मा. नामदेव ढाके** – मा. महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे राबविणेत येणा-या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांचे 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प' असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्रमांक १२ तळवडे (रुपीनगर) हा प्रभाग विस्तृत असून या मध्ये तळवडे गावठाण रुपीनगर, ताम्हाणेवस्ती जोतिबानगर, गणेशनगर त्रिवेणीनगर याभागाचा अंर्तभाव आहे. तसेच देहू तिर्थक्षेत्र इन्फोटेक पार्क चाकण एम.आय.डी.सी. कडे जाणारी वाहतुक ही मोठ्या प्रमाणात आहे. या भागातील नागरिकांना जाणे-येणे सोईचे व्हावे या करीता मंजुर विकास योजनेतील खालील रस्ते नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूसंपादन करणे व रस्ते विकसित करणे आवश्यक आहे.

१. त्रिवेणीनगर ते तळवडे – २४ मी. रस्त्यापासून टॉवरलाईन जवळील गट नं. १६५/१६६ पासून गार्डन (१/६) व खेळाचे मैदान (१/७) यांचेमधून जाणारा व रुपीनगरला मिळणारा विकास योजनेतील १२ मी. रस्ता.

२.	देहू आळंदी ३० मी. रस्त्यापासून टाऊन हॉल (१/४०) व पार्किंग (१/४१) या दोन्ही आरक्षणांचे शेजारुन राणे इंडस्ट्रीज शेजारील बाठे वस्तीला जोडणारा १२ मी. रस्ता.

३.	देहू आळंदी ३० मी. रस्ता **IT** पार्क चौकापासून पुढे ग.नं. ४३६, ४३५, ४०६, ४१५ पासून ४२३ व ग.नं. २५० पर्यंत रुपीनगर पर्यंत जोडणारा १८.० मी. विकास योजनेतील रस्ता.

४.	तळवडे चिखली २४.० मी. शिव रस्त्यापासून ग.नं. १३४/१३१ पासून गणेशनगर चौकापर्यंत विकास योजनेतील १२.० मी. चा रस्ता.

५.	तळवडे चिखली शिव २४.० मी. रस्त्यापासून ग.नं. ११६/११७ पासून (उद्यान आ.क्र.१/२२) शेजारील १८.० मी. चा त्रिवेणीनगर ते तळवडे २४.० मी. रस्त्यापर्यंत व तेथून पुढे ग.नं. १७८/१७९ पासून तळवडे हद्दीपर्यंतचा (ग.नं. २०३ पर्यंत) १८.० मी. चा रस्ता

वरीलप्रमाणे रस्ते भूसंपादनाची कार्यवाही नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार मान्यता देणेत यावी.

**मा. सुरेश भोईर –** मा. महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा. ज्ञानदेव थोरात** – मा. महापौर साहेब, उपसूचना स्वीकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणे दुरूस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक- ३१७	विषय क्रमांक- १६

दिनांक- ३१/१०/२०१८	विभाग – मा. आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र

क्र.मातंवि/३/कावि/१२३/२०१८ दि.८/१०/२०१८

पिंपरी चिंचवड शहराचे एक अनोखे स्थान तयार करणे, नागरिकांची जीवनशैली उंचावण्यासाठी एक उच्च दर्ज्याचे शहर म्हणून ओळख निर्माण करणे हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उद्दिष्ट आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने शहर परिवर्तनाचे उद्दिष्ट साधण्याकरिता

२ जानेवारी २०१८ पासून शहर परिवर्तन कार्यालयाची स्थापना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या लाभार्थींत सुधारणा करण्यासाठी दीर्घकालीन धोरण विकसित करण्यासाठी शहर परिवर्तन कार्यालय कार्यरत आहे. पिंपरी-चिंचवड शहराची तुलना भारतीय आणि निवडक जागतिक शहरांशी करण्यात येत आहे. त्यासाठी शहराचा सर्वांगिण विकास करणे, शहरातील प्रत्येक नागरिकाला शहराची ओळख निर्माण करणेकामी विकास धोरणात समाविष्ट करणे, चिरस्थायी पर्यावरणपुरक शहर आणि शहराची वेगळी ओळख निर्माण करणे व शहर विकासासाठी आवश्यक परिणामांची वेगवान अंमलबजावणी करणेकामी कार्यप्रणाली राबविणेत येत आहे. शहर परिवर्तन कार्यालयामार्फत महानगरपालिकेस शहराची सध्याची परिस्थिती व भविष्यकालीन स्थितीमधील फरक/अंतर ओळखण्यास व अंमलबजावणीस योग्य उपाय शोधण्यास मदत करणेत येत आहे.

पहिल्या टप्प्यात शहर परिवर्तन कार्यालयामार्फत शहर विकास धोरण आराखडा तयार करणेचे प्रस्तावित असून महानगरपालिकेचे अधिकारी/विभागप्रमुख यांच्या सहकार्याने आराखड्याचा प्रारुप मसुदा तयार करणेत आला आहे. नागरी समुह संघटक व शहरातील लोकप्रतिनिधी यांच्या मान्यतेने त्यास अंतिम स्वरुप देणेत आले आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने १४,००० पेक्षा अधिक नागरिकांचे सर्वेक्षण केले असून त्याद्वारे प्राप्त प्रतिसाद/सुचनांचा शहर विकास धोरणात समावेश करणेत आलेला आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने एक सर्वसमावेशक, नागरिक प्रतिबद्ध सर्वेक्षण केले असून ज्याद्वारे सर्व भागातील नागरिकांकडून प्रतिसाद/सुचना प्राप्त केल्या आहेत. १४,००० पेक्षा अधिक नागरिकांचे प्रतिसाद प्राप्त झाले आहेत आणि त्यांचे विश्लेषण केले आहे. सर्वेक्षणातील निष्कर्ष शहर विकास धोरण तयार करणेसाठी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. शहर परिवर्तन कार्यालयाने नागरी समस्या समजून घेण्यासाठी विविध विभागांशी व्यापक चर्चा केली आहे. तसेच, नागरीकांचे प्रतिसाद/सुचनांचा अंतर्भाव धोरण आराखड्यात करुन शहरातील लोकप्रतिनिधींच्या संमतीने एक गतिमान कार्यप्रणाली तयार करणेत आलेली आहे.

शहर परिवर्तन कार्यालयाने शहरातील नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याशी सल्लामसलत करून धोरणाचा प्रारुप मसुदा तयार करुन नागरीकांच्या सुचनांचा अंतर्भाव करुन मसुद्यास अंतरिम स्वरुप देण्यात आले आहे. त्यामध्ये ६ प्रमुख केंद्रित क्षेत्रांची निवड

करणेत आली आहे. शहाराचे व्यवस्थापन सुलभ होण्यासाठी महापालिकेचे ध्येय, उद्दिष्ट, मुल्ये व धोरण आराखडा, २२ धोरणात्मक उपक्रमासह (सोबत प्रपत्र "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे) तसेच, शहर परिवर्तन विकास आराखड्या विषयक तपशीलवार स्पष्टीकरण (सोबत प्रपत्र "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे) धोरणात्मक उपक्रमांचे नियोजन केले आहे.

सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी स्थापन करणेत आलेल्या शहर परिवर्तन कार्यालयामार्फत शहरात विकास धोरण राबविणेकामी तयार करणेत आलेल्या शहर परिवर्तन विकास आराखड्यास महापालिकेचे ध्येय, उद्दिष्ट, मुल्ये व धोरण आराखडा, २२ धोरणात्मक उपक्रमासह (सोबत प्रपत्र "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे) तसेच, शहर परिवर्तन विकास आराखड्या विषयक तपशीलवार स्पष्टीकरण (सोबत प्रपत्र "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे) यांस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे राबविणेत येणा-या इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांचे 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प' असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्रमांक १२ तळवडे (रुपीनगर) हा प्रभाग विस्तृत असून या मध्ये तळवडे गावठाण रुपीनगर, ताम्हाणेवस्ती जोतिबानगर, गणेशनगर त्रिवेणीनगर याभागाचा अंर्तभाव आहे. तसेच देहू तिर्थक्षेत्र इन्फोटेक पार्क चाकण एम.आय.डी.सी. कडे जाणारी वाहतुक ही मोठ्या प्रमाणात आहे. या भागातील नागरिकांना जाणे-येणे सोईचे व्हावे या करीता मंजुर विकास योजनेतील खालील रस्ते नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार भूसंपादन करणे व रस्ते विकसित करणे आवश्यक आहे.

१. त्रिवेणीनगर ते तळवडे – २४ मी. रस्त्यापासून टॉवरलाईन जवळील गट नं. १६५/१६६ पासून गार्डन (१/६) व खेळाचे मैदान (१/७) यांचेमधून जाणारा व रुपीनगरला मिळणारा विकास योजनेतील १२ मी. रस्ता.

२. देहू आळंदी ३० मी. रस्त्यापासून टाऊन हॉल (१/४०) व पार्किंग (१/४१) या दोन्ही आरक्षणांचे शेजारुन राणे इंडस्ट्रीज शेजारील बाठे वस्तीला जोडणारा १२ मी. रस्ता.

३. देहू आळंदी ३० मी. रस्ता IT पार्क चौकापासून पुढे ग.नं. ४३६, ४३५, ४०६, ४१५ पासून ४२३ व ग.नं. २५० पर्यंत रुपीनगर पर्यंत जोडणारा १८.० मी. विकास योजनेतील रस्ता.

४. तळवडे चिखली २४.० मी. शिव रस्त्यापासून ग.नं. १३४/१३१ पासून गणेशनगर चौकापर्यंत विकास योजनेतील १२.० मी. चा रस्ता.

५. तळवडे चिखली शिव २४.० मी. रस्त्यापासून ग.नं. ११६/११७ पासून (उद्यान आ.क्र.१/२२) शेजारील १८.० मी. चा त्रिवेणीनगर ते तळवडे २४.० मी. रस्त्यापर्यंत व तेथून पुढे ग.नं. १७८/१७९ पासून तळवडे हद्दीपर्यंतचा (ग.नं. २०३ पर्यंत) १८.० मी. चा रस्ता

वरीलप्रमाणे रस्ते भूसंपादनाची कार्यवाही नवीन भूसंपादन कायदा २०१३ नुसार मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजेंद्र गावडे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३१८ विषय क्रमांक- १७

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.नगरसचिव

**विधी समिती**

अ) दि.१८/०८/२०१८ व दि.२४/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०७/०९/२०१८ व दि.१४/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.२१/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.राजेंद्र गावडे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३१९ विषय क्रमांक- १८

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दिनांक ०४/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक १८/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.राजेंद्र गावडे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३२० विषय क्रमांक- १९

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) दिनांक २८/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजेंद्र गावडे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३२१ विषय क्रमांक- २०

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) दि.१०/०८/२०१८ व दि.१३/०८/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२४/०८/२०१८ व दि.१४/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

क) दि.१४/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजेंद्र गावडे** – मा. महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक- ३२२ विषय क्रमांक- २१

दिनांक- ३१/१०/२०१८ विभाग –मा.नगरसचिव

**<u>मा.शिक्षण समिती</u>**

अ) दिनांक ०६/०९/२०१८ व दिनांक १०/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दिनांक २१/०९/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

**मा.ॲड.मोरेश्वर शेडगे** – मा. महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आल असता –

अनुकूल -८१ प्रतिकूल- ०


अशी मते पडली व सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. महापौर** – सर्वाना दिवाळीच्या शुभेच्छा देवून व सर्वांचे आभार मानून आजची सभा संपले असे मी जाहिर करतो.

**(राहुल गुलाब जाधव)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/६/कावि/५८२/२०१८
दिनांक - २८/१२/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.